करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग : ३–४

संपादक
मा. वि. गुजर, बी. ए.

किंमत १३ रुपये

म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार
यांना
प्रेमादरपूर्वक भेट
मा. वि. गुर्जर
२०-७-१९५८



करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

भाग तिसरा व चवथा

इ. स. १७६१ ते १८४४



संपादक

मा. वि. गुर्जर, बी. ए.



शके १८८४ इ. स. १९६२

प्रकाशक :
मा. वि. गुजर
१३२१ कसबा पेठ, पुणें २.

●

पुस्तकें मिळण्याचें ठिकाण–
हिस्ट्री ऑफिस, न्यू पॅलेस, कोल्हापूर
किंवा प्रकाशक यांच्याकडे

●

किंमत

रु. १३

(तेरा रुपये)

●

: मुद्रक :
मा. प. तळेकर
श्रीदत्त मुद्रणालय,
३३५ शनवार, पुणें २.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग तिसरा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

छत्रपति शिवाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १७६१ ते इ. स. १८१३

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८४ इ. स. १९६२

प्रस्तावना : ३

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा तिसरा भाग आहे. यांत कोल्हापूर स्टेट रेकॉर्डीतून निवडलेले कागद छापले आहेत या कागदपत्रांची संख्या ४८५ असून ते सर्व छत्रपति शिवाजीमहाराज करवीर, (इ. स. १७६१ ते इ. स. १८१३) यांच्या कारकीर्दीतील आहेत. या लेखांतील ऐतिहासिक मजकुराचें थोडक्यांत वर्णन पुढें केलें आहे.

महाराणी जिजाबाई यांनीं अनुबाई घोरपडे, इचलकरंजीकर यांना जें आज्ञापत्र लिहिलें त्यांत छत्रपति संभाजीमहाराज, करवीर यांची धाकटी राणी कुसाबाई यांना पुत्र झाला त्याबाबत निर्माण झालेला संदेह कसा दूर केला ही माहिती सांपडते (ले. २). माधवराव बल्लाळ पेशवे व त्यांचे चुलते रघुनाथ बाजीराव ऊर्फ राघोबादादा यांनीं मिरजेस वेढा घातला. हा उल्लेख छत्रपति शिवाजीमहाराज करवीर यांच्या ता. २५-१२-१७६२ च्या पत्रांत आढळतो. जिवाजी बिश्राम यांनीं किल्ले प्रसिद्धगड, किल्ले मनोहरगड व जंजिरे सिंधुदुर्ग या करवीर राज्याच्या तीन्ही महास्थळांस उपसर्ग दिला आणि ते व राणोजी घोरपडे सेनापति उभयता या राज्यांत मर्यादेनें वर्तणूक करीत नाहीत ही माहिती महाराणी जिजाबाई यांनीं माधवराव पेशवे, राघोबादादा व त्यांचे कारभारी सखाराम भगवंत बोकील ऊर्फ सखारामबापू यांना लिहिलेल्या आज्ञापत्रांत आढळते (ले. ७.) महाराणी जिजाबाई यांच्याकडे सरदेशमुखीचा हिशेब देण्याबद्दल मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार यानी आपल्या कमाविसदारास पत्र पाठविले [ले. १४]. पुढे मुरारराव घोरपडे यांचा मुक्काम धारवाड येथें लष्करांत असतांना त्यांना महाराणी जिजाबाई यांनीं सामानगड या ठिकाणीं हुजूरांची भेट घेण्याबाबत आज्ञा केली हा उल्लेख ले. १५ मध्यें आढळतो. माधवराव पेशवे यांनीं महाराणी जिजाबाईच्या स्वाधीन मनोली तालुका व सौंदत्ती ठाणें केले ही माहिती ले. ६ व ले. १८ मध्यें आहे. कैलासवासी संभाजीमहाराज करवीर यांचे देवालय करवीर येथे पंचगंगातीरी बांधून त्यांत श्रीची स्थापना केली. तेव्हां तेथील पूजा वगैरे खर्चाबद्दल परगणे कागल व तालुके रुकडी येथील सरनाइकाचें वतन श्रीकडे दिलें; त्याबद्दल छत्रपति शिवाजीमहाराज करवीर यांनीं राणोजी घोरपडे सेनापति यांना एक आज्ञापत्र पाठविले (ले. २०). महाराणी जिजाबाई व पुणे दरबार यांच्यामध्यें झालेल्या करारमदाराच्या कलमांची विस्तृत माहिती ले. २८ व ले. २९ मध्यें आहे. करवीर राज्यकारभाराच्या कामकाजाची सर्व भिस्त यशवंतराव सिंदे, सुभेदार यांजवर आहे हा मजकूर सखारामबापू यांना लिहिलेल्या एका आज्ञापत्रांत आढळतो (ले. ३१). महाराणी दुर्गाबाई करवीर यांनीं नारायणराव बल्लाळ

पेशवे व सखारामबापू यांना जे आज्ञापत्र पाठविलें त्यांत करवीर महाराजांच्या काम-काजावर लक्ष द्यावे ही आज्ञा केली होती. यासंबंधीं महत्त्वाच्या गोष्टी ले. ३२ मध्यें आढळतात. तसेच करवीर राज्याच्या कारभारांत वावरणाऱ्या थोर व्यक्ति यशवंतराव शिंदे सरसुभेदार, वेदमूर्ति महादेवशास्त्री फोंडेकर जिवाजी भोसले आकोजी नेवरे व आपाजी शामजी यांच्याकडे सोपविलेल्या कामकाजाची ओळख पटते. पुणे दरबारांतील प्रमुख मुत्सद्द्यांशीं त्यांनीं ज्या वाटघाटी केल्या त्याची माहिती ले. ३१; ३२; ३३; व ३४ मध्यें दिली आहे.

करवीरकरांनी म्हैसूर राज्याच्या हैदरअलीशी दोस्ती करून राघोबादादांचा पक्ष घेतला आणि पुणे दरबार अथवा बारभाई यांचा उच्छेद करण्याचे राजकारण स्वीकारिले हा उल्लेख ले. ३६ मध्ये आढळतो. या राघोबादादा-प्रकरणासंबंधी हकीकत ले. ४०, ४१, ४३, ४८ मध्ये सांपडते. सांवशीच्या लढाईत बारभाईची फौज गारद होऊन बार-भाईचे सेनाधिकारी पांडुरंगराव पटवर्धन हे हैदरअल्लीचे लष्करांत पाडाव आले त्या प्रसंगी शिवाजीमहाराज करवीर यांनी भारी फौजेचा जमाव करून बारभाईचे फौजेस खूप तंबी करावी व त्याचा मुलुख मारून खंडणी घ्यावी असे हैदरअल्लीने महाराजांना सुचविले (ले. ४९). पुढे हैदरअल्ली भारी फौज व भारी तोफखाना घेऊन श्रीरंग पट्टणाहून कूच करून निघाला. हुबळीच्या ठाण्यांत हैदरअल्लीची कांही फौज होती. त्या फौजेबरोबर बारभाईंचा फौजबंद सरदार परशुरामभाऊ पटवर्धन यांनी युद्ध केले. या युद्धांत पटवर्धनांची फौज फरारी झाली, ही हकीकत हैदरअल्लीने यशवंतराव शिंदे सरसुभेदार करवीर राज्य यांना लिहिलेल्या पत्रांत आहे (ले. ५१). या प्रकरणा-संबंधी अधिक माहिती ले. ५२ व ५४ मध्ये आहे.

महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबावा यांनीं करवीरचे कोटास वेढा दिला त्या समयीं महाराजांच्या सरदारांनीं कोटाबाहेर जाऊन शत्रूंशीं केलेल्या झुंजांची माहिती ले. ५७ मध्ये आहे. राणोजी घोरपडे, सेनापति व अंताजी शामजी यांनीं करवीर सरकारच्या प्रांतांत धुमाकूळ मांडिला, तेव्हां सेनापतींची कुमक न करण्याबाबत महाराजांनी व्यंकट-राव घोरपडे इचलकरंजीकर यांना आज्ञा केली ही माहिती ले. ६१ मध्ये आहे. पुढे हैदरअल्ली व बारभाई यांचा सल्ला झाला.

करवीरकरांना देखील बारभाईशी सल्ला करणे जरूर असल्यास त्याप्रमाणे त्यांनीं सटवाजी भोसले यांस त्या कामगिरीवर सत्वर रवाना करावे, हा मजकूर हैदरअल्लीने शिवाजीमहाराजांस पाठविलेल्या पत्रांत आढळतो (ले. ६५). यासंबंधी विशेष माहिती ले. ६६ मध्ये आहे. छत्रपति शिवाजीमहाराज करवीर व बारभाई यांच्यामध्ये घडून येणाऱ्या करारमदाराची तपशीलवार कलमे ले. ६७ मध्ये आहेत. भुदरगडकरी यांनीं अमर्यादा करून लबाडी आरंभिली. त्यांस राणोजी घोरपडे, सेनापति व विरूपाक्ष आणाजी सामील झाले. तेव्हां त्यांना ताकीद करण्याबाबत शिवाजीमहाराजांनीं बारभाईचे प्रमुख

कारभारी बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांना एक आज्ञापत्र पाठविले, हा मजकूर ले. ६८ मध्ये आहे. सामानगडचे अश्वारूढ, तटसरनोबत, सदरबारगीर, नाईकवडी व समस्त लोक यांनीं शिवाजीमहाराजांना कबुलकतबा बेलभंडाऱ्यासहित लिहून दिला, ही माहिती ले.६९ मध्ये आहे. यासंबंधी अधिक माहिती ले. ७० मध्ये आहे. भुदरगड किल्ल्याच्या गडकऱ्यांनीं अमर्यादा वर्तणूक करून काळोखी लावून घेतली. तेव्हा हा काळोखीचा डाग काढण्याबाबत गडकऱ्यांनीं लक्ष्मीबाई घोरपड्यांना विनंती केली (ले. ७१).

यशवंतराव शिंदे, सेनासुभा व सरसुभेदार, करवीर, यांना पोर्तुगीज ऊर्फ फिरंगी मुक्काम बंदरगोवा यांनीं ता. ३-११-१७८१ रोजीं दोस्तीबाबत पत्र पाठविलें. (ले. ७४). खेम सांवत भोसले सरदेसाई सांवतवाडीकर यांनीं फितूर होऊन शिवाजीमहाराज करवीर यांच्यावर समशेर धरण्याचा जुल्म करून रांगणा किल्ल्यास वेढा दिला. तेव्हां त्यांचा पाडाव करण्यासाठीं गोवा बंदरच्या फिरंग्याची मदत मिळविण्याबाबत यशवंतराव सिंदे यांनीं पोर्तुगीज जनरलशीं पत्रव्यवहार केला. हा प्रकार ले.७६,७७,७८,८०,८१,८२,८३ व ८४ या लेखांवरून निदर्शनास येतो. लेखांक ८५ व ८६ हीं पत्रें चंदीचंदावर व भागानगर या दरबारांतील बातमी देणारी आहेत. स्वामींच्या राज्याशीं व किल्लेकोट जंजिरे याशीं दुष्ट बुद्धि धरतील त्यांचे मिळणींत मिळणार नाहीं असें आश्वासन खेम सांवत भोसले, सरदेसाई प्रांत कुडाळ, यांनीं शिवाजीमहाराजांना लिहून दिलें (ले. ८७). किल्ले भुदरगडबाबत निभावून द्यावयाच्या अठरा कलमांची ता. ३०-३-१७८३ ची एक यादी उपलब्ध आहे (ले. ८८). किल्ले सामानगड येथील लोकांनीं स्वामिनिष्ठेची शपथ घेतली त्याबाबत ता. ३०-११-१७८३ ची एक यादी उपलब्ध आहे. त्या यादींत किल्ल्यांत कारभार करीत असलेल्या अंमलदारांचे व लोकांचे निरनिराळे हुद्देदेखील दर्शविले आहेत (ले. ९०). म्हैसूरच्या टिपूचा सरदार कुमदान यांचा मुक्काम कित्तूर येथें असतांना शिवाजीमहाराजांनीं त्यांना ता. १५-९-१७८४ रोजीं जें पत्र पाठविलें त्यात प्रीतीराव चव्हाण, हिंमतबहादर यांचा उल्लेख आहे (ले. ९६). करवीर राज्याचे सरदार बाबुराव विठ्ठल केदारजी माने व राघो विठ्ठल यांस फौज देऊन टिपूकडे पाठविलें, हा मजकूर शिवाजीमहाराजांनीं कृष्णराव यांस पाठविलेल्या आज्ञापत्रांत आढळतो (ले. ९८). तोरगल, मनोली प्रांतांत अबदुल काजी यास फौजेनें उपद्रव देऊं नये असें शिवाजीमहाराजांनीं टिपूचा सरदार बुरानउद्दीनखां यांस कळविण्यास सांगितलें [ले. १०३]. नवाबवालाजनाब यांच्याकरिता हुजरून वस्त्रें जवाहिर, शिरपेंच व थैल्या समवेत पत्रें देऊन सखो शिवदेव यांस रवाना केलें हा मजकूर रंभाजीराव जयवंत निंबाळकर यांस शिवाजीमहाराजांनीं पाठविलेल्या आज्ञापत्रांत आढळतो (ले. १०६). खेम सावंत भोसले यांस नतीजा द्यावयाचा करार केला, याबाबत माहिती पोर्तुगीज अधिकारी गोवा बंदर यांनीं शिवाजीमहाराजांस जे पत्र पाठविलें त्यांत मिळते

(ले. १०७). रत्नाकरपंत राजाज्ञा व रखमाजी भोसले अनूरकर यांच्यामध्यें तुरकवाडी येथें लढाई झाली त्याचें वृत्त ले. १०८ मध्यें आहे.

यशवंतराव राणोजी घाटगे, सर्ज्याराव देसाई, तालुके कागल यांना शिवाजीमहाराजांनीं देसकतीचें वतन करार करून दिलें, ही माहिती ले. ११४ मध्यें आहे. बाळाजी राम व रघुनाथ पै यांना महाराजांनीं जनरल आबर कॉंबी, मुंबई यांजकडे कामकाजासाटीं पाठविले असता तें कामकाज त्यांनीं यत्न-मेहनत करून महाराजांचे मनोदयानुरूप करून दिले, ही हकीकत महाराजांनीं पितांबर चतुरभुज हिराचंद सावकार मुंबई यांस लिहिलेल्या पत्रांत सांपडते (ले. ११५). हिंमतबहाद्दरीच्या हक्काचे रुपये वसूल करणें किती कठीण आहे आणि त्या देशांतील रयतेचे किती हाल चालले आहेत या गोष्टीचें वर्णन मुकुंदराव पवार, सरदेसाई, परगणे खानापूर यांनीं प्रीतीराव चव्हाण, हिंमतबहाद्दर ममलकतमदार यांस लिहिलेल्या पत्रांत आढळतें (ले. ११६). वाडीकर सांवताचा मुलुख छत्रपतिमहाराज करवीर यांनीं सोडावा, त्याबाबत परशुराम रामचंद्र पटवर्धन यांनीं महाराजांचे कारभारी बाल जोशीराव यांस पत्र पाठविलें (ले. ११७). परशुराम रामचंद्र पटवर्धन यांजकडून राजमंडलचे जाबसाल होऊन यावयाचे होते. त्याबाबत इ. स. १७९३–९४ ची एक यादी उपलब्ध आहे. (ले. १२०). बच्याजी बल्लाळ व बळवंतराव गणेश हे हुजूरचे आज्ञेप्रमाणें नाना फडणिसाशीं वाटाघाटी करीत होते, हा मजकूर शिवाजीमहाराजांनीं नाना फडणीस यांना पाठविलेल्या आज्ञापत्रांत आढळतो (ले. १२१). परशरामभाऊ पटवर्धन यांजबरोबर केलेल्या करारमदाराच्या शर्ती अमलांत आणण्याबाबत कोणत्या अडचणी येतात त्याचें दिग्दर्शन बच्याजी बल्लाळ यांनीं तासगांवाहून सरखवास बापूस पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. १२८ व १२९). जोत्याजी यादव यास तासगांवास जाऊन बोलणें करून प्रांत सोडवून घेण्याची हुजूरनें आज्ञा केली, ही माहिती ले. १३०, १३१ व १३४ मध्यें आहे. तहाचे बोलणे ठरल्याप्रमाणें फडशा होण्यास काय अडचणी येतात व त्या दूर कशा होतील त्याबाबत शिवाजीमहाराजांनीं परशुरामभाऊ पटवर्धन यांस आज्ञापत्र पाठविलें (ले. १३३). याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. १३५, १३६, १४२, १९९ या लेखांत आहे. परशुराम रामचंद्र पटवर्धन यांजकडून हुजूरनिसबतीचीं जीं कामें ठरावांत आणावयाचीं आहेत, त्याबाबत माहिती ले. १४३, १४४, १४६, १४७, १४८, १४९, १५०, १५४, १५५, २०१ व २१० या लेखांत आहे. घोरपडे, सेनापति व घोरपडे इचलकरंजीकर या दोन घराण्यांमध्यें सरंजामी मुलखाची वांटणी झाली, त्याबाबत माहिती इ. स. १७९५–९६ इसवीच्या यादीमध्यें आहे (ले. १५१–१५२). इंग्रज जनरल कंपनीसरकार याशीं दोस्ती संपादन करण्यासाठीं शिवाजीमहाराजांनीं लाला नगीनदास सावकार मुक्काम जंजिरे मुंबई यास खटपट करण्यास आज्ञा केली. या समयीं नागोजी घाटगे झुंजारराव हे हुजूरून काम करणारे होते (ले. १५३, १६८, १९८).

सावनूरकर नबाब अबदुल खैरखान दलेलजंगबहाद्दर यांचे दौलतीचा बंदोबस्त करून देण्याबाबत प्रीतीराव चव्हाण हिंमतबहाद्दर यांना शिवाजीमहाराजांनी आज्ञा

केली (ले. १५९, १६०, १६१, १६२, १६५, १८०, १८१, २०८]. महाराजांनीं नारायणराव घोरपडे यांना सेनापतिपद देऊन गांवगन्नाचे सरदेशमुखी वतन याच सुमारास दिलें, यासंबंधीं माहिती ले. १६३, १६४,१७२, १७३, १७४, १७७ व १८२ या लेखांत आहे. शिवाजीमहाराज करवीर व गोवेकर फिरंगी यांच्यामध्यें तहनामा झाला, त्याबाबत तपशील ले. १६६ व १६७ मध्यें आहे. नबाब निजामुल्मुल्क यांच्याशीं स्नेह दृढतर व्हावा त्याबाबत रायदियानतवंतबहाद्दर यास शिवाजीमहाराजांनीं आज्ञापत्रे पाठविली (ले.१७०, १७८ व १७९). व्यंकटपा नाईक बहिरी बहादर संस्थान सुरापूर यास 'करवीर आणि सुरापूर ऐसी दोन नाहींत' या मतलबाचें पत्र शिवाजीमहाराज करवीर यांनीं पाठविले (ले. १७५). यासंबंधी अधिक माहिती ले. २००, २०२, २०४, २०५, २०७, २३२ व २३३ मध्यें दिली आहे. व्यंकटराव कृष्ण यांस हुजूरून गोव्याचे व्हाइसरॉयकडे पाठविले. तेव्हां दोस्तीचे संबंध स्थापित होण्याबद्दल पोर्तुगीज व्हाइसरॉयचे निसबतींत असलेले जोगन कामत लिंगीस्ताद यांना महाराजांनीं आज्ञापत्र पाठविले [ले. १७६]. दौलतराव शिंदे यांनीं विनंती केल्याप्रमाणे त्यांच्याकडे करवीरच्या सेनापतींना फौजेसह सत्वर रवाना करावे याबाबत यशवंतराव घोरपडे आमीरुल-उमराव यानीं शिवाजीमहाराजांना पत्र पाठविले (ले. १८३). पुढें सिदोजी नाईक निंबाळकर देसाई व सखाराम घाटगे सर्ज्याराव यानी या मसलतीबाबत रायाजी जाधव सरनोबत करवीर राज्य यांना राहेमतपूरच्या मार्गें सातार्‍यास येण्यास सांगितले (ले. १८४ ते १९५ व ले. १९७). गोवेकर फिरंगी यांची दोस्ती आणि कुमक मिळविण्यासाठी जी वाटाघाट झाली ती हकीकत ले. २११ मध्ये आहे. बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यानी शिवाजीमहाराज, करवीर याजकडे नवीन महाल नेमून दिले, 'यासंबंधी माहिती ले. २०९ व ले. २८० मध्ये आहे. मातोश्री बायांचे खूळ चौथे लबाड मिळोन लांबविले. हाली कूच करून करवीराकडे जाणार त्यास स्वामींनीं आश्रा न दिला पाहिजे,' हा मजकूर दौलतराव शिंदे यांनी छत्रपतिमहाराज करवीर यांना पाठविलेल्या विनंतीपत्रांत आढळतो (ले. २१३ व २१४). अशा प्रसंगी महाराजांनी मनावर घेऊन समेटाचा योग घडविला असतां महाराजांस बहुत कीर्ती आहे हा मजकूर यशवंतराव घोरपडे अमिरूलउमराव यांनी छत्रपतिमहाराज करवीर यांना शिंदे बायांच्या प्रकरणाबाबत लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. २१५). यासंबंधी अधिक माहिती ले. २१६ व २१७ मध्ये आहे. म्हैसूरच्या टिपूसंबंधी वृत्त ता. २४–६–१७९९ च्या पत्रांत आहे. (ले. २२२). हुजूरची आज्ञापत्रें व सनदा यासंबंधी माहिती ले. २३० मध्ये आहे

परशुरामभाऊ पटवर्धन याच्या मृत्यूबद्दल सूड घेण्याची तजवीज पटवर्धन सरदारानीं लगेच हिंमतीनें अंगावर घेतली. त्यामुळे पेशवे, शिंदे वगैरे सर्वच आतां करवीर राज्यावर तुटून पडणार म्हणून पुणे दरबारांतील फौजेबंद सरदार व मुत्सद्दी यांच्याशीं बोलणें करून या गोष्टीचा निर्गम करण्यासाठी छत्रपति महाराज,करवीर यानीं आत्माराम धोंडदेव

व जानराव यादव याना या कामगिरीवर पुण्यास रवाना केले. पुढें त्यांनीं पुण्यातील मुख्यांचे व सामादिकांचे लक्ष राखून दौलतराव शिंदे यांच्या कारभाऱ्याबरोबर जें बोलणे केले त्या बोलण्यांतील भाव ले. २३४, २३५, २३६, २३७, २३८, २३९, २४० मध्यें आहे.

नारायणराव घोरपडे सेनापति यांनी सरंजामसुद्धां हुजूर यावे, ही माहिती ले. २४२ मध्यें आहे. सखाराम घाटगे सर्जेराव यांची सुटका ता. ५-१-१८०० रोजी झाली हे वृत्त ले.२४३ मध्यें आहे. आज प्रसंग आहे तेव्हां धोंडजी वाघ याजकडे हुजरून कोणी शहाणा मनुष्य जलदीने रवाना व्हावा हा मतलब ता. १४-१-१८०० च्या पत्रांत आहे (ले. २४६). शिवाजीमहाराजांनीं चतुरसिंग भोसले यांजकडे भवानरावमामा शिर्के, नरसिंगराव गुजर व हैबतराव मोहिते यांच्यासमागमें फौजेस खर्चास पांच हजार रुपये पाठविले, ही माहिती ले. २४७, २४८ व २५२ या लेखांत आहे. नवीन फौजभरती करण्यास येणाऱ्या अडचणी राणोजी नाईक निंबाळकर किल्ले प्रसिद्धगड यांनीं शिवाजी-महाराजांना निवेदन केल्या (ले. २४९).

शत्रूच्या फौजेने तमाम गांव जाळून मिठारवाडीनजीक जें झुंज केले त्याची विस्तृत माहिती ले. २५० मध्ये आहे. करवीरच्या लढाईत शत्रूच्या फौजेने रंकाळा तलावानजिक मोर्चा दिला तेव्हां शत्रूच्या पारिपत्यासाठी इंग्रजी पलटणाची कुमक सत्वर मिळावी म्हणून इंग्रज कुंपणी बहादरांचा जोसूब युटाफ आणि शिवाजीमहाराज व त्यांचे वकील यांच्यामध्ये ज्या वाटाघाटी झाल्या त्याची संपूर्ण हकीगत ले. २५८, २५९, २६४, २६५, २६७, २६८, २६९, २७१ व २७५ या लेखांत सांपडते.

पुढें करवीरची लढाई तहकूब करून पंधरा रोज स्वस्थ राहावे, हा मजकूर ले. २६९ मध्ये आहे. रामचंद्र परशुराम पटवर्धन हे दौलतराव शिंदे यांजकडील फौज व त्या फौजे-वरील इंग्रजी सरदार कुमकेस घेऊन करवीरास आले. त्यांनी करवीरचे कोटावर हल्ला केला. त्यांत शत्रुपक्षाकडील दोन असामी ठार व एक असामी जखमी झाला, हे वृत्त ले. २७० मध्ये आहे. शेवटी दौलतराव शिंदे गोटास येऊन भेट झाली. त्यासमयीं खर्च झाला त्याबद्दल यादीपत्र उपलब्ध आहे ले. २७६. भेटीसमयीं जो बहुमान केला व जे घडले त्याचे वर्णन ले. २७७ मध्ये आहे. शत्रूचे फौजेने करवीरचा वेढा दौलतराव शिंद्याचे हुकमाने उठविला त्यासंबंधीं सविस्तर मजकूर ले. २७९ मध्ये आहे. या समयीं शिवाजीमहाराजांनीं सखाराम घाटगे सर्ज्याराव यांच्याशीं जो ठराव केला त्याची माहिती ले. २७८ व ३०१ मध्ये आहे. बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांजकडून शिवाजीमहाराज, करवीर यांच्या बंदोबस्ताची कलमें दौलतराव शिंदे. आलिजाबहादर यांच्या विद्यमाने उलगडून द्यावयाचे ठरले. त्याबाबत ता. ११-७-१८०० ची एक यादी उपलब्ध आहे (ले. २८१). शंकरराव सिंदे सेनाखासखेल यांच्या स्वाधीन मनोली,

बहुली, मुरगुड व सिरसिगी हीं ठाणीं करावी म्हणून शिवाजीमहाराजांनीं कर्नल वेलस्लीला पत्र पाठविले. (ले. २८२). शिवाजीमहाराजांनीं पेशव्यांना त्यांचे बंडखोराविरुद्ध कुमक करावी यासंबंधीं माहिती ले. २८३, ३०० व ३०२ मध्ये आहे.

यशवंतराव घाटगे, सर्ज्याराव व तुळजोजी ऊर्फ सखाराम घाटगे, सर्ज्याराव यांच्यामध्ये वडील-धाकटेपणाविषयीं भांडण आहे. त्याचा निकाल झाल्यावर पूर्ववत् प्रमाणें ठाणें व गांव देवविले जातील, याबाबत शिवाजीमहाराजांनीं यशवंतराव घाटगे यांना आज्ञापत्र पाठविलें (ले. २८७). यासंबंधी माहिती ले. २८९ व २९१ मध्ये आहे. शिवाजीमहाराजांनीं सखाराम घाटगे यांस ६९॥ गांवे राज्यउपयोगी स्वामीसेवा खातरजमायुक्त करून दाखविल्याबद्दल इनाम दिली (ले. २८८). यासंबंधी माहिती ले. २९२ व २९३ मध्ये आहे. विरूपाक्ष शामराव व नागो शामराव यांचे वतनी गांव पूर्वी जप्त केले होते, परंतु त्यांनीं सरकार कामकाजे बहुत केली. सबब हुजुरून त्यांचे वतनाची मोकळीक केली, हा मजकूर ले. २९५ मध्ये आहे. इंग्रज कंपनी सरकार मुंबई यांनीं शिवाजीमहाराज करवीर यांना सामील होऊन निपाणीचे संस्थान ठेवूं नये याप्रमाणें ठरले, हा मजकूर दादाजी पठण, वकील निसबत इंग्रज सरकार मुक्काम जंजिरा, मुंबई यांनीं नारायणराव पाटणकर सरलष्कर मुक्काम करवीर यांना लिहिलेल्या पत्रांत आहे (ले. २९७). छत्रपतिमहाराज सातारा यांचे आज्ञेप्रमाणें फत्तेसिंग माने यांना फौज व तोफखान्यासह सातान्यास रवाना केले. तेव्हां शिवाजीमहाराज करवीर यांजकडून सातान्यास सरंजाम जाण्यास आज्ञा होऊन एक विचारें कार्य घडे तो अर्थ केला पाहिजे, हा मतलब यशवंतराव होळकर यानीं शिवाजीमहाराजांना लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. ३०३). यासंबंधी अधिक माहिती ले. ३१४ मध्ये आहे. पुढें आजरें प्रांतांत स्वाऱ्या कराव्या, त्याबाबत राणोजीराव घोरपडे यांना आज्ञापत्रे पाठविली. (ले. ३०४, व ३०५). बाजीराव रघुनाथ पंतप्रधान हे सौ. ताईबाई व सौ. काकूबाई यांना सुवर्णदुर्गांत ठेवून वसईस गेले तेव्हां त्यांना सुवर्णदुर्गाहून करवीरास आणण्याकरितां हुजूरून पालख्या सरंजाम रवाना करण्याची आज्ञा झाली. तसेंच पंतप्रधानाच्या तिकडील दिनचर्येचे वर्तमान वरचेवर लिहिण्याबद्दल बाळाजी रघुनाथ पटवर्धन व बाळोजी कुंजीर यांना आज्ञापत्रें पाठविली (ले. ३०८ ते ३१२). परस्पर दोस्ती टिकावी म्हणून जनरल वेलस्लीनें शिवाजीमहाराजांना पत्रें पाठविली त्यासंबंधी माहिती ले. ३२४, ३२६, ३२८, ३२९, ३३४, ३३६, ३३७, ३३८, ३३९, ३४० व ३४३ या लेखांत आहे.

समेटाचा जाबसाल ठरावांत आणून शिंदे, होळकर, भोसले यांजकडे पत्रें पाठवून सर्वांनी एक होऊन जलचरास माघारें लावून द्यावें याप्रमाणें सर्वांचें निश्चयपूर्वक ठरलें. तथापि तूर्त इंग्रजांची प्रबलता बहुत आहे. कसें घडतें तें पाहावें. हा मजकूर खंडोजी नाईक भोसले वाड्यांतील मूल यांनीं पुण्याहून पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. ३३०).

जंजिरे सिंधुदुर्ग येथील बंदराची आमदरफ्ती होऊन पूर्वीप्रमाणे कौलावण चालते करावे, हा मजकूर शिवाजीमहाराज करवीर यांनीं डंकनसाहेब जंजिरे मुंबई यांस पाठविलेल्या पत्रांत आढळतो (ले. ३३५). या प्रकरणासंबंधी अधिक माहिती ले. ३३८ व ३३९ मध्यें आहे. नागोजीराव घाटगे, झुंजारराव हे करवीर दरबारच्या वकालतीचे काम इंग्रज सरकारपाशी करीत होते. ते मृत्यु पावले. तेव्हां शिवाजीमहाराजांनीं हें काम हल्ली करण्यास प्रीतीराव चव्हाण उमदेतुलउमराव यांना आज्ञा केली (ले. ३४१). सिदोजीराव नाईकनिंबाळकर यांनीं चिकोडी व मनोली तालुक्यांतील हुजूरची गांवे व लष्करी ठाणी घेतली ती हुजूर परत येण्यास दिवस लागले, हें इंग्रज दोस्तांना लज्जास्पद आहे. तेव्हां ती गांवे हुजुरांना परत देण्याबद्दल निंबाळकरांस ताकीद व्हावी. तसेंच बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांच्या पटवर्धन सरदारांकडून पेंढारी येऊन हुजूरचे प्रांतास उपसर्ग होतो व करवीर राज्याचे आसामी पांढरे व यादव हे शत्रूस पूर्वी पाडाव गेले आहेत, ते हल्लीं सुटून यावे हा मजकूर दिनकर आपाजी करवीर राज्य यांनीं कर्नेल क्लोज, मुक्काम पुणे यांना पाठविलेल्या पत्रांत आढळतो. (ले. ३४४, ३४५, ३४७, ३४८, ३५०, ३५१, ३५७, ३६५, ३६६ व ३६७). रामचंद्रराव घोरपडे, सेनापति यांचा उल्लेख ता. २०-९-१८०४ च्या पत्रांत आढळतो (ले. ३४९). वाडीकर सांवत यांनी लबाडी केली, सबब त्यांच्या बंदोबस्तास रत्नाकर पंडित राजाज्ञा यांना फौजसुद्धां रवाना केले. तसेच सिदोजीराव नाईकनिंबाळकर, निपाणीकर यांजकडे हुजूरची गांवे व ठाणी आहेत ती सुटून हुजुराकडे सत्वर येई तें करावे, हा मजकूर प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव यांनीं देवीनाईक दुभाषी मुक्काम बंदर गोवा यांस लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. ३५३). या प्रकरणासंबंधीं अधिक माहिती ले. ३४६, ३५४, ३५५, ३५६, ३६०, ३६१, ३६२, ३६३, ३६४, ३७२, ३७३, ३७४, ३७५ व ३८९ मध्यें आहे.

हरि गोपाळ भावे व हरि बल्लाळ केळकर हे बाजीराव रघुनाथ पंतप्रधान यांच्या मुलखांतील बंडखोर आहेत. तेव्हां त्यांना कोणी आश्रय देऊं नये, हा मजकूर ले. ३६७ मध्यें आहे. करवीर राज्यांतील सिंधुदुर्गचे बंदर चालते करणे त्यासंबंधी बोलणे करावे म्हणून शिवाजीमहाराजांनीं रामदास मनोहरदास नगरशेट यांना आज्ञापत्र पाठविलें (ले. ३६९). याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. ३७९, ३८१, ३८२, ३९०, ३९७, ३९८व ४०५ मध्यें आहे. इंग्रज कंपनी सरकार यानी दोस्ती कायम करून करवीर छत्रपतिमहाराजांना सर्व प्रकारें कुमक पोंचवावी, याबाबत कंपनी सरकार व त्यांचे अधिकारी आणि शिवाजीमहाराज व त्यांचे मुत्सद्दी आणि वकील यांच्यामध्यें झालेला पत्रव्यवहार ले. ३९९,४००, ४०२ व ४०३ मध्यें आहे. नारायणराव व्यंकटेश घोरपडे इचलकरंजीकर यांनीं छत्रपति शिवाजीमहाराज, करवीर यांना जो करार करून दिला, त्याबाबत माहिती ले. ४०६ मध्यें आहे. देवीनाईक दुभाषी याच्या विद्यमानें बोलणे होऊन

जाबसाल उलगडून घेऊन इंग्रज बहादर याजकडील तहाची कलमे ठरवून घ्यावी आणि इंग्रजांची पलटणे कुमकेस आणून करवीर राज्याच्या चारी तालुक्यांत हुजूरची ठाणीं बसवून शत्रूचे पारिपत्य करावे. याबाबत माहिती ले. ४१० ते ४३५ या लेखांत आहे.

इंग्रजांनी तहाची कलमे निश्चित न केल्यामुळे त्यांची पलटणे शिवाजीमहाराज, करवीर यांच्या कुमकेस पाठविण्यास इंग्रजांकडून दिरंगाई होते. या गोष्टीचे सविस्तर वर्णन ले. ४३६ व ४३७ मध्यें आहे. इंग्रजाबरोबर तह घडवून आणण्यासाठीं वाटाघाटी चालू असतांना हुजूरच्या राज्याचे कल्याण लक्षांत ठेविलें पाहिजे, हा मुद्दा ले. ४३८ मध्यें प्रामुख्यानें सांगितला आहे. वरील प्रकरणासंबंधी अधिक माहिती ले. ४३९, ४४० व ४४१ मध्यें आहे.

हुजूरच्या कामकाजाविषयीं इंग्रज कंपनी सरकार झटत असतां बाजीराव रघुनाथ पेशवे जिकीर खातात, त्यामुळे दोन रोज अधिक उणें लागले तरी चिंता नाही. परंतु हुजूरचे मनोदयानुरूप कामे होऊन येतील ही खात्री एलफिन्स्टन साहेबबहादूर यांनीं सरूपजी खीरसागर, हुजरे वकील यांची केली. हा मजकूर ले. ४४९ मध्यें आहे. हुजूरचीं ठाणीं हुजूर स्वाधीन करून त्या ठाण्यांचा वसूल हुजूरांना सुरळीत देण्याबाबत सिदोजीराव नाईकनिंबाळकर, निपाणीकर यांना छत्रपति शिवाजीमहाराज, करवीर यांनीं आज्ञा केली, ही माहिती ले. ४५४ ते ४६२ या लेखांमध्यें आहे. सरकारचा वाडा दग्ध झाला. त्यांत प्रांतांतील वहिवाटीचे रुमाल होते ते विल्हेस लागले. हा उल्लेख शिवाजीमहाराजांनी सरूपजी खीरसागर यांस ता. १०–२ १८१३ इसवी रोजी पाठविलेल्या आज्ञापत्रांत आहे (ले. ४६५). सरंजामी यांनी हुजूर येऊन चाकरी करावी, पुरवलेस चाकरी करतील, नाहींतर सरंजाम सरकारांत घ्यावा, याप्रमाणें पूर्वी ठरलें आहे. तेव्हां ठरावाप्रमाणें सरंजामदारांनीं हुजूर रूजू व्हावे, याबाबत एल्फिन्स्टनसाहेब बहादूर कंपनी सरकार यांजकडून बेत घडवून आणावा ही माहिती ले. ४६८ मध्यें आहे. हुजूर चाकरीस असणाऱ्या सरंजामी राजमंडळाची नांवनिशीवार यादी माहे मार्च इ. स. १८१३ ची उपलब्ध आहे (ले. ४७१). एल्फिन्स्टनसाहेबबहादूर व शिवाजीमहाराज करवीर यांचे वकील सरूपजी खीरसागर यांच्यांत जें बोलणें झालें त्याबाबत तारीखवार हकीकत ले. ४७२, ४७३, ४७४, ४७५, ४७८ या लेखामध्यें सांपडते. महाराजांचे मनोदयानुरूप चिकोडी व मनोली हे दोनही तालुके सुटून हुजूर यावे आणि निपाणीवर पलटणांनीं गोळे मारावे. कारण निपाणीकर यांनीं बहुत त्रास दिला आहे तेव्हां निपाणीवर गोळे उडाले म्हणजे चित्तास समाधान होईल. हा मजकूर शिवाजीमहाराजांनीं सरूपजी खीरसागर हुजरे वकील यांना पाठविलेल्या आज्ञापत्रांत आढळतो [ले. ४७६]. हुजूरच्या प्रकृतीस आराम नाहीं. ज्वरांश होऊन उचकी लागली होती ती कांहीं बंद झाली आहे आणि हुजूरची स्वारी श्रीदेवीजवळ राहिली आहे. हा मजकूर सरूपजी खीरसागर हुजरे

वकील आणि एलफिन्स्टन साहेबबहादूर यांच्या बैठकींत झालेल्या बोलण्यांत आढळतो [ले. ४७८]. शिवाजीमहाराज करवीर यांच्या मृत्यूची हकीकत ले. ४७९ व ४८० मध्यें आहे.

म्हैसूर राज्याचा हैदरअल्ली व त्याचा पुत्र टिपू, गोवा बंदरचे फिरंगी आणि कुंपणी सरकार इंग्रज यांजकडून आलेलीं व त्यांना पाठविलेलीं पत्रें प्रस्तुत पुस्तकांत व यापुढील भागांत छापलीं आहेत. त्या पत्रांत वाचतां न आलेल्या शब्दांची जागा कोरी ठेवली आहे. वर निर्देश केल्याप्रमाणे या पुस्तकांत छापलेले ४८५ कागद मी वाचकांपुढें मांडीत आहें.

१३२१, कसबा पेठ, पुणें २
राज्याभिषेकदिन श्रीशिव शक २८९
मिति ज्येष्ठ शुद्ध १३ शके १८८४
ता. १६-६-१९६२

मा. वि. गुजर

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ३

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग तिसरा)

कोल्हापूर स्टेट रेकॉर्डांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख २-८-१७६१

नि. द. रु. नं. १ (अ)

३

अ. नं. १५४ श्री

राजश्री सिवाजी घोरपडे गो-

सावी यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रे॥ माधवराव बलाल प्रधान आसीर्वाद विनंती उपरी तुम्ही पुणे मुकामी आपली हकीकत निवेदन केली की ता।आजर का मौजे सुधा आम्हाकड इनाम सरंजाम करवीर सरकारातून चालत आहे त्याजप्रो भोगवटेस सरकारची पत्र दिल्ही पाहिजेत म्हणोन त्याजवरून मनास आणिता करवीर सरकारातून सनद देऊन तुम्हाकड चालवीत आहेत त्याप्रो तालेकेची वैवाट करून तुम्ही व तुमचे पुत्रपौत्री वौंशपरंपरा आनभऊन आसावा सुा इसने + खमसैन मया अलफ बहुत काय लिा छ१माहे मोहरम.

लेखांक २ पौ तारीख ९-८-१७६१

श्री

अ. नं. १७

रु. नं. ४

पुण्यशील अनुबाई यास

श्रीमन्महाराज मातोश्री जिजाबाई साहेब यानी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला तेथे लिहिले जे शांतवन किती करावे काय संतोष आहे जे साहेबास ल्याहावे हे तरी प्रमाणच आहे भवितव्यास तुम्ही काय कराल करवीरास जाणे विषयी राजश्री रघुनाथ पंडित सांगतात आपण येतो म्हणोन

+ हस्तदोषानें ‘ खमसैन ’ पडलें असेल. तेथें ‘ सितैन ’ पाहिजे.

विनंती सांगोन पाटविली अशास चरंजीव कुसाबाईस गर्भ असते समयी तुम्हास येणे विषयी वरचेवरी पत्रे पाटविली कां कीं तुम्ही वयातीत बायका आणि पुरातन सेवक राबत्यातील साहेब दुखात निमग्न तुम्ही समीप राहून मुलीची उटाठेव कराल याकरिता बोलाविले होते व राजेश्री प्रधान पंतासही लिहिले होते आशास त्याच्या व तुमच्या ध्यानात आले जे परीक्षसाठी बोलावितात पुढे राजकुवर जाइलाच तर संदेह घेणेस जागा राहाव नाही हा अर्थ प्रधान पंतानी चितात आणून तुम्हास निरोप दिला तुम्ही न आला साहेबाच वंशात आशा कष्ट कल्पना यामागे जाहाल्या नाहीत व पुढही होण नाही सर्वजणासी सिक्षा करणेचा अगर बुधीवाद सांगणेच स्थल हे या स्थली असे वर्तल्यास जनास माकलीकच जाहाली जे आजपर्यंत मार्गेरहित वर्तल्याचे बरे काय दैवाने केले आहे त्या मार्गे अण्यत्रानी जावे असो परिणामी सत्य ते सत्य श्री भवानी शंकर करणार परंतु जे मुरुख भाषणे करणाराचे स्मरण साहेबासही असेल हे अपूर्व नाही भोसल्याचे वंशपरंपरने स्मरण राहील सर्वत्रासी आयुष्य सारखच्र आहे आटवण मात्र अक्षई राहील सांप्रत तुम्ही येऊन परीक्षा पाहोन सांगणारासी सांगोन त्याच्या मुख्य होये म्हटल्याने हा राजा होतो नाहीतर ब्रम्हदेवाच लिहिणे लटके पडते असे नाही अनंत शवक पदरी आहेत कोण्ही तांब्याभर पाणी देईल जो भोसला म्हणवील तो काही पूर्वजाचे स्मरण धरील चिंता काय आहे? आमच्या वडिलानी यावरी कृपा याप्रमाणे शेवा करावी म्हणोन कली होती त्याप्रमाणे करितात परंतु सोईरीकीचे नातेही याचे आमचे होईसे नाही तुम्ही येणेचा प्रकार काय हे समजले नाही उघड लिहिणे जाणिजे छ २७ जिल्हेज बहुत काय लिहिणे मोर्तब.

प्रौ छ ८ मोहरम सन इसने सितैन मया व अलफ श्रावणमास.

तारीख ३-११-१७६२

लेखांक ३

श्री शंभु प्रसन्न

अ. नं. १८

रु. नं. १

श्रीमन्महाराज मातुश्री जिजाबाई साहेब याणी राजश्री माधवराव नीलकंट यासी आज्ञा केली येसीजे सुा सलास सितैन मया आलफ तुम्हाकडून विनंती पत्र आले नाही यैसे न करिता निरंतर विनंती पत्री साकल्यार्थ लेहून पाटवीत जाणे मनोदया प्रमाणे कार्यभाग व्हावा हे तुम्हास न कलेस नाही बहुत सावधपणे करणे तुम्हावर शब्द नये यैसी सेवा करावी राजश्री रघुनाथ पंडित व सखाराम भगवंत यासी व सामादिकास पत्रे पा आहेत सत्वर उत्तरे घेऊन पा देणे वरकड आज्ञे प्रा हुजूरे मुक्ता सांगतील प्रो करणे जाणिजे छ १६ माहे राकर लेखन सिमा

(मोर्तब)

लेखांक ४ तारीख २५-१२-१७६२

श्री

अ. नं. २२

रु. नं. ४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ८९ चित्रभानुनाम संवत्सरे पौष शुा दशमी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमान्य राजश्री हरजी महाडीक यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाकडील बहुत दिवस विनंती पत्र येउन साकल्यार्थ निवेदन होत नाही तरी ऐसे न करिता वरचेवरी विनंती पत्री स्वामीस संतोष होय ते करीत जाणे सांप्रत राजेश्री माधवराव पंडित प्रधान व राजेश्री रघुनाथ बाजीराव फौजसुद्धा मिरजेस परीघ घालोन बैसले आहेत हुजूर विनंती पत्रे वरचेवरी येत आहेत येथील कित्येक साद्यंत अर्थ तीर्थरूप माहाराज मातोश्री आईसाहेब यानी लिहिला आहे त्यावरून सकळ भावार्थ कळो येईल जाणिजे बहुत काय लिहिणे.

लेखांक ५ तारीख १०-१-१७६३

श्री

अ. नं. १७८

रु. नं.

राजमान्य राजश्री सखाराम भगवंत यासी श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब याणी आज्ञा केली ऐसीजे राजश्री रघुनाथ पंडित व राजश्री माधवराव पंडित प्रधान याचे लष्कर मजलदरमजल येत चालिले हे वृत तुम्ही विनंती पत्री लेऊन न पाटविले साहेबास परस्परच विदित जाहाले यैसे नसाव या उपरी नित्य सविस्तर लेउन पाटवीत जाणे सांप्रत राजेश्री मल्हार महादेव यासी कितेक आज्ञा करून पाटविले आहे आज्ञेप्रमाणे तुम्हास सांगतील त्याजवरून कलेल तुम्ही साहेबासी करार दाद केला आहे त्याप्रा परिणामस नेहणे जाणिजे छ २५ जाखर बहुत काय लिहिणे.

लेखन

सीमा

लेखांक ६ तारीख २९-५-१७६३

श्री

अ. नं. २०

रु. नं. १

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान राजेश्री

विसाजी कृष्ण गोसावी यासी

सेवक माधवराव बलाल प्रधान नमस्कार सुा आर्बा सितेन मया व आलफ का बेलगाव

वगैरे येथील मुकासबाबेचा यैवज मनोलीकडे पावत असतो त्यास हल्ली तालुके मार श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब याच्या खासगीस दिल्हा तरी का मार येथील मुकासबाबेचा यैवज सालदरसाल चालत आल्याप्रमाण मनोलीकडे चालवणे जाणिजे छ १५ जिलकाद बहुत काय लिहिणे मोर्तब.

लेखांक ७ तारीख २१–१०–१७६३

श्री शंभु प्रसन्न

रु. नं. १

अ. नं. २१

राजमान्य राजेश्री शेषो नारायण यासी श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब यानी आज्ञा केली यैसीजे सुा आर्बा सितेन मया व आलफ तुम्ही विनंती पत्र पाटविले ते प्रा होऊन लखनार्थ श्रवण जाहाला राजेश्री प्रधान पंत याचे व नवाब निजाम आलीखान याचा विवेक जाहाला किंचित ल्ढा राहिला आहे येका दोरोजी तह होईल म्हणून विस्तारे लिहीले ते निवेदन जाहाले प्रस्तुत प्रधान पंताचे मुकाम कोठ आहे काय मनसभा योजला आहे हे विनंती पत्री लिहिणें साहेबाकडील चिकोडी व मनोली व कागल वगैरेचा करारदाद गुदस्ता जाहाला आहे त्याप्रमाणे साल मजकुरी मोंगलाचे पारपत्ये होताच साहेबाचे मर्जी प्रमाणे निखालस सरकारात स्वाधीन होतील म्हणून राजश्री रघुनाथ पंडित व सखाराम भगवंत याची विनंती पत्र आली सांप्रत येवनाचे पारपत्य होऊन महद यश संपादिले आहे अशास गुदस्ता केल्या करार प्रा राजश्री रघुनाथ पंडित व सखाराम भगवंत यासी बोलून जो हंगाम आहे पिके आहेत तो ताकिदी आल्या म्हणजे युक्तीस पडेल हंगाम गेल्यानंतर गैरउपयोगी हे जाणतच आहे यासमई त्वरा करून विल्हे लाऊन टाकणे दिवसगत सहसा न करणे तैसच जिवाजी विश्राम याणे किल्हे प्रसिधगड व किले मनोहर व जंजिरे सिंदुदुर्ग येथे लबाडी बहुत आरंभिली आहे त्यास परभारे ताकीद प्रधान पंत याचे पाटऊन तिन्ही महास्थले सरकारची तेथ काडीमात्र तोसीस न होता मयदिन वर्तनूक करीत ते करणे पूर्वी ताकिदी पाटविल्या त्या ताकिदी न मानिता मगरुरी मांडली आहे प्रस्तुत तैसे न होता पुन्हा निरोपद्रव होय ते करणे शिवाजी भोसलेस आनकूल होणेविसी राजेश्री प्रधान पंताची पत्रे आली आहेत म्हणून राजेश्री राणोजी घोरपडे सेनापति याणी साहेबास विनंती पत्री लिहिले आहे याचा प्रकार कसा आहे हाही शोध करून विनंती पत्री लिहून पाटवणे शेनापति वगैरेस शिवाजी भोसलेस सामील होऊन साहेबाच्या प्रांतात काडीमात्र लबाडी करणेस गरज नाही म्हणून ताकिदी पाटऊन देणे भुदरगडाचा वगैरे सेनापति वळून नेहतो येतद्विशी निशेद पत्र पाठऊन देणे राजश्री प्रधानपंतास व राजश्री रघुनाथ पंडित व राजेश्री सखाराम भगवंत यासी आज्ञापत्रें सादर केली आहेत ती प्रविष्ट करणे येविसीची कितेक आज्ञा राजेश्री भगवंत आपाजी यासी केली आहे मार-निले लिहील त्याजवरून कलल जाणिजे छ १३ राखर बहुत काय लिहिणे मोर आस बार आहे

लेखांक ८

तारीख २३-१०-१७६३

श्री शंभु प्रां

रु. नं १

तालीक

अ. नं. २२

श्रीमन्महाराज मातुश्री ———— आईसाहेब याणी राजश्री भिकाजी नरहर व दादाजी त्र्यंबक यासी आज्ञा केली यैसीजे सुा आर्बा सितैन मया व आलफ तुम्ही पुरातन साहेबाचे एकनिष्ट सेवक साहेबाचे शेवेशी श्रमसाहास बहुत केले आणि पुढेही सेवा करीत आहा तुमचा योगक्षेम उत्तम प्रकारे चालिला पाहिजे हे साहेबाचे मानस आणि तुम्हाविसी करवीरचे मुकामी राजश्री भगवंत आपाजी यानी विनंती केली त्यावरून साहेब तुम्हावर कृपालु होऊन मौजे निडगुंदी कर्यात हवेली. प्रांत रायबाग हा गाव पेशजीच्या मुकाशियाकडून दूर करून हली तुम्हास दरोबस्त दिला आसे तुम्ही भले वौंशजे आणि साहेबाचे सेवेचे ठाई परम तत्पर यास्तव सर्व प्रकारे तुमचे चालवणे साहेबास फार आवश्यक हे पाहून तुमचे कुटुंबाचे स्वास्थेस मौजे मजकूर दरोबस्त खेरीज हकदार व इनामदार करून मौजे मजकूर जलतरुपाषाननिधीनिक्षेपसहीत पूर्वमर्यादेप्रमाणे दिल्हा असे तर तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने मौजे मजकूर हा गाव अनभऊन साहेबाची कृपा अनुग्रह सुखरुप राहाणे यासी कोणी विक्षेप करितील तर त्यास शफेत असे जाणिजे छ १५ रा॥खर लेखन सीमा मोर्तब श्रुत

बार

लेखांक ९

तारीख ७-३-१७६४

श्री

रु. नं. १

अ. नं. २३

श्रीमंत माहाराज मातोश्री आईसाहेबाचे

सेवेसी

कब्ज ब्रो सदासिव राम नि॥ गाडदी दिा श्रीमंत राजश्री पंतप्रधान शेवेसी साहेबाचे लेहून दिले कब्ज ऐसाजे राजेश्री शेषो नारायण याजकडून श्रीमंतानी आम्हास देखील रुपये चौदासे साडेसाठ ते सदरहू रुपये साहेबी करवीरचे मुकामी आम्हास

१४६०॥

चौदासे साडेसाठ दिल आम्ही भरुन पावलो शेवेसी लेहून दिल कब्ज सही छ ३ रमजान सन आर्बा सितैन मया अलफ हे विज्ञापना.

लेखांक १० तारीख ८-३-१७६४

श्री

रु. नं. १
अ. नं. २४

श्रीमंत महाराज मातुश्री आईसाहेब साहेबाचे शेवेशी का बा मुकुंदराव श्रीपत दि॥ श्रीमंत राजश्री पंत प्रधान सेवेशी लेहून दिल्ह कब्ज यैसीजे राजश्री सेषो नारायण याजवर वरात रुपये ४६०० सेचालीसे देविले ते साहेबी करवीरचे मुकामी भरून पावलो लेहून दिल्हा कब्ज सही छ ४ रमजान सन आर्बा सितैन मया व आलफ हे विज्ञापणा.

लेखांक ११ तारीख २०-३-१७६४

श्री

अ. नं. २५
रु. नं. १

श्रीमंत महाराज मातुश्री ——— आई साहेब
साहेबाचे शेवेशी

कबजे बा॥ नारो गोविंद नि॥ दारकोजी निंबालकर व सटवोजी गाडे पागा सरकार पंत प्रधान सुाा आर्बा सितैन मया व आलफ कारणे साहेबाचे शेवेशी लिहून दिल्हे कबज यैसेजे साहेबाकडून पंत प्रधान याणी बि॥ माार शेशो नारायण याजकडून देविले ते रु॥

१७७४८॥ दिाा जारकोजी निंबाल्कर
१४९९१ दिाा सटवोजी गाडे
———
३२७३९॥

येकून बत्तीस हजार सातशे साडेयेकूनचालीस देविले त्यासी बरहुकूम यैवज रो भगवंत आपाजी याचे विद्यमाने आपण भरून पाटवने हे कबज लिहून दिल्हे सही तारीख छ १६ माहे रमजान.

लेखांक १२ तारीख १२-९-१७६४

श्री

रु. नं. १
अ. नं. २७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ९१ तारणनाम संवस्तरे भाद्रपद बहुल त्रितीया सौम्य वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजश्री देशाधिकारी व

कारकून वर्तमान व भावी सुभा
प्रांत कोल्हापूर यासी आज्ञा केली यैसी
जे राजश्री मालोजी निंबालकर व सिद-

राम निंबालकर व भगवंतराव निंबालकर बिन राजजी निंबालकर यानी किले पनालाचे मुकामी स्वामीसंनिध विदित केले कीं मौजे सावगाव खुर्द व मौजे भाटवडे हे गाव आपणाकडे मुकासे आहेत ते इनाम करून देविले पाहिजेत म्हणून विदित केले त्यावरून मनास आणिता यासी तीर्थरूप महाराज राजश्री......कैलासवासी आबासाहेबी मौजे मजकूर मुकासा दिल्हा आहे त्यास हली याणी विनंती केली त्यावरून नूतन इनाम कुलबाब कुलकाणु हली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाननिधीनिक्षेपसहीत खेरीज हकदार व इनामदार करून मौजे सावगाव खुर्द कर्यात सावगाव पा हुकेरी हा गाव देह १ येक इनाम करून दिला असे तरी तुम्ही सदरहू मौजे मजकूर पूर्व मर्यादे प्रमाणे चतुःसिमा याचे स्वाधीन करणे आणि इनाम यासी व याचे पुत्र पौत्रादि वंशपरपरेने चालवणे साल दरसाल ताजा प्रमाणें सनदेचा उजूर न करणे या पत्राची तालीक घेऊन असल पत्र भोगवटियासी मारनिलेजवल परतोन देणे जाणिजे निदेश समक्ष

(मोर्तब) रुजु
स्वा
मंत्री

तेरिख १५ रबिलवल सुा
खमस सितैन

सुरु सुद्र बार समते सुद्र बार

लेखांक १३ तारीख १६-९-१७६४

श्री सुबराज प्रा

रु. नं. १
अ. नं. ३२

राजेश्री बाबू धोंडदेऊ कमाविसदार दिा सरदेशमुखी प्रां तारले अरले गोसावी यासी—

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत सुहुर सन खमस सितेन मया आलफ तुम्हाकडे पंधरा सोळा वर्षाचा हिशेब यावा लागतो रवासुदगी किरकोळ आहे ते वजा जाता बाकी व साल मजकुरापासोन सागवडे व सरदेशमुखी व सागवडे पेशजी तुम्हाकडे किती वर्षे चालले सरकारात श्रीमंत धनी याकडे किती वर्षे आहे ते सर्व हिसेब श्रीमंतास रुजू करून बाकी ऐवज त्याजकडे देणे पुढे गाव व सरदेशमुखी धनीयाकडे रुजू करुन देणे सर्वहि बयावार हिशेब लेहून राजेश्री कोन्हेर तिमाजी याचे मार्फातीने धनी यास रुजू करून त्याची रसीद पाटवून देणे उजूर न करणे जाणिजे छ २० माहे रबिलावल.

लेखांक १४ तारीख २२-९-१७६४

श्री सुबराज प्रा

रु. नं. १

अ. नं. ३३

राजश्री बाबू धोंडदेव कमाविसदार दि॥ सरदेशमुखी तारळे व आरळे गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमाने श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत सुा खमस सितेन मया अलफ तुम्हाकडे साल बसाल्चा हिशेब बहुत दिवसापासून राहात आला आहे तो गावगन्ना रुजवातीने रा कोन्हर तिमाजी याचे विद्यमाने तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब याजकडे बाकिसहित निर्गम तूर्त करून देणे यास उजूर केल्या परछिन्न तुमचा मुलाहिजा होणार नाही तुम्हास येक दोनवेळे येविसी लिहिले असोन अजीवर तुम्ही ढाल्ढवल काय समजून केली याउपर ढील न करिता लिहिले प्रमाणे सरदेशमुखीचा कवडी कवडी जे मागतील त्याप्रमाणे धनीयाकडे मशारनिलेचे विद्यमाने हिशेब जमाबंदीप्रमाणे देऊन बाकीचा ऐवज पोखता यावा त्याची व याशिवाय तुम्ही बहुत दिवस मामला केला आहे सरकारास कांही दिले नाही पोख्ती नजर यावी दोनी ऐवज धनीयाकडे तूर्त निशा करून द्यावे याजकरिता रा कोन्हेर तिमाजीस लिहून मुद्दाम पाटविले जासूद जोडास देविला मसाला रुपये चंद्रभान ६ तुकोजी ६ एकूण बारा रुपये देविले असत आदा करून पावलियाचे कबज घेणे जाणिजे. छ २५ रबिलावल.

लेखांक १५ माहे सप्टेंबर इ. स. १७६४

श्री सुबराज प्रा

रु. नं. १

अ. नं. ३४

राजश्री कोन्हेर तिमाजी गोसावी यांसी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो मुरारजी हिंदुराव घोरपडे ममलकतमदार दंडवत सुा खमस सितैन मया आलफ तू चंद्रभान व तुकोजी जोडी बा पत्रे पाटविली ती पाहून सविस्तर अर्थ कलला तीर्थरूप श्रीमन्महाराज मातोश्री याची आस्छा आपल्या भेटीची फार आहे धारवाडाहून सामानगडास यावे तेथे साहेबही येतात दर्शन जालियावर सवेच जावे म्हणोन कित्येक विस्तारयुक्त धनियाची ममतोतरे लिहिली ऐसीयास धारवाडास मोर्चे लागले आहेत सर्व भार राजेश्री पंत प्रधान याचा आम्हावर लौकरच फते होईल असे असता उभाऊभी कैसे यावे ? हे कार्य जाल्यावर हर प्रकारे निरोप मागून यावयाचे केले असे स्वच्छ चित्त धनी याच्या दर्शनास येऊन कृपेस पात्र

होऊ त्याच्या शेवेविना अन्य दैवत नाही सध्या मनसबयाचे काम लागले आहे वोढीतोढी तुम्ही पाहूनच गेला होता तत्रापि अलीकडे विषेस जाहाली आहे बाबू धोंडदेव यास धनियानी हिसेबाविसी निकड लाविली हिशेबास लागला आहे तेथेच येईन हिशेब देईन म्हणतो म्हणून लिहिले ऐसीयास त्याजकडे बहुतः दिसाच्या हिशेब येणे आहे तो रुजवात युक्त चौकसीने घेऊन पुढे सरदेशमुखीच्या मामल्याचा बंदोबस्त धनियावर घातला असे त्याप्रमाणे तुम्ही त्यास विनंती करून चौकसीने हिशेबाचा गुंता वारूण पोख्ता बाकीबाबत ऐवज व तुम्हास सांगितले प्रमाण धनियाकडून सरंजाम करून घेवून प्रतिपदे इतके येऊन. पावणे जाणिजे पत्र पाठविली आहेत तुम्ही पाहून डीक लाऊन आलेले (अपूर्ण.)

लेखांक १६ इ. स. १७६४

अ. नं. ४९४

याद नवाब सावणूरकर यांच चौ—
थाई तालुकेवार येणे रुो

२५००० ता। मनोली पैली दाखला प्रा द्याव
१३००० का सिंदोगी
१२००० का सुरगोड
२५०००

५०००० प्रांत चिकोडी व हुकेरी जमीदार व फुट जमीदार सुधा येन आकारास चौथाई आलीकडे कमी जास्ती दाखल पाहून सनद करून द्यावा ऐवज आज + +

७५०००

येणेप्रमाणे आमचा आम्हाकडे चालवावे आणि या पौ दरबार खर्च व हुजूर वस्त्र पात्र आणि दरकदार वगैरेची समजाविसी करून बाकी आमचा आम्हाकडे चालविणेस ताकीद रोखा आणि हुजूरची हुजरेस पाठऊन आमचा यैवज आमचा पदरी पंडतेस कराव.

लेखांक १७ इ. स. १७६६–६७

श्री

रु. नं. १

अ. नं. ३६

राजेश्री शाहाजी बिन माणकोजी राजे भोसले गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री माधवराव बलाल प्रधान आसीरवाद सुहूर सन सबा सितेन मया अलफ शके १६८८ व्ययनाम संवत्सरे दिले इनामपत्र ऐसीजे तुम्ही हुजूर श्रीमन्महाराज मातोश्री जिजाऊ साहेब यासनिध पनालियाचे मुकामी येऊन विनंती केली की आपणास श्रीमंत कैलासवासी शाहू माहाराज स्वामीनी आपला लगता

म्हणोन लाहाणपणा पासून आपले पाळीग्रहण केले लग्नकार्य करून सर्वप्रकारे चालविले आपण कुटुंबवत्सल आहो यास्तव साहेबी कृपाळु होऊन कुटुंबाचे बेगमीस येक गाव नूतन इनाम करार करून देऊ चालविले पाहिजे म्हणोन त्याजबरून मनास आणिता शाहाजी भोसले हे शरफजी माहाराजाचे वंशातील याचे चालवणे जरूर जाणोन साहेबी आम्हास आज्ञा केली व येचविषई तुम्ही पुण्याचे मुकामी येऊन विनंती केली त्यावरून तुम्ही पुरातन तुमचे चालवणे अवश्यक जाणोन तुमचे कुटुंबाचे बेगमीस मौजे खानवट ताा पाटस प्रांत पुणे हा गाव स्वराज्य व मोगलाई येकूण दुतर्फा कुलबाब कुलकानु हल्ली पटी व पेस्तर पट्टी खेरीज हकदार व इनामदार करून दरोबस्त नूतन इनाम करार करून दिला असे तरी मौजे मजकूर हा गाव आपले दुमाला करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने इनाम अणभऊन सुखरूप राहाणे जाणिजे रा छ

लेखांक १८ तारीख २५–२–१७६७

श्री

रु. नं. १
अ. नं. ४०

तपोनिदी कर्णगिरी गोसावी यासी

श्रो माधवराव बल्लाल प्रधान नारायण स्मरणानी सुा सबासितैन मया व अलफ मौजे संवदुतीचे ठाणे घेऊन श्रीमंत माहाराज मातोश्री आईसाहेब याचे खासगीस दिले ते वेळेस तुम्ही हुजूर येऊन रद्बादल केली कीं साहेबाकडील कमाविसदार राजेश्री शेषो नारायण याचे विद्यमाने गावात घेऊन गावचा आकार होईल त्यापैकी निमे ऐवज मशारनिलेकडे देऊ व निमे आपण घेऊ ऐसा करार केला असता याजकडील कमाविसदार गावात येऊ देत नाही म्हणोन हुजूर विदित जाहाले तरीं हे गोष्ट कार्याची नसे हली हे पत्र सादर केले असे तरी पेशजीचे करारा प्रमाणे कमाविसदार येईल तो गावात घेऊन त्याचे विद्यमाने जमाबंदी करून आकार होईल त्यापैकी निमे तुम्ही घेणे व निमे ऐवज यास पावता करीत जाणे यात अंतर पडलिया परिछिन्न कार्यास येणार नाही जाणिजे.

छ २५ रमजान बहुत काय लिहिणे.

शिका.

लेखांक १९ तारीख ५-६-१७६८

श्री

अ. नं. १७०

श्रीमंत माहाराज मातुश्री
आईसाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक आबाजीराव कृष्ण कृतानेक विज्ञापना विनंती सेवकाचे वर्तमान ताा छ १३ मोहरम पर्यंत साहेबाच्या कृपावलोकने येथास्थित आसे विशेष तीर्थरूप राजश्री भगवंतराऊ व तीर्थरूप सौ मातुश्री राजसबाई याणी आपणास तीर्थरूप राजश्री आपाजीराव कैलासवासी व मातुश्री सखुबाई याचे वोट्यात घातले आतःपर त्यासी व आपणासी संमध नाही आपण तीर्थरूप राजश्री आपाजीराव व मातुश्री सखूबाई याचे पुत्र खरे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २० तारीख १२-६-१७६८

श्री

रु. नं. १

अ. नं. ४१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ९५ सर्वधारीनाम संवत्सरे जेष्ट बहुल त्रयोदसी भानुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी समस्त सेना धुरंदर विश्वासनिधी राजमाने राजश्री राणोजी घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे तीर्थरूप माहाराज राजश्री कैलासवासी आबासाहेब याचे देवालय करवीरी पंचगंगातीरी बांधोन श्रीची स्थापना केली आहे तेथील पूजाउर्जा व इत्यादिक खर्चाबद्दल परगणे कागल व ताा रुकडी येथील सरनाईकीचे वतन नूतन करून श्रीकडे दिले असे

बो

देहाय गावगना

पा कागल गावगना

किता गाव	किता गाव
१ कसबा कागल	१ मुरगूड
१ पिंपली गाव बुद्रुक	१ चिमगाव
१ होनूर	१ निढोरी
१ सिद्नेरली	१ मडगाव
१ संकवाडी	१ कुरणी
१ वनुर	१ मलगे खुर्द
१ करणूर	१ मलगे बुदरुक
१ शेंडूर	१ यमगे

१ बामणी
१ येकोंडी
१ कुरुकली
१ सुरुपली बुा

लेखांक २१ तारीख ८–१२–१७६८

श्री

रु. नं. १

अ. नं. ४३

राजमान्य राजेश्री शेवो नारायण यासी

श्रीमन्महाराज मातोश्री आईसाहेब यानी आज्ञा केली ऐसीजे सुा तिसा सितेन मया अलफ तुम्हाकडे सरकारची ठाणी हुकेरी प्रांत व मनोली प्रांत व पाटेगाव होते ते सर-कारात राजश्री माधवराव पंडित प्रधान याचे विद्यमाने सरकारात पावले तुम्हास कळावे यास्तव आज्ञा केली असे जाणिजे रवाना छ २७ माहे रजब.

लेखांक २२ तारीख २७–१०–१७६९

श्री

रु. नं. १

अ. नं. ४२

राजेश्री व्यंकटराऊ नारायण गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेो राणोजी घोरपडे सेनापति दंडवत विनंती उपरी तुम्ही विनंती केली जे मामले मिरज येथील देशमुखी सरदेशमुखी कर्याती १६ व सरदेशमुखी कर्याती ४ येकूण वीस कर्यातीचे वतन पेशजी साहेब आमचे स्वाधीन करून वतनाचे शिके आमचे हवाली केले आहेत व कसबा इचलकरंजी व मौजे शिरढोण हे दोन्ही गाव इनाम दिले आहेत त्याप्रमाणे अणभवितही आहो त्यास भोगटियास पत्र करून दिले पाहिजे यावरून मनास आणिता तुमचे वडिलानी व तुम्ही आमचे दौलती विषई श्रम असाधारण केले यास्तव कृपाळु होऊन सदरहू वतन व दोन्ही गाव इनाम तुम्हास दिले असत सदरहू वतनासंबंधे व गावसंबंधे श्रीमन्महाराज शाहू छत्रपति यांची राजपत्रे वगैरे आमचे नावची आहेत तीही तुमचे हवाली केली असत तरी वतन व दोन्ही गावे तुम्ही वडिलाचे पुत्रपौत्रादि वंशपरंपराने अनभवून सुखरूप राहाणे यास कुणी हारकत करील त्यास श्रीची शफत असे सन सबैन मया आलर्फ छ २६ जाकर मोर्तब असल मुताबिक नकल.

लेखांक २३ तारीख १८-१-१७७०

श्री शंभु प्रा

रु. नं. १

अ. नं. ४५

श्रीमन्महाराज मातोश्री आई साहेब यानी राजश्री राजजी निंबाळकर यासी आज्ञा केली ऐसीजे सुाा सबैन मया व आलफ राजश्री राणोजी निंबालकर याचे बाप सिद्राम निंबाळकर यानी साहेबाची सेवा बहुत दिवस केली तदोतर किले प्रसिद्गडचा हावाला सांगितला तेथे एकनिष्टतेने सेवा करीत असता जिवाजी विश्राम याने किलेसी वेइमानी करून आपाय केला त्या समयी मशारनिलेनी मेहणत करून हाला मारून काडिली त्यास वेलेस किल्ले मजकुरी साहेब कामावरी चीज जाहाले हे ध्यानात आणून त्याचा त्यास मौजे सावगाव खुर्द प्रांत हुकेरी येथ + + त्याचे वाटणी खेरीज मळे दोन येकूण जमीन १० व काली कीर्दी १५ येकूण पंचवीस बिघे जमीन दरोबस्त इनाम करून दिली असे तरी ते व त्याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेनं आणभवतील त्या जमिनीची चतुःसिमा करून देणे जाणिजे छ २० रमजान लेखनसीमा.

लेखांक २४ तारीख ७-६-१७७०

श्री

रु. नं. १

अ. नं. ४७

अखंडित लक्ष्मी आलंकृत राज

मान्य राजेश्री रामाजी संभाजी मुतालीक नि॥ देशमुखी व सरदेशमुखी गोसावी यासी--

शेवक नारायण व्यंकटराव नमस्कार सुाा इहिदे सबैने मया व आलफ तुमचे बंधु पिलाजी संभाजी यानी पेशजी मुतालिकी बद्दल नजर दिली तेसमई पांच बिघे जमीन देणे म्हणून विनंती केली होती त्यास हली जमीन चालत आहे त्याशिवाय जाजती गांवगना जमीन साधणूक करणे म्हणजे सनद करून दिली जाईल म्हणोन आज्ञा केली होती त्यास तें देवआज्ञा जाहाले अलीकडे तुम्हीं गावातना पेशजी कमताची जमीन चाल्त आहे त्याखेरीज ज्याजती साधणूक केली आणि येविसी विनंती केली त्यावरून चौकसी करून जाजती साधणूक पैकी पेशजी कराराप्रमाणे देशमुखीच्या इनामा पैकी जमीन काटी मूल

·२ का उदगाव

·१॥ मौजे दानोळी कसबा उदगाव

·१॥ मौजे कोथळी कसबा उदगाव

·५

येकूण पांच बिघे जमीन तुम्हास इनाम करून दिली असे तुम्ही व तुमचे पुत्र व पौत्रादि वंशपरंपरेने अनभवून सुखरूप राहाणे जाणिजे
छ १२ माहे सफर मोर्तबा असे—

लेखांक २५ इ. स. १७७०

श्री

रु. नं. १
अ. नं. १७
यादी स्मरणार्थ

१ भाऊसाहेब पेशवे पानपतचे स्वारीस गारद जाहाले शके १६८२ विक्रमनाम सवस्तरे पौष शु. ८ बुधवार सुाा इहिदे सितैन मया आलफ.

१ भाऊसाहेब पेशवे यासी वस्त्रे पेशवाईची श्रीमन्माहाराज राजेश्री संभाजी महाराज यानी करवीरी दिली शके १६७९ वस्त्रे देऊन कर्नाटकची स्वारी करणेची आज्ञा जाहालीवरून स्वारीस गेले ई।। समानखमसैन मया आलफ.

१ नारायणराव पेशवे यासी वस्त्रे करवीराहून आपाजी शामजी व महादेव शास्त्री व हुजऱ्या या समागमे पाा शके १६९१ सुाा सबैन मया आलफ.

१ नानासाहेब पेशवे सावनूरकर नवाब याजवर स्वारी करावयासी पुणेहून आणविले तेसमई संभाजी महाराज यानी पेशवाईची वस्त्रे देऊन स्वारीस पाटविले शके १६७४

लेखांक २६ तारीख १८–७–१७७१

श्री

निवडी दप्तर रु. नं. १
अ. नं. ४९

यादी हुजुरून राजश्री राणोजी घोरपडे सेनापति याजकडून श्वारी खर्चाबा यकसाली यैवज पैाा यैवज घेतला सुाा इसने सबैन मया व अलफ. नख्त रुाा ५००००

ताा

४०००० शेनापतीकडून
१०००० इचलकर्जीकर घोरपडे याजकडून
———
५००००

येकूण पनास हजार रुपये घेतले ते माहाल पोता जमा आसत विद्यमाने कृष्णाजी गाइकवाड छ ५ माहे शाबान

मोर्तब

लेखांक २७ तारीख २३-८-१७७१

श्री

अ. नं. ५१

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ९८

खरनाम संवत्सरे श्रावण शुध त्रयोदसी गुरुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा यासी आज्ञा केली यैसीजे बहुत दिवस तुम्हाकडून विनंती पत्र येऊन वर्तमान निवेदन होत नाही यैसे न करणे वरीचेवरी तुम्हाकडील विनंती पत्रे येऊन वर्तमान विदित होत असावे हेच स्वामीस परम अवश्यक जाणोन सदैव साकल्यार्थ लेहून स्वामीस संतोष होय ते करीत जाणे प्रस्तुत तीर्थरूप माहाराज मातुश्री आईसाहेब याणी आज्ञापत्र सादर केले आहे तेथे घाटगे याविषई व शरीरसंमधाचा मजकूर लिहिला तो सविस्तर अर्थ चितात आणून कार्य घडोन साहेब तुम्हावरी संतोषी होत ते करणे यतद्विषईचा सकल अभिप्राय मातुश्री साहेबाच्या आज्ञापत्रावरून कलो येईल जाणिजे बहुत काय लिहिणे.

सुरु सुद बार सात सुद बार

लेखांक २८ इ. स. १७७२-७३

श्री

अ. नं. ५३

यादी श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब सुा सलास

सबैन मया व अलफ

(डावी बाजू)

भगवंत आपाजी देहे

७००० मौजे बेडकीहाल पो हुकेरी

४००० मौजे संवदलगे पो मजकूर

६००० मौजे सिरगूर पो रायबाग

५००० मौजे हेरले पो पनाला

३००० मौजे सिदनुरली

२५००० ५

पो वजा मौजे सिदनुरली येथील राजपत्रात शक संवत्सर मागाहून घातला सबब हा गाव साहेबी घ्यावा देह १

यैा आकार अजमासे देहे ३०००

बाकी देहे ४ यैा आकार २२०००

येकून चार गाव याचा आकार अजमासे बावीस हजार आहे त्यास मारनिलेनी पूर्वी-

पासून साहेबाची शेवा बहुत दिवस केली आहे त्याचे चालवणे साहेबास अगत्य आहेच तरी साहेबी कृपा करुन सदरहू गाव त्याजकडे चालवावे मागील गुणदोष चितात न आणिता अंतःकर्णपूर्वक कृपा केल्यास हेहि चाकरीस उमेदवार आहेत चाकरी करितील साहेबी गाव दिल्हयाप्रमाणे क्षेपनिक्षेप कृपा करून चालवावे : येणेप्रमाणे करार.

श्रीनिवास शेषाद्रि देहे

२००० मौजे हचीनहाल पो हुकेरी १
३००० मौजे निलजी पो रायबाग १

५००० २ देहे

० सागरूल व मागूर पेसजीच सरकारात घेतले आहे सबब येकूण दोन गाव पांच हजार आकाराचे अजमासे हाली करार केले असेत तरी मारनिलेस अभयपत्र पाठऊन संशये दूर करून त्यास साहेबी आपणाजवल आणावे चाकरी घेऊन कृपा करून गाव कृपा करून चालवावे.

येणे प्रो करार.

येसाजी राम व रामचंद्र नारायण
६००० मौजे हुपरी पो मिरज देहे १
३००० मौजे राजापूर पो हुकेरी १
१००० मौजे वालवे पो कागल १
४००० मौजे हेरवाड पो रायबाग १

१४००० ४

येकूण च्यार गाव याचा अजमासे आकार चौदा हजार पो तीन गाव वडगावचे पूर्वील भोगवटा आहे बाकी मौजे हेरवाड हा गाव वडगावचे खाली ठाणे घालून घेतला तो सरकारात यावा म्हणून आज्ञा त्यास येविसीची चौकसी येसाजी राम यास आणोन केली त्याणी सांगितले जे इनामपत्र वडगावचे पूर्वी घेऊन गाव जिवाजी मान्ये याजकडे चाकरी घेऊन चालवीत होतो त्यावरून जिवाजी माने याचे भाऊ सिदोजी मान्ये यास रुबरु आणून माथा तुलसी ठेऊन पुरसीस केली यावरून त्याणी सत्योतरे लिहून दिल्हे जे जिवाजी माने व आपण येकवट असता गाव आपणाकडे पेसजी पासून चालत आला त्याची इनामपत्रे आपणाजवल आहेत हरि राम व विसाजी नारायेण यानी चाकरी गावासमधे केली नाही वडगावचे खाली जबरदस्तीने गाव घेऊन ठाणे बसविले त्यावरून साहेबाचा गाव साहेबाकडे द्यावा याचा करार केला असे त्या प्रमाणे साहेबी घ्यावा बाकी तीन गाव दाहा हजार आकाराचे अजमासे चिंतो हरि व आबाजी विश्वनाथ याजकडे चालवावे येणे प्रो रुजू. मौजे हेरवाड येथे मा रनिलेनी इमारत बांधली आहे यास्तव तो गाव त्याजकडे ठेवावा त्याचे मुबादला मौजे राजापूर व मौजे वालवे हे गाव दोन्ही

साहेबी आपले सरकारात घ्यावे. येणे प्रो करार. रामचंद्र माहादेव व बालाजी केशव वगैरे याणी तिगस्ता मध्यस्तीत इनाम गाव म्हणून घेतले देहे.

७००० मौजे करूर मनेरसुधा देहे २
१२०० मौजे करजगे पा हुकेरी
३००० मौजे गलतगे पो मजकूर
३५०० मौजे कल्होल पो मजकूर
२००० मौजे असू परगणे मजकूर
३००० मौजे जनवाड पा मजकूर
३००० मौजे कुडणूर पो मजकूर
१५०० मौजे नसलापूर पा मजकूर
५०० मौजे अकीवाट पा मजकूर

२४७०० १० देहे

येकून दाहा गाव येकून चोवीस हजार सातसे अजमासे आकाराचे रामचंद्र माहादेव व बालाजी केशव वगैरे याणी पेसजी मध्यस्तीसभवे घेतले होते ते हाली आईसाहेबाकडे माघारे द्यावे. येणे प्रो करार.

आपाजी सिंदे देसाई पा रायबाग याजकडे मौजे घोसरवाड पो मजकूर हाली त्याजकडे दिल्हे आहे सन आर्बाचे साली हुजूरचे ठाणे होते तिगस्ता त्याजकडे दिल्हे आहे देहे १
येकूण रु। ४०००

येक गाव चार हजार रुपयाचे अजमासे आकाराचा लिहिला आहे त्यास दुसालाचा यैवज नजर दाखल साहेबी घेऊन गावदेसाई मार याजकडे चालवावा. येणे प्रो अगर त्याची रजाबंदी राखून फडशा करावा येणे प्रो करार.

मानाजी बागुल सिलेदार याजकडे
मौजे येलगुड पो रायबाग देहे १

रुपये
२०००

चाकरी घेऊन सदरहू गाव दोन हजाराचे आकाराचा अजमासे बागुलाकडे चालवावा येणे प्रो करार.

तालुके निपाणी पे॥ हुकेरी निंबालकर देसाई पे॥ मजकूर याजकडे होती ती सन आर्बाचे साली साहेबाकडे दोनही तालुके नजर केले त्यासमई निपाणी तालुका सरकारचे अमलात आला असता हाली गैरवाका तुम्हास समजाऊन गाव घेतले देहे

४५०० मौजे निपाणी देहे १
३५०० मौजे जत्रवाट १
४००० मौजे कोडणी १

५०००	मौजे कणगले	१
१०००	मौजे सिरगोपी	१
५०००	मौजे कोगनोली	१
१०००	मौजे मतीवड	१
५००	मौजे सुलगाव	१
२४५००		८

येकूण आठ गाव येकूण चोवीस हजार पांचसे रुाो आकाराचे घ्यावयाचे आलाहिदा तपसीलवार करार केला आहे त्याप्रो साहेबी गांव सरकारात घ्यावे. येणे प्रो करार.

तालुके मनोली येथील त्रिवर्ग सिलेदाराकडे देहे सुमारे ३ आलीकडे रामचंद्र माहादेव याचे अमलात दिल्हे आहेत ते सरकारात यावे देहे तीन १००० रुपये

आलाहिदा कृष्णाबाई सिंदे याचे कल्मात फडशा लिहिला आहे त्या प्रमाणे चालवावे येणे प्रो करार.

रामचंद्र सखाजी याजकडे मौजे मोरब पे॥ रायबाग हा गाव आहे तो सरकारात यावा बेरीज आजमासे

रुाो १५००

मारनिलेस पाचसे रुपये सालीना वेतन देऊन चाकरी घ्यावी

सदरहू दीड हजार रुपयाचा गांव साहेबी आपले सरकारात घ्यावा. येणे प्रो करार.

दिनकर माहादेव याजकडे मौजे दुगेवाडी व यडराव पो रायबाग हे गाव होते ते सरकारात सन तिसा सितैन साली सरकारात आलेच आहेत त्या प्रो असावे कल्म १

सन तिसा सितैनचे साली साहेबी घेतले त्यास साहेबी आपले स्वसंतोषेकडून चालवावयाचे जाहले तर चालवावे. येणे प्रो करार.

मौजे जनवाड पो हुकेरी हा गाव मंत्रीकडे होता तो सन आर्बा सितैन साली घेऊन विठलराव सिवदेव याजकडे दिल्हा होता. हाली सरकारचा सरकारात सन तिसा सितैन पासून चालत आहे त्याप्रो सरकारात असावा १

सदरहू गाव मंत्री याजकडे इनाम आहे तो साहेबी सरकारात घेतला आहे त्यास मंत्री याचा इनाम आहे साहेबी कृपालु होऊन मंत्री याजकडे चालवावा. येणे प्रो करार.

(उजवी बाजू)

शेष्रो नारायण देहे

४००० मौजे आखाले पो हुकेरी

२५०० मौजे बालेकुड पो मजकूर

९००० मौजे भिरडी पो रायबाग

१५०० मौजे माहालवे पो कागल

४५०० मौजे रुई पो कागल
५०० मौजे पडलीहाल पो हुकेरी
५०० मौजे बालिंग
१००० मौजे भिवसी

———

० यकसंवेची वाडी सन आर्बात घेतली तेव्हा मौजे यडरावे सरंजाम होता तो पेसजीच सरकारात घेतला आहे सबब.

———

२३५००
पो वजा मौजे भिवसी येथील राजपत्रांत शक संवत्सर माघाहून घातला सबब साहेबी हा गाव सरकारात आपले घ्यावा देहे १ येकूण आकार अजमासे १००० रुो
बाकी देहे ७ ये॥ आकार २२५००

येकून सात गाव याचा आकार अजमासे बावीस हजार पांचसे रुपयाचे करार केले असेत त्याप्रमाणे साहेबी मारनिलेकडे चालवावे येथे चाकरी करितील ते साहेबाचीच आहे गावकराराप्रमाणे साहेबी चालवावे येणे प्रो करार.

नीलकंठ शामराव निसबत चव्हाण कसबा रायेबाग सरकार देहे १ यो रुपये ४०००
को मजकूर हा ठाण्याचा गाव सबब साहेबी सरकारात घ्यावा आणि सदरहू गावाचे सुबादला दुसरा गाव पांच हजार रुपयाचा वसुली लाऊन द्यावा त्याची साहेबाची पत्रे व माहाराजाची इनामाची करून द्यावी आणि क्षेपनिक्षेप इनाम गाव साहेबी चालवावा. येणे प्रो करार.
दादाजी त्रिंबक याजकडे मौजे निडगुदी पो रायबाग सन आर्बा सितैन साली घेतला देहे १ येकूण २००० रुो

वडगावचे साला आलीकडे घेतला सबब व पूर्वील वृत्त मनास आणिता रायेबागकर देसाई याचा गाव सबब हाली साहेबी घ्यावा. येणे प्रो करार
इसफबेग किले बेलगाव याजकडे देहे पो हुकेरी पैकी ३ सुमार
५००० रुपये

येकूण तीन गाव पाच हजार अजमासे आकाराचे चालवावे येणे प्रो करार.
कृष्णाबाई सिंदी तालुके मनोली पैकी देहे सुमार ७ येकूण रुपये २५००० पेसजी गाव करार करून दिल्हे आहेत त्याप्रो कृष्णाबाईकडे चालवावे याप्रो आलाहिदा करार करून दिल्हा आहे त्याप्रो चालवावे येणे प्रो करार.
सिवाजी घोरपडे याजकडे मौजे दटवाड पो भिरज देहे सुमार १ सन आर्बा सितैनचे साली साहेबाकडे दिल्हे होते तिगस्ता मारनिलेचे स्वाधीन केले आहे
४००० रुपये

सदरहू गाव घोरपडे याजकडून दूर करून साहेबाकडे देविला असे साहेबी आपले सरकारात घ्यावा. येणे प्रो करार.

आनुबाई घोरपडी याजकडे तिगस्ता हुजूरची ठाणी उठऊन दिल्हे लाट व रांगोली २ देहे

१०००० रुपये

दोन गाव दाहा हजार अजमासे आकाराचे अनुबाईकडे होते ते हाली साहेबाकडे देविले असेत आपले सरकारात साहेबी घ्यावे. येणे प्रो करार.

माहादजी सितोंले याजकडे देहे

७००० कसबा मांजरी पो कागल

४००० मौजे अंकली पो मजकूर

४००० मौजे नेज पा रायबाग १

१५००० ३

येकूण तीन गाव पंधरा हजाराचे आकाराचे मारनिलेकडे चालवावे चाकरी येथे आम्हाजवल करितील. येणे प्रो करार.

विसाजी कृष्ण याजकडे मौजे कोटबागी पो हुकेरी जबरदस्तीने काटकाचे अमलात घेतला आहे १ देहे

२००० रुपये

बडगावचे साली येक गाव दोन हजार रुपयाचे आकाराचा विसाजी कृष्ण याणी घेऊन पागेकडे जमा धरिला आहे तो हाली साहेबी आपले सरकारात घ्यावा. येणें प्रो करार.

मौजे सिंदनहाल तालुके तोरगल हा गाव रामचंद्र माहादेव याचे अमलात घेतला आहे तो सरकारात यावा देहे १

२००० रुपये

येक गाव दोन हजार रुपयाचे अजमासे आकाराचा आहे तो कर्जाचे यैवजी दिल्हा आहे त्याप्रो कर्जाचे यैवजी चालवावा अथवा कर्जास यैवज दुसरा लाऊन द्यावा तदोतर साहेबी सरकारात गाव घ्यावा. येणे प्रो करार.

मौजे माणगाव शेषो नारायण याजकडे असता त्याजकडून अमल दूर जाहाला ते समई सरकारात न देता कितुरकराचे म्हणून सांगोन वेंकापा नाईक कलकेरी याजकडून कितुरकराची पत्रे आणून त्या पत्रावरून तुमचे पत्राचे साधन करून गावामध्येच रा वेंकापा नाईक खातात तो सरकारात यावा. १ कलम

भागीर्थीबाई सांवतीण यास आईसाहेबाकडील सरंजाम आहे त्यापैकी हा गाव कितुरकरानी दाबला होता तो शेषो नारायण याणी घेतला पुढे सन तिसा सितैनात साहेबाकडे यावा

त्यास शेषो नारायण याणी सांगितले की कितुरकराचा गाव कितुरकरानी घेतला त्या उपरी वेंकाजी नाईक कलकिरी याणी कितुरकराची पत्रे करून घेतली ती आणून दाखविली त्याप्रमाणे आम्हाकडील पत्रे करून घेतली म्हणोन साहेबी सांगोन पाठविले त्यास पाहाता अर्थी पाच वर्षे शेषो नारायेण याणी अमल केला त्याअन्वये म्हटले तरी साहेबाकडील गाव असा होतो तो साहेबी आपले सरकारात घ्यावा. येणे प्रो करार.

चिंतो हरि व दुसरे आबाजी विश्व (नाथ) याजकडे गाव चालवावा याचा आलाहिदा करार करून दिल्हा आहे त्याप्राो चालवावे हेरवाड याजकडे राखून त्याचे मुबदला दोन गाव साहेबास लाऊन दिल्हे आहेत त्यास जितका यैवज हेरवाडचा होईल तितका यैवज दोन्ही गाव मिलोन घ्यावा जाजती जाहल्यास त्याची जमीन यास साहेबी लाऊन घ्यावी. येणे प्रो करार.

सदरहू लिहिल्याअन्वये बेवीस कलमे करार.

लेखांक २९ तारीख १९-१-१७७३

श्री

रु. नं. १

अ. नं. १८६

तालीक

यादी श्रीमन्महाराज मातुश्री आईसा

हेब सुा सलास सबैन मया व आलफ

शके १६९४ नंदन नाम संवत्छरे

तालुके मनोली येथील सरकारचा आमल मुकासबाब व कमेत व गडपटी वगैरे आमल तुम्हाकडून माहली चालतो त्याप्रमाणे निखलस सरकारात यावा व परगण मुरगोड व परगणे सत्तीकीरे येथील जाहागिरीच्या आमलाचा मक्ता पेसजी शिंदे याचे कारकिर्दीपासोन तुम्हाकडे द्यावयाचा करार चालत आहे त्याप्रमाणे सरकारातून पावेल येणे प्रमाणे करार करून यैवज देत घेत जावा. कलम १

मनोली तालुक्याकडून आम्हाकडून माहाली मुकासबाब व कमेत सिंदेच्या कारकिर्दीपासून चालत आहेत त्याप्रमाणे साहेबाकडे चालेल व परगणे मुरगुड व परगणे सत्तीकीरे येथील जहागिरीचा मक्ता सिंदेच्या कारकिर्दीपासून आम्हाकडे घ्यावयाचा चालत आला आहे त्याप्रो यैवज साहेबी आम्हाकडे द्यावा येणे प्रमाणे करार. कलम १

भगवंत आपाजी व शेषो नारायण व शेषो त्रिमल साहेबाचे सेवक असता महाराज कैलासवासी जाहलीयानंतर साहेबाच्या पायासी यथोस्थित वर्तणूक न केली याजकरिता मशारनिलेकडे गाव खेडी बहुत आहेत त्या पौ साहेबी संतोषे दिल्ही असतील ते एकनिष्टपणे सेवा केलीयास चालतील बाकी गाव सरकारचे सरकारात यावे. कलम १

त्रिवर्गानी साहेबाची सेवा बहुत दिवस केली आहे पदरशचे आहेत याजकरिता साहेबी कृपाकरून अलाहिदा गाव चालविण्याचा करार केला आहे त्याप्रमाणे चालवावे. येणे प्रमाणे करार. पो हुकेरी व तालुका मनोली व फुटगाव पो कागल व रायबाग पैकी भगवंत आपाजी व शेषो नारायेण याचे कारकिर्दीत चाललेप्रमाणे कुल आमल साहेबाकडे चालावा मध्ये सांगणाराचे गोष्टीवरून विपर्यास घडले पुढे होणार नाही याप्रमाणे करार करून निशापूर्वक विनंती पत्रे यावी.

पेसजी भगवंत आपाजी व शेषो नारायेण याचे कारकिर्दीत चालले आहे त्याप्रमाणे सालमजकुरापासून साहेबाकडे चालेल या उपरी सांगणाराचे सांगितल्यावरी अथवा कोणेविसी दिकत पडोन विपर्यास होणार नाही येविसी आईसाहेबाचे नांवे अलाहिदा पत्र.

रामचंद्र महादेव व बाळाजी केशव व गोपालभट वगैरे यानी मध्यस्तीत गाव इनाम म्हणोन घेतले आहेत ते सरकारात यावे. कलम १

त्रिवर्गानी वगैरे याणी मध्येस्तीमधे गाव घेतले असतील ते साहेबाचे साहेबाकडे देविले आहेत ते साहेबी सरकारात घ्यावे. येणे प्रमाणे करार.

साहेबाचे पायासी कोणी आमर्यादा वर्तणूक केली तरी साहेबाचे आज्ञेप्रमाणे तुम्ही यासी शिक्षा करून साहेबाचे आज्ञेत सुरलीत वर्तनूक करीतसे करावे.......... कलम १

साहेबासी कोणी गैरवर्तणूक करितील त्यासी सिक्षा केली जाईल. येणेप्रमाणे करार.

देशक व देशपांडे व पाटील कुलकर्णी वगैरे वतनदार व इनामदार व सरंजामी वगैरे साहेबाचे राज्यातील तुम्हाकडे व तुम्हाकडील तालुकदाराकडे कोणी आल्यास इनसाफविसी व दरयेकविसी पक्षपात न धरिता साहेबाचे शेवेसी पाटवून द्यावे......कलम

आम्हाकडील व आमचे तालुकदाराकडील कोणी साहेबाकडे गेले तर आम्हाकडे पाठवून द्यावे साहेबाकडील कोणी आम्हाकडे अगर आमचे तालुकदाराकडे आले तरी ताकीद करून साहेबाचे साहेबाकडे पाटऊन देऊ. साहेबाचे राज्यात हरयेक इनसाफ होतच आहे. येणेप्रमाणे करार.

साहेबामध्ये व तुम्हामध्ये हरकोणी विपर्यास वारंवार पाडतात येविसी शफतपूर्वक विपर्यास न येईसे करावे............करार कलम १

साहेबाकडून याप्रमाणे न व्हावे सेवकाकडूनही होणार नाही. येणे प्रमाणे करार.

साहेबाकडील जंजिरे व जंजिरेचे निसबतीचे आरमार व किले यासी तुम्हाकडून व तुम्हाकडील तालुकदाराकडून काडीमात्र उपसर्ग होऊ नये.....................कलम १

साहेबाकडून व साहेबाचे तालुकदाराकडून आम्हाकडील तालुकियात उपद्रव होऊ नये तसेच सेवकाकडून व सेवकाचे तालुकदाराकडूनही साहेबाचे किले व कोटास व आरमारास उपद्रव होणार नाही. येणे प्रमाणे करार.

करारा प्रमाणे इमानपत्रे राजश्री प्रधानपंत याची व सखाराम भगवंत याची यावी.........................कलम १

साल मजकुरी करार जाहले प्रमाणे साहेबाकडून निभावणी व्हावी त्याप्रमाणे सेवकाकडूनही होईल अंतर होणार नाही येविसी आलाहिदा पत्रे देणें. देशमुख देशपांडे व इनामदार व सरंजामी लोकाकडून पैका भगवंत आपाजी व शेषो नारायेण याणी सन इसने सितैनात व आर्बा सितैन साली नजरेदाखल घेतला असेल त्यावेलेस त्याचे निसबतीने रयात जाहाली असेल त्याजपासून त्याअन्वये साल्मजकुरीही पैका घेऊ येविसी तुम्हाकडील त्यास ताकीद आसावी व कोणी तुम्हाकडे आलीयासी दिकत पडो नये. येणे प्रमाणे करार···
················कलम १

हाली गाव आलाहिदा करार करून दिल्हे आहेत त्याशिवाय रजावंदीने बोभाट येथे न येता येवज साधेल तो साधून घ्यावा. येणे प्रमाणे करार.

सालसी महालाकडे सिंधुदुर्गाकडील येवज चालत आहे त्यास कैलासवासी बालाजी पंडित याचे कारकीर्दीत चालत होते आलीकडे काही नवीन दिखत काढून सुधामत आमल देत नाही तरी पहिले चालीप्रमाणे आमल देत जाणे म्हणोन ताकीद करावी···
················कलम १

आजपावेतो चालले असेल त्याप्रमाणे चालेल येणे प्रमाणे करार.

सरकारचे शेवक असता सरकारात रुजू न राहाणे गैरवर्तणूक करितात त्याचे बंदोबस्ताविसी तुम्हाकडील काही तोफा व गारदी व फौज देऊन बंदोबस्त केला पाहिजे
·············कलम १

दोन तोफा मध्यमप्रतीच्या व शंभर स्वार घेऊन फक्त ठाणी आलाहिदा यादीप्रमाणे बसऊन द्यावी याशिवाय मुलुख जाजती सर्वात्मना कोणावरी करू नये. येणे प्रमाणे करार.

बारा पतकेदारानी सरकारात चाकरी करावी त्याचे चालवणे आरातारा पाहून चालऊ···············कलम १

आजपावेतो चालत आले असेल त्याप्रमाणे चालेल येणे प्रमाणे करार.

मनोली तालुकीयातील देसक व देशपांडे याजकडे सरकारच्या सनदा वितरिक्त जे गाव असतील ते सरकारात यावे.············कलम

साहेबाची पत्रे व पादशाही फर्मान व भोगवटा असेल त्याप्रमाणे चालवावे शिवाय असतील ते साहेबी सरकारात घ्यावे येणेप्रमाणे करार.

मनोली तालुका व हुकेरी तालुकीयातील वगैरे दारुगोली व घोडी व गुरे जे काय असतील ते सरकारात द्यावी············कलम १

शेषो नारायेण याचे निसबतीस जिंतीस साहेबाचे पागेची घोडी होती ती रामचंद्र महादेव याजकडे आणिली आहेत ती त्याजकडून देविली आहेत त्याप्रमाणे घ्यावी. येणे प्रमाणे करार.

सरकारचे हुजुरे राजपुरीस पत्रे हमेशा सलुकाची जातात त्या प्रमाणे घेऊन गेले होते ते हुजुरे तुम्ही तले घोसाल्यास ठेविले आहेत ते सरकारात यावे······कलम १

आमचे जेथे विरुद्ध आसेल तेथे साहेबी पत्रे पाटवू नयेत हाली हुजुरे धरून तले घोसाल यात ठेविले आहेत ते सोडून देविले आहेत. येणे प्रमाणे करार.

बालाजी पंडित याचे स्वदस्तुरची याद करवीरचे मुकामी कैलासवासी स्वामीचे सनिध लेहून दिल्ही आहे त्यास अंतर करू नये.······················· कलम १
हली करार करून दिल्हा आहे त्याप्रमाणे चालेल येणे प्रमाणे करार.

तालुके मनोली व चिकोडी व फुटगाव पाो चौसाला सिबंधी फिटून जो यैवज वसूल आला असेल तो हली येवज करार ठरेल त्यात वजा यावा············कलम १

सन सलास सबैनात वसूल साल मजकुरचा पडिला आसेल तो बेहडीयाप्रमाणे सिबंदीत वजा करून जाजती वसूल आला आसेल तर ठराव येवजाचा होईल त्यात मजुरा देऊ सिबंदीचा येवज फार आणि वसूल थोडा जाहाला तर बाकीचा येवज साहेबी आम्हास द्यावा. येणे प्रमाणे करार.

किरकोली वतनदार साहेबाकडील तालुकीयातील तुम्हाकडे जे असतील ते साहेबाकडे पाटऊन द्यावे············कलम

साहेबाचे तालुक्यातील दादीफिरयादी आल्या आसतील शोध लागल्यास साहेबाचे साहेबाकडे पाटवून देऊ. येणे प्रमाणे करार.

शेषो नारायेण याचे कारकीर्दीप्रमाणे एक खेडे न राहाता दोन्ही तालुके व फुटगाव व जुनी खेडी साहेबाकडे द्यावी·············कलम १

शेषो नारायेण याचे कारकीर्दीत चालत आसतील त्याप्रमाणे चालतील. येणे प्रमाणे करार.

हुकीरी परगणेचे देशमुख बसवप्रभु लिंगाईत व तमाजी रबलो निंबाल्कर याणी काटकाई समई मनमाने तसी खेडी इनाम करून घेतली होती. त्यास सन इसने सितैनात व आर्बा सितैनात हुकेरी मनोली तालुका साहेबाकडे नजर केला तेव्हा भोगवटीच्या चालीप्रमाणे गाव नेमोन दिल्हे त्याप्रमाणे हली चालत आहेत निंबाल्कर देशमुख याचा धाकटा घरभाऊ याने काटकाई करून निपाणी वगैरे खेडी बल्काऊन खात होते कागदपत्राची साधने काटकाईत करून घेतली परंतु सन आर्बा सितैनात भगवंत आपाजी व शेषोनारायेण याणी निंबाल्कर देसाई याचे निसबतीचे कारभारी सबब देसाई निंबाल्कर याचीच ठाणी आसेल म्हणून बल्काऊन बसले. त्याजवरी सन सबैनात सदरहू ठाणी द्यावयाचा करार जाहाला होता ते समई सदरहूची चौकशी नागमंगलचे मुकामी भिवराव देशपांडे पाो मजकूर याजकडील ईदलशाही झाडे तुम्ही पाहून खेडी जप्त केली त्याकडे सन इसने सबैनात तुम्हापासून देसाई याचे नांवचे कागद पत्र दाखऊन उभयता देसाई याची चाल मागील इदलसाहीची न दाखविता खेडी आपले निसबत्तीस करून घेतली ती हली साहेबाचे साहेबाकडे यावी.

·· कलम १

सदरहू कल्माची चौकशी मनास आणिता त्यातील आर्थ उभयता देशमुख व देशपांडे परगणे मजकूर याचे दुमाली गावची चाल पुरातन इद्लशाहीचे वेलेस चालत आली तेवेलचे कागदपत्र भिवराव व्यंकटेश देशपांडे परगणे मजकूर यासी आनोन पाहिले त्याची चालू कारकीर्द इद्लशाही कमकसर वर्षे शंभर

(१) आलगोंडा देसाई लिंगाईत
देह ७॥ तनखा रुपये
९९६८॥
देशपांडे देह २॥ तनखा रुपये
१३०६७।·

परबगोडा निंबालकर देसाई देह ३
येकून तनखा रुपये ६३८६॥—

त्या आलीकडे कारकीर्द इद्लशाहीची अखेरीस व शिवशाही व औरंगजेब पाद-शाहा कम कसर वर्षे पाऊनशेह येसी तपसील

(१) बसवगोंडा वलद आल्गोंडा
देसाई देह १४॥ येकून
तनखा रुपये
१७८३६॥
देशपांडे देह ६॥
तनखा रुपये
४८११

(२) तमाजी परवगौंड निंबालकर
देसाई देह ६ येकून तनका रुपये
११७३६॥·

या आलीकडे कम कसर साट पासष्ट वर्षे देसकानी मवासगिरी करुन संवस्थानिक म्हणू लागले त्यावेलेस काटकाईत मनमाने तसी साधने करून गाव इनाम मेलविले ते सन इसने सितैन पावेतो चालिले

(१) बसवगोडा बीन लखमगोंडा
लिंगाईत राजपत्री व फर्मानी
देह ६५ तनखा रुपये
११९९८२॥ राजपत्री
देह ४१॥
१९५७६॥। फर्मानी
देह १३॥
——— —
१३९५५९। ५५
की॥ देह
सुद्धा १०
६५

तमाजी खलो निंबालकर
देसाई व शिदापा देसाई
रुपये
१२४३७ तमाजी खलोजी
३१३७ निपाणी लिंगाईत
देसाई याजला हुजरती मोब-
दला देऊन लिंगायत
देसाई याजपासून
घेतली आणि सिदापा
धाकटा भाऊ याजकडला
निपाणी दिली व ती
कर्यातीचा हक व कौलात

देशपांडे यासी देसक
बलाऊन दरोबस्त मोडिले
सबब गाव याजकडे चालत
नाहीत कल्म.

देऊन तेथे ठेविला
होता.

१५५७४
१६९१६ सिदापा निंबालकर
यान निपाणीत
राहून काटकाई
करून घेतली खेडी
७ येकून.

३२४९०

आलीकडे सन आर्बा सितेनात साहेबाकडील कुल ठाणी बसली तेसमई देसकाकडे गाव राहाते केले बी तपशील

लिंगाईत निसवतीस खेडी
कांहीं इनामी कांहीं गैर-
इनामी मिलोन देह ९ तनखा
रुपये ७३१२ कर्यात मनोली

४६८७ का। मनोली
२६२५ नेरली

७३१२ २
२६२५ आमनगी

का। नेज १
४०४९ का। कबूर

२८१२ नागरमनोली
७५० अवरगोल
४८७ बलेगली

४०४९

३

तमाजी खलोजी
निबाल्कर देसाई देह ६
येकून तनखा
१८७५ नदी कुरली
का। जुगल
४७४३॥। का। कबूर
१९३१। हलेकुड
२८१२॥ हुबराणी

४७४३॥।

२

६८२१। कर्यात सदलगे
३१०७॥। नणदी
२२११॥– नागराल
१५०१॥।= मलीकवाड
बाबत
देशपांडे

१३४०

२७५० मुबलकाकडे
१५०० बेमलवड कर्यात कबूर
१२५० आरल

२७५० उवाकर्यातमूळ

५०

९३७॥ नाडगौडकीकडे

२

बुधेहाल का। कबूर

देह.

१७६७३॥

९

—

६

तपशील

११९३८'२ येकून देह ५

१५०१।।।= मलीकवाड देशपांडे याचे पन्नास साठ वर्षे जबर-दस्तीने खातात

१३४४०

६

तालुके निपाणी पैकी खेडी ८ आठ धाकटे भावाकडे साठ पाऊनशे वर्षे चालली ते शेषो नारायणे यानी सन आर्बा सितैनाचे साली घेऊन ठाणी घातली देह ८ येकून तनखा रुपये

२०२५३

याप्रमाणे चालले पूर्वीपासोन चालत आले आहेत तेव्हा शेषो नारायेण निंबालकर देसाई याचे कारभारी सबब सदरहू आठ गाव निपाणीचे निंबालकर देसाई याचेच म्हणतात परंतु पुरातन दुमालीची चाल पाहाता सदरहु आठ गावशिवाय उभयेता देसाइ याची दुमालीची चाल पुरत्ये येविसीची चौकशी सन सबैन साली कर्नाटकचे स्वारीत तुरे किवरे याचे मुकामी होऊन आठ गाव जप्त जाहाले मध्ये शेषो नारायेण यानी पुरातन दुमालीची चाल न समजाविता देसाई याचे वतनी गाव देसाई याजकडे द्यावे म्हणोन सांगोन जप्ती मोकली करून निंबालकर देसाई याचे नांवे गाव सोडऊन घेतले त्याजवर हाली सालमजकुरी साहेबाकडे तालुके घ्यावयाचा ठराव जाहला ते समई सदरऊ गाव सरकारात यावे म्हणोन साहेबाची आज्ञा आली त्याजवरून मागती चौकशी करिता पुरातन दुमालीची चाल उभयता देसाई याची पाहाता सदरहू आठ गाव निंबालकर देसाइ याजकडे जाजती आहेत ते घेऊन साहेबाचे सरकारात द्यावयाचा करार केला असे त्याप्रमाणे साहेबी घ्यावे. येणे प्रमाणे करार.

लाहानसान अंतर कोणापासोन पडिल्यास साहेबी मनात आणू नये सेवकही मनात आणणार नाही परस्पर वरचेवर बोलून चालून नीट करावे लाहाण गोष्टी मुले योरल्या करारास अंतर न व्हावे. येणे प्रमाणे .... करार. भगवंतराव आपाजी व शेषो नारायण हे आपले कर्ज सरकारात यावे

म्हणतात त्यास सन ईसने सितैन साली सात लाख रुपयेचा भरणा करार केला त्यापैकी साहेबानी उभयेतास सावकाराकडून आडीच लाख रुपये कर्जदाखल देविले व आडीच लाख चिकोडीकरापासोन घेतले सिवाय आजमासे सरंजामी वगैरे याजकडून तीन लाख रुपये घेतले पुढे सन आर्बा सितैनात पाच लाख रुपये व सन सबा सितैन साली रुपये येक लाख येकून साहा लाख भरले त्यापैकी साहेबानी सावकाराकडून आर्बासितैनात सवा लाख कर्जदाखल रुपये दिल्हे आहेत बाकी पावणे पाच लाख रुपये मशारनिलेनी भरले त्यापैकी सन ईसने सितैन व आर्बा सितैनात ठाणी सरकारची बसली तेव्हा मागती सरजामीयापासून व इनामदार व जमीनदार याजपासून यैवज वसूल करून घेतला आहे पाच वर्षे दरोबस्त हुकेरी मनोली तालुका व निपाणी निा खेडी व फुटगाव वगैरे खेडी याचा यैवज वसूल घेतला असेल तो साहेबाकडील सदरहू पावणेचार लाख रुपये कर्जा-बद्दल येणे आसता त्यातील पैसा वसूल दिल्हा नाही यैसे आसोन उपराटे कर्ज साहेबाकडे येणे म्हणतात तरी येविसीचा फडशा होणे साहेबासही जरूर आहे तरी उभयता मशार-निले हुजूर पाठवून देणे रुजुवातीमुले साहेबाचा पैका त्याजकडे फिरल्यास त्यानी द्यावा त्याचा पैका सरकारात फिरल्यास साहेब देवितील यासी मुदत एक वर्षा आलीकडे उभयेतानी येऊन रुजवात होऊन फडशा व्हावा न जहालीयासी साहेबाचा पैका कर्जाचा आहे तो मशार-निले कडून घेतला जाईल त्यानी आपले कर्ज यावे म्हटल्यास सरकारातून देणार नाहीत.

कलम १

रुजुवातीस कारकून दोन दोमहिन्याआलीकडे पाटऊन देऊ व भगवंत आपाजी व शेषो नारायेण याजकडील येख्त्यार कारकून दो महिन्याआलीकडे पाटवून देऊ साहेबा कडील येख्त्यारी कारकून. येऊन जमीदाराचे विद्यमाने वाजबी रुजुवात व्हावी रुजुवातीमुले भगवंत आपाजी व शेषो नारायेण याचा पैका साहेबाकडे निघा--ल्यास साहेबी द्यावा सहेबाचा पैका उभयेताकडे फिरल्यास ऊभयतां साहेबास देतील त्यास मुदत आम्हाकडील कारकून महाली पैवस्ता होतील त्यापासून बारा महिने रुजवात होऊन फडशा व्हावा व भगवंत आपाजी व शेषो नारायण याजकडील कारकून जावयासी दिवसगत लागली किंवा सुरलीत रुजवात न करीत असे जाहलीयास बारा महिन्यानंतर रुजवात करू नये व उभयेतानी साहेबास पैका मागू नये साहेबाकडून रुजवातीस दिकत पडिली तरी उभयताचे हिसेब पाहून चौघाचेमध्ये वाजवी येवज द्यावयाचा ठरेल तो साहेबी उभयतास द्यावा येणे प्रमाणे ——————————————— करार.

रामचंद्र महादेव व बालाजी केशव याणी हुजूरची आज्ञापत्रे व सावकारी पत्रे मनोलीच्या सनदा व दरम्यानगिरीच्या ज्या आसतील ते सरकारात याव्या.

——————————————— कलम १

साहेबाकडील दस्तयेवजी पत्रे आसतील ती शोध करून माघारी द्यावी. येणे प्रा करार.

तालुके विजयदुर्गाकडील यैवज बालाजी पंडित याणी करार केला आहे त्याप्रमाणे सरकारात यावा. —————————— कलम १

हली चालत असेल त्याप्रमाणे चालेल. येणे प्रमाणे करार.

कृष्णाबाई सिंदे तालुके मनोली यासी व त्रिवर्ग सिलेदार याजकडे गाव आहेत ते शेषो नारायेण याचे आमला प्रमाणे सरकारात यावे. —————— कलम १

पेसजी प्रमाणे गाव कृष्णाबाईकडे व सिलेदाराकडे चालवावे. येणे प्रमाणे करार.

आवंतर लोकाकडील गाव व ठाणी आहेत ती अलाहिदा यादीबरहुकूम सरकारात यावी. —————————— कलम १

आलाहिदा यादीवरी फडशा करून दिल्हा आहे त्याप्रमाणे ध्यावे येणे प्रमाणे करार.

यैवजाचा करार ठरेल त्याप्रमाणे हप्तबंदीचा करार करून हप्तबंदीप्रमाणे तालुकीयांत जो सीका पडत असेल त्याप्रमाणे यैवज घ्यावा —————— कलम १

येणेप्रमाणे करार.

येवजाची यादी अलाहिदा ठरावली आहे त्याप्राो क्षेपनिक्षेप निर्गमात यावे. येणें प्राो करार

लासुनकर व बाबदे परभु व मानाजी गुरव व शिवाजी भोसले सरकारात चाकर आसामी यावे. —————————— कलम १

बाबदे परभुचे पारपत्य केलेच आहे मानाजी गुरव साहेबास सापडल्यास साहेबी धरावा आम्हास सापडल्यास धरून साहेबाकडे पाटवून देऊ भोसले पासून अतंर पडिले ते पडिलच याउपरी आंतर पडिल्यास साहेबाकडे पाटवून देऊ येणे प्रमाणे करार.

सोदे व बिदनूर वगैरे संवस्थाने याजकडील येवजी पेसजीच्या करारा प्रमाणे सरकारात यावा. —————————— कलम १

आजपावेतो चालले असेल त्याप्राो चालेल. येणे प्रमाणे करार.

शेषो नारायेण याजकडील सरकारची पत्रे व प्रधान पंडिताकडील करारमदाराच्या यादी वगैरे जे काय असतील ते सरकारात यावे. —————————— कलम १

साहेबाचे कारभार संबंधाची पत्रे साहेबाकडील व आम्हाकडील शेषो नारायेण याजपासी असतील ती पाहून जिवराव भाो याचे गुजारतीने परत करावी. येणे प्रमाणे करार.

पत्रे तुम्हाकडील लागतील ती आलाहिदा यादी प्रमाणें द्यावी. —————————— कलम १

यादी पाहून अलाहिदा पत्रे देविली जातील. येणे प्रमाणे करार.

हत्ती वस्त्रे जवाहीर सन आर्बा सितैन साली राजश्री शेषो नारायेण याचे गुजारतीने तुम्ही पाटविली असता सरकारात आली नाही त्याची चौकशी करून फडशा करावा. —————————— कलम १

हत्ती व वस्त्रे येथून शेषो नारायेण या समागमे पाटविलीच नाहीत सेवेशीं विदीत व्हावे येणे प्रमाणे करार.

किले मालवण जंजिरा सर्ज्या कोट नजीक तोंडालीस विजयदुर्गकरी मेढा घालितात त्यास कैलासवासी सिवाजी माहाराज याचे कारकीर्दी पासून व आंग्रे याचेवेलेस आजपर्यंत तेथे कोणी मेढा घातला नाही हली विजयदुर्गकरी मेढा घालितात त्यास किल्या नजीक मेढा घातल्याने किल्यास उपद्रव होतो यास्तव मेढा घालावयाचे मना करावे. घातला आसल तो काढावा. कलम १

साल मजकुरी नवाच मेढा घालितात तो घालू नये सुधामत चालत आले आसेल त्याप्रमाणे चालेल याप्रमाणे आम्ही आपले तालुकदारास ताकीद करून नवीन होऊ देणार नाही येणे प्रमाणे करार.

सावकारी तारू दर्यातून बाहेर सावकारीस जात असतात त्याचा कौल मालवणकराकडून कैलासवासी शिवाजी महाराज याचे कारकीर्दी पासोन घेऊन जात असतात त्यास तुमचा आमल जाहाल्या पासून अलिकडे तुम्हाकडील तालुकदार कौल मालवणचा न घेणे म्हणोन सावकारास सांगतात त्याप्रमाणे सावकार यैकोन कौल न घेता जात येत असतात त्याचा माल कौल घेतला नाही यास्तव लुटला जातो त्यास येविसी कौल घेण्यास दिकत तुम्हाकडून आसो नये पेसजी प्रमाणे मालवणचा कौल घेऊन जात येत असावे कौल न घेता गेल्यास लुटले जातील येविसी तुम्हाकडील तालुकदारास ताकीद जाहाली पाहिजे...कलम १

सालबाद कौल घेत असतील त्याप्रमाणे द्यावा नवीन काहींच करू नये याप्रमाणे आम्ही आपले तालुकदारास ताकीद करू येणे प्रमाणे करार.

शंकराच्यार्य स्वामी याचे पुरातन चालत आले त्याप्रमाणे चालवावे नवीन दिकत करून स्वामीची आमर्यादा न व्हावी त्याजकडील कारभारी आगर कारकून येऊन समजावितील ते यैकू नये स्वामीचे विचारास येईल ती गोष्ट करतील येविसी आज्ञा आसावी. येणे प्रमाणे करार.

आलीकडे२२२११जुनी खेडी सरकारची घेतली आहेत त्याचा वसूल ठाणे पडिल्यापासोन आजतागायेत आला असेल तो हली येवजाचा करार जाहला आहे त्यात मजुरा यावे. कलम १

कारभार होऊन गेला तो गेलाच पुन्हा या गोष्टीची उद्घाटण न व्हावे थोडाबहुत यैवज घेतला असेल तो साहेब्री मागू नये. येणे प्रमाणे करार.

राजश्री नारो बाबाजी कमाविसदार प्रांत धारवाड याचे आमलात नवीन मनोली तालुक्या पो येवज तुम्हाकडे पेसजीपासून पावतो त्याचा बटा म्हणून ठराऊन घेतात.

१७१२॥।= जागीरबाबे बाबत बटा रुपये

११३० निमसरंजाम बाबत बटा

२८४२॥।=

येकून आठावीससेहे पावणेत्रेतालीस रुपये चवल येतात त्यास दोन तीन वर्षे नवीन चाल घातली आहे ते मना करून पुरातन पासून तेथील चाली प्रमाणे यैवज घेत जावा आठावीससेहे पावणेत्रेचाळीस रुपये चवल बस्याबाबत घेऊन धारवाडचे बेहड्यास जमा धरिले आहे तो न घेणे मजुरा पडेल म्हणोन व्यंकटराव नारायेण याचे नांवे सनद यावी.

कलम १

बटा घ्यावयाची नवीन चाल आलीकडे घातली आहे ते घालू नये सुधामत प्रमाणे तेथील चालीचा येवज घेत आला त्याप्रमाणे घ्यावा येविसी आम्ही आपले कडील तालुकदारास ताकीद करू. येणे प्रमाणे करार.

हाली करार जाहाला आहे त्यामध्ये आम्ही याउपरी लोभ धरणार नाही साहेबी आम्हाखेरीज इकडील आणुसंधान आथवा राजकारण सर्वात्मना करू नये येविशी परस्परे बेलभंडार व्हावा. येणे प्रमाणे करार. साहेबानी हाली शेवकास खर्चाबद्दल यैवज द्याव-याचा करार केला तो ऐवज सावकारापासून आपाजी शामराव याचे विद्यमाने चिकोडी मनोली दोनी तालुके ऐवजाबा। साहेबी ठेऊन सावकारास येवज लाऊन दिला आहे त्याप्रमाणे व्याज मनोती दरबारी खर्चासुद्धा यैवज फिटे तो पावेतो साहेबी तालुकीहाची घालमेल होऊ देऊ नये येविसी सेवकाचे वचन साहुकारापासी गुंतले येणे प्रा। करार.

साहेबाकडील साधारण पत्रे कोणास गेल्यास चिंता नाही राजकारणी पत्रे ज्यात आम्हास विरोध ती कोणासही पाठऊ नये. येणें प्रा। करार.

सदरहू लिहिल्याप्रमाणे एकेचाळींस कलमे करार. छ २५ सवाल पौष सन सलास सबैन मया व अलफ मुक्काम पुणे. (ता. १९-१-१७७३)

लेखांक ३० तारीख १७-२-१७७३ नंतर

श्री

अ. नं. ६८

राजश्री सकाराम भगवंत यासी आज्ञा आज्ञा केलीं यैसीजे सु॥ सलास सबैन मया व अलफ तीर्थस्वरूप माहाराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याणी तुम्हास बंधु म्हणविले तेच बंधु साहेबाचे या उपरीं बंधुत्वाची उतीर्णता होऊन साहेबाचे मनोदयानरूप कार्य घडोन येश घेणे तुम्हाकडे आहे राज्यभाराचे कामकाजाची भिस्त सर्व चिरंजीव राजश्री येशवंतराव शिंदे सुभेदार याजवरी आहे यामुले तुम्हास कोणी कांहीं विपर्यास समजावितील तरी आज्ञा-पत्रासिवाये कोणताही अर्थ चितात न आणिता साहेबाचे आज्ञेप्रमाणे येश संपादणे चिरंजीव राजश्री येशवंतराव शिंदे सुभेदार याविसी व हरयेक बंदोबस्ताविसी दिगर होणार नाही. तुम्ही मात्र पूर्वील संकेत चितात आणोन दुसरी हरयेक कल्पना न धरिता अविलंबे कार्याचे यश घेणे तुम्ही येशस्वी आहा हुजरोन इतबारी पाठविणे म्हणोन विनंती पत्रे

आली होती त्यावरून पाठविले असता विनाकार्य बहुत दिवस तेथे राहिले यामुले लौकिक मनस्वी होतो यारतव त्वरा करावी सविस्तर आज्ञेप्रमाणे चिरंजीव राजश्री येशवंतराव सिंदे सुभेदार याणी लिहिले आहे व वेदमूर्ति महदेभट आज्ञेप्रो लिहितील त्यावरून कलो येईल.

लेखांक ३१ तारीख २--५--१७७३

श्री

अ. नं. ५६

राजश्री नारायणराव पंडित प्रधान यासी

श्रीमन्माहाराज मातुश्री दुर्गाआईसाहेब उपरी थोरले सिवाजी माहाराज याणी सिलाशाश्वत केले आहे व माहराज व तीर्थस्वरूप माहराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याणी जे शाश्वत केले त्यास चल कदापि होणार नाही विपरितबुध्धी धरून येत्न करणारानी करीत गेले होते परंतु ते न घडिले आसे आसोन ते यासमई कदापि घडणार नाही आणि वडील तीर्थस्वरूप माहराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याचे वेलेस चालत आले प्रमाणें सर्व भिस्त तुम्हावरी असता आतिस्वार्थ धरून विपर्यास वर्तणूक उचित नाही आमर्याद प्रवर्त-ल्यास श्री भवानी शंकरे यामागे कोणाचा मनोदये सिधीस पाठविला आहे ते समजतच आसेल परंतु आनहित कर्म घडावे यैसे ईस्वरेच्छ निर्मून बुधीप्रेरणा केली आसल्यास ईस्वर-सतेकडून घडेल ते प्रमाण चिरंजीव विजईभव राजश्री बाबाजी याणी आज्ञापत्र सादर केले आहे त्यावरून कलेल सारांश इकडून हरकोणी सांगोन आगर लेहून पाठवितील किंवा तेथेही प्रेरणा करून सांगतील त्यातील अर्थ किमपि चितात न आणिता साहेब सेवेचे ठाई आज्ञेप्रमाणे लक्ष धरून निदर्शनास येई ते करावे चिरंजीव राजश्री येशवंतराव सिंदे सुभेदार यासी आज्ञा आहे साहेबाचे आज्ञेप्रमाणे लिहिले आहे त्यावरून साकलअर्थ कलो येईल वेदमूर्ति राजश्री माहादे भट यासी समक्ष निक्षूण आज्ञा जाहाली आहे वेदमूर्ति साहेबाचे आज्ञेप्रमाणे लिहितील व राजश्री जिवाजी भोसले व आकोजी नेवरे व आपाजी शामजी यासी आज्ञापत्रे पा। आहेत व हुजरूने राजश्री गोविंद दासो यासी सनिध आज्ञा करणे ती करून पा। आहे आज्ञेप्रमाणे सांगता कलेल सीघ्रवत साहेबाचे मनोदयानरूप कार्य करून त्रिवर्गास पाठवणे. जाणिजे छ ९ सफर सुा। सलास सबैन मया व अलफ.

सदरहू प्रो पत्रे

१ नारायणराव

१ सखाराम भगवंत सदरहू मजकूरा प्रो आसे.

२

लेखांक ३२ तारीख ३-५-१७७३

श्री

अ. न. ६७

आज्ञा केली येसीजे सुा सलास सबैन मया व अलफ पूर्वील राज्यातील तह व राजमर्यादा व करार व शफता व श्रीमन्माहाराज व शाहू माहाराज याचेवेलेच्या चाली तुम्हास दखलच आहेत त्याप्रमाणे राजश्री प्रधानपंत यासी पुर्ते समजाऊन श्राज्ञेप्रमाणे लक्ष धरून साहेब सेवेसी तत्पर होत ते करणे वो राजश्री माहादेव भट फोंडेकर याणी जे लिहिणे ते लिा आहे व हाली लिहितील त्यावरून कलेल. जाणिजे छ १० सफर याप्रो आज्ञापत्रे

१ कृष्णराव बलाल	१ माहादाजी बलाल
१ बालाजी जनार्दन	१ विष्णू नरहर
१ हरि बलाल	५
५	

सदरहू मजकुराप्रमाणे पाच आज्ञापत्रे लिहिली आसेत.

लेखांक ३३ माहे आगस्ट इ. स. १७७३ नंतर

श्री

अ. नं. ६९

राजश्री आपाजी शामजी यासी आज्ञा केली येसीजे सुा सलास सबैन मया व अलफ साहेबाचे मनोदयानरूप सेवा करून कार्यभाग करितो साहेबी बिस्वासु आज्ञा करून पाठवाव म्हणून त्याची व तुमची विनंती पत्रे व तुम्हाकडून आईसाहेब आसतेसमई वरचेवर विनंतीपत्रेही सत्वर कार्य करितो म्हणोन पाठवीत व वो। राजश्री माहादे भट यासी हुजूर पाठविले महिना पंधरा रोजात आज्ञेप्रो कार्य होईल म्हणोन वेदमूर्ती (चे) विनंती केलेवरून राजश्री जिवाजी भोसले यासी आज्ञा करून पाठविले असता लांबणीवरी पडिले हे काय समजोन ? थोरले सिवाजी माहराज याणी सिलाशास्वत केले आहे व माहराज व तीर्थरूप माहराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याणी जे शाश्वत केले त्यास चल कदापि होणार नाही विपरित बुधी धरून येत्न करणारानी करीत गेले होते परंतु ते न घडिले आसे आसोन ते यांसमई कदापि घडणार नाही वडील माहराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याचेवेलेस चालत आलेप्रो सर्व भिस्त पूर्ववत रीतीने त्याजवरी असता आती स्वार्थ धरून विपर्यास वर्तणूक उचित नाही आमर्यादे प्रवर्तलेस भवानी शंकरे यामागे कोणाचा मनोदये सिधीस पावविला आहे ते समजतच आसेल परंतु आनहित कर्म घडावे येसे ईस्वरे निर्मून बुधीप्रेरणा केली आसल्यास ईस्वरसतेकरून घडेल तेप्रमाणे साहेबाचे आज्ञेनरूप कार्य घडते अभयपत्र सादर व्हावे सर्व गोष्टी आज्ञेप्रो घडोन येतात म्हणोन तुम्ही विनंती पत्रे पाा ते समई कैलासवासी मातुश्री आईसाहेबी

अभयपत्र व आज्ञापत्रे सादर करून पाठविली असता दिनमेकावरी पडिले मातुश्री आईसाहेब याचा काल जाहला तन्मुले लांबणीवर पडिले म्हणोन म्हणाल तरी मध्यें च्यारपाच महिनेचा आवकाशहि पडिला आसे आसून कार्य न घडिले आलीकडे माहाराजाही तुम्ही विनंती लिहिले प्रमाणे आज्ञापत्रे सादर केली परंतु कार्य न घडे तेव्हा तुम्ही चिती काय आणिले ? साहेबाचे राज्यातील वतनदार आज्ञेप्रो सेवा करून कृपा संपादन घेतल्यास उतम दिनमेकावरी पडिल्यास तुम्ही दूरदेसी पाहून वर्तणूक कराल वतनदार आहा आज्ञेप्रो निभावणी करून देणे लागेल वे।। माहादेव भट हुजूर आले आज्ञा करणे ते करून विनंती केले प्रमाणे अभयपत्र पुनरुक्त सादर करून पाठविले तरी कार्य आज्ञेप्रो न करिता वेदमूर्तीस हुजूर पाठविले तेव्हा निक्षूण माहाराजाही समक्ष आज्ञा करणे ते वेदमूर्तीस केली त्याप्रो तुम्हास त्याणी लिहिलेच आसेल हाली चिरंजीव राजश्री येशवंतराव सिंदे सुभेदार यासी आज्ञा जाहली आहे सविस्तर आज्ञे प्रा लिहितील व वेदमूर्तीस हुजूर आज्ञा करणे ते केली आहे त्याप्रो लिहितील व गोविंद नाईक यासी आज्ञा करून पाठविले आहे आज्ञेप्रो सांगतील त्या प्रो कार्य करून सत्वर सीध्रवत हुजूर येणे.

लेखांक ३४ तारीख ४–१०–१७७३

श्री

अ. नं. ५७

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना येथील वर्तमान ता छ १६ रजेब पर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित आसे विशेष चिकोडी व मनोली तालुके व रायेबाग व कागल पैकी फूटखेडी पेशजी भगवंत आपाजी व राजश्री शेषो नारायेण याचे कारकीर्दीत चालले आहे त्या प्रमाणे सालगुदस्त सन सलास सबैनापासून स्वामीकडे चालेल याउपरी सांगणाराचे सांगितल्यावरी अथवा कोणेविसी दिकत पडून विपर्यास होणार नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पो छ १४ माहे रमजान सन आर्बा
सबेन मया व अलफ (ता. २९–११–१७७३)

लेखांक ३५ तारीख १२–१०–१७७३

श्री

अ. नं. ६३

श्रीमंत माहाराज राजश्री छत्र
पति स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ बाजीराव विज्ञापना सेवकाचे वर्तमान ता। छ २४ रजब पावेतो माहाराजाचे कृपे करून येथास्थित असे विशेष चिकोडी व मनोली तालुक्याचा फडशा करून कागदपत्र देऊन राजश्री जिवाजी भोसले व आपाजी शामराव व आकोजी नेवरे व वे।। राजश्री माहादेव शास्त्री यास निरोप देऊन सेवेसी पाठविले आहेत यासमागमे घस्त्रे व जवाहीर पाठविले आहे त्याची याद आलाहिदा आहे त्याप्रो पावल्याचे उतर पाठवावयाची आज्ञा केली पाहिजे वरकड सविस्तर विनंती करावयास माारनिलेस सांगितले आहे विनंती करितील सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

पो छ १४ माहे रमजान

सन आर्बा सबैन मया व अलफ (ता. २९-११-१७७३)

लेखांक ३६ तारीख ५-११-१७७३

हुजूर

रु. नं. १

अ. नं. ४२

नबाब हैदरअली खां बाहदर शादकाम
व मकजीयुल्मराम बाशंद

आमारत व अयाल्त मर्तबत शौकत व हशमत मंजीलत खान आजी मुशान बाज ईषियाक फिरावांमशहूद आंके येथील खैर आफीयत जानोन आ आमारत पनाहाकडील खैरीयत कलमी करून शादमानी रुयदाद होयेते केले पाहिजे दरिविला आ आमारत पनाहाकड्न अजम परशराम बलाल व आनंदराव वेंकटेश व राघो विठल व बालाजी विठल या हमराह खत खुषनमत बमय येक जजिर फिलवजवाहीर व खीलअत पारचे बरहुकूम याददास्तप ईरसाल केले ते ईतिजार समई पोहचून कलमी केला मतालीब मुफसील जाहीरीस पोहचला व जबानी रुबरन मारनिले यानी राजकारणाचा मजमून सुफशिल पोशिंदा अर्ज केल्यावरून बिसयार खुषवक्ती हांसील जाहाली इनशा अलाहुता आला दसरा होताच आ अमारत पनाहा बमयेभारी फौजेनिसी त्या जिल्हेस येत असो हरबदील खनाह मतालीब हांसील होतील म्हणोन बयानवार कल्मी केले ते माल्रुम जाहाले पेशआंजी आ अमारत पनाहाचे येणे बमय तोफखाना भारी फौजेनिशी तुंगभद्रापार होताच मजलदरमजल कूच करून दुरपेश आलो असतां म्हणजे दिल्व्वाह मतालिब कार सुरत पिजीर होऊन तमाँम उमदा काजकामे हाशील जाहाली आसती बरसातचे बारशीचा जोरामुले माघारी कूच करून गेलो फिलहाल मसलहतीचे रोज आनकरीब येऊन पोहचले दरीनीजदिकी आअमारत पनाहानी दसरियाचे मुहूर्तें कूच करून दरमजल तुंगभद्रापार होऊन जलदीने या जिल्हेस येऊन पोहचावे हेच इंतिजारी आजहाद आफजूल जाणोन आमदन काफीस्त अजम रघुनाथराव पंडित याची स्थापणा स्वस्थलास करावी हा इरादा हरदुतर्फेने बस्तर आहे बई

सबब आं अमारत पनाहाचे येणे या तर्फेस भारी फौज व तोफखाना सुधा जाहालियाने माहाराजाचा व आअमारत पनाहाचा इतिफाक होताच बारभाईस तंबीह पोहचून पंडित मशारनिल्हे याची स्थापणा केली जाईल व बस्तर मसलहतीची काजकामे घडोन येथील येबाबेचा कितेक मुफसिले हुकूम फर्मावणे तो कयकूल्मराहमत येशवंतराव शिंदे सरसुभेदार यांस फर्माविला आहे मताबिक हुकूम कलमी करतील त्यावरून मालूम होईल त्या मवाफिक कारसुरतपिजीर होऊन आ अमारत पनाहाचे येणे या जिल्हेस जलदीने होय ते करावे रवाना छ १९ माहे शाबान सन आर्बा सबैन मया व आलफ सुा करवीर

लेखांक ३७ पौ तारीख २९-११-१७७३

श्री

अ. नं. ५८

यादी करवीरवासीस या राज्याचा उपर आहे तो येणे प्रो विसाजीपंतास शेषोपंतास पाठऊन मतलब यादी शफतपूर्वक करार करून आणाव्या

(उजवी बाजू)

हे राजे खोटे सर्वांचे प्रत्ययास येईसे जाले यैशीयासी मारू नये फतसिंग बावा आथवा यसाजी कुसाजी प्रा ठेवावे नीट राहात तर आटकेत ठेवणे प्राप्त होईल तेव्हा ठेवणे परंतु जीवास नाश अन्नवस्त्रास अंतर नसावे. १

मसलतीमुळे वगैरे कर्ज सेवकास आहे कर्जवारे तो सेवकास पैका देणे पूर्वी पासून पडतो तो न मागावा कर्जाचे सर्व प्रकारे सेवक विनंती करील त्याप्रकारे साहित्य करावे.

३

(डावी बाजू)

येणे प्रो स्थलाची सुभेदारी यख्त्यारी द्यावी

१ सातारा १ चंदन १ वंदन १ रांगणा १ मालवण जंजिरा.

—

५

पाच स्थलाची + + + सेवकाकडे द्यावी.

२

सेवकाकडील मातबर जो हुजूर राहील त्याजवरी कृपा करून लहानमोठे काम त्याचे विचारे करावे सर्व येख्तियार सेवकाकडे असावा खास चौकीचे दारोगी सेवकाकडे सांगावी.

(रकाणे मजकूर संपला) ४

सेवक कार्यप्रसंगे दूर गेला तरी तिलमात्र कृपेस अंतर नसावे तिलमात्र विरुध दृष्टी नसावी यतद्विषई उभयेतानी क्रियाप्रमाण द्यावे आईसाहेबाची भेट जाहालियास जो करारमदार होईल तो निभावावा अंतर करू नये येणे प्रो शफत दोन पत्रे करार लेहून आणावी

(उजवी बाजू)

क्रिता वाई देसी कराडदेसी दाहा गाव मातबर आर्ज करून ते इनाम नवे करू द्यावे.
(डावी बाजू)
शाहू महाराजाचे वेलेचे व आईसाहेबाचे कर्ज वारावे धर्म मोठा आहे तरी सेवकाचे वचन गुंतले आहे यास्तव.
पैवस्ता छ १४ माहे रमजान
सन आर्बा सबैन मया व अलफ.

लेखांक ३८ इ. स. १७७३

श्री

अ. नं. ६६

राजश्री शेषो नारायण यासी आज्ञा केली यैसीजे सुा सलास सबैन मया व अलफ तुम्ही हुजूरचे सेवक असता हरयेक गोष्टी सरकार उपयोगी असतील त्याच घडाव्या त्यास कार्य उपयोगी यादी आज्ञेसिवाये दुसऱ्याचे स्वाधीन केल्या प्रस्तुतही मागील गैरउपयोगी गोष्ट बोल्ता व परभारेही बोलविता यैसे हुजूर परस्परे निवेदनात येते येणेकडून सेवाधर्मास उचित अनुचित हे पुर्ते ध्यानात आणावे उतरोतर बेमर्जीची मर्जी येथास्थित होईल न होईल हे चितात आणोन जे करणे ते करावे. पेसजी सर्व जाबसाल तुम्हाकडेसच होता तो हाली या रंगास का आला हे समजतच आसेल येवंच समयोचित येखादे समई हुजूरचे आनुपयोगी कार्य घडल्यास बेमर्जी होते परंतु जेथील तेथोनच कृपा संपादून घेण्याच्या रीती ज्या आहेत त्या तुम्हास दखल नसतीलशा नाहीत आज्ञेसिवाये सेवकानी कोणताही प्रर्वत करू नये जे करणे ते साहेब आज्ञेने करावे परोपयोगी बोलणे उतमात नसे.

लेखांक ३९ इ. स. १७७३

श्री

अ. नं. ७०

रा। जिवाजी भोसले यासी आज्ञा केली यैसीजे सु॥ सलास सबैन मया व अलफ साहेबाचे मनोद्यानरूप कार्य घडोन येते म्हणोन तुमची वरचेवर विनंतीपत्रे कैलासवासी आईसाहेब याचे सेवेसी आसतेसमई येत होती महिना पंधरा रोजात कार्य होणे त्यास लंबणीवर पडावयासी कारण काय हे उमजणेत येत नाही थोरले सिवाजी माहाराज याणी सिला शाश्वत केले आहे व माहराज व तीर्थरूप माहराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याणी जे शाश्वत केले त्यास चल कदापि होणार नाही विपरित बुधी धरून येत्न करणारानी करीत गेले होते परंतु ते न घडिले आसे असोन यासमई कदापि घडणार नाही वडील माहाराज मातुश्री आईसाहेब कैलासवासी याचेवेलेस चालत आले प्रा। सर्व भिस्त पूर्व-

रीतीने त्याजवरी आसता आतिस्वार्थ धरून विपर्यास वर्तणूक उचित नाही आमर्यादे प्रवर्तलेस भवानीशंकरे यामागे कोणाच्या मनोदये सिधीस पावविला आहे ते समजतच आसेल परंतु अनहित कर्म घडावे असे ईस्वरे निर्मून बुधी प्रेरणा केली आसल्यास ईस्वर-सते करून घडेल ते प्रमाण आज्ञेप्रो सर्व गोष्टी घडोन येतात म्हणोन विनंती लि॥ प्रा कैलासवासी आईसाहेबी अभयपत्र पा आलीकडे माहादेवभट हुजूर येऊन पुनरुक्त विनंती केले प्रो साहेबी अभयपत्र सादर करून वेदमूर्तीस पा तरी कार्य न घडता हुजूर आले तेव्हा निक्षूण आज्ञा वेदमूर्तीस जाहली त्याप्रो लिाच आसेल हाली चिरंजीव राजश्री सुभेदार याणी आज्ञाप्रा लि॥ आहे वेदमूर्तीस समक्ष आज्ञा केली आहे आज्ञाप्रा लिहितील व गोविंद नाईक यासी आज्ञा करून पा॥ आहे आज्ञप्रा॥ सांगतील त्यास सत्वर आज्ञेप्रो कार्य करून सीघ्रगत हुजूर येणे.

लेखांक ४० — इ. स. १७७४

श्री

रु. नं. १
अ. नं. १८४

करारनामा येणे प्रमाणे कलमे करार करून

दिली असेत —————————————— बी तपसील

किले सातारे सुधा तोतया सरकारात स्वाधीन करून स्वामीच्याच शिका एक प्रथवीवरी चालू — कलम १

मुलुकगिरीतून प्रतीवर्षी आलियावरी हुजूर दर्शनास येऊ ते समयी खंडनीचा ऐवज जो असेल तो वाजीबी देत जाऊ शिवाय नजर नक्त व जडजवाहीर व कापड व हत्ती घोडे व हरएक अपूर्व जिन्नस सरकारात नजर करू. — कलम १

गोदानदीआलीकडे आहद तुंगभद्रा नदीपर्यंत दक्षणेस व पश्चमेस समुद्रपासोन पूर्वेस विजा-पूरपर्यंत तहद स्वराज्य करून देऊ — कलम १

सदर्हू खेरीज पंचवीस हजार स्वाराच्या खर्चाबद्दल स्वदेशात कबजी मुलूक साहेबाचे स्वराज्या-दाखल करून देऊ —————————— कलम १

कैलासवासी शाहू महाराज याचे कारकीर्दीस सरकारकून व सरदार वगैरे ल्हाणथोर शेवक याजकडे सरंजाम गड कोट किल्ले व ठाणी होती त्यापैकी दुसरे कोणाकडे गुंतला असिला अगर खुद्द आम्हाकडे खासगीस जरी असिला तरी तो सरंजाम ठाणी व गडीकोट सरकारात देऊ. —————————— कलम १

सरकारकून अगर सरदार वगैरा लाहाणथोर शेवक यात जो स्वामीच्या पायासी अमर्यादा वर्तणूक करील त्यास अज्ञेप्रमाणे नसीहत पोहोचऊन त्यास सामील अंतर्यामी अगर ब्राह्यात्कारे होणार नाही आणि त्याचा अर्जही करणार नाही —————— कलम १

आमचे मुतालीक व फडणीस सरकारात स्वामीजवळ नेहमी हुजूर सेवेसी ठेवणे अगर दुसरे सरकारकून यानी ठेवणे येकूण अष्टप्रधान याचे मुतालीक फडणीस ठेवणे ते ज्यास साहेब मुतालिकी व फडणिसी आज्ञा करून सांगतील त्यास आम्ही करार करून ठेवावे त्यास करार दूर करणे ते स्वामीचे आज्ञेरूप करावे —————————— कलम १

जिकडे मुलुकगिरीस जाऊ तिकडे सरकारची पंचवीस हजार फौज व जरीपटका व नगारा घेऊन जाऊ त्याबराबरी सरकारातून सरदार येतील ते व आम्ही एकविचारे चालून त्याचे बहुमानाप्रो बहुमान चालवीत जाऊ. —————— —————— कलम १

ज्या प्रांतास मुलुकगिरीस जाऊ तेथील खंडणीचा ऐवज व गडीकोट किले व सरंजाम येईल त्यापैकी सरकारची चौथाई व सरकारची पंचवीस हजार फौज येईल त्यामुले चवथाई ऐसी दोन्ही हिसे सरकारात देऊ —————— —————— कलम १

जे समयी ज्यावरी साहेब आज्ञा करितील त्याचा पक्षपात अंतरयामी अगर बाह्यातकारे न करिता त्याजवरी मोहीम करून नसीहत पोहचऊ —————— —————— कलम १

झाडेनिसी गडीकोट यासी सरकारचे हवालदार व सरनोबत व सबनीसीस व कारकानीसीस व फडणीस शककर्ते थोरले शिवाजी महाराजा पासून चालत आले आहेत त्याप्रमाणे पुढे ठेवावे त्यात आम्हाकडील देखील सरंजामात याप्रमाणे ठेवावे व ज्याकडे जुन्यापैकी व कोणास नवा सरंजाम साहेब कोणास करार करून देतील तेथेही याप्रमाणे साहेबी ठेवावे.
—————————————————— कलम १

अष्टप्रधान याजपासी मुजूमदार व चिटणीस सरकारातून स्वामी नेमून देतील ते असावे.
—————————————————— कलम १

दर्शनास येऊ ते समयी सरकारकून व सरदार व अठरा कारखानेचे मामलेदार वगैरा लहाण-थोर स्वामीचे शेवक याचा बहुमान शेवकाने ज्याचा त्याप्रमाणे कारावा.
—————————————— —————— कलम १

सरकारकून व सरदार वगैरा लहाणथोर स्वामीचे शेवक आहेत त्याजकडे गडीकोट किल्ले ठाणी व सरंजाम आहे त्याचा करार दूर करणे तो सरकारातून करावे त्याची रदबादली आम्ही करणार नाही. —————————— कलम १

चंदावरचे संस्थान अरकाटवाले याने जप्त केले आहे ते संस्थान त्याने सोडोन दिल्हेने असिले तरी उत्तम कदाचित राहिले असले तरी चंदावरीचे संस्थान घेऊन सरकारात देऊ. —————————————— कलम १

—————— कलमे —————————— सुमार ——————

१५

येकूण कलमे पंधरा करारनाम्याची आपले स्वसंतोषे साहेबाचे शेवेसी लिहून दिल्ही आहेत त्याप्रमाणे साहेबाचे शेवेसी एकनिष्टपणे चालून राजश्री यशवंतराव शिंदे सरसुभे-

दार यासी स्नेहभावे एकविचारे साहेबाचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करू त्याजविषयी हरकोही हरएकप्रकारे सांगतील ते ध्यानावरी न घेता निःक्रित्रिमे ऐक्यता उभयपक्षी स्नेहभावे चालू यासी अंतर करू तरी आपले कुलस्वामीची व आपले स्वधर्माची शपथ असे.

सदरहू प्रमाणे करारनामा बाजीराव बरवे याजकडे पाठविला त्याची नक्कल असे.

लेखांक ४१ — तारीख २६–१–१७७४

श्री

रु. नं. १ — तालीक

अ. नं. १७६

म/५२० श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति साहेबांचे

शेवेशी

विनंती शेवक रघुनाथ बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापणा ता. छ १३ जिलकादपावेतो साहेबाचे कृपे करून वर्तमान यथास्तित असे विशेष साहेबी राघो आपाजी कारकून व खलोजी शिंदे व धोंडजी यादव याजबरोबरी पत्रे पाटविले ते पाहून पत्री कितेक मनसबायाचा मजकूर लिहिला तो कलला अशास फितूर याचे पारपत्ये व्हावे हे स्वामीचे मानस आणि फौजेची जथ धरीत आहेत नवाब हैदरअलीखान बहादरही लौकरच येऊन सामील होणार याजवरून संतोष जाहाला वरकड कितेक मार माणको नारायण यासमागमे राजश्री येसाजी शिंदे यास लिहिले आहेत त्याजवरून कलेल सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना

लेखांक ४२ — तारीख १४–२–१७७४

श्री

अ. नं. ७१

चिटी सु॥ आर्बा सबैन मया व अलफ राजश्री रघुनाथ पंडित प्रधान वडगावचे मुकामास आले वर्षी करवीरचे मुकामी हुजूर दर्शनास आले ते समई हुजूर खुणेस पाचेची आंगठी दिल्ही ती देवघराकड गु॥ गंगाजी जाधव याजकडे इतलबी छ २ माहे जिल्हेज वि॥ लोहाडीचे निकम याजकडे ठेवावयाबदल दिल्ही आसे.

लेखांक ४३ — तारीख २०–३–१७७४

श्री

अ. नं. ५५

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०० जयनाम संवत्सरे चैत्रशुध आष्टमी रविवासरे क्षत्रिय-

कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राज-मान्य राजश्री रघुनाथराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे बहुत दिवस तुम्हाकडून विनंतीपत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाही निरंतर विनंतीपत्री लेहून पाठवित असावे तुमचा मुकाम कृष्णातीरी जाहाला म्हणोन हुजूर स्वामीचे सेवेसी निवेदन जाहाले यैशी-यासी कृष्णे येलीकडे हुजूरचे प्रांतात कही येऊन उपसर्ग जाहला लस्करात ताकीद होऊन प्रांतात उपद्रव न होई ते करावे हुजरूने कितेकार्थे आज्ञा करणे ते वकीली जाबसालास राजश्री नागो शामजी यासी आज्ञा करून आपणाकडे पाठविले असता कोणी गैरवाका तुम्हास समजाविला याजमुले मशारनिलेस तसदी तुम्हाकडून जाहाली म्हणोन स्वामीचे सेवेसी हुजूर निवेदन जाहाले वकीलास तसदी आजीपर्यंत कोठेहि घडिले नाही तुमचे वडिलाची वर्तणूक कोणेप्रकारची होती ? हाली तुम्ही करारमदाराच्या यादी शफत-पूर्वक करून वेदमूर्ती राजश्री माहादेव शास्त्री फोंडेकर याजबरोबर पाठविल्या आसता आम-र्यादा वर्तणूक स्वामीचे चरणासी होऊ नये वरकड मजकूर राजश्री यशवंतराव सिंदे सरसुभे-दार यासी आज्ञा केली अहे अशिप्रो राजश्री चिंतो विठल व आबाजी माहादेव यासी लिहितील उभयता मशारनिले तुम्हास सांगतील त्याजवरून कळो येईल. जाणिजे बहुत लिहिणे तरी सुज्ञ आसा.

मर्या
देयं विरा
जते

लेखांक ४४ तारीख २-२-१७७६

श्री

अ. नं. ७४

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री व्यंकटराव नारायेण स्वामी गोसावी यासी पो माधवराव नारायेण प्रधान नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावे विशेष राजश्री येसाजी सिंदे याणी सर-कारचा करारमदार मोडोन चिकोडी तालुकियात वगैरे मनस्वी वर्तणूक करितात त्याचे पार-पत्यास हुजूरून राजश्री रामचंद्र गणेश यास फौज सुध्धा रवाना केले आहे तरी तुम्ही आपलेकडील जमावसुधा जाऊन मशारनिल्हेस सामील होणे राा छ ११ माहे जिल्हेज सु॥ सीत सबैन मया व अलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ४५ तारीख २०-६-१७७६

हुजूर

रु. नं. १

अ. नं. ४३

अर्जंम जरबनाना मो कोल्हापूर दामसाहेबत

हुजूर

मोहिबान पनाहा मुखलीखान दस्तगाहा अजी भेस्तर रुब सद्रीन शाबा सरकार कौंपनी इंग्रज सलाम हाजरा सलाम येथील नेकी जाणऊन करणेकी कलमे केली पाहिजे दिगर सिदोपंत आलेचे कार्य करुन जागुस गेले आहेत ते निवेदन करतील त्यावरुन मालुम होईल मोहीद तेथ कारभारी बाहा इजानेबाकडून कांही काजकाम असलेस मना आणावे आमचे तर्फेने कांही मोहिबास आगत्य नाही येसे नाही परत ज्यादे करितो येथ सारिख काजकाम असलेस कलमे करावी वकील त्यास आंतर होणार नाही. ज्याईदा काई लिहिणे प्यार असोविला पाहिजे ता. २० बजून बहु मुधवे वरुशी.

लेखांक ४६ तारीख २९-११-१७७६

अ. नं. ४४

श्री शंभु प्रसन्न

श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गाबाईसाहेब याणी राजश्री अच्युतपंत यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ सन सबा सबैन तुम्हाकडून हैबती खराडा व कासी कारला हे दोघे हुजूर येऊन साद्यत मजकूर निवेदन केला.

छ १७ संवाल

लेखांक ४७ तारीख १९-१२-१७७६

श्री

रु. नं. १

अ. नं. ४४

रोखा घाट राहाणा सु॥ सबा सबैन मया आलफ वेदशास्त्रसंपन्न राजेश्री रामचंद्र भट नाखरे अग्नहोत्री देसष्ट ब्राम्हण याचे योगक्षेम चालाव लागतो यास्तव पोकल्या बा विस्वा-रुके ·१॥ दीड रुका दिला असे साल दरसाल नूतन सनदेच उजूर न धरितां आकाराप्रमाणे ऐवज होईल तो कमाविसदार चौथाई न घेता सारा ऐवज भटजीस पावत करीत जाणे जाणिजे रवाना छ ७ जिल्काद मोर्तब शुद्ध नोंदणी बुक नंबर २८६४ सन १८४८

दाजीकृष्ण पंडित मुख्य कारभारी सरकार करवीर.

लेखांक ४८

तारीख ५-१-१७७७

रु. नं. १

अ. नं. ११२

श्रीमंत माहाराज मातुश्री दुर्गाबाई आईसाहेब साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथ बाजीराव प्रधान कृतानेक विज्ञापना ता। छ २४ जिल्काद-पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष आपण दोन पत्रे पाठविलीं ती पावली पुरंदरकरी याजकडून राजश्री माहादजी शिंदे आले आहेत त्यासी सलुक करून घ्यावा सबब नबाब हैदरअलीखान बाहादूर याणी लिहिले आहे त्यास + + (ये) साजी सिंदे व परशराम बलाल यास लिहिला आहे त्याजवरून निवेदन होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पो छ १३ जिल्हेज सन सबा

(ता. २३--१--१७७७)

लेखांक ४९

पौ तारीख ६-३-१७७७

रु. नं. १

अ. नं. ४५

माहाराजे बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति हामवारे

खुषवक्त व कामयाब बाशंद

उब्राहत व शोकत पनाह यकबाल व इजलाल दस्तगाह कुदवय राजहाय समूआल मकान बाआदज ईजहार इखियाक फिरावा मषउद आंकी येथील खुषी जाणोन आपली षादमानी हमेशा कल्मी करीत यावे दरिविला खत मसारतनमत पाठविले ते पोहचून मजमून माल्म जाहाला अजम बहिरजी नायक गायकवाड व बालाजी विठल यास पाठविले आहे फौजेचा खर्चाबदल येवज पाटवावा आम्हीहि कूच करून त्या जिल्हेस यावे येसे कल्मी केले होते तरी पेशजी येथून भारी फौज बंकापूर त्या जिल्हेला रवाना करून पाटविले असता बाराभाई याकडील पांडुरंग षकी वगैरे फौजसुधा सांवसीवरी येऊन नमुद जाहाले याकरिता लढाई होऊन बाराभाई याची फौज गारत होऊन पांडुरंग षकी वगैरेना सरदार पाडाव आले मार आपणासही माल्म जाहाला असेल हलीहीं येथून भारी फौज रवाना करून पाटविले असे आम्हही निघावयाची तयारी करविलीं होतीं मोहरमचा आषुरा नजदीक पोहचला या करिता तहकूब जाहाली इनशाह अला हता अला बाआदज आषुरा कूच करून अनकरीब त्या जिल्हेस येत आसो आपणाकडून आले बहिरजी गाईकवाड व बालजी विठल बंकापुरास बाजीराव बरवेकडे येऊन पोहचले येथून ऐवज आपणाकडे पाटवावा तरी ऐवज घेऊन जावयाबदल येथून इतबारी मजाम राहाबाठ जाणणार दो तीनशे स्वारास बंकापुरास पाटऊन द्यावे म्हणजे त्याच सवारा बराबरी ऐवज देऊन आपणाकडे

पाटवित असो आपण तेथे भारी फौजेचा जमाव करून तिकडे बाराभाई याचे फौजेस खूब तंबीह करीत जावे आणि तिकडील मुलुकही मारून खंडण्याही करीत जावे. इतकीयात आम्हीही भारी फौज व भारी तोफखाना सुद्धा अनकरीब येत आसो हमेषा आपली षादमानी कलमी करीत यावे जियादा लिहिणे काय असे हे किताबती.
पौ छ २५ माहे मोहरम सु॥ सबा
सबैन मया व आलफ मु॥ पनाला

लेखांक ५० पौ तारीख ६–३–१७७७

नकल

राव अजम यशवंतराव शिंदे सरसुभेदार
दाम मोहबत हू

मोहबत व मुवदत पनाह खुलत व मवालात दस्तगाह बाआदज इस्तियाक फिरावा मशऊद आंकी येथील खुषी जाणोन आपली शादमानी हमेशा कलमी करीत आल्या पाहिजे दरिविला खत पाटविले ते पोहचून मजमून मालूम जाहाला अजम बहिरजी नाईक गाइकवाड व बालाजी विठल यास पाटविले आहे फौजेचे खर्चाबदल ऐवज पाटवावा आम्हीही कूच करून त्या जिल्हेस यावे एसे कलमी केला होता तरी पेशजी येथून भारी फौज बंकापूर त्या जिल्हेस रवाना करून पाटविले असता बाराभाई याकडून पांडुरंग षकी वगैरे फौजसुधा सांवसीवरी येऊन नमूद जाहाले याकरिता लढाई होऊन बाराभाई याचे फौज तमाम गारत होऊन पांडुरंग षकी वगैरे सरदार पाडाव जालेचा मजकूर आपणासही मालूम जाहाला असेल हलीही येथून भारी फौज रवाना करून पाटविले असे आम्हीही निघावयाची तयारी करविली होती मोहरमचा आषुरा नजदीक पोहचला याकरिता तहकुब जाहाला ईनशाह आलाहता आला बाअदज आषुरा कूच करून अनकरीब त्या जिल्हेस येत असो आपणाकडून आले बहिरजी गायकवाड व बालाजी विठल बंकापुरास बाजीराव बरवेकडे येऊन पोहचले येथून येवज पाटवावे तरी येवज घेऊन जावयास येथून इतबारी मजाम राहबाट जाणणार दोनीसे सेवारास (स्वारास) बंकापुरास पाटऊन द्यावे म्हणजे त्याचा सवारा बराबरी येवज देऊन आपणाकडे पाटवीत असो आपण तेथे भारी फौजेचा जमाव करून तिकडे बाराभाई याचे फौजेस खूब तंबी करीत जावे आणि तिकडील मुलूकही मारून खंडण्याही करीत असावे इतकीयांत आम्हीही भारी फौजसुधा अनकरीब यत असो हमेषा आपली शादमानी कलमी करीत यावे ज्यादा लिहिणे काये असे.
पौ छ २५ माहे मोहरम सु॥ सबा
सबैन मया व आलफ मु॥ करवीर.

लेखांक ५१ तारीख १८-३-१७७७.

नकल

रु. नं. १
अ. नं. ४७

राव अजम यशवंतराव शिंदे सरसुभेदार
दाम मोहबत हूं

मोहबत व मुवदत पनाह खुलत व मवालात दस्तगाह बाअदज इष्तियात मुलाकात मषहूद आंके येथील खुषी जाणोन आपली षादमानी हमेषा कल्मी करीत यावे दरिविला खत पाटविले ते पोहचून व आनंदराव वकीलाचे अर्जीवरून मुफसील मजमून मालूम जाहाला तेथे भारी फौज जमा जाहाली आहे खर्चासही येवज पाटऊन द्यावा आम्हीही कूच करून यावे म्हणून मुफसील कल्मी केले होते तरी तेथील फौजेच्या खर्चाबदल बंकापुराहून यक लाख रुपयेचा ऐवज तेथून आले सवाराबराबरी देऊन पाटविला असे.तो हाल पोहचला असेल आम्हीही भारी फौज व भारी तोफखानासुधा पटणाहून कूच करून वीस कोसावरी येऊन पोहचलो कूच दरकूच अनकरीब त्या जिल्हेस येऊन पोहचत असो हुबलीत सरकारची फौज ठेविली होती ते फौजावाल्हेने परशराम षकी उगरगोलापासी उतरले असता त्यावरी चालून जाऊन षबहून केले सरकारचे फौजेतून आराबेचा मार जाहाला या करिता ठरून सकता परशराम षकीचे फौज दाणादान होऊन फरारी जाहाली सरकारचे फौजेचे लोकांनी षकी मजकूर उतरले स्थल लुटून तीन चारशे घोडे व वीस तीस उंट व बहीरचे बैल वगैरे दोन तीन हजार मवेषीसही लुटून घेऊन परतोन हुबलीस येऊन पोहचले हुबलीस सरकारची फौज जुजबी आहे त्याचे मुकाबिलेस देखील परशराम षकी ठरत नाही तिकडे फरारी होऊन आला आहे अशास तेथे भारी फौज जमा केल्या बादज सिबंदी चढत जाते फौजेचे लोकांस खाली बसविल्याने काम नाही फाजेचे लोकास खर्चवेचास देऊन रजाबदी करून तिकडे रामचंद्र गणेशाची तंबी तुम्हा कडून होत असलीया त्यावरी चालून जाऊन तंबी पोहचऊन त्याचा पाय तेथून उखडे यैसे करवणे अगर रामचंद्र गणेशाची फीकीर तूर्त होत नसलीया हिकडून परशराम षकी फरारी होऊन मुनवली वगैरेकडे आला आहे त्याचे हमराही फौजही दहषत खाऊन दाणादान जाहाले आहे वख्त काबूचा आहे परशराम षकीची तरी तंबी होत ऐसे करावे इतकीयात अनकरीब खास सवारीही येऊन पोहचत आहे बाअदज मुनासीब तजबीज करणेची केली जाईल तबल्ग जमा जाहाले फौजेस खाली न बसविता तिकडे रामचंद्र गणेशाची तंबी तरी अगर इकडे परशराम षकीचे फिकीर तरी करीतसे केले पाहिजे हमेषा आपली षादमानी कल्मी करावे ज्यादा लिहिणे काय असे.

रा छ ८ सफर,
पौा छ १० रबिलावल सुा सबा सबैन
मया व आलफ सुा पेट किले
पन्हाळा. (ता. १९-४-१७७७)

लेखांक ५२ पो तारीख १-४-१७७७

रु. नं. १ नकल

अ. नं. ४६

महाराजगो राणी दुर्गा आऊसाहेब दाम षजा

कतहू.

असमत पनाह ईफत दस्तगाहा मुष्फीक मेहरबान करम फर्माय जीशान बुलंद मकान बाअ-दज ईजहार मरातीब नियाज मषहूद आंकी येथील खुशी जाणोन आपली शादमानी कल्मी करवाऊन दिल आराम करवीत असावे दिगर तेथे भारी फौजेचा जथ करविल्याचा मजकूर व येवजा करिता स्वार पाटविले आहेत येवज रवाना करून पाटवावा म्हणून अजम येशवंत-राव शिंदे सरसुभेदार यानी लिहिले होते आणि राव अजम बाजीराव बरवे यानी पेहला कलमी केल्यावरून येवज रवाना करुन पाटवणे जरुर जाणोन हाली यक लाख रुपयेस दर सावणुरीस साडेतीन रुपये प्रमाणे २८५७० आठावीस हजार पांचसेह सत्तर होन स्वारा बो पाटविले आहेत पोहचल्याचे माारास निगारिष केले पाहिजे भारी फौज जथवावि तर ताबडतोब करून मातबर काम करावे दिरंगावर घातलीया मनसबा मूल दरजावर जात आहे भारी फौज जथली असता रामचंद्र गणेश जुजबी फौजेनिसी नजीक असून त्यास गारत कर-णेची पैरवी काये सबब केली नाही त्याची सबब मालूम न जाहाला आताही रामचंद्र गणेश वगैरे फौज आटोक्यात येत असेल तर सरसुभेदार यासी सांगोन ते फौज गारत जलद होयेसे करवावे अगर ते फौज आटोपात येत नसेल तर दरोबस्त जथले फौजसुधा सरसुभेदार यास धारवाडाचे सुमारास पाटवणे म्हणजे धारवाडा नजीक येथील फौज आहे हरदो फौजा शामील होऊन मखालीफास गारत करतील. आम्हीही छ २५ मोहरम पटणाहून कूच करून पेषखानेस दाखल जाहालो अनकरीब मजल दरमजल धारवाड त्या जिल्हेस येत असो सरसुभेदार याची आमची मुलाकात होऊन तरफैनचे मसलहतीने मखालीफास जरब द्याव-याची पैरवी केली जाईल हरदो फौजा मिलालेवर खातरखा मनसुबा जहुरात येईल इतकीया-वर दिरंग करणे हरगीज मसलहत नाही ऐशास सदरहू लिहिले प्रमाणे रामचंद्र गणेशास तंबी होऊ सकेल तर ते काम करवावे तो माार अटोपात येत नसेल तर सरसुभेदार याची रवानगी जलद केली पाहिजे येबाबे सरसुभेदार यासही लिहिले असे बाकी मरातीब वकील आनंदरावाचे जबानी मालूम होईल राव आजम बाजीराव यानीही लिहिले आहे त्यावरून अयां होईल हमेशा आपणाकडील खुषखबर निगारीव करऊन दिलषाद करवीत असावे जादा काय लिहिणे हे किताबत. पो छ २२ माहे सफर सुा सबा सबैन मया व आलफ सुाा किले पनाला.

लेखांक ५३

तारीख २२-८-१७७७

नकल

रु. नं. १

अ. नं. ४९

खुसी खैरयत दस्तगाः नारो दतात्रये घो बाद दरिविला कितेक मसलहतेचा मारास राव अजम यशवंतराव शिंदे यास मुफसील लिहिला असे त्यावरून मालूम होईल त्याप्रमाणे तेथे जमा जाहाला फौज घेऊन येशवंतराव शिंदे बंकापुरचे रोखेस येऊन सरकारचे फौजेस शामील जाहालीया येथून आले फौजेस खर्चासही पोहचत आहे हरदो फौजेच्या इतीफाकेने हरीपंत फडक्याची तंबीही होत आहे आगर कोलापूरचा बंदोबस्ती करिता येशवंतराव शिंदे तेथेच असावे यैसे असलिया आणखी तेथे फौजही जमा करावा लागतो अशास येशवंतराव शिंदे हे तेथेच असावे फौज घेऊन सटवोजी भोसले आपणसहीत बंकापुरचे रोखेस येऊन सरकारचे फौजेस पेरीक जाहालीया बेहतर आहे बंकापुरास आले फौजासही खर्चासही पोहचाविले जाईल आणि कोलापुरासही येवज पावविला जाईल बाकी मार बहिरजी गाईकवाड व बालाजी विठल लिहिले आहेत त्यावरून मालूम होईल ब तारीख छ १८ रजब ११९१ हिजरी

पौ छ १५ माहे शाबान सुा समान (पौ ता. १८-९-१७७७)

सबैन मया व आलफ मुा करवीर

लेखांक ५४

पौ तारीख १८-९-१७७७

नकल

रु. नं. १

अ. नं. ५२

महाराजे बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति

हमवारे खुशवक्त व कामयाब बाषंद

ऊबहत व शौकत पन्हा यकबाल व इजलाल दस्तगाह कुदवे राजहाय समुआलमकान बाअदज इजहार ईस्वीयाक फिरावा मषहूद आंके येथील खुषी जानून आपली शादमानी कलमी करीत याव दरिविला आपण खत पाटविले ते पोहचून मजमून मालूम जाहाला आपला कुमकेस फौजही रवाना कराव व खर्चासही पाटवावा ऐस लिहिला होता तर पेशजी कोलापुरात फौज जमा जाहाला होता त्या वख्ती सरकारचे फौजेसहीत बाजीरावजीही हुबलीचे रोखेस होते सरकारच फौजेस आपली फौज येऊन शामील जाहले असलीया बहुताद कामेची सरबराही होत होती त्याप्रमाणे इतीफाक जाहाला नाही आताही आपणापासी फौज आहे ते आहे आणखी फौजेची जमा करणेचा करावा येथून भारी फौज व भारी तोफखाना बंकापुराचे रोखेस रवाना करून पाटविले असो आपणाकडील फौजसुधा यशवंतराव सिंदे बंकापुराचे

रोखेस येऊन सरकारचे फौजेस शामील जाहालीया आपले फौजेस खर्चासही पोहचेल आणि सरकारचा फौज व आपला फौज इतीफाक जाहाल्या बाअदज हरीपंत फडक्या सिरहटीकडे आला आहे त्यांचे तंबीही सहजात होईल याप्रमाणे केली या मखालीफाचे तंबीही होत आहे अगर नाहीतर बिलफैल तेथे जमा जाहाला आहे ते फौज पैकी यक हजार स्वार तेथ ठेऊन घेऊन बाकी फौजेस बंकापुराकडे सरकारचे फौजेस षरीक होत ऐसे पाटविलीयाही बेहतर असे येथून यैवजाचा सरंजाम करून कोल्हापुरास पाटऊन देऊ तेथ आणखीं फौजेचा जमाव करावा खुल्लस जे विसी वजेने बाराभाई याची तंबीह व्हावी आणि रावसाहेब मेहरबान रघुनाथ रावजी याची स्थापना व्हावी हेच आमचेही खुषीचे कामे आहेत आपणासही हे काम जरूर हे काम इनसराम जाहाल्या बादज आपलाही कामे बहुत घडून येईल या बख्ते कोणवजे तरतूद करावी त्याप्रमाणे भारी फौजचा जमाव करून पोख्ता मसहलत ठराऊन त्या मारास लिहून पाटवणे तेथे जमा जाहाले फौजेस इकडून खर्चास पोहचविले जाईल कोणेबातेचा अंदेषा न करिता खातीरजमेकडून बाराभाई याची तंबीह व राव मौसूफ याची स्थापना होये ऐसी पैरवी करीत जावे बाकी मार बाजीरावजी व आबाजी महादेव लिहिले आहेत त्यावरून मालूम होईल आपणाकडील बहिरजी गाईकवाड व बालाजी विठल आहेत त्यासही जे काय मरातब सांगणेचा सांगितले आहे त्याना लिहितील त्यावरून मालूम होईल हमेशा आपली शादमानी कलमी करीत यावे जीयादा लिहिणे काये असे हे किताबत.

पौ छ १५ माहे शाबान सुा

समान सबैन मया व आलफ

मुकाम करवीर.

तारीख ९-१-१७७८

लेखांक ५५

अ. नं. ७६

माहाराज सिवाजीराजे छत्रपति एकबाल

पन्हाहूं

दौलत व येकबालपन्हा हिशमत व शाकत दस्तगाहा जीशान बुलंद मकान अजी हनराब्येल उईलिंम हार्नबी इस्कोयर प्रजिदेंत गोवर्नदोर जनराल जंजिरे मुंबई बादज इजहारे मरातीब शौक मशहूद आंकी इजानेबी छ २८ जिल्कादी वेंगुरल्याचे राहाने यकबाल पन्हास इबलाग केला असे व आंहिशमतपन्हाकडील मकतुब (मकातीब-पत्रे) छ ३ जिल्हेजी बिलातारीखची रसीद जाहली त्याचा दरजवाब सदरहू आं हिशमतपन्हास आयां होईल अलहाल बमाई खत आ शौकत पन्हाकडील सिपायाची रवानगी केली असे

किताबती

रा छ ९ जिल्हेज सुा समान सबैन मया व अलफ हे

लेखांक ५६ तारीख ६-२-१७७८

श्री

अ. नं. ११७

यादी राजपत्रे व पेशव्याकडील चिरंजीव सखाराम बावाकडे राजश्री माहादजी सिंदे याचे लस्करास करवीरचे मोकामी राजश्री दताजी निंबालकर याजसमागमे पाठविली सु॥ समान सबैन मया व अलफ माहे सफर छ ६ रोज ऊर्फ फाल्गुण शुध सप्तमी शुक्रवार मोा लाटीचे मुकामाहून पाठविली रुबरु खास श्री देवपूजा करिते समई

३६ राजपत्रे

५ श्री शाहू छत्रपति याजकडील इनामगावाची

३१ श्री शंभू छत्रपति याजकडील

३६

४५ पेशव्याकडील पत्रे

४ यादीचे बंद

८५

येकून पत्रे पंच्यायंसी पाठविली आसेत बाकी सरकारात द्प्तरी तसील्मात धोंडजी घोरपडे-कडे जुने यादीचे बंद ४ च्यार व राजपत्राच व पेशवेचे पत्राचे आनवयाचे यादी बंद ३ तीन येणे प्राो आसत छ मा। र.

लेखांक ५७ तारीख २२-३-१७७८

रु. नं. १

अ. नं. ५३

खुसी खैरयत दस्तगाः नारो दत्तात्रेय घोा घांद दरिविला तुम्ही खत पाटविले ते पोहचून हकीकत जाहीर जाहाली करवीरच कोटास महादाजी शिंदेने मोहासरा केले आहेत कोटातून येशवंतराव शिंदे व सटवाजी भोसले यानी बाहेर जाऊन मारामारी करून येतात त्या वक्ती इकडून कुमक पाटवावा म्हणून लिहिला होता तर इकडे हरि पंडत फडक्या व धोसासहीत मोकाबिलेस आले आहेत करिता रोज जंग जहालच- काम रुबकार आहे खुदाय फजनकडून ष्रबखून करून हरदो मखालिफाचे फौजेची तंबी करावी म्हणून मोरर केली अस इनशालाहुताला पंधरावीस रोजात इकडील मखलिफाचे तंबीबवामे करऊन तेथील कुमकेस वीस पंचवीस हजार स्वार लगता लगत पाटऊन देत असो तबलगवीस रोज महिना कोट करवीरास मजबुती करून घेऊन असीजेस महाराजाकडून यशवंतराव शिंदे सरसुभेदार व सटवाजी भोसले यास लिहऊन पाटऊन मकान मारची उस्तवारी खुबवजेने करविले पाहिजे. बा तारीख छ २२ सफर सन ११९२ हिजरी सुहूर सन समान सबैन

को. घ. ३...४

लेखांक ५८

तारीख १५-५-१७७८

श्री

अ. नं. ७५

यादी तालुके चिकोडी राजश्री पंतप्रधान याजकडे द्यावयाचा ठराव होऊन राजश्री आपाजी शामराव याचे कर्जाऊ येवजाची उगवणी व्हावी म्हणून राजश्री माहदजी सिंदे याणी विनंती करून तालेबंदावर मखलासी करून घेतली त्या रदकर्जास येवज ता। मा।र पैकी गाव नेमून दिल्हे सु॥ समान सबैन मया व अलफ

२१७६।= मौजे नाहिंगलज
७९३८- मौजे गीरगाव
३५०४८= मौजे कोगनोली
६४१३॥-

येकून तीन गाव बेरीज सा हजार च्यारशे साडेतेरा रुपये येक आणा रदकर्जास लाऊन दिल्हा असे रदकर्ज जालेविना सदरहू तीन गावची घालमेल होणार नाही येणेप्रमाणे करार तेरीख छ १७ माहे रबिलाखर.

लेखांक ५९

माहे जून इ. स. १७७८ नंतर

श्री

रु. नं. १

अ. नं. १८५

तहनामा येणे प्रमाणे कलमे करार करून दिल्ही

असेत ———————————————— बी तपसील

सह

पूर्वेस भीमातीरपर्यंत पश्चम
समुद्रतीरपर्यंत तल कोंकण व
समुद्रातील किले जंजिरे व गडी
कोट किल्ले व प्रांत अहद लि-
हिली आहे त्याप्रमाणे पूर्व
पश्चिम पावतो जराबाजरा
सरकारात खाजगी करून
देऊ कलम १

दक्षण उत्तर तुंगभद्र पासोन
सप्तरुसीदेखील गडीकोट किल्ले
व प्रांत संपूर्ण जराबाजरा
सरकारात खाजगी करून दिली
असे. कलम १

..........कल्म

१

चंदावरचे राज्य अर्काटवाले
यानी घेतले आहे ते सोडवून
स्वराज्य करून दिल्हे
असे कल्म १

राजश्री रघुनाथराव पंडित याची स्थापना व्हावी हे माहाराजाचे मानस त्यास आम्ही साहित्य करून मनोदये सिद्धीस नेऊ. कल्म १

माहाराजाचे सरदार व सरकारकून व मराठे व कारकून व राज्यातील वतनदार व पालेगार हे महाराजाचे खिदमतीत अमर्यादा करून किंवा बेमानी करून आलेस त्यासी आम्ही आश्रय देणार नाही तैसेच आम्हाकडील कोणी बेमानी करून आलेस माहाराजानी त्यास आश्रय देऊ नये आणि हरकोणी कित्येक प्रकारे गैरवाका समजावितील ते उभयपक्षी न ऐकता श्नेह द्रढोत्तर चालू. कल्म १

राज्यातील अवांतर कोणी माहाराजाचे खिदमतीवर बदनजर धरतील त्याचे पारपत्ये उभयपक्षी ऐक्यता होऊन करू ——— कल्म १

महाराजाचे खिदमतीत रघुनाथराव पंडित यांनी मर्यादेने वर्तणूक करावी आज्ञेनरूपे वर्तन असावे व राजेश्री यशवंतराव सिंदे सर सुभेदार यानी निखालस रीतीने स्नेहभावे उभय ऐक्यतेत किमपि संसय त्यानी न आणावा येविषी पंडित मारनिले यासी आम्ही दरम्यान आहो येविसी माहाराजाचा खातीरजमा बार करार असो द्यावा ——— कल्म १

राजश्री यशवंतराव सिंदे सरसुभेदार यासी सरंजाम साहेब कृपा करून देतील तो व आम्ही सरंजामाचा तहनामा लिहून देऊन करार करून देऊ तो यावतर साहेबाचे राज्य आहे तो कायम चालवावे साहेबी व आम्हीही आमची दौलत कायम तोपर्यंत राव सरसुभेदार याच्या सरंजामास व स्नेहास शपथपुरसर अंतर कदापि न करिता चालू ——— कल्म १

तुंगभद्रचे दक्षणतीर पासोन दक्षण समुद्रपर्यंत प्रांताच्या सनदा साहेबी आम्हास करून द्याव्या ——— कल्म १

तुम्ही लिहिलेवरून राजश्री महादजी सिंदे याचे विद्यमाने बारभाईकडील तह त्यानी म्हटले प्रमाणे जाहाला कागदपत्र व जामीनकतबे व ऐवजाच्या चिठ्या व तहाच्या यादी व ऐवज खर्च पडिला त्याची निभावणी करून देणे आपणाकडे आहे ——— कल्म १

कैलासवासी शाहू महाराज यानी सरकारकून व सरदार व अवंतर हरकोणी जिल्हे मामले व परगणे दिल्हे आहेत ते सरकारात खालसा करून देऊ माहाराज ज्यास कृपा करून देतील त्यास करार असे. ——— कल्म १

सोंधे व बिदरूर व अंतरूज येथील व तुंगभद्रपलीकडील व अवंतर प्रांतातील सालदरसाल

ऐवज रुपये ५०००००० पनास लक्ष सुरळीतपणे देऊ व शिवाय चौथाई देत जाऊ ——— कलम १

जंजिरे सिंधुदुर्ग सरकारचा जंजिरा तेथील कौल समुद्रामध्ये हुनावर व मंगरूल व कलीकोट व मया व तालेचिरी येथील साहूकार व कर्नाटकातील वगैरे बंदरचे साहूकार पेशजी जंजिरे सिंधुदुर्गचा कौल घेऊन आमदरफ्ती करीत आले त्याप्रमाणे पुढे जंजिरेचा कौल घेऊन आमदरफ्ती करून महाराजाकडील आरमार व आम्हाकडील आरमारासी गाठ पडलिया स्नेहभाव चालवू. ——— कलम १

वकिलीस महाराज रवाना करतील त्याचे हातून घेऊ ——— कलम १

महाराजास व आम्हास ममतापुरःसर आक्रतीम स्नेहात अन्यत्र हरयेकविसी इतर कल्पना चितात आणणार नाही व हरकोणाचे सांगणीवरून विपर्यास न पडता उभयपक्षी स्नेहयावंतर चंद्रसूर्य तावत्पर्यंत चालू याविषयीं शफतपुरःसर दरवार परवरदिगार व कुराण्याचे शफतेनिसी पत्रे दोन दिल्ही आहेत. ——— कलम १

जोपर्यंत माहाराजाचे राज्य कायम व आमची दौलत हरकरार तोपर्यंत हरदु तर्फेनची दोस्ती बेखिलाफरीतीने चालेल. ——— कलम १

महाराजाचे राज्यावरील हरकोणी आमर्यादेस प्रवर्तलेस आम्ही फौजसुद्धा सामील होऊ आमचे दोलतीवरी कोणी आल्यास महाराजानी फौजसुद्धा सामील असावे. ——— कलम १

राजश्री रघुनाथराव पंडित यानी करारनामा महाराजाचे खिदमतीमध्ये इमान पुरासर शफतेनिसी लिहून दिला त्यात पंडित मारनिल्हे याजकून अंतर पडिलेस आम्ही निभावनीस दरम्यान असो. ——— कलम १

प्रतीवर्षी माहाराजाचे शेवेसी नजर जडजवाहीर व हत्ती घोडे व नकद व कापड व चीजवस्त वगैरे अपूर्व जिन्नस नजर करू ——— कलम १

लेखांक ६० तारीख १४–७–१७७९.

रु. नं. १
अ. नं. ७६

राजासाहेब मेहरबा सलाम बाजद सलाम आंकी

येथील खैरसला जाणोन साहेबी आपली शादमानीस लिहीत आली पाहिजे दरविला साहेबी हुजूरास येक थैली व आम्हास एक थैली ऐसे प्रमाणे पाटविला होता बजिनस हुजूरास रवाना केले आहे त्याचा दरजवाब येताच लिहून पाटवितो जाणोन नारो बहिरव मोकासी यासी सांगितले होते हान हुजूराहून साहेबाचे नांवे जे थैली आले करिता पाटविलो असो यथून पोचवतील पादशाहाची व साहेबाची दोस्ती वीस वरुषापासून चालीत

आले असता तलीखोरा त्या व गुरुपुत्र रुद्राका यास असरा देईल एखलासीचा जागा जिनहार तैसे काम होणारच नाही म्हणोन येकीन समजलो असो मगर साहेबास मालूम नसता निसब्रतीदार नरसिंगराव सिंदे यानी आपले तालुक गड नेसरी वगैर तालुकातून कित्येक लुटारेस शारासी जमाव करून राज्याचे संरक्षण होऊन कितूरच मुलकावरी दंगाहा करून सरकारच जमेयत थोडेबहुत गडकोडा जवली असता शारनत करून सरकारचा दागिन बारा घोडे बावीस बंदुका एक कुंबक ऐसे सामान घेऊन गेले आहे साहेबाच तालुक्यात जागा व जागा कोटे आहे ते ताकिरारा करून सरकारच दागिन घोड बंदुखा आणवून पाठवितो व करावी सिवाय सिंदे मजकुरानी तलीखोर असे शरीखान हातेस सेना पोर्चावली हे खबर पादशाहा येकूण बहुत खूष होऊन फौज व फौज दोस्ती तर्की होईल नरसिगरावच नांवे नमता चार पाच कल्मदानेत सापडावे ते त्यास साहेबी व भिरजा परशराम भाऊ उभयताकडून फस्ताप ऐसे जाले नाही म्हणोन बहुत बजाऊन हुजूरास अर्जी करून पाठविलो होतो हे कैफीयत नारो भैरव यास मालूम आहे आसाहेबस लिा असतील त्याजवरून मालूम जाहाले असतील तोरगल वगैर सरहद्द सिलोन आहे कोणते सतीषी सन होतेस ताकीद करवणे म्हणोंन तरी आमच व साहेबाच एखलासी एकीन असता सरकारच फौज इतके हमर आले होते येक आदमी येक घोडेवाले तरी आपले तालुकेस आणून हजर दिले की काय ते खबर तालुकेवालनी साहेबास लिहिले असतील त्याजवरुन मालूम जाहाले असतील सरकारच माल गेले त्यास हरज देऊन वसूल केलेवरी दुगणामार येथील म्हणोन सांगणारानी सांगितले परंतु हलके कामास कदीम दोस्ती तोडीनेसी होत नाही साहेबी हमेशा खरीयतेस आजाहा दोस्ती खत देऊन दिलशाद करीत आले पाहिजे. जादा लिा काय असे हे किताबती तारीख छ २९ माहे जाखर पौ. छ. ६ माहे रजब सुा समानेन मया व आलफ मुकाम किले पनाळा

(पौ २०–७–१७७९)

लेखांक ६१ तारीख २०–९–१७७९

श्री व्यंकटेश

अ. नं. ७७
पौ छ १३ रमजान
मुकाम पनाला सन
समानीन

श्रीमन्माहराज राजश्री छत्रपति
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक वेंकटराव नारायेण कृतानेक विज्ञापना ता छ ९ माहे रमजान पर्यंत स्वामीचे कृपाद्रिष्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष स्वामीनी कृपालु होऊन आज्ञापत्र सादर केले ते पावोन मस्तकी वंदून सनाथ जाहलो राजश्री राणोजीराव घोरपडे

सेनापति व अंताजी शामजी यानी बोरगाव व कोगनोली वगैरे येथून सरकार प्रांतात उपसर्ग करणेत बाकी ठेविली नाही सबब बोरगावचे ठाणे सरकारात घेतले त्यासी बोरगावास हरयेकविसी उपसर्ग जाहालीया आणि सेनापति व आंताजी शामजी याची कुमक केलिया व आकीवाट व बस्तवाड दोनी गावची लावणी केलिया तुम्हाकडे सरकारातून उपसर्ग होईल स्वामीस पष्ट मानणार नाही म्हणोन आज्ञा येसियासी सेवकाकडून आजपर्यंत स्वामीच्या चेरणासी आमर्याद वर्तणूक जाहली नाही व सरकार प्रांतातही उपसर्ग जाहला नाही आकीवाट व बस्तवाडे दोनी गावाची लावणी केलिया स्वामीस पष्ट मानणार नाही म्हणोन निरोपिले त्यास सेवकाचे तर्फेने लावणी जाहली नाही आसे आसता स्वामीस कोणी गैरवाखा समजाविला असल्या स्वामीनी तहकीकात मनास आणोन मग सेवकावर आरोप ठेवावा कोणी गैरवाका समजावितील तर ध्यानात न आणावे स्वामीच्या चरणासी येकनिष्ठपणे वर्तणूक करून उर्जित करून घ्यावे हेच सेवकाचे मानस आहे सिध्धीस न्हेणार स्वाम समर्थ आहा
सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.
आसलबरहुकूम नकल रुजू
पाहणार रामचंद्र धोंडो चिटणीस
नि॥ सरकार करवीर.

लेखांक ६२ तारीख २२–९–१७७९

अ. नं. ५४

श्री गणराज

श्रीमंत माहाराज राजश्री छत्र
पति स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रघुनाथराव नीलकंठ कृतानेक विज्ञापना भाद्रपद शु॥ १२ स्वामी यानी आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदून सनाथ जालो पत्री आज्ञा जे मौजे बोरगावच्या ठाण्यातून सरकार तालुक्यास उपसर्ग फार जाला सबब मौजे मजकूरचे ठाणे घेतले आहे त्यास तुम्हाकडून ठाणे मजकुरास उपसर्ग लागो नये म्हणोन आज्ञा त्यास स्वामीचे आज्ञे प्रो आम्हाकडून उपसर्ग होणार नाही व आकीवाट व बस्तवाडची लावणी जाल्यास सरकारातून उपसर्ग लागेल त्यास पेशजी श्रीमंतानी कारकून पाठवून थोडीबहुत लावणी केली आहे आम्ही स्वामीचे आज्ञेखेरीज नाही निरंतर आज्ञापत्री सेवकाचा सांभाल करावयास धणी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ती.

लेखांक ६३ तारीख २४-९-१७७९

श्री

रु. नं. १

अ. नं. ९८

पो छ १७ रमजान सन समानीन मुा पनाळा

श्रीमंत माहाराज छत्रपति स्वामीचे सेवेसी आज्ञाधारक बाबूराव दादाजी दिा महिपतराव कृष्ण कृतानेक विज्ञापना तागाईत छ १३ रमजान पावतो माहाराजाचे कृपाकटाक्ष शेवकाचे वर्तमान यथास्तित असे विज्ञापना शेवकावर कृपालु होऊन आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदोन सनात जालो तेथे राजश्री राणोजी घोरपडे सेनापति व अंताजी शामजी यानी बोरगाव व कोगनोळी वगैरे येथून सरकार प्रांतात उपसर्ग करण्यात बाकी ठेविली नाही सबब बोरगावचे ठाणे सरकारात घेतले त्यास बोरगावास दरएकविसी उपसर्ग होऊ नये आणि अकीवाट बस्तवाड हे दोन्ही गाव सरकारचे तेथील लावणी केलियास स्वामीस माणणार नाही जे लावणी करतील तिकडे सरकारातून उपसर्ग होईल व सेनापति व अंताजी शामजी यासी कुमक करतील त्यास मात्र सरकारातून तोषीस लागेल उपरात राजश्री बाळाजी जनार्दन याजकडे सरकार फौजेचा बोभाट ल्याहाल यास्तव आज्ञापत्र सादर जाले असे सरकार प्रांतात तुम्हाकडोन आमर्यादा न व्हावी म्हणोन आज्ञा जाली ऐसीयास तालुका माहाराजाचा महिपतराव कृष्ण व रामचंद्र महोदव याजकडे कर्जात आहे तालुकियात सरकार निसबत फौजा फिरतात त्याजकडून गावखेडियास उपसर्ग लागतो त्याजमुळे शिबंदी येऊन खर्च होतो व आज च्या वर्षे उपद्रव होऊन मुबलग खर्च जाला रदकर्जी पैसा पावला नाही व महाली कर्ज जाले तेणेकरून सरकारचीच नुकसानी आहे यास्तव माहाराजाचे शेवेसी विंनती करावयास कारकून पाटवाव याची याचना सेवकानी केली• होती तव आज्ञापत्र सादर जाहाले त्यावरून सरकार प्रांतात उपसर्ग करू नये त्याप्रो ठाण्यानी ताकीद केली आहे आज्ञा जाली आसता सेवकाकडोन अतःपर सेवेसी अंतर पडावयाचे नाही राजश्री वाकेनीस व रो पिराजी घोरपडे वगैरे जागाजागा सरकारच्या फौजा आहेत त्यास सेवकाकडे खेडी आहेत तेथे उपसर्ग करू नये येविषी आज्ञा करणार स्वामी समर्थ. शेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

लेखांक ६४ तारीख ६-१२-१७७९

रु. नं. १

अ. नं. ५५

माहाराजे बुलंद दर्जे सिवाजी राजे छत्रपति हामवारे खुषवक्थ कामयाब बाशद उबाहत व शोकत पन्हा एकबाल व इजलाल दस्तगाह कुदवय राजहाय समूआल मकान बादज इजहार इस्वियाक फिरावा मशहूद आंकी येथील खुषी जाणून आपली

शादमानी हमेशा कलमी करीत यावे दरिविला हमीरा कारकून दुपीते खत मसरत नमत पाटविले ते पोहचून
बहुत खुषी हसील जाहाली याकरिता हलीचे पारचे पाटविला आहे
बाराभाई यानी मुल्कास तोषीस देत आहेत आणि पेशवे रघुनाथ रावजीही करवीरास येणार आहेत म्हणून निगारष केले होते तर राव मारनिले करवीरास येतील तर इकडू-नही अणकरीब त्या जिलेस फौजा येत आहे बाराभाई याची तंबीई होईल सटवाजीराव भोसले करारा प्रमाणे ताहाल येऊन पावले नाहीत राव मशारनिलेस ताकीद करवून पाट-विले पाहिजे हमेषा आपली शादमानी कलमी करीत यावे ज्यादा लिहिणे काय अस हे किताबत. पैा छ. २७ माहे जिल्काद सुा समानीन मया व अलफ मुकाम किल्ले पनाळा.

लेखांक ६५ पौ तारीख २०–१–१७८०

रु. नं. १
अ. नं. ५६
महाराजे बुलंद दरजे शिवाजी राजे छत्रपति
हमवार खुषवख्त व कामयाब बाषंद
उब्हत व शौकत पनाह व एकबाल व इजलाल दस्तगाह कुदवय राजहाय समुअलमकान ....बादज इजहार इस्तीयाक फिरावा मषउद आंके एआहा खुषी जाणून आपली शादमानी हमेषा कलमी करीत असा पाहिजे दिगर आमचा व आपला खमस मुदत पासोन चालत आहे या करिता पेशजी पुणेवाले बारभाई याचा व आमचा बिगाड होता करिता इकडूनही त्याच मुल्कास तोषीस पोहचत होता आणि आपणाकडूनही हरज पोहचत होता दरिविला बाराभाई याचा व आमचा सलुकाचा पैगाम लागला आहे या-करिता इकडूनही त्याच मुल्कास हरज न पोहचे यैसे ताकीद करविले आहे तेथे सटवाजी भोसले व मानाजी शिंदे यानी जमखंडी तेरदाल वगैरे बाराभाई याच मुल्कास तोषीस देऊन लुटालटी करितात यैसे येकनेत आले तिकडून सलूकाचा पैगाम असता त्याच मुल्कास तोषीस देणे लाजम नाही या करिता मानाजी शिंदे तेथे असतील तर त्यास रावसो मेहरबान रघुनाथरावजी कडे जाई तैस रजा देऊन पाटवावे सटवाजी भोसले यासही बारभाई याच तालुकेत स्वारी न करणेस ताकीद करवून करारा प्रमाणे सटवाजी भोसलेस जमीयेतसुधा येथे राा करून पाटवावे बामफेल पुनेहून सलूकाचा जबाबसवाल करिता मातबर येथे आले आहेत इकडील सलूकाचा जबाब सवाल होते वख्ती आपणा-कडील तहचा जवाबसवालही फैसल व्हावा लागतो का जे तरफैन दुजाई नाही या करिता आपणाकडील मातबरास जवाबस्वालाचा येखत्यारी देऊन पाटविले पाहिजे अगर आपली मर्जी बारभाई यासी सलूक करणे नसलीया त्या मााारास लिहून पाटवावे सटवाजी भोसले

त्यासही जलद रवाना करून पाटविले पाहिजे बाकी मजकूर राघो विठल व अवधूतराव लिहिल्यावरून मालूम होईल हमेषा आपली शादमानीस कलमी करवीत आला पाहिजे ज्यादा लिहिणे काये अस हे कितबत.
पौ छ २१ माहे मोहरम सुा समानेन
मया व आलफ मुकाम किले पनाला

लेखांक ६६ तारीख २–२–१७८०

श्री

रु. नं. १
अ. नं. ५८

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके १०६ विकारीनाम सवंत्सरे पौष बहुल द्वादशी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजश्री राघो विठल यासी आज्ञा केली यैसीजे नवाब बाहादर याणी स्वामीचे शेवेशी थेली पाटविली होती व राजश्री येशवंतराव शिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार यासी नबाबाचे व तुमचे पाटविले पत्राभाव व राजश्री गणेश बलाल याणी मुक्ता सविस्तर अर्थ सांगितलेवरून राव मारनिले याणी स्वामीचे सेवेसी निवेदन केल्यावरून अवगत जाहाला त्यावरून (दोन ओळी फाटल्या आहेत) यत + + + व तहाची यादी पेशजीची नकल करून पाटविली आहे त्याबरून कलेल त्याअन्वये जे बोलणे ते बोलून विनंतीपत्री लेहून पाटवणे म्हणजे तुम्हास आज्ञापत्र सादर होईल तदनुरूप करणे तहाचा मजकूर शाहू महाराज याचे कारकीर्दीस जाहाला त्यावरी तह कोण्हासी करावा हा मजकूर सर्व तुम्हास दखल आहे आज्ञा करून कलवावेसे नाही तुम्हाकडील उतराची विनंती पत्रे आलेनंतर आज्ञा होणे ते होईल व मातब्रर पाटवेण तो पाटऊन दिल्हा जाईल नवाब बाहादर याणी मनावरी घेऊन तहाचा मजकूर करितात तेव्हा उत्तम तोच प्रकार करतील वरकड सविस्तर आज्ञे प्रमाणे राव सेनासाहेबसुभा सरसुभेदार लिहितील त्यावरून कलेल जाणिजे लेखन सीमा

लेखांक ६७ तारीख २२–१–१७८१

श्री

तालीक

रु. नं. १
अ. नं. ५९

इहिदे समानीन मया व आलफ

यादी श्रीमन्माहाराज राजश्री ———————— छत्रपति स्वामीचे सेवेशी करार होऊन यावे शके १७०२ शार्वरीनाम संवत्सरे
१ प्रांत हुकेरी ता॥ व मनोली ता॥ व फुटगाव व प्रांत कागल व रायबाग व कटगोल

तालुकेसुधा पेशजी चाललेप्रमाणे स्वामीकडे चालवे मध्ये सांगणाराचे गोष्टीवरून विपर्यास पडला पुढे होणार नाही या प्राो करार करून शफतपूर्वक विनंतीपत्रे यावी.

——————————————— कलम १

प्रांत हुकेरी ता व मनोली ता याच्या सनंदा स्वामीनी पोचलह्या त्या हली स्वामीस नजर केल्या हली हुकेरी प्रांत व मनोली प्रा व कागल व रायबाग प्रांत समतलाम नजर केले असे येणे प्रमाणे करार. तालुका मनोली येथील सरकार अंमल वगैरे फुटगांव मोकासबाब व गडपटी व कमतपटे वगैरे आमल चालत आला त्याप्रमाणे हुजूर यावा. आलीकडे सावनूरकर नवाब व हैदर नवाब व नवलगुंदकर देसाई व कितुरकर देसाई याजकडे ठाणी व गाव वगैरे आमल व बाब ज्या ज्याकडे असतील त्या हुजूर सोडून द्याव्या. ——————————————— कलम १

हैदरखान याजकडे प्रांत गेला आहे तिकडून सुटोन आल्यानंतर पेशजी वहिवाटी प्राो चालवू येणे प्राो करार फुटगाव वगैरे फुटगाव झाडून जराबाजरा हुजूर यावे ज्या ज्याकडे ठाणी व गाव त्यातील कांही न राहता झाडून हुजूर यावे. ——————————————— कलम १

हली कराराप्राो झाडून सोडून देऊ येणे प्राो करार.

देशक व देशपांडे पाटील कुलकर्णी वगैरे वतणदार व इनामदार व सरंजामी वगैरे स्वामीच्या राज्यातील तुम्हाकडे व तुम्हाकडील तालुकेदाराकडे कोणी आल्यास इनसापाविसी व हरयेकविसी पक्षपात न धरिता स्वामीचे सेवेसी पाटऊन द्यावे.

——————————————— कलम १

स्वामीकडे पाटऊन देऊ स्वामीनी मनसुफी वाजबी करून आज्ञा करून चालवावे येणे प्राो करार.

जरीपटके व हाती दोन हुजूरचे नेहले आहेत ते हुजूर द्यावे ——————————————— कलम १

स्वामीकडील जरीपटके व दोन हती व तोफा रामचंद्र गणेश याजकडे च्यार आहेत त्या देऊ स्वामीनी तोफा दोन कोणेरराव त्रिंबक याजबाबत आहेत त्या द्यावयाची आज्ञा करावी येणे प्रमाणे करार. स्वामीमध्ये व तुम्हामध्ये हरकोणी विपर्यास वारंवार पाडतात येविसी शफतपूर्वक विपर्यास न येई असे करावे ——————————————— कलम १

स्वामीचे शेवेसी निखालस विनंतीपत्रे शफत पुरस्कार पाटऊन देऊ स्वामीनी विनंती पत्राप्राो आज्ञापत्रे पाटवावी येणे प्रमाणे करार. भगवंतपंत व शेषोपंत याणी हुजूरची आज्ञापत्रे नेहली ती व प्रधानपंताकडील उभयताकडे आहेत ती व रामचंद्र महादेव व बालाजी केशव याजकडे गोपालभट याचे विाो हुजूरची आज्ञापत्रे व सावकारी पत्रे व मनोलीच्या सनदा व दर्म्यानगिरीची पत्रे व सनदा आहेत ती व आपाजी शामजी व महादेव भट याचे विद्यमाने सावकारीपत्रे व हुजूरची आज्ञापत्रे आहेत व प्रधानपंताकडील कराराची पत्रे आहेत ती हुजूर यावी ——————————————— कलम १

आजपर्यंत मागील पत्रे करारमदाराची यादी वगैरे कागदपत्र ज्या ज्याकडे आसतील ती शोध करऊन पाटऊन देऊ शोधासही न लगेत ती पत्रे रद असेत येणे प्रमाणे करार. तीन सालात राजश्री परशराम रामचंद्र याणी गाव व ठाणी जी घेतली आहेत ती व ज्या ज्याकडे दिली आहेत ती झाडेनिशी सरकारात यावी ———— कलम १

हली झाडेनिशी करारप्रमाणे सोडून देऊ येणे प्रमाणे करार. ————

स्वामीकडील जंजिरे व जंजिरीचे निसबतीचे आरमार व किले व कोट यासी तुम्हाकडील तालुकेदाराकडून हरयेकविसी उपसर्ग होऊ नये ———— कलम १

स्वामीकडील तालुके यासी इकडून उपद्रव होणार नाही स्वामीकडील तालुकेदारानी इकडील तालुकेयास उपद्रव करू नये येणे प्रमाणे करार.

तालुके विजयदुर्गाकडील यैवज बालाजी पंडित याणी करार केला आहे त्याप्रो सरकारात यावा ———— कलम १

पेशजीचे वहिवाटीप्रो चालऊ येणे प्रमाणे करार.

कराराप्रमाणे इमानपत्रे राजश्री प्रधानपंत व राजश्री बालाजी जनार्दन व हरि बलाल व परशराम रामचंद्र याची शफतपुरःसर स्वामीचे सेवेसी यांवी ———— कलम १

हाली कराराप्रमाणे पत्रे पाटऊन देऊ स्वामीचे शेवेशी त्या आन्वये स्वामीनीही आज्ञापत्रे पाटऊन द्यावी येणें प्रमाणे करार ————

राजमंडलचा सरंजाम व गाव खेडी जे आणभवितात ते व वतनदार याणी येवजाभरहुकूम चौसालचा यैवज हुजर द्यावा येवीसी तुम्ही ताकिदी यादीवार हुकूम द्यावे ———— कलम १

सावकाराकडे गहाण तालुका आहे तो पावेतो पेशजी चालत आल्याप्रमाणे चालेल पुढे सावकाराकडून तालुका सुटल्यावर स्वामीनी जीवनमाफीक जे घेणे ते पाहून घ्यावे येणे प्रमाणे करार.

करवीकरावरी महादाजी शिंदे आले ते समई करारदादाच्या यादी व सरकारची पत्रे व कागद कतबे व आकरा लक्षाचा कतबा व राजश्री सुबराव पंडित आमात्य व राजश्री आबाजीराव पंडित प्रतिनिधी याचे कागद कतबे देविले ते झाडून माघारे द्यावे ———— कलम

महादाजी शिंदे याजवल कागदपत्रे व यादी आहेत त्या तिकडून आणून देऊ न आल्यास रद आहेत. येणे प्रो करार.

सालसी महालकडे जंजिरे सिंधुदुर्गाकडील येवज चालत आहे त्याप्रमाणे जंजिरेकडे चालावे ———— कलम १

पेशजी चालत आल्याप्रमाणे चालऊ. येणे प्रमाणे करार.

सालदरसाल स्वामीचे शेवशी नजर दुस्त व जवाहीर व हाती घोडी सेवेशी पाटवीत असावे ———————————————— कलम १

पेशजी प्रमाणे वर्तनूक घडेल येणे प्रमाणे करार.

राजश्री येशवंत शिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार हे स्वामीचे आज्ञेनरूप सेवा करितात आणि स्वामीचा येख्तयार त्याजवरी याजकरिता त्यासी तुमची निखालसता असोन उभयपक्षी येक्यरूपे असावे ———————————— कलम १

स्वामीचे आज्ञेनरूप सेवा करितात आणि स्वामीचे येख्तयार त्याजवर तरी त्यानीही निखालसपणे आम्हासी आसावे आम्ही निखालसपणे त्यास आसो. येणे प्रमाणे करार...

आजीपावेतो भगवंत आपाजी व शेषो नारायेण व आपाजी शामजी याणी गैरवाखा हुजूर विनंती करून तुम्हास हुजूरचा गैरवाखा समजाऊन देऊन राज्याची खराबी केली आणि तुम्हासी विपर्यास घातला याजमुळे राज्याची खराबी जाहाली त्याचा दिनावा त्यानी भरून द्यावा लागेल ———————————— कलम १

येविसी स्वामीनी त्याचे हातून सेवा घ्यावी सेवेआंती जी आज्ञा करणे ती करावी. येणे प्रमाणे करार.

राजमंडलचे सेवक व वतनदार यासी तुम्ही आश्रय देऊन त्याचा पक्षपात न धरावा आणि त्यानी सरकारात रुजू आसोन आज्ञेनरूप सेवा करावी ———————— कलम १

स्वामीचे राज्यातील जे आसतील ते स्वामीकडे पाटऊन देऊ आजीपर्यंत त्याजकडील आन्याये आसतील ते माफ करावे पुढे आज्ञेप्रो सेवा करतील. येणे प्रमाणे करार.

पत्रे तुम्हाकडून लागतील ती आलाहिदा आज्ञेप्रमाणे द्यावी कलम

हली कराराप्रो पत्रे लागतील ती देऊ. येणे प्रमाणे करार.

सरकार तर्फेचे सेवक आसता सरकारात राहून गैरराह वर्तनूक केलिया स्वामी आज्ञा करतील त्याप्रमाणे तुम्हाकडून तोफा व फौज स्वामीचे शेवेशी यावी स्वामी त्यासी सिक्षा करतील. ———————————————— कलम

स्वामीनी फौजेची खर्चाची बेगमी केलिया जैसी आज्ञा होईल

तसी फौज पाटऊन देऊ येणे प्रमाणे करार.

बारा पतके पूर्वीपासून सरकारचे सेवक याचे पूर्वी सरंजाम होते ते देऊन त्याणी हुजूर रुजू आसोन सेवा करावी ———————————— कलम १

प्रस्तुत हैदरखानाकडे तालुका गेला आहे सुटल्यानंतर पेशजी प्रमाणे चालवू. येणे प्रमाणे करार.

मनोली तालुकेतील देशमुख व देशपांडे वगैरे वतनदार याजकडे सरकारच्या सनदा वितिरिक्त जे गाव असतील ते सरकारात यावे —————————— कलम १

गैरसनदी नूतन खात असतील ते स्वामीनी घ्यावे. येणेप्रो करार. बालाजी पंडित प्रधान याचे स्वदस्तूरची यादी पुणेत कैलासवासी तीर्थरूप मातुश्री —————— आईसाहेब याची स्वारी जाहाली ते समई व करवीरास कैलासवासी तीर्थरूप———— आबासाहेब याचे शेवेशी बालाजी पंडित प्रधान आले त्यासमई त्यांनी यादी व विनंती-पत्रे व शेषो नारायेण व भगवंत आपाजी याचे विद्यमाने दिल्ही त्यास आंतर करू नये —————————————————————————— कलम १

हाली करार जाहाला आहे त्याप्रमाणे सेवेशी आंतर करणार नाही. येणे प्रमाणे करार.

हाणमंत सिवराम व भिकाजी नरसिव्ह व घनःशाम येशवंत आंताजी जनार्दन व विठोजी सुर्वे वगैरे त्याजबराबर कारकून व म्हराठे व मनुष्ये तुम्हाकडे असतील ती हुजूर पाटवावी —————————————————————————— कलम १

स्वामीकडील जे सापडले आहेत ते सोडून देऊ स्वामीकडे आमचे कज्यामुळे सापडले आहेत ते सोडून द्यावे. येणे प्रमाणे करार.

शककर्ते कैलासवासी माहाराजापासून सावकारी तरांडी सावकारीस जातात त्याचा कौल जंजिरे सिंधुदुर्गाकडून घेऊन जात आसतात हली तुम्हाकडील आमलदार दिकत घेऊन कौलावणीचा यैवज सुदामत चालू देत नाहीत त्यास ताकीद करून पूर्ववतप्रमाणे कौलावण चालावी ते न जाहालेस येवज जिकडे राहील तिकडून घ्यावा लागेल———कलम

पेशजी प्रमाणे चालऊ. येणे प्रमाणे करार.

हुकेरी तालुकेतील देसाई याजकडे पेशजी भोगवटे विरहित काटकाईमुळे गाव आनभवीत आले आहेत ते गाव देह आठ हुजूर यावे व पैवस्तीबरहुकूम येवज त्याजकडून यावा देसाई मार याचा कारभार ज्या ज्यानी केला असेल त्यानी पैवस्ती बा येवज हुजूर द्यावा —————————————————————————— कलम

करारा प्रो स्वामीचे आज्ञेनरूप चालतील. येणे प्रमाणे करार.

किले तोरगलची गडपटी तालुकेदाराकडे व देशाकडे आहे ती किलेची किलेकडे चालत असावी येविसी देसकास ताकिदी द्याव्या. —————————— कलम

पेशजी प्रमाणे चालऊ. येणे प्रमाणे करार.

सोंदे व बिदनूर वगैरे संस्थाने कर्नाटक प्रांताची आहेत तेथील यैवज पेशजीच्या करारा-प्रमाणे तुम्हाकडे कर्नाटक प्रांत सुरू जाल्यावरी यावा —————————— कलम

पेशजी चाल्त आहे त्याप्रो चालऊ. येणे प्रो करार.

रामचंद्र नाईक परंजपे याचे कर्ज मामलतीकडे आहे त्यास सरकारात हुकेरी तालुका व मनुली तालुका व फुटेगाव नवेजुने जाहली याऊपरी तुम्हाकडील कारकून प्रमाणिक यावा म्हणजे त्याचे विद्यमाने रुजवात करून रामचंद्र नाईक याचे कर्ज फिटून सिबंदी वगैरे खर्च तुम्ही मामलतीचा येवज पाहून वजा देता त्याप्रमाणे वजा देऊन बाकी येवज रामचंद्र नाईक याचे देणे निघालेस हप्तेबंदी प्रमाणे सरकारातून त्याचे रुपये देववयाची आज्ञा होईल ——— कलम

बालाजी जनार्दन व परशराम रामचंद्र याजकडून कारकून पाटऊन देऊ सरकारचे कारकून पाटऊन द्यावे त्याचे व याचे विचारे हिशेबी वाजवी ठराव होईल त्याअंती रामचंद्र नाईक याजकडे रुपये फिरल्यास वायदे करून देऊ त्या प्रो स्वामीनी घ्यावे किंवा रामचंद्र नाईक याचे देणे निघाल्यास हप्ते करून देऊ त्या प्रमाणे स्वामीनी देण्याची आज्ञा करावी येणे प्रमाणे पकी खातरजमा स्वामीनी द्यावी. करार. स्वामीचे मनोदयानरूप आज्ञे प्रमाणे सेवा करावी दिवसेदिवस विशेषात्कार स्वामीचे आज्ञेनरूप वर्तनूक करू. स्वामीनी कृपा सेवकावर करावी येणे प्रमाणे करार.

——— कलमे ३०

येकून कलमे तीस सदरहू लिहिली आहेत त्याची मखलास कलमवार निरनिराली लिहिली (फाटलें आहे) वे सेवकाकडूनही आज्ञे प्रो वर्तनूक (फाटलें आहे) रार.

छ २६ मोहरम सन इहिदे समानीन मया व आलफ पौषमास.

लेखांक ६८ तारीख १–४–१७८१

श्री

रु. नं. १

अ. नं. १८८

तालीक

श्रीमत माहाराज राजश्री छत्र

पति स्वामीचे सेवेशी

विनंती शेवक बालाजी जेनार्दन कृतानेक विज्ञापणा येथील कुशल तागायत छ ६ रबिलाखरपावेतो यथास्थित आहे विशेष स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा की भुदरगडकरी यानी अमर्यादा करून लबाडी आरंभिली आहे त्यास राजश्री राणोजीराव घोरपडे सेनापति व विरुपाक्ष आणाजी वगैरे सामील जाहले आहेत त्याजला ताकीद करणे म्हणोन यसियास जे त्यांजला मिळाले असतील त्याचे मुदेवार दस्तऐवजी कागदपत्र

इकडे पाटवावयाचे आज्ञा होऊन दस्तऐवज आल्यास त्याचा बंदोबस्त येथूनच करू राजश्री मानाजी शिंदे यास अद्याप तेथून निरोप होत नाही त्यास मशारनिल्हेसे निरोप जाहाला पहिजे शेवेशी श्रुत होय हे विज्ञापना
पौ छ १२ माहे जमादिमावल सन इहिदे
समानेन मया व अलफ मुकाम किले पनाला
(पौ ता. ७-५-१७८१)

लेखांक ६९ तारीख २७-४-१७८१

श्री

अ. नं. ८३

कबुलखत बा आश्वारूढ व तटसरनोबत व सदर बारगीर व नाईकवाडी व समस्तलोक किले सभानगड सेवेसी विज्ञापना सुा इहिदे समानेन मया अलफ कारणे सेवेसी लिहून दिल्हा आपले आत्मसंतोषे कबूल कतबा यैसाजे किले मुदरगडकरी साहेबाचे पायासी अमर्याद वर्तणुकेस प्रवर्तून नामजाद लोक व नामजाद निसबत सबनिवीस व किलाचे सबनिवीस व हवालदार व मुतालीक सरसुभेदार यासी किलेखाली घालविले आणि राजश्री नरसिंगराव सिंदे वगैरे यासी किलेवरी घेऊन येऊन सरकार प्रांतात उपद्रव करून गावगना जाऊन गुरेढोरे घेऊन गेले त्याचे बोलणेविसी किले मजकूरचे सरनोबत व फडनिवीस व गडकरी दोनवेला साहेबी आज्ञा करून पाठविले परंतु ते कांही धराने बोलून स्वामीसेवेचे ठाई निष्ठेने वर्तणूक करावी यैसा त्याचा भावगर्भ नाही यैसी येऊन विनंती केली तदोतर किले मार येथही राजश्री राणोजी सिंदे याणी संधान लाविले आहे यैस सरकारात बातमी आली ते समई सेवकास आज्ञा जाहली तेव्हा आम्ही समस्तानी विनंति केली मूदरगडकरी याणी आमर्यादा वर्तणुकेस प्रवर्तले त्याचे फल ते भोगतील आमचाहि किला बहुत दिवस सिंदेकडे होता मूदरगडची गत तैसी जाहाली तेव्हा आम्ही मख्तेसर[1] गडकरी आसामी दाहा व सरनोबत व सबनिविस व फडनिविस साहेबाचे चरणासनिध किले पनाले याचे मोकामी राहातो मुदरगड किला सरकारात सुरू जाले नंतर साहेबाची आज्ञा घेऊन किला जाऊ गडकरी या लिा प्रमाणे दाहा आसामी महिने माहाल येऊन जातील मामलेदार सेवेसी सनिध आहेत जागेविसी साहेबी कांही फिकीर न करावी सेवक शिवशाई इमानास बटा कदापि लाऊन घेणार नाही सदरहू सेवकास सुभानराव सिंदे व सुलतानराव सिंदे याचे पुत्रपौत्र यासी कोणासी वगैरे कोणासी साहेबाचे चरणाविना दुसरे जाणत नाही. येक

---

१ = हक्कदार किंवा कामदार नव्हत असे कांहीं वतनदार, गांवांत जुने.

साहेबाचे चरण किंवा राजश्री सेनासाहेबसुभा सरसुभेदार यासिवाये दुसरेकडे कागदपत्र आगर संधान कांही दखल नाही अगर करणार नाही सदरहू सेवेसी विनंती पनालेस लिहून दिल्हे यासी अंतर करू तरी आपले मातेपितेची व कुलश्वामीची व श्री + माची व आपले लेकराची शपथ आसे तेरीख २ माहे जमादिलावल सेवेसी लेहून दिल्हा आपले आत्मसंतोषे कबुलकतबा सही सदरहू बेलभंडारसहित पत्र लिहून दिल्हे सही नावनिसी हजीर.

लेखांक ७० तारीख ६-५-१७८१

श्री रामचंद्र प्र॥

अ. नं. ८०

श्रीमन्माहराजेश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सुबराव घोरपडे कृतानेक सेवेसी विज्ञापना विनंती येथील वर्तमान वैशाख शुद्ध त्रयोदसी रविवार पर्यंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी कृपालु होऊन आज्ञापत्र पाठविल ते सिरसा वंदून सनाथ जाहलो तेथ वाडीकर गडकरी यानी स्वामीचे सेवेसी अमर्यादा वर्तणूक केली तेविसीची तपसिले आज्ञा जाहली ती प्रमानच आहे परंतु दिवसावरी नजर देऊन कोणत्याही आर्थे माहस्थल स्वामीचे स्वामीस हस्तगत होय तो अर्थ अविलंबे सर्व प्रकारे करावा दिवस कोणे रीतीच सेजार बलोतर आणि अविवेकी किंचित उण पडस पाहून हस्तगत करावे याजपरती दुसरी आस्ता आहोरात्र ज्यास नाहीच त्यासी सहवास त्यात स्वामीचे पुण्ये विचित्र आहे. सर्वही पराभव होईलच परंतु त्यासही दीर्घप्रयत्न असावा आजीपावेतो ज्याणी अमर्यादा वर्तणूक केली त्याचा परिनाम काय जाहाला तोच विभाग सांप्रत करणारास आहे आज्ञप्रमान किलेकरास पत्रे पाठऊन तिकडील उत्तर आली तीच सेवेसी पाठविली आहेत ती अवलोकनात आणून आज्ञा करण ती करावी सेवकास स्वामीच आज्ञपरती दुसरी जोड नाही स्वामीनी यत्न आरंभिलाच आहे त्याच यत्न करून दिवसगती न लागता हस्तगत होईस असलिया अविलंबे करावे तेणकरून सर्वत्रास संतोस आहे त्यास चार दिवस अदिक लागस असलिया विवेक करून स्थल हाताखाली लेवकर अनावा स्थलकरी सर्वप्रकार त्रासल आहेत आणि धास्त मोठी त्यानी घेतली आहे याजउपरी स्वामी प्रानानसी सोडीत नाहीत हे पुर्ते त्याचे उमजणेत आले आहे त्याजमुल अन्नवस्त्र व तसदी पोहचली नाही.

तोच येकादे अश्रयास लागावयाचा निछैये केला आहे अन्नवस्त्र किती दिवसाच असल नसल हे स्वामीच स्वामींस ठाऊक असल तसदीचाही प्रकार स्वामीचे लक्ष्यात असल त्याप्रमान आज्ञा करावी. सेवकाकड नाकाबिली ठरावलेस सेवक पदरीचाच आहे परंतु आजीचे प्रसंगास आग्रहवरी न पाडिता अविलंबे करून जे म्हणतील ती विनंती मान्ये सर्वप्रकार करावी आणि जागा हाताखाली घ्यावा पुडचेपुडे कलल त्या रीतीन करावयास स्वामीस काही अगाद नाही येविसीच सविस्तर राजश्री येशेवंतराव सिंदे सेना-साहेबसुभा सरसुबेदार मामा यासी लिहिले आहे ते स्वामीचे सेवेसी विनंती करितील त्याजवरून निवेदन होईल सेवकास स्वामीचे पायापरती दुसरी जोड नाही कोणताही अर्ज करणे नाही स्वामी कृपा करून देतील ते घेणार आणि सांगितली सेवा करावी याज-परती इछा दुसरी नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पौ छ १४ माहे जालेवल

सन इहिदे समानीन.

लेखांक ७१

पौ तारीख ८-५-१७८१

श्री

अ. नं. ८७

पुण्यसील मातुश्री लक्ष्मीबाई घोरपडे

यासी प्रति

स्नेहपूर्वक समस्त गडकरी लोक किले भूदरगड कृतानेक विनंती येथील क्षेम जाणोन स्वकीये लिहित आसिले पाहिजे विशेष आपण बहुता दिवसी स्मरणपूर्वक पत्रे पाठविली ती पाऊन बहुत संतोष जाहाला येसेच निरंतर पत्र पाठवून संतोषवीत असिले पाहिजे तदनंतर किलेचा मजकुर यैश्या गोष्टी घडल्या येणेकरून पुरातन जितके आहेत तितकेस बटा आला सर्वप्रकारे धणियाचे पायेजवल होऊन त्याची कृपा तुमचे ठाई होऊन सर्वत्राचा कालोकीचा डाग उडतो अर्थ करावा तुम्हास सांगणार अगर बुध देणार बहुत मिलाले आहेत परंतु निस्तरणे तुमचेच माथा आहे यैसे कितेक तपसिले लिहिले आशास ज्या गोष्टी जाहाल्या त्या आपणास परभारे यैकणेत आल्याच आसतील बहुता प्रकारे त्रासाते पावलो यामुले आम्हाकडून जी गोष्ट घडावयाची ती घडली, आम्ही धण्याचे पुरातन सेवक आम्हापासून जरी अंतर पडले तरी धण्यानी माफ करून पोटासी धरावे ते न करिता अवकृपा करून फौज रवाना करून गावगना जप्ती करून प्रांत उज्याड केला घरे-दारे व गवते कवले रानमाल डोंगर कणगर देखील कुली जाळून सत्यानास केला तो कांही पत्री लिहिता पूर्वत नाही आम्ही सेतभाते लोक प्रांत उज्याड जाहाला तेव्हा आमची नांदणूक राहिली सेवकपणाचे विचारे म्हणावे तर पायाचे नखापासून डोईचे केशपर्य आन्याईच आहो हातीस वोढा म्हणावयास सामर्थ्य कोणास आहे? आम्हास चौकडून

न समजता बटाच लावितात बहुत उतम बट्यायोग्य कांही आलपे घडले नाही हा काल-पर्यंत इमान साबूत राखले आहे राजश्री नरसिंगराव सिंदे बापू यास किलेस आणिले म्हणून बेनवा जाहालो नाही परराज्यातील कोणी किलेवरी आले आसते तरी सहजच बद्‌ल येता हे आपणास न समजेसे नाही आपण राज्यातील श्रेष्ठ आणि पूर्वश्रेहीत वडिला-दारभ्य हरयेकविसी ममताभिवृध्धी चालत आली त्याचप्रमाणे पुढे आपण ममता चालवावी हे आपणास विहित आहे आम्ही धण्याचे आवकृपेमुले संकटी आहो येविसीची देशांदेसी ध्यानी आणोन धण्याची कृपा होय आणि आपणास यश येई यैसे आसलिया आपणा-सिवाये काये आहे? येविसी अधिकोतर ल्यावेसे नाही. कलले पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनंती.

पौ छ १३ माहे जालोवल

सन इहिदे समानेन.

तारीख ११-६-१७८१

लेखांक ७२

श्री गणपती

अ. नं. ८९

श्रीमत महाराज राजश्री छत्रपति

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक परशराम रामचंद्र कृतानेक विज्ञापना स्वामीचे कृपावलोकने करून तागायत छ १८ जमादिलाकर पर्यंत सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनी जेष्ठ शुध्ध दशमीचे आज्ञापत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन बहुत संतोष जाहाला पत्री आज्ञा जे किले भुदरगडकरी याणी आमर्याद वर्तणूक केली त्यास राजश्री अंताजी शामजी वगैरे सामील होऊन बखेडा करितात येविसीचे बंदोबस्त व्हावा म्हणोन आज्ञा यैशीयास येत-द्रिषइचा मजकूर सविस्तर राजश्री बाल जोसीराव यासी बोलिलो आहो ते सेवेसी लिहितील त्यावरून विदित होईल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

तारीख १५-७-१७८१

लेखांक ७३

श्री

अ. नं. ८१

यादी राजमंडलाकडून करार होऊन यावयाची कलमे सुहूर सन इहिदे समानीन मय व अलफ

"हे विज्ञापना" व मथळा "श्री गणपती" हीं अक्षरें लेखक परशराम रामचंद्र पटवर्धन यांच्या हातचीं आहेत.

मातुश्री आनुबाई याची वतने
वगैरे पेशजी प्रो चालवावे

कलम
१

पेशजी वैवाट चालत आली
आहे त्याप्रो आज्ञा करून चालल करार.

चिकोडीकर व कागलकर
जमीदार याची वतने आहेत
ती पुरातन प्रमाणे चालवावी.

कलम
१

कागलकर जमीदार याचे वतन
पेशजी वैवाटी चालत आली
आहे त्या प्रो आज्ञा करून
चालल. चिकोडीकर याणी
आजीपर्यंत राज्यासी आपाय
करीत आले हाली किले भूदरगड
येथे फितूर केला आहे तेव्हा
त्याचे वतन चालणार नाही.
करार

सिवाजी भोसले यास उपद्रव
न व्हावा

कलम
१

त्याणी स्वामीच्या चरणासी
वर्तणूक अमर्यादा करू नये अगर
स्वामीच्या पायासी व रा-
ज्याविसी दुष्टबुधी धरतील
त्याचे मिलणीत मिलोन
गैरवर्तणूक करू नये आणि
लांडीलबाडी फितूरफांद्डा
करू नये म्हणिजे यास उपद्रव
होणार नाही.

करार

कसबे सिरोल व आकीवाट येथे
देवास व ब्राम्हणास जमीन
सवादोन चावर दिली आहे
ती चालवावी

कलम
१

श्रीदेवास जमीन दिल्ही आहे
ती आज्ञा करून चालविली
जाईल ब्राम्हणाचे जमिनीविसी
राजश्री बाल जोसीराव व
सिवराव या उभयेतास आज्ञा
केली आहे. करार.

राणोजी घोरपडे सेनापति
याचे चालवावे

कलम
१

त्याणी स्वामीचे पायासी
येकनिष्ठेन वर्तणूक केलिया
त्याचे चालविले जाईल.

कैलासवासी नारायणराव प्रधान
याचेवेलेस यादी सन सलास
सबैनात ठरली आहे त्याप्रो
उभयपक्षी चालावे. त्यापैकी
व हाली
१ येकसंबे
१ भोज
१ बोरगाव
१ राजापूर
१ वालवे
२ लाट व रांगोली
१ दटवाड
३ खालसाकडे देहे

१.................................
१.................................
१.................................
——
३
——
११
हाली कराराप्रमाणे चालल

येकूुन सदरहू कलमे साहा आसेत.

सदरहू प्र॥ यादी परशराम रामचंद्र याजकडून आली त्याजवरी सदरहू प्रो मखलासी[1] मात्र करून राजश्री सेनासाहेब सुभे सरसुभेदार याजकडे करवीरास पा॥ असे. छ २२ माहे रजब सन इसने समानीन.

लेखांक ७४

पौ तारीख ३–११–१७८१

तालीक खत फिरंग

अ. नं. ५२

अजम यशवंतराव सिंदे सेनासुभासाहेब व सरसुभेदार सलतनत

माहाराज सिवाजी राजे छत्रपति दाम मोहबत हू

शाहामत व मुवदत दस्तगाह अजी यरीक कार्ले येरिक ब्रिगेदर जनराल फौजानी शेनाहजरत बादशाही पुर्तुगाल व सरसुभेदार अज सरकार गोवा............ मोहिबी किताबत पाठविली पोहचोन मोहिब खुब हयातीने आहा म्हणोन निशा कलोन आलेवरून खुशाली हासील जाहाली सदरहू किताबतीत कल्मी केले कीं सरदेसाई खेम सांवत भोसले फितूर होऊन माहाराज सिवाजी राजे यावर समशेर धरणेचा जुल्म करून रांगणेस महासिरा केला अशास हे बातमी गोधर इज्यानीबास कललीच होती मारनिले माहाराजाचा आश्रा भोगणेस अयोग्य सबब त्यास जोर नतीजा द्यावा हेच युक्त आहे राजश्री विठल गोविंद येथे पावताच इज्यानीबास जबानी सांगायचे सांगोन यकबाल व इजलाल पनाह गोवरंदोर कपिता व जनराल साहेबाची मुलाजमत हासील केली त्याणी मजमून ध्यानात आणोन माहाराजास जवाब देखील मशारनिलेनी मुदेदाखल केलेस दिल्हा त्यावरून मोहिबास सर्व माल्म होईल सर्वदा तुमचे खुषीचे काजकाम असेल तेथ इज्यानीबाचे दोस्तीचा निशा दाविला जाईल खुदायताला मोहिबास रखोनिविस्तन गोवा व तारीख १६ माहे वेतुब्र सन १७८१

येरीक कार्ले येरीक

छ १६ जिल्काद कार्तिक वद्य
त्रितीया मु॥ किले पनाला
सन इसने समानीन.

---

१ = साफसुफी, सारवासारव, मल्लीनाथी.

लेखांक ७५ तारीख १४-११-१७८१

श्री

रु. नं. १

अ. नं. ९३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०८ प्लवनाम संवत्सरे कार्तिक बहुल चतुर्दसी सोम्यवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी समस्त राजकार्य शेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री यसवंतराव सिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार यासी आज्ञा केली ऐसीजे आपण विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ठ होऊन साद्यंत निवेदन जाहाले पुण्यसील राजसबाई भोसली खानवटकर त्याची मुले व समुदायसहवर्तमान करवीरा आली म्हणोन विनंती लिहिली अशास त्यानी यावयाचे कारणच नाही असे असता आली त्यास राजसबाई व त्याची मुले व समुदायसुधा बराबर लोक देऊन वारणापार करून देणे हुजूरूनही हुजरे आज्ञा करून वारणापार करून देणेविसी पाठविले आहेत तरी त्यास स्पट सांगणे जे याउपरी यावयाचे कराल तर स्वामीचे कार्यास येणार नाही याप्रमाणे आपण त्यास ताकीद करून वारणापार करून देणे येविसी क्षणाचा विलंब न करणे अशास पेशजी आपण विनंती केली ते समयी रुबरू जी आज्ञा करणे ती केली आणि आपण विनंती केली येविसीची ऐसे असता आपण आधी त्यास वारणापार करून देऊन उप्रांत विनंतीपत्र पाटवावे असे न होता तपसिले विनंती लिहिली हेच अपूर्व येविसी विस्तार आज्ञा करून कळवावेसे नाही येविसी कृष्णाजी गाईकवाड आज्ञेप्रमाणे सांगता कळेल जाणिजे बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा शिक्याचे मार्तब जोडबंधासुद्धा दोन असेत व दोनबार असेत छ १ जिल्हेज इसने समानीन.

(ता. १८-११-१७८१)

लेखांक ७६ तारीख १५-११-१७८१

तालीक खत फिरंग

अ. नं. ५३

अजम येशवंतराव सिंदे सेना महाराज छत्रपति सुभा व सरसुभेदार
दाम मोहबत दोल्त हू

शाहामत व मुवदत व हशमत दस्तगाह मोहिबाकडील किताबत खुशीने मान्य करोन यकबाल व इजलाल पनाह गोवरनदोर कपिता व जनराल साहेबास माहाराज छत्रपतीकडील किताबती व सदरहू जाहीर करिता कुलमजकुराचा साहेबी जवाबसाल केला असे भोसलेनी आज आठ माहे परियत बुलंद किला रांगणेस माहासिरा करून वेढा बसविला असता माहाराजानी आजी लग आपणाकडील फौजा पाठऊन गनीमास उठवीत

नाहीत याचे ताअजुब दिसोन येत सिंधुदुर्गास माहाराजाकडील सबल आरमार असताना
कडील तरांडी स्वारीस निघाली असेत त्यासही हाती न देता
कडोन कुमक व्हावा यैसेच लिहितात त्यास सदरहू जंग दुशमनावरी इस्तादाने जाहले
शमशेर धरोन त्याजकडील ठाणी माहाल काबीज करोन आजोन मसलहत चालवीत असता
आणिक आपणास काय तो कुमक करावा आसाहेबाने मजकूर इजत असार दादाजी
पांडुरंग जबानी सांगता मालूम होईल दराज काय लिहावे द्रुदायताअक मोहिबास रखो हे
निविस्तन गोवा व तारीख १५ माहे नोवेंब्रु सन १७८१

येरीक कार्ल येरीक

बाजे मरातीब कानो सारंग
जबानी सांगोन देईल.

लेखांक ७७

तारीख १५–११–१७८१

रु. नं. १
अ. नं. ५४

चिटणीसी दप्तर
तालीक खत फिरंग

अजम येशवंतराव सिंदे सेनासुभा माहाराज छत्रपति व सरसुभेदार दाम मोहबत व दौलत हू

शाहामत व मुवदत दस्तगाह फेलीसियान राम नोब्र मौराव कावाल्र
प्राफस नोवोर्देदकिस्त सक्रतर्य मकानी हाय
यकबाल व इजलाल पन्हा गोवर्नदोर ये कपिता व जनराल फेंदेरीक
नित्येर्क साहेबास मोहिबी किताबत पाठविली जाहीर करिता साहेबी तुम्हास जाब करणे
म्हणोन इजानेबास फर्माविले कीं तुम्हाकडील किताबत आवडीने मान्य करून त्यात
कलमी केले मजकुराचा जाब तर पेशजी केलाच असे त्या खेरीज कीं
महाराजास यकबाल पन्हाकडील भारी कुमक म्हणायास जगदुष्मन भोसला यासी तर
यकबाल पन्हा फौजा रवाना करून भांडत असेत सदरहू फौजा
तालुकचे सरहदीवर असेत त्यास तिकडून माहाराजानीही त्यावर लडावे म्हणजे
आपली कुदरत विभागायाची जरूर लागेल.
रांगणेचे किलेवरी बहुत वर्सास गला व जंगी सामानचा भरपूर साठा आहे यैस भोसलेनी
चोहीकडोन पुकारिले अस तेव्हा हजरत कडील कुमकीचा गरज नाही
माहाराजानी आपले अरमार पाठऊन जगदुषमनची गलबते नेस्तनाबूद करावी हे सजावार आहे हिकडोन चे अरमार यकबाल पन्हा पाठऊन सापडतील ते तरांडी
त्याकडील दस्त आणितील.
यकबाल व इजलाल पन्हा गोवर्नदोरय कपिता व जनराल साहेबाचे चितानरूप माहाराजानी
करायास मोहिबी आपणा तर्फेने कुमक करावा कीं माहाराजाकडील गलबतचे उमादारानी

नागावा केला तो माघारी देवविला पो (पाहिजे) येणेकरून दोस्तीचा निशा होऊन पुढा यखलासीची अफ़जुदगी होईल खुदायता आंक मोहिबास रखो हे नविस्तन गोवा ब तारीख छ १५ माहे नोवेंब्रुली सन १७८१

फिलसियान रामनोब्रमौराव

लेखांक ७८ तारीख १७–११–१७८१

अ. नं. ५५ तालीक खत फिरंग

इजतअसार अजम बाबूराव मालप
सुभेदार बंदर शिंधुदुर्ग सलम हू

फिलीशियान राम नोब्र मौराव कावालर प्राफस नोवोर्देद किस्त सक्रतार्य हजरत दादाजी पांडुरंग अज राजधानीहून निघोन जातेवख्ती तुम्हास कलमी केले जाते कीं यकबाल व इजलाल पन्हा गोवर्नदोर ये कपिता व जनराल साहेबी आं वालाशान शिवाजी राजे छत्रपति माहाराज याचे दोस्तीवरी नजर देऊन बंदर शिंधुदुर्गास मारनिल्हेस सरकार ज्याहाजबनाम रयालफिदे लिस्कयावर रवाना केला असे मारनिले अजशहरात होता तेव्हा यकबाल पन्हाकडून जो बहुमान पावला ते कुल मोहिबास जबानी सांगोन घेईल आं वालाशान माहाराजाचे किफायतीकारणे हजरत मध्ये व आं वालाशान माहाराजामध्ये येकरंग दोस्ती चालावी वाजीब असे म्हणोन मोहिब जाणतच आहेत त्यास उभयतर्फे दोस्तीचा खाबिता यथास्थित चालल्याने यकबाल व इजलाल पन्हा गोवर्नदोर कपिता व जनरालसाहेब संतोष पावतील व यकबाल पन्हाचा इरादा कीं माहाराजाचे अरमार व गलबते हजरत कडील तरांडीयास नागावा व लुटून आजतागायत करून अवमान व धोका दिल्हा तैसे न होये ऐस हुकूम आज्ञा रास माहाराजानी करणेस मोहिबी आपणा तर्फेने हुकूम केला पाहिजे यकबाल व इजलाल पन्हा साहेबी हजरत कडील भांडणी ज्याहाजास येकंदर आज्ञा केली असे की भोसले याची तरांडी दस्त करून हाती देणे परंतु ते बंदरचे सयाज प्रमाणे करणेस अजोन हुकूम दिल्हा नसे निशा असावा खुदायताला मोहिबास रखो हे नविस्तन गोवा तारीख १७ माहे नोवेंब्र सन १७८१

फिलीशीयान रामुसनोब्र मौरव

लेखांक ७९ तारीख १६–१२–१७८१

श्री

श्रीमन्माहाराज राजश्री छत्र
पतिसाहेबाचे सेवेसी

विनंती शेवक रघुनाथ बाजीराव कृतानेक विज्ञापना ता। छ ९ जिल्काद पर्यंत साहेबाचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष आपण पत्र पाठविले ते प्रविष्ट जाहाले बारभाईस शह द्यावयाचा व कुमकेस पलटणे पाठवावेयाचा मार लिहिला तो कलला त्यासी इकडील मार राजश्री सटवोजी भोसले साहेबास लिहितील याजवरून कलेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ८० तारीख २–१–१७८२

तालीक खत फिरंग

रु. नं. ४

अ. नं. ३१

शिवाजी राजे छत्रपति दौलत व कामया
ब बाआशंद

बिशियार राजे वालाशान आंकी आं वालाशान पन्हाची किताबत पोंहचोन दिल आराम जाहाला येखलासीची तरकी होणेचे वख्त हमेशा पैदा व्हावे हाच इरादा आहे सुलतानजी भोसला व जाणोजी भगम हुजरे यानी सनिधानी येऊन इजानेबाची मुलाजमत हासील केली त्यानी इलातीमाश केल्या सुणणेत आणिल्या आ वालाशान पन्हाकडील आदमी सबब बहुमान केला.

जंगी सामान जो कुली हुजरे मस्तुर याणी मागितला तो देणेचे फर्मावीले तो सामान घेऊन जाते.

जमावाचे कुमकेविसी फेर कलमी केले जाते कीं जगदुसमीन भोसला यास नतीजा देणेबदल पलटणे हजरत सरहदीवर नेमिले असेत म्हणजे गनीमाकडील कुदरुत विभागून कमी होते.

आ वालाशान पन्हाही त्यावर लडवावे उभय तर्फाकडोन तसदी लागल्याने सहजेच नेस्तनाबूत होईल गनीम मजकुराकडील तरांडी सांपडतील ते दस्त करणेबदल ज्याहजे फिरणेस रा केले.

हजरत चे आ वालाशान पन्हाकडील गलबताही नागावा नुकसान केले असे ते फारीग करवावे येसे च्याहते असो यावरून रयेतीची नफेबदल दोस्तीचा भारी जडाव होऊन येईल खुदायाताला आ वालाशान पन्हास आपले पन्हामध्ये खोहे

निविस्तन गोवा ब नो २ माहे जनेर सन १७८२

(१) खोहे निविस्तन गोवा

(२) दोफेदेरीक गील्येर्मदेसोज

लेखांक ८१ तारीख २-१-१७८२

तालीक खत फिरंग

रु. नं. ४

अ. नं. ३२

शिवाजी राजे छत्रपति दौलत व
कामयाब बाशंद

बिशियार राजेवालाशान फेलीसीयान रामनोब्र मौराव कावाल्यर प्राफस नोवोर्देंद क्रिस्त कोसेलेर व सक्रतार्य व आजीय पुर्तूगेष व दर मकानीहाय आ वालाशान पन्हाकडील इनायतनामा सादर जाहाला रसीद होऊन आ वालाशान पन्हाचे खुषखबर गोषगुजार होऊन बेशुमार फरहती दिल जाहाला

येकबाल व इजलाल पन्हाह गोवर्नदोर व कपिता व जेनराल साहेबास आ वालाशान पन्हाकडील किताबत जाहीर करिता साहेबी आ वालाशान पन्हाचे जवाबात आपणाकडील मनोदय दोस्तीचे अणाजुदगीचा कलमी केला असे तो कुली मजकूर मालूम होईल इजानेबास मवसार होईल ते बरहुकूम आं वालाशान पन्हास सन्मान आपणाकडून करणेचे कामास कोताई करणार नाहीत खुदायताला माहाराजास आपले पन्हामध्ये खोहे निविस्तन गोवा ब तो २ माहे जनेर सन १७८२
फेली सियान रामनौब्र मोरांव

लेखांक ८२ तारीख २-१-१७८२

रु. नं. ४

अ. नं. ३३

तालीक खत फिरंग

अजम येसवंतराव शिंदे सेनासुभा महाराज
छत्रपति व सरसुभेदार दाम महबत हू

शाहामत पन्हा मवदत दस्तगाहा........ फीलीशीयान रामुसनोब्र मोराव कोसल्येर व सकडतार व आजीय पुर्तीगश व दरमकानीहाय मोहिबाची किताबत पोहचून आपणाकडील खुष्रीचे वर्तमान आमलांत येऊन खुशाली हासील जाहली येकबाल व इजलाल पन्हा गोवर्णदोर व कपिता व जनराल साहेबी माहाराजाचे दोस्तीलायक जवाब त्यास पाटविला असे मा हुजरे त्यास मलाजमत देऊन त्यानी इलतीमास केले प्रमाणे जंगी सामान त्यासी देणेचे फर्माविले

जगदुशमीन भोसला याची कुदरुत कमी होणे बदल कडील लष्कर सरहदीवर येकबाल पन्हा साहेबी नेमिले हे मसलतीवरून माहाराजास भारी कुमक होतो की गनीम उभय तरफाकडून तसदी पोहचता येकंदर नेस्तनाबूद होईल.

दोस्तीचा कराननिशा करणेस माहाराजाकडील गलबताही अज हजरत चे तरांडीयास नागावा नुकसान केले असे ते कुली फारीग करणेस मोहिबी आपणाकडून कुमक केला पाहिजे खुदायताला मोहिबास खोहे निविस्तन गोवा तहरीख २ माहे जानेर सन १७८२

फिलीशियान रामुसनोव्रमोराव

लेखांक ८३ तारीख ३–१–१७८२

रु. नं. ४

अ. नं. ३४

तालीक खत फिरंग

आजम येशवंतराव शिंदे सेनासुभा माहाराज छत्र-
पति व सरसुभेदार दाम महबत हू

शाहामत व मवदत व हशमत दस्तगाह········· येरीक कार्ल येरीक ब्रिगादेर जनराल ईकातेरीया दोईस्ताद गोवा दि हजरत राणीसाहेब पुर्तीगाल सलाम बादज सलाम महवल मकसुद आंकी मोहिबी किताबत पाटविली पोहचून कल्मी केला मजकूर अमलात येऊन दिल आराम जाहाला त्यात लिहिले प्रमाणे इजानेबी आपणाकडून कुमक करायाचा केला सांवत भोसलेचे मतलबविसी येकबाल व इजलाल पन्हा गोवर्नदोर व कपिता व जनराल साहेबी दृढनिश्चय आमलात आणिलेचा माहाराज छत्रपतीस जवाब जातो त्यावरून मोहिबास कळो येईल हमेशा आपणास खुशी देणेचे कामास येखलास दोस्ती तरकीयान दिल खुदायताल मोहिबीस रखोहे निवीस्तन गोवा ब तारीख ३ माहे जानेर सन १७८२

येरीक कार्ल येरीक

लेखांक ८४ पौ तारीख १२–२–१७८२

तालीक खत फिरंग

अ. नं. ५६

·········

शिवाजीराजे छत्रपति दौलत व
कामयाब बाआशंद

बिशीयार राजे वालाशान येखलासनामा दिल्हा रसीद होऊन आ वालाशान पन्हाची खुषी मालूम होऊन न्याहायत खुषी हासील जाहली हमेशा दुसमिनाकडोन ज्यस माहाराजानी जोडावे हाच इरादा असे.

आ वालाशान पन्हाही जगदुसमीनावर फौजा रा करून किला रांगणेचा शह दुराविलेची व परदेश मसलहत फर्माविलेची खबर गोष्रगुजार होऊन दिल आराम पोहचला हरामी पडोसी हा जुल्म आचरले खतबी होऊन सजावार आहे डिचोलीचे तलास इजानेबी आपणाकडोन फौजा नेमिले असेत व गनीमाचे सरहद्पासून फिरताहेत म्हणजे त्याकडील जमाव विभगोन कुदरुद[1] मोडत जाती आण आ वालाशान पन्हाचा इरादा इनसरामास पावतो वख्तानसार फिसात त्यास होईल येणे करून आ वालाशान पन्हास इजानेबाकडील आपणाविसी कैसे मानस तो खातीरजमा होऊन येईल खुदायताला आ वालाशान पन्हास आपले पन्हामधे रखोहे निविस्तीन गोवा ब तारीख १ माहे फेवरेर सन १७८२

दोंफेदेरी कगीलयेमंदेसोज

पो छ २८ माहे सफर

सुा इसने समानीन

मया व अलफ मुकाम करवीर.

लेखांक ८५ तारीख १२-३-१७८२

श्री

रु. नं. १

अ. नं. ६०

श्रीमन्माहाराज राजश्री——— छत्रपति स्वामीसाहेब साहेबाचे शेवेशी

आज्ञाधारक राघो विठल सेवेशी विज्ञापणा विनंती प्रार्थना येसीजे ताा फाल्गुन बहुल १४ मुा लस्कर दर जागा नजीक चंदावर पावेतो माहाराजाचे कृपाआवलोकनेकडोन सेवकाचे वर्तमान येथास्थित असे साहेबाकडून आज्ञापत्र सादर होऊन सेवकाचा सांभाल होत नाही आज्ञापत्र सादर करून सेवकाचा सांभाल करणार धनी समर्थ आसा इकडील सेवेशी निवेदनार्थ विनंती हजरत नवाब बहादर साहेब भारी फौजेनसी आर्काट चेनापटन प्रांतास येऊन वेली म्हणोन फिरंगीयाचा मातबर सरदार भारी जमावानसी आला त्यास तमाम त्याचे फौजेसहित गारत करून मातबर सरदार व तोफखाना धान्ये सरंजाम पाडाव करून आर्काट वगैरे गड किला ठाणी घालून मुलिकाची बदोबस्ती केली इतकीयात बंगालेहून मातबर फिरंगी सरदार जपेतसुधा आले खबर येकोन आर्काटाहून सडे स्वारीनसी निघताच सरदार नामे फारारी होऊन गुंटूर नामे बंदर आहे तेथे आश्रा घेऊन बैसले आहेत करिता सरकारची फौज घेरून बैसले आहेत यामुले त्याच्या लष्करात दाणेचारेचा फार तुटारा होऊन रुपयेस

१ कुद्रत = शक्ति

सेर आनाज (अन्न) मिलत नाही करिता आजीज होऊन कितीयेक फरारी होऊन येत जातात यासिवाये सरकारचे स्वारानीही रोजचे वीस तीस फिरंगी व बारवालेस धरून आणित जातात थोडे रोजात त्यासही आजीज करून पारपत्य केले जाते या तपश्चर्येपुढा आजकाल या पृथवीवरी दुसरे कोणी यासमोर जयेप्रद होऊन जाईल म्हणावयाचे नाही जो इंग्रज सर्वांसे वरचड होता त्यास गरदीस मिळऊन उरले आहेत त्यासही काडोन आपोआप मरणेचा प्रेत्न केला येथील काम उरकोन सीघ्रच त्या प्रांतास खासा स्वारी फौज सुधा होत आहे सेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आसे सरकारात थैल्या व सेवकास आज्ञापत्रे आजवर न लिहिलेवरून सेवकास प्रकारांतर वाटले या ऊपरी तिकडील कैफीयेतस लिहून पाटवणेस लेखकास आज्ञा व्हावी यामुले घरोबेचा दंडक बिशेष होत जाईल राजश्री सटवोजीराव यासी रवाना केले आहे म्हणून साहेबी आज्ञापत्र सादर केले व त्यानी जमावनसी सत्वरच येतो म्हणऊन लिहिले परंतु आद्याप निदर्शनास आले नाही याउपरी जलद येऊन पोहचेसी आज्ञा केलिया उत्तम साहेबाकडून मातबर मनुष्य राहिल्यासारिखे होत आहे यामुले दोस्तीचे रोजबरोज तरकी होत जाईल याप्रमाणे हुजूरचेही थैल्या मुदाम जोडीबा आले आहेत ते मनास आणून सत्वर सटवोजीरावाची रवानगी होऊन सत्वर येऊन पोहचलेचे आज्ञा करणार धणीं मायबाप समर्थ असा वरकड तपसीलवार श्रीमंत राजश्री राव सेनासाहेब सुभा सरसुभेदार दादासाहेबाच्या पत्री विनंती लिहिली असे निवेदन करिता विदीत होईल. सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

पा छ २४ माहे जमादिलावल सुा इसने समानीन मया
व अलफ

(पा ता. ८–५–१७८२)

लेखांक ८६ पौ तारीख १२–४–१७८२

श्री शंकर

पा छ २८ राखर सन इसने समानेन
रु. नं. १
अ. नं. ६३ तालीक

श्रीमत राजेश्री यशवंतराव सिंदे सेना
साहेब सुभा सरसुभेदार गोसावी यास

अखंडित लक्ष्मी आलक्रुत राजमान्य श्री रावजी कासी आसीर्वाद विनंती ऊपरी येथील कुशल जाणून स्वानंद लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष आम्ही आपणापासून पत्रे व जोडी घेऊन स्वार जाहलो ते सुखरूप भागानगरी पावलो मार्गांत शरीरास सावकाश नव्हते म्हणोन भुमेमध्ये यक मास आठकाव पडला तदनंतर आलो मार्गांत

राजश्री कृष्णराऊ बलालही जाबसाल कांहीं श्रीमंताकडून करावयानिमित्य आले भेट जाली येथे आल्यावर आपली पत्रे उभयता श्रीमंत राजे दयानवंत राये रायाबहादर व राजे अमाबत रामजी यास प्रविष्ट केली व खलिते श्रीमत् माहाराज साहेबाचा व आपला नबाब साहेबास गुजरानिले वर्तमानही आपण स्वमुखे आज्ञा केली होती तितका ध्यानारूढ उभयताचे लोक त्यानीही आपले पत्राची पारसी करून हजूर नबाबास गुजरानिला मुख्याचेही ध्यानारुढ जाला तदनंतर मुख्यासी व राजश्री कृष्ण रावजीसी जो साहा साल पंतप्रधानाकडील चौथाई व सरदेशमुखी बाबती अमल जप्ती केली होती त्याचा अड च्यार महिने पावेतो पडला कोन्हे प्रारे याचे त्याचे रहश्य न पडे आपलेकडील त्यास सांगणे रहस्यायोग जाल्या त्याजला सांगणे होते त्यास कांहींयेक राजश्री कृष्ण रावजीनी पुण्यास लिहिले नवाब साहेबाची मरजी रक्षले तर जैशे हे प्रसतूत आज्ञा करितात ते यैकावे त्याजवरून तेथीलही आज्ञा आली लक्ष्या दोन लक्ष्याची नुकसानी जाली ती कबुल करणे आणि काम करणे त्याजवरून मामलीयती बंद केल्या त्या चौथाई येवज तहकूब ठेऊन मामलती जारी केल्या चिठी यादी धन्यापुढे उभयताकडील अमीन माहालोमहाल फिरोन नवाब असफज्याचे समई चौथाई व सरदेशमुखी बाबती ज्या वहिवाटी होत्या त्याजप्रमाणे पैसा घेत जावा याजमध्ये जिकडे पैसा अधिक गेला त्यानी मजरा घ्यावा येसा तह जाला मामलती मुलकाच्या ज्यारी केल्या परंतु हे गोष्ट चितशुद्धीतेची नाही घडली परस्परे चितांत मल्मलच राहिली पुढे कांहीं सांगणे च्यार अगत्यवाद इकडील च्यार त्याज

(पुढील बंद नाही)

लेखांक ८७ तारीख १६–४–१७८२

अनु. नं. ६४

श्रीशंभू

श्रीमान माहराज राजश्री छत्रपति

स्वामीचे शेवेसी

शेवक खेम सांवत भोसले सरदेसाई पा। कुडाल व माहालनिहाय विज्ञापना येथील कुशल तागाईत छ २ जमादिलावल जाणून स्वकीयस्थान लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष किले प्रसिध्धगड शेवकाकडील फौजेचा हर्षामर्ष जाहला याजकरिता हुजूरची फौज आली तन्मुले बहुतसा विकृत वाडली तेव्हा मध्येस्त राजेश्री आपाजीराव दि। राजश्री पंतप्रतिनिधि पडोन शेवकाकडील विवेक केला याउपर स्वामीच्या राज्याची व किले प्रसिध्धगड व किले मनोहरगड व किले भैरवगड व जंजिरे सिंधुदुर्ग वगैरे कोट किले स्वामीच्या राज्यातील याची हरयेकविसी शेवकाकडून उपसर्ग होणार नाही व प्रसिद्धगड व मनोहरगड व जंजिरे सिंधुदुर्ग तीन स्थळाचा तनखा पुरातन शेवकाकडील तालुकेत आहे तो पूर्वमर्यादेप्रमाणे किल्याचा किल्यास देऊ यात अंतर होणार नाही याखेरीज स्वामीच्या

राज्यासी व किले कोट व जंजिरे यासी दुष्टबुध्धी धरतील त्याचे मिळणीत भिळणार नाही हे चितांत द्दढ जाणून विनंती पत्र शेवेसी दिल्हे आहे यात शेवक अंतर करतील तर श्रीकुळस्वामीची व आपल्या स्वधर्माची शफत आहे. बहुत काय लिहिणे कृपालोभ असो दिला पाहिजे हे विज्ञापना.

पौ छ १२ जमादिलावल
सु॥ इसने समानेन मया
व अलफ.

लेखांक ८८ तारीख ३०–३–१७८३

श्री

रु. नं. १
अ. नं. ९५

पहिले यादीची तालीक

यादी कलमे येणे प्रमाणे निभाऊन यावी निसबत किले भुदरगड सु॥ सलास समानीन मया व आलफ

झाड पिछाडी होणे त्यासी हुजूर निसबत आमचे बोलणेतील माहित ग्रहस्त जे असतील ते यावे इकडून जे असतील ते यावे उभयपक्षी ग्रहस्त बैसोन झाडपछाडी बोलून बटा आहे नाही याचा ठराव जाहालेबिना निखालसता होणार नाही कलम

१

राजश्री नरसो शेषाद्री व रामचंद्र नारायण व अंताजी रघुनाथ याचे विद्यमाने फडशा होणे तो जहालाच आहे हुजूरने चिमणाजीपंत यानी येऊन मोजणी करून जमीन डोंगर काणगर गुरचार मालपड देखील एकदर मोजून जमीनी दुपट केल्या आहेत त्यास पेशजी ज्याचे जाग त्याजकडे भोगत आहेत त्या

दंगा जाहाले तागायत प्रांतात कुली उज्याड होऊन गडकरी लोकाची सेतेभाते अगदी पडली त्यामुळे दोन वर्षे खराबी जहाली पुढे शेते भाते लागून पोटभर अन्न व्हावे यासी आणखी दोन वर्षे पाहिजेत तेव्हा लोकाचे पोटाची बेगमी जहाली पाहिजे याची खातरजमा व्हावी······कलम

चौकशीमुले ज्याची सेते लागली असतील ती वजा करून ज्याची शेते लावणी न होता पडली असतील त्याची चौकशी करून लावणी होयेपर्यंत पोटास देणेविसी खातरजमा देविली जाईल.

कर्डा व सिब्रंदी आजीपर्यंत जाहाली असल ती वारून द्यावी. कलम

१

प्रमाणे चालावे पेशजी मोजणीचे
खर्डे पंत मशारनिले याणी हुजूर
नेहले आहेत ते रद्द होऊन पूर्ववत
प्रमाणे चालवे.........कलम १
कैलासवासी शककर्ते थोरले महा-
राजा पासोन शिवशाई दाखले
चालत आले असतील त्याची
चौकशी पाहून पूर्ववत ज्याचे त्या
प्रो चालविले जाईल मशारनिलेनी
मोजणीचे खर्डे केलेले तुम्ही विनंती
केली त्यावरून रद्द असेत
गावगना वतनदार दंगेमुळे खासगी
तनख्यात कांही आहेत कांही
किलेच्या आसऱ्यास आहेत कांही
परमुलकी गेले आहेत ते सर्वत्र येकत्र
होऊन त्यासी अभये देऊन पूर्ववत-
प्रो चालावे.........कलम १
त्यानी इमान पूर्वक सेवा करावी
फितुरेयांत न मिलवे आभेयपत्र
सादर होऊन पूर्ववत प्रो चाल-
विले जाईल दंगेचे पेबेस्तीपासोन
आजीपर्यंत किल्यावर आगर पेठत
व मुलुकी लूटलबाड जाहाली आहे
ती सर्व एकंदर माफ करावी. कलम
१

तुम्ही विनंती केलेवरून माफ केले
असे.
किलेच्या सरंजामाचे खेडी पेशजी
किलेकडे चालत होती तीमध्ये
घालमेल होऊन चालत नव्हती
त्यास अंताजीपंत वाकेनीस याचे
कारकीर्दीस किलेचे किल्कडे हुजूरून
करून देऊन सनदा करून दिल्या
त्यापैकी थोडीबहुत किलेकडे

यकंदर फडशात येईल पेठेतील उदमी
व गडकरी व गावगनाचे वतनदार
बंद धरून नेहून हुजूर अटकेत ठेविले
आहेत त्यास पैसा न देता सोडून
द्याव. कलम
१

तुम्ही विनंती केलेवरून गडकरी
व पेट मजकूरचे व किलेचे तनखेतील
हली तुम्ही विनंती केली यावरून
सोडून दिल्हे जातील गडकरी
लोकापैकी थोडबहुत लोकाची
वेतनाची कमभरती आहे त्याचे
जमिनीची भरती करून द्यावी
कलम १

लोकाचे वतनाची भरती करून
देणे म्हणून विनंती केली त्याची
पेशजी वतने कोणाकडील आहेत
त्याची चौकशी करून त्याची
त्यास द्यावयास येईल.
नरसिंगराव शिंदे याचे बोलणे व
करारा प्रो टराव व्हावा आणि
नेसरी व इनामं खासगी पूर्वी
कैलासवासी माहाराजापासोन
जिजाबाई साहेब पर्यंत चालत
आली ती याचे स्वाधीन निखालस
करून चालवावी.........कलम
येविसीची आज्ञा करणे ती राजश्री
नरसो शेषाद्री व रामचंद्र नारायेण
यासी केली आहे कासीबा घाटगे
सरदेसाई ता खानापूर हे वतन
समधे परागंदा जाहाले आहेत
त्यास पूर्ववत प्रमाणे वतनबाब व
गाव खेडे चालत होती त्याप्रो
त्याचे त्याजकडे चालवावे आणि

चाल्त आहे कांही चाल्त नाही
ती किलेचे किलेकडे करून देवावी
सनदा करून दिलाल्या किलेचे
हिशेबाचे रुमाल किले पनालेवरी
राहिले आहेत त्यात बजिनस
सनदा आहेत. ——————— कलम
१

कैलासवासी शककर्ते थोरले महा-
राजापासोन शिवशाई पदतपूर्वक
चालविले जाईल हिशेब कितेब
म्हणतील तरी दंगेचे गर्दीत वैवट
केली आहे त्यास्तव हिशेब किते-
ब न म्हणता सर्व माफ करावे.

म/१२७

कलम

तुम्ही हली विंनती केली त्यावरून
माफ केले असे.
कुसाजी नलगे व मुख्य मुख्य गडकरी
सांगतील त्याप्रो मुद्दे असतील ते
उलगुडून देणेचा करार पेशजी यादी-
त आहे व बोलणे आहे त्याप्रमाणे
ठराव व्हावा. ——————— कलम

पेशजीच्या कराराप्रो निभाऊन
दिल्हे जाईल.
किलेची वैवाट पूर्वी शिवशाई
तागायत कैसासवासी महाराजा-
पर्यंत व जिजाबाईसाहेबापर्यंत
ज्याप्रमाणे उभयपक्षीची वैवाट
चाल्त आला त्याप्रो चालावा
कैलासवासी शककर्ते थोरले माहा-
राज शिवशाई तागायत कैलासवासी
तीर्थस्वरूप माहाराजापर्यंत चाल्त
आले प्रो चालविले जाईल..............

अभयपत्र देऊन नांदनूक व्हावी-
सारखी करावी. ——————— कलम
१

हली चाल्त आल्याप्रो चालविले
जाईल.
दंगेत कोणकोणासी वचने दिल्ही
आहेत जे धनी आम्हावरी कृपाळु
होऊन आमचे कल्यान करतील ते
समई तुमचे उर्जित होईल म्हणून
वचन दिले आहे त्याप्रो करून
द्यावे. ——————— कलम
१

त्यानी स्वामीचे चरणापासी
येऊन एकनिष्ठ इमाने करून वर्तनूक
करावी त्याचे चालविले जाईल
तहाचा ठराव होऊन पूर्ववत प्रो
सर्व लोकाचा बचाव होऊन ठराव
जहालेस त्यातील ज्यास तेथे
निखालस राहाणेस न पुर्वे ते बाहेर
निघतील त्याचे मागील ज्याचे
जैसे वतन सरंजाम पूर्ववत प्रमाणे
असल त्याप्रो चालवावे व कुटुंबास
राहावयासी स्वरूपानसारे योग-
क्षेम चालेसारखा बंदोबस्ते करून
देऊन राहावयासी स्थळ द्यावे.

कलम
१

किलेवरी गडकरी लोक संतोषे कोण
राहातील त्याचे नेमनूक हर हुकूम
चालेल ज्यास न पुर्वे त्यानी
आपले आसामीवर कोणी दिलेस

किलेचा हिशेब पुढील वैवाटीचा किल्यास मामलेदार असल त्यानी किल्यास गुदरून घ्यावे जागा न न्याहावे जेथील तेथे पहावे............

कलम
१

कैलासवासी शककर्ते थोरले महाराजा पासोन शिवशाई दाखले प्रमाणे चालेल.

शिवशाई तैनाती हर हुकूमे नेमनूक चालविले जाईल.

गावगना तनख्यातील वैवाटी पेशजी चालत होती सांप्रत मनस्वी आकार करून त्रास दिला हाली पूर्ववत प्रो वैवाट चालवावी.—————— कलम १

पूर्वीपार आकाराबरहुकूम वेवाटून घ्यावयास येईल.

येकूण कलमे आठरा याचा फडशा व्हावा

येकून सदरहू कलमे आटरा छ २६ माहे रबिलाखर सदरहूप्रमाणे भूदरगडची यादी आली होती यावरी हुजूरूने मखलासी सदरहूअन्वये होवून मोर्तबे करून यादी राजश्री सेनासाहेबसुभा सरसुभेदार याजकडे दिल्ही करवीरास जाते समई.

लेखांक ८९

तारीख २५-४-१७८३

श्री

रु. नं. १
अ. नं. १००

यादी किले भुदरगडकरी लोक किलेखाली उतरतील त्यास गाव राहावयासी द्यावा तेथे मुले माणसेसुधा राहातील त्यास कुटुंबमाफक पोटास नेमून तेथेच द्यावे हुकेरी तालुका सुटले नंतर तालुकीयात राहावयासी जागा देऊ सदर नेमणुकेप्रमाणे पोटास देत जावे.

कलम १

गडकरीलोकानी हली हुजूर स्वामीचे सेवेसी येऊन जामिन खातरजमेचे देऊन जामिनकतबे प्रथक प्रथक व ईमानपत्रे लांडीलबाडी फितूर फांद + हीला हरकत करू नये याप्रमाणे लेहून द्यावे तदोतर च्यार महिने पोटास देणेविसी पूर्ववत प्रमाणे तूर्त राजश्री विठल शेषाद्री व रामचंद्र नारायण यासी आज्ञा जाहाली आहे आणि स्वामी आज्ञा करून ज्या गावी ठेवतील तेथे सुखवस्तूदाखल राहावे आणि गडकरी लोकानी स्वामीचे शेवेसी येऊन प्रथक प्रथक जामिनकतबे व इमानपत्रे लिहून द्यावी स्वामीचे आज्ञेप्रमाणे गडकरी लोकानी आज्ञा होईल तेथे शेवा करावी उपरांतीक पोटास पूर्ववत प्रो हुकेरी तालुका हुजूर सरकारात सुटलेनंतर तालुकेऐवजी उभयता मशारनुलेकडून आज्ञा करून देविले जाईल. सुा सलास समानेन मया आलफ छ २२ माहे जमादिलोवल.

लेखांक ९० तारीख ३०-११-१७८३

श्री

रु. नं. १

अ. नं. १८९

यादी शप्ती करविल्या नांवनिशीवार किले सामानगड
सुा आर्बा समानेन मया आलफ माहे मोहरम छ ५
रोज रविवार

मामलेदार व कारकून

किता
१ राजश्री जिवाशी केशव सुमंत सरसुभा
१ राजश्री जोत्याजी सालोखे हवलदार
१ राजश्री बाबूराव नलवडे सरनोबत
१ राजश्री भिमाजी गंगाधर
१ राजश्री नरसिंगराव सबनिवीस
१ राा बाजीराव बलाल
१ रा बालाजी गोविंद कारखानीस
१ गिरमाजी रामचंद्र फडनिवीस
१ नरसो रघुनाथ फडनिवीस
९

किता
१ रामचंद्र जिवाजी चिटणवीस
१ कृष्णाजी बलाल दप्तरदार
१ बाजी आपाजी दप्तरदार
१ मनोहर आपाजी दप्तरदार
१ जिवाजी शेषाद्री दप्तरदार
१ गोपाळ बापू कोटणीस
१ मांगजी मल्हार
१ व्यंकाजी रघुनाथ
१ जिवाशी जनार्धन
१ जोती सदाशिव
१०

आसामी १९

सभासद

किता
१ भिमराव नरसिंव्ह
१ गोविंद नारायण
१ व्यंकाजी गिरमाजी
३

किता
१ मोरो भगवंत
१ आंताजी आपाजी
२

आसामी ५

आश्रित

किता	किता
१ लिंगन भट	१ बाळंभट पुजेला
१ रघुनाथ भट	१ दशरथ भट
१ गुंड भट पुजेला	१ विठल भट पुराणीक
३	३

आसामी ६

आस्वारूढ------

किता	किता
१ खंडोजी रामोजी सिंदे	१ मानोजी सटवोजी लोंढे
१ आपाजी खलोजी माने	१ पिराजी भोवानजी सिंदे
१ जोती कुसाजी कदम	१ फिरंगोजी सिंदे
१ राणोजी माधवजी चव्हाण	१ हणमंतराव कदम
१ नरसोजी विठोजी जाधव	१ आणाजी उमाजी चव्हाण
१ सिदोजी बिन रघोजी कोरे	१ रावजी जाधव
१ मालोजी बिन भिमाजी शिंदे	१ जनकोजी
१ हणमाजी बिन भैरजी शिंदे	१ बालाजी आबाजी गरुड
१ सुभानजी चव्हाण	१ बालाजी गोंदजी चव्हाण
१ राणोजी जिवाजी चव्हाण	१ सुभानजी काटकर
१०	१ सुल्तानजी शिंदे
	११

आसामी २१

तट सरनोबत

किता	किता
१ गिरजोजी सिंदे	१ सुल्तानजी निकम
१ येसाजी रामोजी शिंदे	१ भैरजी निकम
१ गिरजोजी आबोळे	१ रावजी पोवार
१ देवजी कीरद्त	१ मसोजी बिरंजा
१ लक्ष्मण निकम	१ राणोजी भरमोजी भोसले
१ राणोजी दादजी भोसले	१ केदारजी बिरंजा

१ चिलोजी सुभानजी भोसले
१ केदारजी कापशा
१ येसाजी जोत्याजी शिंदे
१ बालोजी भिमाजी कदम
१ लिंगोजी सांवत
१ सुल्तानजी गंभीर
१ भिमाजी कोळीगडे
१ संताजी लोंढे
१ राणोजी पोळ
——
१९

१ येसाजी विचारे
१ सुभानजी भरमोजी चवाण
१ सुल्तानजी शेलार
१ भिमाजी बिरंजा
१ नारोजी महाडीक
१ राणोजी सुभानजी कदम
१ मानाजी सठवोजी भोसले
१ गवरोजी कदम
——
१४

पुा शप्ती करविल्या नांवनिशीवार किले
सामानगड सुा आर्बा समानेन मया व आलफ
माहे मोहरम छ ५ रोज रविवार तटसरहोबत
आसामी २९

बारगीर

किता
१ जानोजी नागोजी जाधव
१ संक्राजी गाईकवाड
१ चिलोजी खंडोजी भोसले
१ भिमाजी नरसोजी कोरे
१ राणोजी बिन खंडोजी लोंढे
१ रामजी भोसले
१ येलजी काटकर
१ भिमाजी विचारे
१ सटवोजी निंबालकर
——
९

किता
१ भिमाजी भोसले
१ व्यंकाजी महाडीक
१ गिरजोजी गोतीलकर
१ केरोजी पोवार
१ सकोजी लोंढे
१ पिराजी मोहिते
१ धोंडजी चवाण
१ सेट्याजी शिंदे
——
८

आसामी
१७

जथे नाईक

किता		किता	
१	सोमाजी नाईक आबोळे	१	मलारी मुरुकटा
१	शिवाजी आइकर	१	सिदोजी चंदोजी निकम
१	कृष्णाजी नाईक शिंदे	१	खलोजी नाईक चवाण
१	बाळोजी नाईक रेडेकर	१	चालोजी केदारजी मांगला
१	जिवाजी मांगला	१	चालोजी खलोजी कापसा
१	खलोजी नाईक माने	१	जिवाजी रामजी पोवार
१	भरमोजी नाईक चव्हाण	२	सुभानजी गंभी
१	रायाजी भोईबर	१	येसाजी गंभीर
१	गोपजी हणमंत शिंदे	१	पिराजी चवाण
१	सिदोजी	१	रानो भोसले
१	भिमाजी नाईक आईकर	१	येमाजी वेवडा
१	शेकोजी मान्या	१	आंबाजी गाईकवाड
१	तुकोजी भदरगा	१	येमाजी खाडा
१	केदारी खाडा	१	विरोजी हगवणा
१	भैरजी लिंगाजी भदरगा	१	जोती सिरका
१	बाबू घुगरा	१	राणोजी लाड
१	तुकोजी येलजी चवाण	१	मलारी कदम
१	भिमाजी नाईक कदम	१	नारायण जाधव
१	सुभानजी काजरा	१	येमाजी मांगला
१	बाबाजी आबाजी नाईक कदम	१	बालोजी गाईकवाड
१	माहदजी रामजी पोवार	१	लिंगोजी निकम
१	बालोजी रामजी कोरे	१	संताजी ढेंगा
१	भरमाजी खंडोजी कोरे	१	तुकाजी वाल्का
१	संताजी धावजी कदम	१	भैरजी द्वारकोजी जाधव
१	बालोजी हणमंत कापसा	१	भिमाजी खाडा
१	खलोजी हणमंता मांगला	१	लिंगोजी भदरगां
१	जोती विठोजी जाधव	१	जानोजी भैरजी जाधव
१	संगाणा कोरे	१	रखमाजी शिंदे
१	रामजी भिवगडा	१	केदारजी भांबर
१	केरोजी पोठ्या	१	भिमाजी रणदिया
१	संताजी गंगाजी नाईक राणा	१	यलापा कोरे
१	गोदजी रामाजी पोवार	१	चालोजी रामजी मांगला
१	मानाजी गोदजी बिरम	१	बालोजी भिवगुडा

१ भरमोजी नाबविल्कर
१ भरमोजी भोइवर
१ भिमाजी शेलार
१ भिमाजी कोंडजी टेहला
१ निंबाजी गाईकवाड
१ कृष्णाजी सूर्यवंशी
१ खिरोजी जाधव

४०

१ भिवाजी जाधव
१ सिदोजी बंक्या
१ वालोजी केरोजी कदम

३६

आसामी

७६

किता लोक आसामी

किता

१ खलोजी शिंदे
१ जनकोजी शिंदे
१ परलोजी आरबोळे
१ आपाजी भोसले
१ जंगली माने
१ भरमाणा निलजी

किता

१ गोविंद मांगला
१ मानोजी सिंत्रा
१ नरसोजी भोसले
१ हणमंत कुरळा
१ गोविद निंबाल्कर
१ रकमाजी रायकर

पु।। शप्ती करविल्या नांवनिशीवार किले
सामानगड सुा आर्बा समानेन मया व आलफ
माहे मोहरम छ ५ रोज रविवार कितालोक

१ भिमाजी महादजी चव्हाण
१ जोती भिमाजी आईकर
१ हुसेन भाई

९

१ सुलतानजी कदम
१ माहादाजी पोवार
१ तिप्पाजी भिमाजी आईकर

९

आसामी

१८

छेपेकरी आसामी

किता
१ भिकन भाई
१ फते भाई
१ हणमंत कोपडा
३

किता
१ कुसाजी भांबर
१ गोविंद टेबूलकर
१ गोविंद कुणक्या
३

आसामी
६

बाजेलोक आसामी

किता
१ नारोराम रक्तवान
१ जोती कर्णेकरी
१ रामाजी सिवार
१ बालोजी गोलंदाज
१ आपाजी लव्हार
१ भरमाना सोनार
१ मलारी भंडारी
१ महिपा मशालची
८

किता — नौबती
३ राजश्री सरसुभा निा
२ नौबती १ मशालची

३ राजश्री सबनिवीस निा
२ नौबती आ (आसामी)
१ मशालची
३
१ नाईकजी माधवजी राजेश्री हवलधार
१ गोविंद कापसा निा राजश्री
भिमाजी गंगाधर
२ रा बाबूराव सरनोबत निा
१ नौबती
१ मशालची
१०

आसामी
१८

पेठकरी आसामी

निा भीमनाईक
१ भीमनाईक
१ नरस नाईक कणगले
१ रा नाईक चिचवडे
१ भीम नाईक गीर नाईक

किता
१ संताजी तुकोजी जाधव
२ नागनाक हलगे
१ मल नाईक सिंग्या
१ हुलस्वार

१ वली नाईक हसूर
१ आपानाईक तुमज नाईक
१ खल नाईक नवेकाडे
१ खलोजी कोकीतकर
१ भीम नाईक धवडया
१ बाबू घेवडा
——
१०

१ बाल नाईक बेरड
——
६

आसामी
१६

तेरीज एकंदर आसामी
१९ मामलेदार व कारकून
५ सभासद
६ आश्रित
२१ आस्वारूढ
२९ तटसरनोबत
१७ बारगीर

७६ जथे नाईक
१८ किताल्रोक
६ छेपेकरी
१८ बाजेलोक
१६ पेटकरी लोक
——
२३१

लेखांक ९१ तारीख २९-३-१७८४

श्री गणपती

रु. नं. १

अ. नं. १०२

पौ छ ३० जावल आर्बा समानीन.

राजश्रियाविराजीत राजमान्य राजेश्री बाल जोसीराव व सिवराव स्वामींचे सेवेसी पो परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जावे विशेष श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधि याजकडील तालुक्यातील गावगनाचे पाटील कुलकर्णी व रयता पनाळ्यावर कैदेत आहेत त्याची मोकलीक करावी असा करार पेशजी ठरलाच आहे त्यास श्रीमंताकडील कारकून नांवनिसीवार याद घेऊन येतील त्याप्रमाणे कोण असतील त्याची चवकसी करून सोडून द्यावे रा छ ७ जादिलावल करार आहे तर दिकत न करिता वोली नेल्या आहेत त्या सोडून देणे.
ब्रहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ९२ तारीख १७-४-१७८४

श्री

रु. नं. १

अ. नं. १०३

यादी ऐवज भरणा मोकाम तासगांव राजश्री बाजी अनंत याजकडे दिल्हा राजश्री परशरामपंत भाऊ याजकडील बोलीच्या करारापौ देऊन पावती आलाहिदा मशारनिलेची पाठविली आहे सुा आर्बा समानीन मया अलफ छ २६ माहे जावल विा बो राजश्री गोपाळभट कवटेकर व बाबूराव धोंडदेव रुपये

२५००० विा राजश्री विठोबा नाईक नगदी भरणा ऐवज

१०७४२॥ विा राजश्री सखाराम नाईक वाडेकर याजकडून तपसील

६००० राजश्री कृष्णाजी कलेगीर याजकडील ऐवजी

४७४२॥. खुद नाईक मशारनिलेकडील ऐवज

———

१०७४२॥.

———

३५७४२॥.

येकूण पस्तीस हजार सातसेहे साडेबेचाळीस रुपये तासगावच्या मुकामी नकद पावित करून पावती पाठविली आहे त्याजवरून शेवेसी निवेदन होईल.

लेखांक ९३ तारीख १७-४-१७८४

श्री जगदंबा

रु. नं. १

अ. नं. १०४

पैवस छ. २९ जोवल आर्बा समानैन

(ता. २०-४-१७८४)

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामी यासी

आश्रितातरगत गोपाळभट कवटेकर कृतानेक आसीरवाद विज्ञापना ताा चैत्र बहुल त्रयोदसी मंदवासर पर्यंत मो तासगाव येथे स्वामीच्या कृपावलोकने अश्रिताचे वृत येथास्तित असे विज्ञापना ऐसीजे येथील वृत साकल्य राजश्री सरखवास बावा व राजश्री तात्याच्या पत्री लिहिले आहे मशारनिले विनंती करतील त्याजवरून ध्यानी येईल उदेक

रविवारी निघोन लस्करास जातो तिकडील बोलणे केलियानंतर सर्व मागाहून विनंतीपत्री विनंती लिहितो स्वामी कार्याविषयी आश्रिताकडून किमपि अंतर होणार नाही साभिमानी सर्वप्रकारे स्वामी धनी समर्थ आहेत विशेष विनंती करणे + + नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९४ माहे एप्रील इ. स. १७८४

श्री

रु. नं. १ छत्रपति

अ. नं. १०५

× × जावल अर्बा समानेन

राजश्री गुजाजी गायकवाड सरखवास यासी प्रति बाल जोसीराव आसीरवाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकुशल लिहीत असले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले ते पावले पत्री लिहिले जे राजश्री परशरामपंत याजकडून पत्र आले ते पाठविले आहे व याचे उत्तर लिहिणेचा मजकूर लि॥ तो कलला त्यास मशारनुलेस पाठवून देऊन कारकुनाची रवानगी केली परंतु आम्ही आलो ते समयी श्रीमन्महाराज राजश्री स्वामीचे शेवेसी विनंती केली होती जे + लीकडील पाटील गावकरी जे असतील त्याची मखलासी करून सो + + ते समयी राजश्री बाबाजीस आज्ञाही जाहाली होती परंतु अद्याप पाटील गेले नाहीत राजश्री प्रतिनिधीकडील कारकून साहा आसामीची याद घेऊन आला आहे आम्ही उत्तर दिले परंतु आणखी पत्रे येतील यास्तव जे पा असतील त्यास तस्ती करून च्यार रुपये घेऊन

× वर घालू नये खालचे उजुव खडकाच्या

इकाची पत्रे पाटविठी ती पाहिली राजश्री

भाऊसही आपणाकडे पा आहे दोनी पत्रे कागदाबरोबर पाटवून द्यावी त्यावरून सविस्तर मार कलेल बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे असीरवाद.

लेखांक ९५ तारीख १८-८-१७८४

रु. नं. १

अ. नं. ६९

माहाराजे — बुलंद दरजयी शिवाजी राजे छत्रपति दाम दौल्त हू अमारत व आयालत

दरिविला बालाजी विटल पारचे पाठविले ते पोहोचून मजमून मालूम जहाला कित्येक मरातब निघारष केला होता आणि बाळाजी

विठलच जबानी वरून मालूम जहाला त्यास येथून काय सांगणेच मशारनिले यास रुबरु सांगितले आहे त्यानी सांगितल्यावरून मालूम होईल मुख्यार्त इकडून होणेच साहित्यास प्रसंगी कसूर होणार नाही खातीरज काय वावे हमेशा आपणाकडील खुषखबर कलमी करीत असावे हल्लीचे   पारचे पाटविले आहे अजतः येकहुस घेतला पाहिजे ज्यादा लि।। काय अस रा।। छ. १ सवाल हे किताबत पौ. छ. १७ माहे जिल्काद सु।। खमस समानेन मया व अलफ मु।। किले पनाळा.

(पौ। ता. ३-१०-१७८४)

लेखांक ९६ तारीख १५-९-१७८४

हुजूर

रु. नं. ४ नकल

अ. नं. ४०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १११ क्रोधीनाम संवत्सरे आश्विन शुद्ध प्रतिपदा सौम्यवासरे क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी अजम कुमदान मु।। कितुर यासी फर्माविले ऐसेजे दरिवीला आं यकबाल मंदानी अर्जदास्त हुजूर माहाराजाचे खिदमतीमध्ये इरिसाल केली ती रसीद होऊन कलमी केला मुफसील मजमुन बयांवार जाहीर जाहाला व तहऊर व जलादत दस्तवार जाहीर जाहाला व तहऊर व जलादत दस्तगाहा अजम प्रीतराव चव्हाण हिमत बाहाद्दर यासी निगारीष केल्या बमोजीब रावमशारुनईले याणी हुजूर अर्ज केल्यावरून मनजुर जाहाले ये बाबेचा जो हुकूम फर्माविणे तो राव मशारुनइले यासी फर्माविला आहे मताबिक हुकूम आ यकबाल मंदास कलमी करितील त्यावरून माअलूम होईल जाणिजे रा।। छ २९ माहे शोवल.

लेखांक ९७ तारीख १७-४-१७८५

रु. नं. १

अ. नं. ६७

माहाराजे बुलंद दरजे शिवाजी राजे

छत्रपति दामदौलतहू अभारत व अयाल्त मर्तबत

उबहत माअली मजलत बादज इस्तिआक

येथील खुषी जाणोन आपली सादेमानी हमेशा कलमी करीत असल पाहिजे दिगर सटवाजी-राजे भोसले यांनी   सरकारास   आहेत आपल्या साहेब तर मालूमच आहे येथे बद्दल रघुनाथराव याजहमराहा तुळजापुरापावतो येथून तेथून माघार निघून गेले म्हण याजकरिता सरकार तर्फेचा कारकून रघुनाथराव सटवाजी भोसले याचे कोल्हापुरी अस मागून ठेविला आहे त्यास आपल्या जिमेस घेउन रघुनाथराव यास

हजूर पाठवी तैस कराव अगर सटवाजी
आणवून रघुनाथरावजीकडेस करावे रघुनाथरावास इकडे
रवाना केल पाहिजे हमेशा जादिया खबर कलमी करत असल पाहिजे
जीयाद काय लिा ह किताबत छ. ७ जमादिलाखर पौ छ. २० माहे जमादिलाखर सु॥
खमस समानेन मया व अलफ मु॥ किले पनाळा.
(पौ ता. ३०-४-१७८५)

लेखांक ९८ तारीख ४-५-१७८५

श्री

रु. नं. १

अ. नं. ७०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १११ विश्वावसुनाम संवत्सरे चैत्र बहुल दशमी सौम्य-वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजश्री कृष्णराव यासी आज्ञा केली यैसीजे तुम्हाकडून बहुत दिवस विनंतीपत्र येऊन साकल्य वर्तमान निवेदन होत नाही तरी येसे न करिता वरिचेवरी विनंतीपत्री साद्यंत अर्थ लेहून महाराजास संतोषावाप्ती होये ते करीत जाणे प्रस्तुत हुजूरुन राजश्री बाबूराव विठल व केदारजी माने व राघो विठल या हमराह फौज देऊन रवाना केले आहेत मशारुनईले यासी रुबरु महाराजानी कितेक मातबर कार्यभागाची आज्ञा करणे ते करून नवाब टिपूअलीखा बाहादर याकडेस पाटविले असेत आज्ञेप्रमाणे सविस्तर सांगता कलेल पूर्वीपासून इकडील साहित्य व अगत्यवाद व उमेद मसलहतीचे काजकामाचे करार दाद नवाब गुफरान पना-हानी कलमी करून दिल्हे आहेत ते सिद्धीस पोहचऊन देऊन त्याचे वचनाची उतीर्णता करणे हे नवाब बाहादराकडे आहे तरी तुम्ही त्यास प्रसंगोचित दर्शऊन महाराजाचे मनोदयाप्रा राज्योपयोगी कार्यभागाचे मतलब अविलंबे नवाब बहादराकडून हासील होऊन येत ते करणे वरकड आज्ञेप्रमाणे राजश्री नारो दत्तात्रय लिहितील त्यावरून कलेल.

लेखांक ९९ तारीख ३०-५-१७८५

हु०

रु. नं. ४

अ. नं. ३९

रफअत व अवली पन्हाह तहहू व जलादत दस्तगाह अजम बुहरहाणदीन
बाशद बाआदजा की अमारत व आयालत पनाई खान अजी
नबाब टिपू अलीखा बादर याची खाई चोकोसीस महाराजाचे राज्याचे तरकीबाबे अज बाद

अफजूद तर असोन एकलासमंदीची मोह कमी होण्याबाबत मशतूर तर असता आर-पअतपन्हाअस कलमी करून जाहीर करावयाचा बायस केला फिलहाल बाके फौज मसलहातीबा

माहाराजाचे हुजूर तालुके सरकार तोरगल व मनोली तालुका वगैरे ठाणी त्या प्रांतास फौजेचा हरज व तशवीष लष्कर न पोहोचवी याबद्दल.

लक्ष्मणराम शिंदे सेनाखासकील यानी आगाह अबदुल काजी सरकार तोरगल पनाहाकडे रवाना केले आहेत मुपसील जाहीर करतील त्यामफिक खातीरले आणून नवाब बहादर याचे एकलासीवरी नजर देऊन सरकार तालुके याचे प्रांतास हरज व तशवीष्र लष्कर न पोच करणे निपाणकरका जियादे काय कलमी करणे जाणिजे रवाना छ. २० माहे रजब.

याच्र प्रभा‌ण कमरदीनखान

सुर सन खमस समानीन मया व अलफ

लेखांक १००

तारीख ३०-५-१७८५

हु

रु. नं. ४

अ. नं. ३९ अ.

स्वस्ति श्री राज्याभिषक शके १११ विश्वावसुनाम सवत्सरे वैषाख बहुल सप्तमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी

अगाह अबदुल काजी सरकार तोरगल यासी फर्माविले जे राजश्री लक्ष्मणराव सिंदे सेना-खासकील यानी तुम्हास अजम बहादूर बोणखान व कमरुदीखान याकडे रवाना केले आहेत फिलबी हुजूर नही त्यास खत पत्रे सादर जाहालीं आहेत त्याती पोहोचू करून त्यातील मुफसील मजकूर आया करून अमारवाव आफलत पनाह खनअंजीमुष्रण टिपूअलीखा-बाहादर याचा एकलास व माहाराजाचे राज्याचे तर्कीबाबे कोषीस होण्याबाबती महशूर होऊन हुजूरचे तालुके सरकार तोरगल व मनोली तालुका वगैरे ठाणी व प्रांतास फौजेचा हरज व तषवीस लस्कर न पोहोच ते करवणे येबाबे सेनाखासकील मजकूरने कलमी करितां जाहीर होईल.

लेखांक १०१ तारीख १६-९-१७८५

श्री

रु. नं. १

अ. नं. १११

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११२ विश्वावसुनाम संवत्सरे भाद्रपद शुद्ध त्रयोदसी भ्रगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजश्री सेनाधर व सेनालेखक व संभारलेखक व अश्वारूढ सदरबारगीर व तटसरनोबत व नाईकवाडी व समस्त लोक गडकरी किले प्रसिधगड यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री येसाजी जिवाजी यासी किले मजकूरचे सबनिसीचे शेवेची आज्ञा करून मशारनिलेची मुतालकी राजश्री बचाजी अनंत यासी सांगितली आहे तरी आज्ञेप्रमाणे सबनिसीचे कामकाजाची वेवाट बच्याजी अनंत करतील माजीप्रमाणे सबनिसीचे वेतन सबनिवीस मशारनिल्हेकडे सालीना देविले असे देणे जाणिजे निर्देश समक्ष. मोर्तब.

लेखांक १०२ तारीख ५-१-१७८६

श्री वेंकटेश प्रसन्न

रु. नं. १ नक्कल

अ. नं. १०८

नमस्तुंग शिश्वुंबीछत्र चामरचारुचे त्रैलोक्य नगरारंभ
मूळ स्तंभाय शंभवे ॥

॥ १ ॥ स्वति श्री नृपशालीवाहन शके १७०७
वर्षेविश्वासुनाम संवत्सरे पौष्य शुद्ध ५ भ्रगुवासरे
तदिनिवेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री चिंतामण
भट्ट पिता हरभट्ट उपनाम फाटक गोत्र कौशिक सूत्र
आश्वलायन वास्तव्य मलकापूर प्रांत विशाळगड
स्वामीचे शेवेसी---

विद्यार्थी लक्ष्मणराव सिंदे सेनाखासकील तालुका सुभा मनोली दंडवत विज्ञापना सुा सीत समानीन मया व अलफ लिहून दिल दानपत्र ऐसीजे तुम्ही थोर ब्राम्हण सत्पात्र कुटुंबवत्सल बहुत दिवस श्रीमन्महाराज धनीसाहेब याचे राज्यास व दौलतीस अभिष्ट चिंतून होता तुमचा योगक्षेम चाललेस परम श्रेयस्कर जाणोन तुम्हास प्रा मुरगोड येथील खासगत जमीन पैकी इनाम जमीन रेगड करार करून दिली असे गावगन्ना बी तपसील

..।।. का मुरगोड पैकी कर्ते नरोजी जाधव बाबत जमीन अर्धा चावर बिजवरी महाल मापे ८१ कैली एक मण पट्टी पूर्वपश्चिम

..।।. मौजे हारगोप पैकी जमीन अर्धा चावर बिजवरी माहाल मापे कैली १ एक मण कर्ने

१

येकूण जमीन येक चाऊर स्वस्ताजलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित धारादत्त दिल्ही असे सदरहू जमीन पुत्रपौत्रादि वंशपरंपरा आचंद्रालोआनभऊन राज्यास व दौलतीस कल्याण चिंतून सुखरूप असावे इनाम सेत चालवणेस अंतर येणार नाही अण्यत्र कोणी इस्कील करील त्यास यतद्विषयी श्लोक

स्वदत्ताद्द्विगुणं पुण्यंपरदत्तानुपालनं ॥
परदत्तापहरणे स्वदत्तं निष्फलंभवेत ॥ १ ॥
स्वदत्तं परदत्तंवा योहरेश्चव सुधरा ॥
षष्टि वर्षे सहस्राणी विष्टायां जायते कृमी ॥ २ ॥

याचा अर्थ समजून सर्वत्र चालवितील येविसी चालवणेस इस्कील करतील त्यास शफत असे लिहून दिले दानपत्र सही तेरीख छ ४ माहे रावल मोर्तब सुद्र.

लेखांक १०३ तारीख ९–३–१७८६

हुजूर

रु. नं. ४

अ. नं. ४९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११२ विश्वावसुनाम संवत्सरे फाल्गुन शुध्ध दशमी गुरुवासरे क्षत्रिय कुंलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी
आगाह अब्दुल काजी सरकार तोरगल फर्मावि‌ले जे तुम्हाकडून यअतीकादनामा ईरसाल होऊन बयावार कैफीयत माहाराजाचे खिदमतीमध्ये इजहार होत नसे तरी पैदरपै अर्जदास्त इब्लाग करून मुफसील मजमून जाहीर होये ते करणे मनोलीस बार फिरस्ताद केले आहेत ते वापस माघारी घेऊन जाणेबाबे व किले तोरगल व मनोली प्रांत सुधा या हरदू ताअलुकीयास हरयेक बाबेचा हरज व फौजेची तशवीश न पोहचावी येबाबे शाहामत पनाह बुरानदीनखा यास खतपत्रे हुजूरून सादीर फर्माविली असेत बंदा मोजीब तुम्ही बुराणदीनखा यांस माकूल करून सांगोन मताबिक इरषाद हरदू ताअलुकीयास हरज व तषवियात न पोहचे ते करणे. जाणिजे रवाना छ ९ माहे जमादिलावल.

लेखांक १०४ तारीख २२-४-१७८७

श्री

रु. नं. १

अ. नं. ११४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११३ प्लवंगनाम संवत्सरे वैशाख शुद्ध पंचमी भानुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी ५

वेदशास्त्रसंपन्न राजश्री रामचंद्र पंडित व नारायण पंडित व वासुदेव पंडित गोत्र कृष्णात्री सूत्र कात्यायन शाखा वाजसनी उपनाम देव वास्तव्य क्षेत्र नरसिहपूर यासी दिल्हे इनामपत्र ऐसाजे तुम्ही बहुत थोर सत्पात्र विद्यासंपन्न तुमच्या योगक्षमाची अनुकूलता करून दिल्हीयानें माहाराजास श्रेयस्कर जाणोन तुम्हास नूतन इनाम कुलबाब कुलकानु हली पटी व पेस्तर पट्टी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहीत खेरीज हकदार व इनामदार करून मौजे वळीवडे र्फ हवेली कोल्हापूर हा गाव देह रास येक इनाम सर्वमान्य अजरामऱ्हामत करार करून दिला असे तरी तुम्ही सदरहू मौज मजकूर पूर्व मर्यादेप्रमाणे चतुःसीमापूर्वक आपले स्वाधीन करून घेणे आण इनाम तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आणभऊन सुखरूप राहाणे सदरहू इनामास कोणी इस्कील करील त्यासी धर्मशास्त्र वचन स्वदत्तां परदत्तां वा ब्रह्मवृत्तिंहरेत्तुयः ।। षष्टि वर्ष सहस्त्राणि विष्टायां जायते कृमिः ।। १ ।। हे जाणोन इनाम चालविला जाईल जाणिजे निर्देश समक्ष मोर्तबा

रुजु बार समंत समंत
मंत्री सरकार
बार सुरु सुद्र बार समत सुद्र बार
बार

तेरीख ४ रजेब सु।। सब्रा समानीन मया व आलफ

लेखांक १०५ तारीख ८-७-१७८७

रु. नं. १

अ. नं. ७४

हुजरून नवाब टिपू आलीखा बाहादर
याचे पत्राचे जवाबाचा मसूदा

बाअद राजे बिसयार दरवख्त इतीजार आ अमारत पनाहाकडून खत खुष नमत पारचैय हमराह बालाजी भगवंत इरसाल केले ते नेकवख्ती रसीद होऊन कलमी केला मुफसील मजमून महाराजास इजहार जाहाल्यावरून बेन्याहायत खुषवख्ती दाद जाहाली

पारिचेयक कबूल जाहाले की बालाजी अजम बाबूराव विठल व दादेराव हुजूर येऊन
केले मतालीब जाहीर होऊन जबाब सवाल फर्माऊन इरसाल जाहले
असेत जुबानीवरून माअलुम जाहाले असेल मुतआकीब नारो बहिरव हे हुजूर रवाना
होत आहेत बईसबाब मरकूम केले बाअदज रसीद मशारून इलआच मजमून ज्याय जाहीर
होईल त्या मवाफीक जवाब फर्माऊन रवाना केले जातील
अखबार खैरीयत असार दिलशाद करीत असावे जियादेयच निगास्त आयाद
रा छ २२ माहे रमजान अयाम बकाम बाद रवानगी छ ५ माहे रमजान सुा समान
समानेन मया व आलफ किले पनाली याचे मुकामीहून बालाजी भगवंत कारकून नि-
बदरी जमालखान बुन्हान दिनाचा सासरा याजकडील थैली व वस्त्रे घेऊन हुजूर आला
त्या बराबरी मुबादला वस्त्रे न देता खाली जवाबाची थैली देऊन रवाना केला असे.

लेखांक १०६ तारीख ११-८-१७८७

श्री

आवा
रु. नं. १
अ. नं. ७५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११४ प्लवंगनाम संवत्सरे अधिक श्रावण बहुल त्रयोदशी मंदवासरें क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री रंभाजीराव जयवंत निंबालकर यासी आज्ञा केली येसीजे बहुत दिवस तुम्हाकडून विनंती पत्रे लिऊन महाराजाचे सेवेशी येऊन साकल्यार्थ निवेदन होत नाही तरी येसे न करिता वरिचेवरी विनंतीपत्री साध्यंत वृत आवगत होऊन माहाराजास संतोषावाप्ती होये ते करीत जावे पूर्वी तीर्थरूप कैलासवासी महाराजाधिराज———साहेब याची गुफरुलाह ताआक नवाब असफज्याह याची मुलाजिमतेची दस्तरसी होऊन राज्याचे तरकीबाबेचे करारदाह होऊन फैमाबैनचा यखलास बेखिलाफ वजेहनबर करार चाल्त आली याची वाकीफगारी सांप्रतया नवाबवालाजनाबास असता त्याची जियादती दिवसेदिवस विशेषा-त्कारे होत आसावी हेच महाराजास जरूर असता खत पत्राचा राबता ज्यारी न होता यखलासीची तरकी रुयदाद न जाहाली हे नवाबास लाजीम तर नसे अशास प्रसंगी तुम्ही संनिध असता वरिचेवरी यतद्विशईचा अर्थ नवाबवालाजनाबास मनजूर करून सांगोन महाराजाचे व नवाबवालाजनाबाचे अद्वितीय स्नेहाची अभिवृधी होऊन ममता बिशेषा-त्कारे चालोन महाराजास संतोषावह होयेसारिखे करीत जाणे सांप्रत हुजूरून नवाबवाला जनाब याकारणे वस्त्रे व जवाहीर शिरपेच सुमार १ येक व थैल्या समवेत पत्रे देऊन राजश्री सखो सिवदेव या बराबरी रवाना करून पाटविली असेत तरी तुम्ही नवाबवाला-जनाबास प्रविष्ट करून समर्पक उत्तरे प्रविष्ट जाहालियाची घेऊन पाटवणे. वरकड आज्ञे-प्रमाणे मशारनिल्हे मुखातरे सांगता कलेल. जाणिजे.

को. घ. इ. ३...७

तारीख २७-१२-१७८७

लेखांक १०७

तालीक खत फिरंग

अ. नं. ५८

राजे शिवाजी राजे छत्रपति दौलत

व मशनत जियादा बाशंद

महवल मकसूद आंकी

ब्रिशीयारनुर अफजार राजेवालाशां
सरदेशाई खेमसावंत भोसले यास नतीजा द्यावयाचा करार केलेची कैफीयत व हे मतालीबसअज हजरत इस्तादाचा कुमक व्हावा म्हणोन कलमी केलेची किताबत रसीद जाहली.

सदरहू कुमक द्यावयाचे मुदे तद्दात आणायास यख्तयार आहे म्हणोन मा। सुल्तानजी भोसले याकडे मुतसदी नेमिलेनी बोली करिता जवाब केला की मुदे आणिले नाहीत दरीज्या बहुमाने चालवितात अजी सबब मुदे आणायास जातो त्याजवरून मारनिले अगर त्याचा कारकून आवालशान राजे + जाणेस दस्तकनामा सादर केला यख्तयारनामा + + तां अजहजरत इस्तादासी व आवालशान राजेचे ख+ + + यासी कदीम तागायत येकरंग दोस्ती चालत असे + + + लायक उभय तर्फांचे किफायतीने तह केला जाईल खुदायताला आवालशान यासी आपले पन्हात रखो निविस्तन गोवा ब तारीख २७ माहे दिजेंब्र सन १७८७

फ्रासिस्कदाकुज्य येमीनेज

माहे डिसेंबर १७८८

लेखांक १०८

श्री

रु. नं. १

अ. न. १९०

यादी किल्ले सामानगडास श्रीमंत पंत राजज्ञा करवीराहून फोजसुद्धा येऊन किल्ले भोवानगडास गेले तेथ रखमाजी भोसले अनुरकर हे फौजसुद्धा तुरुकवाडीवर उतरले होते ते राजमंडलचे प्रांतात येऊन उपद्राप करणेचे मसलतीबद्दल आले होते तेव्हा राजाआज्ञा यानी भोसले यासी बोलणे लाविले जे तुमच्या आमच्या भेटी व्हाव्या जरूर काय जे बोलन ते बोलाव असा बोलण्याचा भाव घातला तेव्हा भेटीवा खात्री मागितली ते समयीं किल्ले वल्लफगड व कसबे सोलापूर हा तनखा त्र्यंबकराव आण्णा हेरवाडकर याजकड पेशवेकडून होता हेरवाडकर यानी आपले नि। भैरराव मंगेश सेणवी सिपूरकर यास वलफगडचे धंदेत सोलापुरास ठेविले होते बहिरवराव म्हणणार हे कसबे नेसरी नजीक मौजे सिपूर येथ

बहुत दिवस राहिले होते नेसरीकर सिंदे यानी शिपूर हा गाव भैरवराव याजकड इनाम चालविला होता सदरहू मशारनिले राजश्रा याचे स्वारीबराबर भवानगडास गेले होते राजश्रा यानी भैरवराव यास जामीनखात्री देऊन रखमाजी भो यास तेथे लष्करात आणोन त्याच्या व याच्या भेटी जाल्यानंतर लष्करात डेऱ्याकड जावयास निघाले तेव्हा भो यास घोडयावर ठार मारला.उपरांतीक त्याचे लष्कर दरोबस्त लुटून तुरुकवाडीचे ठाणेतील तोफासुद्धा घेऊन नेसरीस आले तेथ रखमाजी भो याच धन केल तुरुकवाडीच्या तोफा सामानगडास ठेऊन राजाश्रा करविरास गेले याप्रमाण सन तिस्सा समानेन साली करतव्य जाले.

लेखांक १०९ तारीख १३-११-१७९०

श्री

रु. नं. ४

अ. नं. ५२

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य राजेश्री महिपतराव कृष्ण गोसावी यासी

सेवक माधवराव नारायण प्रधान नमस्कार सुा इहिदे तिसेन मया व अलफ कसबे संगमेश्वर तालुके मजकूर तालुके रत्नागिरी येथे श्रीमंत कैलासवासी संभाजी माहाराज राज्य करीत होते त्या राजवाडयाचे चौथऱ्यावर सदाशिव दादाजी मावलंकर यानी आपले घराचा चौथरा म्हणोन घर बांधो लागले तेव्हा समस्त जोसी संगमेश्वरकर यानी राजवाडयाचे चवथऱ्यावर सदाशिव दादाजी घर बांधणार त्यास ताकीद करून घर बांधो न द्यावे म्हणोन तुम्हास सांगितल व हुजूरही विनंती केली तेव्हा हुजूर चवकसी जाहालियासिवाय घर बांधो नये याप्रमाणे जाहाले असता तिघस्ता चवकसी न होता त्या चवथऱ्यावर घर बांधिले तेव्हा राजश्री गणपतराव जिवाजी सरसुभा यास चवकसी करून घर मोडावे म्हणोन आज्ञा जाली असता गुदस्ता पैल घर बांधिले आहे त्या लगत नवे काम घराचे केले म्हणोन समस्त जोसी संगमेश्वर यानी हुजूर विदित केले ऐशास राजवाडयाचा चौथरा तुम्हास समजले असता सदासिव दादाजी यास त्या चवथऱ्यावर घर बांधू दिल्हेत हे ठीक न केले त्याजवरून हली हे पत्र तुम्हास सादर केले असे तर घर मोडावयासी सरकारातून मोरो आत्माराम कारकून व ढालाईत आा २ पाठविले आहेत हे घर मोडतील त्यास मोड्डू देणे राजवाडयाचे चवथऱ्याजवळ माहाराजाची बाग आहे त्यासुधा जागा सरकारात ठेवणे जाणिजे छ ५ रबिलावल बहुत काय लिहिणे लेखन सीमा.

लेखांक ११० तारीख ६–३–१७९१

श्री

रु. नं. ४ नकल

अ. नं. ५८

संभाजी महाराज

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११७ साधारणनाम संवत्सरे फाल्गुन शु॥ द्वितीया रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वास-निधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली येसीजे कसबा संगमेश्वर येथे कैलासवासी तीर्थस्वरूप———साहेबांचा वाडा आहे त्या जाग्यावरी हाली राजश्री सदाशिव दादाजी मावलंगकर सरदेसाई याणी वाड्याच्या जुन्या जोत्यावरी घर बांधिले म्हणोन जोशी यानीं हुजूर गैरवाका समजाऊन पेशजी आपणास आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यासी हाली सरदेसाई याचे घर मोडल म्हणोन हुजूर विदित जाहाले त्याजवरून सरदेसाई याजकडील कागदपत्र व भोगवटा मनाशी आणिता कसबे मजकूर महाराज किले रायगडाहून येऊन सरदेसाई याचे वाड्यात राहिले तेव्हा व त्याचे पूर्वी व अलिकडेस त्या जाग्यात सरदेसाई याची नांदणूक आहे या अनवय समजणियात आले त्याजवरून हे आज्ञापत्र आपणास सादर जाहाले आहे येसीयासी जोशी याणी गैरवाका पत्र नेहले आहे त्या अलीकडे सरदेसाई याचे घर मोडिले असिल्यास तो जागा याचा आहे सरदेसाई याचे घर बांधऊन जागा व बाग चालत आल्याप्रमाणे सर-देसाई याजकडे चालवावी जाणिजे. बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा मोर्तब असे.

लेखांक १११ तारीख २३–३–१७९१

श्री गणपते

रु. नं. १ तालीक

अ. नं. १९१

राजश्री नरसिंगराव उडपी स्वामी

गोसावी यास ——————

शेवक परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी वौ रा विश्वनाथ दीक्षित याणी विदित केले कीं समत कडकोल येथील सरदेसाई याचे मुतालिकाचे इनाम सेता पौ यकंदर सेत आम्हास इनाम दिल्हे आहे ते आजपावेतो चालत आले पुढे चालवणेविषी आज्ञा जाहाली पाहिजे म्हणोन त्याजवरून हे पत्र लिा आसे तरी वेदमूर्ती सेत येकंदर देसाई याचे मुतालिकाचे इनामतीपौ पूर्वी चालत आल्याचा दाखला व भोगवटा पाहून वाजवी सुरलीत चाले करणे रा छ १७ रजेब सुा इहिदे तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ११२ तारीख ४–९–१७९१

श्री

अ. नं. ६०

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ११८ विरोधीकृतनाम संवत्सरे आश्विन शुध सप्तमी भोमवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री रायरेणूराव बाहादर यासी आज्ञा केलीं ऐसीजे बहुत दिवस तुम्हाकडून विनंतीपत्र येऊन साद्यंत अर्थ निवेदन होत नाही तरी ऐस न करिता वरचेवरी विनंतीपत्री साकल्यार्थ निवेदन होये ते करीत जाणे पूर्वी रायराय दियानतवत बाहादर याचा मनोदय ऐसा होता जे माहाराजाचे आज्ञेनरूप सेवा करून उमदे काजकामाचे कार्यभाग करून दाखवावे हा हेतू विशेषतर होता त्याची वाकीफगारी तुम्हास नसेल याकरिता आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुम्ही त्याचे निष्टेचा अर्थ चितात आणोन आज्ञेनरूप उमदे काजकामाचे कार्यभाग कर्तव्यतेचा अर्थ जाहिरीस पोहचे ते करीत जाणे यतद्विशईचे अर्थे नवाबवालाजनाब यास थैल्या समवेत पत्रे देऊन राजश्री जिवाजी आनंदराव यासी पाठविले आहेत हे माहाराजाचे आज्ञे प्रमाणे सांगतील तो अर्थ चितात आणोन तदनरूप नवाबवालाजनाबास मनजूर करून सांगोन कार्यभागाचे कर्तव्यतेचे निदर्शन तुमचे मारफातीकडोन कारसुरतदजीर होऊन येई ते करणे. जाणिजे बहुत काये लिहिणे.

लेखांक ११३ तारीख ४--१०–१७९१

श्री

रु. नं. ४

अ. नं. ६३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११८ विरोधीकृत नाम सवंत्सरे आश्विन शुध्ध सप्तमी भौमवासरे क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजेश्री कल्याणराव बाहादर यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाकडून बहुत दिवस विनंतीपत्र हुजूर येऊन साद्यंत अर्थ निवेदन होत नाही तरी ऐसे न करीत जाणे वरचेवरी विनंतीपत्री साकल्यार्थ निवेदन होय ते करीत जाणे उमदे कित्येक काजकामाचे कार्यभागाविषयी नवाबवालाजनाब यास हुजरून थैल्या समवेत पत्रे देऊन राजश्री जिवाजी आनंदराव यासी पाटविले आहेत हे माहाराजाचे आज्ञेप्रमाणे तुम्हास सांगतील तो अर्थ चित्तात आणोन नवाबवालाजनाब यास मनजूर करून सांगोन माहाराजाचे मनोदयाप्रमाणे उमदे कार्यभागाचे मतलब तुमचे इतिल्याकडून कारसुरतदजीरन होऊन येई तो अर्थ करणे तुमची रवाणगी राजश्री माहदजी सिंदे याजकडे जाहाली आहे म्हणोन निवेदन जाहाले. अशास हुजूरचे काजकामाचे जाबसाल तुमचे मार्फातीने होणे त्यास जिवाजी आनंदराव याजकडीस जाबसाल खचित

करून देऊन उपरात तुम्ही तिकडे जावयाचे करणे तुमचे येणे क्षेत्रास कोणत्या तारखेस होणार तेव्हा करार हुजूर विनंतीपत्री लेहून पाटविणे तुम्ही तेथे आल्याचे वर्तमान हुजूर निवेदन होताच राजश्री अमृतराव कदम यासी कित्येक कार्यभागाची आज्ञा करणे ते करवून तुम्हाकडे रवाना करून पाठांवले जातील त्याचे व तुमचे विचारे सिंद्याकडील जाबसाल घडोन यावे हुजूरचे काजकामाचा यअतीबार सर्व तुम्हावरी आहे याकरिता हुजूरचे कार्यभागाचे ठाई लक्ष धरून माहाराजाचे मनोदयाप्रमाणे कार्यभाग करून दाखवून कृपेस पात्र होणे हेच तुम्हास उचित असे वरकड आज्ञेप्रो राव मशारनिले लिहितील तो अर्थ चितात आणोन तदनुरूप कार्यभागाची पैरवी कारसुरतदजीर होऊन जाहिरीस पोहोचे ते करणे जाणिजे बहुत काय लिहिणे.

लेखांक ११४ — तारीख १४-१-१७९२

श्री

अ. नं. ६१

स्वस्तिश्री राज्याभिषेक सके ११८ विरोधीकृतनाम संवछर पोष बहुल पंचमी मंदवार क्षत्रिये कुलावतंस श्री राजा सिव छत्रपति याणी

मोकदमानि हाये गावग-

ना ता। कागल यासी

आज्ञा केली येसीजे राजश्री येशवंतराव बिन राणोजी घाटगे सर्ज्याराव देसाइ ता। मजकूर याणी करवीरचे मुा। स्वामीसन्निधे विनंती केली कीं आपले पुरातन ता। मजकूरचे देसकतीचे वतन चालत आहे माहाराज कृपालु होऊन हाकइनाम कानुकाइदे गावगना करार करून देऊ भोगोटेस सनदा सादर व्हाव्या म्हणोन विदित केले त्याजवरून स्वामी याजवर कृपालु होऊन ता। मजकुरच्या देसकतीच्या वतनास हाकइनाम कानुकाइदे करार करून दिल्हे आसत गावगना देहाये बी तपसील

किता गाव	किता गाव
१ कसबे कागल	१ मौज वंदूर
१ मौज बाचणी	१ मौज संकरवाडी
१ मौज वालव बुा।	१ मौज सिदनरली
१ माज सावर्ड बुा।	१ मौज व्हानूर
१ मौज सेडूर	१ मौज पिंपलगाव खुा।
१ मौज बस्तवाड	१ मौज येकांडी

१ मौज कुरुकली
१ मौज दिगरज खुा
१ मौज रुवी
१ मौज मलग बुा
१ मौज पिंपलगाव बुा
१ मौज केंबली
१ मौज बालव खुर्द
१ मौज सावर्ड खुर्द
१ मौज कर्नूर
१ मौज म्हाकव
१ मौज मुरगुड
१ मौज मांजरी
१ मौज चेकाक
१ मौज भडगाव
१ मौज बेलवल बुा
१ मौज मुंगळी
१ मौज बोरगाव
१ मौज मलणगाव
१ मौज बेलवल खुर्द
१ मौज चंदरे
१ मौज होरिवड
१ मौज सोनाळी
१ मौज मळगे खुा

किता गाव

१ मौज सुरुपली
१ मौज निढोरी
१ मौज चवर्डेहाल
१ मौज सिरदवाड
॥. मौज निमसिरगाव

३३॥.

१ मौज बामणी
१ मौज खेबवड
१ मौज व्हानाली
१ मौज चिखली
१ मौज भिवसी
१ मौज येमगरणी
१ मौज नागनूर
१ मौज कौलग
१ मौज बालिंगे
१ मौज सानग
१ मौज आनुर
१ मौज केनवड
१ मौज गौरंब
१ मौज बुरली
१ मौज आलमंदे
१ कसबा दिगरज
१ मौज डोंगरसानी
१ मौज निगव
१ मौज बिद्री
१ मौज उंद्रवाडी
१ मौज साके
१ मौज चिमगाव

किता

१ मौज यमगे
१ मौज कुरणी
१ मौज माणगाव
१ मौज आंकली
१ मौज गौरवाड
१ मौज सांजणी

३४

यो देहाये सुमार साडसदेसष्टे येथील देसकतीच्या वतनास हकइनाम कानुकाइद्याची मोईन करार करुन दिल्हे आसे कलम बिा

किता कलम

हाकदार सदेनकद

रु.॥ १०

इनाम दर चावरी

जमीन बिघे ६।.

या कलम १

मला (मळा) जमीन कलम

१

वतनी रयताव

कलम १

भेटबेकार कलम १

किता कलम

लग्नमुहूर्तास नारल

खाडव कलम १

आहेर कलम १

महकुड कलम १

आऊतइरले कलम १

सणबेंदूर कलम १

पक्षाच तूप व शाख

भाजी व पानची भारे

कलम १

गुलाचा हक कलम १

गुरालाचे घाणेस

दररोज ऊस रस व

सेरणी कलम १

परटाकडील पडदे

कलम १

ठाणेचे गावास प्यादेची

आसामी कलम १

किता कलम

घुगरी पडी कलम १

जकायेत दर बैली रुका

८३ केणे गाणीस

८१ भुस गाणीस

—

८४

याो कलम

१

साली काष्टी धनगर

सणगर मागास सालीना

हक रुा ८=

किता

कलम १

तेली याचे घाणेस दर

रोज तेल वजन ...४॥

यो कलम १

पानारी याचे नगास

पानसुमार १०० याो

कलम १

पानारी याचे दुकानास

पान दररोज २५

फसकी उखला कलम १

राबता म्हार कलम १

चांबाराकडील सालीना

जोडा सुमार १ कलम १

हाये जमा कलम १

दिवाणातून तश्रीफा कलम १

लक्षुमीचे जत्रेचा हक

कलम १

गैरवाटेवरला कलम १

कमाविस बाबेवर हक

दरसदे १० रुपये कलम १

या कलमे सुमार २८ येणे प्रमाणे ताा मजकूरचे देसकतीचे वतन व हकइनाम कानुकाइदे

करार करून दिल्हे आसत तरी यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे. या सनदेची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियासी देसाई मारनिल्हेकडे देणे जाणिजे निर्देश समक्ष.

लेखांक ११५ तारीख २६-१२-१७९२

श्री

रु. नं. ४

अ. नं. ६८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ११९ परिधारी नाम संवत्सरे पौष शु॥ त्रयोदसी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजेश्री पितांबर चतुरभुज हिराचंद साहूकार साकीन मुंबई यासी आज्ञा केली ऐसीजे माहाराजानी हुजूर राजेश्री बाळाजीराम व रघुनाथ पै या उभयतास अजम जनराल अबरक्रांबी प्रजीदेत गोवरनेर जनराल याकडे पाठविले असता सरकार काजकामाविषयी तुम्ही यत्न मेहनत करून माहाराजाचे मनोदयानुरूप कार्यभाग करून दिला यावरून माहाराज तुम्हावरी बहुत संतोषी आहेत तुम्हाकडून मोतीचंद पत्र घेऊन आले यानी मुखांतरे तुम्हाकडील कार्यकर्तेपणाचा मजकूर निवेदन केला व पत्रार्थे साद्यंत विदित जाहला याचप्रकारे वरचेवरी माहाराजाकडील काजकाम सुधरून देऊन लौकीक उत्तमप्रकारे प्रसिद्धेतेस येइ ते करणे बालाजी राम व रघुनाथ पै उभयता मशारनिले याची रवाणगी मास पक्षात सत्वरच होऊन येईल चार दिवस अधिक अगले लागले म्हणोन अजम उइलीम टामस सांडीफोर्ट इस्कोयर यानी कांही चितांत आंदेशा न आणाव म्हणोन तुम्ही माकूल करून सांगावे वरकड साकल्य वर्तमान उभयता मशारनिले यानी आज्ञेप्रमाणे लिहिले आहे व जबानी मोतीचंद सांगतील त्यावरून कलेल जाणिजे रवाना छ माहे जमादिलावल.

लेखांक ११५ अ तारीख ३०-५-१७९३

श्री

रु. नं. १

अ. नं. २३३

तीर्थस्वरूप सकल तीर्थास्पद

राजश्री अमरसिंव्ह राजे दादा काका वडिलाचे शेवेशी आपल्ये शिवाजी राजे छत्रपति दंडवत विनंती उपरी येथील कुशल ता। वैशाख वद्य पंचमी सौम्यवासर पर्यंत यथास्तित असे विशेष श्रीचे वरप्रसादे करून माहाराजास माहाल वाडा आठवा येथे अधिक वैशाख

श्रुध्ध + दशमी स्थिरवारी सुमूहुर्ते पुत्रोउत्साह जाला याची शर्करा वडिलाकारणे प्रियशीली असे प्रविष्ट जाहालिया.

लेखांक ११६ तारीख ३१-७-१७९३

श्री

रु. नं. १

अ. नं. १०६

पौ. छ १ मोहरम सन आर्बा

राजश्री प्रीतीराव बापू चवाण हिंमतबहादर ममलकतमदार गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहंकित मुकुंदराव पोवार सरदेसाई पा खानापूर रामराम विनंती येथील कुशलता छ २२ जिल्हेज जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असले पाहिजे विशेष मौजे सिरगाव ता चंदगडे येथील हिंमतबहादरीचे हकाचे रूाकरिता गुदस्ता या दिवसानी तगादा जाहला यामुळे गाव बखेडेस आला यास्तव आम्ही करवीरी आपणासी बोलून सालमजकूरचे रु॥ मार्गशीर्समासी आपणाकडे द्यावे मौजे मजकुराकडे चिटी होऊ नये याप्रमाणे करार करून वचन घेऊन आल्यावरून रयता चारचारीकडे गेल्या होत्या त्यास धीर भरवसा देऊन परजन्य कालात आणून गावी घातले अद्यापि रोपासुद्धा लागल्या नाहीत दुष्काळ आणीवार रयताचे घरी खाण्यास अन्न नाहीं तशात जुजबी लावणी होईल तसी करायास लाविली असता पंचवीस रुपयाची चिटी व दोन रुपये मसाला घेऊन आपल्याकडील माणसे येऊन गावाकडे बसली आहेत म्हणोन काल गडी आला त्यावरून आश्चर्य माणिले प्रथम आपणच हुजूर विनंती करून गाव देवविला उप्रांत मार्गषीर्समासी करवीरी आपणाकडे रुपये घ्यावे असा करार केला असता चिटी होऊ नये परंतु गडबडी असेल किंवा कसे कल्त नाही तसा प्रकार असल्यास लिहून कलवावे आपण सरदेशकतीच्या हक्काच्या सनदा करून देविल्या त्याचाही जाबसाल होईल तर पाहावा लागतो घालमेल नसल्यास तेही कलवावे आणि सिरगावाकडे रोखा घेऊन आल्या वरातदारास मनाचिटी पाटवावी आम्ही येतासमयी रुपये घेऊन येतो आपल्या जामदारखानेत सिरगावचे रुपये रुजू जाहाले असे समजून सत्वर चिटी पाटवावी गावकरी यास अन्न नाही सद्या त्यास उपसर्ग होतो यास्तव लि॥ आहे खातरा जमा समजोन माणसे नेतसी करवावी गंगेचे उदक गंगेस समर्पण करायास आमचे काय जाते सरदेशकतीच्या हाकाकरिता ही आपले उत्तर येताच गावगना चिठ्या घालितो काय ते कलवावे बहुत काय लिहिणे लोभ करावा ही विनंती.

+ ता. २०-४-१७९३

लेखांक ११७ तारीख २६-८-१७९३

श्री गणपती

रु. नं. १

अ. नं. १२०

राजश्रीयाविराजीत राजमान्य राजश्री बाल जोसीराव स्वामीचे शेवेसी

पो परशराम रामचंद्र साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे विशेष सांवताचा तालुका खातरजमेने सोडावयाचा मजकूर पेशजी तुम्ही लिहिला व रा बाबूराव नरसिंव्ह याजबरोबर सांगोन पाटविला त्याजवरून हा मजकूर सरकारात लेहून पाटविला तेथे तुम्हाकडून चिट्या गेल्या होत्या त्या येथे आल्या सबब ताज्या चिट्या व हुजरे कारकून पाटवावयाकरिता तुम्हास दोनवेला येथून लिहिले असोन त्याप्रमाणे न करिता जाब लिहिता कीं बाबूराव यास पाटवून द्यावे संशये धरू नये ल्ढा नाही त्यास आज चवदा महिने होत आले कोणता सेवट नाही तत्राप तुम्ही बोल्त होता त्याचा प्रत्यय आला फसवावयाची गोष्ट दिसते बाबूराव यास पाटवावयाचे प्रयोजन कोणते दिवसागतीचा प्रकार समजला आम्ही सेजारी असता तुमचे बरे व्हावे हे चितात आणोन तुम्हास लिहीत गेलो ती गोंष्ट तुमच्या गावीच नाही ईस्वर इछा काय आहे कळत नाही सरकारची पत्रे वरचेवर निकडीची येतात कोटपर्यंत वाट पाहावी ? असो चाल समजली हेविसीचे बाबूराव लिहितील ईस्वरइछा प्रमाण रा छ ६ मोहरम + पुण्याहून यादी आलेली पा आहे व बाबूराव लिहितील त्याजवरून कळेल याउपर आम्हाकडे शब्द नाही बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती छ १८ मोहरम सन आर्बा तिसैन श्रावणमास

लेखांक ११८ तारीख २६-८-१७९३

श्री गणपती

रु. नं. १

अ. नं. १२१

राजश्री बाल जोसीराव स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी श्री स्वामी मट करवीर याच्या संस्थानाकडील गावगना रोखे करून गावकरी धरून नेले आहेत कांही ऐवजाची निशा घेतली आणखी मसाल्याचे रोखे गेले आहेत यासिवाय ब्राम्हणाच्या व श्रीदेवाच्या जमिनीचा वसूल घेता म्हणोन कळले ऐसीयास आजपर्येत माहाराजाच्या राज्यात असी गोष्ट घडली नाही देव ब्राम्हणाचा कारभार अशाने श्रेयस्कर नाही सरकारात समजले असता काय म्हणतील हे पुर्तें समजोन

+ येथून पुढें अक्षर परशुरामभाऊ पटवर्धन यांचें.

माहाराजास विनंती करून निर्वेध करावा वसूल घेतला असेल तो निशेसुधा माघारा द्यावा हे काम लवकर करावे रा छ. ६ मोहरम श्री + स्वामीस वगैरे ब्राम्हणास उपद्रव व्हावा हे बरे की काये ? चांगले दिसेल ते करावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती. छ १८ मोहरम सन आर्बा तिसेन श्रावन बद्य ५

लेखांक ११९ तारीख २०-१०-१७९३

श्री

अ. नं. ६२

आज्ञापत्र राजमंडल तो मोकदमानी मौज गुडाळ तो तारळे यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ आर्बा तिसैन मया व अलफ वो राजश्री भाऊभट बिन गणेशभट अध्यापक वा क्षेत्र करवीर यासी श्रावण बहुल अमवशा केतुग्रस्त सूर्यग्रहण पर्वकाली मौजे मजकुरी भूमिदान जमीन कालीकीर्दी भारोदे बिघे ५ पाच करार करून दिल्ही आसे तरी सदरहू प्रमाणे जमीन चतुःसीमा करून वोचे स्वाधीन कर्णे आणि भूमिदान जमीन यासी व याचे पुत्रपौत्रादि वौंशपरंपरेने चालवणे सालदरसाल नवीन आज्ञापत्राचा उजूर न करिता या पत्राची तालीक लिहून घेऊन आसल पत्र भोगवटियासी देणे जाणिजे रा छ १४ माहे रावल

बार

लेखांक १२० इ. स. १७९३-९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १२९

यादी राजमंडल याजकडील राजश्री परशुराम रामचंद्र याजकडे जाबसाल होऊन येणे सु॥ आर्बा तिसैन मया व अलफ कलमे बी तपसील

राजश्री पाटीलबावा यानी	येसाजी सिंदे मेले म्हणून
करवीरास येऊन तह केला ते	राज्यात माणूस करता नाही
समयीची बाकी म्हणोन मखलासी	सबब फौजसुधा येऊन साडेदाहा
करून घेऊन सात लक्ष रुपये	लक्ष रुपये खंडणी केली त्यास
घेतले त्यापैकी साडेपांच लक्ष	मनोली तालुका पांच लक्षांत

+ येथून पुढें अक्षर परशुरामभाऊ पटवर्धन यांचें.

रुपये दिले आणि दीड लक्षांत
शिरोळ तालुका वगैरे अठरा
गाव येकूण पन्नास हजार रुपयेचा
ऐवज लाऊन देऊन दीडलक्षात
ऐवज दिल्हा त्यास चौदा वर्षे
जाहाली तो तालुका व खेडी
यावी व फजिलाचा ऐवज
यावा. कलम १

मनोलीच्या बारीपलीकडील प्रांत
सुटला त्याचा ऐवज यावा.

कलम १

राजश्री पाटीलबावा यानी
तह करून फुटगांव बत्तीस याच्या
ऐवज हुजूर द्यावा ऐसे आपाजी
शामजी याचे विद्यमाने करार
करून आलाहिदा यादी लिहून
दिली आहे तो ऐवज यावा.

कलम १

तोरगल तालुक्यातील समत
कटकोल तोसुधा यावे.

कलम १

बनूर तालुका तोरगल हे ठाणे
यावे. कलम १

किले भुदरगड हा फितवा करून
घेतला तो तालुकेसुधा किल्ला
व किल्ल्यावरील जखीरासुद्धा
यावा कुसाजी नलगा स्वाधीन
करावा. कलम १

निपाणीचा तालुका हुजूरचा
हुजूर यावा.....................कलम १

लाऊन घेतला बाकी साडेपांच
लक्ष रुपये राहिले त्यास
राजश्री नाना याचे विद्यमाने
पुण्यात आम्हाकडून ऐवज
पावला होता त्याची रुज-
वात तीन लक्ष पंच्याऐसी
हजार रुपये याची तासगाव-
कराकडील कारकून राजश्री
चिंतो रामचंद्र याचे विद्यमाने
जाहाली बाकी देणे एक लक्ष
पासष्ट हजार राहिले त्यापैकी
जवाहीर एक लक्ष रुपयेस गाहण
ठेविले आहे बाकी देणे
पासष्ट हजार रुपये त्यास
दाहा गाव तीस हजार रुपयेचे
दिले त्यास आठ वर्षे जाहाली
अद्याप गाव सोडीनात. ते गाव
सुटावे व फाजील रुपये यावे कलम १

चिकोडी व मनोली हुजूर
दिली असी आलाहिदा पत्रे
राजश्री प्रधानपंत याची आहेत
हलीची त्यापैकी मनोली
तालुका हुजूरूने कर्जात दिला
आहे चिकोडी तालुका
कमाविसीस हुजूरच्या म्हणोन
राजश्री परशरामपंत भाऊ
यानी आपणाकडे ठेवून घेऊन
कतबा हुजूर लिहून दिल्या
आहे कतबा दिलहा असता
तालुकाचा ऐवज न ये. व
तालुकाही सोडीनात तो
सुटून यावा.

कलम १

लेखांक १२१ तारीख १४-१-१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १३०

छ १२ जार आर्बा तिसैन मया व अलफ पौत्र शुा त्रयोदसी भोमवासरे १२० प्रमादीनाम सवत्सर राजमान्या राजेश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली ऐसाजे राजश्री बच्याजी बलाल व राजश्री बळवंतराव गणेश हुजुरचे आज्ञेप्रमाणे आपणासी बोलत आहेत. प्रस्तुत आज्ञा करून राजश्री मालजी निकम पो आहेत त्रिवर्ग मशारनिले आपणाशी बोलतील त्यावरून कलो येईल आज्ञेच्या आज्ञेचा लक्ष ध्यानात आणून मालजी निकम यासी पाटवून द्यावे

येणे प्राो पत्रे

१ बाळाजी जनार्धन

१ हरि बलाल

१ चिंतामण हरि

३

श्री मसुदा

राजश्री बच्याजी बलाल यासी आज्ञा केली ऐसीजे सुा आर्बा तिसैन मया व अलफ राजश्री बालाजी जनार्दन व राजश्री हरि बलाल व राजश्री चिंतामण हरि यासी आज्ञापत्रे सादर होऊन राजश्री मालजी निकम यासी आज्ञा करून पो आहेत आज्ञे प्राो मशारनिल्हे तुम्हास सांगतील तेणे प्रमाणे त्रिवर्गास बोलोन आज्ञेच्या लक्षाप्रमाणे कार्यभाग घडोन येईत ते करून मशारनिले यासी हुजूर पाटवून द्यावे येविसी राजश्री बाजीराव बलाल चिटणीवीस यानी आज्ञेप्रमाणे लिहिले आहे त्यावरून कलेल.

१

राजश्री बळवंतराव गणेश यासी सदर्हुप्रमाणे आज्ञापत्रे १

येाा रो छ १२ जार सुा आर्बा तिसैन.

लेखांक १२२ तारीख १७-१-१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १३१

समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजेश्री प्रीतीराव चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार यासी आज्ञा केली ऐसीजे पुणेच रवाणगीस राजश्री मालजी

निकम नेमिले होते त्यासी मशारनिलेचे पुत्रास बहुत समाधान वाटत नाही यास्तव राहिले राजश्री बहिरजी नाईक गायकवाड याची रवाणगी करून दिल्ही आपणास कळावे वेदशास्त्रसंपन्न राजश्री बाल जोसीराव व राजश्री आनंदराव घाटगे झुंजारराव अद्यापि तासगांवाहून हुजूर आले नाही कळावे याजकरिता आज्ञा केली असे जाणिजे सुा आर्बा तिसैन मया व आलफ रा छ १४ माहे जादिलाखर बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक १२३ तारीख १८–१–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १३२

समस्त राजकार्यधुरंधर विस्वासनिधी राजमान्य राजश्री प्रीतीराव चव्हाण हिंमत-बहादर ममल्कतमदार यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री आनंदराव घाटगे झुंजारराव याणी मजकूर हुजूर निवेदन केला तो काली गुरुवारी तुम्हास आज्ञापत्री आज्ञा जालीच आहे त्यास फौज घेऊन बाहीर गेला आहा तिकडे असिलेस उत्तम किंवा करवीरी येकेटाईच असलेस बरे यात आपले विचारास कसे येते त्याप्रमाणे विनंती लेहून पाठवावी हुजूरचे मानस फार दूर नसावे एकेठाई करवीर लगतेनजीक असावे यात राजश्री रत्नाकर[१] राम पोतनीवीस याचे व आपले विचारे कसे येते त्याप्रमाणे विनंतीपत्री लेहून पाठवावे. जाणिजे सुा आर्बा तिसैन मया व अल्फ रा छ १५ माहे जमादिलाखर बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक १२४ तारीख २०–१–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १९२

राजश्री हंबीरराव जाधव मुद्राधारी व कृष्णाजी
मलेगीर किले सामानगड यासी आज्ञा

केली जेसीजे सु।। आर्बा तिसैन मया व आलफ राजश्री प्रीतीराव चवाण हिंमतबहादर ममल्कतमदार व राजश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर उभयता किलेमारी तेथील बंदोबस्त पाहाणेस्तव येतील त्यास किलेवरी घेऊन जखीरा व तटाचा व दागदुजी वगैरे

---

१ रत्नाकरपंत राजाज्ञा ते हेच.

बंदोबस्त कसा केला तो दाखवणे उभयता येतील खाली येऊ देणे आणि तुम्ही किले मारी बहुत सावधपणे राहाणे जानिजे रा छ १७
माहे जाखर लेखन सीमा

सि
का

लेखांक १२५

तारीख २१-१-१७९४

श्री

अ. नं. ६३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२० प्रमादिनाम संवत्सरे पौषय वद्य पंचमी इंदुवासरे क्षत्रियकुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजेश्री राये हरि नारायेण यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाकडून बहुत दिवस विनंती पत्र येऊन साद्यंत अर्थ निवेदन होत नाही तरी ऐसे न करिता वरिच्वेवरी विनंती पत्री साकल्यार्थ निवेदन होवे ते करीत जाणे पूर्वी राये दियानतवंत बाहादर याचा मनोदये ऐसा होता जे माहाराजाचे आज्ञेनरूप सेवा करून उमदे काजकामाचे कार्यभाव करून दाखवावे हा हेतु विशेषात्कारे होता त्याची वाकीफगारी तुम्हास नसेल याकरिता आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुम्ही त्याचे निष्टेचा अर्थ चितात आणोन आज्ञेनरूप उमदे काजकामाचे कार्यभाग कर्तव्यतेचा अर्थ जाहिरेस पोहचे ते करीत जाणे यतव्दिशईचे अर्थे नवाबवालाजनाब यास थैल्या समवेत पत्रे देऊन राजश्री रामाजी तुकदेव यासी पाठविले आहेत हे माहाराजाचे आज्ञेप्रमाणे सांगतील तो अर्थ चितात आणोन तदनुरूप नवाबवालाजनाबास मनजूर करून सांगोन कार्यभागाचे कर्तव्यतेचे निदर्शन तुमचे मारफातीकडून कारसुरतदजीर होऊन येई ते करणे.

लेखांक १२६

तारीख १५-५-१७९४

श्री

रु. नं. ४

अ. नं. ७३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२० अनंदनाम सवत्सरे वैशाख बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री सेनाधर व सेनालेखक व संभारलेखक व अश्वारुढ व सदरबारगीर व तटसरणोबत व नाईकवाडी व गडकरीलोक किल्ले पनाळा यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री अग्नोजी दलवी यासी किले मजकूरचा हवाला नामजाद धंदेची सेवा सांगोन आज्ञा करून पाटविली आहेत यासी किल्लावरी घेऊन स्वामीसेवेविषी मशारनिले व तुम्ही पूर्व वहिवाटीप्रमाणे येकविचारे असत जाणे आणि माजीप्रमाणे वेतन नामजाद मशारनिले यासी सालीना देत जाणे जाणिजे.

लेखांक १२७ तारीख १९-५-१७९४

श्री दत्तात्रेय प्र ॥

अ. नं. ४७५

श्रीमन्माहाराज राजश्री छत्र

पति स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक खंडो मोरेश्वर परंडकर कृतानेक सेवेसी विज्ञापना ऐसीजे ता॥ छ १९ शोवालपर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत्त येथास्थित आसे यानंतर स्वामीनी आज्ञापत्र सादर केले तेथे आज्ञा बोली सोडवणे ब॥ दीडलक्षापैकी जो ऐवज जमा आहे तो राजश्री आनंदराव रामचंद्र याचे पदरी राजश्री बच्याजीपंत याचे विद्यमाने घालणे त्यास करवीराहून आज्ञा होऊन येतेसमई राजश्री गोविंद नाईक व आम्ही मिलून बोली सोडिवणेची आज्ञा घेऊन उभयता तासगावास आलो गोसावी याच्या चिठ्या बसरत गोविंद नाईक याचे नावच्या आसता सेवकास आम्हासच मात्र ऐवज पदरी घालणेची आज्ञा जाली आज्ञेप्रमाणे ऐवज पदरी घालावा परंतु गोविंद नाईकास व गोसावी यास आज्ञापत्र पाहिजे याजमुले उजूर पडला आहे त्यास आज्ञापत्र सादर करणार स्वामी समर्थ आम्ही निघोन आजी तासगावास गेलो बच्याजीपंतही क्षाद्यापि तेथे आले नाहीत त्याची आमची भेटी जाली म्हणजे सेवेसी विनती लिहितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १२८ तारीख २४-६-१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४५

छ २५ जिल्काद
खमास तिसैन
मया व आलफ

राजश्री सरखवास बापू गोसावी यास

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने बचाजी बलाल आसीर्वाद विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिल पा॥ विशेष आपला निरोप घेऊन आलो ते नांदणीस खासगत कामाविसी येकरोज राहून बुधवारी सायकाली तासगावास पावलो राजश्री आनंदराव भाऊची भेट जाहाली हुजरची आज्ञापत्र दिले व यादही त्याणी मखलासी कराबयाची लेहून दिली होती त्याआन्वये न जाहाली येविसी भाऊची मर्जी कांहीं संशयात होती परंतु आम्ही जबानी आवलील हुजूरची मर्जी कांहीं मखलासीवर नाहीपनाची तुम्ही चाकरी बजावली त्यापक्षी तुमच मनोदयानरूप तुमची याद हुजूराने व्हावयाची येविसी आम्ही व सरखवास बापू व आबाजीपंत याणी खातरजमा करून घेतली

आहे मखलासी ते पांच चार अक्षर नाहीत म्हणोन चितात सवशय आणो नये येसी तुम्हा विसीच्या खातरजमा सांगून आली आहे, जोतीबा आपा यादव येथून न पुसता करवीरास गेले आणि करवीराहून आले ते त्यास न भेटताच उगेच वडगांवास जातो येसे राजश्री जोशीरावाजवळ सांगोन गेले त्याविसी काय संधान घेऊन गेले हे मनात दिकत आहे ते आपणास कलो असेल वरकड येथील कारभार विषये सर्व थोडाबहुत चिरंजीव दिनकरपंतास लिा आहे त्याप्रमाण आपणास विंनती करतील तो अर्थ हुजूर निवेदन करावे साराश रा परशरामपंत भाऊ मिरजहून एकदोन रोजी येथे येणार त्याबाा हरि भास्कर व गोविंद नाईक येणार आल्यानंतर राजश्री जोशीराव तात्याचे विचार व्याज वसूल वजा षडतो कीं न पडतो हे पाहून मग भाऊसी प्रत्योतर पुसोन घ्यावे येसा ठराव केला आहे आले नंतर जो ठराव होईल तो माघावोन लेहून विंनती पाटवून दे ो बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विंनती.

लेखांक १२९ तारीख २६–६–१७९४

श्री गणपती

रु. नं. १

अ. नं. १३५

राजश्री गुजाजी गायकवाड सरखवास गोसावी यासी

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्वो परशराम रामचंद्र आसीर्वाद उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहित जाणे विशेष तुम्ही पत्र पाटविले ते पावले प्रांतातील वसूल वजा यावा व व्याज काटून ऐवज घ्यावा याप्रो करार आहे त्याअन्वये घडवावे बोलाच्या सुटकेचा ऐवज सावकारी पटवितो त्याची सुटका व्हावी म्हणोन लिहिले ते कलले व बारगीर गोसावी याच्या सांगितल्यावरून समजले ऐसीयास प्रांतातील वसूल कोणता कोठे आहे व व्याजाचा आशये काय हे समजण्यात आले नाही व कोणी बोलण्यातही आणिले नाही बोलाच्या सुटकेच्या ऐवजाची वाट पाहात आहो कराराप्रमाणे ऐवज आल्यानंतर काय गुंता आहे हे विषीचे बारगीर गोसावी सांगतील त्याजवरून कलेल जाणिजे छ २७ जिल्काद सुा खमस तिसैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक १३० तारीख २८–६–१७९४

श्री

राजमान्य राजेश्री जोत्याजी यादव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हास हुजूरने आज्ञा करून तासगावास पाठविले जे राजश्री गोविंद दासो याजकडील हामीचिष्या घेऊन राजेश्री खंडो मोरेश्वर परांडेकर याजकडे देऊन राजश्री आनंदराव रामचंद्र याजकडे

ऐवज देणेची आज्ञा असता ते लक्ष सोडू दुसरेच करिता हे ठीक नव्हे तरी आज्ञेप्रमाणे चिठ्या घेऊन परांडेकर याजकडे देऊन ऐवज राजेश्री आनंदराव रामचंद्र याचे पदरी घालणे आणि गुले तासगावास आणवणे प्रांत सोडून घेणे जाणिजे सुा खमस तिसैन मया व अलफ रा। छ २९ जिल्काद.

लेखांक १३१ तारीख २८–६–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १३७

पौ छ १ जिल्हेज सन खमस तिसैन

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति आबासाहेब

साहेबाचे शेवेसी

विनंती सेवक जोत्याजी यादव कृतानेक सेवसी विज्ञापना ता। छ २९ माहे जिल्काद-पावतो साहेबाचे कृपाष्टीकडून सेवकाचे वर्तमान यथास्थित अस साहेबी आज्ञापत्र पाठविल ते मस्तकी वंदोन सनाथ जाहालो तेथ आज्ञा जाहाली थैलीप्रताच्या चिठ्या घेऊन जलदीन येण म्हणून आज्ञा त्यास उद्येक रविवारी राजश्री हरबा आना व गोविंद नाईक येणार थलवरी बोलणेचा ठराव जो होईल त्याप्रा। सेवसी विनंती पत्र पाठवितो आज्ञा होइल त्याप्रा। सेवक वर्तणूक करील सेवेसी श्रुत होय राजेश्री हरबा आना याच मानस आहे जे सावकारी चिठ्या आपणापासी आहेत पहिल बोलण आपले विद्यमानेच आहे त्यास ओली परभार करवीरास पाटवून द्याव्या ऐसा मजकूर आहे दीडलक्ष रुपये आपले विद्यमान देऊन ओली करवीरास परभार पाठवून द्याव्या ऐस परभार ऐकनेत आहे यावरून सेवसी विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३२ तारीख २८–६–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४०

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजेश्री बाल जोसीराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हास तासगांवास जाऊन महिना जाहला राजश्री आनंदराव रामचंद्र यानी निशेविसी खचीत तुम्हास सांगितले असता राजश्री हरि भास्कर व गोविंद दासो या उभयताबिसी आडती धरली त्यापक्षी राजश्री परशराम रामचंद्र याची तुमची वलख नव्हती असा अर्थ नव्हता

बरे जाहले ते उत्तम हल्ली उभयतास आणोन त्याकडून जाबसाल हुजूरसंबंधी होणे ते उलगडोन घेणे गोविंद दासो याजकडे हामीचिठ्या आहेत त्या निकडीने घेऊन राजश्री खंडो मोरेश्वर परांडेकर याजकडे देऊन ऐवज राजश्री आनंदराव रामचंद्र याजकडे ऐवज देऊन दोनी निशा करून घ्याव्या आणि हुजूरची कामे प्रांत व गुल आपले स्वाधीन करून घेणे येविसी दिवसगत न लागता सत्वर उलगडेत येई ते करावे जाणिजे सुा खमस तिसैन मया व अलफ रा छ. २९ जिल्काद.

लेखांक १३३

तारीख २८–६–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४२

राजमान्य राजश्री परशराम रामचंद्र यास आज्ञा केली येसीजे तहाचे बोलणे ठरल्याप्रमाणे फडशा व्हावा त्यास राज्यावरी कसाले कसकसे पडत आले हे सर्व तुम्ही जाणतच आहा तशात करार जाहाल्यास फेर पडू नये हें जाणोन आज्ञा घेऊन येवजाची तरतूद कांही करून पाटविली येवज दीड लाख घेऊन गुले सोडावी पुढे तीन लाख रुपयेची निशा चारसाल सांगोन तालुका हुजूर घ्यावा त्यासंबंधे कलमे पाडाव सोडावी त्या पौ काय पावले ते पावले बाकी जे असेल ते सोडावे त्यात राहिले त्याचा पथा जेथे लागेल तेथे करून हुजूर विनंती लेहून हुजूरून त्यास आसरा होऊ नये तुमचे तर्फेने उलगडोन येणे पो आज्ञा करून देविले जाईल वसूल वजा यावा व चारसाले हप्तेबंदीचा यैवज देणे तो जे समई आज्ञा करून देऊ ते समई व्याज एकोत्रा प्रमाणे काढून येवडा घ्यावा आजीपर्यंत जाहली गोष्ट येत नाही कोणीकडून तरी जाहाले असता हुजूरच दोष येतो बरे जाहले ते जाहाले ते जहाले इतकायाउपरी आज्ञेप्रमाणे तोडीवरी घेऊन जाबसाल उलगडावयाचे हे निखलस विनंती लिहून पाटवावी हुजूरची परीक्षा बहुत पाहावी हे उत्तम नव्हे जेथील जैसे सोईस पडेल तसे जाबसाल उलगडेत येत आसे करावे जाबसाल उलगडल्यानंतर हुजूरचे दर्शनाचा योग घडावा हा योग घडलेअंती परस्परे किंतु परिहार होईल हुजरून जाबसाल बोलणे गेले ते तिकडेच जाऊन बसले निकडीने आज्ञा जाली आसता तपशीले विनंती लिहितात स्वामीच्या आज्ञेचे साभिमानी आहा तुमचेही चितास दिवसगत लागोन राज्य पेचात यावे असेच आसल्यास चिंता नाही येविसीची विनंनी सविस्तर राजश्री बच्याजी बलाल यासी बोलोन हुजूर विनंतीपत्री लेहून पाटवावे आतःपर चितात विकल्प न धरिता जाबसाल सरलपणे उरकून आपल्या वाट्यास येश ये आसा अर्थ करावा इतकायाउपरी कोणत्या गोष्टीची परीक्षा आपण पाहावी हे ठीक नव्हे. राज्याचे अकल्यान इछिले असता आपणास लौकिकावह नव्हे आज्ञाआन्वये समजोन कार्याचा उलगडा करून विनंती पत्र पाटवावे यातच आपले निष्टेचा भाव

स्वामीचे समजण्यात येईल जाणिजे सुा खमास तिसैन मया व आलफ ता छ २९ माहे जिल्काद (तारीख २८–६–१७९४)

लेखांक १३४

तारीख २८–६–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४६

राजमान्य राजेश्री आनंदराव रामचंद्र यासी

आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंतीपत्र राजश्री राघो जिवाजी बाा पाठविले ते प्राा होऊन लेखनार्थ निवेदन जाहला व मशारनिल्हेनी विनंती केलेवरून विदित जाहाले कितेक तपसिले विनंती लिाा आशास पेशजी तुम्हास आज्ञापत्र सादर जाहालेच आहे त्याप्रमाणे स्वामीसेवा करून दाखऊन कृपेस पात्र होणे कोणेविसी संशय न धरिता वेदशास्त्रसंपन्न राजश्री जोसीराव यासीही सांगोन हुजूरची कामे सत्वर उलगडोन येईल ते करावे यादीचा मजकूर व तुमचे कामाविसी विनंती लिाा येविसी राजश्री बच्याजी बलाल यासी आज्ञा जाहाली आहे त्याणी तुमची खातरजमा केलीच असेल वारंवार संशय चितात घेणेचे कारण नाही जाणिजे सुा खमस तिसैन मया व अलफ राा छ २९ जिल्काद.

लेखांक १३५

तारीख ११–७–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४४

राजश्री गुजाजी गाईकवाड सरखावास बापू गोसावी यासी

सकलगुणालेंकरन अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य

राघो जिवाजी आळतेकर कृतानेक आशिर्वाद विनंती येथील कुशल ताा छ १३ जिल्हेज जाणोन स्वकीय लेखन करीत जाव विशत्र आपण पत्र पाा ते पावून सविस्तर कलल हुजूर आला होता तेविसी बोलोन गेल्याप्रमाण कार्याचा उलगडा जलद देवू अशी गोष्टी सत्य करावी ही आज्ञा त्यास इकडून मजकूर साध्यांत लिहून आपल्याकडील गडी पत्र घेऊन आला होता त्याबराबर बुधवारी दोनप्रहरा लखोटा दिल्हे आहे तो येवून पावलाच असल त्याजवरील सविस्तर निवेदन जहाले आसल काली छ १० रोजीची पत्रे आपली आली त्यास इकडील मजकूर तर हुजूरचे बोलण्यासंबंधी राजश्री आनंदराव भाऊ ज्ञाहाले असा सिधांत जाहला दीडलक्ष ऐवज याजकड आला बाकीची बाकी हे भरणार याच्या इतल्यान कोन्ही बोलणाऱ्यानी बोलावे ही हुजूरची आज्ञा त्यापक्षी सर्व-

त्राच चाले राहिले मात्र पत्र पाठविले होत त्यात लिा होत कीं हारी भास्कर व गोविंद नाईक याचे हातून राजश्री आनंदराव भाऊची खातरजमा करवत जावी त्यापक्षी त्याजकडून राहिल अस जहाले होत ऐसी पत्री लिहिल होत हाली काली गुरवारी सायंकालपासोन आणिखी आनंदराव याजकडे गोविंद नाईक यानी राजश्री बचाजीपंताच विद्यमान वळण लाविला आहे जे याप्रमाण वसूल वजा देताही खातर-जमा आणि हरबा अण्णाकडून भाऊस सांगवितो भाऊनी पंचवीस हजाराची खातरजमा सांगावी यैसी अक्षर गोविंद नाईक बोलो लागला त्याजवरून बचाजीपंतानी आनंदराव भाऊस बोलोन करार केला आहे हा येक मार्ग बोलावे जाहल्यास ठीक करून घेऊन हरि भास्कर अगर त्याकडील कारकून येवून त्याची समक्षता जहाली नंतर मग हुजूर निवेदनार्थ मला पत्र देऊन पाठवून देतो आणि हुजूरून काम उलगडून आणवितो असा करार ठरोन गोविंद नाईकास सांगितल आहे हा एक मजकूर ध्यानात आणोन करार करून ठेविला आहे नागावाचा व म्हैसी बैल असल ते देणे प्राप्त आणि पंचवीस हजार रुपयाची सविस्तर जमा कसी त्याविसीची मी आल्यानंतर आज्ञा समजोन व्हावी लागेल ही विनंती हुजूर करून ठेवावी बहुत काय लिहण लोभ करावा ही विनंती.

लेखांक १३६ तारीख ११–७–१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १४३

पौ छ १४ जिल्हेज मंदवार सुा
खमस तिसैन

राजेश्री सरखवास बापू गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो बच्याजी बल्लाल आसीरवाद विनंती येथील कुशलता छ १३ जिल्हेज भ्रगुवार जाणोन स्वामीचे आज्ञा असावी विशेष आपण छ १० मिनहूचे पत्र पा ते रोज गुा सायंकाळीं प्रा जाहाले लिा साद्यंत कलले वेदशास्त्रसंपन्न राजश्री जोसीराव याजकडील व हरि भास्कर याचे येकवाक्यतेचे बोलणे जाहालेचा मजकूर लिहाव यादीचे कराराप्रमाणे कामे होऊन यावी व दोही कामाचे उलगडे पडत ते करणे म्हणोन लिा ते कलले आशास हा मजकूर छ १० रोजी सविस्तर लिहून पाच आहे नंतर राजश्री गोविंद नो यासी बोलण्याचा नाद चालतच होता त्यास रोजगुदस्त गोविंद नो याणी येऊन सांगितले की यादीप्रमाणे वसूल वजा घालवाव हे बोलणे राजश्री हरि भास्कर बोलतात आनंद रायानी समेक्ष होऊन समजोन घ्यावे आणि पंच-वीसा हजाराची खातरा सांगावी तदोतर आनंदरावासी नाईकाची समक्षता करून बोलणे हरबा आणाकरून समजोन घ्यावे आणि ठरावात आणून हुजूर विनंतीपत्र आनंदरावानीं

देऊन राजश्री राघूपंत याची रा करितो ऐसे उत्तर सांगितले याविसीचे सविस्तर राघोपंतानी आपल्यास लिा च आहे त्यावरून कलेल राजश्री आनंदराव भाऊ यानी आम्हास पत्र पाठविले तेथे लिहिले कीं घराच्या कामाकरिता वेळू वासे सर वगैरे आणवितो गावास ताकीदी व मामलेदारास आज्ञापत्र व दस्तक येणेप्रो पाठवावे त्यावरून आपण हुजूर विनंती करून सदरहू प्रो मौजे मजकुरी येथ ताकीद व प्रसिद्धगडचे मामलेदारास आज्ञापत्र व दस्तक याप्रमाणे आनंदरावजीस आपले उतरसुद्धा रवाना केले कळावे सदरहू लिा आन्वये गोविद नाो याचे विचारे रा हरि भास्कराची व आनंदरावजीची एकवाक्यता ठरवून राघोपंताची रा आनंदरावजीची विनंती पत्र हुजूरचे शेवेसी देऊन करवितो निवेदन करावे राजेश्री बाजीराव माने म्हसवाडकर याजला वीस हजार रुपये आनंदरावजीनी उसणी पावती द्यावी म्हणोन हुजूरची आज्ञा त्यास आनंदरावजीकडील काम ठरावात यावे आणि नंतर पावती येईल असे बाजीराव दादा यासी आनंदरावजी सांगतात व मी सांगतो परंतु त्याची मर्जी विशेष दिवस जाहाले त्यापक्षी विनंतीपत्र तुम्ही द्यावे हुजूर जाऊन दिल्यास रोख रुपये मागूं किंवा दीड लक्षाचे निशेच्या एवजा पौ मागूं किंवा आज्ञे प्रो करू ऐसे म्हणतात यास्तव विनंती हुजूर करून बाजीराव दादा यासी आज्ञापत्र हुजूरचे पाठवावे जे च्यार रोज सबुरी खाऊन काम करून घ्यावे उतावली करू नये ऐसे आज्ञापत्र जरूर पाठवावे आवकाश पडल्यास ते येतील या अर्थे जरूर बाजीराव दादास आज्ञापत्र पाठवावे बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

तारीख १४–७–१७९४

लेखांक १३७

श्री

अ. नं. ६४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२१ आनंदनाम संवत्सरे आशाढ बहुल द्वितीया इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी या

णी हरीगुरुभक्त पराय-
ण मोतीगिरी गोसावी

यासी दिल्हे पत्र ऐसजे तुम्ही करवीरचे मुा स्वामीसंनिध विनंती केली की आपले गुरूची समाध सणवार पेठ सिवापूर का कोल्हापूर येथे मठ बांधोन समाधी बांधीत आहे माहाराज कृपाळु होऊन मटास व समाधीस जागा करार करून द्यावा आणि समाधीचे उर्जेबदल इनाम जमीन करून देऊन मो सनदा सादर व्हाव्या म्हणून विदित केले त्यावरून स्वामी कृपाळु होऊन पेट मा।री जागा करार करून दिल्हा या जागेची हद महदुक लांबी रुंदी हात सुमार

बि ताा

समाधीस जागा हात सुमार

पूर्व पश्चिम लांबी	उतर दक्षण रुंदी हात
हात ५२	सुमार ३५

प्रतीवसक मटाचा जागा

पूर्व पश्चम लंबी हात	उतर दक्षण रुंदी हात
६०	३७

परसु मटा नजीक जागा

उतर दक्षण लंबी हात	पूर्व पश्चम रुंदी हात
५२	४०

येणे प्रमाणे चतुःसीमापूर्वक समाधीस व मटास व परसु करावयास जागा करार करून दिल्हा आसे व समाधीचे उर्जेबदल मठानजीक जमीन कीर्दीची दूपिकी भातरोप सेत कुक-डेश्वर बिघे ८५ पाच करार करून दिल्हे आसेत. तरी तुम्ही सदरहू जमीन चतुःसीमा करून आपले स्वाधीन करून घेणे आणि इनाम जमीन तुम्ही व तुमचे सिष्यपरंपरा अनभऊन स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून समाधीची उर्जा करून सुखरूप राहाणे जाणिजे निर्देश समक्ष.

मर्या
देयं विरा
जते

लेखांक १३८ तारीख १८-९-१७९४

श्री गणपती

तालीक

रु. नं. १

अ. नं. १४७

चिरजीव राजश्री रामचंद्रपंत आपा यासी प्रति परशराम रामचंद्र आसीर्वाद उपरी राजमंडलाकडील तालुका सालगुदस्त स्वारी होऊन घेतला तो तीन लक्ष रुपयेत गाहण आहे त्याचा करार चार सालत येवज द्यावा त्यास हाप्तबंदी पनाली मल्का-पुरी............................रुपये

७५००० सन खमस तिसैन चैत्रमास
७५००० सन सीत तिसैन चैत्रमास
७५००० सन सबा तिसैन चैत्रमास
७५००० सन समान तिसैन चैत्रभास

३०००००

या प्रमाणे तीन लाख रुपयाची निशाचिठी राजश्री आनंदराव भाऊ याची घ्यावी व सदरहू शिवाय दरबार खर्चाचे एकतीस हजार रुपये सन खमासच्या कार्तिक अखेरीस

द्यावे याप्रमाणे निशा घेऊन साल गुा स्वारीत तालुका घेतला आहे त्याची मोकलचिठी द्यावी व आलत्यावरी घोडी वगैरे पाडाव गेली आहेत त्याचा पत्ता लागेल ते देऊ व सेनापतीची वस्त्रे व दीड लक्ष रुपयेचे व्याज बाराआणे प्रमाणे वैशाख अवलपासून हाली राजश्री जोसीराव याचे चिठीचे मिती तागायत बहैसी व स्वामीचे चालवावे याप्रमाणे करार करून घेऊन चिठ्या द्याव्या आलत्याची खडी चिरंजीव रा हरबा आणा व आनंद-राव भाऊ पेशजीच्या रद कर्जात आहेत त्याशिवाय जी आम्हाकडे आहेत ती याप्रा चिठी देऊन हवाली करावी याप्रमाणे निशाचिठी दिल्ही आस्ता दिकत करू नये दीड लाखाचे व्याज वैशाख शुा प्रतिपदापासून झाडून यैवज चालीस हजार रुपयाचा पली चिठी दिली आहे हा ऐवज येई तो पावेतो व्याज करून त्याची निशा घेणे आणि ठाण्याची चिठी देणे छ २३ सफर सन खमास तिसैन मया व आलफ बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

लेखांक १३९ तारीख ४-१०-१७९४.

श्री

रु. नं. १

अ. नं. १४९

नकल

छत्रपति

राजश्री परशरामपंत भाऊ स्वामीचे शेवेसी पौ आनंदराव रामचंद्र सां नमस्कार विनंती उपरी राजमंडलाकडे सरकार खंडणीचा ऐवज आर्बेसाली करार केला त्याज पौ आम्ही द्यावयाचा करार राजश्री बाल जोसीराव यानी भाद्रपदमासी बोलोन ठराविले प्रो हप्तेबंदी

बीाताा पनाली मलकापूर रुपये

७५००० आनंदनाम संवत्सरे चैत्रमास अखेर

७५००० राक्षसनाम संवत्सरे अखेर चैत्र

७५००० नळनाम संवत्सरे चैत्र अखेर

७५००१ पिंगलनाम संवत्सरे चैत्र अखेर

३००००१

एकूण तीन लक्ष एक रुपये सदरहू प्रमाणे हप्तेने द्यावयाचे त्यास श्रीमन्महाराज राजेश्री याजकडील तालुका गुा स्वारीत घेतला आहे तो जराबाजरा हवाली आमच्या केला असता आम्ही हुजूर सोडून देऊन कराराप्रमाणे हप्तेच्या हप्तेस ऐवज पावता करून देऊ खेरीज तालुका हवाली जाहाल्यापासून दोन महिनने एकतीस हजार दरबार खर्चाबद्दल

द्यावयाचे ते कराराप्रमाणे पावते करू रा छ ८ माहे रावल उर्फ अश्विन शुध सन खमस तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती. १०

लेखांक १४० तारीख २९-१०-१७९५

श्री

रु. नं. १

अ. नं. १६२

यादी आदमासे येवज १

२

३०२००० आठ गाव पैकी गाव सात वी॥ बालाजी तुकदेव यकंदर साल मक्ता करार रु॥

२०००० येन रुपये

३००० बटे बाबत

....

२३०००

पौ।

२१०००० वर्षे ७ दर ३०००० प्रो

९२००० वर्षे ४ दर

....

३०२०००

२८८००० समत कटकोल तालुके तोरगल इ॥ सन समानीन तागाईत सन खमस तिसैन आखेर यो वर्षे १६ चवे दरसाल म॥ मजकूर व सिबंदी वज्रा करून रसद दरसाल रुपये १८०००

२८८०००

२२००० मौजे सेनगाव खमास समानेन ता॥ सन खमस तिसैन आखेर यो वर्षे ११ दरसाल रुपये २०० प्रमाणे येकून रुपये २२०००

५५००० किनगाव नजीक भुदरगड

मौजे उत्तर

मौजे भाटीवडे

मौजे नवले

मौजे मेघोली

मौजे मोरेवाडी

गाव ५ पाच दरसाल रुो ५००० प्रमाणे वर्षे ११ एकून रुो चिकोडी तालुका सन इहिदे समानीन ताो सन आर्बा समानेन वर्षा ४ याचा येवज यावा कला

८७१८८ सन आर्बा समानेन व सन खमास समानेन येक

३११०० घहका बाा खाो

५६०८८ वसूल माौ पाौ

....

८७१८८

१५००० कडलगेकर सालीना रु. १००० प्रमाणे साले १५ येक रुपे सन इहिदे समानेन ताा सन मजकूर

१८००० हरली दरसाल रुपे १२०० प्रमाणे सन इहिदे समानेन ताा सन माार येाा वर्षे १५ येाा

१५००० मौजे भिवशी दरसाल रुपे १००० प्राो १५ साले याौ सन इहिदे समानेन ताा सन माार

२४०० मौजे सेलोंली दरसाल बाबती रुाा २०० प्राो साले १२ याो रुाो

३७५००० मनोली तालुका बारी पैलीकडून यैवज दरवर्षी ७५००० प्राो वर्षे ५ येको रुपये

३७९०८ मनोली तालुका कयांत मुरगुड वसतीगीर व सिदनुर गाव बटनाल याो दरसाल ११२००० प्राो वर्षे ९ याो रुाा १००८००० रुाा पैकी वजा दरसाल

५५२९०॥= सिवदी

४४६७ खेरीज मुशाहिरा

१२०० देवस्थान

६८३०॥ जमेदार

....

६७७८८८२

नऊ साल वजा रुपये

६७००९२

बाकी...............

३३७९०८

४००००० ठाणे सिरोल येथील जमा दरसाल रुो खर्च वजा पो मजकूर

व सिबंदी वजा होऊन रसद दरसाली २५०००

प्रमाणे वर्से

सन इहिदे समानेन ता। सन मजकूर यको वर्षे १६ येकून रुपये

चार लक्ष

.. ..

१६१७४९६

छ १५ रालाखर सन सीत तिसैनात

टीपः–(यांतील आंकड्यांचा मेळ जमत नाहीं)

लेखांक १४१ तारीख २९–१०–१७९५

श्री

रु. नं. १

अ. नं. १६१

याद तह संबधी देणे एकंदर बी॥ ता॥ सन खमस तिसेन

१५०००० सन इहिदे समानेन पौ गुमुट सिरोल

६५०००० सन अर्बा समानेन पौ

५००००० मनोली बाबत

१५०००० हुजुरने हस्ता साडेपांच लक्ष पौ आदा होऊन बाकी देण

....

६०००००

५००००० सन अरबा तिसैन

५००००० मनोली व सिराले आटगाव येथील आकारा बा। सिबंदी रसदी वजा करून आकारा बा देणे हिसेरसी

० परभारे हुजूरने वैवाट सबब

....

५०००००

....

१३०००००

सदरहू प्रमाणे तालीक रामचंद्र जोसीराव याजकडे दिल्ही तासगांवास जातेसमयी सन सीत तिसैन छ १५ रोखर

लेखांक १४२ तारीख २३-१२-१७९४

श्री

रु. नं. १

अ. नं. १७६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२१ आनंदनाम संवत्सर पौष शुद्ध १ भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमाने राजश्री गंगाधरराव गोविंद यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री परशराम रामचंद्र याजकडे द्यावे याबद्दल राजेश्री कृष्णाजी नाईक नरगुंदे याजकडोन राजेश्री अबाजी नाईक परांडेकर यानी च्यारे शाला (साला) निशाचिठी पनाली मल्कापुरी नख्ते रुपये एक लक्ष वीसहजार दरसालीना तीस हजार हप्तबंदी बरहुकूम निशाचिठी १२०००० घेऊन राजश्री आनंदराव रामचंद्र याजकडे दिल्ही सदर्हू ऐवजास आबाजी नाईक परांडेकर याजकड गाव यादी बरहुकूम देह रास चौदा १४ दिले असत सालोसाल ऐवज हप्ता प्रमाणे नरगुंदे याजकडे पोचता करून देतील करारात हुजूरन दिगर व्हावयाची नाही येविसी तुम्ही सावकाराची खातरजमा करून देण जाणिजे बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक १४३ तारीख ६-२-१७९५

श्री

रु. नं. १

अ. नं. १५७

यादी सुा खमस तिसैन मया व आलफ छ १५ माहे रजब माघ वा ३ विो बाबा फडणीस

मनोली सिरोल आठखेडी तालुके
सुधा याकडे खंडणीचा ऐवज देणे
त्याचे व्याज मागू नये

भाऊची स्वारी तासगांवी आ
ल्यावर जोसीराव यानी
माहितगिरीने बोलावे

म्हाकवे बालिंग दोनी गाव
भिरडीकराकडे आहेत ते हुजूर
यावे.

भिवसी माणगाव दोनी गाव
हुजूर यावे.

सन खमसचे साली हप्ते पावणा
लाख रुपये द्यावे त्यास सन सीत
तिसेनापासून सदरहू ऐवज चौ-
साला दरसाल पावणा लाख
रुपये प्रो घ्यावे.

सालमजकुरी दुसाला जो ऐवज
वाजवी निघेल तो द्यावा पुढे
हप्तीबंदी करून देऊन
यैवज देवाव व्याज काढून रुपये
दिल्हेस तुम्ही घ्यावे एकंदर
ऐवज तुम्ही भरणा करून दिला
असता व्याज देऊ

खेडियाचे कतबे घ्यावे कमाविस-
दाराची उगवणी घालावी दर-
सालीना दरसालीना पावणा
लाख.

ठाणे आलते हुजूरचे कमाविसदारा-
च्या स्वाधीन करावे सरल व्याज
एक मनोती घेऊन हिशेबाअंती
बाकी निघेल ती द्यावी

सरळ व्याज व एक मनोतीने
हिशेब करून वाजवी पावती
मजुरा घालोन बाकी ऐवज राजश्री
भाऊसाहेबाचे विद्यमाने जो ठरल
तो सावकारीने द्यावा ऐसे करून
तालुकेच्या बंदोबस्त करावा

दीड लक्षाचे व्याज व जवाहिरा-
बाबत पांच हजार रुपये मागू नये
पैकी दीड लक्षाचे व्याज मागणार
नाही.

हरि भास्कर याबद्दल पंचवीस
हजार व कारकुनीबद्दल साहा
हाजार रुपये मागू नये पंचवीस
हजार याचा जाबसाल आम्हास
ठाऊकन्व नाही साहा हाजार पैकी
पांच हजार मागणार नाही
पंचवीस हजारही मागावयाचे
नाही.

वसूल दुसाल पैकी सन अरबा सन
खमस तिसैनी प्रांती वसुल घेतला
आहे त्यापैकी कारकूनी एक लक्ष
घेऊन बाकी ऐवज मजुरा यावा

वसुल मजुरा द्यावयाचा मजकूर
त्यास सन आर्बा व खमस तिसैन
छ १५ रजेब पर्यंत वसूल तुम्ही
आम्हास द्यावा.

लेखांक १४४ तारीख ६-२-१७९५

श्री

रु. नं. १

अ. नं. १३३

यादी हुजूर निा कामे राजश्री परशराम रामचंद्र याजकडून व्हावयाची विा रामचंद्र श्रीधर काले सुा खमस तिसैन मया व आलफ एकूण कलमे

जवाहिर हुजूरचे तुम्हाकडे आहे ते हुजूर यावे असा करार जोसीराव याचे विा जाहला आहे त्याप्रमाणे यावे. कलम १

लस्करास तीा राजश्री भाऊकड पत्र पाा आहे त्याचे उत्तर येताच जवाहीर सत्वर पाटवितो

तीन लक्षाची परनिशा हुजूरने तुम्हास देविली असता व्याज काटून ऐवज घ्यावा व हाली सदर्हू संमधे कतबे गावगनाचे चौसाला हिसेरसीने दिल्हे आहेत व हुजूरचे आज्ञापत्र गावगनाचे कतबे दिल्हे येविसी उगवून दिल्हे आहेत व यादी ऐसी दिल्ही आहे ती जराबाजरा माघारी द्यावी. कलम १

ऐवजाची परनिशा मुदती आत जाहाली आस्ता व्याज काटून ऐवज घेऊ आणि सदरहू कागद पत्र जराबाजरा निशासंमधी माघरे देऊ आम्हास करारा प्रमाणे हिसेरसीने ऐवज पावला असता गावचे कतबे व मोर्तबी

आलतेचे ठाणे हरि भास्कर व आनंदराव रामचंद्र याजकड कर्जात आहे ते हुजूर निा कादार याचे स्वाधीन असोन वहिवाट न व्हावी......................कलम १

हुजूरचे प्रांतातील वतनदार वारणे-पलीकड राहून तलीतगादा करतील त्यास आश्रा न देता ताकीद करून माघारे गावास पाटवावे. कलम १

आलीकडे येऊन तलीतगादा करू लागतील त्यास ताकीद करून माघारे लाऊन देऊ.

छ १५ रजब सन खमस तिसैनपासून पुढे प्रांतातील वसूल तुम्हाकड जाला असेल तो माघारी यावयाचा तो पावणा लाख रुपये हबतेपो मजरा यावे १

१ वाजबी कमाविसदार याचे रुजंवातीने छ १५ रजब सन खमस तिसैनचे पुढे जो वसूल घेतला असेल तो मजुरा देऊ.

घाट आंबा येथे दाहा आसामी व कारकून ठेविले आहेत पूर्वी पासून कधी नाही किले विशाळगड लगता घाट त्यासी

याद व आज्ञापत्र ऐसी ऐवजाचा
फडशा जालेवर माघारे देऊ
हाती व घोडे द्यावयाचा करार जोसी-
राव याचे विा तुम्हाकडून
जाहाला आहे तेणे प्रमाणे हुजूर
यावे. कलम १
हाती व घोडे तीा राजश्री
भाऊची स्वारी आल्यावर देऊ
अथवा घोडेचे दोन हजार रुपये
देऊ.
कसबे मलकापुरी टंकसाल चालत
असता अडथळा केला आहे चाल-
वणेविसी राजेश्री नाना याचे पत्र
देवावे. कलम १
राजश्री सेनापति याजकडील
तालुका इचलकरंजीकर याणी व
दादा सांवत याणी घेतला आहे
तो सोडून द्याव. कलम १
किला विशाळगड व बावडा
येथील तालुक्यात मध्यस्तीच्या
बोलण्यामुळे विसाजी केशव लेले
यास व दिनकर माहादेव यास
गांव दिल्हे होते ते वारले सबब
गांव तालुक्याचे किलेकडे चालावे
कलम १
येकूण कलमे १५ निभाऊन
यावी.

ते लोक व कारकून उटवलेपाो
(पाहिजेत). कलम १
राजश्री पंतप्रधान याकडून
होऊन यावे राजश्री पंतप्रति-
निधि याकडून कैलासवासी
श्रीपतराव यानी तह केल्या
पासून किले विशाळगडाकडेस
मौजे दुसणे व मौजे पणुंद्रे चालत
आले त्याप्रमाणे चालावे
विशाळगड तालुकेतील मौजे
कडवे कराडाकडे चालते आहे.
कलभ १
हुजूर व राजश्री पंत अमात्य
व राजेश्री सांवत सरदेसाई यांज-
कडे सालसी माहाल चालत
आला त्यांत अलीकडे विज्या-
दुर्गच्या बाबती बसविल्या
आहेत त्या दूर करून पूर्ववत
प्रमाणे माहाल हुजूर चालावा.
कलम १

लेखांक १४५ तारीख ९-५-१७९५

श्री

रु. नं. ४
अ. नं. ७५
पो छ २२ माहे शोवाल सु॥ खमस तिसैन मया व अलफ

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति साहेबाचे शेवेसी विनंती सेवक रायाजी जाधव सरनोबत मा॥ हुजूर पागा दोनी कर जोडून विज्ञापना ऐसीजे बाळकाचे वर्तमान ता। छ १९ माहे शोवाल पर्यंत साहेबाचे पुण्यप्रतापे करून वृत यथास्तित असे साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदून सनाथ जाहाला तेथे आज्ञा जे दागिने करिता रुपये पाटविले आहेत ते घेणे आज्ञेप्रमाणे रुपये पावले दागिनें येतेसमयी घेऊन येतो शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १४६ माहे मे इ. स. १७९५

श्री

रु. नं. १

अ. नं. १५५

यादी कल्मबंदी सुा खमस तिसैन मया व आलफ रुपये १२०००० एक लक्ष वीस हजार चौ साल घ्यावे

राजश्री गंगाधरराव गोविंद मिरजकर याचे नांवे खातरजमेविसी आज्ञापत्र आणून घ्यावे. कल्म १

आज्ञापत्र सादर असे सावकारी खत पत्रे व कराराची यादी को राजश्री आबाजी नाईक परंडकरे याचे नांवे खत राजश्री गंगाधरराव याचे नांवेच घ्यावे. कल्म १

देणेविसी आज्ञा जाहाली असें गांवगना मोकादमानीची खते चौसाल सावकाराचे नांवे घ्यावी. कल्म १

देणेविसी आज्ञा जाली असे हाप्तबंदीफेड येवज मोबदला पडेल त्यास व्याज दरसदे येकात्र प्रो घ्यावे. कल्म १

हप्ता पुढे दरसदे एकोत्रा प्राणे देणे करार.

सदरहू येवज मोबदला पडल त्याचा सालोसाल हिशेब करून घ्यावा. कल्म १

सदरहू येवजास गाव लावून दिल्हे आहेत आमचा येवज पावलेखेरीज मोबदला करू नये मोबदला केल्यास सदरहू गांवची वैवाट गंगाधरराव याचे निा करतील. कल्म १

येवज न पावता फेर व्हावयाचा नाही.

सदरहू येवजास गांवगन्नाचा येवज चवतीस हजाराचा लाऊन घ्यावा. कल्म १

अजमासे यादी पा आहे हिशेबी येवज ठरल त्याप्रमाणे तुमची आधी पुरवणी करून देणे.

फडफारमास वेट बेगार घ्यावी. कल्म १

सालाबाद प्रमाणे हुजूर यावी. करार.

सालदरसाल तीस हाजार रुपये घ्यावे त्यांस गांव लाऊन दिले आहेत गांवचे आकार कमी जाहालेस येवजाची भरती करून घ्यावी कल्म १

को. घ. ३ . . . ९

सद्रहू प्रमाणे करार मनोती दर-
शेकडा रुपये २ प्रमाणे घ्यावे कलम
दोन रुपये सेकडा करार सावका-
रास वेतन दरसालीना रुपये
१५०० सालीना वेतन
५०० कारकून व माणशे
———
२०००

....

कलम १
सरसाल दोन हाजार रुपये ध्यावे
करार
सद्रहू कारकून आा १ व मानसे
आा २ दोन वसुलास येतील त्याची
पोटगी गांव सादीलवारीकडोन
ध्यावी वसूल मिरजेस पावतां
करून घ्यावा कलम १
पोटगी गावगनाकडून पावल.

सद्रहू गावचा येवज कमी पडल्यास
हुजूरने देविला जाईल हिशेब पाहून
आज्ञा होईल आमचा येवज फिटे तो-
परयंत गांवगना सरकारची पागा
येऊ नये कलम १
येणे प्रमाणे करार
हमीची चिठी घ्यावयाची त्यास
राजश्री परशराम रामचंद्र यांजकडून
सोडचिठ्या होऊन गांव आबाजी
नाईक यांचे ताबियात व्हावे सद्रहू
गांव स्वाधीन जाले नंतर सद्रहू
चौसाल हाबतेबंदी बा येवज घ्यावा
म्हणजे चिठी देऊ येक महिनेचे मुद-
तीने बशरत घ्यावी कलम १
येक लक्ष वीस हजार रुो चार सालात
दरसाली तीस हजार चैत्रमासी
घ्यावे याप्रो बशरत चिठी घ्यावी यांत
हाव्हली जाहलेवर रुपये घ्यावे

येकून कलमे सुमारी पंधरा रा छ. माहे सौवाल
मोर्तब असे.

लेखांक १४७ तारीख ३०-६-१७९५

श्रीगणपती

रु. नं. १
अ. नं. १६०

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री रामचंद्र जोशीराव स्वामीचे शेवेशी पो परशराम रामचंद्र सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पा ते पावले कामकाजाचे बोलावयाकरिता राजश्री नारायण जोशीराव यास पाटविला आहे व राजश्री बाबूराव नरसिंव्ह कागलकर यास लिहिले आहेत उभ-यता मिलोन समजावितील म्हणोन लिहिले ते कलले व उभयताच्या सांगितल्यावरून समजले येसीयास दरबारचा प्रकार येविसीचे मारनिले सांगतील त्याजवरून कलले अलत्या प्रकर्णी मार लिहिला त्यास स्वारी तासगांवी आलियावर समजून सांगणे ते सांगितले

जाईल तवपावेतो खटला करू नये असे चिरंजीव रा। हरबा आणा यासही सांगितले आहे रा। छ १२ जिल्हज बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती.
पौ. छ २० जिल्हेज सीत
तिसैन.

लेखांक १४८ तारीख २२-११-१७९५

श्री

रु. नं. १
अ. नं. १६३
याद स्मरणार्थ

१ पेशजी आटगाव वगैरे खेडी व सिरोल्चा यैवज घ्यावा त्यास तालुका वा। राजश्री जोसीराव याचे स्वाधीन करावा हुजूरचे कारकून व तुम्हाकडील कारकुनाचे विचारे हिशेबी बाकी जी निघल ती खिस्तबंदीने हुजूरने घ्यावी जाजती यैवज तुम्हाकडे होईल तो तुम्ही हुजूर द्यावा यैनबोली प्रमाणे हिशेब करावा व्याज मागू नये सिबंदी ठाणेतील पेशजी वैवाटी प्रो। घालावी

१ मनोली तालुका हुजूर द्यावा सदरहू प्रो। तिराईतीने वो। राजश्री जोशीराव याकड द्यावा सिबंदी वजा होऊन बाकी यैवज जो राहील तो खिस्तीबंदीने घ्यावा फाजील जाहलेस सरकारात द्यावा व्याज उयभपक्षी मागू नये.

१ भूदरगड व चिकोडीचे बोलणे उगवून घेऊन करून द्यावे.

१ गैर बोलणी पेशजी तपसीलवार यादीच आहेत त्याप्रो। करून द्यावी.

१ फुटगाव हुजूर सोडून द्यावे याची करार पेशजी कैलासवासी जोसीराव याचे वि। यादी करार कलमबंदी आहे त्याप्रमाणे सोडून द्यावे.

१ मनोलीचा तालुका बारी पलीकडील व कटकोल व तोरगोलचे गाव व धकपटीचा यैवज हुजूर द्यावा.

छ ९ माहे जोवल सन सीत तिसैन मया व आलफ राजश्री नाना जोसीराव

लेखांक १४९ इ. स. १७९५-९६

श्री

रु. नं. १ तालीक
अ. नं. १६५

यादी कलमे राजश्री परशराम रामचंद्र याजकडून कामे होऊन यावयाची सुा। सीत तिसैन मया व आलफ

१ समत कटकोल तालुकेसुधा सन समानेन साली सुरापुराहून राजश्री परशराम रामचंद्र आले ते समई ठाणे घेऊन तालुकेसुधा दाबून ठेविले ते येवजसुधा हुजूर यावे. कलम

१ मनोली तालुकेसुधा गहाणवट आहे त्याचा फडशा होऊन हुजूर यावी. कलम

१ मनोली तालुक्याचा बारीपलीकडील मुलुख व कमत बाबतीसुधा यावयाची त्यास हैदरखानाकडील तह जाहलियापासून हुजूर यावा यैवजसुधा. कलम

१ तोरगल निा फुटगाव राजश्री परशराम रामचंद्र व आनंदराव रामचंद्र ब्र ब आंताजी विठल याजकडे आसतील ते हुजूर यावे.———————— कलम

१ शेषो नारायण व भगवंत आपाजी व श्रीनिवास शेषाद्री या त्रिवर्गाकडे व किलेसमधे वगैरे सरंजामी गाव आहेत ते त्याकडून हुजूर यावे देखील माहाल ब्रहलिंगे येकून...कलम

१ तोरगल तालुक्यातील दहकपटी सन आर्बा समानेनात घेतली तो ऐवज सन आर्बासमधे तहात मजुरा यावयाचा तो मजूरा यावा. ———————— कलम

१ हुजूर निा प्रांत तर्फ आलते व रुकडी व वडगांव व प्रांत कागल व प्रांत खानापूर या तर्फाची गाव व समानगड तालुकेचे गाव सन आर्बा समानेनात परशराम रामचंद्र याणी जप्त केले त्याचा वसूल मजुरा यावयाचा तो आला नाही सबब मजुरा यावा.

१ मौजे सेकोली ता खानापूर येथील प्यादे पटीस बाबतीचा यैवज हुजूर येत होता तो सन आर्बा समानेनापासून येत नाही त्यास माजी सुधामत चालत आल्या प्रो ईस्तकबील पासून हुजूर यावा

१ सन आर्बा तिसेनात परशराम रामचंद्र मौजे उचगावचे मुकामी आले सबब प्रांत जप्त करून वसूल घेतला सन आर्बाचा व सन खमसचा वसूल घेतला तो तहाच्या सिबंदीच्या खर्चाच्या ठरावात मजुरा यावयाचा करार आहे तेणेप्रो दुसाला यैवज प्रांताच्या वसुलाचा मजुरा यावा.———————— कलम.

१ सन आर्बात सिबंदी खर्चाचा येवज हुजूरुन राजश्री परशराम रामचंद्र याजकडे दिल्हा तो यैवज वाडीकर सांवत याजकडून उमजऊन यावयाचा याजविसी प्रधान पंताचे व परशराम रामचंद्र याचे संमत होऊन यैवज वाडीकराकडून उगऊन हुजूर यावा........

१ सन आर्बाच्या तहाचे समधे चिकोडी तालुक्यातील सरंजामी व देसक याकडून दुसाला सरंजामाचा येवज हुजूर यावा.————————

१ चिकोडी तालुक्यातील सरदेशकुलकर्ण व उमलीचा गाव सुधा हुजूर याबे.

१ तालुके चिकोडी तालुक्यासुधा हुजूर यावी. कलम

१ किले भुदरगड तालुक्यासुधा हुजूर यावा. कलम.

लेखांक १५० इ. स. १७९५-९६

श्री

रु. नं. १

अ. नं. १६४

यादी राजश्री परशराम रामचंद्र याकडे तहसंबंधे देणे सुा सीत तिसैन मया व आलफ आदमासे हुजूरून केला तो यो रुपये
१२८३२७७। देणे रुपये

१५०००० ठाणे शिराळे गाहाण सन इहिदे समानेनात ठेविले ते

६३३२७७। सन अर्बा समानेनच्या तहसंबधे

५००००० मनोली बाा

१३३२७७। हुजूरून द्यावयाचे त्यापैकी

५५००००

पावती परशराम रामचंद्र याकडे हुजूरने विाा बाल जोसीराव बद्दल यादी रुपये ४१६७२२.।।।.

बी ताा सदरहूस गाहाणवट खेडी १० गाव ८

....

६३३२७७।.

....

७८३२७७।.

५००००० सन आर्बा तिसैन तहसंमधे देणे रुपये १०००००० पैकी हुजूरने परभारे

२००००० रोख

३००००० सन सीत तिसैन ताा चार साला देणेचा करार

....

५०००००

बाकी देणे पांच लक्ष यासी मनोली व सिरोल

५०००००

व आटगांव येथील दरसाल शिबंदी महाली

खर्च वजा करून बाकी दरसाल राहील त्या
हिसेरसींनें दरसाल घ्यावे. येणेप्रमाणे करार

....

१२८३२७७।

यासी पावती .... रुपये

३९६०००	आटखेडी या पैकी सेणगाव खेरीज करून दरसाल रुपये ३६००० प्रमाणे इ।। सन खमस समानेन ता सन खमस तिसैन येकूण वर्षे ११ रुपये
४६२००	मौजे सणगाव दरसाल आकार ४२०० प्रमाणे साले ११ एकूण रुपये
९४६००	किता भुदरगडानजीक गांव ५ ये।। दरसाल आकार रुपये ७०० मौजे नवले १००० मौजे मेघोली ५३०० मौजे कूर ६०० मौजे मोरेवाडी १००० मौजे भाटीवडे ८६०० येकूण वर्षे ११ येकूण रुपये
२८८०००	ठाणे कटकोल सिबंदी व माहाली खर्च वजा जाऊन बाकी दरसाल आकार रुपये १८००० प्रो सन समानेन ता सन खमस तिसेन येकूण वर्षे १६ यो रुपये
१२०००००	ठाणे चिकोडी तालुकेसुधा व चिकोडी तालुकेतील फूटगाव येकूण आकार सिबंदी व माहाली खर्च वजा करून बाकी आदमासे दर-साल ३००००० प्रमाणे सन इहिदे समानेन ता अर्बा समानेन येकूण वर्षे ४ यो
१०२९००	किता गाव
३१५००	मौजे कडलगे का।। नूल येकूण दरसाल आकार २१०० प्रो सन इहिदे समानेन ता।। सन खमस तिसेन येकूण साले १५ येकूण रुपये.
३६०००	मौजे हरली दरसाल रुपये २४०० प्रमाणे १५ वर्षे ये।। रुपये

१५००० मौजे भिवसी दरसाल रुपये १००० प्रमाणे वर्षे १५
ये॥ रुपये

१८००० मौजे माणगांव दरसाल १२०० प्रमाणे वर्षे १५
येकूण

२४०० मौजे सेलोली ता। खानापूर दरसाल रुपये २००
प्रमाणे सन अर्बा समानेन ता। सन खमस तिसैन
येकूण वर्षे १२ येकूण रुपये

१०२९००

३७५००० मनोली तालुके पैकी बारीपलीकडील मुलुक हुजूर यावा तो हैदराकडील तह जाल्यापासून सन इहिदे तिसैन ता। सन खमस तिसैन येकूण साले ५ दरसाल रुपये ७५००० प्रमाणे येकूण रुपये

८७००० येक साला यैवज सन अरबा समानेन व खमस समानेन जदी

५६००० प्रांतातील जप्तीमुळे वसूल

३१००० धहकपटी तोरगल व मनोली

८७०००

८८०६९५ टाणे मनोळी तालुके सुद्धा भाऊ यानी सन सबा समानेनात घेतले त्यासी दरसाल आकार येकंदर विद्यमाने सेनाखासकील

१४३४२३

पैकी वजा सिबंदी व महाली खर्च वगैरे बाकी ९७८५५ प्रमाणे

४५५३८

सन सबा समानेन ता। सन खमस तिसैनपावेतो वर्षे ९ आकार

६००००० सिरोल व सिरोलाखालील गाव लाऊन दिले ते येकूण दरसाल सिबंदी व माहाली खर्च वजा जाऊन बाकी दरसाल रुपये ४०००० प्रो सन इहिदे समानेन ता। सन खमस तिसैन वर्षे १५ येकूण रुपये

३९७०३९५

याशिवाय फूट गावचा ऐवज ईा पासून आजीपर्यंत पावला असल तो जमेस याव ——— कलम १

सन अर्बा समानीन साली तह समधे रोख पावले ते रुपये

--- कलम १

४१६७२२॥।.

लेखांक १५१ इ. स. १७९५-९६

श्री

रु. नं. १

अ. नं. १६६

यादी राजश्री सुब्राव घोरपडे याचे बोलणे शके १७१७ राक्षसनाम संवत्सरे

राजश्री बालाजीपंत नाना यासी पाटीलबावानी विनंती करून सेनापतीची वस्त्रे आणतील त्यानी पांच हजार रुपयेचा सरंजाम अधिक अनभवाव बाकी सरंजाम सरदेशमुखी व देशमुखी व इनाम गांव व पाटीलक्या व मोकास बाब वगैर जराबाजरा निम्मी प्रमाणे द्यावव म्हणोन राजश्री पंतप्रधान याची आज्ञा राजश्री परशरामपंत भाऊ यासी समक्ष आज्ञा व्हावी १

या बोलगेत राजश्री बहिरोपंत मेखल व राजश्री रामजी पाटील पाटीलबाबा गेलेपासून बालणेत मन घालीत नाहीत.

१

व्यंकटराव नारायण घोरपडे म्हणवीत असता सध्या त्याचे नकल जाहाले आहे त्याजकडे सरंजाम व इनाम गांव व सरदेसमुखी व मिरज प्रांतची देशमुखी वगैरे दोन लक्षाचा यैवज आमचे चालते सरंजामासिवाय आहे ते आमचे आम्हाकडे द्यावे त्यासिवाय पांचशे स्वारानिसी सरकारात शेवा द्यावी दरबार खर्च व सरकारची नजर सवालक्ष रुपये द्यावी. कलम. खासगत सरंजाम सतावीस हजार रुपयाचा आहे सिवाय तनखाबाब वगैरे आहे ती निमेनिम द्याव.

१

सुब्राव घोरपडे थाची मातुश्री व मुले व संताजी घोरपडे याची मातुश्री धाकटी दिवस करून संताजीराव घोरपडे अधिक वर्सानी आहेत.

लेखांक १५२ इ. स. १७९५-९६

श्री

रु. नं. १

अ. नं. २४१

यादी भिलवडीचे मुकामी कृष्णातीरी बसून वडील व दौलतराव व परशरामपत

भाऊ व व्यंकटराव नारायण व याचे कारकून ऐसे सर्वत्रानी आम्हापासी व संताजी घोरपडे याजपासी व्यंकटराव नारायण याचे स्वदस्तुर आमचे वडिलाचे नांव दोन पत्र लिहून घेतली आहेत कीं आम्ही सांगू त्याप्रमाणे तुम्ही मान्य असाव त्यावरून आम्ही दोन पत्र लिहून दिली आहेत बी तपसील

१ पटणकुडी
१ मौजे पांगीर
१ मौजे चिखलव्हाल
कापुस घोलची निमखेडी
एकूण नऊ हाजारचा यो
९०००

१ सुब्राव घोरपडे याजकडे
असावा

---

१ गडीइंग्लज
१ नवल्याहाल
१ रामापूर
१ हारली कापूसघोलची निमी
खेडी एकूण नऊ हाजाराच्या
यो

१ संताजी घोरपडेकडे
असावा

---

१ सेनापतीकड
१ का लाट
१ कसबा कापसी
१ मौजे वाळकी
१ मौजे हेब्बाळ
१ मौजे हसुर
१ मौजे नांगनूर

हे आपआपले कुरुंदवाडकर व
तासगांवकर व भिरजकर वडीलपण
पदाचे पदाकड राहून सरकारची
नजर पडल्याली देऊन धन्याची
सेवा करतात त्याप्रमाणे करावी
कलम १

तेव्हा बजिनस बापही तेच आणि
सेनापतीही तेच पुढ सेनापतीचा
पदाचे सरंजाम वगैरे सेनापति
करतील त्यानी आनभवाव वतन-
मात्र सर्वत्रास विभागून द्याव
कलम १

१ सरदेशमुखी
१ देशमुखी
१ मोकासबाब
१ वगैर वतनीबाब
१ धण्याची कृपा संपादून
गेलेला सरंजाम सोडवून
सेनापतीनी धण्याची सेवा
करावी
कलम १

या प्रो बजिनस यादी करुन वडिलानी आपले दस्तूरचे निशाण करून राजेश्री दादाजी यशवंत याजपासी दिल्हे आहे स्वामीची सेवा व्हावी कटकट तुटावी हा जाबसाल चिरंजीव राजेश्री नारायणराव घोरपडे यानी पुण्याचे मुकामी आपले नांव घालून सनदापत्र करावयाचे केल होत नानानी व पाटीलबावानी बजिनस सुबराव आस्ता नारायण रायाचे नांवावरी कसे होईल ऐसे म्हणून जाबसाल राहिला होता यानंतर पडापड मरामर होताच आम्ही स्वामीचा बोलबाला ऐकूण पायापासी आलो यथ आम्हास ही अवस्था घडली आहे.

लेखांक १५३ तारीख १२–४–१७९६

श्री

रु. नं. १

अ. नं. ७८

(शिका)

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके १२२ नळनाम संवत्सरे चैत्र शुद्ध पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावंतस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री लाला नगीनदास साऊकार मुकाम जंजिरे मुंबई यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही राजश्री नागोजी घाटगे जुंझारराव यासी पत्र पाठविले त्यातील अभिप्रायास विशदे मारनिले यानी महाराजाचे शेवेशी अर्ज केल्यावरुन आवगत जाहाला शौकतपनाह अजम जनराल याचा व महाराजाचा यखलास बैखिलाफ व जेहनबर करार चालत असावा आणि त्याची अभिवृध्दी दिवसेदिवस विशेषात्कारे होत असावी हेच महाराजास जरूर तर असे झुंजारराव मशारुनईले यासी आज्ञा करून मुंबईस रवाना करून पाटवणेस्तव सिधता जाहाले असेत अशास जनरालकडून पत्र झुंजारराव मशारनिले यासी रवाना करून पाटवणेविसी हुजूर येऊन पोहचताच त्याप्रमाणे याची रवानगी त्वरेने हुजूरुन करून पाटविले जातील येबावे पेशजी जनराल यासी पत्रे पाटविली आहेत त्याचे जाबसाल त्वरेने हुजर येत ते करणे आणि तुमचा मनोदय जे माहाराजाचे आज्ञेनरूप सेवेची काजकामे जनराला कडून करून दाखऊन कृपेस पात्र व्हावे यैसा आहे तोही निवेदनात आला हेच तुम्हास योग्य असे मशारनिले तेथे पोहचताच तुमचे व त्याचे विचारेकडून जनरालाचा दिल खुलासा करून

हुजूरचे काजकामाचे मतलब रुबकार होऊन येताच तर्फैन दोस्तीचे खुलासे जाहिरीस पोहचतील महाराजास जनरालच्या यखलासी परते दुसरे कांहीं ज्यादा तर नसे जाणिजे बहुत काय लिहिणे ही

(मोर्तब)

लेखांक १५४ तारीख १-५-१७९६

श्री गणपती

रु. नं. १
अ. नं. १६७

पो. छ. ६ जिलकाद
सुा सीत तिसैन
मया व अलफ

राजश्रीया विराजीत राजमान्य राजश्री रामचंद्र जोसीराव स्वामीचे शेवेसी पो परशराम रामचंद्र सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लिहीत जावे विशेष राजमंडलाकडे ऐवज येणे त्याचा फडशा च्यार सालांत व्हावा असा करार चिरंजीव राजश्री रामचंद्र श्रीधर काले याच्या विद्यमाने तुम्ही करून तालुका सोडवून घेतला असे असता साल मारच्या हपत्याचा फडशा मुदत जाहाली असून होत नाही हे काय ? या उपर दिवस गत न लाविता कराराप्रमाणे हपत्याचे ऐवजाचा झाडा करावा तुमच्या प्रमाणीकतेवरून हा ठराव जाहला असे असोन दिवसगत होणे हे चांगले नव्हे जलदीने फडशा करावा हे न जाल्यास तालुक्याकडे पाहावे लागेल मग रजबदलही चालावयाची नाही रा छ २२ सवाल सुा सीत तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे आम्ही तुमच्या भरवशावर आसे असता अद्यापि ऐवजाची निशा होत नाहीं हे कसे ? आमचे लक्ष सर्व श्रीमंत महाराज याच्या पायासी आसे असतान असे होऊ नये तुम्हीं बहुत प्रकारे खातरजमा केली आहे त्याप्रमाणे शेवटास न्यावी याहून आधिकोतर लिहिणे काय आहे.

लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १५५ तारीख २८-१०-१७९६

श्री

रु. नं. १
अ. नं. १६९
याद सुा सबा तिसैन मया व आलफ

तहसंबंधे राजश्री परशरामपंत
याजकडे माहाराजानी इा
पासोन करार केला त्यात
हुजूरने व परभारे महालाकडून
भाऊ याजकडे इ॥ पासून ऐवज
पावला असेल तो पावोन
बाकी ऐवज येणे म्हणोन पर-
शरामपंत हुजूर महाराजाकडे
मागतात व माहाल ठाणी
दाबून ऐवज घेतात तो त्यानी
घेऊ नये व हुजूर मागू नये त्या
पैकी ऐवज बाकी राहिला
असेल तो माहाराजास नजर
केला असे. .... कलम १

सदरहू प्रमाणे ऐवज आज ता
वसूल पडला असेल तो वजा
करून बाकी राहेला ऐवज नजर
असे.

राजश्री परशराम रामचंद्र आपले लक्षा-
खेरीज परभारे कारभार करितात या·
करिता त्याजकडील सरंजाम वगैरे जप्ती
व्हाव असे कारण आहे आशास पुनः
त्यानी सौरस्य करितो म्हटल्यास
स्वामीच्या मर्जीच्या संतोषे घेऊन सोरस्य
होणे ते होईल दरम्यान त्याचे सौरस्य
होणार नाही. .... कलम १

स्वामीस समजोन सौरस्य होईल कदाचित
अवकाश न पडल्यास स्वामीकडील रक्षून
होईल.

सरकार निा तो राजश्री परशरामपंत
याजकडे कमाविसीचे वहिवाटीस आहेत
वगैरे तालुके स्वामीच्या लगती आहेत व
परशरामपंत याजकडे सरंजामास आहेत
वगैरे सरंजामी आपणे ठाई दुर्लक्ष आहेत
याजकडील सरंजाम स्वामीनी जप्त करून
ऐवज वसूल करून घ्यावा ठाणी घालावी
ऐवज येईल तो फौजेस मसलतीसंबंधे खर्च
करावा. ——————— कलम १

सदरहू प्रमाणे ठाणी घालावी. × ×
पुढे सरकारचे माहाल सरकारात द्यावे.
स्वामीकडील महाल असतील ते स्वामीनी
घ्यावे.

येणे प्रमाणे कलमे तीन ३ छ २६ रोवल विा बालाजी जनार्दन-

लेखांक १५६ तारीख २३–१२–१७९६

श्री

रु. नं. १

अ. नं. ८३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२३ नलनाम संवत्सरे मार्गशीर्ष बहुल दशमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावंसतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री

दौलतराव शिंदे यासी आज्ञा केली ऐसीजे चिरंजीव राजश्री सुलतानराव निंबालकर बाहादर हे पहिल्यापासोन नवाबवालाजनाब याचे संग्रही आहेत त्याचे बहुमान पुरसार सरंजाम व जागिरी व तनखे व किले व वतनबाब आधीकरून चालत आले होते त्यास सांप्रत तुम्ही नबाबास येतद्विशई लिहून पाटऊन पूर्ववत प्रमाणे निंबालकर मारनिले याचा सरंजाम धारूर व बीड व खराडे वगैरे तालुकेत देह व परगणे आष्टी व वतन बाब आधी करून नवाबाकडून बाहाल होऊन त्याचा त्याजकडे खालसा व्हावा आणि त्याची सरफराजी नवाबाकडून होय तो अर्थ करणे तुम्हाकडे असे हे जाणोन आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी तुम्ही येविषईचा साद्यंत अर्थ नवाबास लेहून पाटऊन त्याचा सरंजाम पूर्वापार प्रमाणे त्याजकडे खालसा होय ते करणे.

लेखांक १५७ — तारीख १२–२–१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. १७१

राजश्री नरसो तुकदेव गोसावी यास

अखंडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो बाजीराव

रघुनाथ प्रधान नमस्कार सु॥ सबा तिसैन मया व आलफ राजश्री दौलतराव घोरपडे हिंदुराव याजकडे कसबे गेकसंब व मौजे भोज प्रांत रायबाग हे दोनी गाव सरंजामास लाऊन दिले ते राजश्री परशराम रामचंद्र यानी आपलेकडे ठेऊन त्याचे मोबदला प्रांत गलगल आपले सरंजामातील घोरपडे यास दिला त्याप्रमाणे चालत आहे हली परशराम रामचंद्र याचे सरंजामाची जप्ती तुम्हाकडे सांगितली त्यास परगणे मजकुरची जप्ती जाहाली त्यास हरदो गावची जप्ती सरकारात करून प्रांत मजकुरचा दरोबस्त अमल घोरपडे याजकडे सरंजामास चालवावे याचा करार करून ही सनद तुम्हास सादर केली असे तर प्रांत मजकुरचा आमल तुम्ही ठाणे जकिरासुध्धा त्याचे हवाली करून कबज घेणे जाणिजे रा॥ छ १४ शाबान आज्ञा प्रो मोर्तब. सदरहू असल पत्र नानासाहेब याजकडे आहेत.

लेखांक १५८ — पौ. तारीख १०--४--१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ७९

श्रीमंत राजश्री शिवाजी राजे महाराज छत्रपति स्वामी याचे शेवेशी सकल गुनालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य........श्रा वेंकटपा नाईक बहिरी कृतानेक

विनंती विज्ञापणा येथील कुशल जाणोन स्वामी याणी आपले कुशल लेख आज्ञा करीत असावे विशेष स्वामियाचा संनिधेत असावा येसे आमचे वासना फार आहे येविसीचा मजकुरास जे सांगायाची सांगोन राजेश्री गिरधर राऊ बाजी घाटके व श्रीपतराव वकील यास सेवेत पाटविले आहे आण राजेश्री दौलतराव घोरपडे यासही पत्र लि॥ आहे राव मजकूर व उभयेतानी विनंती करतील ते ध्यानास आणोन त्याप्रमाणे कृपा करून बंदोबस्ती करून पाटवणार स्वामी समर्थ आहे सर्वप्रकारे संस्थान सुधा आम्ही पदरचे आहो या समयात स्वामीनी उदासीन केलिया आमचा परिनाम होत नाही कृपा करून पदरी घेतलेल्या संस्थानच्या स्थापिना स्वामीनी केल्याप्रमाणे होतात हे येश घेणार स्वामी समर्थ असा बहुत काय लिहिणे कृपालोभ करावे हे विनंती.

पौ छ १२ माहे शोवाल सुा

सबा तिसेन मया व आलफ मु॥ करवीर

लेखांक १५९ तारीख ९–६–१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ८७

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री प्रीतीराव चव्हाण हिमतबहादर ममल्कतमदार यासी आज्ञा केली येसीजे सावनूरकर नवाब अब्दुल खैरख्या दलेलजंगबहादर याचे दौलतेचा बंदोबस्त करून देवणेविसी आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे त्याचे तालुकेचा बंदोबस्त जराबजरा करून देवावा येविसी त्याचीही पत्रे वरिचेवरी हुजूर येत आहोत व त्याजकडील वकील नेहमी हुजूर आहेत + + + आपण त्याचे दौलतीचा बंदोबस्त करून देवावा येविसीचे अगत्य माहाराजास आहे त्याप्रमाणे आपणास असावे नवाबाचे बंधु तेथे आहेत त्याचा बहुमान करीत असावा आणि खातिरतसलीही करीत जावी त्याचे तालुके आहेत ते आपले आहेत यैसे जानोन निगहबानी करीत असावी सावनूरचे शहरात नवाबाची मातुश्री आहेत तरी तेथे लस्कराकडून अथवा हरकोणाकडून उपसर्ग न पोहचे येसी ताकीद करवावी त्याचा परामर्श उतम प्रकारे आपण वरचेवरी करीत असावा तिकडील बंदोबस्ताविषई हुजूरून आज्ञा करून फौजेच्या रवानग्या करून पाटविल्या आहेत येऊन पोहचतील जाणिजे सुा समानतिसेन मया व आलफ रा छ १३ जिल्हेज.

लेखांक १६०

तारीख २६-१०-१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ९३

पिंगलनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध सप्तमी गुरुवासरे सुाा समान तिसैन मया व आलफ छ ५ जमादिलाव मुाा करवीर सावनूरकर नवाब अबदूल खैरखा दलेलजंग बहादर याजकडील वकील राजश्री त्रिमलराव श्रीनिवास वस्त्रे तिवट व शालजोडी व खंजीर येणे प्रमाणे हुजूर येऊन आले व थैल्या समवेत त्याजकडून पत्रे आली होती त्याचे जबाब सवाल व वस्त्रे देऊन हुजूरून नवाबास पत्राची अल्काब

१ पूर्वी हकीमखान यासी मानामरातीब पारसी लिहीत आले त्या प्रो हाली पारसी पत्रे लेहून दिल्ही असत.

१ नवाबाचे ——————— — —— रफअत व अवाली पनाह तहऊर व जलादतदस्त.

लेखांक १६१

तारीख २७--१०--१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ७७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ पिंगलनाम संवत्सरे कार्तिक शुध सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री काशीराव रामजी व वासुदेवराव शामजी निाा नबाब अबदूल खैरखां दलेलजंगबाहादर यासी आज्ञा केली ऐसीजे नबाबाकडून राजश्री त्रिमलराव श्रीनिवास या हमराह थैली समवे पत्र व वस्त्रे शालजोडी व तिवट व खंजीर येणे प्रमाणे माहाराजाचे सेवेसी पाटविल्या प्रमाणे हुजूर प्रविष्ट जाहाली व मशारनिलेनी मुखोतरे कितेक कार्यभागेचे अर्ज केले ते निवेदन होऊन येविसीईचे बंदोबस्ताची आज्ञा होणे ती जाहाली आहे आणि पुण्यासही राजश्री पंत प्रधान व बालाजी जनार्दन फडणीस व दौलतराव शिंदे यासी हुजूर आज्ञापत्रे सादर ज्ञाहाली आहेत त्याची उत्तरे येताच त्रिमलराव याची रवानगी करून पाटवितो पूर्वीपासोन त्या संवस्थानचे अगत्य माहाराजास आहेच त्याप्रमाणे बंदोबस्त नवाबाचे मनोदयाप्रमाणे घडोन येईल हुजूरच्या फौजाही त्या सरहदेस त्वरेनच येऊन पोहचत आहेत तुम्हाकडीलही जमावाची तयारी असो.देणे कलावे राजश्री धोंडो बलाल गोखले यासीही आज्ञापत्रे सादर जाहले असे. कलावे जाणिजे.

लेखांक १६२ तारीख २७--१०--१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ७६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ पिंगलनाम संवत्सरे कार्तिक शुद्ध सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री मलद वीरणगोंडा बाहादर देसाई व सरदेसाई पौ देवर हुबली वगैरे माहालानिहाये यासी आज्ञा केली ऐसीजे येकबाल पनाह नवाब अबदूल खैरखां दलेलजंगबहादर याचे दौलतीचा अगत्यवाद पूर्वीपासोन माहाराजास आहे हे जाणोन त्या दौलतीची काजकामे करीत आला आहा त्याप्रमाणे हली तुम्ही त्याचे लक्षात राहून त्याजकडून कार्यभाग जेसमई सांगतील त्याप्रमाणे जमावसुधा सामील होऊन त्याजकडील कामकाजे करीत जाणे राजश्री त्रिमलराव श्री निवास नि॥ नबाब बहादर याणी हुजूर तुम्हाकडील निष्टेचा अर्थ निवेदन केला तो आवगत जाहाला तुम्ही माहाराजाचे आज्ञेनरूप सेवा करून कृपा संपादून घेणे तुमचे मनोदयानुरूप संवस्थानचा बंदोबस्त माहाराज कृपा करून देवितील सांप्रत हुजूरच्या फौजा त्या सरहद्देत रवाना जाहाल्या आहेत तुम्ही आपले जमावानिशी सामील होऊन आज्ञेनरूप सेवा करून कृपा संपादून घेणे जाणिजे लेखन सिमा.

मर्यादे
यंविरा
जत.

लेखांक १६३ तारीख १--११--१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. १७५

स्वास्थि श्री राज्योभिषेक शके १२४ पिंगलनाभ संवत्सरे कार्तिक शुद्ध द्वादसी सोम्यवासरे क्षत्रिय कुलवंतस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री नारायणराव घोरपडे यासी आज्ञा केली यैसीजे चिरंजीव राजश्री हैबतराव गाईकवाड सरखवास याणी तुम्हास लिहिले आहे त्यावरून कलेल व राजश्री वेंकोजी नाईक पिसाल यासी आज्ञा जाहाली आहे आज्ञेप्रमाणे मारनिले सरंजामसुधा हुजूर येणेविसी सांगतील त्याप्रमाणे सरंजामसुधा सत्वर हुजूर यावयाचे करावे जाणिजे बहुत काय लिहिणे

शिका

मर्या
देयविरा
जते

लेखांक १६४ तारीख २१--११--१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. २३०

राजमान्य राजश्री नारायणराव घोरपडे यास आज्ञा केली ऐसीजे तुम्हास हुजूर येणेविसी आज्ञापत्र हुजरे समागमे सादर जाहाले त्याजप्रमाणे सत्वर हुजूर करवीरचे मुा निघोन येण जाणिजे सुा समान तिसैन मया व अलफ रा छ १ माहे जादिलाखर बहुत काय लिहिणे.

लेखांक १६५ तारीख २७–११–१७९७

श्री

रु. नं. १

अ. नं. ७८

सावणूरकर नबाबास साहित्य पत्रे दिल्ही निा राजश्री नीलकंठ राबजीस

विशेष तुम्हाकडून बहुत दिवस पत्रागमने संतोषावाप्ती होत नाही तरी सदैव प्रेशीत पत्री सांभालास अविस्मर असावे सावणूरकर नबाब अबदूल खैरखां दलेलजंगबहादर यांचे दौलतेविसीचा अगत्यवाद महाराजास बहुत आहे अशास त्याचा सरंजाम खालसा होऊन येणेविसी साहित्य पत्रे आपले विद्यमाने श्रीमंताची व राजश्री दौलतराव शिंदे याची निखालसरीतीने त्याची दौलत सरंजामसुधा पूर्ववतप्रमाणे त्याची त्याजकडे चालोन देशकीर्ति आपण संपादावी हे जाणोन लिहिले असे तरी येविसीचे अगत्य धरून कार्यभाग घडोन येई तो अर्थ करावा पूर्वीपासून नबाब हे घरणदाज मातबर अमीर याची स्थापणा दौलतेवरी केलियाने कीर्तिस्पद असता विस्तारे ल्याहावेसे काये आहे ? मागाहून हुजूरूनही नबाबाचे साहित्याविषई आज्ञापत्रेही सादर होऊन येत आहेत पेशजी हुजूरचे कार्यभागाविसी चिरंजीव राजश्री महिपतराव याणी राजश्री देवरावबाबा चिटणिवीस यास लिहिले आहे त्याप्रमाणे आपले पत्र हुजूर पाटवावे वरकड साद्यंत अर्थ चिरंजीव राजश्री नरसिंगराव मल्हार आपणास सांगतील त्यावरून कलो येईल बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती

राजश्री सखाराम घाटगे सर्जाराव यासी विशेष सावणूरकर नबाब अबदूल खैरखां दलेलजंगबहादूर याचे दौलतेविसी व सरंजाम खालसा होऊन येणेविसी साहित्यपत्रे श्रीमंताची व राजश्री दौलतराव शिंदे याची निखालसरीतीने त्याचे दौलत सरंजामसुधा पूर्ववत प्रमाणे त्याची त्याजकडे चालोन येश आपणास येई तो अर्थ करावा हे जाणोन लिहिले असे तरी येविसीचे अगत्य धरोन कार्यभाग करून पाटवावा पूर्वीपासून नबाब हे

घरंदाज मातबर अमीर याची दौलतेवरी स्थापणा करणे हे आपणास योग्य आहे कळेल बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती.

२ वरकड सविस्तर चिरंजीव नरसिंगराव मल्हार सांगता रवानगी छ ७ जमादिलाखर सुा समान तिसैन मया व आलफ मार्गशीर्षमास सुा करवीरहून पत्रे पाली आहेत.

लेखांक १६६ इ. स. १७९७

श्री

अ. नं. १७८ इ. स. १७९७

यादी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी गोवेकर सौंस्थानी + मार्चेल + सकरताल फिरंगी याज + + न त्याचे आश्रित + + याणी हुजूर करवीरच्या + + मी येऊन राजश्री सुबरा[illegible] पंडित आमात्य + + + माने तहनामा गोवेकर सौ + + + + + + सु॥ समान (कागदाचा अर्धा बंद फाटून गेला)

२

१ सदरहू खंडणीचा यैवज कैलासवासी संभाजी माहाराज यांच्या कारकीर्दीपासून आजपावेतो संवस्थानाकडून यावयाचा त्याचा फडशा मारचेल काम व + करताल यासी बोलोन सदरहू आन्वये करून देतील.

फिरंगी दस्तुरची मखलासी लिहिल

कलम + + (करार.)

१ हुजूरचे माहाल गोवेकर संवस्थानिक याकडे हली वैहिवाटीस आहेत ते कैलासवासी संभाजी माहाराज याच्या कारकीर्दीत हुजूर होते त्या आन्वये हली हुजूर द्यावे.

+ + +

किल

१ आंत्रुज माहल गावगना सु +
५ फोंडयाचे माहाल ठाणे व गावगना
५ जाबोली पंचमहाल ठाणे व गावगना
१ माहाल सांगे गांवगना सुधा
१ जकायेती नाकेबंदीच्या व बाब + + तालुकियात सदरहू माहल स + + असतील त्या

१४

सदरहू माहाल व किला व ठाणी येकून + + दा हुजूरची हुजूर दिल्ही असेत

फिरंगी दस्तुरची मखलासी
लिहिले कल्म करार

१ वाडीकर सांवत याच्या तैनातेस
+ + + + +
+ + +

(खालील बंद त्रुटित आहे)

फिरंगी दस्तुरची + +

+ +

माहाराज याच्या कारकीर्दीस + +
ते ते हाली हुजूरचे हुजूर द्यावे.

१ जंजिरे कूर्मगड तालुकेसुधा +
१ जंजिरे खोलगड तालुकेसुधा +
१ जंजिरे सदासिवगड तासुकेसुधा +
५ आकोले ठाणे पंचमाहाल तालु + गावगनासुधा
१ ठाणे सुपे गावगना तालुका + + धा
१ महाल पैजणी गावगनासुधा

१०

सदरहूप्रमाणे किले व ठाणी +

+ ÷ + ÷

(त्याच्या पाठीमागील बाजू)
दाहा हुजूरचे हुजूर स्वामी + +
गोबेकर सौंस्थानिक फिरंगी याचा वारसा + ही
फिरंगी दस्तूरची मखलासी
लिहिले कल्म करार

५

येकून कलमे पांच स्वामीचे सेवेसी करार करून दिल्ही आहेत येणे प्रो गोवेकर सौंस्थानिक याजकडून हुजूरचे सेवेसी चालतील.

फिरंगी दस्तूरची मखलासी की
पाच कल्म लिहिले प्रो करार
चालऊ.

... ...

(एक त्रुटित बंद)

\+ \+ \+

× × समघे करोन दिल्हा × ×

१ संस्थान गोवे + +

खडी १ येक खडी दोहो वर्षां नंतर पुरा + + पासोन गोवेकर याणी द्यावयाचे त्या + + (अ) जमास रुपये ३२१००० तीन लक्ष येकवीस हजार द्यावयाचे त्याची हिसरसी दरसाल रुा १०७०००

येक लक्ष सात हजार रुा सालदरसाल हुजूर द्यावयाचा करार केला असे सदरहू प्रो सालदरसाल गोवेकडून स्वामीचे सेवेसी रुा

\+ \+ \+

३

चे माहाल होते ते सांप्रत गोवेकर सोंस्थानीक याणी घेऊन जप्तीच्या वहिवाटीस ठेविले आहेत ते माहाल हुजूर स्वामीस दिल्हे आसेत

बीतपसील

१ माहाल डिचोंली ठाणे व गावगनासुधा

१ माहाल सांखली ठाणे व गावगनासुधा

१ माहाल हालधण गांवगनासुधा

१ माहाल पेडणे.

४

येकून च्यार माहाल हुजूरचे हुजूर दिल्हे असेत.

फिरंगी दस्तुरची मखलासी

लिहिले कलम करार.

\+ \+ \+

लेखांक १६७ इ. स. १७९७-९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ९४

तालीक

यादी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेशी गोवकर संस्थानीक मार्चल सरकरताल फिरंगी याजकडून त्याचे एश्रीत यानी हुजूर करवीरच्या मुकामी येऊन राजश्री

सुब्राव पंडित अमात्य याचे विद्यमाने तहनामा गोवेकर सो आहे समधे करोन समान तिसैन मया आलफ शके १२४ पिंगलनाम संवत्सरे

१ संस्थान गोवे येथील (फाटले आहे) अही यक १ दोहो वर्षानंतर पुरातन पासोन गोवकर याणी द्यावेयाचे त्याचे जमास रुपये ३२१००० तीन लक्ष यकवीस हजार द्यावेयाचे त्याची हिस्येरसी दरसाल रुपये १०७००० यक लक्ष सात हजार रुपये दरसाल हुजूर यावयाची करार केला असे सदरहू प्रमाणे सादर बेलगावकडून स्वामीचे शेवेशी रुपये पोहचते होतील.

फिरंगी दस्तुर मखलासी लिहीले कलम करार

१ सदरहू खंडणीचा यैवज कैलासवासी संभाजी महाराज याच्या कारकीर्दीपासूण आजपावेतो संस्थानाकडून दयाचा त्याचा फडशा मारचलकाम सकरताल यासी बोलोन सदरहू अनवये रुजू देतील

फिरंगी दस्तुर मखलासी लिहिले कलम करार

१ हुजूरचे माहल गोवेकर संस्थानीक याजकडे हली वहिवाटीस आहेत ते कैलासवासी संभाजी महाराज याच्या कारकीर्दीत पासोन हुजूर होते त्या अनवये हली हुजूर द्यावयाचे

१ आत्रुज माहाल गावगनासुधा
५ फोंडयाचे माहाल ठाणे व गावगनासुधा
५ जांबेली पंचमहाल ठाणे गावगनासुधा
१ माहाल सांगे गावगनासुधा
१ जकायेती नाकेबंदीच्या बाबती तालुक्यात सदरहू महालसंमधे असतील त्या

१४

सदरहू महाल व किमान ठाणी येकून (फाटले) दा हुजूरची हुजूर द्यावी असेत

फिरंगी दस्तुरच्या मखलासी लिहिले कलम करार

१ वाडीकर सांवत यांच्या तैनातेस हुजूरचे महाल होते गोवेकर संस्थानीक याणी घेऊन जप्तीच्या वहिवाटीस ठेविला आहेत ते महाल हुजूर स्वामीस दिले असत बी तपशील

१ महाल डिचेली ठाणे गावगनासुधा
१ महाल सांकली ठाणे व गावगनासुधा
१ महाल हालधन ठाणे व गावगनासुधा
१ महाल पेडणे

४

एकून चार महाल हुजूरचे हुजूर दिले आहेत

फिरंगी दस्तुरची मखलासी लिहिले कलम करार

माहाराजाचे कारकीर्दीस हु (फाटले आहे) ते ते हाली हुजूरचे हुजूर द्यावे.....

बी तपशील

१ जंजरे कुर्मगड तालुकेसुधा
१ जंजरे खोलगड तालुकेसुधा
१ जंजरे सदाशिवगड तालुकेसुधा
५ आकोले ठाणे पंचमहाल तालुका गावगनासुधा
१ ठाणे सुपे गावगना तालुकासुधा
१ माहाल पैजणी गावगनासुधा

—

१०

सदरहू प्रमाणे किले व ठाणी व महाल हुजूरचे हुजूर स्वामी याणा द्यावे यावर गोवेकर सौस्थानीक फिरंगाई याचा वारसा नाही.

फिरंगी दस्तूरचे मखलासी लिहिले कलम करार

—

५

येकून कलमे पांच स्वामीचे शेवेशी करार करून दिली आहेत.
येणे प्रमाणे गोवकर सौंस्थानीक याजकडून हुजूरचे शेवेशी चालल
फिरंगी दस्तुरची मखलासी कीं पांच कामे
लिहली प्रमाणे करार चालवू.

लेखांक १६८ तारीख १-१-१७९८

श्री

रु. नं. १
अ. नं. ९५

श्रीमन्माहाराज राजश्री........................छत्रपति
स्वामीचे सेवेशी

विंनती सेवक मिगेलदली मयसोज येथील वर्तमान ता। १२ माहे रजब येथास्तित असे विशेष मोरोपंत याजबरोबर आज्ञापत्र पाटविले पाहून माहाराजाकडील कुशल वर्तमान कळून संतोस जाहाला मोरोपंत याजबरोबर सांगणी केली ते माहाराजास जाहीर जाली असे पत्र मजकुरावरुन कलो आले परत जे सांगणी आम्ही केली ते मोरोपंत दखल करणेस चुकला तेळचेरेहून ज्याहाज बनाम सेविफ आले ते गोवा बंदरास दाखल जाहाले त्यावर आम्ही गेलो तेव्हा सहजात मोरोपंताचे दर्शन जाहाले...............

कांहीं आम्हाकडील काजकामाविसी आज बंदरास आलो इंग्रजाची रयत तेव्हा ज्याहाज मजकुरी गेलो त्याजवर इज्यानेबाचे दोस्त कपितान विलसोन हे थोर व आमचे गोवर्णदोर याचे इतबरी याकरिता त्याचे दर्शन घेणे जरुर तेव्हा त्याची भेट घेता ज्याहाजाचे लोकाबरोबर मोरोपंतास पाहिला ताजूव जाहाले काय करिता म्हणोन पुसिले तेव्हा उत्तर केले कीं माहाराजानी साहेब जनराल यासी मतलब मना आणनेवदल तेलचेरीस रवाना केला त्यास आपल्याकडील व कुल आपले तरफ लोकाचे चाल आपणास कलोन गेली आहे कितेक वख्त मनसबे घोलविले परत कांहींच तहात आले नाही त्याचा अनुभाव आम्हासही आहे म्हणोन माहाराजही जाणत असो तेव्हा जनराल साहेबी कांहींच सुणणेत आणिले नाही आपले सांगणी टाकू नये याकरितां कपतान विलसोन याणी महाराजास इशारा पाटविला असेल परत हा मजकूर आम्हास कलला नाही परिणाम म्हणावा तर पेशजी आम्हाकडील कारकून गोविंद रामचंद्र व आपले पेदेबरोबर हरलेख पाटविला तोच करार आहे कुंपोनी इंग्रज यास सरकाराने देणे व इंग्रजाचे रयत साऊकर याचा माहाल व जाहाजे नागावा केला ते कुली फारीम करणेचा मजकूर व महाराजाकडील आरमारचे सरदार इंग्रजाचे आश्रेतील तरांडीयास जुलूम करीत आहे त्याचा बंदोबस्त व सलुकाचा तह व्हावा म्हणोन कितेक वख्त कलमी केले यातील मजकूर गोवर्णदोर साहेबास सांगून घेणार जाहालेवर कपिता व विलसोन याजबरोबर नागोजीराव घाटगे अगर हर कोणीहि इतबारी आदमी येक्षामार सुधा व इंग्रेजी कुंपणेचे व सावकारी कलमाचा फडशा करणेचा सरंजाम पाटवावा याज प्रो कपितान विलसोन यास ताकीद आहे येसे दिसते विलसोन याजबरोबर आम्ही यावे आल्यावर महाराजाचा व नागोजीराव याचा संतोशहे व कितेक मनसबे आम्हा मार्फतीने मनास आणिले जातील म्हणून मोरोपंत बोलिले त्यास आम्ही जवाब केला कीं आम्हास तव येणेची बहुत खुसी परत आमचे गोवर्णदोराही सांगितल्यासिवाई अगर फर्माविले खेरीज जावत नसे याप्रमाणे आमचे व मोरोपंत याचे बोलणे जाहाले महाराजास मालूम होय वख्त तंव चांगला नागोजीराव विलसोनसाहेबाबरोबर जाणेस समय आणकूल आणखी कसा मिलेल उभय तर्फातील मजकूर ठरावात आणावे असेच गोवर्णदोरसाहेबाचे मानस नजरेस तंव येत आहे नागोजीराव यास बखेडे अगर तांत्रिक भावे पाठऊ नयेत नहून येकदाच तहाचा फड होणेबदल त्यास महाराजाही पाटवावा व आम्ही लवकरच मुंबैस येऊ म्हाहाराजाचे काजकामाविसी मेहनत करू व आपणाकडील वकीलास सर्वार्था बहुमान चालायाबदल मदत करू मालवणास येऊन महाराजाची मुलाजमत घेणे हेच दिलात आहे परत मुंबैस कितेक काजकामे आहेत याखेरीज आमचे गोवर्णदोर

याचे हुकूम निरोपासिवाई महाराजाचे उपयोगी पडत नसो येणे करून येऊस घडत नाही नागोजीराव याचे पत्राचे उत्तर जात असे बाकी मजकूर मोरोपंत जबानी सांगतील महाराजाचे सेवेस हाजीर रवाना गोवा ब तारीख १ ज्यानेर सन १७९८ सेवेशे श्रुत होय हे विनंती.

सही इंग्रजी

लेखांक १६९

तारीख २-१-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ३०२

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री गुजाजी गायकवाड विश्वासराव यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री रायाजी जाधव सरनोबतकडे पाठवणेबद्दल जरी लगी येक पाहिजे तरी आपण येथून जरी लगी येक तयार करून हुजूर पाटवावे वाडीयातून फरालाचे साहित्य तयार करून पाटवावे संक्रांतीची आज्ञापत्रे राजश्री राघो शंकर व आपाजी कृष्ण याजकडून यादीप्रमाणे तयार करून पाटवणेची आज्ञा जाहाली असे तरी खासे कागद नसलेस हुजूरबाजाराकडून कागद त्याजकडे देऊन आज्ञापत्रे तयार करऊन हुजूर पाटवावे नालबंद आसामी येक दोघे हुजूर पाटवावे सदरहू नालबंद नवे ठेऊन दिवाणपागेकडे हुजूर पाटवाबे जाणिजे सुा समान तिसैन मया व आलफ रा छ १४ माहे रजब.

लेखांक १७०

तारीख २०-२-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ७९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ पिंगलनाम सबत्सरे फाल्गुन शुद्ध पंचमी भोमवासरे क्षत्रिय कुलावंतस राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री राय रायदीयानतवंत बहादर यासी आज्ञा केली येसीजे सांप्रत तुम्हाकडून बहुत दिवस विनंतीपत्र माहाराजाचे सेवेशी येऊन साध्यंत अर्थ अवगत होत नाही तरी ऐसे न करिता वरिचेवरी विनंतीपत्री साकल्ये अभिप्राये सविशद लिहून पाटऊन माहाराजास संतोषावाप्ती होये ते करीत जावे पूर्वीपासून यकब्राल पनाह नवाब वालाजनाब याचा व माहाराजाचा अद्वैतरीतीने श्नेहभाव ममतापुरस्सर चालत आला आहे त्याची द्दोतरता विशेषात्कारे चालत असोवी हेच महाराजास अवश्यक असे प्रस्तुत नवाबवालाजनाब यासी हुजूरून थैल्यासमवेत पत्रे राजश्री कृष्णराव नरसिंव्ह काटीकर या समागमे पाटविली आहेत कितेक

कार्यभागाची आज्ञा केली आहे आज्ञेप्रमाणे तुम्हास सांगतील तदनरूप जाबसाल नमुद्यात आणोन हुजूर विनंतीपत्र पाटवावे.

लेखांक १७१

तारीख १३-३-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ९८

श्रीमन्माहाराजाधिराज्या माहाराजा.................छत्रपति स्वामीचे सेवेशी...........................

आज्ञांकित मुदबसापा तुपद सर नाडगोडा समत आनंद मजवरी व प्रांत नाल्तबाड विनंती विज्ञापणा ता छ २४ रमजान पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे स्वामीने रो सखाराम खंडो याजबरोबर आज्ञापत्र लेहून पाटविला ते पावोन सिरसावंदोन सनाथ जाहालो मशारनुलेने जे सांगावयाच रुबरु सांगितल्यावरी संतोष वाटला आता रो राघो सदाशिव याने जे लिहिणेच स्वामीयाच सेवेसी विनंतीपत्र लिहून घेतल आहे तेवरी चितास समर्पक होईल आम्ही स्वामीस ज्या प्रकारे विनंती करून घेतल होतो त्या मारास स्वामीने आम्हास ज्या प्रकारे बुधीवाद दिल्हा होते तैसेच सेवकाने श्रीमंत बहरी बहादर यास सांगोन करारप्रो फौजसह संगमास घेऊन येणेचा सिद्धांत केल होतो तालुक्यांत साहेबाच्या लष्करपुढेह गेले रा सखोपंताबरोबर खास स्वारी संगमास आले नंतरे श्रीमंत बहिरी बहादर यास घेऊन येणेस आज्ञापत्र आली त्यास्तव वाट पाहतो स्वामीने संगमास आल क्षणी श्रीमंतास बोलाऊन घेऊन फौजसह सेवेशी हाजर होतो हाली मानुले बरोबर कांही बार व स्वार व प्यादे येकून दीड दोन हजार जमीयत देऊन पाटवितो आठ चार रोजी सेवेशी येऊन पोहचतात स्वामीने बुधीवाद दिल्हाप्रमाणे पोटपाणीचा बंदोबस्त कराराप्रमाणे करून देऊन पुन्हा सेवकास उधार करणार धनी समर्थ मुख्य साहेबाच आमृतवचनवरी साहेबान हुकूम दिल्हा प्रो श्रीमंत बहिरी बहादरास आम्ही खचित करुन सांगितल आसो ते वचन सत्य न करून सेवकास उध्धार करायासँ स्वामी समर्थ आहा परंतु श्रीमंत बहिरी बहादरास चौकडून दंगा उठून सिबंदीखाली हैराण जाहाला करिता चार महिने येणेस सेवकाकडून आंतर पडल ते मात्र क्षेमा करणार स्वामी समर्थ आह सेवेशी श्रुत होय हे विज्ञप्ती.

(सही मुसलमानी)

पौ. छ ३० मोहरम जाने

मु॥ पतंगाचीगडी पो जथ

सन तिसा तिसैन.

(छ २९ मोहरम १४-७-१७९८)

लेखांक १७२ तारीख १९-३-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. १७९

समस्तसेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामी कृपाळून तुम्हास सेनापति दिल्ही त्याजबद्दल तुम्हाकडून नजराणा वि॥ राजश्री हैबतराव गायकवाड सरखवास नख्त

रुपये

३३००० मांडणावल वि॥ राजश्री निंबाजी यादव हावलदार याजकड

७००० राजश्री रामचंद्रराव घोरपडे याजकड मशारनिले यानी निंबाजी यादव हावलदार याचे कर्ज देण होत त्याबद्दल पटणकुडी गाहाण ठेविली होती ती सोडवणे बा॥

४००००

एकूण रुपये च्यालीस हजार करवीरचे मु॥ माहाल हुजूर पोता जमा असे वि॥ कृष्णाजी गाईकवाड वोमुल जाणिजे. सु॥ समान तिसैन मया व आलफ छ ३० माहे रमजान बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक १७३ तारीख ४-४-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. १९५

चिरंजीव राजमान्य राजश्री रायाजी जाधव जप्तनमुलूख यासी आज्ञा केली ऐसीजे ठाणे शिरोलचे गावगन्ना व कसबेची सरदेशमुखी जप्तीस होती ती हली हुजूरुने राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति याजकडे करार करून दिल्ही असे तरी सरदेशमुखीची बाब कसबेसुधा गावगन्नाची सेनापति मशारनिले याजकडे चालवीत जाणे सु॥ समान तिसैन मया व आलफ रा॥ छ १६ शोवल बहुत काय लिहिणे.

लेखांक १७४ तारीख ४-४-१७९८

रु. नं. १

अ. नं. १९४

श्री

आज्ञापत्र राजमंडळ ता॥ मोकादमानी का॥ इचलकर्जी सु॥ समान तिसैन मया व

आलफ का। मा। चे गावगना व कर्यात मा।रची सरदेशमुखी जप्तीस होती ती हली हुजूरने राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति याजकडे करार करून दिल्ही आसे तरी सरदेशमुखीची बाब कसबेसुधा गावगनाची सेनापति मशारनिल्हे याजकडे चालवीत जाणे जाणिजे रा। छ १६ शौवाल मोर्तब.

सुद.

(शिका)

लेखांक १७५ तारीख १३–४–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ८०

राजश्री व्यंकटप नाईक बहिरी बहादर संवस्थान सुरापूर गो यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजे श्री उपरी तुम्ही विनंती पत्र माहाराजाचे शेवेसी पाठविले ते प्रविष्ट जाहाले लिहिला मजकूर विदित जाहाला वरकड कित्येक मुखातरे राजश्री मुदबसाप याणी विनंती केलेवरून अवगत जाहाले यादीप्रमाणे बंदोबस्त करून देवणेची आज्ञा होऊन मोर्तब यादी आलाहिदा सादर जाहाली असे हुजूरून आज्ञा होणे ते मशारनिलेस जाहाली आहे आज्ञेप्रमाणे तुम्हास सांगतील त्याअन्वये कांही लडा पडणार नाही ऐसे जाणोन मशारनिले बराबरी मुलेमाणसे रवाना करून पाठवणे कोण्हे गोष्टीचा वसवसा न धरिता बेवसवसा पाठवून द्यावी करवीर आणि सुरापूर ऐसी दोन नाहीत ऐसे समजोन पाठवणारास खातीरजमेनिसी हुजूर पाठवून देणेची आज्ञा केली जाईल कांहीं काजकाम पडल्यास फौजेची कुमक व्हावी म्हणोन मशारनिलेनी विनंती केली त्यास तुमचा साभिमान माहाराजास असता फौजेचेही कुमक होऊन येईल येविसी तुमची खातीरजमा असो देणे विजापूर तालुक्यात चीजवस्त व हत्यारे वगैरे जिनसाना जागाजागा ठेविला आहे त्याची रखवाली व्हावी म्हणोन विदित जाहाले आज्ञास खासा स्वारी त्या प्रांती जाहालियावरी आज्ञा करून रखवाली करविली जाईल वरकड जे आज्ञा होणे ते मशारनिलेस जाहाली आहे आज्ञेप्रमाणे सांगतील त्याबरहुकूम त्वरेने रवाना करून पाठऊन देणे हरकारे वगैरे हुजूर येणार त्यास रहदारीचे दस्तक सादर जाहाले असे जाणिजे रा छ १७ माहे शोवोल बहुत काय लिहिणे रा छ २५ माहे शोवाल काल्युक्तनाम संवत्सरे चैत्र वा द्वादसी सुा समान तिसैन मया व आलफ बराबरी मुदबसाप निा सुरापुरकर यास नांवे त्याजकडील विनंतीपत्र हुजूर आले होते त्या उत्तर लेहून देऊन रवानगी करून पाठविले असेत.

लेखांक १७६ तारीख १७-४-१७९८

श्री

रु. नं. १

आ. नं. ८१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख शुद्ध प्रतिपदा भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यांणी राजश्री भोगण (जोगण ?) कामत लिंगिस्ताद निा विजरई मुकाम गोवे यासी आज्ञा केली येसीजे बहुत दिवस तुम्हाकडून विनंतीपत्र महाराजाचे सेवेशी येऊन साकल्यार्थ निवेदन होत नाही तरी यैसे न करिता वरिचेवरी विनंतीपत्र पाटऊन महाराजास संतोषावाप्ती होये ते करीत जाणे पूर्वीपासून विजरइचा व माहाराजाचा येखलास बेखिलाफ वजहने चाल्त आला असता खत किताबतीचे खाबिते कमपेश होऊन खिलाफ जाहिरीस पोहचत आहे हे विजरईस सजावार कीं काय येबाबे तुम्ही विजरईस माकूल करून सांगोन पूर्वीपासोन खत किताबतीचे खाबिते चाल्त आल्या बमोजीब चालोन मोअतबिर वकील हुजूर फिरिस्ताद करून पाटवून माहाराजाचे खातीरख्वाह मतलब रुबकार करून घेणे हे विजरईस जाणार आसता हे कांहींच विजरइनी खातीरेत न आणिता वकील हुजूर फिरिस्ताद न केल्यावरून बिसयारता अजुबतर जाहाले असे तरी तुम्ही पेशजी पासोन वाकीफगार असता आज्ञा करून फर्मावावेसे काये असे फिलहाल अजम व्यंकटराव कृष्ण वकील फिरिस्ताद केले असेत जुबानी इंजेहार करितील त्या बमाबे वकील व खत पत्राचे जवाब सवाल विजरई-कडील हुजूर फिरिस्ताद करून पाटवणे जाणिजे लेखन सीमा.

लेखांक १७७ तारीख २८-४-१७९८

रु. नं. १

अ. न. १९७

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख शुद्ध त्रयोदसी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी समस्त सेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री नारायणराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही स्वामी शेवेसी योग्य जाणोन पेशजी तुम्हास हुजूर येणेविषयी आज्ञा होऊन हुजूर आणविले ते समयी राजश्री रामचंद्र घोरपडे यानी राजश्री परशराम रामचंद्र याचा आश्रय करून आडान सेनापतीची वस्त्रे घेतली यास्तव त्याजकडील सेनापति दूर करून तुम्ही स्वामीचे येवेशी राज्योपयोगी याजकरिता स्वामी तुम्हावर कृपाळु होऊन सेना-पतीचा हुद्दा सांगोन वस्त्रे दिली आणि सरंजाम तीर्थरूप कैलासवासी मातोश्री साहेब याचे वलेस पूर्वील वहिवाटीप्रमाणे सरंजामी गाव व वतनी गाव व शेऱ्या व सरदेश-

मुख्या महालानी व बाबती येणेप्रमाणे करार करून दिली असेत तरी तुम्ही सदरहू सरंजामी गाव व वतनी गाव व शेन्या व सरदेशमुख्या व बाबती तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आणभऊन स्वामीची सेवा येकनिष्टपणे करून आपले शेवेच्या मजुरा करून राहाणे तुम्हास जमान राजश्री हैबतराव गायकवाड सरखवास यासी हुजूर घेतले असेत जाणिजे बहुत लिहिणे तरी तुम्ही सुज्ञ असा.

सिका

लेखांक १७८

तारीख ७–५–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ८३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख बहुल सप्तमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री यशवंत आनंदराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही हुजूर विनंती पत्र राजश्री कृष्णराव नरसिंव्ह याजबराबरी पाठविले ते प्रविष्ट होऊन साद्यंत लेखनाभिप्राये अवगत जाहाला व कितेक मुखातरे निवेदन केला तोही विदित जाहाला पूर्वी माहाराजाची स्वारी काटीवरून तुळजापुरास जाहाली होती तेसमयी कित्येक मजकुराची आज्ञा केली होती अशास सांप्रत हुजूरून यकबाल पनाह नवाबवालाजनाब यासी थैल्यासमवेत पत्रे कृष्णराव मशारनिलेया हमराह देऊन आज्ञा करणे ते करून तुम्हाकडे पाठविले आहेत हा साद्यंत अर्थ तुम्हास सांगतील तो नवाबवालाजनाब यासी माअरूज करून माहाराजाचे मनोदयानुरूप कार्यभाग घडोन येऊन तुमचे शेवेचे निदर्शन जाहीर होऊन कृपेस पात्र व्हावे येविसीचा साद्यंत मजकूर मशारनिले सांगतील त्यावरून कलेल पेशजीपासोन तुमचे लक्ष माहाराजाचे सेवेची टाई आहे तदनरूप सेवा करून दाखवून कृपा संपादून घेणे तुम्हाकडे असे. जाणिजे लेखन सिमा.

लेखांक १७९

तारीख ७–५–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ८४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख बहुल सप्तमी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यांनी राजश्री जनार्दन आनंदराव यासी आज्ञा केली ऐसाजे तुम्हाकडून विनंती पत्र येऊन साखल्यार्थ निवेदन होत नाही तरी ऐसे न करिता वरिचेवरी विनंती पत्री साद्यंत वर्तमान अवगत होये ते करीत

जाणे प्रस्तुत हुजूरून एकबाल पन्हाह नवाबवालाजनाब याजकडे आज्ञा करून राजश्री कृष्णराव नरसिंह या समागमे थैल्या समवेत पत्रे देऊन रवाना करून पाठविले आहेत आज्ञेप्रमाणे सांगतील त्याप्रमाणे कार्यभाग नमुदेत आणोन हुजूर विनंती पत्र पाटवणे जाणिजे लेखन सीमा.

लेखांक १८० तारीख १३–५–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ८७

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख बहुल त्रयोदसी भानुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री कृष्णराव व्यंकाजी देशपांडे समत करडगी यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाविसी राजश्री त्रिमलराव श्रीनिवास यानी हुजूर विनंती केलीवरून हल्ली तुम्हास व राजश्री पंत राजाज्ञा यासी आज्ञापत्र सादर जाले असे तरी हरयेकविसी तुमचे तालुकेस उपसर्ग न होयेसारखे आज्ञापत्र सादर जाहाले आहे अशास तुम्ही कराराप्रमाणे सरकारचा ऐवज सरकारास पोहोचता करून याचे तालुके जराबाजरा तालुके येकबाल पन्हा नवाब दलेरजंग बाहादर आपले जिमेस करून घेऊन ठाणेन्या बंदोबस्ती करून येथे हुजूरास वरिचेवरी विनंती पत्रे मशारनिलेचे विद्यमान पाटवीत जाणे नवाबाकडे तुमचे लक्ष ठेऊन वर्तणूक करीत जाणे हल्ली त्रिमलराव यासी सरकारातून खर्चाबद्दल देविले नक्त रुपये २००० दोन हजार देविले आहेत सदरहू रुपये आज्ञेप्रमाणे तुम्ही मशारनिलेकडे पावते तूर्त करणे येविसी उजूर न करणे हरयेकविसी तुमचे साहित्याकरिता पंत राजाज्ञा यासी आज्ञापत्र सादर जाहाले आहे तुम्हास कांहीं उपसर्ग होणार नाही तुम्ही अवसान न टाकिता दरोबस्त ठाणेचा बंदोबस्त राखीत जाणे त्रिमलराव याची रवाणगी केली जाईल उभयता येकत्र होऊन सरकारचे कामकाजे करीत जाणे. जाणिजे लेखन सीमा.

लेखांक १८१ तारीख १३–५–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ८६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२४ काल्युक्तनाम संवत्सरे वैशाख बहुल त्रयोदसी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा सिवछत्रपति स्वामी यानी राजमान्य राजश्री मल्ल वीरपगौंडा शेमसेरजंग बहादर सरदेसाई मा। हुबली व महावलानिहाय यासी आज्ञा केली ऐसीजे सावनूरकर येकबाल पनाह नवाब दलेरजंग बाहादर याचे दवलतीत

तुम्ही बहुत दिवस पूर्वीपासोन वर्तणूक करीत आला प्रस्तुत तेच लक्ष धरून ज्या समयी त्याचे पत्रे येतील त्यासमयी आपले जमावानिसी जाऊन सांगतील त्याप्रमाणे वर्तणूक करीत जाणे याविसीचे आगत्य तुम्हास आहे म्हणोन आज्ञापत्र सादर जाहाले आहे लक्ष ठेऊन वर्तणूक करीत जाणे नवाब याजकडील राजश्री त्रिमलराव श्रीनिवास यानी विनंती केली त्यावरून पेशजी तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आसे तरी हरयेकविसी पत्रे येतील त्याप्रमाणे लक्ष धरून सेवा करीत जाणे जाणिजे बहुत काय लिहिणे.

लेखांक १८२ तारीख ३०–५–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २००

समस्तसेनाधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति यास आज्ञा केली येसीजे स्वामीचे शेवेशी आपण विनंती पत्र पो ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहाला सत्वरच हुजूर येतो म्हणोन विनंती पत्री लिहिले त्याप्रमाणे सरंजाम सुधा सत्वर हुजूर यावयाचे करावे याविसी क्षणाची विलंब न करिता सत्वर यावे जाणिजे सु॥ समान तिसैन मया व अलफ रवाना छ १३ माहे जिल्हेज.

लेखांक १८३ तारीख १६–६–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ३२४

पो. छ. ११ मोहरम सन तिसा मु॥ कासेगांव

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

विनंती शेवक यशवंतराव घोरपडे आमिरुलउमराव कृतानेक विज्ञापना तागाईत छ १ मोहरम पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून शेवकाच वर्तमान यथास्थित असे विशेष पेशजी राजश्री आकाराम बावा हावालदार याजसमागमे राजश्री दौलतरावबाबा याणी स्वदस्तुर विनंती पत्रे देऊन कित्येक विषयी विनंती करणेविसी सांगोन पाटविले आहेत त्याप्रो सेवेसी पोहोचून वृतात निवेदन जाहला असल प्रस्तुत स्वामीस स्वदस्तूर विनंती पत्र तीर्थस्वरूप सेनापति यास फौज देऊन सत्वर रवाना करावा यास्तव विनंती लिहिली असेत ते स्वामी ध्यानात आणून जे आज्ञा करणे ते केली पाहिजे विशेष लिहिणे शेवक नव हे विज्ञापना.

लेखांक १८४ तारीख १८–६–१७९८

श्री गयबी प्रा

रु. नं. १

अ. नं. २०३

पो छ ६ मोहरम सुा कामेरी सुा तिसा तिसैन

राजश्री रायाजी जाधव सरनोबत गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलकृत राजमान्य श्नो सखाराम घाटगे सरजेराव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाटविल ते पावले लिहिला मजकूर कळला त्यास आपण फौज घेऊन जलद येणे आपण घाटाचे मुकामी आलेवर लिहिणे म्हणजे इकडून कोणीतरी रवाना करून देतो रा छ ३ माहे मोहरम सु।। तिसा तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

नारायणराव घोरपड सेनापति यासी घेऊन आपण सत्वर याव ही विनंती आपण रहिमतपुरचा बंदोबस्त करून सातारचे मुकामी येऊन तेथे रास्तेची फौज दोनएक हजार आहे ती किलेकरानी शाहारातून उधळून दिली ती बाहीर नदीवरी उतरली आहे त्याचे पारपत्य करावे आणि तेथे मुकाम करून ताबडतोब इकडे पत्रे रवाना करावी म्हणजे इकडून कोणास तरी पाठवू नंतर आपण ते भिळून जसा बेत लिहून पाठवू त्याप्रो त्या मार्गानेच यावे.

लेखांक १८५ तारीख १८–६–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २०४

पौ छ ६ मोहरम सुा तिसा तिसैन मुता कामेरी

राजश्री रायाजी जाधव सरनोबत दादा गोसावीस

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्ये श्रो सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई रामराम विनंती उपरी येथील क्षेम ताा छ ३ माहे मोहरम जाणून स्वकीये लेखन करीत असले पाहिजे विशेष स्वामीनी फौजसुद्धा आपली रवानगी इकडे केली म्हणोन आज्ञापत्री निरोपिल तरी आपण रहिमतपूरचे मार्गे येऊन तेथील ठाणेचा बंदोबस्त करून सातारचे मार्गेस फौजसुधा याबे तेथ पेशजी बंदोबस्ताविसी रास्त्याची फौज पुण्याहून गेली होती ती शाहरात उतरल होत हली किलेकरानी इकडील संधानावरी फौज शाहारातील उदळून दिली ती फौज नदीवरी उतरली आहे त्याच पारपत्य आपले फौजेच हातून करून तेथच मो करावा आणि ताबडतोब आम्हाकडे पत्र रवाना करावे

म्हणजे इकडून कोणी मातबर मनुष्ये रवाना करून देऊ ते व आपली फौज मिळून इकडू बेत लिहून पाटवितील त्याप्रमाण करावे ज्या मार्गान येणेची सूचना होईल त्या मार्गेत आपण मिलोन यावे याजप्रमाणे येथील येजीमानाचा निरोप आहे व पूर्वी राजश्री आकारामबाबासही हाच बेत सांगितला आहे त्याजप्रमाणे करावे आपण कोठे दम खाऊ नये कूच दरकूच निकडीने यावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १८६ तारीख१८–६–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २०८

पौ छ ६ मोहरम सुा तिसा तिसैन मुा कामेरी

राजश्री लिंबाजीबावा यादव हावालदार गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रो सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई पौ हुकरी राम राम विनंती उपरी येथील क्षेम ताा छ ३ माहे मोहरम इंदुवार जाणोन स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविल ते पावले तेथ लिहिल जे तुम्ही दरबारातील बोलणेचा बेत यथोस्थित राखाव इकडूनही फौजेची रवाणगी जाहाली आहे त्यास आम्ही तो नित्यनित्य येजिमानास येकदोन वचनास गोवीतच आहो आम्हाकडून स्वामी सेवेसी कदापि अंतर होणार नाही आणि येथीलही बोलिल्याप्रमाणच खंबिरता आहे आपण स्वामीस विनंती करून चांगली फौज दाहा हजार पर्यंत रवाना करून द्यावी हा समय पुढे येणार नाही फौजेचा येण सत्वरीच व्हावे येते समई रहिमत-पूरचा बंदोबस्त राजश्री आकाराम बावासी सांगितले प्रमाण कराव आणि सातारचे मोस फौज यावी तेथ पेशजी बंदोबस्ताविसी रास्त्याची फौज पुण्याहून गेली होती ती शाहरात उतरली होती हली किलेकराणी इकडील संधानावरिती फौज शाहारातून उदळून दिली ती फौज नदीवरी उतरली आहे तिचे पारपत्य आपले फौजचे हातून करून तेथच मो होऊन आम्हाकडे त्वरेने पत्रे रवाना करावी म्हणजे इकडून कोणी मातबर मनुष्य रवाना करून देतो ते व आपली फौज मिळून ज्या प्रो इकडून बेत लिहून पाठवितील त्याजप्रमाणे करून ते आपण मिलोन ज्या मार्गाची सूचना लिहू त्या मार्गान यावे इकडील वर्तमान तरी सरकारची दोन पलटणे चराई भरून आणावयास जात होती ते दिवसीच मुश.पर-खान बायासुधा येऊन मार्गास उतरले होत त्याची व पलटणीची गाठी दोनप्रहर रात्री पडली नंतर त्याची याची लढाई जाहाली तेव्हा ते बुनगे टाकून तळ सोडून पलाले आणि बोरघाटाने चडोन जेजोरीचे सुमारास राजश्री अमृतरावसुधा मोकाम केला नंतर श्रीमंताकडे त्यानी कागदपत्र पाटवून बोलणच संधान लाविले आहे आणि फौज सुधा येऊन पुणे नजीक खडकीचे मो उतरले आहेत अशामध्ये आपली फौज लवकर

येऊन पोचावी पोचले नंतर त्याचा त्याचा बोलणेचा समेट घडिल्यास चिंता नाही आपला बंदोबस्त होईल तोंपर्यंत बहुत करून भिटणार नाही येस दिसते तरी आपण लिहिल्या अन्वये फौज लवकर येऊन पोचतेच करावे येथील बोलणेचा भाव राजश्री आत्माराम बापानीही रुबरु ऐकिलाच आहे हलीही त्याजप्रमाण आहे आपल पत्र सोमवारी पंधर दिवसास येऊन पोचल गडी फार निकडीन आला कलावे बहुत काय लिहिण लोभ कीज हे विनंती सदरहू दरबारची पत्राचे उत्तर आले नाही म्हणऊन अंदेशा न घ्यावी पत्रे व्हावयास एक दिवस लागतो याज करितां गडी निकडीन राजश्री बापूजी रवाना केला पत्रे आपले जासुदा बरोबरी देऊन रवाना करितात हे विनंती विशेष.

तारीख १८–६–१७९८

लेखांक १८७

श्री गयबी प्रा।।

रु. नं. १

अ. नं. २०२

पो छ ६ मोहरम सुा तिसा तिसैन सुा कामेरी

राजश्री आकाराम बावा यादव गोसावी यास

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो सखाराम घाटगे सर्जेराव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहित असले पाहिजे विशेष आपण पत्र पाठविल ते पावले लिहिला मजकूर कलला यथील खातरजमेच बोलण जे होणे ते आपणासी जाहालेच आहे त्याप्रमाणे येणेची त्वरा करावी राजश्री गोपालजी मोहिते व हुजूर याची खातरजमा करून लवकर पाटवावे येतेसमयी रहिमतपूरचे ठाणेचा बंदोबस्त करावा आणि घाटाचे सुमारे मुक्कामाचे दिवसी बातमी लिहिणे म्हणे (म्हणजे) इकडून कोणासतरी रवाना करावयास येईल आपण दरमोकामाची बातमी पाटवीत जावी राजश्री बाबासाहेब याची पत्रे तयार जाहाली नव्हती याजकरिता निकडन रा करून दिल्ही मागाहून पत्रे आमचे जासुदा बरोबर पा देतो आपण निकडीन फौजसुधा येऊन पोहाचावे रा छ ३ माहे मोहरम सुा तिसा तिसैन मया व आलफ गोपालबा मोहिते याची व हुजूरे याची खातरजमा पकी करावी ही विनंती.

पौ तारीख २१–६–१७९८

लेखांक १८८

श्रीसुब्रराज

रु. नं. १

अ. नं. २०५

पो छ ६ मोहरम सुा तिसा तिसैन

राजश्री आकारामबावा यादव गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नो यशवंतराव घोरपड आमिरूल उमराव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाटविल ते पावले लिहिला मजकूर कळला आपण जलद यावे येतेसमयी रहिमतपूरचे ठाणेचा बंदोबस्त करून यावे राजश्री गोपालजी मोहिते व हुजूरे याची खातरजमा करून जलद पाठवून द्यावे सरकारची पत्रे रात्रीमुले तयार जाली नाहीत याकरिता जलदीन पत्र मागाहून आमचे जासुदाबराबर पाटवून देतो कलावे बहुत काय लिहिणे लोभ असावा हे विनंती.

लेखांक १८९ पौ तारीख २१–६–१७९८

श्री सुबराज

रु. नं. १

अ. नं. २०६

पौं छ ६ मोहरम सुा तिसा तिसेन मया व आलफ मुकाम कामेरी

राजश्री लिंब्राजीबावा हावलदार गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमाने श्नो यशवंतराव घोरपडे आमिरुल उमराव रामराव विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावे विशेष आपण पत्र पाटविल ते पाहून संतोष जाहाला हुजूरची खातरजमा करून तीा राजेश्री आपासाहेब व राजश्री रायाजी जाधव जप्तनमुलुख याची फौंजसुद्धा रवानगी जाहाली रहिमतपूरचे मुकामी येऊन पोहोचतील म्हणोन लिहिला त्याजवरून राजश्री सर्जेराव बापूनी हिकडून जे लिहिण ते लिहिल आहेत त्या अन्वय कराव येथील खातरजमा वरचेवर करून घेऊन बंदोबस्त राखावा म्हणोन लिहिल लिहिल्या प्रमाण व आपल आमच बोलिल्यान्वये खातरजमा आहे वरकड कितीयेक विस्तार सरजोराव यानी लिहिले आहेत त्यावरून कल खावंदाच च्याकरीविसी सेवकाकडून कदापि अंतर होणार नाही जलदीने फौज रवाना करावी कितीयेक काम त्वरीत कलाव बहुत काय लिहिणे लोभ करावा ही विनंती.

लेखांक १९० तारीख २१–६–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २०७

पौ छ ६ मोहरम सुा तिसा तिसैन मुकाम कामेरी

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक सिदोजीराव नाईक निंबाळकर देसाई पो हुकेरी दोनी कर जोडून विनंती विज्ञापना ऐसीजे स्वामीनी कृपाळु होऊन आज्ञापत्र पाठविले ते मस्तकी वंदून सनाथ

पाविले तेथ आज्ञा केली जे तुम्ही तेथील बेत बोलिल प्रमाणे राखून असावे ऐशास येथील बेत जो पहिल आहे तोच आहे राजश्री दौलतरावबाबास स्वामीच आज्ञापत्र फौजेची रवानगी करून दिली म्हणोन निरोपिल ते पोचताच परम परम समाधान पावले आणि आम्हासी उत्तरे केली जे स्वामीची पूर्णकृपा सेवकाचे ठाई आहे त्या पेक्षां मजकडून स्वामी शेवेसी अंतर किमपि होणार नाही फौज मात्र चांगली सरंजामसुधा त्वरेन येऊन पोचावी म्हणोन आम्हास सांगिले त्याजवरून सर्व मजकूर राजेश्री हवालदारबाबाचे पत्री लिहल आहे ते शेवेसी निवेदन करतील सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

तारीख २२-६-१७९८

लेखांक १९१

श्री

रु. नं. १

अ. नं. २०९

पौ छ ८ मोहरम

सन तिसा तिसेन

तीर्थस्वरूप राजश्री आबासाहेब वडिलाचे सेवेसी अपत्याचे दंडवत विशेष आपली फौज येत आहे त्यास मार्गीला राजश्री प्रतिनिधीची फौज आहे त्याजकडून अडथला होणार नाही त्यास ताकीद जाली आहे आपले फौजेस ताकीद असावी कीं कराड वगैरे मार्गी गाव लागतील त्यास उपसर्ग न लागावा मार्गाने लवकर येऊन सातारियानजीक पोहोचेते जाले पाहिजे रवाना छ ७ मोहरम हे विनंती.

पौ तारीख २६-६-१७९८

लेखांक १९२

श्री

रु. नं. १

अ. नं. २१०

पौं छ ११ मोहरम

सन तिसा तिसैन

मु॥ कासेगांव.

राजश्री आकाराम बावा हवालदार गोसावी

यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ यशवंतराव घोरपडे अमिरुलउमराव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपण जाताना समक्ष कितेक मजकूर बोलिलो आहो ते सर्व ध्यानात आसल प्रस्तुत राजश्री दौलतराव बाबा याणी स्वदस्तूरची पत्रे श्रीमन्माहाराज स्वामीस विनंती लि॥

आहे ते पा। असे माहाराज स्वामीस प्रविष्ट करोन लिहिल्या अन्वये रवानगी होऊन जलद पोहचे तो अर्थ कर्तव्यात आणावे येथील दरबारचे रंग आपणास दखलच आहे याजकरिता लि॥ असे चिरंजीव बाला तेथे आहे सर्वविसी बंदोबस्त होऊन गाव तालुका वगैरे यास उपसर्ग न होसे तो प्रकार केला पाहिजे येखाद वेलेस उभयताच ग्रहकृत्य मिटल्यानंतर आपण इतके श्रम केल्याच व्यर्थ होईल यास्तव रात्री दिवस करून येथून बोलून गेल्याप्रमाणे सत्वर करावे हली तीर्थस्वरूप सेनापति याजकड महाराज स्वामीस विनंतीपत्र देऊन पाटविल आहे आपणासी कितीयेक मजकूर बोलणेत आला होता श्रीकृपेने जलधीनच स्वाधीन होऊन खावंदास येशे प्राप्त होईलस आहे आपण पत्र कारकुनाच-पासी देऊन जातो म्हणून सांगून गेला परंतु पत्र येऊन पावल नाही प्रसंग तो पडला आहे तर दुसर पत्र लिहून पाटविणे आपण जलदीन येऊन दाखल केल्ये प्रमाण सिद कराव बहुत काय लिहिणे लोभ कराव हे विनंती.

लेखांक १९३ पौ २६–६–१७९८

श्री गयबी प्रा

रु. नं. १

अ. नं. २११

पौ छ ११ मोहरम सन तिसा तिसैन

राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति गोसावी यासी––

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमाने श्रो सखाराम घाटगे सर्जेराव राम-राम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष इकडील वर्तमान तर श्रीमंत मातोश्री बायास घेऊन मुजफर्दन वाईतून गला त्यास बक्षीही तिकड भयामुल गेल तर यथ नवीन मसलत करण त्यास श्रीमंत माहाराज त्याजकडून १०००० दहा हजार फोऊज घेऊन तुम्ही याव याप्रमाण येथील मर्जी आहे तर आपण याची खातरजमा माहाराजाकडून उभयताचा एक विचार आसावा येविसी तुम्हास लिहिण नलगे सत्वर येऊन फोजसुद्धा पोचाव सरोपरी तुमच्या पदरचे त्यास चाकरी करून दाखवाव्याच्या समय हाच आहे पंत मशारनिले सांगतील त्या प्रमाणे कार्य घडून याव इकडून कामाचा उपयोग फार आहे पुढे करण्यास चांगल पडल काम करून घ्यावेयाचा वेल हाच आहे आपणास ल्यावस नाही. तुम्ही सरंजाम घेऊन येणे ही विनंती.

लेखांक १९४ तारीख २९–६–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २१३

श्रीमन्माहाराज राजश्री–

छत्रपति स्वामीचे सेवेशी

विनंती सेवक सखाराम घाटगे सर्जेराव कृतानेक विज्ञापणा तागाईत छ १४ मोहरम पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विनंती येसीजे स्वामीनी आज्ञा करून राजश्री जानराव जाधव व आकाराम यादव यासी पाटविले त्याही सविस्तर सांगितले त्याजवरून कलले सांप्रत इकडील मारविसी उभयता स्वामीस सेवेसी विनंती करतील ती ध्यानास आणून त्याप्रमाणे घडण्यात आले पाहिजे सेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा. पौ छ १९ मोहरम मो कासेगाव नजीक सुा तिसा तिसैन मया व अलफ बुधवार रात्रौ.

लेखांक १९५ तारीख १-७-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २१४

श्रीमन्माहाराज राजश्री ——————— छत्रपति

स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक सिदोजीराव नाईक निंबालकर देसाई पोा हुकेरी दोन्ही कर जोडून विनंती विज्ञापणा येसीजे येथील क्षम तागायत छ १६ माहे मोहरम पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीनी आज्ञा पत्र पाटविले ते उत्तम समई पावले लेखनार्थ कलों आला पत्री आज्ञा जे हुजूरने फौजची रवानगी जाहाली आहे तरी कराराप्रमाणे फौज व फलटणे सातारी यास पाटवून देवणे आणि स्वामीस मनोदयानरूप कार्यभाग घडाव येविसी राजश्री जानराव जाधव व राजश्री आकाराम यादव हवलदार यासी आज्ञा करून पाटविले आहेत आज्ञेप्रमाणे बोलतील त्याजप्रा निदर्शनास यावे म्हणोन आज्ञा त्याजवरून येथ बेसून इकडील सर्व मजकूर उभयतासी सांगितला आहे सेवेशी येऊन विनंती करतील इकडील लक्ष स्वामींचे आज्ञे प्रमाणच आहे सेवेशी श्रुत होय विशेष काय लिहिणे शक्ती नसे हे विज्ञापणा.

पौ छ १९ मोहरम सुा तिसा

तिसैन मुा कासेगाव.

लेखांक १९६ तारीख ६-७-१७९८

रु. नं. १ हुा.

अ. नं. ८८

छत्रपति.

अजम दाऊल सौर सेख महमद बासेबान पीरजादे साकीन किो अजम नगरदामय्यखलास

गुदादस्त अजी ज्यानीब सुबराव कृष्ण

आमात्य हुकमत पन्हाह बाअदजसलाम इस्तियाक फिरावा आकीं

खतमकतुबा फिरिस्ताद केले ते इरसाल होऊन कल्मी केला बया फरमजदून मायल्म जाहला तेथील अमलदारी जे
त्यावरून श्रीमन्महाराजाधिराज माहाराजाचे खिदिमतेमध्यें अर्ज करून अमलदारास ताकीद फिरिस्ताद करून पाठविली असे एक फिरिस्ताद
केली ते रसीद जाहाली असे मालूम व्हावे व ज्यादा काय लिहिणे रा छ २१ माहे मोहरम हे किताब ती किताबाचे भर जाणोन फिरीस्ताद करून पाठवणे जाणिजे रा छ. २१ माहे मोहरम.

बेळगावचे किलेदार यासी आज्ञापत्र स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२५ कालयुक्तनाम संवत्सरे आषाड व॥ आष्टमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री बळवंतराव त्रिंबक यासी आज्ञा केली ऐसीजे हलापनास हकीकत असीर खैरबाजेगार गुदादस्त सेख महमद बासेबान पीरजादे साकीन किले अ अजमनगर इनाम-गाव मौजे उपली (हुबली?) यासी तुम्हाकडून व जमीनदाराकडून मौज मजकुरास उपसर्ग पोचत आहे म्हणोन हुजूर विदित जाहालें त्यावरून आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी पीरजादे मार यासी व त्याचे इनाम गावास तुम्हाकडून व जमीदाराकडून हरयेकविसीचा उपसर्ग न लागे ते करीत जाणे लेखन सीमा

दरबाजे प्रांतास हुजूरचे पत्र

सेख महमद बासेखान पीरजादे साकीन

किल्ल अहजमनगर इनामगाव मौजे उपलीविसी फर्माविले ऐसजे
अर्जदास्त हुजूर माहाराजाचे शेवेसी फिरिस्ताद केली ते रसीद जाहाली तेथील पाच्छा-पुरचे अमलदार व जमेदारसुद्धा आदावत करून उपद्रव देतात येबाबे बयावर मजमून निघारीश केला तो जाहीर जाहाला त्यावरून अमलदार मजकूर यासी ताकीद सादर फर्माविली असे हुजूर दोन फिरिस्ताद केले ते रसीद जाहाले हुजूर अबदुल फाजल अगर

लेखांक १९७ तारीख १३–७–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २१५

वडिलांचे शेवेसी दंडवत विशेष आपण पत्र पा॰ ते प्रविष्ट जाहाले लिहिला मजकूर अवगत जाहला व संकु जाधव हुजूरे यानेही सांगितल्यावरून सर्व ध्यानात आले इक-डील कर्तव्याचा अर्थ आपले संधानान्वये सिद्धच आहे पुरवणीची त्वरा जाली असता सबलसाधने घडतील माघेच उपराला जाला असावा परंतु लांबणीवर पडले यामुले स्वल्प साध्यास बल आणून कार्य करणे प्राप्त आहे त्यापक्षी त्वरा जाली असता उभयपक्षी-चीही कार्यसिद्धी आहे हे ध्यानात आणून लांबणीवर न पडे तो अर्थ घडावा राजेश्री पंत-

प्रधान याजकडून कारकून बोलवयास आले आहेत त्यासी उत्तर करणे ते आपले विचाराअन्वये करावयास येईल तूर्त लांबणीवर टाकिले आहे कुमक लवकर येऊन पोहोचावी म्हणजे ठीक पडेल जाणिजे छ. २८ मोहरम बहुत काय लिहिणे लोभ करावा ही विनंती.

लेखांक १९८ तारीख २१-७-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ९९

श्रीमन माहाराज राजाधिराज राजश्री

छत्रपति स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक चरणरज रामचंद्र केशवराव चरणावर मस्तक ठेऊन कृतानेक विज्ञापणा तो आशाढ शुद्ध ११ पावेतो स्वामीच्या कृपावलोकने करून जंजिरे मुंबई येथे चरणरजाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीचे सेवेशी विज्ञापणा येसीजे नबाब याकुदखान याजकडून हुजूर येणेविसी चरणरजास आज्ञा जाहाली परंतु दर्या तुफान भारी माहागेरीचा निभाव होत नाही याजमुले ठेरून घेतले पुढे आवलीस श्रावणी पौर्णीमा होताच यावे आणि चरणरजास पायाचे दर्शन घडेल तो सुदीन वरकड इकडील बातमी वर्तमान येथामती राजश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव याचे पत्री लिहिले आहे ते स्वामीचरणी निवेदन करतील त्याप्रमाणे आज्ञा करणार स्वाम समर्थ आहेत शेवेशी श्रुत होय हे बिज्ञापणा पो छ ७ माहे सफर सुमा तिसा तिसैन मया व आलफ मु॥ लस्कर दर जागा काले.

लेखांक १९९ पौ तारीख२९-७-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २१६

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री

बच्याजीपंत दादा स्वामीच सेवेशी

सेवक आपाजी विठल कृतानेक सा। नमस्कार विज्ञापणा येथील क्षेम स्वामीच्या कृपेकरोन यथास्थित असे सेवेशी विज्ञापणा किंचित वर्तमानाची लिहिली आहे निवेदन होईल येथील बोलण आज्ञेप्रमाण बोलवयाचे ते बोलत आहो सेवकास आज्ञा होऊन रवानगी जाली बोलणे कांही लागले तो मागाहून बापू पटवर्धन याची रवानगी जाहली पूर्वी रत्नाकर आणाजी बोलणे बोलतच आहे बोलणी बहुत त्या आर्थे प्रमाण कोणती

पडत नाही बोलणी चौथाची चार पडतात यक बोलणे पडत नाही काही घाटावर आले तो पटवर्धन आले आसो काय कारवाई आपले आसीर्वादे करोन घडेल ती करीत आहो आज्ञा थईल तैसी वर्तणूक होईल बोलण्याचा बेत वोढोन दाबदबावाने वाढ धरोन बोलणे जाहाले पाहिजे हली सर्वास यश यावे या अर्थे मनास येईल तैसे बोलतात आसो सारांश जेमेत फुटो नय ग्रहस्ताची कबुलात आहे त्याचे पारपत्य जालियाने येथे समाधान आहे आणि जमावाच्या आबाखालीचे सहील जो विचार होणे तो होई पाय पुढे दिल्हे तो मागे न पडावा आपण सूज्ञच आहे बोलणे धीराचे पडलियाने आज्ञे प्रा विचार घडेल सेवकाच्या हातून सेवा घ्यावयाची आहे तर यकया हातून जाली या गोष्टी मार्गावर यईल मागाहून सविस्तर विंनती निवेदन होईल जासूद स्वार यावे कर्नाटक प्रांतचे तालुके किती आपणाकडे आहेत व किती लक्षाचे ती याद पाटवावी कांही थोडाबहुत मर्जी प्रा आर्थपल्यावर या हातोटीने येईल वरकड मार्गान काहीच व्हावयाचे नाही आपन का म्हणतील तर येथे बोलणी बा आर्थाचीच पडली आहेत कलावे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विज्ञापणा

पौ छ १५ सफर रविवार

तिसा तिसैन मुा नजीक

काले.

लेखांक २०० तारीख ५-८-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. ११२

राजश्री व्यंकटप नाईक बहिरी ब्रहादर संवस्थान सुरापूर गो यास

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री ऊपरी तुम्ही विंनती पत्र हुजूर महाराजाचे शेवेशी पाटविलेत प्रविष्ट होऊन साद्यंत लेखनाभिप्राये सविशदे अवगत होऊन महाराजास परम संतोषवाप्ती जाहाली पूर्वीपासून तुमचे वडील बडिलानी येक-निष्टपणे सेवा करून कृपा संपादन केल्या आहेत त्याची माहितगारी तुम्हास असता तदनरूप तुम्ही पुढे सेवा करून दाखऊन कृपा संपादन करून घ्याव्या हे मानस महा-राजाचे आहे त्याचे निदर्शन घडोन येई ते करीत जावे पेशजी राजश्री मुदी बसाप हुजूर येऊन तुम्हाकडील येकेनिष्टतेचा ममता भाव साद्यंत निवेदन केला त्यावरून महाराजाचे आज्ञा होणे ते मशारनिलेस होऊन तुम्हाकडे रवाना करून पाटविले होते आज्ञेप्रमाणे तुम्हास साकल्यार्थ सांगितलाच असेल तदनरूप महाराजाचे मनोदयाप्रो सर्वच कार्यभाग घडोन येई ते करावे आणि तुम्ही अविलंबे हुजूर यावयाचे करावे पुढे राजश्री पीडा पावललियासी फौजेचे जमेत सुधा हुजूर त्वरेने रवाना करून पाटवावे प्रस्तुत तुम्हा

कारणे वस्त्रे राजश्री राघो सदाशिव व राजश्री गुरु बसाप या समवेत अलाहिदा यादी बारश पाटविली आहेत घेऊन पावले याचे विनंती पत्र हुजूर पाटवणे वरकड आज्ञेप्रमाणे मशारनिले सांगतील ते खचीत जानोन तदनरूप कार्यभाग होऊन येई ते करणे जाणिजे रवाना छ २२ माहे सफर बहुत काय लिहिणे मोर्तब शिक्याचे

मोर्तब

शिका

सन तिसा तिसैन लफाफेवर थोरला व थैलीकिनखापी व थैलीवर शिका लाखप्ती सहीत लफाफेवर नांव ल्यावहे व पोच चिठीवर राजश्री वेकटप नाईक बहिरी बहादर सवंस्थान सुरापूर गो यांसी

लेखांक २०१

पौ तारीख ७-८--१७९८

श्री

रु. नं. १
अ. नं. २१८

श्रीमत् माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवशी

विनंती सेवक बालाजी रघुनाथ कृतानेक विज्ञापणा ता आधिक श्रावण व॥ ५ पावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामी कडून आज्ञापत्र सादर जाहाले की हुजूरचे कार्यभाग स्वामीचे मनोदयानरूप घडोन यावे येविसी र॥ बाजीराव पंडित प्रधान यास आज्ञापत्र र॥ बापूजी रघुनाथ याजसमागमे देऊन मशारनिल्हेसी समक्ष आज्ञा होऊन रवानगी केली म्हणोन पत्री आज्ञा आज्ञे पो पंडित प्रधान यास पत्र प्रविष्ट करून विनंती पत्र देऊन सेवेशी पाटविलें आहे सविस्तर मार रा रामचंद्र जोशीराव याचे पत्री लि॥ आहे विनंती करिता ध्यानास येईल सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.
पो छ २४ सफर भो नजीक काले सु॥ तिसा तिसैन मया व अलफ.

लेखांक २०२

पौ तारीख १०--८--१७९८

श्री

रु. नं. १
अ. नं. १०२

श्रीमंत महाराज राजेश्री राजा शिवछत्रपति
महाराज स्वामी गोसावी यास

सकलगुनालकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ राजें वेंकटपा नाईक

बालवंत बहिरी रो आब जंग मुतहवर दौलाबबारुल मुलुक बहादर कृतानेक रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वामी याणी आपले आनंद वैभवातिशये लिहीत आसिले पाहिजे विशेष आपण कृपा करून रोा मुदबासपा या समागमे आज्ञापत्र पाटविले होते ते पावोन संतोष जाला त्याचे प्रत्योतरही सेवेत लिहून पाटविले आहे ते येऊन पावले असेल त्याचे प्रत्योतर अद्यापि आले नाही मशारनिले यास सेवेत रवाना करावे म्हणोन केले होते स्वामी याकडोन रोा राघोपंत येथे येणार त्यानी आल्यावर जाऊ म्हणोन मशारनिलेनी बोलिल्यावर रवाना करायास भवकुफ करून देविल ती पत्र सेवेत लि॥ आहे स्वामी यानी कृपाकरून मारनिले यास सत्वर पाटवितीस आज्ञा करावी त्यानी येथे आल्यावर समक्ष जे सांगायाचे सांगोन त्याजसभागमे रोा मुदबासपास सेवेत रवाना करणे होईल अलीकडे वर्तमान यैकण्यांत येतो की सरकारात रोा धोंडोपंत गोकले याच्या संधी लागिले आहे ते आलीयावर हिकडे येणार असे वर्तमान येकतो येकादे त्यावरी इकडे आले या स्वामी यानी कुमकीचा फौज पाटून आमचे संरक्षण करावी एसे स्वामी याचे वचन आहे म्हणोन रे॥ मुदबसपानी सांगितले याजवरून आम्ही खातरजमा आहो परंतू गोकल्याची व आमची बिगाड असल्याचे परस्परे सेवेत विदत आसेल त्यानी इकडे यावयास काही चुकणार नाही त्यानी आल्यावर स्वामी याचे कुमक येऊन संरक्षण व्हावाविनहा दुसरे आधार नाही सेवेशी विनंती लिहिले जाते जे एकादे संधीच्या प्रसंगच घटण पडलेया त्यांत आमचे संस्थानाचे नांव त्यानी न घेत येसे करारमदार केली आसावी मणजे स्वामी याणी आम्हास कुमक पाटून संरक्षण करावयाची प्रयास पडणार नाही येविसी अगोदर विनंती लि॥ असो येविसीची त॥वार मजकूर रो॥ मुदबसपानी सेवेत विनंती लिहून घेतले आहे त्याप्रमाणे कृपा करून संरक्षण करायास स्वामी समर्थ अहा राजेश्री रत्नाकर आपानी आम्हास कुमकीच्या फौजा करिता पत्र लिहिले होते आपल्या मर्जी ठेवायाच्या जरूर जाणोन जे जाहलेच जमीयेत सरंजाम करून रोकडे पाठवणे केले आहे सेवेशी कलावे म्हणोन विनंती लिहिले आहे बहुत काय लिहिणे हे विनंती.

पौा छ २७ माहे सफर अधिक श्रावण
मास सु॥ तिसा तिसैन मया व आलफ
मु॥ लस्कर नजीक काले.

लेखांक २०३ तारीख १-९-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २१७

राजेश्री नारायणराव घोरपडे सेनापति

गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ बालाजी जनार्दन आसीरवाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष तुम्ही पत्र पाठविले ते पावले कर्यात कापसी व मौजे लाट व मौजे पटणकुडी वगैरे ठाणी आम्हाकडे सरंजामास आहेत त्यास राजश्री परशरामपंत भाऊ याजकडून घासदाण्याचा उपद्रव लागतो व आमचे भाऊबंद त्यास गैरवाका समजाऊन उपसर्ग करितात याजकरिता सरकारचे पत्र पाटवून दंगा न करीत ते केले पाहिजे म्हणोन लिहिले ते कलले ऐशास तुम्हाकडील सरंजामाचे ठाण्यास घासदाण्याचा व तुमचे भाऊबंद याचे समजाविल्या वरून उपद्रव करू नये या अन्वये सरकारचे पत्र परशरामपंत भाऊ यास पाठविले आहे व येथूनही लिहिले आहे त्यास पत्रे त्याजकडे पाठवावी ते समजोन तुमचे भाऊबंदास सांगतील व घासदाण्याचे उपद्रवाचा बंदोबस्त करितील रा छ १९ रोवल बहुत काय लिहिणे लोभ सो दिजे ही विनंती.

लेखांक २०४ तारीख ११-९-१७९८

श्रीं

रु. नं. १
अ. नं. ८९

राजश्री राघो सदासिव यासी आज्ञा
केली ऐसीजे सुा तिसा तिसेन मया

व अलफ तुम्ही हुजूरून आज्ञा घेऊन निघोन गेला ते सुरापुरास जाऊन राजश्री वेंकटप नाईक बहिरी बाहादर याची भेटी घेऊन त्याजकडील मातबर मनुष्ये फौज व जमीयेतसुधा तुम्ही बराबरी घेऊन त्वरेने हुजूर यावे त्यास अद्यापि तुमचे येणे जाहाले नाही यावरून नाईक बाहादर यासी थैली समवेत आज्ञापत्र सादर जाहाले आहे ते त्यास प्रविष्ट करून त्याजकडील मातबर येणार त्यास फौज व जमीयेतसुधा बराबरी घेऊन तुम्ही हुजूर त्वरेने यावयाचे करणे जाणिजे र॥ छ २९ रबिलावल लेखन सीमा.

लेखांक २०५ तारीख १०-१०-१७९८

श्री

रु. नं. १
अ. नं. १०४

नकल

यादी राजे वेंकटपा नाईक बलवंत बहिरी रो अबजेंग मुतहवर दौलाबाबरुल मुलुक बहादर लेहून दिला करारनामा मुा १२०८ फसली

१ आम्हाकडील फौज स्वार व बार व पयादे यो तीन हजार खचित पाटवितो त्याचे पोटीस रत्नाकर आपाच्या यादी प्रमाणे कृपाकरून द्यावे ———————— कलम

ज्या प्रमाणे पंडित राजाज्ञा याणी वचने दिल्हे आहे त्याप्रो चालविले जाईल.

१ आम्हास समय येऊन पडल्या सरकारची फौज कुमक बीनखर्चा पाटवावी यैसे माहाराजाचे वचन मुदब्रसापास रुबरू आहे त्याप्रमाणे समये पडल्यास कुमकी बीनखर्ची कृपा करून पाटवावी ———————————— कलम

सदरहू प्रमाणे फौज कुमकसे द्यावयासी येईल.

१ आम्हावर कसाला फार आहे सर्व विषई आम्ही महाराजाच्या पदरसे पडिले असो यक लाख रुपये बीन व्याजी कर्ज कृपाकरुन द्यावे सदरहू रुपये वर्षास तीस हजार प्रो तिनी वर्षास नवद हजार चौथ्या वर्षास दाहा हजार याप्रो पावते करून देऊ.
———————————— कलम

येविसीची आज्ञा सखाराम खंडो यासी जाली आहे तुमचे करारा प्रो येवज पावेल.

१ सिबंदी फौज ठेवणेविशईचे मजकुरास सेरासिरस्ता न कलता मार्गाचे खर्चास न देता लोक निघणार नाही त्याचा जास्वाल कलल्यास सिबंदी फौज व बार व प्यादे यो तीन हजार पावेतो सिबंदी ठेऊन पाटवणे होईल. ———————— कलम

सदरहू जाबतेवरी मखलासी केली आहे फौज हुजूर पाटवणे

१ दोन हजार जमीयतची जागीर आमचे सोईची कृपाकरुन द्यावी———— कलम

सदरहू प्रो जागीर तुमचे सोई प्रो देणेची आज्ञा करून देवितो.

१ माहाराजाचे संनिधानी आमचे घर आसावे येसे मुदब्रसापासमागमे सेवेशी सांगोन पाटविले आसता स्वामीनी यादी खास दस्तुर रुजू मोर्तब करुन पाटविले वरून खातरजमा जाहाली प्रस्तुत आम्हाकडोन घर करून ठेवणारास ठेवितो पुढेही तसेच प्रसंग पडल्यास आमचे येणेही होईल सद्या ठेवणारास पाठवतो स्वामीनी अभयवचन दिल्हे प्रो मानपान कडोन संवरक्षण करणे भार स्वामीस मिळाला आहे.……… कलम

तुम्हाकडील पाटवणारास हुजूर पाटवावे घरजागा उत्तम देवणेची आज्ञा होईल.

सदरहू लिहिले प्रमाणे कलमे साहा करार असे जाणिजे छ ११ माहे रबिलाखर सन १२०८ पता

येकूण साहा कलमाची मखलासी हुजूरून करार करून दिल्ही असल जाणिजे ता छ २९ माहे रबिलाकर सदरहू यादीवरी सिक्याचे मोर्तब करुन दिल्हे यैसे.

लेखांक २०६ पौ तारीख ११-१०-१७९८

रु. नं. १

अ. नं. ११२

तालीक खत फिरंग

शिवाजीराजे छत्रपति दौलत व कामयाब बाशह

ब्रिशियार राजे वालाशान फ्रडिरक आंतोन दाविंयोग

काब्राल क्रिस्त बनाम सातकारीय

साहेबाचे खलव तगार व तैनत जनराल फौंजानी पुर्तुगाल व गोवर्णशेर व व

जनराल बहादर

छ १० जिल्कादचा

आ वालाशान पन्हाही मोहबतनामा पाटविला पोहचून त्यातील मजमून आमलात आणिता उभय सरकारात येकरंग दोंस्ती चालती त्याचे महकमी लायक आहे याबाबे बिशियार खुशाली हाशील जाहाली अज हजरत आपखुशीने रुखसत घेऊन गेले त्यास जरूर ती सरंजामी करविली

कर्नाटक प्रांताचे मोहीमेस आज हजरत कडील जमीयत हालचे वख्ती फिरवणेस होंत नसे सजावार समई नुकसानचा जाबिता महबतनामे मजकूरात कल्मी केला पाटविला जाईल बर्सात नजीक पोंहचलेवरून दुसरे मनसभेस वख्त मवसर नाही किनखाप थान दोन कबूल होऊन फिलहाल निखाल्स ब असल दोस्तीचे राहानेची निधान दोन रवाना होत आहेत अखेर आ वालाशान पन्हाकडील केला जातो कीं इजयानीबांचा अमल अज हजरत आहे त्यापेक्षा सदरहू दोस्ती उभयत जियादा चालणार नाहीं खुदायेताला आ वालाशान पन्हास आपले पन्हातच रखोहे निवीस्तन गोवा ब ता १६ माहे मायु १७९८

फ्रडरिक आतोन दावीयेगकाबुल

पौ छ १ माहे जमादिलावल
सुा तिसा तिसैन मया व आलफ
मुा करवीर.

लखांक २०७ तारीख २२-१०-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २३३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२५ काल्युक्त नामसंवत्सरे आश्विन शुद्ध त्रयोदशी इंदुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजश्री मुदबसप दुपद सर नाडगौंडा समत आनंद कानेवरी यास आज्ञा केली यैसीजे तुम्ही विनंती पत्र लिहून पाटविले ते प्रवीष्ट होऊन साध्येत लेखनाभिप्राय आवगत जाहाला पेशजी तुम्ही हुजूर आला होता ते समई रुबरू तुम्हास जे आज्ञा करणे ते केलीच आहे तदनरूप जाबसाल त्वरेने घडोन आले आसते तरी सर्व तुमचे मनोदयानरूप घडोन आले असते तुम्हा-कडून पैरविस दिवसगती लागली बरे आसो तेथींल संवस्थानीचा अभिमान पूर्ण माहा-

राजास आहे फौजा त्याप्रांती गनीमाच्या येऊन पोहचल्या आहेत म्हणोन काही न गडबडने याविषई तुम्ही राजश्री बहिरीजी बाहादर यास सांगोन हिंमत आवसान न सोडिता तुम्हाकडील तमाम फौजा व स्वार मजबुदीने सरंजामसुधा यकदील करून रात-बिरात घाव डाव पाहून छेप्याची पैरवी करून गनीमाची फौज गारतीत येई यैसा विचार पकेपणे करणे म्हणोन बहिरी बहादर यास सांगावे वरकड पुढील पैरवीचा मज-कूर आज्ञापत्री राजश्री राघो सदाशिव यासी लिहिला आहे त्याप्रमाणें नाईक बाहदरास सांगोन पैरवी करून पाटबणे हुजरूनही पैरवीचा आर्थ ध्यानात आणोन खासा स्वारी डेरे दाखल जाहाले आहे पुढे फौजेचा बंदोबस्त होऊन मनोली व तोरगलचे सरहदेस हुजूरची फौज येऊन दाखल होत आहे तुम्हाकडील फौज व स्वार जलदीने रवाना करून जलदीने पाटवणे येऊन पोहचताच त्याजबराबरी कुमकेस हुजूरची फौज देऊन रवाना करणेची आज्ञा सादर केली जाईल आणि कार्यभागही तुम्हाकडील घडोन येईल.

लेखांक २०८

तारीख २८–११–१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. १०१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२५ काल्युक्तनाम संवत्सरे कार्तिक बहुल पंचमी सौम्य-वासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री राजा सिव छेत्रपति स्वामी याणी राजश्री कृष्णराव व्येकाजी देशपांडे समत कारडगी यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाकडील वर्तमान राजेश्री त्रिमलराव श्रीनिवास याणी माहाराजाचे सेवेसी विनंती केली यावरून सादेत निवेदन जाहाले हुजूरच्या फौजा सरंजामसुधा त्या सरदेस रवाना जाहाल्या असत येऊन पोहोचतील तुम्ही कोण्हेविसी अंदेशा न खाता आपले तालुकेचा बंदोबस्त राखून वरचेवर मार-निलेचे विद्येमाने विनंतीपत्री सादेत निवेदन होये ते करीत जाणे येकबाल पन्हा नवाब आबदुल खैर खां दलेलजंग बहादर याणी त्रिमलराव मारनिले यासी सातसेह होनाची चिटी तुम्हाकडेस दिली आहे तरी मशारनिलेस सदरहू ऐवज पोचता करणे नवाबाकडील काजकामामुले मशारनिले येथे हुजूर दीड वर्ष पर्यंत बहुत मेहनत केली आणि कर्जाचे तगादेत आले आहेत याजकरितां नवाबानी ऐवज देविला आहे त्याजप्रमाणे ऐवज मशारनिलेस निकडीने पोहचता करणे तुम्ही हुजूरचे व नवाबाचे लक्षात राहून आज्ञे प्रमाण सेवा करीत जाणे वरकड आज्ञे प्रमाणे मशारनिले लिहितील त्याजवरून कलल तुम्ही नवाबाचे दौलतीचे कदीम येकनिष्ठेपणे राहून सेवा चाकरी करीत जाणे. जाणिजे.

लेखांक २०९ तारीख ३०-१२-१७९८

पारसनिसी

रु. नं. १

अ. नं. १२३

यादी श्रीमंत माहाराज राजश्री छे त्रपति स्वामी यास साल्मज़कुरी नवीन माहाल कमाल आकाराचे नेमून द्याव ते सुा तिसा तिसैन मया व अलफ

२५०००० रुो

यो दोन लक्ष पनास हाजार कमाल आकाराचे नेमोन देऊ त्या प्रो घ्यावे.
येणे प्रो करार.

छ २१ रजब सुाा तिसा तिसैन
मार्गसीर्ष मास
मुाा पुणे.

सेवकास अनेक प्रकारच्या दौलती प्रकर्णी मसलती पडतात त्यास महाराजाचे सेवेसी विनंती पत्र सेवक लिहील त्या प्रो फौजची रवानगी हरवख्त होत जावी.
येणे प्रो करार.

लेखांक २१० तारीख ३०-१२-१७९८

श्री

रु. नं. १

अ. नं. २४८

यादी माहाराज राजश्री छेत्रपति याजकडील ठरावाची कल्मे सुा तिसा तिसेन मया व आलफ

सरकार तालुके गडकोट किल्ले माहाल व गाव सुधामत आहेत त्यात अलीकडे परशराम रामचंद्र वगैर यानी फिसालती केल्या त्यामुले परस्परे अनेक प्रकारचे वेध पडोन सरकारचे मुलकाची व तुमचे मुल्काची खराबी जाहाली इतःपर परस्परे होऊ नये आमचा तालुके चिकोडी व मनोली मिलोन पेसजी कैलासवासी नारायणराव पंडित व रघुनाथराव पंडित यास साडेबारा लक्ष रुपये देऊन दोन्ही तालुके निर्वेधपणे त्यानी आमचे आम्हाकडे दिल्हे त्याप्रमाणे निर्वेधपणे चालवावे त्याजविसी इतःपर दिकत असो नये. कल्म १

तालुका आम्हाकडे सुधामतप्रमाणे
निर्वेध चालवा तुम्हाकडील
अलीकडे महाल गाव खेडे टाणे जे
असेल ते तुमचे तुम्हाकडे द्यावे
परस्परे किलाप असू नये. कलम १

सुधामत माहाल व गाव व ठाणे
जात व किल्ले हाये स्वामीकडे
चालत आहे त्यास सेवकाकडून
उपसर्ग होणार नाही निर्वेधपणे
स्वामीकडे चालेल सेवकाकडील
माहाल व गाव व ठाणे जात
सरंजामी सरदारसुधा स्वामीनी
घेतले असेल ते सोडून द्यावे. येणे
प्रमाणे करार.
राजश्री बाजीराव पंडित प्रधान
याच्या लक्षात राहून फौज
ठेविली त्याचा खर्च सरकारात
पडला त्याची सरभरा तुमचे
संतोषाने होईल तेच करून द्यावे.

कलम १

आलाहिदा यादी करार करून
दिल्ही आहे. येणे प्रा करार.

तीर्थरूप कैलासवासी दादासाहेब
व तीर्थस्वरूप नारायणराव याच्या
कराराप्रा दोनी तालुके
स्वामीकडे दिल्हे त्याप्रा निर्वेध
चालतील सेवकाकडून उपद्रव
होणार नाही. येणे प्रमाणे करार.
सरकारचे फितुरी अथवा कोणी
तुम्हाकडे आल अस त्याचा पुस्त-
पन्हा तुम्ही करू नये आमचा
आम्हाकडे पाठवाव त्याचे
वाजबीचे असेल त्याप्रा येथून
होईल. कलम १

स्वामीच्या तालुकेतील कोणी
सेवकाकडे आलयास सेवेसी
पाटवून देऊ स्वामीनी
वाजबी असल त्याप्रा करावे
येणे प्रा करार.
छ २१ रजब सु॥ तिसा तिसैन
मार्गसीर्ष मास सु॥ पुणे.

लेखांक २११

तारीख २६--१--१७९९

श्री भगवती

अनंत विजयते

रु. नं. १

अ. नं. १०७

श्रीमन्माहाराज छत्रपति स्वामीचे चरण शेवेस विनंती शेवक बहुगुण सदाशिव वाग दुभाशा संस्थान गोवा विज्ञापन्हा ता काल्युक्त सवछरे पौ वद ५ मी स्वामीचे कृपाकटाक्षे येथील वर्तमान यथास्थित असे विशेश माहाराजाही कृपाल होऊन आज्ञापत्र आश्विन शु॥ १० मीचे निरोपन केले पावोन मस्तकी वंदन जाहाले महाराजाचे सेवेस

को. घ. ३...१२

अंतर होते ऐसा अर्थ नाही उभय सरकाराशी अधिक श्नेह व्हावा हेच सेवकाचे चिती आहे पूर्व माहीत तेव्हा उभय सरकाराचे ममता चालवी या खेरीज दुसरा विचार नाही थैल्या येथून माहाराजा हुजूर जात असेत पोहचल्यावर जाब्रसाल उक्ततेस येईल सेवेस श्रुत होय ही विज्ञापणा. पौ छ २६ माहे रब्रिलाखर सुा मयातैन व आलफ मु॥ करवीर.
पौ ता. २७--९--१७९९

लेखांक २१२

तारीख २७-१-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. १०४

राजश्री प्रतापसिंग संवस्थान कोची
मलेवर गोसावी यास

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री उपरी बहुत दिवस तुम्हाकडून पत्र येऊन त प्रांतीचे साकल्ये वर्तमान निवेदन होत नाही तरी येसे न करावे वरिचेवरी पत्री तुम्हाकडून साकल्यार्थ लेहून पाटवून स्वामीस संतोषावाप्ती होय ते करीत जावे प्रस्तुत तुम्हाकडून मौ सिताराम येऊन कितेक वृत विदित केल्यावरून सर्व निवेदन जाहले हली हत्ती दोन रवाना बदल तयार जाहाले असत सिब्राड रवाना होंऊन येतशे करणे म्हणोन विनंती करोन घेतली त्यावरून सांप्रत सिब्राड रवाना केले आहे तरी हत्ती रवाना करून पाटऊन द्यावे हत्ती बरोबर मातबर मनुष्र देऊन केवल मार्फाजातीने येऊन पोहचतसे करावे ते प्रांती हस्तीदंताची पालकी नाजूक प्रसंदी होत आहे म्हणोन विदित जाहाले आहे या करिता सांप्रत येक पालकी नाजूक पंसदी तयार करून पाटवून देतस करावे पूर्वादारम्य श्नेहभाव येकत्र न्यायेकडून चालत असता श्नेहात नून्यता पडो नये वरकड कित्येक वृत समक्ष माारनिलेस निरोपावयाचे निरोपिले असे सर्व याचें मूखातरे मनन होईल बहुत काय लिहिणे ताा छ २० माहे शाबन मोर्तब्र शिकीयाहचे लफाफेवर नांव ल्याहावे यैली किनखापी लफापेवर सिका थोर अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य राजश्री प्रतापसिंग संवस्थान कोचीमलबर गो प्रविष्ट कीजे रवाना छ. २० माहे शाबान उर्फ पौषमास सुमातिसा तिसैन मया व आलफ शके १२५ काल्युक्तनाम संवत्सरे.

लेखांक २१३

तारीख २६-२-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. ११५

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक दौलतराव सिंदे कृतानेक विज्ञापना तागायत छ २० रमजान पावेतो

यथास्तित असे विशेष मातोश्री बायाचे खुल चौवे लभाड मिळोन लांबविले हाली कूच करून करवीराकडे जाणार म्हणोन ऐकण्यात येते त्यावरून स्वामीस विनंती लिहिली आहे नवाबआदि करून पत्रे गेली त्यानी आस्त्रा न दिला इकडील फौंज पलटणेही मागे आहेत त्यास स्वामीनीही आसरा न दिला पाहिजे सूचेनार्थ विनंती लिहिली आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पौ छ ४ माहे शोवाल सन तिसा तिसैन मया व आलफ मुकाम लष्कर ननीक जतगडी परगणा येथे होता.

(पौ ता. १२-३-१७९९)

लेखांक २१४ माहे मार्च इ. स. १७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २२७

विशेष राजश्री कृष्णाजीपंत हुजूरने आज्ञा घेऊन आपणाकडे गेले त्या येलक्डे आपणाकडून पत्र येऊन परामृष होत नाही यैसे नसावे सदैव पत्री साकल्यार्थ लिहून चिताचे ठाई आनंदावाप्ती होय ते करीत असावे यानंतर इकडील वर्तमान तरी राजश्री परशरामपंत भाऊ सातारेहून निघोन मिरज तासगांवकडून कर्नाटक प्रांती गेले त्या लगतेस हुजूरचा कदीम व जदीद प्रांत आहे त्या प्रांतास त्याजकडून उपसर्ग होणार हे श्रीमन्महाराज राजश्री स्वामीचे निवेदनात आलेवरून पुढे त्याचे तोंडावरी हुजूरने फौजा रवाना होऊन किले तोरगल हा स्वामीचा जागा स्वामीनी बहुत दिवस अवलोकन केला नव्हता याजकरिता किल्ला अवलोकनार्थ हुजूरची स्वारी करवीराहून फौजसह वर्तमान निघाली इतकियात पुण्यशील मातोश्री लक्ष्मीबाई सिंदे व राजश्री दौलतराव सिंदे याचे वैमनस्य आलेमुले बाई पुण्याहून निघोन या देसी येऊन शिंदेबायाचे वकील व पत्रे हुजूर आली जे आम्ही देशांतर करीत नष्टचर्य असेच किती काल भोगावे? माहाराज धनी आमचे नष्टचर्य दूर करून संगोपन करणार स्वामीशिवाय दुसरा कोण आहे? सर्वोपरी हे संकट महाराज निवारण करतील हे लक्ष धरिले आहे आज्ञा जाहालेस सेवेसी येऊ याप्रमाणे त्याची विनंती व वकीलाचे बोलण्यातील भाव हुजूरचे निवेदनात आले तेव्हा त्यानीहून लक्ष धरून येत असता त्याचे अलक्ष करणे हा माहाराजाचा सांप्रदाय नाही पुढे कोणते पलेवरी जाणार तसे जावो परंतु येतो म्हणतात त्या अर्थी या म्हटलेच पाहिजे असे दृढतर होऊन त्यास येण्याविसी आज्ञा जाहाली त्यावरून सिंदेबाई फौजेसुधा हुजूरचे दर्शनास आली आहेत येसियासी पेशजी आपले विनंती पत्र आले होते त्यातील भाव चार दिवस घ्यावे आपण स्वामीचे लक्षाशिवाय नाही त्यावरून स्वस्थचिते दिवस घेतले प्रस्तुत शिंदेबाई इछा धरून आली त्या पक्षी अभिमान धरणे प्राप्त जाहाले हा प्रकार राजश्री दौलतराव सिंदे यासी संतोषावह नाही यदरथर्थ पुढील कर्तव्य तर स्वामीच्या मनोदया-

नुरूप घडोन त्याची स्थापना जाली पाहिजे तदन्वये मोठीच मसलत योजावी लागती आपण पुरातन महाराजाचे राज्यातील एकनिष्ट मातबर सरदार आणि स्वामीचे लक्ष आपले ठाई त्याअन्वयेच आपलेही लक्ष माहाराजाचे चरणी त्या पक्षी या मसलतीस आपली सला असोन कारभार सिधीस न्यावयाविषईचे कितेक अर्थ बोलणेकरिता आम्हास आपणाकडे जाणेची आज्ञा होऊन आमची रवानगी जाहाली आहे या पत्राचे उत्तर येताच निघोन येतो. दरशनांती सर्व अभिप्राय समजण्यात येतील.

लेखांक २१५ तारीख २-४-१७९९

श्री

रु. नं. १ पौ छ ७ जिल्काद

अ. नं. २३९ तिसा तिसैन मु॥

श्रीमन्माहाराज राजश्री छेत्रपति
स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक येशवंतराव धोरपडे अमिरुलउमराव कृतानेक विज्ञापना तागाईत छ २५ शवाल पर्यंत स्वामीचे कृपाकटाक्षे कडोन सेवकाचा वर्तमान यथास्थित असे विशेष आलीकडे आज्ञापत्रे येऊन शेवकाचा सांभाल होत नाही यानंतर राजश्री दौलतराव शिंदे याचा व बायाचा समेटाविशी राजश्री पंत प्रधान याणी बहुत प्रकारे प्रयत्न केला परंतु आद्यावत समेटचा योग न घडता बाया तिकडे आले आहेत अश्या-प्रसंगी स्वामीयाणी मनावर घेऊन समेटाचा योग घडविला असता स्वामीस बहुत कीर्ति आहे येणेकडोन कितेक कामकाजे उलघडोन सहजात येतील व शिंदे व राजश्री नाना याजवर कृतोपकार केल्या प्रमाणे होईल तेही स्वामी कार्यास उपयोगी पडतील आसा भाव आहे वरकड कित्येक विनंती लिहिणे आहे ते मागाहून विनंती लिा या पत्राची उत्तरे सत्वर लिहिणेविशी आज्ञा जाहाली पाहिजे. विशेष लिहिणे शत्क नवे हे विज्ञापणा.

पौ छ ७ जिलकाद तिसा
तिसैन मुा जलालपूर
(पौ ता. १३--४--१७९९)

लेखांक २१६ तारीख ३-४-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २३४

सेवेसी विनंती विज्ञापना ता छ २६ माहे शवाल पावतो साहेबाचे कृपेकरून

यथास्तिथ अस यानंतर इकडील वर्तमान तरी आमची व त्याची भेट होऊन बोलणचा अर्थ समजोन देऊन निरोप जाहाला आम्ही निघोन याव त्यास सिंदेची स्वारी फाल्गुन वदेचेथातीं दिवसी मांजरी होऊन माघारी पहिले जागेवरी वाणवडीस येऊन राहिली तेव्हा राजेश्री दाजीसाहेबानी आणखी चार रोज ठेऊन घेतल आणखी काय मसलत होती ती पाहून निरोप देऊ त्यावरून राहिलो येथील बोलणेचा बेत जो बाया तिकड आल्या आहेत त्या आपले कशेपी लाऊन घेन आमचा त्याचा समजोता करून द्यावा. विपर्यास न पड ते कराव म्हणजे आमचा आपला सेरेशे राहातो आणि आपली कामकाज सांगावी त्या अन्वय घडून येतील त्यास हाताखाली घेऊन भलत खटल उत्पन्न न कराव ऐसा जाबसाल जाहाला याच उत्तर आल म्हणजे आपलेकडे कोणासी रवाना करितो समजोता करून द्यावा दुसर वर्तमान तरी सिंदेचा व श्रीमंताचा करार पेशजी जाहाला होता त्यावरून रुपय दिल बाकी राहील त्याची निशा जाहाली सिंदेनी कूच करून जांबगावास जाव ते न होता आपला कार्यभाग ऐवजाचा करून घेऊन मागती येथ आल त्यावरून आणखीं सेवशेय राजश्री नानास व श्रीमंतास आला आहे त्यावरून नैमीचे दिवसी विश्रामबागत श्रीमंताची व नानाची भेट होऊन च्यार तास रात्रपर्यंत मसलत जाहाली त्यानंतर सिंदेनी मसलत करून बायास आणावयासी पाठवितो म्हणऊन श्रीमंता परवाणगी घेऊन आपलेकडील राजश्री बाबूराव आंग्रे व यादो भास्कर व बनाजी × येला देऊन रवाना केल आहेत श्रीमंताकडील राजेश्री दादा गजरे व बजाबा शिरोळकर येस निघोन कोसी दोन कोसी उतरल आहेत तेथून कूच होत ऐस जाहाल म्हणजे आम्ही निघोन येतो बालोबा पागेच बोलण सुटका होणेच लागल आहे दा लक्ष रुपये द्याव त्या पैा तूर्त दोन लक्ष रुपयेची निशा जाहाली तो ऐवज देऊन हिकड लोक रवाना केल राजश्री परेशरामपंत याजकडून बाबा काले येथ आल आहेत त्यास नकारनामकाकडून सांगण आहे कीं तुम्ही बायास मिलोन जम बांदावा त्याच बोलण जे आम्हास राहावयास जागा येक करून द्यावा आणि आम्हाकडील स्वास्तव रास्तेस निकड लाविली आहे ती मना करा.

लेखांक २१७ तारीख १३-४-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २४०

श्रीमंत् माहाराज राजश्री............छत्रपति

स्वामींचे शेवेशी

विनंती सेवक बालाजी जनार्दन कृतानेक विज्ञापणा सेवकाचे वर्तमान ता छ ७ जिल्काद पावेतो स्वामींचे कृपावलोकने करून यथास्थित असे विशेष स्वामीनी दोन आज्ञापत्रे सादर

केली ती पावली कांहीं बोलणे आहे याजकरिता राजश्री बालाजी गणेश यास सत्वर पाटवावे म्हणोन आज्ञा व बाया सिंदे हुजूर आल्या याजमुले चितात आंदेशा येईल तर येऊ नये जे होणे ते आपल्या लक्षानरूप घडेल याप्रो राजश्री आबाजीपंत 'यास आज्ञा जाहाली त्याजवरून त्यानी येथे लिहिले ते सविस्तर कलले ऐशास स्वामीचे आज्ञेवरून राजश्री…………पंत प्रधान याजवल विंनंती करून बालाजी गणेश याची रवानगी केली आहे लौकरच येऊन पोहचतील बाया प्रकर्णी आबाजी पंत यास आज्ञा जाहाली त्या विषईचे अर्थ बालाजी गणेश यास सांगितले आहे सेवेशी निवेदन करितील ते मनांत आणून पंत प्रधान याचे मनोद्यानरूप आज्ञा व्हावी यातच स्वामीचा उपयोग आहे दरम्यान कोणी कांहीं समजावितील ते मनांत न आणावे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा. पौ। छ १२ मोहरम सु॥ मयातैन व अलफ
मुा बारवाड.
(पौ ता. १७–६–१७९९

लेखांक २१८ माहे एप्रिल इ. स. १७९९

रु. नं. १
अ. नं. १९२

श्री

राजश्री प्रतापसिंगराव बंदर रामेश्वर
कोचीमलेबार[१] गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री………उपरी बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन साकल्यार्थ निवेदन होत नाही तरी वरचेवरी पत्री साकल्ये वर्तमान लेहून पाटऊन माहाराजास संनोषावाप्ती होये ते करीत असावे प्रस्तुत वेदशास्त्रसंपन्न राजश्री हरभट अभ्यांकर माहाजन जंजिरे मालवण हे तिर्थोपाध्ये हुजूरचे हे श्री………चे यात्रस जाणार त्यास आपले आमलदारास ताकिदी देऊन आपले प्रांताची सरहद पार करून द्यावे आणि यात्रा करून येतील तेसमई मशारनिलेस आपले प्रांतातील आमलदारास ताकिदी देऊन सरहद पार करून देऊन यात्रा सांग्ये होऊन येई तो अर्थ करावा रवाना छ १७ माहे शाबान बहुत काय लिहिणे.

मया
देयंविरा
जते

---

१ कोचीन मलबार

माहे एप्रिल इ. स. १७९९

लेखांक २१९

श्री

रु. नं. १

अ. नं. १९३

राजश्री प्रतापसिंगराव बंदर कोचीमलेवार

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति राजश्री.......................उपरी बहुत दिवस तुम्हाकडून पत्र येऊन त प्रांतीचे वर्तमान निवेदन होत नाही तरी यैसे न करिता सदैव पत्री तुम्हाकडील साकल्यार्थ लेहून महाराजास संतोषावाप्ती होये ते करीत जाणे प्रस्तुत फाल्गुन वा॥ ८ स्थिरवासर ते दिवशी माहाल जनानखाना वाडा ६ येथे पुत्ररत्नप्रसव जनोत्साह जाहाला राजे संभाजीराजा नांव ठेविले या संतोषाची शर्करा वेदशास्त्रसंपन्न राजश्री हरभट अभ्यांकर माहाजन जंजिरे मालवण हे तीर्थोउपाध्ये हुजूरचे याजबरोबर पाटविली आहे येऊन पावलियाचे उत्तर पाटवावे आणि चिरंजीवाकरिता हत्ती छावे सुमारी दोन २ पाटवून द्यावे हुजूर हस्तीदंत पालखी खासगी योग्य नाजूक पसंद एक पाटऊन द्यावी म्हणोन पेशजी येक दोनवेला पत्रे आपणास पाटविली होती त्यास हस्तीदंति पालखी येक फर्मासी व हति दोन पाटवून द्यावेत.

तारीख १२-५-१७९९

लेखांक २२०

श्री गणपती

रु. नं. १

अ. नं. १०५

आज स्वारी राजश्री परशराम रामचंद्र ताा मोकदमानी मौजे पालकुड पा॥ हुकरी सुमा तिसा तिसैन मया व आलफ राजश्री श्रीधरराव विठल याचा मौजे मज्कूर हा गाव इनाम असता करवीरकरानी घेतला होता तो हल्ली त्याचा त्याजकडे चालवावयाचा करार करून हे पत्र सादर जाले असे तरी देखत पत्र वेदमूर्ती राजश्री रामचंद्र दीक्षित वाटवे याजकडील कारकून नारो विठल पा॥ आहेत तरी मौजे मज्कूरचे ठाणे सुद्धा हवाली करणे या कामास स्वार ढिा हायच्च पो आहेत यासी मसाला रुपये पन्नास ५० आदा करणे जाणिजे छ ६ जिल्हेज मोर्तब

तारीख २४--६--१७९९

लेखांक २२१

श्री.

रु. नं. १

अ. नं. २४३

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री दादा स्वामीचे शेवेशी

पो बाजी रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १९ मोहरम रोज सोमवार प्रातःकाल पावेतो मुकाम वाडी त्रिमली नजीक आऊध येथ सुखरूप असो विशेष आपण पत्रे छ १० मिनहूची पाटविली ती छ १६ रो मिनहूस मुा मजकुरी पावली हुजूरचे आज्ञापत्र व राजश्री हिंमतबहादर बापू याचे पत्र श्रीमंत मातुश्री बाई यासी होते ते प्रविष्ट करून उत्तरे घेऊन पाटविली आहेत हिकडील मजकूर तरी राजेश्री येशवंतराव शिवाजी याणी गावगना बोली पाटील कुलकर्णी धरून न्हेले आहेत त्याविसी मातुश्री बाई यासी विनंती करून सुटून येईत असे जाले पाहिजे म्हणून लिा त्याप्रो विनंती केली मशारनिले येथे आले होते तेच समई बाई याणी समक्ष येशवंतरावजीस निक्षूण ताकीद केली बोली सोडून देतो यैसा करार करून रोज गुा येथून निरोप घेऊन आपले लग्नाकरिता चरेगावचे मुकामास बुनगेत गेले हाली मशारनिलेस बाई याचे पत्र घेऊन पा आहे हे त्याजकड पाटऊन बोली देतात न देतात याचे उत्तर लौकर पाटऊन द्यावे म्हणजे येथून कोणी खिजमतगार पाटऊन बोली येईत असे घडल मातुश्रीनी ताकीद करणेत आंतर केला नाही पाथरेकडील हुजूरबाजारचे बैलाविषईचा माार लिहिला त्यास हलीचा मजकूर समजोन दिल्हा त्यावरून बाई याणी राजश्री बक्षी यासी ताकीद केली सुपेकर हाली या लष्करात नाहीत आणि बैल वोलखणारही आपलेकडून आला नाही येविसी बक्षी याणी सांगितले आहे जे बैल वोलखणार आणवणे म्हणजे ज्यापासी असतिल त्यास ताकीद करून बैल देवितो याप्रमाणे उत्तर जाले आहे त्यास पाथरेकडील कोणी पा द्यावा खटपट करून पाहून बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

(पौ ता. २९-६-१७९९)

पौ छ २४ मोहरम सुमा
मयातेन व आलफ मुा बार-
वाड.

लेखांक २२२ तारीख २४-६-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २४२

सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १९ मोहरम पावेतो यथास्थित असे विशेष राजश्री परशुरामपंत भाऊचा मुकाम बालेकुडा नजीक आहे बोलणे करिता राजश्री बाबूराव नाना आले आहेत पुणीयाहून राजश्री बाबा काले मिरजस येऊन भाऊ जवळ आले तेही येणार यैसे लिहिले हाही माार मातुश्री बाई यासी निवेदन सहजात केला उत्तर जहाले जे आमचा समेट व परशरामपंताचे हुजूर बोलणे दोनी सारखीच आहेत

आता जे समई माहाराज स्वामीची सेवा घडल तो दिवस सुदीन याविसी आजीचेप्रसंगी काय बोलू ? माहाराज स्वामीचे पुसणे करू जे घडल ते प्रमाण यसे उत्तर जाहाले आणि सांगितले जे परशरामपंत यास इंग्रजाचे कुमकेस जावे येसे नाना याचे म्हणने त्यास काली जुरस करनेल व मंडळी आली होती सांगणीत कीं इंग्रेजाची व टिपू मागती लडाई जाहाली त्या लडाईत टिपू ठार जाहाला पटन इंग्रजानी घेऊन कबिले धरले पटणात ठाणे इंग्रेजाचे याप्रमाणे होऊन इंग्रेजाची फत्ते जाहाली असे आसता आता परशरामपंतास कुमकेस जा म्हणाव याचे कारण ते कोणत ? या वर्तमानात टिपू काईम आहे येसे दिसते याविसी आम्हासही वानवा आहे कोणता आलेले मंडलीच्या मात्र सांगणीत याप्रमाणे परंतु पुणेची पत्रे यकबारची येतात त्यातून हे लिहिले आद्यापि आले नाही याजकरिता तुम्ही लिहून हे वर्तमान तहकीक कैसे आहे याचा जलदी शोध आणवावा टिपू काईम आसावा यात चांगले आहे येविसीचा शोध पका आणवावा त्यावरून लिा असे तात्या यास समजले आसल आगर आपलेकडेही याची बातमी असल लिहून कलवावे त्याप्रमाणे निवेदन करू बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

पौ छ २४ मोहरम
सुा मयातैन व अलफ
मुा बारवाड

लेखांक २२३ तारीख २४-६-१७९९

श्री

रु. नं. १
अ. नं. २४४

कृतानेक सा नमस्कार विनंती ता छ १९ मोहरम पावेतो वर्तमान यथास्थित असे विशेष राजश्री बलवंतराव तात्या पुणीयाहून करवीरास आले आजी लष्करात हुजूर येणार येताच समजोन घेऊन दिनावधी वरी न घालविता सारांष लिहून कलवितो त्याप्रमाणे मातुश्री बाई यासी निवेदन करावे म्हणून लिा। त्याप्रमाणे निवेदन केले आज्ञा जाहाली जे आम्हास श्रीमंताचे व श्रीमंत राजश्री नानाचे लक्षाशिवाय कोणतेही करणे नाही येविसी आम्हीं पेशजी तुम्हास सांगितले होते त्यावरून त्यानी पुणीयास हा मार लिहिलाच्च असल आणि आलेले ग्रहस्तानी आम्हाविसीचा त्याचा मानस कैसा आहे हाही समजोन घेऊन आले आसतील याजकरिता येविसी आणखी लिहून नाना याचे लक्ष कैसे आम्ही समेट करावा किंवा न करावा करणे तरी काणे पलेन करावा ? याचे लिहून आणवावे त्या सारखे हुजूर माहाराज स्वामीस विनंती करू त्यावरून आम्ही विनंती केली जे इतकी आज्ञा होती तेव्हा आपलातरी मनोगत हा काय ? तेव्हा सांगितल कीं वारंवार सांगणे तो कोणता ? कोणीही आल्तरी दुष्टास काईम ठेऊन यैक्य होणे ही गोष्टी घडावयाची नाही याविसी जो सोबती तोच मित्र यात जे घडणे असेल

ते घडो यैसे उत्तर जाहाले याजकरिता तात्या याजकडील मजकूर समजोन जेसें असेल तैसे वास्तविक उत्तर लिहून पाटवावे त्याआन्वये विनंती करू बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.
पौ छ. २४ मोहरम
सु॥ मयातैन व आलफ
मुा बारवाड

लेखांक २२४ तारीख २४-६-१७९९

श्री.

रु. नं. १
अ. नं. २४१

श्रीमन्माहाराज राजश्री.........छ
त्रपति स्वामीचे शेवेशी

विनंती सेवक बाजी रामचंद्र दोनी कर जोडून कृतानेक विज्ञापणा ता छ १९ मोहरम पावेतो स्वामीचे कृपावलोकन करून शवकाचे वर्तमान यथास्थित असे विज्ञापणा स्वामीनी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर केले ते मस्तकी वंदून सनाथ जाहाले मातुश्री बाई यासी आज्ञापत्र सादर होते ते प्रविष्ट करून सेवेशी विनंतीपत्र घेऊन प॥ आहे यशवंतराव शिवाजी यासी बाई यानी पत्र लिहिले आहे बोली सुदेन यतात. वरकडही आज्ञेच्या लक्षे बोलिलो जातीचे खंबीरीची गोष्टी बलकट आहे यात घडेल ते प्रमाण तपसिले राजश्री हिमतबहादर ममलकतमदार बापू व राजश्री बच्याजीपंत दादा याचे पत्री लिहिले आहे आवलोकनात आणून आज्ञापत्र सादर होऊन उत्तरे देणेस आज्ञा करणार स्वामी धणी समर्थ आहेत सेवेशी श्रुत होणे हे विज्ञापणा.
पौ छ २४ मोहरम सु॥
मयातेन व आलफ.

लेखांक २२५ तारीख २४-६-१७९९

श्री

रु. नं. १
अ. नं. १०६

कृतानेक सा नमस्कार विनंती येथील कुशल ता छ १९ मोहरम पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष वानवडीहून राजश्री आबा चिटनिवीस व बालोबा तात्या व बाजीबा मोदी व बाबूराव आंगरे व जुरस करनेल यैसे पाच जन मातुश्री बाई याचे समजुती बा सापाचे मुकामास येऊन महकुब मुकाम करून आहेत यास व त्यास दोन कोसाची छेटी

आहे येसे पेशजी लिा आहे आलीकडील मजकूर छ १४ मोहरम रोज बुधवारी येके-विसावे घटकेस बाईचे दर्शन जाहाले बाई बिचोबेत पडदेआंत पिछाडीस बैटक केली होती त्या जागेस होती बाहीर कचेरीचा डेरा व चांदणी दिली होती त्या जागेस सर्वत्र मंडली बसोन हे पांचजण मात्र बाईचे दर्शनास बिचोबेजवळ आले होते समक्ष दर्शन नाही बाहीरूनच वस्त्रे व भेटीबदल दोन मोहरा प्रा आंगरे खेरीज करून पुढे ठेविल्या भेटीच्या समई मीही जवल होतो ते दिवसी बोलणे कांहीं जाहाले नाही तैसच सवच निघून मुकामास गेले दुसरे दिवशी मंडली आणखी आली ते दिवशी बाई याणी आपली हकीकत व आबा व तात्या याणी आपली हकीकत परस्परे येकमेकास सांगितली तिसरे दिवशी दोन प्रहरानंतर पांच आसामी ही बोलणे करिता आली ते दिवशी आंगरे यानी बाई यासी वस्त्र देणेबदल आणून पुढे ठेविली बाई याणी वस्त्रे घेतली नाहीत पुढे तात्या आबा व करनेल याणी बोलणेचा प्रसंग केला परस्पर बोलणे होता कांहीं रंग मिठला नाही सेवटी उत्तर सांगितले जे आमची चिठी येईल त्या काली आपण येत जावे बागरचिठी गेत जाऊ नये येसे भाषन जाहाले नंतर संध्याकाली निरोप घेऊन ठिकाणास गेले त्यास दोन दोन रोज कांहीं आले नाहीत आजी बक्षी त्याचे ठिकाणास जाणार आहेत काय बोलोन येतात पाहावे सौरस्ये येश येणे उभयपक्षी ईश्वराधीन आहे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

पौ. छ २४ मोहरम सुा मयातेन
व आलफ मुा हेरवाड.
(पौ ता. २९–६–१७९९)

तारीख २०–९–१७९९

लेखांक २२६

श्री

रु. नं. १
अ. नं. १०८

राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा यासी आज्ञा केली येसीजे आपणाकडून राजश्री कृष्णाजी शामराव हुजूर आले होते त्यास समक्षता आज्ञा होणे ते होऊन आज्ञापत्र सादर होऊन मशारनिलेची रवानगी कार्तिकमासी जाहाली त्यादारभ्य आपणाकडून विनंतीपत्र येऊन कांहीच वर्तमान हुजूर निवेदन होत नाही येसे नसावे नित्य विनंतीपत्री सकलार्थ लेहून संतोषवित असावे वरकड सविस्तर वृत आज्ञा होणे ते राजश्री जानराव जाधव यासी जाहाली आहे मशारनिले यानी आज्ञेप्रो लिहिले आहे त्यावरून कलो येईल.

सदरहू प्रमाणे
१ सेना साहेबसुभा
१ व्यंकोजी भोसले सेनाधुरंधर
२

याचे अन्वये राजमान्य
१ कृष्णराव जाधव
१ श्रीधर लक्ष्मण
२

येगेप्रमाणे पत्र छ १९ रबिलाखर मयातैन व आलफ भाद्रपद बहुल सप्तमी भृगुवार रोज व २८ सिधार्थी नामसत्सरे पत्रे लेहून जानराव जाधव याजकडे दिली.

लेखांक २२७ तारीख २०-९-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २४५

राजश्री सुल्तानराव मालप किल्ले मनोहरगड यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ मयातेन व अलफ राजश्री भगवंतराव गाइकवाड हावलदार किल्ले मुदर यासी

आजरे व उत्तरचे ठाणे घालणेची आज्ञा जाहाली असे तरी तुम्हाकडून किल्ले मजकूरचे लोक कुमक लागेल ती देऊन हुजूरची ठाणी बसत ते करणे जाणिजे र॥ छ १९ माहे रबिलाकर लेखन सिमा.

लेखांक २२८ पौ तारीख २७-९-१७९९

तालीक खत फिरंग

अ. नं. १०२

सिवाजी राजे छत्रपति दौलत व काम

याबबाशद

बिशीयार राजे वालाशान फ्रडरिक आंतोन दावियेगकाब्राल

क्रिस्त बनाम सातकारीय

साहेबाचे खलवतगार ब तैनत जनराल फौजानी पुर्तुगाल गोवर्णदोर व कपिता व जनराल बाहादर

मशहद आंकी वेंकटराव कृष्ण याचे हमराह महबतनामा पाठविला त्यात नेक खबर आं वालाशान पन्हाचे दौंलतीचे अमलात येऊन न्याहायत खुशी हासील जाहाली

कुमकेबाबे कलमी केले त्यास हालचे वख्ती अज हजरत कडील कुदरतीची वेगलीक करिता नये हरयेक दुसरा वख्त गैरखोटा सापडताच आ वालाशान पन्हास सनमान करणेस इज्यानेबाचे दिलात आहे त्याचा दिलापासून खातरजमा केला जाईल

खुदायेताला अ बालाशान पन्हास आपले पन्हात रखो निविस्तान गोवा ब ता। ३ माहे सन १७९९

फ्रडरीक आतोन दावियेगकाब्राल

पौ छ २६ माहे रबिलाखर
सु॥ मयातैन व अलफ
मुकाम करवीर.

तारीख २५-१०-१७९९

लेखांक २२९

श्री

रु. नं. १
अ. नं. ६४६

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे
शेवेशी

बिनंती शेवक खंडेराव भोसले हवालदार ठाणे मनोली कृतानेक शेवेशी विज्ञापणा तागायत छ २५ जावल पर्यंत ठाणे मजकुरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विज्ञापणा एसीजे स्वामीचे आज्ञापत्र छ १ जा।वालच सेवकास सादर जाहाल ते छ १४ जावाल येऊन पावल आज्ञापत्र सिरसावंदोन सनात जाहालो आज्ञापत्रीं आज्ञा सीव सिका पनास हजार रुपये हुजूर पाटवणेविशी आज्ञा दुसर आज्ञापत्र छ ५ जावलच सादर जाहाले ते छ ८ मिनहूस येऊन पावले आज्ञापत्री आज्ञा सेवकास सडेनिशी राजश्री धोंडजीराव वाघ यासी जमावेसुधा घेऊन ठाणेचा बंदोबस्त करून हुजूर येणेची आज्ञा स्वामीचे सेवेशी आज्ञा प्रमाणे येवजाची तरतूद करून घेऊन हुजूर पाटवावे त्यास तंटा बखेडा गांवदंग्यामुले वसत नाही हाली कौल करार दैवास देऊन बोलाऊ पाटवित आहे गोरगरीब येत आहेत आताच वसुलास निकड करावे तरी तेही येणार नाहीत चौघ दैव आल्यानंतर आज्ञेप्रमाणे येवज्याची तरतूद करून देऊन हुजूर शेवशी येतो सेवकास हुजूर येणेविसी आज्ञा सेवक सडेनिसी आज्ञेप्रमाणे हुजूर यावयासी निघालो इतकेत गोखले-कडील बातमी आली कलमबंदी बिनंती लेहून सेवेशी पाटविली आहे याप्रो शेवक ठाणे मजकुरी बंदोबस्तान लोकलोकपालसुधा राहून आज्ञापत्र सादर होणच अगोधर वाग मारनिले यासी जमावसुधा छ १० जावल ठाणे मजकुराहून रवाना करून पाठविली आहे सेवेशी येऊन पोहचतील ठाणे मजकुरास मागून हुजूर आज्ञा करून राजश्री दिनकरपंत रवाना होऊन येत आहेत यैसी आज्ञा त्यास मी हुजूर येतो आल्यानंतर कृपाळू होऊन कोणास आज्ञा होईल ते ठाणे मजकुरास येतील सेवकाविसी गैरवाका बहुतप्रकार विनंती करून येतील त्यास स्वामी कृपाळू होऊन मारनिलेस इकड पाची आज्ञा सेवका येई-तोपर्यंत होऊ नये सेवक आज्ञाप्रमाणे येवजाची तरतूद करीत होतो इतकेत मशारनिले

येणेचा मजकूर ऐकून येवज देणार देत नाहीस जाहले हर कसही येवजाची तरतूद करून घेऊन सेवेशी येतो सेवक फितवेखूर अस बहुतजन हुजूर विनंती केले आसतील येवजाची तरतूद करून घेऊन सत्वरच स्वामीचे शेवेशी येतो निवेदन होईल सेवकास साहेबाचे पायाशिवाय दुसर आधार नाही सेवक ठाणे मजकुरी मुलेबालेसुधा व लोकलोकपालसुधा खदीद जाहालो आहे सेवक साहेबापासी येऊन बक्षीसी घेणेची उमेद होती तेव्हा साहेबापासी येणारानी येऊन सेवकास बक्षिसी बहुत दिली सेवक निकडीनेच निघून साहेबापासी येणार होतो इतकेत गोखल्याकडील बातमी आली इतक दिवस राखलेले व्यर्थ होईल हे समजून येणेस आलश्य जाहाला पेशजी राजश्री परशराम भाऊ फौजेसुधा बारीनजीक आले तव्हा साहेबास सेवकानी क्रियापुरस्कर अर्जी लिहिली होती आजुनी जाहाली तरी सेवकाची क्रिया तीच आहे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २३० माहे आक्टोबर इ. स. १७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २५१

रबासुदगी राजमंडल हुजूरची आज्ञापत्रे व सनदा

सु॥ मयातेन व आलफ

माहे जमादिलवल आस्विनमास

२ छ ४ रोज वे॥ राजश्री रामचंद्रचार्य बिन बालाचार्य बिलगीकर यासी मौजे मजलहटी प्रांत हुकीरी हा गाव धर्मादाय इनाम करून दिल्हा

१ बाबूराव धोंडदेव सुा चिकोडी यासी सनद

१ मौजे माारास

२

२ छ ५ रोज गोविंदराव सूर्यवंशी नि॥ हुजूरपागा यासी तैनातीत मौजे गोरबाल तालुका मनोली हा गाव दिल्हा

१ खंडेराव भोसले हवालदार व आबाजीराम सुभा मनोली यासी आज्ञापत्र

१ मौजे गोरबाल ताा माार यासी सनद

बापू बलाल

२

१ छ माार राजश्री पंत राजाज्ञा यासी आज्ञापत्र

मौजे हेबाल व हासूर व———येथे उपसर्ग लागो देऊ नये छ ६ रोज

पत्र राजश्री उपाध्य बावाकडे फडणिसी सरंजाम

१ सुभा चिकोडी येथील चालवणेविसी राजश्री धोंडदेव यासी पत्र
१ ठाणे यमकनमर्डी येथील चालवणेविसी आज्ञापत्र
सुभेदार यासी

२

छ ६ ता। १० रोज
१ शाहजी पांढरे गोकाक तालुका सुधा
१ निंबाजी यादव यासी मौजे आबदूललाट येथील नाईकी दिल्ही
१ जानराव जाधव यासी मोजे बोचबाळ येथील नाईकी
२ वे।।संपन्न राजश्री उपाध्ये बावा यासी फडणिसी
१ ठाणे गोकाक
१ मनोली

२

१ आबाभट जेरे व।। श्रीची वाडी यासी मौजे सिरटी कसबा शिरोल येथे श्रीचे प्रातकालचे क्षीरचे नैवद्याबद्दल जमीन बिघे ८१४
१ भगवंतभट जोशी मानगाव ता। रुकडी यासी धर्मादाये जमीन बिघे ८५ मौजे मयकुरी दिल्ही
२ राजमंडल दि।। चिटणिसी रोजेकिर्द
शके१२६ सिध्दार्थीनाम संवत्सरे सन मयातैन व अलफ
माहे जमादिलावल
३ छ १७ रोज
२ सिवराव जाधव यासी सेवेबद्दल सरंजामात का। आष्टे दिल्हे
सबब आज्ञापत्रे
१ नारायणेराव पाटणकर सरलष्कर यासी गाव स्वाधीन कर्णेविसी
१ कसबे मारास रजतलबेत वर्तणूक करून वसूल घेणेविसी

२

१ आमृत खंडेराव फडणीस यासी नेमणुकी पेशजी प्रो दोनसेहे रुपये व गला चार खंडी सालमारी देणे आणि साल गुदस्त नेमणुकी बा। बाकीचे शंभर रुपये व दोन खंडी गला राहिलेला तोही देणेविसी बच्याजी बलाल यासी आज्ञापत्राने खासगी करे सरदेशकुलकर्ण मामलेकडून देणेविसी छ १५ रोजच

३

छ १९ रोज सुब्रराव घाटगे सर्जाराव यासी सरंजामात अनवाल तालुकेसुधा करार करून दिल्हा आसे
१ सुब्रराव घाटगे सर्जेराव यासी तुम्ही हुजूर येकांडे आसामी चार व कारकून आसामी

येक सुधा सेवा करीत आहा याजबदल सरंजामात का। मा।र तालुके सुधा करार करून दिला असे तरी सदरहू कसबे गावसुधा अनुभऊन सदरहू आसामीसुधा तुम्ही स्वामी सेवा येकनिष्टेने करीत जाणे म्हणोन आज्ञापत्र

१ देहाये गांवगना का। अनवाल यासी आज्ञापत्र सदरहूप्रो स्वाधीन होणेविसी

१ हणमा नाईक देसाई का। अनवाल का। तालुकेसुधा रुजू होऊन वसूल घेत जाणेविसी

३

छ मारी शाहजी पांढरे समशेरबहादर याचे स्वाधीन गोकाक करणेविसी स्वदस्तूर आज्ञापत्र राजश्री पंत राजाज्ञा यास व तिमाजी रंगो बक्षी यासी येक ठाणे स्वाधीन करणेविसी

१ राजश्री पंत राजाज्ञा यासी ठाणे स्वाधीन करणेविसी अनमान करिता स्वाधीन करणे आणि बक्षी मारनिलेस यादवडचे ठाणे देणे व चिरंजीव राजश्री हैबतराव यासी पाछ्यापूरचे ठाणे देणेविसी अनमान न करणे म्हणोन खासे दस्तूरचे आज्ञापत्र

१ बक्षी मारनिसेस गोकाकचे ठाणे पांढरे मारनिलेचे स्वाधीन कर्णेविसी

२

१ सदरहू प्रो ठाणे स्वाधीन करून रजतलबत वर्तणूक करणेविसी गोकाकचे देशमूख व देशपांडे यासी.

लेखांक २३१ तारीख १९-११-१७९९.

रु. नं. १

अ. नं. ३०६

राजमंडल शके १२६ राज (फाटलें) दि। मजसु
सिदार्थीनाम सु। (फाटलें) माहे जाखर + + +
तैन व आलफ

श्री शुध

तेरीख २० रोज कार्तिक बहुल सप्तमी भोमवासरे मु। करवीर

....

किता दांन पत्र वो राजश्री रामभट बिन हरभट गोत्र काश्यप सूत्र आश्वलायन उपनाम ठकार यासी दिल्ह दानपत्र येसजे तुम्ही बहुत थोर विद्यासंपन्न सत्पात्र तुमच्या योगक्षमाची आनकुलता करून दिलिया स्वामीस परम आवश्यक जाणोन तुम्हास नूतन जमीन भूमीदान मौजे बोरीवडे ता सातवे या गावी किर्दीची दूपिकी भातरोप बिघे २ दोन सकुश हिरण्योदक धारादत कुलबाब कुलकाणु हली पटी व पेस्तर पटी जलतरुपाशाननिधीनिक्षेपसहीत खेरीज हकदार व इनामदार करून दिल्ही असे तरी तुम्ही सदरहू जमीन चतुःसीमा करून आपले स्वाधीन करून घेणे आणि भूमीदान जमीन तुम्ही वडिलाचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने आनभऊन श्नानसंध्यादि षट्कर्म आचरोन स्वामीस व स्वामीच्या राज्यास कल्याण चिंतून सुखरूप राहाणे जाणिजे.

लेखांक २३२ पौ तारीख २४-११-१७९९

श्री.

रु. नं. १

अ. नं. ११७

श्रीमंत राजेश्री राजा सिवछत्रपति माहाराज स्वामी

गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमाने श्ने।। राजे वेंकटपा नाईक बळवंत बहरी रोआ बाजंग मुतहवर दौला बाबारुल मुल्क बाहादर कृतानेक रामराम विनंती विज्ञापना ऐसीजे येथील कुशल जाणून स्वानंद वैभव लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष महाराजाचा शेवेसी येथोन फौज प्यादे देऊन रवाना केले असता ऐनापुरापावेतो जाऊन तेथोन माघारी आली याचा विस्तार राजेश्री सखोपंत व राो मुद्बासपा उपद विनंती करतील त्याजवरोन ध्यानास येईल आमचे मानस सर्व प्रकारे माहाराजाचे कृपा संपादोन उर्जित व्हावी हेच विनाहा दुसरे इछा नाही प्रस्तुत जे सांगायाचे ता।।वार राो उभयता मशारनिलेस व राो राघवेंद्र अस्वथ राऊ यास सांगोन पाटविले आहे याणी विनंती करतील ते ध्यानास आणोन त्याप्रमाणे कृपा करून संरक्षण करणार माहाराज समर्थ आहा: काही शेरीर संमंधिकास सेवेसी पाठविले आहे यास पदरी घेऊन प्रतिपाल करणे भार माहाराजास मिळाले आंहे यास प्रतिपाल करवून सनिधेत ठेऊन घेतलेच वर्तमान आलेया मग येथोन सेवत येणारास खातरजमा होईल स्वामियाच्या उमेद धरून फार खराबीखाली आले असो हे पेच निवारण होऊन पुढे उर्जित करणे भार स्वामियास मिळाले आहे आम्हा हून सेवा घडले नाही खरे परंतु स्वामी ज्याचा आज्ञावर सेवा केली आहे याची तपसीलवार राजश्री सखोपंत द्रिष्टीने पाहिले आहे सेवेत विनंती करतील त्याजवरून ध्यानास येईल सदैव कृपापत्र पाठून सांभाल केली पाहिजे बहुत काय लिहिणे कृपालोभ करावा हे विनंती. पौ छ २५ जमादिलावल सुा मयातेन व अलफ मुकाम करवीर.

लेखांक २३३ पौ तारीख २४-११-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. ११८

श्रीमंत राजश्री राजा सिवछेत्रपति माहाराज स्वामी गोसावी

यांसी

सकलगुणालकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। राजे वेंकटपा नाईक बळवंत बहरी रोआ बाजंग मुत हवर दोलाब बारून मुलक बहादर कृतानेक विनंती विज्ञापना

ऐसीजे येथील कुशल जाणोन स्वानंदातिशये लेखनाज्ञा करीत असावे विशेष महाराजाकडोन आज्ञापत्र येऊन वर्तमान कळत नाहीं सदैव पत्र पाटवून परामर्ष घेणार स्वामी समर्थ आहा माहाराजाकडील फौजास व गनीमाचा फौजास लडाई होऊन गनीमाचा फौज न ठरता वाताहत होऊन फौजे समग्र बुडिली लुटल गेले खुद् गनीमानी हस्तगत होऊन मृत्या पावला फते असमानी जाहली म्हणोन परस्परे वर्तमान ऐकून फारच हारुषायमान पावलो ते पत्री कोटहवर लिहावे श्रीने वरच्यावर ऐसच माहाराजास फते देत जाव हेच प्रार्थना आमचा आहे येणेकडोन आम्हसारख गरीब लोक माहाराजाच चरणास पत्याज केलेचा श्रेयस्कर आहे ऐसें समजतो यापूर्वी सेवेत राजश्री उपेद्रपा कनकगिरी व मुदबसपा तुपद् व सखोपंत व राघपाया चौघास पाटविल आहे या चौघानी आम्हाकडील वर्तमान सेवेत विनंती करतील ते ध्यानास आणोन आम्हाकडील अंतर घडल्याचे गणणात न आणिता खातीरजमेची पत्रे आमचा नांवे माहाराजानी कृपा करून पाठविला येथोन पाठविणारास सेवेत पाठवणे होईल सर्वप्रकारे कृपाकरून उर्जित करणार स्वामी समर्थ असा बहुत काय लिहिणे हे विज्ञापना पौा छ २५ जमादिलाकर सु॥ मयातेन व आलफ मुा करवीर.

तारीख १–१२–१७९९

लेखांक २३४

हुजूर

रु. नं. १

अ. नं. ८६

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके १२६ सिधार्थीनाम सवत्सरे मार्गशीर्ष श्रुध्घ पंचमी रविवासरे क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी रफअतवअवाली पनाह अजम जुरस इंग्रेज मुकाम पुणा यासी फर्माविले असेंजे माहाराजाचे खिदमतेचा इरादा आं रफअत पनाहाचा असावा येब्राबे इजत आसार अजम आत्माराम धोंडदेव यासी हुकूम फर्माविला असे मताबी हुकूम आरफअत पनाहासी गुत्पगोई करितील त्या मवाफिक गुत्पगोईत आणोन नमूदेत यावे ज्यादा मरकूम करणे काये असे जाणिजे रा छ ३ माहे जमादिलावल.

तारीख २३–१२–१७९९

लेखांक २३५

श्री

रु. नं. १

अ. नं. २४९

पौा छ ४ शाबान सुा
मयातैन व आलफ
मु॥ करवीर

विनंती सेवक आत्माराम धोंडदेव सेवेशी विज्ञापणा ताा छ २५ रजबे पर्यंत

स्वामीचे कृपोअवलोनेकरून वर्तमान यथास्थित असे विज्ञापणा स्वामीनी कृपाकरून आज्ञापत्रे सादर केली ती मस्तकी वंदोन संतोष जाहाला आज्ञापत्री सेवेची आज्ञा जाहली त्या आन्वये येथील मुख्याचे व सामादिकाचे लक्ष राखोन सिंदे याचे कारभारी याजकडे बोलत आलो बोलणेतील अभिप्राय हुजूरचे शेवेशी विनंतीपत्री निवेदन केले हुजूरने आज्ञापत्रे राजश्री सदाशिव मल्हार व राजश्री बालाजी आनंत यास सादर जाहाली ती प्रविष्ट करून उभयताचे बोलणे होऊन सदाशिव मल्हार याचे तपशीले विनंती पत्र शेवेशी पाटऊन दिल्हे राजश्री जानराव जाधव येथे आले भेटी आद्यापि जाहाल्या नाहीत येकाच्च नादी लागोन पावन महिना जाहाला मशारनिले यास कितेक प्रकारे सांगितले कीं जिकडून कामाचा निभाव पडेल त्यांत आपली मर्जी आसोन सांगो त्या अन्वये लक्ष ठेवावा भेटीचा योग घडवितो आणि शिंदे याचे कारभारी याचीही भेट करून बोलण्यातील सारांश पाहून हुजूरचे शेवेशी विनंती लिहून पाटवा ज्यात स्वामी सेवेचे साधन उत्तम दिसेल तेच × × म्हणोन सेवकाने व राजश्री रत्नाकर आणाजी व खंडोजी गाईकवाड यानी कितेक प्रकारे सांगितले त्यावरून मशारनिले याणी उत्तर केले कीं तुम्ही सांगता ही गोष्ट प्रमाण × आणि तुमची साधणेही यथास्थित आहेत परंतु आपण व राजश्री बलवंतराव खांडेकर समागमे आलो त्याशिवाय बोलो लागल्यास व भेटी घेतल्यास ब्रहवस कारभार दिसेल याजकरीता खांडेकर भेटी करून बोलणे करितो म्हणतात त्याच्याच विचारे कैसे ते पांहू या प्रो उत्तर केले आम्ही × × वर्ग नित्यानित्य सांगत गेलो उत्तरे याआन्वये होत आली × × दे याजकडेही परभारा बोलणी लाविली आहेत कोण्यामागे बोलणे लाविलेस स्वामी कार्याची साधने कैसी पडतील हे ध्यानात न येता बोलणी पाडोन कारभारी यास दिकत आणिली उभयेता आले हे स्वामी कार्याच्या बंदोबस्त करतील या घोरणेवरच लक्ष राहून दिनावधी आणखी पडेल याजकरिता सेवेशी विनंती लिहिली आहे येकाचेच्च ठाई विस्वास ठेऊन दिनावधी करावयाचा समये नव्हे सदाशिव मल्हार यास आज्ञापत्र मार्गसीर्ष शुद्ध ५ सादर जाहाले ते मशारनिलेस प्रविष्ट करून सेवेचे अर्थ बोलोन रत्नाकरपंत व खंडोजी गायेकवाड न्हेऊन कारभारी याच्या सर्वत्राच्या भेटी करून बोलण्यातील सर्व आभिप्राय समजाविले तेही हुजूरचे शेवेशी विनंतीपत्री विनंति निवेदन करतील आणि गायेकवाड हुजूरचे सेवेशी आले आहेत अर्ज करितील सेवकास स्वामी सेवेचे आधार दोन आहेत एक स्वामीच्या पुण्यप्रताप आणि दुसरा भरोसा सदाशिव मल्हार यास स्वामी सेवेचा अभिमान बहुत त्याचे सांगणे सर्वांस मान्य तात्या भीडही बहुत धरितात आणि स्वामी सेवेचे बोलणे तेच बोलतात त्यासिवाय आन्यत्राचे बोलणे ते किती हे जाणोन आडीच महिने पर्यंत हुजूरचे शेवेशी विनंतीपत्रे पाटविली व सर्वत्र मुतसदियास पत्रे पाटविली परंतु कोणाचे लक्षात न येता हुजूरचे शेवेशी निवेदनात आणोन दिले नाही भाऊ यास आज्ञापत्री आज्ञा येका तरीची बोलणेविसी येती परंतु तेथे लक्ष न ठरता परभारे बोलणेच्चे सिलसिले बहुतच्च पडतात तेथे उपाये काये या मसलत समधे आन उपयोग तेथे खर्च

बहुतच चालिले आहेत स्वामी कृपा करितात × आणि उपयोग तेथें आनस्था कृपा करणार स्वामी समर्थ वरकड आर्थांतर राजश्री उमेदउलउमराव बहादर याचे पत्री लिहिले आहेत सेवेशी निवेदन करतील मर्जी प्रसन्न होऊन बंदोबस्त करणार स्वामी समर्थ शेवेशी श्रुत होय ही विज्ञापणा.

लेखांक २३६ तारीख २५-१२-१७९९.

श्री

रु. नं. १ पौ छ ४ शाबान

अ. नं. २५९ सुा मयातेन

व आलफ सुा करवीर

सेवेशी विज्ञापणा ताा मार्गसिर्ष बाा बुधवार पावेतो स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष इकडील वर्तमान राजश्री नाना यासी समेटाचे बोलणे बोलो त्यात पाहाता सारौंष त्याचा बाकीचा येवज राहिला आहे याचा निर्गम जाल्याखेरीज कोणतेही बोलणे नमोदायेत नाही असे चितातील भाव समजण्यात आले तेव्हा येविसी शेवेशी विनंती लिहून आज्ञा होईल त्या आन्वये करावे यानिमित्य पेशजी पांच साहा विनंती पत्रे पाटविली परंतु या प्रकर्णी जाब साल × × × × प जाली नाही तेव्हा येथें नादाचे बोलणे लावले आणि हारद्रये काडला मुख्य त्याचे म्हणे विनायेवज आल्याखेरीज कांहीं बोलत नाही त्याजवरून बोलणे जाले कीं येवजही पावता करिवितो आणि आजपर्यंत आमी दुसऱ्याचे लक्षाने वागलो नाही त्यापेक्षा आमचे दौलतीचा बंदोबस्त करून घ्यावा म्हटले आस्ता त्याजवरून त्याचे बोलण्यातील आर्थ पाहाता यैवज बाकीचा आला म्हणजे तह करून देऊ असे बोलणे होत्ये परंतु तह कसा कोणत्या प्रकारचा याचे कांहीं समजण्यात येत नाही येवज दिला आस्ता समजेल आणि पुढे बोलण्यासही तेज येईल याजकरीता याचा विचार होऊन आज्ञा होणे ती सत्वर व्हावी विलंब नसावा राजश्री येशवंतराव घोरपडे मजकडेस आले होत्ये त्याचेही म्हणे आहे कीं माहाराजाचे सेवेविसी या प्रसगांत अंतर करीत नाही जितका यत्न चालेल तितका करून प्रयत्न करून राो नानाकडेसही काट चालेल तितका करून व राजश्री दौलतराव शिंदे याकडेसही बोलणे करून फकीरजी घोरपडे वगैरे च्यार मऱ्हाटे त्याचे पदरी आहेत ते सर्व मिळून दौलतराव याजवल बोलून पष्टच पुसूकीं पाटीलबावा गेले होते त्यानी संस्थान रक्षिले आणीकही कित्येक प्रकारचे तंटे पडत होत्ये परंतु संस्थानाची उपेक्षा कोणी केली नाही हली तसा प्रकार दिसतो त्यापेक्षा ते हे दोन संस्थाने नाहीत मसलतीने काम करून समेट करावा म्हणून सर्वत्र मिळून करून या प्रसंगात जितका काठ चालेल तितका करून चाकरी करून दाखऊ असा अभिमान त्यास आहे असा आमचे उपयोगी पडतात साहेबाचे पुणे कळून काय होईल पाहावे असे असोन मारनिल्हे याचा गाव कंकणवाडी घेऊन कोणास दिली म्हणून

त्याजकडील कारकुनाचे पत्र आले अशास आजचे प्रसंगी उपयोगी पडतो त्यापेक्षा त्याचा गाव कोणास देऊ नये घेतला असल्यापेक्षा त्याचा त्यास माघारे देवावयाची आज्ञा करावी म्हणजे यात उपयोग बहुत आहेत साहेबाचे चरणाखेरीज याचे लक्ष दुसरे नाही यामुले विनंती लिा आहे केवल त्याचे मनोदयामुले लिा असा आर्थ नाही सरकार उपयोगी जो ग्रहस्त पडत असेल त्याचे मनात हुजूरचे दौलतीविसी येणेकडून विकल्फ येईल तो न यावा या करिता लिा आहे त्याप्रमाणे आज्ञा जाली पाहिजे राजश्री फकीरजी घोरपडेही आमचे बोलण्याचा पक्ष धरीत असतात त्यासही येविसी आज्ञापत्र सादर व्हावे येथे तहचे बोलणे बोलाव तेव्हा परशरामपंताचे चिरंजीव याणी मसलतीस यैवज दिला आहे आणि मसलत केली यावर आमचे बोलणे रुक्ष दिसते तथापि बोलले असता कोणाचे चितात भरत नाही जर स्वामीचे चितात तहच करावा असे आहे तरी येथे अंतस्त मनश्वी द्यावे लागल तेव्हा त्याचे बोलणे व मसलत मंदीवर पडोन आमचे बोलण्यास तेज पडेल बोलण्याच्या पोटी जसे ठरेल त्याप्रमाणे अयकावे लागेल तत्रापि दोन रुपये कबूल केल अस्ता निभावणीचा विचार स्वामी जवळून होणे हा मला माहितच आहे त्यापेक्षा साहेबावर प्रसंग पडला आहे त्यापेक्षा सर्वत्रानी याचा विचार करून तहच करावा असे सिद्ध जाले तरी यैवजाची खातरी पाहून बोलण्यास आज्ञा करावी म्हणजे मी बोलून नमोदांत आणून शेवशी विनंती लिहीन त्याप्राो खर्चाची बेरीजही स्वामीचे ध्यानात येईल नंतर समेटही होईल असे वाटते ज्यापेक्षा येथे समेट करावा असे शिद्ध जाल्यावर जसे इकडून ठरेल त्याअन्वये करणे प्राप्त मग वाकडी गोष्ट म्हटले असता दाबही कमी पडतो आणि त्याचे फौजचा सिलसिला लागतो त्यास येवी पुर्ता विचार सर्वत्रानी करून लिहून पाटवावे व साहेबानीही आज्ञा करावी हे जर चितापासून करावयाचे नसल्यास फौजचा जथ पाहाव सर्वत्रानी विचार कराव लंब्राईचे देऊन मसलत सिद्धीस न्यावी अशी मर्जी असल्यास हेच सिद्ध करून मला निराल्या वाटेन आज्ञा व्हावी म्हणजे मी हिकडून संधान ठेऊन भ्रमात निघोन शेवसी हजर होतो इतकी विनंती पत्र पाटविली त्याचे सिध होऊन येकही आज्ञापत्र सादर जाले नाही त्यापक्षा उगच काय म्हणून राहाणार येविशी काय आज्ञा होणे ती त्वरेने व्हावी विलंब लागल्यास हिकडील मसलत दिवसेदिवस अधिक होऊन जथ पडतो मग यासही आवरशक्त करण्यास प्रयत्न लागतील याजकरिता त्वरेस मोल आहे सविस्तर साहेबास हिकडून वृतांत समजावा या निमित्य मलबा वंजारी यासच सर्व सांगून शेवेशी पाटविले आहे त्याप्राो स्वामीचे ध्यानात येईल येथील वृतांत व सिंदे याकडील माार सर्व याचे ध्यानात आहे शेवशी सविस्तर निवेदन करील श्रीमंत राजश्री पंत अमात्य यास माघारे आणावे म्हणोन पत्रे पांचसाहा पाटविली ती लक्षात न येता बाबतीचा आम करावयासी गेले म्हणून आज्ञापत्र सादर जाहाले शेवटी येथून धुलपन रत्नागिरीकर मामलेदार व विजयदुर्गकर मामलेदार यास वगैरे सर्वत्र मिलोन बंदोबस्त करावा म्हणून पत्रे पेशजी पाटविलीच होती मागाहून सरसुभा व गारद व अरब दोन हजार पर्यंत जात होत्ये इतकियात बातमी आली की बावडेकर यासी

धुलपाने लढाई देऊन खारेपाटणची गडी घेतली आणि राजापुरचेही ठाणे घेऊन बावडेकर यास किल्यापर्यंत पोह्चविले हे वर्तमान राजश्री पंतप्रधान राजश्री बालाजीपंत नाना यास समजल्यावर त्यानी ताकीद येथून जाताना त्यास केली केली कीं बावडकर याचा प्रांत चालीस हजार रुपयेचा आहे तो जप्त करावा आणि किल्यास शह देऊन हस्ताग जालास करून घ्यावे तसाच श्रीमंत राजश्री पंत प्रतिनीधि याचाही प्रांत जप्त करावा म्हणून सांगितले त्याजवरून मी सांगितले कीं विसाळगडकर याकडे सदोबा नाही यावरूनही बोलले कीं विशाळगडकरं याणी चारशे प्यादे बावडेकर यास कुमक पाटविले आणि बंदोबस्तास म्हणून साटविलीत दोनशे प्यादे ठेवल डावघाव पडेल तसे करावे असे त्याचे वकीलाचे आंगी लागू केले नंतर जे करणे ते करू चौकशी खेरीज काही करीत नाही आपले शेवेशी निवेदन केले आहे स्वामीनी आज्ञा केली त्या अन्वये येथील रंग नाही त्यापेक्षा तह त्याचे बोलणे कशास बोलावे आलीकडे तो जो विचार होत आहे तोही निवेदन करीतच आहे मी येण्याचे पूर्वीच फौजा गेल्या तेव्हा याजकडील नेट आहे विना पैक्या खेरीज समेटीचे बोलणे लागत नाही याचा विचार करून आज्ञा सत्वर व्हावी कारभारी मंडलीस पत्र लि॥ आहे अवलोकनकर्ता निवेदनांत येईल त्याप्रमाणे आमलात यावे याची मार्गप्रतीक्षा करितो नाहीपेक्षा मला येण्याविसी आज्ञा व्हावी. शेवशी श्रुत होय हे विज्ञापणा.

तारीख २५-१२-१७९९

लेखांक २३७

श्री

रु. नं. १
अ. नं. १२०

पौ छ. ४ शाबान सु॥ मयातेन
राजेश्री प्रीतीराव चव्हाण उमेदउलउमराव
बहादर गो

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ जानराव जाधव रामराम विनंती उपरी यथील कुशल ता मार्गसीर्ष वद्य चवदा पावतो क्षेम असे विशेष इकडील मजकूर सविस्तर पेशजी लि॥ त्याची उतरे आपण व हुजूरचे आज्ञापत्रे सादर केलेत प्रो बोलिला लेखनार्थ समजला जी आज्ञा होणे ती समक्ष जाहाली आहे तेव्हा येथील मनोदयानरूप जाहाल्यास दरबार खर्चही कबूल करावा म्हणून मजकूर आहे. अशास समक्ष आज्ञा जालियाप्रमाणे करून तह ठरावा म्हटले असता त्या बोलण्याचा उपक्रम येथे किमपि नाही मी येथे येण्याचे पूर्वी मसलत दुसरीच सिध्ध होऊन पलटणे व फौजा घाट पार जाहाल्या तेव्हा सर्व बोलणे मागले मागे राहिले हल्ली नवा क्रम दिसतो तो सर्वत्रास पेशजी लिहिलेच आहे हल्लीही हुजूरचे शेबेसी विनंती पत्रे व सर्वत्र मंडळ यासी व आपणास लिहिले आहे त्याप्रो नमोदात येत नाही हल्लीचे पत्रा-

वरून तरी इत्यर्थ ठराऊन लवकर समेट होय तो अर्थ करावा येथून मसलत जाहाली यांत किमपी तथा नाही याचा विचार ठराउन सत्वर पाठवून द्याव भेटी जाहाल्यावर जी बोलणी जाहाली ती सर्वत्रास समजावी म्हणून लिहिले आहे त्यांत सर्व अर्थ ध्यानात येतील सारांष आधी आमचा बाकीचा यैवज यावा आणि दरबार खर्च देणेसे हिमत धरावी म्हणिजे सर्व गोष्टी चांगल्या नाहीतरी संस्थान घेतात कलावे बागणीकर याजकडील साडेचार हजार रुपये इस्लामपूर चलनीची हुंडी पाठवावी त्यास दिवसगत लागलीं तेव्हा नानाचे ऐवजा पैकी घेऊन जिकडील तिकडे नेमणुके प्रमाणे दिला तेव्हा जाला याचे ऐवजास सोटा येतो या करिता सत्वर पाठवून द्यावा म्हणिजे भरति होईल बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंति.

लेखांक २३८

तारीख २९-१२-१७९९

श्री.

रु. नं. १

अ. नं. १२१

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री प्रीतीराव चवाण उमदे-उलउमराव बहादर यासी आज्ञा केली ऐसीजे रेटरेकर मंडळी यासी सरंजामसुद्धा आपणाकडे पा आहेत त्यास हुजूरने हजरीची यादी दिली आहे त्याप्रमाणे खर्चास देवीत जाऊन आपलेपासी ठेवून घ्यावे फलटणकर मंडळी याजकडे अंकलकोप हा गाव दिला आहे त्यास गाव उजाड आहे याजकरिता तेथील घराची व रानांतील पिकाची रखवाली होय ते करावे जाणिजे सु॥ मयातेन व आलफ रा। छ २ माहे शाबान बहुत लिहिणें तरी सुज्ञ.

लेखांक २३९

तारीख ३०-१२-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. १२२

पो छ ९ शाबान सुा मयातेन

राजश्री प्रीतीराव चवाण उमदेउलउमराव बहादर गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राज्यमान्य स्ने॥ जानराव जाधव स॥ दंडवत विंनती येथील कुशल ता। छ ३ साबान पावेतो क्षेम असे विशेष आपण पत्रे पाटविली ती पावली पत्री लि॥ कीं लिहूनपुसून पत्रे येतील त्याप्रमाणे करू इतका उजूर न ठेवता समवेच बोलणे करून तह कराव असे लि॥ त्यास कर्जाऊ ऐवज बाकीचा राहिला तो पाटविण याविसी हुजूर विनंती लिहिली आहे आणि आपणासही लि॥ आहे तरी

ऐवज आला म्हणजे त्याप्रमाणे पोचता करून समेट कसा करून देतात हे समजोन लिहून पाटवितो बागणीकराकडील हुंडी मागाहून लिहून पाटवून देतो म्हणोन लिहिले ते कलले त्याप्रो ऐवज आगत्यरूप सत्वर पाठऊन द्यावा राजश्री पंत अमात्य माघारे आणविले म्हणोन लिहिले उत्तम केल हुजूर विनंति लि।। आहे त्याप्रो राजश्री निंबाजी हावलदार यास दरबार खर्चांचे बोलणे कबूल करणेस व पार पाडण्यास युक्त दाखऊन कर्जाऊ ऐवज बाकीचा देऊन सत्वर पाटवून द्यावा विनायैवज आलेखेरीज कांहीयेक व्हावयाचे नाही फौजाही लवकर तिकडे दंगा करतील येथून संस्थानाची उपक्षा जालियाची निरास्ता होणे दुरापस्त आहे साहबाचे पुणेकडून सर्वत्र कारभारी याचे नेटाने काय घडल पाहावे नेमूनच करून म्हटले असता, घडणे दुरापस्थ आहे समक्ष आज्ञा जाली म्हणोन वरवर लिहिता त्यास तहाच्या यादी प्रमाणे तेव्हाच ठरल नाही म्हणून ते बोलणे तेव्हाच राहिले ते येथे काडीमात्र बोलणे नाही पुढें काय करावयाचे याचा विचार करून सत्वर पाटवून द्याव याप्रमाणे हुजूर विनंती करावी आपण पेशजीपासून मोटी दौलत घरची संभालीत आला हाली ही दौलत रक्षणे तुम्हाकडे आहे याचा विचार करून सत्वर पाटविणे बहुत काय लिहिणे लोभ करावा.

लेखांक २४० तारीख २०-१२-१७९९

श्री

रु. नं. १ पो छ ९ शाबान सुा

अ. नं. २५६ मयातेन आलफ मु।। करवीर

सेवेशी विज्ञापणा ताा छ ३ शाबानपावेतो स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष स्वामीनी छ २५ रजेबची आज्ञापत्रे सादर केली ती काल येऊन पावली सिरसावंदोन लखनार्थ समजून घेतला राजश्री पंत आमात्य यास आज्ञा करून माघारे आणविले म्हणोन आज्ञा जाली उत्तम जाले सेवकाची भेट होऊन जाबसाल जाले ते सेवेशी निवेदनार्थ विनंतीपत्रे पेशजीच पा।। शेवेशी प्राा जालीच असतील त्यावरून सांप्रत मजकूर स्वामीचे ध्यानात येईल राजश्री बालाजी जनार्दन याचा कर्जाऊ येवज बाकीचा येणे तो आदी आणून द्या नंतर तुमचे बोलणे करू असे स्पष्ट माानिलहे यानी सांगितले आहे जर तह करावा अशी मर्जी असल्यास बाकीच्या येवजाच्या उंडपा चिठ्या येथील सावकारावर पाटऊन देणेची आज्ञा व्हावी येवज आला म्हणजे पोहचता करून त्याचे म्हणे काय निघते ते समजोन घेऊन शेवेशी विनंती लिहीन सारांश येवज आल्याखेरीज कोणतेही ठरणार नाही असे परिछिन त्यानी सांगितले त्यास येविसी आज्ञा होऊन सत्वर येवज यावा आणि पुढे बोलणे लागू जाल्यावर पैक्याचे कामकाज घडोन आले पाहिजे त्यास मी स्वामीचे दौलतीविसी प्राणासुद्धा तयार आहे परंतु माझा भ्रम येथे नाही खातरी जरी केली तरी प्रमाण वाटत नाही याकरिता येवजाचे बोलणे ठरेल त्याप्रमाणे उलगडावयाची आज्ञा होऊन कर्जाऊ यैवज रोख देऊन राजश्री निंबाजीबावा

हवलदार याची रवानगी आगत्य जाली पाहिजे पेशजीचे तहाच्या यादी ठरली त्याप्रमाणें ते ठरले नाही म्हणून राहिलेने येथे जमेसही धरीत नाही पुढे कसा बंदोबस्त करून घेतात हे येवज बाकीचा आला म्हणजे समजोन घेऊन सेवेशी लिा पाटविन ज्याप्रमाणे आज्ञा होईल त्याअन्वये करीन फौजा माघारे येणे हे साहेबाचे पुण्य आहे येथे यत्न करून आणू असे म्हटले तरी हे दुरापस्त आहे बोलणे जमल्यानंतर आल्यावर येवज गुंतेल नाहीपेक्षा अनामत राहील शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २४१ तारीख ३१-१२-१७९९

श्री

रु. नं. १

अ. नं. २५५

पौं छ ७ माहे शाबान मयातेन

शेवेसी विज्ञापना ताा छ ४ मुा। हली इंगली शेवेसी विज्ञापना ऐसीजे स्वामीनी आज्ञापत्र सादर केले ते पावले आथणीची खंडणी होऊन त्याचे तालुकेतून कूच करून पुढे जावे त्यास जमखिंडी व तेरेंदाळकर माघेवाट मारतात याकरता आज हली इंगळीवर मुकाम केला आहे जमखिंडी तेरेंदाळचा स्वालजाब जाहालेवर गोटेकडे जावे ऐसे आहे मोईनीच्या लुगडेविसी आज्ञा जाहाली त्यास अथणीचे खंदणी पैकी कापड घेणे चवथाई करार यापैकी दाहा हजार रुपयेची लुगडी आणावी यास मनोले यास अथणीस पाठविले आहे आलेवर सेवेसी पाठवून देतो खर्चास पाटविणेविसी आज्ञा त्यास रोख ऐवज आलेवर पाठवितो वराता पाठवून द्याव्या सोये लाऊन देतो सुरसेट नारायण पुरेस साडेपंचवीस हजार रुपये दिले त्याची पावती अलाहिदा पाठविली आहे. रामना गोसावी व सुरसेट आथणीत राहिले आहेत चोरानी × × येथील वागाचा[1] मजकूर आज्ञेप्रमाणेच आहे मिरजकर येकत्र होऊन लबाडीत आहेत त्यास पुणेकडील स्वस्त असलेस मिरजेस शाह देऊन खंडणी जाहालेने ठीक पडल वाघ सावनुराकडे जाणेचे बोडीत होता त्यास युक्तीने आधी मिरजकर वगैरे इकडील पाश तोडून मग तिकडे जावे याप्रमाणे ठरावात आणून समयामुले मायेत येऊन ठेविले आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २४२ तारीख ३-१-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं २५४

१ धोंडजी वाघ याचा.

समस्त सेनाधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री नारायेणराव घोरपडे सेनापति यास आज्ञा केली यैसीजे आपणास सरंजामसुधा हुजूर येणेविशी आज्ञापत्र सादर जाहले आहे तरी आज्ञेप्रमाणे निघोन हुजूर यावयाचे करावे हुजूर आले नंतर आपलेकडील जाबसाल आसतील ते हुजूर निवेदनात आणोन उलघडोन येतील तरी आज्ञे प्रो सत्वर यावयाचे करावे जाणिजे सुा मयातेन व आलफ रा छ ७ माहे शाबन बहुत लिहिणे तरी सुज्ञ आसा.

मोर्तब (शिका)

लेखांक २४३

तारीख ५--१--१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १२४

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे सेवेसी विनंती सेवक सखाराम घाटगे सर्ज्याराव कृतानेक शेवेसी विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ताा छ ९ शाबान पर्यंत स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वृत्त येथास्थित असे विशेष सेवकाची सुटका पौष शुध्घ दसमी रविवारी संध्याकालचे दोन घटका दिवसास मुक्तता जाहाली स्वाभीस निवेदन व्हावे याजकरिता विनंती लिहिली असे सदैव पत्र पाठंवून सेवकाचा परामृष घेणार स्वामी समर्थ असा. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पौ छ १३ शाबान गुरुवार सन मयातेन व आलफ संध्याकाली.

(ता. ९–१–१८००)

लेखांक २४४

तारीख ११–१–१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १२५

समस्त राजकार्य धुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजश्री प्रीतीराव चवाण उमदेउल-उभराव बहादर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री नरसिंगराव संकपाल व निंबाजी संकपाल यासी कांही खर्चास पोहोचले नाही म्हणोन निवेदन जाहाले त्यावरून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी सर्वत्रा बाा माारनिलेसही खर्चास देत वेजा जाणिजे सु॥ मयातेन व आलफ र॥ छ १५ माह शाबान बहुत लिहिणे तरी सुज्ञ.

तारीख ११-१-१८००

लेखांक २४५

श्री

रु. नं. ४

अ. नं. १३५

यादी डाक ठेविली त्याच्या चौक्या नांवनिसी जागाजागा जंजिरापासून पनालेपर्यंत मु॥ नाईकजी चव्हाण हुजरे व सखोजी चवाण हुजरे सु॥ मयातेन व आलफ

१ जंजिरापासून किल्ले प्रा गड पर्यंत चौक्या डाकेच्या जागा नांवनिसी

१ मालवण रामेश्वर नजीक देवालय
१ आनंदवाडेवरी चौकीये केली
१ नांदरुक येथ चौकी
१ कुनकावल
१ नादोष केटवरी
१ तलगाव
१ अणव
१ तुनसाळी ता नारूर किल प्रागडानजीक
८

जंजिरापासोन चवक्या रांगणेपर्यंत आठ ठेऊन डाक बसविली दर चवकीस आा चार प्रा आसामी ३२ आहेत निवेदन व्हाव

१ किल्ल प्रागडापासोन[४] पनालेपर्यंत ठेविल्या त्याचा तपसील

१ रांगणे पासून वलीवडेपर्यंत
१ मरुरात
१ चिंकेवाडीत
१ पाटगावांत
१ खडकाचा हुडा
१ भानेचा हुडा
१ वलीवड
६

१ वलीवड पासोन सालवण पर्यंत

१ मादवड
१ काडीलटेक
१ आबटाल
१ सालवन
१ म्हासुर्ली।
५

४ येणे प्रमाण डाक बसली असे.

१ सालवण पासोन पनाल पावेतो

१ खुद्द सालवण १ कपरचे खडीवर १ क॥ कल्वर

१ कोतोली तर्फ बोरगांव

—
४

—
३

पनाळपर्यंत

येकूण प्रापासोन पनालपर्यंत याजप्रो चवक्या ठेऊन हुजूर आल नंतर जंजिराच्याही लिा प्रमाणे चवक्या बसल्या निवेदन व्हाव.

लेखांक २४६ तारीख १४--१--१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. २५७

पो छ १८ शाबन

सुमा मयातेन व आलफ

सेवेशी विज्ञापणा ता॥ छ १८ शाबन पावेतो वर्तमान येथास्थित अस विज्ञापना येसीजे म॥ तोफखानेत बानदार आहे त्यास फौजेत पाटवणेची आज्ञा करणार धनी समर्थ राजश्री हैबतराव गाईकवाड विश्वासराव याजकडही बानदार आहे त्यासही आज्ञा करून पाटविणार स्वामी समर्थ हली येक चांगला ल्ढाऊ बानदार यैसे दानीखडीचे मार्ग जाणेची आज्ञा व्हावी घुणकीहून फौजच कूचे होऊन आली कोडोलीचे माकामास गेलो सेवेशी श्रुत होय राजश्री आपासही आजी येणेची आज्ञा करणार धनी समर्थ सर्वत्र येक जागी घ्यावे ते झाडून येक जागी जाहाले आहेत राजश्री धोंडजी वाघ याजकड हुजूरून कोणी शहाणा मानुश जलदीने रवाना करणार धनी समर्थ आजीचा प्रसंग आहे समजाविसी करावी पुढे कोणी पाहील जे घडण ते घडेल राजश्रीचे उत्तर सवूतराव भोसले याचे खर्चाचा येवज सेवकाकड हुजूर बरोबर म्हणजे त्यासी प्राा करीन फौजेचे खर्चास पाटविणेची आज्ञा करणार धनी समर्थ स्वामीन तरी काय करावे फौजेस तो खर्चास पाहिजे यात श्रीकृपेने जे घडेल ते प्रमाण राजश्री पंत प्रतिनिधीपासी रुपये पांचशे रोखड वरात दीड हजाराची देववली धनी समर्थ त्याची वरात दीड हजाराची देविणे गवगव बहुत आहे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २४७ तारीख १७–१–१८००

श्री

रु. नं. ४

अ. नं. ११५

पो छ २२ शाबन मया-
तैन आलफ मु॥ करवीर

तीर्थस्वरूप माहाराज राजश्री आबासाहेब
वडिलाचे सेवेसी

आपत्ये चतरसिंगराव भोसले दंडवत विज्ञापणा ता।। छ २१ रोज साबान पर्यंत येथास्थित असे विशेष वडिलानी तीर्थस्वरूप राजश्री भवानराव मामा सिरके व राजश्री नरसिंगराव गुजर व हैबतराव मोहिते या समागमे कृष्णाजी पवार हुजरे देऊन फौजेचे खर्चास सिवसिका रुपये अडीच हजार याचे राजापुरी रुपये ५००० पांच हजार पाटविले ते पावले वरकड साहेबाचे आज्ञे प्रो सांगितला मजकूर ध्यानात आला शेवशी श्रुत होय हें विज्ञापणा.

तारीख १८-१-१८००

लेखांक २४८

श्री

रु. नं. ४
अ. नं. ११७

पो छ २४ शाबान मयातैन व आलर्फ

तीर्थस्वरूप माहाराज राजश्री आबासाहेब
वडिलाचे शेवेशी

आपत्ये चतरसिंगराव भोसले दंडवत विज्ञापणा ता छ २२ साबन पावेतो वडिलाचे असिवादे करुण वर्तमान येथास्थित असे विशेष वडिलानी तीर्थस्वरूप राजश्री भवानराव मामा शिरके व राजश्री नरसिंगराव गुजर व हैबतराव मोहिते याजसमागमे येवज फौजेचे खर्चास पा तो आज्ञेप्रमाणे लोकास दिल्हा वरकड मार निले याणी साहेबाचे आज्ञेप्रमाणे सांगितले ते ध्यानात आले असियास तूर्त शह आहे व फौजे येक महिना दरोबस्त खर्चास पावले नाही यास्तव आणिक येवज रवाना करावयाची आज्ञा जाली पाहिजे म्हणजे फौजेचा बंदोबस्त होऊन स्वामी सेवा घडेल सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

तारीख २५-१-१८००

लेखांक २४९

श्री

रु. नं. १
अ. नं. २५०

पौ छ ४ माहे रमजान
सन मयातैन व अलफ

श्रीमन्माहाराज राजश्री .... छत्रपति स्वामीचे
वेशी ....

विनंती सेवक राणोजी नाईक निंबालकर किले प्रसिधगड कृतानेक शेवेशी विज्ञापणा ता छ २९ माहे शाबन पर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेकडून किले मजकूरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे शेवशी विज्ञापणा येसीजे स्वामी कृपाळू होऊन आज्ञापत्र सादर जाहाले

ते मस्तकी वंदून सनाथ जाहालो तेथे आज्ञा जदीद लोक ठेऊन हुजूर पाटवणेविसी पेसजी आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे आज्ञापत्र सादर होतेक्षणी करवीरचे मुकामी पाटवून देणे-विसी आज्ञापत्री आज्ञा त्यास सेवक हुजूरून आल्यापासून जदीद लोक ठेवणेचा येत्न केला परंतु मिल्त नाही घाटाखालील लोक ठेवावयाचे ते सांवत याचे धास्तीमुले कोणी राहात नाही इकडे चाकरीस आलेवर मागे त्यास उपद्रव होतो त्यामुले कोणी इकडे येत नाही किला गडकरी लोका पौ से पनास नेमून पाटविले होते इतकीयात चौकन वर्तमान आले त्यावरून तहकूब करून पेशजी विनंती पत्री विनंती लिहिली आहे त्याजवरून निवेदन होईल किला भरतीचे लोक किती आहेत हे स्वामीच्या निवेदनात आहे किला-पासून किले शिवगड तीन साडेतीन गाव जमीन आहे. त्यास जागाजागा चौक्या ठेऊन बंदोबस्त जाहाला पाहिजे एकाच मार्गे चडतील परंतु मार्ग व पांजा व घाट आहेत तितक्या ठिकाणी चौक्या ठेऊन बंदोबस्त जाहाला पाहिजे गलीम कोसी अर्धा कोसी आहे तैसेच घाटाखाली सांवताच्या सिलसिल्यामुळे किलाच्या तणख्यात चौक्या ठेऊन किलाची भरती राखोन जागेचा वंदोबस्त जाहाला पाहिजे जागा आफाट दोन अडीच कोशाचा फेर किलावरी व खाली दुहेरी चौक्या ठेवावयाचा समय प्राप्त जाहाला आहे गडकरी लोकाचे भाऊबंद जदीद ठेऊन पाटवावे तर चौकडे दंगा गडबड बहुत तेव्हा मलण्या काढून दाणागला आटोपावयाचे उद्योगात आहेत याजकरिता शेवेशी निवेदनार्थ विनंती लिहिली आहे द्वारकोजी पासके हुजूरे हे लोकाविशी निकड करीत बैसले आहेत त्यास मना चिटीची आज्ञा करावया धणी मायबाप समर्थ शेवेशी निवेदनार्थ विनंतीपत्री विनंती लिहिली आहे. शेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २५०

तारीख २६–१–१८००

श्री

रु. नं. १ पौ छ ३० शाबान

अ. नं. २५८ मयातैन आलफ

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे

सेवेशी

विनंती सेवक खंडोजी निकम हावलदार व लक्ष्मण भगवंत किले पावणगड कृतानेक सेवेशी विज्ञापणा ता छ ३० माहे शाबन रविवार दोनप्रहरपर्यंत किले मजकुरचे व सेवकाच वर्तमान यथास्थित असे शेवशी विज्ञापणा येसीजे शत्रूची फौज मौजे येतवडहून झाडून तोफखानासुधा किले मजकुरचे तनखा याचेकडे शाहापूर येथे आली तमाम खेडी प्रखर पोखले जाखले मोहूर आरले सातवे व माले येथे तमाम गाव जाळून सत्यानाश केले त्याजवर कसबा कोडोलीस दोनप्रहरी आगी घातली आणि तमाउन निघोन मौजे आंबवड किल्या नजीक तेथील मिठाखाडीवर गूल तमाम गावगनाचे राहिले होते त्या

गुल्वर त्याचा फोजेने नीस करून मिठाखाडी जाळून सत्यानाष केला आणि सरकारची फौज बोरपाडलेवर होती ती फौज कांहीं प्रातःकाली करवीरास गेली कांहीं फौज गडचे सरदेश मौजे आबटीवर आली कांही फौज मिठाखाडीचे तोंडावर आली तेथे याचे व त्याचे जुंज जाहाले दाहा पांच माणूस इकडील जखमी दहा पांच तिकडील जखमी होऊन त्याजकडील फौजेने मिठाखाडी जाळून कांहीं गूल लुटून नेहले याप्रमाणे दोनप्रहर पर्यंत जाहाले त्याजवर त्यानी तोफखाना वोढून कसबा कोडोलीचे मार्गे गेले पुढे मुकाम कोठे होता हे मागाहून विनंतीपत्री विनंती लेहून पाठवीन शत्रूकडील फौजेने आजी तमाम किल्याचा तनखा व कुरलीची खेडी व कसबा सातवे येसे नाषफार केला गुले झाडून जाहाले गुरढोर झाडून किलेखाली आली याजउपरी आणखी काय वर्तमान होईल ते सेवक मागाहून साहेबाचे सेवशी विनंती लेहून पाटवीन सरकारची फौज आबटीवर गेली व कांहीं खाली बांबवार्डावर आली आजी कांहीं कोणतीही बाकी राहिली नाही त्याचा तोफखाना भारी दोन प्रहरा वोढून मागारा चालविलेनंतर सेवकाने विनंती लिहिली आसे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २५१ तारीख २७--१--१८००

श्री

रु. नं. ४

अ. नं. १२९

राजश्री विठोजी भोसले वाड्यातील मूल व बालाजी आपाजी वाडी रत्नागिरी यासी आज्ञा केली यैसीजे सु।। मयातैन व आलफ स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र पाटविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला मौचे कुसरे तर्फ ठाणे येथे पेंढाराच उपद्रव होऊन गुरे गेली म्हणोन विनंती लिहिली आशास वाडी मार येथे रात्रदिवस बहुत हुशारीने आसोन वाडी मारचे आसरेन गुले राहिले आहे त्याची रखवाली करून याउपरी तिकडील उपद्रव गुलेस लागो न देणे व चौकडील बातमी वर्तमान चौकसीन पकेपणे नित्यानित्य आणोन हुजूर विनंती पत्री लिहून पाटवीत जाणे. जाणिजे र।। छ १ माहे रमजान लेखन सिमा.

(शिका)

लेखांक २५२ तारीख २७–१–१८००

श्री

रु. नं. ४ छ ३ रबिलावल

अ. नं. १३० मयातैन आलफ

तीर्थस्वरूप माहाराज राजश्री अाबासाहेव वडिलाचे शेवेशी आपत्ये चत्रसिंग

भोसले दंडवत विज्ञापणा येसीजे क्षेम तागायत माघ शुा २ पर्यंत स्वामीचे कृपाआवलोकने करून यथास्थित आसो विशेष ल्ढाईत लोक ठार व जखमी व घोडी व चीजवस्त गेली त्याचा पट आलाहिदा करून शेवेशी पा। आहे त्यावरून निवेदन होईल बहुत खराबा जाहाला आहे स्वामी कृपाळू होऊन बंदोबस्त यथोस्थित जाहाल्यास आमची स्थिती राहील पतकात सेंड्याचे मनुश तितके खराब जाहाले आहे याची उस्तवारी जाहाल्यास जमीयत राहील आणि कामकाज होईल हा अर्थ सर्व माहाराजाचे ध्यानातच आहे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

लेखांक २५३

तारीख २७–१–१८००

रु. नं. ४

अ. नं. १२७

सिधार्थी नाम संवत्सरे माघ शुध्ध द्वितीया सु॥ मयातेन व अलफ छ १ माहे रमजान बंगालेहून नवा सुभा इंग्रजाचा बंदर गोवेस आला त्यास हुजूर पत्रे लिहिणेचा अल्काब बी तपसील श्रीमन्म महाराजाधिराज छत्रपति माहाराजाचे नांवे नवा आलेला मुख्य इंग्रजी सुभा अजम जोसूव युटाफ फौजानी विलायत मुकाम बंदर गोवा शादकाम बाषंद शाहामत व अवली पनाह तहहूर व जलादत दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके पुढे मजकूर ल्याहा खसखसी रुपेरीवरी सोनेरी बुटेदार कागद व थैली किमखाबी जरीबुटेदार असावी मुख्य पत्रावरी थोरला सिका.

लेखांक २५४

तारीख २७–१–१८००

रु. नं. ४

अ. नं. १२९

राजेश्री वेंकटराव कृष्ण मुा बंदर गोवा

यासी

आज्ञा केली ऐसीजे सु॥ मयातेन व आलफ पुढे मजकूर लिहाव सेवटी जाणिजे रवाना छ १ माहे रमजान लेखनसीमा चालते मोर्तब करावे

१ हुजूर नि॥ वकील यासी पत्र राजेश्री मोरो माहादेव यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ मयातेन व अलफ पुढे मजकूर लिहाव सेवटी जाणिजे रवाना छ १ माहे रमजान लेखन सिमा चालते मोर्तब करावे.

— पंत गोसावी यासी

लेखांक २५५ तारीख २७-१-१८००

रु. नं. ४
अ. नं. १२६

त्याजकडील मुतसदी यास

श्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२६ सिद्धार्थी नाम संवत्सरे माघ शुध्ध द्वितीया क्षत्रिय कुळावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमान्य राजेश्री

१ गोविंदराव बुदजी मु॥ बंदर गोवे यासी आज्ञा केली ऐसाजे
१ आपुराव रामराव यासी आज्ञा केली ऐसाजे

२

नाही सेवटी जियादयच निगास्त्र आयद रवाना छ १ माहे रमजान अयाम बकाम बाषंद सेवटी सिक्याचे मोर्तब करावे

लपयावरी नांव लिहिणे

अजम जोसुव रुटाफ फौजानी विलायत मु॥ बंदर गोवा शादकाम बाशंद. चिटीवरी नांव लिहिणे. अजम जोसुव रुटाफ फौजानी विलायत.

लेखांक २५६ तारीख २७-१-१८००

रु. नं. ४
अ. नं. १२४

राजेश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव याचे नांवे पत्रे सुरय रुटाफ साहेब यासी अजम जोसुव रुटाफ साहेब फौजानी विलायत मुकाम बंदर गोवा दाम एकलास हू मोहबत व मुवदत पनाह खुलत व मवाकत दरतागाह बाआदज दोस्ता अजीनियाजमंद नागोजीराव घाटगे झुंजारराव बादज सलाम आंकी येथील खेरखुशी जाणोन आमोहिबानी आपली कारणे की कलमी करीत असावी पुढे मजकूर लिहाव रुपेरी खसखसी कागद थेली मुसेजरी असावी कागदावरी शिका व मोर्तब नाही लेफाफेवरील थैलीवरी मोर्तब करावे सेवटी ज्यादा काय लिहिणे तारीख १ माहे रमजान प्यार मोहबद असो दीजे हे किताबत यास त्याजकडील मुतसदीयास पत्रे राजश्री गोसावी यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो नागोजीराव घाटगे झुंझारराव रामराम विनंती उपरी येथील कुशल तो. छ. १ माहे रमजान पर्यंत यथास्तित असे विशेष पुढ मजकूर लिहावा सदरहू प्रमाणे पत्रे १ गोविंदराव बुधजी १ आपुराव. १ व्यंकटराव ३-१ हुजूर नि॥ राजे श्रीमोरो-

लेखांक २५७ माहे जानेवारी इ. स. १८००

रु. नं. १

अ. नं. २५२

राजश्री राघो जगनाथ सुभा

चिकोडी यास आज्ञा केली यैसीजे सु।। मयातेन व आलफ तीर्थरूप माहाराज साहेब संवस्थान किले पनाला याजकडे प्रांत हुकेरीचे गावगनाचे सर्वमान्य वतन पेसजी करार करून देऊन आलाहिदा पेसजी सनदा सादर जाहाल्या आहेत त्याप्रमाणे सदरहू वतन स्वाधीन करून चालविणेची आज्ञा होऊन या कामास...पौ आहेत याचे विद्यमाने आज्ञेप्रमाणे सुभेकडील ताकिदी गावगना देऊन वतन स्वाधीन करून हक इनाम कानु-काईदे सालदरसाल चालवीत जाणे आणि या पत्राची तालीक लेहून घेऊन आसेल पत्र भो।।स संवस्थानाकडे देणे जाणिजे रा छ शाबान लेखनसीमा.

लेखांक २५८ तारीख २६–२–१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १२९

यौ छ ९ माहे शोवाल सु।। मयातेन व आलफ मुकाम किले पनाळा

राजेश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव बापू गोसावी यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे।। मोरो माहादेव आसीरवाद विनंती उपरी येथील कुशल तागायत छ १ माहे शोवाल जाणोन स्वानंद लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण रांगणेकरा-कडून पत्रे पाटविली ती पावोन लिहिला मजकूर सविस्तर कलो आला आपण लिहिले जे जोसुव इटाबा साहेब येणार म्हणोन रांगणेकरी यानी हुजूर विनंती पत्र लिहिले म्हणोन आपण तपसिले लिहिले परंतु हा जाबसाल आम्हाकडून कोणास लिहिला नाही येथे फौजेची तयारी आहे हे वर्तमान ऐकोन लिहिले असेल आपण जलदीने साहित्य सरंजाम-सुधा कुमक पाटवणे म्हणोन लिहिले यैसीयासी आपण हुजूरचे पत्राची थैली व आपले-कडील थैली पाटविले प्रमाणे साहेबास देऊन समर्पक पत्रातील मजकूर आवगत जाहला त्यावरून बहुत संतोष पावला आणि उत्तर केले जे माहाराजानी कुंपणी तर्फ सविस्तसीर मसलतीस रुबगार जाहाली आहे त्यास साहित्य सरंजाम कुमक जरुरीने पोचावी म्हणोन विस्तारे लिहिले अशास तुम्ही येताच बोलून कित्येक जाबसाल घडोन यावयाचा तुम्हास सांगितला परंतु अद्यापि त्यातील कांही घडोन आला नाही आणि हली पत्रे तपसिले आप-णास लिहिली व तुम्हीही पत्रातील अन्वयाप्रमाणेच बोलता त्यावरून आपण साहित्य करावे तरी कुंपणीस जबाब कोणत्या तरेन कराव तुम्ही तरी कुंपणीचे दोस्तदार होऊन कुंपणीची नुकसानी केली आहे यैस असता त्याची समजी होऊन माहाराजास कुमक यासमई

व्हावी म्हणोन तुम्हास समजून सांगितले असता तो अर्थ घडोन कांहीच आला नाही हा मजकूर घडोन अलेविना कुंपणीची समजी होत नाही येणे प्रो त्याचे बोलणे आहे त्यास आम्ही समजी यैवजाविसी केली परंतु हुंडीचिठी किंवा रोख येक लाख रुपये आणोन द्यावे त्यासिवाय जाबसाल करवत नाही यैसे बोलणे जाहाले अजम इटाबा यासी थैल्या पाटविल्या त्याची उत्तरे घेऊन पाटवावी म्हणोन आज्ञा त्यास मशारनिलेकडील पत्रे तयार करविली आहे उदईक हुजूरे याजसमागमे पा देतो कळावे. बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

लेखांक २५९ पौ। तारीख २७-२-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३१

पोा छ २ माहे शवाल सु॥ मयातेन व आलफ

मु॥ किल्हे पनाळा

पेशजी तुम्हास ल्याहावयाचे ते लेहून पाटविले आहे येका गोष्टीचा संषय घेऊन विचारतील त्यास तुम्ही सांगण जे माहाराज सर्व राज्य सुधा कोपणीचे आहेत त्यास कोपणीस आणून या राज्यात ठेवणार आणि त्यापासून आपले पूर्वार्जीत सर्व राज्याचा बंदोबस्त करून घेणार हे मानस माहाराजाचे अंतःकरणापासून आहे तेव्हा तहाचा मजकूर सांगावयाचा काय आहे च्यारी राज्यात इंग्रज साहेब लोकानी राहून त्याची संवस्थाने रक्षूण आपले कार्यभाग करून लौकीक संपादून राहिले आहेत त्याजप्रमाणे श्रीमन्माहाराजाधिराज महाराज याही मसलत करुन पेशजी पत्रे पाटविली आहेत अशास अजम इटाबा साहेब याही किमपी अंदेशा चितात न आणावा या समयी पलटणे सरंजाम सुधा साहेब मशानिल्हे यानी सत्वर निघोन यावे उभय पक्षीची ऐकेता जाहाल्याने उभय पक्षीचे कार्यभाग मनोदयानरूप घडोन येतील ते तो सर्व मसलहतीचे वाकीफगार आहेत त्यास दुसऱ्यानी सुचऊन द्यावे असा अर्थ नाही पेशजीच्या पत्री लिहिले कीं लिहल्या प्रमाणे रुपये साहुकारीपण्यात द्यावत नंतर पलठणे कुमकस देतात याप्रभाणे उभयताची खातीरजमेची पत्र आली त्या प्रो स्वामीस अर्ज करून ऐवज आपले जिमेस करून घेतला आहे तुम्हाकडील गडी आला त्याणी जबानी सांगितले जे तारवे भरून तयार आहेत इकडील पत्रे पोहोचताच निघोन येतात त्याजवरून आ निराली चिटी लिहून देणेची वास्तवे त्याचे मसलहतीचा खरेपण करणेचा बेत जो तुम्हास समजला असेल तो आम्हास लेहून पाटवावा तुम्ही तो मतलबी लिहिणार नाही ही तो राज्याची कामे जे खर असेल ते पकपणे लेहून कलवावे तदनुसर मसलत केली जाईल या समयी मतलबी जाबसाल लिहिणेचा समय नव्हे जे खरे असेल ते निराले पत्रे लेहून कळवणें वरचेल सविस्तर

पत्री मजकूर लेहून पाटवावा पलटणे सरंजामसुधा कुमकेस सत्वर सत्वर घेऊन यावयाचे करणे सर्वत्राचे कल्याण आहे तुम्ही न आंदेशा धरता ज्या मार्गानी येतील त्या मार्गानी घेऊन सत्वर यावयाचे करावे.

लेखांक २६० तारीख २७–२–१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३०

पौ छ ९ शोवाल सु॥ मयातैन
व आलफ मुकाम दरजागा किले पनाळा
राजेश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव बापू गोसावी

यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नो मोरो माहादेव आसीरवाद विनंती उपरी येथील कुशल ता छ २ माहे शोवाल जाणोन स्वानंद लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पत्र पाटविले पाटगावकर माणसाबरोबर ते पावले लिहिला मजकूर सविस्तर कळला यानंतर हुजूर पेशाजी जोसुबा बिटाब साहेब याणी पत्रे पाटविलीप्रमाणे जाबसाल होऊन आला नाही आणि हली हुजूरची पत्रे आपणास येतात किंवा तुम्ही बोलता कीं कुमक जलदीने द्यावी यैसीयासी माहाराजास कुमकेची जरुरी असल्यास पेशाजी लिहिंलेप्रमाणे कुंपणीची समजी करून कुंपणी पासोन कार्यभाग करून घेणे माहाराज सुज्ञ आहेत कुंपणी तर्फे जे माहाराजाविसी साहबलोक वचन देतील ते आन्यथा व्हावयाचे नाही येणेप्रमाणे त्याचे बोलणे आम्हासी जाहाले त्यास आम्ही जाबसाल केला जे स्वामीचे राज्य ते कुंपणीचे आहे त्याअर्थी यासमयीं सर्वश्वे अभिमान धरून कुमक करून राज्य रक्षिल्यान कुंपणीचा लौकिक चंद्रार्क असोपर्यंत होईल त्यास त्यानी उत्तर केले जे कुंपणीचा व माहाराजाचा एकरंग घरोबा होईल त्या समयी शत्रू पराभव कोणत्या तऱ्हेने होईल तो कळणार नाही याप्रमाणे बोलले त्याजवरून ऐवजाची निशा बहुत तरेने आम्ही व राजश्री व्यंकटराव यानी केली आपला यैवज येईपर्यंत आपणापासी आम्ही राहातो ऐवज आपणास पावल्यानंतर आम्हास निरोप द्यावा म्हणोन बोललो त्यास ती गोष्ट मान्य करीत नाही आणि तो बहुत तऱ्हेने बोलिला तो पत्री लिहिता पुरवत नाही मागील जाबसाल केल्याविना नूतन जाबसाल आमच्या हातून व्हावयाचा नाही याप्रमाणे जाबसाल जाहाला आपणास कळावे करिता लिहिला आहे मारनिले साहेब यानी हुजूर व आपणास पत्राच्या थैल्या दोन पा॥ आहेत त्याजवरून सर्व मजकूर कळो येईल आम्हास आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू आपण पत्र पाटविले तेथे आज्ञा जे हेच पत्र आजम इटाब्रा साहेब यासी दाखवावे व ऐवजाविसी खातरजमा करावी आणि पत्र

लेहून मागील त्याप्रमाणे द्यावे म्हणोन लिहिले अशास पत्र ऐनजिनसी त्यास दाखविले व ऐवजाची खातिरजमा बहुत तऱ्हेन केली व पत्र लिहून द्यावयास मान्य जाहाले परंतु त्यास तो कांही मान्य जाहाला नाही हुंडीचा जाबसाल घडोन आल्यास माहाराजाचे मनोदयानरूप कार्यभाग घडोन येईल याप्रमाणे त्याचे बोलणे आहे आपल्या विचारास येईल त्याप्रमाणे करावे. बहुत काय लिहिणे लोभ करीत असावे ही विनंती.

लेखांक २६१

तारीख ९–३–१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३३

पौ छ १७ शोवाल सुा मयातेन व आलफ

मुकाम किले पनाला

राजश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव बापू गोसावी

यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्वे॥ मोरो माहादेव असीरवाद विनंती उपरी येथील कुशल ता। छ १२ माहे शोवाल जाणोन स्वानंद लेखन करीत असावे विशेष पेसजी रांगणेकरी व हुजूरे याज समागमे हुजूर विनंती पत्रे व आपणास पत्रे पाटविली ती पावलीच असतील परंतु अद्यापि उत्तरे आली नाही हुजूरची खासा स्वारीच मुकामी गलीमाची फौज येऊन लडाई जाहाली म्हणोन वर्तमान ऐकिले त्याजवरून बहुत चिंता लागली आहे तरी सविस्तर वर्तमान सुखरूपतेचे लिहून कळवावे यानंतर इकडील वर्तमान अजम इटाबा साहेब याचे बोलणे प्रथम पासून येकच आहे त्यातील भाव माहाराजाचा व कुंपणीचा एकरंग व्हावा हेच मानस आहे आणि हल्लीचे प्रसंगी कुमक करावी हे अगत्य आहे माझे चितात परंतु तूर्त कुमक पाटवावी तरी कुंपणीस व इतर साहेब लोकास ठीक दिसोन येत नाही कांही अस्ता धरून जाबसाल केला ऐस दिसोन येते याजकरिता माहाराजास कुंपणी पासून कार्यभाग व दोस्ती करून घेणे करार असल्यास पेसजीचे लुकसानीपैकी पेसजी लिहिले प्रमाणे रुपये तूर्त द्यावे म्हणजे कुंपणीची समजी करून माहाराजाचे मनोद्यानुरूप काम करून घ्यावयास येईल यैसे बोलणे त्याचे आहे त्यास तूर्त एक लाख रुपये द्यावे ऐस त्याचे बोलणे आहे त्याहीमध्ये कांही कमी होऊन ऐवज आल्यास कुमकीचा जाबसाल घडोन येईल बाकी राहातील ते कार्यभाग जाहले नंतरी दिले पाहिजे व त्याचे स्वकार्य कांही करावे लागेल यैस दिसते आपणास कळावे करिता लिहिले आहे पत्राची उतरे सत्वर पाटवीत असावी वाडीकर सांवत यानी पेसजी एक सावकारी फत्तेमारी लुटून नेहली त्याजकरिता अजम इटावा साहेब यानी वाडीकरास लिहिले जे तो सावकार आमचे बादर (बंदर) आहे त्याचा माल तुम्ही घेतला आहे

तो पाठवून देणे म्हणोन लिहिले त्याजवरून त्यानी वकील येथे पाटविला त्याने करार करून गेला जे माल आठ रोजानी आणून देतो म्हणोन गेला आहे त्याचे माघारा येक तारू व च्यार फत्तेमाऱ्या रेडीच्या नजीक पाठविल्या आहेत त्याची पत्रे वरचेवरी येत आहेत. कळावे बहुत काय लिहिणे लोभ करीत असावे हे विनंती.

लेखांक २६२

तारीख ९-३-१८००.

श्री

रु. नं. १

अ. नं. १३२

राजेश्री मोरो माहादेव यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ मयातेन व आलफ तुम्ही विनंती पत्र छ २ शोवालचे पाठविले ते व राजश्री नागोजीराव घाटगे जुंझारराव यास तुम्ही पत्र पाठविले ते हुजूरे प्रविष्ट होऊन साद्यंत लिहिला अभिप्राय निवेदन जाहाला. अजम जोसुव इटाफा याचे व तुमचे ममतेव्याअर्थे पलठणे देऊन कुमक करावी हा त्याचा आतःकरणा पासून मनोभाव व कौपणीची देणेची समजी व्हावी येविसीचे मतलब अवगत होऊन माहाराजास परम संतोषावाप्ती जाहाली तुम्ही लिहिल्या प्रमाणे यैवज राजेश्री नागोजीराव घाटगे जुंझारराव याचे पदरी घातला असे येविसीचा मजकूर जोसुव इटाफ याचे खातर तसली करून देऊन पलठणे सरंजामसुधा जलदीने हुजूर पाठवून देण वरकड आज्ञे प्रमाणे राजश्री बाळाजी मल्हार मुखतर सांगतील त्याप्रमाणे तुम्ही व मशारनिले मिलोन जोसुव इटाफ यासी सांगून त्याचा खातरजमा करून देऊन पलटणे व कुमक सत्वर हुजूर येऊन पोचस करणे जाणिजे र॥ छ १२ माहे शोवाल लेखन सिमा.

वो राजश्री कमलाकर भटजीस रुपये वरात मौजे बोरीवडे तर्फ सातवे सुा मयातेन व आलफ जमा रुपये १००

लेखांक २६३

तारीख १४-३-१८००.

श्री

रु. नं. १

अ. नं. १३४

पाो छ २४ माहे शोवल सु॥ मयातेन व आलफ मु॥ किले पनाला साहेबाचे चरण सेवेसी सेवक व्यंकटराव कृष्ण कृतानेक शेवेसी विज्ञापना येथील कुशल तागायत छ १७ माहे शोवाल साहेबाचे कृपेने शेवकाचे वर्तमान यथास्तित असे यानंतर साहेबी कृपाळु होऊन आज्ञापत्र पाठविले सिरसावंद होऊन सनाथ जाहला आज्ञापत्रीं आज्ञा केले प्रमाणे राजश्री मोरोपंत यास इटाबा साहेब यासी भेट करवून माहाराजाचे आज्ञे प्रमाणे थैल्या गुजरून सर्व जाबसाल बोलणे जाले ऐसीयास या प्रसंगी मळलीक जाणोन त्यानी उत्तर

साहेबाचे मनोदयानरूप सर्व बंदोबस्त करावा याबद्दल कारनामा जाहाला पाहिजे याकरिता कित्येक जाबसाल सांगणे ते पंत मशारनिले यास सांगणे ते सांगून पत्रे साहेबास व राजेश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव बापू यास थैल्या समवेत देऊन जलद पाठविले आहेत तदनरूप साहेबासी विनंती करतील त्याप्रमाणे बंदोबस्त साहेबाकडोन घडोन याव म्हणजे अविलंबे जाबसाल घडोन मातबर काजकामे घडोन येतील गलीम नजीक पोचला म्हणोन साहेबानी आंदिशा न धरावी साहेब व कुंपणी येक होईल त्या समयी सहज गलीम पराभव होईल यात संशय नाही परंतु कुंपणीसी करार जाबसाल करावा लागल वरकड मजकूर राजेश्री मोरोपंत याचे पत्रावरून सर्व निवेदन होईल. सेवेसी श्रुत होईल हे विज्ञापना.

तारीख २२-३-१८००

लेखांक २६४

हु.

रु. नं. ४ करार

अ. नं. १३८

हुजूरून युटाफ यासी पत्राचा मसुदा बाआदज आके दरीविला आयखलासमंदाकडे कितेक मसलहतीचे काजकामाचे मतालीब जे फर्मावणे त अजम नागोजीराव घाटगे झुंजारराव मुस्तियार आदमी याचे जुबानी रुबरु फर्माऊन रवाना करून फिरिस्ताद केले असेत हुकूम इजहार करतील ते दिलनिषी जाणोन आपला खातीर करार जाणोन अनकरीब माहाराजाचे खातीरखवाह मसलहतीची काजकामे करून दाखवून तमाम अल्मात आयखलासमंदाचे नामोष जाहिरीस पोहोचे ते करणे दिरंग अशा बख्ती हरगीज न करावा

आयखलासमंदाकारणे माहाराजाचा खास पोशाख बादली व सीरपेच झुंजारराव मशारुनइल्या + + (अपूर्ण)

तारीख २३-३-१८००

लेखांक २६५

श्री

रु. नं. ४

अ. नं. १४०

राजमान्य राजेश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही गेलियानंतर बोली राजश्री आनंदराव पंडित प्रतिनिधि त्याजकडील ग्रहस्त आले त्यास भेटावयास गेले खालजाब ऐकोन घेतला त्याचे प्रथक बोलणे आहे तेच आहे त्यात

कमी कांही नाही तेव्हा विवेकाचा स्वालजाब घडोन येत नाही गोखले याजकडील मोर्चा नवा रंकाले नजीक बसला आहे तरी तुम्ही विलंब न करिता निकडीने केलेले कार्यसिद्ध करून त्यास घेऊन सत्वर यावयाचे करणे जाणिजे सु॥ मयातैन व अलफ रवाना छ २६ शोवाल बहुत काय लिहिणे. पौ छ ५ जिलकाद सु॥ मयातीन व आलफ.

लेखांक २६६ तारीख २८–३–१८००

श्री

अ. नं० ४१

राजमान्य राजश्री नागोजीराव घाटगे

झुंझारराव यासी

आज्ञा केली ऐसीजे तुम्ही विनंती पत्र छ २६ सवालचे पाठविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाले वरकड सविस्तर जे लिहणे ते आज्ञापत्री लिहिले आहे त्याजवरून कळेल शत्रूकडील प्रकार कसा काय बोलणेचा ठराव येतो तो मागाहून सविस्तर आज्ञापत्री लिहून पाठविणेची आज्ञा होईल राजश्री मोरे सखदेव यासी रूबरू कितेक कार्यभागाची आज्ञा केली आहे त्या आज्ञेप्रमाणे साद्यंत अर्थ चित्तात आणून तदनुरूप तुम्ही अविलंब गोवेस जाऊन अजम जासुबा युटाफ याची भेट घेऊन त्याजकडील बोलण्याचा प्रकार खचित करून घेऊन अविलंब त्याजकडील पलटण सरंजामा सुद्धा जलदीने हुजूर येऊन पोहचते करावे ये विशीचा सर्व अर्थ तुमच्या चित्ती असता आज्ञापत्री आज्ञा करून कळवावे असे काय आहे पुण्याचे पत्राची तालीक लिहून पाठविली आहे त्याज वरून कळेल जाणिजे सूर सन्न मयातैन व अलफ छ २ माहे जिलकाद सरकारचे निशाण मोर्तब असे.

पैवस्ती छ ८ माहे जिलकाद सन मयातैन व अलफ. मुकाम बंदर गोवे.

लेखांक २६७ तारीख २९–३–१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३५

राजमान्य राजश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र छ २९ शोवाल सौम्यवार प्रातःकालचे मुकाम जंजिरे सिंदुदुर्ग येथून पाठविले ते छ जिल्काद रोज मंदवार प्रातःकाली हुजूर येऊन प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाले जंजिरे मजकुराहून गोवेस जावयास प्रतिपदेस निघोन गेलो ते विसीचा मजकूर लिहिला तो निवेदन जाहला इकडील कच्चे पक्के वर्तमान शेवकास

येत नाही म्हणून विनंती लिहिली त्यासी इकडील वर्तमान वरचेवर आज्ञापत्री आज्ञा होऊन तुम्हाकडे रवानगी होत असती येऊन तुम्हास पोहचत असेल किले प्रसिधगड व जंजिरे मजकुरचा बंदोबस्त येथास्तित आहे म्हणोन तुम्ही विनंती लिहिली ती निवेदन जाहाली. तुम्हाकडील वर्तमान वरचेवर लिहीत असावे जाणिजे सु॥ मयातेन व आलफ र॥ छ ३ माहे जिल्काद बहुत काय लिहिने.

लेखांक २६८

तारीख ३०-३-१८००

श्री

रु. नं. ४

अ. नं. १४२

राजेश्री संक्राजी साळुंखे यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ मयातेन व अलफ तुम्ही स्वामीचे शेवेसी विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला अजम नवाब मुलकेजहाखाबाहादर याचे येणेचा मजकूर सविस्तर लिहिला त्यावरून राजेश्री रायाजी जाधव जप्तनमुलूख व राजश्री शंकराव सिंद सेनाखासकील याच्या निशाचिठ्या पाठविल्या आहेत त्याप्रमाणे नबाबाची खातरदास्त करून देऊन फौजसुध्दा त्याचे येन जलदीने करवीरास होई ते करणे मार्गाचे खातरेमुळे ऐवजाची रवाणगी न जाहाली सबब निशाचिठ्या पाठविल्या असेत करवीरास येऊन पोहोचताच कराराप्रमाणे ऐवज पोहोचेल हे जाणोन तुम्ही त्याची तसली करून देऊन त्वरेने फौजसुधा समागमे घेऊन अविलंबे हुजूर येऊन पोहोचणे. जाणिजे र॥ छ ४ माहे जिल्काज.

लेखांक २६९

माहे मार्च इ. स १८००

रु. नं. १

अ. नं. २३८

श्री मार्तंड प्रसन्न

छत्रपति

राजेश्री नागोजीराव घाटगे झुंजार-

राव काका गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रे॥ हैबतराव गाईकवाड विश्वासराव रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत असिले पाहिजे विशेष राजेश्री आकाराम यादव हावलदार या बरोबरी राजश्री दौलतराव सिंदे व बालोबा पागनीस याची पत्रे त्याजकडील गणपतराव व रामचंद्र परशराम यासी व कंपूची पत्रे बारडेल इंग्रज यासी आली जे करवीरची लढाई तहकूब करून पंधरा रोज स्वस्थ राहावे आणि हुजूरून मरवतेसरग्रहस्त आणविले आहेत ते पुण्यास येऊन तहाचे बोलण्याचा ठराव करून तुम्हास पत्रे पाठवून देऊन त्याप्रमाणे वर्तणूक करणे याप्रमाणे पत्रे आली ती देऊन

हुजूरून राजश्री जिवाजी पंत वाकेनीस व बच्याजीपंत व तिकडील हरकारी रवाना करून दिले त्याजवरी त्यानी जाबसाल दिल्ले. जे पंधरा दिवस उगीच तहकुबी करून राहा वयाची आपणास आनकुलता पडणार नाही आम्ही पत्रे पाठवितो त्याची उत्तरे येतील त्याप्रमाणे आम्ही वर्तणूक करू तुम्ही आले मार्गी निघोन जाणे याप्रमाणे मतलबी जाबसाल सांगितल्यावरून उभयता मशारनिले माघारे आले तसेच राजश्री रघुनाथराव माने याची पत्रे गेली होती त्याची ही उतरे आली जे हुजूरून मखतसर पुण्यास रवाना करून पाटऊन द्यावे येथे बोलण्याचा ठराव जाहाले नंतर वेढा उटेल याप्रमाणे मतलबी जाबसाल तिकडील हे सर्व आपण ध्यानात आणोन सर्व माहाराजाची भिस्त आपणावरी आहे तरी त्या कार्याचे खचीत करून अविलंबे तिकडून फलटण सरंजाम सुद्धा घेऊन येऊन शत्रूचा पराभव होऊन येशास पात्र आपण जाहाले पाहिजे तरी त्वरेन आपण कार्य सिद्ध करून याव सर्व इमारत आपणावरी आहे. येविसी श्रीमन्माहाराजाधिराज माहाराज याही आज्ञापत्र आपणास सादर केलें आहे त्यावरून सर्व अभिप्राय कलो येईल बहुत काय लिहिने हे विनंती.

तारीख १–४–१८००

लेखांक २७०

रु. नं. ४

अ. नं. १४४

रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध सप्तमी छ ६ माहे जिल्हेज सु॥ मयातेन व अलफ राजेश्री दौलतराव सिंदे याजकडील फोज येऊन करवीरास रामचंद्र परशराम याचे कुमकेस पाटविली होती त्यातील सरदार इंग्रेजी हल्ला कोटावरी केला ते दिवसी दोन असामी ठार व एक असामी जखमी जाहाली सबब पुणेहून कंपूकडून नवा सरदार पलटणात आला त्यास हुजूरून आज्ञापत्रे लिहिली त्याचे नांव त्यास आज्ञापत्रे लिहिंणेचा आल्काब बि॥ स्वस्ति श्री राज्यभिषेक शके १२६ रौद्रनाम संवत्सरे वैशाख शुद्ध सप्तमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी रफअत पनाह अजम डाकन कप्तान यासी फर्माविले ऐसजे पुढे मुसुलमानीनी मजकूर ल्याहावा, शेवटी जाणिजे रा छ ६ माहे जिल्हेज सिक्याचे मोर्तब शेवटी करावे माथे सिका थोरला वरता मध्येभागीं करावा लफा फे समेत लाखोटे पाठीमागे पेशव्याचे अथवा चालते मोर्तब करावे, रफअत पनाह अजम डाकन कप्तान महमूज बाशंद रा॥ छ ६ माहे जिल्हेज स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १२६ रौद्रनाम संवत्सरे वैशाख शुद्ध पोर्णिमा गुरुवासरे छत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी रफाअत पनाह अजम डास कप्तान यासी फर्माविले ऐसीजे पुढे मुसुलमानीनी मजकूर लिहावा माथ शिका करावा सेवटी जाणिजे रा॥ छ १३ माहे जिल्हेज मोर्तब शिक्याचे बराबरी करावे.

तारीख १३ माहे जिल्हेज उर्फ वैशाख शु॥ पोर्णिमा गुरुवासरे सुामयातेन व आलफे पेशजी सिंदेकडून पलटणात नवे इंग्रजी सरदार पुणेहून कुंपणी पाठविले त्याचे नांवे हुजूरून आज्ञापत्र लेहून पाटविले होते त्याचे नांव व त्यास आज्ञा पत्र लिहिणेची पद्धत येणे प्रमाणे बी॥

लेखांक २७१

पौ॥ तारीख ४–४–१८००

श्री नागनाथ प्रसन्न

रू. नं. १

अ. नं. १३७

पौा छ ९ जिल्काद मयातैन

राजेश्री खेम सांवत भोसले सरदेसाई गोसावी यासी अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ नागोजीराव घाटगे झुंझारराव राभराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखण करीत असले पाहिजे विशेष आलीकड आपणाकडून बहुत दिवस पत्र येऊन कुषलार्थ कलो येत नाही तरी ऐसे न करिता वरचेवर पत्र पाठवून चित संतोषवीत असावे प्रस्तुत सरकार आज्ञेवरून आज्म जोसु विटाबा याजकडे गोवेस हुजूरचे कामाकरिता आलो पेशजीपासून माहाराजाचा व आपला वेत्यय घरगुती असता हली राजश्री रामचंद्र परशराम यानी येऊन प्रांताची खराबी करून तूर्त करवीरावर मुा करून राहिले आहेत याजकरिता आपणास लिहिले आहे तरी यासमयीं आपणाकडोन कुमक असावी माहाराजाचा आपला घराऊ शिलशिला लक्षात यावेलस न आणिता कुमक केलियाने बहुत उपयोगी पडल हाली समय गुजरोन जाईल चिंता नाही परंतु पुढे आपले उपयोगी आहे कलावे बहुत काय लिहिणे लोभ असू द्यावा सुलतानजी जाधव हुजरे आम्हा समागमे आले होत त्याजबरोबर पत्र पाठविले आहे समर्पक उत्तर पाठविले पाहिजे हे विनंती.

लेखांक २७२

तारीख ४--४--१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३८

आज्ञा केली यैसीजे आपण विनंतीपत्र पाठविले ते छ ९ माहे जिलकादमधे रात्री प्रविष्ट जाहाले लिहिला मज्कूर निवेदन जाहला आपण लिहिले अन्वये तहचा ठराव करून घेतो आपण इटाबा इंग्रज याची दोस्ती राखोन घेऊन गेला

तो जिनस न गुंतवता निघोन याव इकडील मजकूर सविस्तर लिहून पाठवण म्हणोन विनंती लिहिली त्यास पेशजी यक दोन पत्र आपणास पाटविली त्यात सर्व मजकूर लिहिलच आहे. जाणिजे. सुा मयातेन व आलफ रवाना छ ९ माहे जिलकाद बहुत काय लिहिणे.

तारीख ४-४-१८००

लेखांक २७३

रु. नं. १

अ. नं. ११३

श्री प्रभु प्रसन्न

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे सेवेशी विनंती सेवक मलपा विरप गौंडा शेमशेरजंगबहादर सरदेसाई सरदेशपांडे नाडगोडा मामले हुबली सरदेसाई सरदेशपांडे पो अजमनगर तो खानापूर तो चांदगडे तर्फ सुपा सार हल्याल सरदेसाई देशपांडे का देवर हुबली वगैरे माहलानिहाये कृतानेक विनंती विज्ञापणा येथील क्षेम ता छ ९ जिलकाद पर्यंत स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विनंती इकडील मार रौ कृष्णाजी नारायेण सांगोन पाटविले असे विनंती करिता विदित होईल विशेष लिहिणे शेल्क नव्ह स्वामीकारण पाटविली आहे स्वीकार करावे हे विज्ञापणा.

पौ छ २३ माहे जिलकाद सुा मयातैन व अलफ.

तारीख ६-४-१८००

लेखांक २७४

रु. नं. १

अ. नं. ११५

श्रीमन्माहाराज छेत्रपति स्वामी
स्वामीचे शेवेशी

अर्जदास्त फिदवी नवाबमुलकेज्याहांखा बहादर तसलीमात खुर्नीशात बंदगी मारुज आंकी येथील खैरखुशी छ ११ माहे जिलकाद साहेबाचे नेकनजरेकडून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे धनी स्वामीनी कृपाळू होऊन आज्ञापत्र छ २९ माहे सोवालचे सादर जाहाले ते मस्तकी वंदून सनाथ जालो पत्री वाटमार्गात येवज पोहचणे याआर्थ खातरजमेच्या चिठ्या सादर जाहाल्या आहेत खातरजमा करून घेऊन हुजूर येऊन सेवची चीज यावख्ती करून दाखवावी म्हणोन आज्ञा सेवकास खातरजमेच्या चिठ्या पोहचल्या नाहीत येविसी सेवकानी वारंवार आर्जी काये म्हणोन चरणासी ल्याहावी कायावाचा साहेबाचा चिरंजीव म्हणविले सबब साहेबाचा शाहा उठावा जाणून सहस्त्र कामे टाकून रो संकरेपा साळोखे याजबरोबर आर्जी हाताने लिहून शत्रू तालुका डंबल वगैरे पेटा मारून गदग पेट बेचिराख

करून वेढा घालून बसलो आहो आमचे निकडीमुळे तिकडील फौजा माघारी फिराव्या याअधि सेवकाची फौज धन्याचे येकण्यात आलीच असल पत्री काय लिहिले हालफेल पंधरा सोल हाजार सवार फौज व पायदल तीस पसतीस हजार खर्च चालण कठीण साहेबानी दोन लक्ष रुपये पाटविले क्षणी आठवडा खर्च होणे नाही परंतु साहेबास वचन गुंतले सबब अर्जी लिहिणे घडली शेवा घेणेची चिती असलेस दोन लक्ष रुपये तोरगल मोकामास यावे आणि मनोली कुली टाणे सेवकाचे स्वाधीन होणेस खातरजमेच्या चिठ्या येऊन ठाणी स्वाधीन व्हावी म्हणजे बुनग बाहीर ठेऊन रातबिरात सडे फौजेनिशी येऊन शत्रूचा फडशा धण्याचे पुण्य प्रमाणे करून देऊ यासी आंतर होणार नाही टाणेचे व रु॥चे कार्य करून पाटवणेस आनमान केल्यास साहेबास श्री महालक्ष्मीची शेफत असे आम्ही येऊन न पोहचू तरी आम्हासही तीच शेफत असे वारंवार पत्रे लिहून लटके न पाडावे यावरी कार्य होत नसल्यास सेवकास आज्ञापत्रे सादर न करावी सेवटची अर्जी लिहिली आहे हे अर्जी.........पौ छ २२ जिल्काद सु॥ मयातैन व आलफ मुकाम किले पनाला.

लेखांक २७५ तारीख २७-४-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १३१

राजमान्य राजश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुमचे येणे हुजूर व्हावे हे जाणोन आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी आज्ञे प्रमाणे अविलंबे निघोन हुजूर यावयाचे करणे जाणिजे सुा मयातैन व आलफ छ २ माहे जिल्हेज.

लेखांक २७६ तारीख ४-५-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. ११७

यादी राजश्री दौलतराव सिंदे याचे भेटीबद्दल खर्च छ ९ जिल्हेज चांदवडी रुपये सन मयातेन

६४१० राजेश्री दौलतराव बाबा		३२२ माधवराव भाऊ अ॥			
४०००	शिरपेच व कंठी मोत्याची ये॥		तिवट	शेले	महमुदी
			२	२	२
८००	घोडी		किनखाप		
१६१०	सनगे.		१		
६४१०					

४५० चिरा
५१५ दुपेटा
३६० जामेवार
२२५ किनखाप

४८५ राजेश्री सखाराम बावा
६५ तिवट
३२५ शेला
२० महमुदी
७५ किनखाप
४८५

६६८ आबा चिटनीस अ॥ ४
तिवट सेले महमुदी
४ ४ ४
किनखाप निमे अ॥
२

१० १३८ दर १५ दर ७५
१८ ८५
१५ ९० ६० १५०
१२ ७०
७५ ८३

६६८

६८ मोरो हरी मुजूमदार
तिवट शेला
२३ ४५

१३५ भाऊ फडणीस
तिबट शेला महमुदी
२२ ८५ १५
गजणी ॥०
१३

१३५

८५ पोतनीस
तिवट शेला
२० ६५

२२ १०५ दर ०
१५ ७० १५ ८०
३७ १७५ ३०

३२२

२०९॥ सदासिव मल्हारभाऊ
तिवट शेला महमुदी
३० १२७ १५
किनकाफ
३७॥०

२०९॥०

२२२॥० नारायणराव बक्षी
तिवट शेला महमुदी
३० १४० १५
किनकाफ
३७॥०

२२२॥०

८२ आत्माराम पागणीस
शेला तिवट
५५ २७

८२

६७ तात्या फरास भोसले
तिवट शेला
२२ ४५

९५ खासगीवाले सखाराम
ति॥ शेला
३० ६५

५५ विठलपंत बनाजी बावा
तिवट शेला
२० ३५

५७ दप्तरनीस
तिवट शेले
२० ३७

२१९ बनाजी बावा शेठे
तिवट शेला महमुदी
३२ १२७ १५
किनकाप ·।।·
४५

१५० देवजी गोली
तिवट शेला महमुदी
२० ७० १५
किनकाप
४५

२४५ बोबाजी जामदार
तिवट शेला महमुदी
२५ ९० १५
किनखाप
४५

२८५ हसणखान बावा
तिवट शेला महमुदी
३० ९५ १५
किनखाप
४५

खिसमतगार अ।। ५
तिवट शेले ५ दर १३
५
दर ९ प्रो ६५
४५

२४० चोपदार अ।। २
तिवट शेले दर ९०
२ २ १८०
दर ३० प्रो ६०
१७५ इनाम खर्च
५७ म्हतापखान
तिवट शेला
२२ ३५

१०२४२
४७५ कंपुचे सरदार ३
यासी

१०७१७

लेखांक २७७ तारीख ६-५-१८००

श्री गजानन

रु. नं. १
अ. नं. १४५

शेवेसी विज्ञापना ता। छ ११ जिल्हेज सौम्यवार प्रातकाल पावेतो वर्तमान यथास्थित असे विज्ञापना छ ९ रोजी रविवारी राजेश्री दौलतराव सिंदे गोटास येऊन भेटी जाहाली भेटी समयी मेजवानी दौलतरायासी करावी असे राजश्री सखाराम बावाचे विचारे ठरले त्यावरून दौलतराव बाबा यासी पोशाख बादली पद्धती प्रमाणे व जवाहीर मोत्याची कंटी व सीरपेच व हुजूरने हती समागमे आणिल्या पैकी हती एक व घोडा खरेदी सखाराम बावाचे वि।। करून घेऊन दिला व मुत्सदी दरखदार यासी पोशाख पद्धती प्रमाणे दिले व राजश्री सखाराम बावासही त्याजकडील मंडलीबरोबर पोशाख दिला येणे प्रमाणे समारंभ होऊन दवलतराव बाबा माघारे गेले निवेदन व्हावया लि।। श्रीमंत राजेश्री बाजीराव पंडित प्रधान याचीही भेटी होईल त्या समयी या

प्रमाणेच समारंभ जाहला पाहिजे म्हणून सखाराम बावानी सांगितले निवेदन व्हावे रोज गु॥ हुजूरने आज्ञापत्रे छ ६ मिनहूची हुजूरने आज्ञा होऊन राजश्री जानराव जाधव याच्या माणसा बा॥ आज्ञापत्रे सादर जाहाली ती येऊन पोहोचली त्यात शत्रूच्या लस्करचा मजकूर कांहीच आज्ञा जाहाली नाही यावरून आंदेशात आहो राजश्री तुळसाजी सिंदे याजकडे रविवारी प्रातकाली सांडणीस्वार त्याचे बंधु माणकोजी सिंदे याजकडून करवीरानजीकच्या सिंदे निषबत कारकून बा। छ ७ मिनहूची पत्रे होती त्यातील वर्तमान जे परशुरामपंताचे पुत्र गोखले याचे लष्करात जातो म्हणोन सडे होऊन गेले तदोतर गोखले व धाकटे पुत्र सारे एकत्र कलंबे बालंगे नजीक होऊन बुनगे पा। देणेविसी कंपूवालेस सांगू पा। त्यावरून बुणगेस निरोप दिले तदोत्तर शत्रूचे पुत्र व गोखले कुशेगल येथे गेले गणपतराव भिकाजी मोरचे पाहातो म्हणोन सडेनिसी मशारनिलेचा माऊसबंधूसुधा गेला तोहि रामचंद्र परशुरामाकडेच गेला इतकियात येथून सिंदेकडील ताकीदी सतलज कंपूसुधा गेल्या जे मोर्चे उठवून गावात आणणे त्यावरून सिंदेकडील पथक कंपूसुधा यानी करवीरात सांगू पा। कीं आम्हास आमचे यजमानाचेच पत्र मोरचे माघारे काढोन आणणेविसी आले आहे मोर्चे माघारी काढून आणितो तुम्हाकडोन वरचेवरी गल्बल नसावी त्यावरून करवीराहूनही गल्बलीची मनाई आणली तदोतर सिंदेकडील पथक कंपूसुधा व सरकारी पथके पानसेसुधा ऐसी गुरुवारी प्रातकाली कूच करून इचलकरंजी नजीक पंचगंगातीरी सदरहू फौज आली पटवर्धन व गोखले कुशेगल रोखे जावयासी दरकूच गेले करवीरचा शह मोकला जहाला या प्रो वर्तमान आले त्याजवरी हुजूरने आज्ञापत्री आज्ञा होईल म्हणोन दोन दिवस वाट पाहिली आज्ञापत्र सादर जाहाल नाही तरी येविसीची साद्यंत ता। आज्ञापत्री आज्ञा असावी सदरहू पथके यासी श्रीमंताकडील ताकीद पत्रे व सिंदेकडील ताकीदपत्रे जे श्रीकृष्णतीरी येऊन उतरणे म्हणोन सखाराम बावासी बोलणेयात येऊन ताकीद पत्रे दोहीकडील सिध करवीत आहेत उदईक ताकीदपत्रे सिध होताच खिजमतगार व हालकारे नेटाने रुबुरु सांगवून समागमे हुजूर नि॥चे हुजूरे ऐसे देऊन हुजूर रवाना करितो निवेदन व्हावे यादी बुधी तहसंबंधे ठरावून घ्यावी म्हणोन आज्ञा त्यास सखाराम बावा यासी बोलण्यात आले आहे चहुरोजात बोलोन घेऊन यादी ठरवून देतो म्हणोन सखाराम घाटगे सर्ज्याराव बोलले आहेत निवेदन व्हावे राजश्री सखाराम बावाचे म्हणणे जे हुजूरचे मर्जीस्तव बालोबा पागणीस याचा बंदोबस्त केला त्यावरून शत्रूची फौज सहजी शह टाकून निघून गेली त्या पक्षी दोन लक्ष रुपये करार केले प्रमाणे रोख द्यावे त्यास दोन लक्ष रुपयाची तरतूद साहेबाचे लक्षात आहे पावणा लाख रुपयाचा भरणा तेथून होऊन आला पाहिजे दागिणे आणील तेही गाहाण ठेऊन काम होते ऐसे अद्यापि जाले नाही सारांष दोन लाख रुपये रोख द्यावे तेव्हा पुढील कामास चांगले निवेदन व्हावे पुढील बोलणे चालणे यादी ठरवून घ्यावी म्हणोन नेट लाविला आहे त्यास हुजूरने आज्ञापत्री आज्ञा वरचेवर व्हावयाची आज्ञा त्यास आल्यादारभ्य आज्ञापत्र आले नाही तरी आज्ञापत्री तरी आज्ञा त्वरेने व्हावी शत्रूचे

किती जमेतीनिसी कोठे आहेत मनोलीचे ठाण्यास उपसर्ग करितील या अर्थे तेथील बंदोबस्ताची आज्ञा असावी आणि दोन्ही पथके पृथक पृथक आहेत किंवा एकच आहेत हे आज्ञा व्हावी म्हणजे सदरहूच्या बंदोबस्ताविसीचा विचार केला जाईल. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

पोा छ १५ माहे जिल्हेज
सुा मयातेन व अलफ.

लेखांक २७८ पौ तारीख ११-५-१८००

श्री गजानन

रु. नं. १
अ. नं. २६३

पौ छ १६ जिलेज सुा
मयातेन अलफ मु॥ पनाला
रविवार

राजश्री निंबाजी बावा हवलदार नाना यासी प्रति रामचंद्र जोशीराव आसीरवाद विनंती उपरी तुम्ही पत्र पोा ते पावले लिा सविस्तर कलले तपशिलवार मजकूर हुजूरचे पत्री लिा आहे त्यावरुन कलेल राजश्री सखाराम घाटगे सर्जाराव बापू याचे मनोदयानुरूप प्रसंग आहे म्हणून लिहिले त्यास बापूकडून आमचे कामास अंतर किमपि नाही बहुत म्हेनत करीत आहेत व राजश्री दौलतराव बाबाचेही लक्ष चांगले आहे पुढे स्नेह राखणे तुम्हाकडे आहे येथे सखाराम बावास दोन लक्ष रुपये देणे प्राप्त आहेत याची पुरवणी तुम्ही केली पाहिजे त्याशिवाय बापूचे मन प्रशस्त होत नाही आणि कामेही लवकर होत नाहीत आम्हाजवल दागिने आहेत ते ठेऊन येथ काम होत नाही सिंदेचे दरबारी रुपये देतो म्हटलेस आवकाश नाही रोख देणे पडते तरी अर्ज करून दोन लक्षाची पुरवणी करावी आणि पुढील बोलणे जे करणे ते केल्या शिवाय परिनाम नाही जाजती प्रांत द्यावे येसे लावले आहे तरी बोलणे कोठवर बोलावे आणि ऐवज ठरल तो कसा द्यावे हे लिहून पाठवावे पुढे ऐवज ठरल तो तिकडूनच पुरवणी करून देणे प्राप्त येथे तालुके घेऊन ऐवज देणार कोणी नाहीत तरी काय ते लिहून पाठवणे चिकोडी तालुक्यात सरकारची ठाणी बसली असतील तरी आमचे गाव जतरट व निपाणी दोन्ही ठाणी घेणे. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

लेखांक २७९ तारीख १८-५-१८००

श्री

रु. नं. १
अ. नं. १४७
राजेश्री धोंडो बलाल गोखले गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री॥ दौलतराव सिंदे दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष करवीरकर याजकडील सलुखाचे बोलणेचे संधान येथे आले त्यावरून त्याजकडील ग्रहस्त बोलण्यास येणार त्यास येथे पोहाचाऊन द्यावे यासविसी राजेश्री रामचंद्रपंत आपा यासी लिहिले आहे बोलणे लागले आहे त्या अर्थी निश्चियात येईतोपर्यंत तोफा गोळी चालू नये बंद असावी याप्रमाणे राजश्री आपा यासी लिहिले आहे ते गोळी बंद करतील तुम्हीही गोळी तोफे बंद करावी! करवीरकराकडील ग्रहस्थ येथे येणार ते आल्यावर निश्चयात येईल त्याप्रमाणे तुम्हास लिहिण्यात येईल र॥ छ २३ जिल्हेज सु॥ मयातेन व आलफ. बहुत काय लिहिणे हे विनंती

मोर्तब सुद्र.

लेखांक २८० — तारीख १२–७–१८००

श्री

पा. द. रु. नं. १

अ. नं. १५४

यादी श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडील राज्य फौजेच्या खर्चामुळे आत्फरीत आले सबब ज्याजती सरंजाम श्रीमंत पंतप्रधान याजकडून लावून घ्यावयाचा सु॥ इहिदे मयातेन ९ अलफ सरंजाम वसुली राज्याचे लगत्यास

२५०००० माहाराजास सरंजाम
 २५००० सौ बाईस सरंजाम
———
२७५०००

स्वामीन ज्याजती खर्चाबदल सरंजामास माहाल लाऊन द्यावे म्हणोन आज्ञा केली त्यास सेवकास आनेक प्रकारचा दौलती प्रकर्णी मसलती पडतात त्यास फौजेविसी सेवक विनंती पत्र लिहील त्याप्रमाणे स्वामी कडून फौजेची रवानगी हरवख्त होत असावी सदरहू पावणे-तीन लक्षाचे कमाल बेरजेचे माहाल नेमून देऊ. येणे प्रो करार.

१ राज्यातील इनामदार व जाहगीरदार व देशमुख व जमीदार व सरंजामी श्रीमंताकडील सख्तीचा उपर दाखऊन सदरहू प्रो आनभवीत होते ते हाली येकदर त्याची तगिरीबाहाली हुजूरन व्हावी येविसी तुम्हाकडे आल्यास फिर्याद मनास आणू नये.

——————————————— कलम १

सदरहू प्रो करार

छ १९ माहे सफर आशाढ इहिदे मयातैन.

लेखांक २८१ तारीख १२-७-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. २६४

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडील बंदोबस्ताची कलमे राजश्री पंतप्रधान याजकडून उलगडून घ्यावयाची बि॥ राजश्री दौलतराव सिंदे आलिजाबाहादर सु॥ इहिदे मयातैन व आलफ

पो॥ चिकोडी व मनोली येथील व फुटगाव व इनामदार व सरंजामीसुधा रामचंद्र परशराम यासी पत्र द्यावे सदर्हु अन्वये माहाल व फुटगाव दरोबस्त याचे याजकडे लाऊन द्यावे कलम १

चिकोडी व मनोली व फुटगाव पूर्वी स्वामीकडे चालत होते त्या प्रमाणे चालतील येणेप्रमाणे करार

पेशजी पासून कागदीपत्री शिलशिला उभयपक्षी चालत असावा संस्थानचे कल्याण दिवसेदिवस वृद्धी होत असावी कलम १

पूर्वीपासून कागदीपत्री सिलसिला चालत आला आहे त्याजप्रो॥ चालेल स्वामीच्या राज्याचे कल्याण ते सेवकाकडून घडेल या-प्रमाणे करार.

इंग्रजाचे रुपये मुद्दल वाजवी हिशेबी रुजवात मुंबईच्या रुज-वातीने फडशा करून हाप्तबंदी प्रो॥ उलगडून देऊ यासी इंग्र-जाचे बोलणे जरबेचे पडल्यास सदरहू प्रो॥ आपण तोड काडावी. १

परशरामपंत याचा देण्याचा तंटा एकंदर न लागावा. १

सदरहू प्रो॥ करार.

तिकडून वकीलीस येतील व पुण्यात राहातील त्याची योग्य-ता पाहून खर्च चालवाव. कलम १

सुधामत पेशजी चालत आल्याप्रमाणे सिरस्ता पाहून चालविले जाईल..

येणे प्रो॥ करार.

परभारे फिर्याद कोणी इकडे आल्यास जिकडील तिकडे पाठवून द्यावे. कलम १

स्वामीकडील कोणी फिर्याद आलेस स्वामीकडे पाठवू सेवका-कडील कोणी स्वामीकडे आल्यास सेवकाकड पाठवावयाची आज्ञा असावी. येणेप्रो॥ करार.

इकडील कामे पडल्यास तिकडून पुस्तपनाः व्हावा. तिकडील कामे पडल्यास उभयता परस्परे साहित्य व्हावे. कलम १

सदरहु प्रमाणे करार.

इंग्रजाचा ऐवज स्वामीकडे येणे
त्याच्या फडशाचा ठराव
स्वामीकडून दोन महिनेच्या
मुदतीत क्षेप निक्षेप व्हावा
तोपावतो स्वामीकडील जाब-
सालास मातबर आले आहेत
त्यानी येथे असावे इंग्रजाकडील
जाबसालाच्या ठरावाविसी
सेवकाकडून अंतर होणार नाही.
येणे प्रा करार.

छ. १९ माहे सफर आषाढ इहिदे
मयातैन व अलर्फ.

लेखांक २८२ तारीख १२-९-१८००

हु.

रु. नं. ४
अ. नं. १५९
हुजूरून अजम कर्णल वसली बहादूर यासी पत्र
मनोलीचे ठाणे बाबे

बाआदज आके आजी आशाहामतपनाहाकडे पेदरचे खते जबाबसवाल फिरिस्ताद केले ते रसीद होऊन बयावार मजमून माआल्म जाहला असेल लेकीन अजम शंकरराव सिंदे सेनाखासकील याजकडे बादराह सेवकलोकानी मनोलीचे ठाणे बहुलीचे ठाणे व मुरगूड व सिरसिंगी ही ठाणी घेतली आहेत त्यास बादराअ शेंवकलोकास नशिहत करून तमाम ठाणी सेनाखासकील याचे ताबिन करणेबाबे कलमी केले असता तमाम ठाणी सेनाखासकील याचे ताबिन जहाली नाहीत म्हणोन हजूरात जाहीर जाहाले त्यास येकबालपनाह कोपणीची व माहाराजाची कदीम दोस्ती बिरादरीची असता अजी कलमी केले असता ऐसे न व्हावे त्यास देखत रसीद होताच तमाम ठाणी बादराह सेवकलोक यासी ताकीद सख्त करून सेनाखासकील याचे ताबिन तमाम ठाणी करावी येबाबे पैदरपै कलमी करणे काये आहे छ २२ माहे रार हुजूरची जासूद जोडी रवाना तोरगलास सु॥ इहिदे मयातैन व आलफ.

लेखांक २८३ तारीख २५-१०-१८००

श्री

रु. नं. १

अ. नं. २३६

श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे

शेवेसी

बिनंती सेवक बालोजी कुंजर कृतानेक विज्ञापना ता। छ ६ जमादिलाकर पावेतो स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील मजकूर श्रीमंत राजश्री पंतप्रधान यानी राजश्री चिटको रघुनाथ व मानसिंगराव जाधव यास समक्ष सांगून रवाना केले आहेत हे विनंती करतील त्याअन्वये स्वामीकडून मातबर सरदार याचे समागमे फौजेची रवानगीची आज्ञा होऊन राजश्री त्रिंबकराव महिपत याजकडे सामलात जाहाली पाहिजे आणि राजश्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बहादर यास पुणीयास यावयाची आज्ञा जाली पाहिजे भेटीनंतर उभयपक्षी चांगले तेच श्रीहरीकृपेने सेवकाचे हातून घडोन येईल ते खरे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २८४ तारीख १५-११-१८००

श्री नाथ प्र॥

रु. नं. १

अ. नं. ११९

राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर गौसावी यास अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य रो दौलतराव शिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लिहिणे विशेष राजश्री नारायणराव घोरपडे सेनापति याची सरदेशमुखी ता। अजरे येथे व का। इचलकरंजी येथें शेरी सुधामतपासून चालत आली असता आलीकडे राजश्री नारायणराव व्यंकटेश दिकत करितात सुरलीत वसूल देत नाहीत म्हणोन विदित जाले त्याजवरून हे पत्र तुम्हास लिा असे तरी तुम्ही त्याजकडे स्वार पाठऊन हक रूसुमाचे बाकीचा व शेरीचा येवज राहिला आसेल त्याचा फडशा करून देऊन पुढे सरदेशमुखी व शेरी चालत आल्या प्रो चालवित असे करणे ता। छ २७ जाखर सु॥ इहिदे मयातैन आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

श्री
जोती स्वरूप चरणी
तप्तर माहदजी सुत दव-
लतराव शिंदे नितर

शिका
लेखन
सिमा

लेखांक २८५

इ. स. १८००

श्री

रु. नं. १

अ. नं. १२२

तालीक

राजश्री व्यंकटराव कृष्ण यासी आज्ञा केली येसीजे सुा मयातैन व आलफ तुम्हास वरचेवरी आज्ञा होणे ते आज्ञापत्री होऊन आज्ञापत्रे रवाना जाहालीच आहेत तदनुरूप साध्येत मजकूर अजम जोसुव इटाफ फौजानी विलायेत यासी समजाऊन देऊन तुम्ही व राजश्री मोरो महादेव उभयता मिलोन त्याची खातीरदास्त करून देऊन कोन्हे गोष्टीविसी किमपि चितात आंदेशा न धरिता पलटणाची कुमक जलदीने हुजूर येऊन पोहोचे तो आर्थ निकडीने करता येविसी हुजूरून त्यासी थैल्यासमवेत पत्रे पाटविली आहेत ती प्रविष्ट करून कुमक जलदीने येऊन पोहचे ते करणे निकडीचा समये ध्यानात आणोन दिरंग न करिता पलटणे घेऊन जालदीने येऊन पोहचणे वरकडन आज्ञा करणे ते राजश्री नागोजीराव घाटगे झुंझारराव यासी केली आहे आज्ञेप्रमाणे तुम्हासी लिहितील त्यावरून कलेल.

लेखांक २८६

तारीख १२-३-१८०१

श्री

रु. नं. १

अ. नं. १५८

चिरंजीव राजमान्य राजेश्री तुळजोजी[1] घाटगे सरज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे आपण अ जी आठरा घटका नंतर दरशनास येणार त्याप्रमाणे सत्वर यावयाचे करावे पदमालचे बागेत याव नंतर आठरा घटकेचे मुहुर्तान दर्शन घ्यावे जाणिजे सुरू सन इहिदे मयातेन व आलफ रा छ २६ शोवल बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

दामोदर पर्वतराव कारभारी

मु. पाहणार

बाळाजी पांडुरंग कारकून

संस्थान कागल.

---

१ तुळजोजी ऊर्फ सखाराम घाटगे सर्जेराव.

तारीख २७-३-१८०१

लेखांक २८७

श्री

रु. नं. १

अ. नं. १५९

चिरंजीव राजमान्य राजेश्री यशवंतराव घाटगे सर्ज्यांराव यासी आज्ञा केली ऐसीजे रामचंद्र परशराम पटवर्द्धन यानी सिंदे याची पलटणी आणून करविरास शह दिला त्याप्रसंगी चिरंजीव राजश्री सखाराम घाटगे सरज्याराव यानी जीवदारभ्य श्रम करून कागल तालुका मागितलेवरून त्याजकडे देणे अवश्य ज्ञाणोन तुम्हाकडे होते ते ठाणे व गाव व खासगतील असलेले गाव देणेचे ठरले आणि त्यात व तुम्हात वडिल-धाकटेपणाविसी विवाद आहे त्याचे चौघामते ठराव होईपर्यंत मशारनिलेकडून आज्ञा होईल ते वेळेस हुजूर स्वाधीन करू म्हणोन विनंती पत्र स्वदस्तुरचे घेतलेले तुम्हाकडे देऊन तुम्हाकडील गावचे मोबदला दुसरे गाव तुम्हास देऊन तुम्हाकडील ठाणे व खालसा असलेले गाव त्याजकडे देऊन थोडे दिवसात पंचामते ठराव जाहला म्हणजे त्याची समजूत दुसरेप्रकारे करून तुम्हाकडील ठाणे व गाव पूर्ववत प्रमाणे तुम्हाकडे देविले जातील जाणिजे सुा इहिदे मयातेन व अलफ रवाना छ ११ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे मोर्तब असे सदरेकडील यादी दे. जा. नं. ४३५ ता. १२ दिजंबर १८५५ ची आलेत मेरबान नारायणराव शिंदे घाटगे सरजेराव यानी कापसी मुा आलेवत्ती दंगल प्रकर्णातील कागदाच्या नकला तीन दिल्या त्या पाठविल्या आहेत त्याविसी कसे ते लवकर समजावे व यात चि. रा. यास नंबर ५७ तारीख १५ मितीचे लिहून गेलेचे उत्तर

नंबर ७२ उत्तरी विज्ञापना

आलेले नकला पैकी तुळजोजी उर्फ सखाराम घाटगे सरजेराव याचे विनंती पत्र असल असलेले त्याची नक्कल १ ब्रह्म व सन इहिदे मयातेन व अलफ सालचे आज्ञापत्राची नक्कल असलेची नक्कल अशा दोन नकला पूर्वी आदलचे हकीकती प्रकर्णी रिपोर्ट जाले समागमे गेल्या असोन तीवरी इसने मयातेन व अलफ सालचे आज्ञापत्राचे नकलेबद्दल दप्तरी तपास करिता जुनी नकल मिळाली परंतु असल आज्ञापत्रे अथवा बारनिसीवर खरी वाडा दगद्ध ज्ञाहाले कारणाने नसलेमुळे नकलेवरून मजबुदीचे करण्यास थोडी मनातरी आलेल्या नकला तीन बराबर आहे ता १९ मिाा रिपोर्ट डे. अ. नं. २९८ ता. २० मिाा चा गेला असे.

लेखांक २८८ तारीख ४-४-१८०१

श्री

रु. नं. १

अ. नं. १६० पैकी

चिरंजीव राजमान्य राजेश्री सखाराम घाटगे सरज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्ही करवीरचे मुकामी स्वामीसंनिद्ध विनंती केली कीं प्रांत कागल देहाय सुधा आम्हाकडे पुरातनपासोन इनाम चालत असता हली दंग्यामुळे कांही देहाय चालत नाहीत याजकरिता नूतन सनद भोगवटियासी देऊन चालविले पाहिजे म्हणोन विदीत केले त्याज वरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे राज्याचे उपयोगी राजश्री रामचंद्र परशराम यानी राजश्री पंत प्रधान व शिंदे याजकडून आपली फौज आणून राज्य-आप्तरीस आणिले करवीरास शह देऊन राज्याची उत्सेद करावा हा लक्ष धरून राज्याचा नाश केला त्यासमयी तुम्ही राज्यउपयोगी स्वामीसेवा खातरजमायुक्त करून दाखविले त्याजवरून स्वामी तुम्हावर कृपाळू होऊन पुरातन तुमच्या वडिलार्जीत पादशाही सनदा आहेत त्या बरहुकूम साडेएकुणहत्तर देहाय सुद्धा दरोबस्त इनाम कुलबाब कुलकानु हल्ली पटी व पेस्तर पटी जळतरुपाषाणनिधीनिक्षेपसहीत खेरीज हकदार व इनामदार करून दिले असत गाव बी तपसील

किता गाव		किता गाव
१३ का॥ कागल		१२ का॥ वाळवे
१ का॥ मजकूर		१ का॥ मजकूर
१ मौजे करणूर		१ मौजे वाळवे खुर्द
१ मौजे वंदूर		१ मौजे बेलवळे खुर्द
१ मौजे पिपळगांव		१ मौजे साक
१ मौजे व्हणूर		१ मौजे केंबळीं
१ मौजे सिद्नेर्ली		१ मौजे चंद्र
१ मौजे शंकरवाडी		१ मौजे निगवे
१ मौजे बामणी		१ मौजे उंदीरवाडी
१ मौजे यकोंडी		१ मौजे बोरवडे
१ मौजे खेबडे		१ मौजे बिद्री
१ मौजे व्हनाळी		१ मौजे सोनाळी
१ मौजे बामणी		१ मौजे बेलवडे बुा
१ मौजे शेंडूर		१२
१३		

२४ का॥ मुरगुड

१क ॥ मजकूर
१ मौजे पिपळगांव बु॥
१ मौजे चिमगांव
१ मौजे यमगे
१ मौजे निडोरी
१ मौजे कुरणी
१ मौजे भडगांव
१ मौजे मळगे बु॥
१ मळगे खुर्द
१ मौजे सावडे बु॥
१ मौजे चंवडाळ
१ मोजे कुरुकली
१ मौजे सुरुपली
१ मौजे सावर्डे खुर्द
१४

७॥ कसबे मांजरी

१ कसबा मजकूर
१ मौजे आंखली
१ मौजे सिख्दाड
१ मौजे रुई
१ मौजे माणगांव
१ मौजे साजणी
१ माज चोकाक
॥ मौजे निमसिरगांव
७॥

२ ———————

१ मौजे अवसिग
१ मौजे सुरुकली
२

३६॥

१२ का॥ चिखली

१ कसबा मजकूर
१ मौजे यमगरणी
१ मौजे नांगनूर
१ मौजे कोलगे
१ मौजे बस्तवाड
१ मौजे आणूर
१ मौजे भिवसी
१ मौजे बालिंगे
१ मौजे म्हाकवे
१ मौजे सोनगे
१ मौजे केनवडे
१ मौजे गोरंबे
१२

९ कसबे डिग्रज

१ का॥ मजकूर
१ मौजे डिग्रज खुर्द
१ मौजे डिग
१ मौजे बुडली
१ मौजे मळणगांव
१ मौजे गौडगांव
१ मौजे आलसंद
१ मौजे बारगांव
१ मौजे डोंगरसानीं
९

३३ बेरीज
३६॥
६९॥

येकूण देह साडेयेकूणहतर इनाम करार करून दिले असे तर तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चिरकाल पुरातन भोगवटेप्रमाणे अनभवून राज्यासी एकनिष्टपणे असोन सुखरुप राहाणे जाणिजे सुर सन इहिदे मयातेन व अलफ रा। छ १९ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे मोर्तबा असे.

लेखांक २८९

तारीख २६–५–१८०१

श्री

रु. नं. १
अ. नं. १४८ पैकी

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बाहादर कृतानेक विज्ञापना ता छ १२ मोहरम पावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्तित अस किले भुदरगड राजेश्री यशवंतराव घाटगे सर्जेराव यासी हुजूरून दिला त्यास ठाणे कागल व गाव पूर्ववत प्रमाणे सर्जेराव याचे स्वाधीन हुजूरन जाहालेनंतर स्वामीचा किल्ला स्वामीचे स्वाधीन सर्ज्याराव करतील ते न जाहाले पेक्षा स्वामीचा किल्ला आम्ही सर्जेराव याजकडून दरम्यान जाहालो आहो किले स्वाधीन करून देऊ शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना सुा इहिदे मयातैन व आलफ मुकाम करवीर.

लेखांक २९०

तारीख १६–६–१८०१

तालीक खत फिरंग

रु. नं. ४
अ. नं. १७४

शिवाजी राजे छत्रपति दवलत व कामयाब बाषंद

बिषीयार राजे वालाशान बजानिबा फ्रडरिक आंतोनदावियेगकाब्राल
क्रिस्त बनाम सातकारीय

साहेबाचे खलावतगार व तैनेत जनराल फौजानी पोर्तूगाल गोवर्णदारे व कपिता व जनराल बाईदीय पोर्तुगेष व दर मकानीहाय महवल मुलाकात मशहद आंकी ब तारीख २० माहे मायुगुजस्तास ७ मोहरमचा महबतनामा रसीद होऊन दोघे कुमार पैदा जाहालेची नेकबादर जाहीरीत येऊन न्याहायत खुषी हसील जाली आ वालाशान पनाही बिसियार बिसियार दुबारकी अमलात आणिली पाहिजे शर्करा पाटविली दस्तुर मवाफीक घेतली दरिविला जोताजीराव घाटगे सर्जेराव सदरहू खेरीज हरयेक काजकाम मनास आणायाचे असलेवर व करणेस होत नसे सबब त्यास येऊस होत नाही

करिता दस्तक सादर करविला मालुम होय खुदायताला आवालशान
पन्हास आपले निवीस्तन दरजागा राजवाडा पनजह तारीख १६ माहे जून
सन १८०१

फ्रडरिक आंतोनदावीयेगकाब्राल

लेखांक २९१

तारीख २८--६--१८०१

श्री.

रु. नं. १

अ. नं. १६२

चिरंजीव राजमान्ये राजेश्री येशवंतराव घाटगे सरज्याराव यासी आज्ञा केली ऐसीजे कागल ता। देसमुखीसुद्धा वडिलकीकडे पेशजीपासोन तुम्हाकडे वहिवाट चालत होती त्यास अलीकडे राजश्री सखाराम घाटगे सर्ज्याराव यानी सिंदे याजकडे कारभारास होते त्या जबरीनें ता। ठाणे कागलसुद्धा तुम्हाकडून दूर करून हुजूरने घेतला त्याजविसी तुम्ही स्वामीचे शेवेसी विनंती केली कीं वडिलकी जिकडे तिकडे कागल व देसमुखीचे वतन व नाडगोंडी सुद्धा चालावे वरचील भाऊबंद याची वसूलीची पुरातन गावे चालत आले त्याचप्रमाणे अनभऊन राहावे जांस्ती जबरीने करून घेतली ती आपली आपणाकडे चालावी असी अर्जी केली त्याजवरून सनद सादर जाली आहे तरी पुरातन वहिवाटी प्रमाणे तुमचे तुम्ही आनभऊन सुखरूप राहाणे सखाराम घाटगे सरजेराव यानी सनदा वगैर जबरी दाखऊन घेतल्या असतील त्या रद असेत जाणिजे सु॥ इसने मयातेन व अलफ

रा छ १६ माहे सफर बहुत अस लिहिणे मोर्तब्रा असे.

लेखांक २९२

इ. स. १८०१

श्री

रु. नं. १

अ. नं. १६५

यादी नि॥ सखाराम घाटगे सरज्याराव याजकडून ऐवज मुब्रदल्यास व जव्हायर व कापड व मशारनिलेकडे पागा व सिलेदारी पथक व दागिने सोन्या रुपयाचे व पागेची घोडी व हत्ती व उंट वगैरे खरेदी सुदा दरोबस्त फडशा ब॥ इ॥ सन सब्रा तिसेन अवल साल ता। सन इहिदे मयातेन माहे सफर अखेर आषाढमास पर्यंत एकंदर देण्याचा मोघम ठराव १४००००० रुपये एकूण चौदा लक्ष रुपये एकंदर द्यावयाचे ठरले त्याची हप्तेबंदी साल दरसाल द्यावयाची यादी आलाहिदा ठराऊन ऐवज नेमून देविला जाईल येणे प्रमाणे करार.

दामोदर पर्वतराव कारभारी

मु० पाहणार

आणाजी बाजी कारकून

संा कागल.

तेरीख छ ११ जमादिलावल अश्विनमास

लेखांक २९३ इ. स. १८०१

श्री

रु. नं. १

अ. नं. १६४

यादी सखाराम घाटगे सरज्याराव याजकडील ऐवज मुबादला व जवाहीर व कापड व रुप्याचे डागिने व पागा व पथक वगैरे लागवडसुद्धा माहगला ठराव याची यादी अलाहिदा मखलसी करार सुधा करून दिल्ही आहे

रुपये

१४०००००

यासी हप्तेबंदी

३००००० सन इहिदे मयातेन साल मजकूर

१५०००० १५००००

२००००० सन इसने मयातेन

२००००० सन सलास मयातेन

२००००० सन आर्बा मयातेन

२००००० सन खमस मयातेन

३००००० सन सीत मयातेन

———

१४०००००

सदरहू चवदा लक्ष रुपये हप्तेबंदी प्रमाणे ऐवज लाऊन देविला जाईल येणे प्रमाणे करार.

दामोदर पर्वतराव कारभारी

मु. पाहणार

आणाजी बाजी कार-

कून संस्थान कागल.

लेखांक २९४ तारीख ३-२-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. २६८

यादी हुजूरची फौज वि॥ राजश्री हैबतराव गाईकवाड विश्वासराव राजश्री बापोजी गणेश गोखल याजकडे आले त्यास एकमाही आकारणी सुा इसन मयातेन व अलफ चांदवडी रुपये माहे रमजान छ २७ रोज सौम्यवार मु॥ कटकोळ रुपये २४२९३ हुजूरात मानकरी व असामीदार व पतके वगैर अ॥ येकंदर

येकूण बेरीज

५७३

१२४८०	पागा साहा ये॥ अ॥ ३१२
९७३७	हुजूर नि॥ हुजूरे व भालदार व जासूद व फरास व खासबारदार व हाशम व आठरा कारखाने वगैरे ८३८
३५०	हुजूर नि॥ व पागे नि॥ कारकून १४
१४०	हती माहात व गडकरी व कब्राडे खर्च सुधा
३०००	मुदबाक खर्च
५००००	

येकूण स्वार पागासुधा आठशे पंच्याऐसी व पायदळ आटशे आडतीस व कारकून आसामी १४ हत्ती नग येक मुदबक खर्चसुधा येकमाहा खर्चास रुपये पनास हजार द्यावयाचे ते चांदवड हुकेरी पीरखानी शापुरी पावतील यास बैलावर जिनस येतील ते बाजार निरखाने घ्यावे तेरीख छ २९ रमजान सन मजकूर.

लेखांक २९५ तारीख १५-३-१८०२

श्री

नकल

रु. नं. १

अ. नं. २६७

आज्ञापत्र राजमंडळ त॥ मोकादमानी देहय गावगना प्रांत हुकरी सुा इसन मयातैन व अलफ राजश्री विरुपाक्ष शामराव व नागो शामराव मु॥ देसाई चिकोडीकर याचे वतणी गाव मौजे नेरलीस राजश्री सिदोजीराव निंबालकर याणी कोगनाली करिता बेढा घालून दोन आडीच महिने लढाई जाहली तेव्हा राजश्री अबाजी अनंत यास सल्यान उतरून बाहिर अणून त्यास पुन्हा उजनीस धरून नेऊन निंबालकर याणी येकंदर वतन जप्ती केल होत त्यास मशारनिलेनी सरकार काम काजे बहुत केली आहेत

अणखी पुढे उपयोगी सत्रत्र त्याच वतनाचे मोकलिकीविसी निंबाळकर यासी सांगण जाहल आहे हुजूरून मोकलीक चिट्या व्हाव्या म्हणोन पुण्याहून पत्र आली त्याप्रमाण सदर मशारनिले याचे वतनाची मोकलीक केली बी तपशील

२ कसबा रायबाग पो गाव
 १ मौजे शिरगांव
 १ मजरे हुंबरवाडी
 ——
 २
१ मौजे किणे तर्फ आजर
६ नाईकीयाची वतन
 १ मौजे बोरगांव
 १ कसबे सदलगा
 १ मौजे नहिगाज
 १ मौजे कलोळ
 १ मौजे बोकीर
 १ मौजे गलतग
 ——
 ६

७ पो हुकीरी पैकी गाव
 १ मौजे नेरली
 १ मौजे आमनगी
 १ मौजे अवरगोळ
 १ मौजे निडसोसी
 १ मौजे बोंब्रवाड
 १ मौजे येडरवेडी
 १ मौजे गीरगाव
 ——
 ७
१ सिवाय यकदरचा वरातीच कमताची मिसल मोकलीकीची आलाहीदा आहे.

येणे प्रमाण हुजूरून मोकलीक केली अस तरी पेशजी पासून चालत आल्याप्रमाणे विरुपाक्ष शामजी व नागो शामजी याचे रजतलबेत वर्तनूक करीत जाणे फिरोन नवीन पत्राचा आक्षेप न करणे जाणिज ताा छ १० माहे जिल्काद मोहर.

लेखांक २९६ तारीख १५–५–१८०२

श्री

रु. नं. १
अ. नं.१२७

राजेश्री नागोजीराव घाटगे झुंजारराव गोसावी यास सकल गुणालंकरण अखंडित लक्षुमी आलंकृत राजमान्य श्नो देवजी नाईक दुभाषा दिमत सरकार कुंपणी इंग्रज बाहादर मुकाम गोवे राम राम विनंती येथील कुशल दुंदुभी संवत्सर वैशाख शुध्द १३ दसी जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष श्रीमन्महाराज छत्रपति स्वामी यासी विनंती करून पत्र आम्हास पाठविले पावोन संतोष जाहाला अजम मस्त्र दिलोन यानी तुम्हास लिहिणे करिता आम्हास आज्ञा केली की पेशजी माहाराजाचे तालुकेतील साहुकरी फत्तेमारी धरोन आणली ती साहेब्र सीर कार्णेल यानी माघारे देवविली ती बंदरास पोहोचलीच असेल याखेरीज वोडी धरोन आणल ते तुमचे रयत लोक साहुकर याचे ऐसे लिहिलेवरून आली सोडून दिली व पेस्तर न धरणे बाा ताकीद तमाम केली

असे व साहेब सीर कार्नेल सुरतेस ल्हाईस स्वार आहेत तेथही ब हकीकत लिहिला असे जबाब अलेवर कळवू दरघडी आपणाकडील पत्रद्वारे परामृश करावा बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती. पौ छ २० माहे मोहरम सु॥ इसने मयातेन व आलफ.

लेखांक २९७ तारीख २०-५-१८०२

श्री

रु. नं. १
अ. नं. १७२

राजश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर

मुकाम करवीर दाजी गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने॥ दादाजी पठण वकील नि॥ सरकार कुंपणी बहादर इंग्रज मुकाम जंजिरा मुंबई कृतानेक रामराम विनंती येथील क्षेम जाणोन तागायत वैशाख वद्य ३ पावेतो ज़ंजिरा येथे आम्हाकडील वर्तमान सुरक्षित असे यानंतर आपली लेकनाकरन जाणोन आपणास पत्र लिहावे याचे कारण कीं निपाणीचे प्रकरणीविसी येथून सरकारातून श्रीमंत छत्रपति माहाराजास अज इंग्रज सामील होऊन निपाणीचे संस्थान अजी ठेऊ नये याप्रमाणे इत्यार्थ जाहला आहे किती वक्ता माहाराजाचे राज्य ताराज केले आण पुन्हःही बेचिराख करणार म्हणोन येथे सरकारात जाहीर जाहाले त्यांजवरून कुंपणी बहादर याची गैरमर्जी फार जाहाली आणि तेथून सरकारातून मसुदा श्रीमंत छत्रपति माहाराज स्वामीकडेस पाठविला आहे त्याप्रमाणे हुजूरून पत्र येथे कंपणी बाहादर यास यावे म्हणजे येथून घडीचा विलंभ न होता जो बंदोबस्त व्हावयाचा तो होईल याजविसी आपणास पत्र देऊन राजश्री हिरोजी नाईक सुभेदार यासी रवाना केले आहेत यासी येथून सरकारातून जे निरोपायाचे ते मुखता निरोपिले आहे त्याप्रमाणे हुजूरून पत्र घेऊन मशारनिले सुभेदार याची बरदास्त करवून सत्वर रवाना करावे संस्थान राखावयाचे असल्यास जरूरीने पत्र पावताच हुजूरचे पत्र देऊन पाठवावे नाहीतर ही घडी पुन्हा येणार नाही ऐसीयास राजश्री निपाणकर याजकडून सध्या संस्थानांत उपसर्ग न होई असा आपलेकडून बंदोबस्त होत असल्यास करावा याजविषीचे बोलणे मशारनिलेस बातमी आणि निपाणीसी पत्र पाठविले आहे कळावे बहुत काय लिहिणे. लोभ करावे ही विनंती. पौ छ २७ माहे सफर सुा सलास मयातेन व आलफ दरजागा करवीर जेष्टमास (ता. २८-६-१८०२)

लेखांक २९८ तारीख ३०-५-१८०२

श्री शंभु प्रा

रु. नं. १

अ. नं. १६१

यादी वाडीकर सांवत याचे बोलण्याचे कल्मबंदीवर मखलासी करावयाची सु॥ इसने मयातैन व आलफ छ २७ मोहरम उर्फ वैशाखमास शके १२८ दुंदुभिनाम संवत्सरे

१ कैलासवासी ती॥ शाहार्जी माहाराज याचे पुत्र शिवाजी माहाराज शेकर्त याची आम्हापासी सनद आहे व सनदे ब॥ भोगवटाही चालत आला आहे म्हणोन तुम्ही विनंती केली त्यास सनदेची चौकसी करून व सनदेपासोन भोगवटा पाहून सनद खरी जाहाल्यास त्याप्रमाणे चालवणेची आज्ञा केली जाईल चौकशीअंती सनद खरी न जाहाल्यास व सनदे प्रमाणे भोगवट्याचा दाखला न पुरल्यास हुजूरून आज्ञा होईल त्या प्रमाणे तुम्ही वर्तणूक करावी..............................कलम १

लेखांक २९९ तारीख २५-८-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. १६९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १२९

दुंदुभिनाम संवत्सर श्रावण बहुल व्दादसी भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसाजे मुरारराव घोरपडे हिंदूराव हे हैदरअल्लीखान याचेशी कजेत येऊन त्याचा काळ जाहला त्याचे स्त्रीस राजेश्री दौलतराव घोरपड यानी गजेंद्रगडास आणून आपला नातू सुब्राव घोरपडे याचे दत्तविधान करून त्याचे ओठत घातला त्याअन्वये मुलास हुजूर आणोन हिंदूराव हा किताबता देऊन त्यास तालुका व चौथाईचा अम्मल करार करून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले असे तर त्यास मुरारराव याचे पुत्र जाणोन त्याचा तालुका व चौथाईचा अमल पुरातन प्रमाणे याचा याजकडे चालवावे जाणिजे बहुत काय लिहिणे तरी सुज्ञ असा मार्तंब असे.

बार

बार

बार

टीप—असेंच आज्ञापत्र दौलतराव शिंदे यांना देखील पाठविलें आहे.

लेखांक ३०० तारीख २९-९-१८०२

श्रीराम

रु. नं. १

अ. नं. २६५

पौ छ ९ माहे जोर उर्फ अश्विन शुध ११ सन सलास मयातेन व अलफ

राजेश्री प्रीतराव चव्हाण उमदेउलउमराव बहादर गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ यशवंतराव पाटणकर रामराम विनंती उपरी येथील कुशल ताा छ १ जाकर वर्तमान येथास्तित असे विशेष ठाणे शिरोल घेऊन अमलावर फरु निकम यास ठेविले आहे म्हणोन कल्ले त्यास कासेगांव येथे ठाणेहूण हरयेकविसी उपसर्ग होऊ नये आणि वसूल सुरलीत चालाव येविसी निकम मजकूर अगर आणखी कोण ठाणेत नेमिले असतील त्यास पत्र पाठवावे जे कासेगाव येथील वसूल पाटणकर घेतील तुम्हाकडून उपसर्ग येकंदर न करणे हरयेकविसी खटल्यास ठाणेतून पुस्तपणा करणे याअन्वये पत्रे द्यावी बहुत काय लिहिणे ह विनंती.

लेखांक ३०१ तारीख १३-१०-१८०२

श्री नाथ प्र॥

रु. नं. १

नक्कल अ. नं. १७०

राजेश्री सखाराम घाटगे सरज्याराव गोसावी

यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्ने॥ दौलतराव सिंदे रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाव विशेष तुमचे विद्यमान करवीरकर श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति याजकडून फौजेचे खर्चाबद्दल घेणे ठरले चांदवड शिक्का ७०००००

सदरहू सात लक्ष रुपये ठरले त्याचा हवाला तुम्ही घेतला तो ऐवज तुम्हाकडून भरणा जाला चांदवड शिक्का

२५०००० मिती अश्विन शुा १ शके १७२२ सन इहिदे मयातेन व आलफ (ता. १९-९-१८००)

२००००० मिती अश्विन शु॥ १ शके १७२३ सन इसने मयातेन व आलफ (ता. ८-१०-१८०१)

२५०००० मिती अश्विन शुद्ध १ शके १७२४ सन सलास मयातेन व आलफ (ता. २७-९-१८०२)

———

७०००००

एकूण सात लक्ष रुपये चांद्वड शिक्का तुम्हाकडून पावले ते खासगीकडे जमा असे रवाना छ १५ जमादिलाखर सुा सलास मयातेन व आलफ बहुत काय लिहिणे ही विनंती.

लेखांक ३०२ तारीख २३-१०-१८०२

श्रीराम

रु. नं. १

अ. नं. २६६

पौ छ २५ जमादिलाखर सन सलास मयातेन व अलफ मु॥ हुपरी

राजश्री प्रीतराव चव्हाण उमदेउलउमराव बहादर बापू गो

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो यशवंतराव पाटणकर रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असाव विशेष आपण पत्र पाटविल ते पावले लिहिला अभिप्राय कल्ला ठाणे सिरोलचा मजकूर लिहिला असी-यास येथील बोलण जे सिंदे यास पांच लक्षाचा सरंजाम द्यावयाचा करार होता त्यापैकी सिरोल राजश्री सर्जराव यानी घेतले होत तें त्याजकड तसेंच होते वरकड सरंजाम बाकीचा देणे होता त्यापैकी विजापूर प्रांती दोन ठाणी दिली होती तीही सरकारात माघारी घेतली त्या अर्थी ठाणे सिरोल ही त्यास द्यावयाचे नाही येविषीचा शेव्हाद तिकडील कांही यावयाचा नाही असे म्हणतात आणि ठाणे मागत आहेत याप्रो सध्या येथील मर्जी आहे हुजूरच्या कामाकाजाचा मजकूर लिहिला त्यास हुजूरचे बोलणे राजश्री पंतप्रधान याचे समक्ष होऊन सर्व अर्थ दर्शविला त्याजवरून तिकडील उत्तर केले ते समक्ष राजश्री मानसिंगराव जाधव याणी श्रवण केले आहे त्याप्रो ते विनंती करतील त्यावरून सर्व ध्यानास येईल इकडून निचरस[1] जाहला त्याप्रो तिकडूनहिं सिधांत होऊन त्याअन्वय याव कोणता आंदेशा घेऊ नये फौजेविसी पत्रे आलाहिदा दिल्ही आहेत त्याप्रो फौज घेऊन आपण यावयाचे करावे राजश्री बालोजी बावा कुंजीर यासी बोलणे होवयाचे ते निकास तेच जाहाले आहे त्यानीही आपणास लि॥ आहे जे बोलणे ते समक्ष श्रीमंतानी राजश्री बापूसी समक्ष बोलले हे ध्यानी आणोन करावे वेल हीच आहे सर्व साधन होईल बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ३०३ तारीख २-११-१८०२

श्री म्हाळसाकांत

रु. नं १

अ. नं. १७३

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

---

१ निचरा या अर्थी

विनंती सेवक यशवंतराव होल्कर कृतानेक विज्ञापना येथील क्षेम ता। कार्तिक शुध्द ७ पर्यंत यथास्तित असे विशेष सातारियाहून श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामीकडून र।। लक्ष्मण हरि आले यानी आज्ञेचे भाव सांगितले त्यावरून राजेश्री फत्ते-सिंगराव माने याजकडील पथक तोफासह रवाना केल्या आहे माहाराजाचीही तेथील सरंजाम सातारियास जावयाविसी आज्ञा होऊन येक विचारे कार्य घडे तो अर्थ केला पाहिजे इकडील लक्ष सेवा करून दाखवावी हेच आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ती.
मौ छ २ माहे साबान सन सलास
मयातेन व आलफ.

लेखांक ३०४ तारीख ४-११-१८०२

श्री

रु. नं. १
अ. नं. २७१

समस्त सेनाधुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजश्री राणोजीराव घोरपडे यासी आज्ञा केली ऐसीजे तुम्हाकडील जमाव व तोफा पाठऊन राजश्री यशवंतराव सिंदे ठाणे सेंडुर याचे विचारे मतीवडे व बहीरापूर व आजरे तनखे निा ठाणी घालवणेची आज्ञा जाहाली असे तरी आज्ञे प्रो जमाव व तोफा पाठवून ठाणी घालवणे. जाणिजे सु।। सलास मयातेन व आलफ र।। छ ७ माहे रजब्र बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३०५ तारीख ६-११-१८०२

श्री

रु. नं. १
अ. नं. २७२

समस्त सेनाधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री राणोजीराव घोरपडे यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला आज्ञे प्रमाणे राजश्री वाकोजी पिसाल याजबराबर जमा देऊन ठाणे सेंडुरास राजश्री येशवंतराव सिंदे याकडे पाठविले आहेत मौजे सिपूरचे ठाणे घातले पुढेही आज्ञेप्रमाणे सेवा करितो ऐसे विनंती पत्री लि।।वरून निवेदन जाहाले अशास आणखी जमाव स्वार व पावलोक ठेऊन आजरे प्रांत वगैरे तालुकेत स्वाऱ्या करीत जाणे. जाणिजे सु।। सलास मयातैन व आलफ र।। छ ९ रजेब्र बहुत लिहिणे तर सुज्ञ असा.

लेखांक ३०६ तारीख १९-११-१८०२

श्री

रु. नं. ४

अ. नं. १८६

चिरंजीव राजेश्री चत्रसिंग राजे

भोसले यासी आज्ञा केली ऐसीजे मानमार्ग

सविस्तर शास्त्रीबावा यासी बोलण्यात आले आहेत ते सांगतील त्या प्रमाणे स्वामीचे मनातील धर्म व त्रिंबकराव महिपत याचे विनंतीतील तोच भाव आहे येविषयी निसंषय मनात दुसरा विचार न धरिता तुम्हाकडून त्याअन्वये घडण्यात यावे यात स्वामीचा संतोष निखलसपणे विनंती पत्र लेहून पाटवणे जाणिजे छ २२ रजब बहुत काय लिहिणे हे आसीरवाद.

पौ छ २२ रजब सन सलाम मयातेन

व॥ १० शुक्रवार मु॥ म्हसवे

लेखांक ३०७ तारीख २४-११-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. २७८

राजेश्री प्रीतराव चवाण उमदतुलउमराव बाहादर

गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो चत्रसिंगराज भोसले रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन करीत असिले पो विशेष आपण पत्र प॥ तेथ लिहिले की कारकून अद्यापि पा नाहीत ऐसीयासी आपले पत्रावरून हली राजश्री नरसिंगराव जगनाथ पागे पा आहेत हे आपल्यासी बोलतील व तीर्थस्वरूप राजश्री स्वामीस विनंती करतील त्यावरून सर्व मजकूर कलेल राजश्री यशवंत होल्कर यानी तीर्थस्वरूप राजश्री स्वामीस विनंती पत्र र॥ नारायणराव माने याजकडे प॥ तेच आपणाकडे प॥ आहे त्यावरून सर्व अर्थ ध्यानात येईल वडिलाची आज्ञापत्रे येतात त्यास पत्री किताब लिहिण्यात येत नाही त्यास आपण आर्ज करून चिटणिसाकडून लेखन करवीत जावे आपणास पाहावयाकरिता दाखल्यानीस पत्र मशारनिले समागमे प॥ आहे र॥ छ २७ रजब बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती. पौ छ २ शाबान सलास मयातैन व आलफ मु॥ करवीर.

लेखांक ३०८ तारीख ११-१२-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. १४७

चिरंजीव सौभाग्यवती ताईबाई व सौभाग्यवती काकुबाई यास आसीर्वाद उपरी आपणास सुवर्णदुर्गास ठेऊन तारवावरून चिरंजीव राजश्री बाजीराव पंडित प्रधान वसईस जावयाकरितां गेले येसे वर्तमान हुजूर निवेदन जाहाले अशास पंडित मशारनिले जाऊन पोहोचलेचे वर्तमान हुजूर विनंतीपत्री विनंती दिनचर्यचे लिहून पाटवावे आपणास आणावयाकरिता पालख्या वगैरे सरंजाम रवाना करणेची आज्ञा देऊन आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी कोणे गोष्टीची आशंका न घेता यावयाचे करावे तेथील हवा आपल्यास माननार नाही हे जाणून आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी यावयाचे करावे विनंती पत्रे येताच सरंजाम रवाना होऊन येत आहे प्रधानपंत यास आज्ञापत्र सादर होऊन लखोटा व हुजुरे पाटविले आहेत यासी तेथून जलमार्गे रवाना करून देऊन तिकडील उत्तरे आणऊन हुजूर पाटवून द्यावी आपणाकडे ही हुजूरे पाटविले आहेत तरी सविस्तर विनंती पत्री लेहून पाटवावे जाणिजे सु॥ सलास मयातैन व आलफ ता॥ छ १५ माहे शाबान बहुत काय लिहिणे

मर्या
देय विरा
जते

लेखांक ३०९ तारीख ११-१२-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. १४५

राजमान्य राजश्री बालाजी रघुनाथ पटवर्धन यास आज्ञा केली येसीजे राजश्री बाजीराव पंडित प्रधान वसईस गेले म्हणोन निवेदन जाहले तरी तिकडील वर्तमान आले असेल ते विनंती पत्री दिनचर्येचे वरचेवर लिहीत जाणे लखोटे व हुजूरे पंडित मारनिले याजकडे पाटविले आहेत पुढे रवाना करून देणे सौभाग्यवती ताईबाई व सौभाग्यवती काकुबाई सुवर्णदुर्गास आहेत त्यास तेथील हवा मानवणार नाही याजकरिता हुजूरूने फौज व पालख्या व सरंजाम रवाना होऊन येईल येविसीचे विनंतीपत्र पाटवून देणे त्याअन्वये रवानगीची आज्ञा होईल बरदास्तीविसी व हरएकविसी कालजी न करणे सौभाग्यवती उभयता मंडली यासी घेऊन येणे जाणिजे सु॥ सलास मयातेन व आलफ रवाना छ १५ माहे शाबान बहुत काय लिहिणे.

विलस
तिलेका
नाबादी

लेखांक ३१० तारीख ११-१२-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. १४६

राजमान्य राजश्री बालोजी कुंजीर यासी आज्ञा केली येसीजे राजश्री बाजीराव पंडित प्रधान सुवर्णदुर्गाहून वसईस गेले समागमे तुम्ही आहा म्हणोन हुजूर निवेदनात आले अशास हुजूरूने पंडित मशारनिले यासी आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यावरून सविस्तर कलो येईल तरी दिनचेर्यंच वर्तमान सविस्तर विनंतीपत्री विनंती लिहित असावी जाणिजे सु॥ सलास मयातैन व आलफ त॥ छ १५ माहे शाबन बहुत काय लिहिणे

विलास मोर्तब

शिल्का

लेखांक ३११ तारीख ११-१२-१८०२

रु. नं. १

अ. नं. १४४

श्री

राजश्री बाजीराव पंडित प्रधान यासी

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री सुंदराबाईसाहेब उपरी आपले जाणे सुवर्णदुर्गाहून वसईस जाहले म्हणोन साहेबाचे सेवेशी निवेदनात आले त्यावरून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी सविस्तर विनंतीपत्र लेहून पाठवावे वरकड आज्ञा होणे ते हुजूरने आपणास आज्ञापत्री आज्ञा जाहली आहे त्यावरून कलो येईल जाणिजे सु॥ सलास मयातैन व आलफ रवाना छ १५ माहे शाबान बहुत लिहिणे तरी सु॥ असा.

लेखन मोर्तब

सिमा

लेखांक ३१२ तारीख ११-१२-१८०२

श्री

रु. नं. ४

अ. नं. १८९

सौभाग्यवती ताईबाई व सौभाग्यवती काकुबाई यास श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न-वज्रचुडेमंडित मातोश्री सुंदराबाईसाहेब उपरी राजश्री बाजीराव पंडित प्रधान सुवर्णदुर्गाहून वसईस गेले म्हणोन साहेबाचे शेवेसी निवेदनात आले त्यावरून आपणास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी पंडित मशारनिले याजकडील व आपणाकडील सविस्तर विनंतीपत्री लेहून पाटवावे जाणिजे सु॥ सलास मयातैन व आलफ रवाना छ १५ माहे शाबान बहुत काय लिहिणे

लेखन

सीमा

लेखांक ३१३ तारीख १२-१२-१८०२

श्री

रु. नं. १

अ. नं. १७४

राजेश्री शिवाजी राजे छत्रपति संस्थान कोलापूर

स्वामी गोसावी यासी

श्री सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नो। सवाई बसवलिंग राजे संस्छान सोंधा कृतानेक रामराम विनंती उपरी दुंदुभि संवत्सर मार्गसीर व॥ ३ या क्षेम जाणोन स्वकीय साम्राज्यानंद वैभवलेखनी परामर्ष घेत असिले पाहिजे विशेष आम्ही बेपुरातन आपले पदरचे तेव्हा गनीमाने राज्यापाहार करून घेतले नंतर स्छल-च्युत होऊन परस्छली श्रम पावत असता आश्रिताचा मन समाधान होईसे करणेस आश्वासनपूर्वक अभयपत्र कृपाकरून पाठविलेवरून केवल मेघचातकवत आतुरेकरून चित सापेक्षित असलेस हरघडी पत्र पाटवून आम्हा सारिखेयाचे परामर्ष घेणे हे आपले पदवीस व कीर्तीस भूषण आहे हली आम्हाकडील हसनखान यास आपले सन्निधानी पाठविले आहे हे सर्व विनंती करितील तें अंतकरणी आणून आश्वासन पत्र पाठवावे या सुज्ञ बयी प्रती विशेष काय लिहावे कृपा लोभ असू दिला पाहिजे. पौा छ १७ माहे रमजान सुा सलास मयातैन व आलफ दरजागा उपरी

लेखांक ३१४ तारीख २१-१-१८०३

श्री

रु. नं. ४

अ. नं. १९५

श्रीमंत माहाराज राजेश्री छत्रपति

स्वामीचे शेवेसी विनंती सेवक फत्तेसिंगराव माने दोनी कर जोडोन कृतानेक विज्ञापना ताा छ २६ रमजान सुा कराड स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वृत यथास्तित असे विज्ञापना ऐसीजे स्वामीनी कृपाळू होऊन रो पिराजी निकम हुजरे याजसमागमे विनंती सांगू पाटवलेली निवेदनात आणोन मागती हुजरे मारनिलेस आज्ञा करून पाठ-वून दिले ते मुकाम मजकुरास येऊन दाखल जाहाले आज्ञे प्रमाणे सविस्तर सांगितले ऐसीयास स्वामीचे पायासी शेवकाकडून काडीमात्र विनाभाव नाही हीच विनंती पुनः करून कोणी हुजरून शेवकाकडे येऊन स्वामी सेवा घडणे तें अर्थ बोलण्यात यावे येविषीचा प्रकार राजेश्री बाजी रामचंद्र याचे विद्यमाने बोलण्यात आणोन पिराजी निक्कम हुजरे याची हुजूरेच शेवेसी रवाणगी करून लाऊन दिले आहेत स्वामीनी सेवकाची कोणताही अंदेशा चिती न आणिता कोण इकडे यावे त्याची विनंती हुजरे याजवल सांगितली आहे त्याप्रमाणे आज्ञा करून त्यास त्वरेने पाटऊन देऊन शेवका-

कडोन स्वामी सेवा घडे ऐसे करणार स्वामी समर्थ आहेत स्वामीचे पायापर्ते दुसरे लक्ष नाही सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पौ छ २७ रमजान सुा सलास मयातैन ब आलफ स्थिरवार अस्तमान मुा हुपरी.

लेखांक ३१५ तारीख १३–२–१८०३

श्री

रु. नं. १

अ. नं. २७३

राजश्री सिदरामराव भोसले जंजिरे सिंधुदुर्ग गोसावी यास

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्नेाा बाजीराव रघुनाथ प्रधान आसीरवाद सुा सलास मयातैन व आलफ तुम्ही विनंती पत्र पाटविले ते प्रविष्ट जाहाले मकरसंक्रमणाचे तिल्शर्करायुक्त पाठविले ते पावले तिकडील वर्तमान वरचेवर लेहून पाटवीत जाणे जाणिजे छ २० शवाल बहुत काय लिहिने.

लेखांक ३१६ श्री तारीख १२–४–१८०३

रु. नं. १

अ. नं. १५१

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

मोरो बाबूराव स्वामी गोसावी यासी

पो अमृतराव रघुनाथ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष राजश्री सुबराव पंडित याजकडून रा लक्ष्मणराव विठल पत्रे घेऊन हुजूर आले त्यातील मजकूर व माारनिलेचे बोलणी यातील अर्थ निवेदन जाहाले त्याजवरूण सरकारीतून रा सदाशिव दादाजी पाठविले आहेत हे व लक्ष्मणराव विठल तुम्हासी बोलतील त्याप्रोा सर्वांचे ऐकयतेचा घाट घाटणे जाणिजे छ १९ जिल्हेज सुा सलास मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ३१७ श्री तारीख १२–४–१८०३

रु. नं. १

अ. नं. १५०

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत

राजमान्य राजश्री सुब्राव पंडित स्वामी गो यास

पो अमृतराव रघुनाथ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वामी स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष आपण रा लक्ष्मणराव विठल याजसमागमे पत्र पाटविले ते पावले व माारनिलेचे मुखजबानी कितेक मजकूर निवेदन होऊन संतोष जाहाला यान्त्र प्रोा परस्परे श्नेहाची वृद्धी असावी हिकडून कितेक मजकूर बोलावयाचे ते लक्ष्मणराव विठल

याजवल बोलण्यात येऊन याजसमागमे रा सदाशिव दादाजी याची रवानगी केली आहे हे सविस्तर मजकूर बोलतील त्याचे मनन करून श्रीमत् माहाराज राजश्री छत्रपति यास विनंती होऊन येविसीची उत्तरे लौकर यावी महाराजाचे सेवेशीही येथून विनंती लिहिली असे ता छ १९ जिल्हेज सुा सलास मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ३१८ तारीख १६-५-१८०३

श्री

रु. नं. ४
अ. नं. १९७

यादी राजश्री बालाजी सखाराम पुण्याहून आले त्याज बराबरी पत्रे आली छ २४ मोहरम सन सलास मयातैन व अलफ

१ जनराल वसली याचे हुजूर
१ मेजर मलकाम याचे हुजूर
१ लिंगो भगवंत याचे पुरवणी
सुाबंद २ व चिठी १
एकूण हुजूर
१ आपा निपाणकर याचे हुजूर
१ सुब्राव घाटगे सर्जेराव
—
५
१० नांवनिसीवार पत्रे
—
१५

५ पारसनिसीकडे
१ जनराल वसलीचे हुजूर
१ मेजर मलकम हुजूर
२ विश्वासराव याचे नांवची
१ जनराल वसलीचे
१ मेजर मलकम
—
२
१ नारायणराव पाटणकर
याचे नांवचे जनराल वसलीचे
—
५

५ हैबतराव गाईकवाड
विश्वासराव यासी
जनराल वस्ली बाहादर
१ मेजर मल्कम
१ लिंगो भगवंत
१ सिद्रोजीराव नाईक
निंबाळकर
१ सुब्राव घाटगे सर्जेराव
—
५
२ नारायणराव पाटणकर
सरलष्कर
१ जनराल वसली बहादर
१ सुबराव घाटगे सर्जेराव
—
२
१ माणसिंगराव पाटणकर
यासी सुबराव घाटगे याचे
१ पंत राजाआज्ञा यासी
लिंगो भगवंत याचे
१ पंत प्रतिनिधि यासी
लिंगो भगवंत याचे
—
१०

१० चिटणिसीकडे दिली
—
१५

छत्रपतीस

लिंगो भगवंत याची विनंती
पत्राची चिटी राजश्री
सुभानजी साळोखे वातून
याजवल ठेवावियासी दिली
रुबरु बि॥ राजेश्री अबाजी-
राम फडणीस किले पन्हाळा
चिठी———————— ———— सुमारी
१

लेखांक ३१९ तारीख ५-७-१८०३

हु

रु. नं. १
अ. नं. १८२

मोहबत व मुवदत पनाह अजम बाहादूर
दाम एखलासहू

अजी तर्फ रत्नाकर पंडित राजाज्ञा बाअदज सलाम आखे दरिविला आ मोहबत-पनाहानी श्रीमन्माहाराजाधिराज राजश्री माहाराजाचे शेवेसी विनंती पत्र पाटविले ते हुजूर प्राविष्ट करून आ मुवदत पनाहास इनायेतनामा घेऊन पाटविला आहे त्यावरून मालूम होईल त्याला वाफीक हुजूर येणेचे करावे जियादेयचे निगास्त आयद तारीख छ १५ माहे रबिलावल हे किताबत सुा आर्बा मयातेन व आलफ

लेखांकं ३२० पौ तारीख २०-७-१८०३

श्री

रु. नं. १
अ. नं. १८९

आज्ञा केली यैसीजे पटवर्धन याणी सरकार तालुकेतील गावास ठाणी घातली आहेत ती हुजूरने ठाणी घालणेविसी चिकोडी तालुकेतील मामलेदार यास आज्ञा जाहली आहे व कुरुंदवाडकर याणी आकिवाटकर बाजारास गेले आसता धरून ठेविले यामुले मोबादला ठाणेदारानी करतील त्यानी कुले सोडिलेवर हेही अडहालतील ती सोडतील आजरेकर याणी सरकार तालुकेत स्वारी करून मौजे माहागावची गुरे हजार बाराशे नेहली व शिरढोण गाव सरकारात आहे तेथे हेरवाडकर याणी कुरुंदवाडकराचे बलावर उपद्रव करीत आहेत व मिरजकर यानी तपोनिधी कृष्णगीर गोसावी याचा

येवज जप्त केला आहे याचा मोबदला हुजूरने होईल त्याचा बोभाट ते तुम्हास लिहितील यामुले तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले असे.

पौा छ ३० माहे रावल सुा आर्बा मयातेन व आलफ हुजूरून जनराल वजली ब्रहादर यास याप्रमाणे इनायतनामा सादर जाहाला आहे.

लेखांक ३२१ तारीख १-८-१८०३

रु. नं. १

अ. नं. १९०

श्रीमन्महाराज शिव छत्रपति राजे माहाराज याचे सोसी

आजम जनरल वसली बाआदज

दरिविला आमोहब्रतपनाहानी छ २१ रावलचा कलमे फिरिस्ताद केले ते पोहाचल व माा लिंगोपंताच्च मोन आ माहाराजाची दरखाष्तचा तपसीलही अवगत जाहाल त्यासबबेकडून अजम सुबराव घाटगे सरज्याराव यासी माहाराजाजवली रवाना केल अस

माहाराजाकडील सरदार सखाराम घाटगे यानी कांही जमीयत आपणाजवली ठेऊन कृष्णा नदी जवली आहेत तो जागेत हांगामा करीत आहेत म्हणून मा॥र रामरायानी जाहीर केल आहेत व इजानिबा

ते वख्ते आमाहाराजासी सुला दिल्हेत व दरखाष्त केले ते चांगले श्मरण ठेविला असील व सर्व प्रकार मुलक अमनचे न ठेवीत आहा म्हणून केव्हाही इजानिब्राजी उमेद ठेवीत अस ऐसीयासी इजानिबाचे इलाखेदार पुणेच्च बाटो येणार जाणारासी सखाराम घाटगेकडून हारगीज मुजाहिमत न व्हाव हे माहाराजाच्च खातीरवरी चांगल आणून बिलकूल कोणाचा हाताकडूनही त्या लोकावरी जुल्म व इजा न होऊ द्यावा आणि माहाराजानी घोडेच्च जीन व बारुदच्च जिनस दरखाष्त फर्माविला होता तरी इजानिब्रानी हे दोन्ही जिन्नसही मोंबाईहून आणविल अस आणकरीब रवाना करीत अस जाहीर होये

रवाना छ १२ रा॥खर छ १ माहे आगष्ट सन १८०३ इसवी जियादाचे

पौा छ ५ जमादिलावल सु॥ अरबा मयातेन व अलफ दर जागा करवीर

(पौा ता. २३-८-१८०३)

लेखांकं ३२२ तारीख ६-९-१८०३

रु. नं. १ मसुदा

अ. नं. १९३

रफअत व आवाली पनाह तहऊर जलादत दस्तगाह अजम मेजर मलकम कामयाब बाशंद दरिविला आ कारपरदाजानी खतूत आजंम सुबराव घाटगे सर्जेराव याहमराह फिरिस्ताद केले ते हुजूर प्रविष्ठ जाहाले मोमिले याणी तमाम

मजमून कदीम दोस्तीचा बयावार मारुज केल्यावरून माहाराजास खुषवख्ती जाहाली फिल-हाल हुजूरचे जाबसालाची आज्ञा आजम बालाजी बापूजी यासी होऊन आज्ञापत्र सादर जाहाले आहे मवाफीक हुकूम जवाबसवाल आ कारपरदाजासी करतील बंदा मौजीब हुजूर

ची काजकामे अजम जनराल बहादर यासी बोलून होऊन येई ते करावे जाणिजे रवाना छ १९ माहे जमादिलावल जियादा काय लिहिणे मोर्तब सिक्याचे मु॥ आर्बा मयातेन व आलफ.

लेखांक ३२३ तारीख २५--९-१८०३

रु. नं. १

अ. नं. १९४

श्रीमन्माहाराज शिव छत्रपति राजे

महाराजाचे स॥ सी

अजम जर्नेल वसली बाआदज

ईज्यानीबान राजासी इतिला देत असे जे परवाच दिवशी अम्ही सोळा कोसच कूच करून आजम दौलतराव शिंदे व रघुजी भोसले याचे फौजे मिलल होत त्याजवरी लढाई केलो त्या उपरांतिक हे लढाईत त्याच लष्कर तमाम सिकस्त जाहल आणि त्याची तोफा ९० नवद घेतलो असेत कर्नल इष्टविसन सो बाहदरच लष्कर व मोगलाई लष्करसहित या लढाईत नव्हत ज्या जागेत लढाई जाहाली कीं त्या जागेशी याणी आठ कोसावरी होते मोखालीफ तमाम पळून गेले आणि घाटाखाले गेलेसारिख मालूम होत आहे. जाहीर होये र॥ छ २५ सबटंबर सन १८०३ इसवी मु॥ छ ९ जमादिलाखर ज्यादाचे जे खातरेजत चवद

पौ॥ छ १९ माहे जमादिला मु॥ आबा मयातेन व आलफ

लेखांक ३२४ तारीख १५-१०-१८०३

रु. नं. १

अ. नं. १९६

श्रीमन्माहाराज शिव छत्रपति राजे माहाराज

याचे सासी

अजम जेर्नल वसली बाआदज

राजाच तावेदारीत असणार

लष्कर मुरगोडवरी लढाई केली बादज मुन व

किल्लेवरी लढाई केली त्यासी कुमके-

स्तव सवारासी पाटविला आहा म्हणून आजम सिदोजीराव नाईक निंबाल्कर आपा देसाई निपाणकर यानी आम्हास जाहीर केले आहेत अगर त्या पाळेगाराशी कुमक न जाहल असलीया त्याकडून यैस काम कधीसही होऊ सकत नव्हत आपा देसाई निपाणीकर मौसुफ यानी श्रीमंत पेशवेसोची चाकर आहेत हाल पेष्रवासोब्राच नोकरीवरी इंग्रजी लष्करासमागमे आहे ते आमाहाराजासी जाहीरच आहे इंग्रजी लष्करा खासगत जे कोण आहेत त्याची मुलकासी इजा न द्याव अगर त्याजवरी कांहीं दावा असलिया इज्यानीबासी सांगाव इज्यानीबा त्यासी तजवीज करुन इनसाफीच रुयेने फैसला करून देऊ म्हणून ईज्यानीबा बहुत दफा आमाहाराजासी इतीला केला आहे हे आमाहाराजासी यादगिरीही असल हाल आ साहेबासी इतीला देत आहो जे आमच लष्कराहमराह जे कोणे सरदार आहेत त्यानी जवपो इंग्रजी लष्करासमागमे राहातील तव पोही याची मुल्कावरी कोणी इजा दिल्या त्यासी आम्ही इंग्रेजी सरकारची दुष्मन जाणून त्यासी रजा करू जैस की कुंपणीच्च मुल्कावरी जुल्म केलसारिख समजू आमाहाराजानी कुंपनीच कदीम दोस्तदार आहा हे हमेषा यैसे करणेच कुंपणीच्च दसातूर आहे म्हणून अलब्रता आमाहाराजासी जाहीरच असल आणि आमाहराजा आहा यावास्ते यैसे हरकत करणेच मौकूफ करवाल म्हणून ईज्यानीबा यकीन सलाभर अस लेकीन तिकडे इंग्रजी लष्करच सरदार जर्नेल कमेल सोबा आहेत त्यासी हे खबर लिहिणेची जरूर जाणोन त्यासी लिहील अस जे तुम्ही अपा देसाई निपाणीकर मौसुपा याच मुलकाची बचाव करणे म्हणून यैसे हुकूम अस याशिवाये तलूर पालेगारानी कितूर राजेवरी ल्ढाई केले म्हणून ईज्यानीवासी खबर पोहचल आहे यैसियासी त्याजवरीही इजा न व्हावी जाहीर होय रा छ २८ जमादिलाखर मुताबीक छ १५ माहे आक्टोबर सन १८०३ ईसवी

जियादाचे जेबीर तखद
पौ छ ८ माहे रजब सुा
आर्बा मयातैन आलफ दर
जागा करवीर.

लेखांक ३२५ तारीख १६-११-१८०३

श्री

रु. नं. १
अ. नं. २०४

श्रीमन्माहाराज राजश्री———————छत्रपति
स्वामीचे शेवेशी

विनंती शेवक सखाराम घाटगे सर्जेराव कृतानेक विज्ञापणा येथील कुशल तागायत छ १ माहे शाबान पावेतो मुा पुणे येथे स्वामीचे कृपे करून सेवकाचे वर्तमान यथास्थित

असे विशेष मौजे आसोडे ता। हातखंबे किले विशालगड प्रांत राजापूर हा गाव आदमासे साहा सातशाचा त्यास निमे तालुके रत्नागिरी व निमे विशाळगड दुतर्फा आहे येविसी समक्षे वेदशास्त्रसंपन्न राजश्री गोपाल बाबा वाटारकर संवस्थान जेजुरी याजकडे श्री मार्तंडास घ्यावा म्हणोन स्वामीचे शेवेशी विनंती केल्यावरून महाराजाचीही आज्ञा देण्याविसी जाहाली आहे त्याजवरोन शेवेशी विनंती पत्र लिहिले आहे तर मौजे मजकूरच्या सनदा बावाचे नांवी देवयाची आज्ञा जाहाली पाहिजे हे विज्ञापणा.

लेखांक ३२६ तारीख १६–११–१८०३

रु. नं. १

अ. नं. २०६

तालीक

आजम विकली इंग्रज दाम यखलास हू

आजी तर्फ नारायणराव पाटणकर सरलष्कर बाअदज सलाम आंकी येथील खैरखुषी जाणोन आपली शादमानी कलमी करून दिल खुषी होय ते करीत असिले पाहिजे विशेष बहुत दिवस तुम्हाकडून खत येऊन वर्तमान कलत नाही त्यास वरचेवरी खत पाटऊन वर्तमान कल्वीत असावे अजम जनराल वसली सो बहादर याजकडील वर्तमान तुम्हास आले असेल ते बयावार लेहून पाटवावे आणि गैरवर्तमान जी तुम्हास येत असतील तीही लेहून कलवीत असावे जियादा काय लिहिणे तारीख छ १ माहे शाबान हे किताबत सुा आर्बा मयातेन व आलफ दर जागा कागल रवाना.

(ता. १६–११–१८०३)

अजम सैद हैदर रिसालदार दाम मोहबत हू अजीतर्फा नारायेणराव पाटणकर सरलष्कर बाआदज सलाम आंके जियादा काय लिहिणे तारीख छ ९ माहे शाबान हे किताबत

(ता. २४–११–१८०३)

पौ. छ १० रमजान सुा

आर्बा मयातैन व आलफ मु।।

नदीतीर नजीक बेलगाव पौष्य

द्वादशी इंदुवार

(पौ २५–१२–१८०३)

लेखांक ३२७ तारीख २६-११-१८०३

रु. नं. १ मसुदा

आ. नं. २०५

आजम कृष्टीन कमेडर दुमासगोली
तौ कितूर दाम येखलास हू

अर्जी तर्फ रत्नाकर पंडित राजाज्ञा बाअदज सलाम आंके येथील खैरखुशी जाणोन आपली शादमानी निगारीष करून खुषवख्ती हासील होय ते करीत असावे दरिविला खत मसरत नमत फिरिस्ताद केले ते रसीद होऊन बयावार मजमून माअलूम जाहाला कितूर ताअल्लुकात उपसर्ग न व्हावा म्हणोन कलमी केले त्यास किनूर ताअलुकेत उपसर्ग व्हावयाचा नाही हमेशा अखबार खैरीयत आशीर खबर मरकूम करून दिलखुषी करीत असावे जियादा काय लिहिणे तारीख छ ११ माहे शाबान हे किताबत.

सुा आर्बा मयातैन व आलफ रवाना छ मार दर जागा नागरालो वि राजश्री जिवाजी मल्हार निा घोरपडे.

लेखांक ३२८ तारीख १८-१२-१८०३

श्री

रु. नं. १

अ. नं २७६

सेवेशी बातमी वर्तमान ता छ ३ माहे रमजान रविवार सु॥ आर्बा मयातेन

१ इंग्रजाचे लष्कर भरगुवारी मुदलावीवर मु॥ जाहाला तेथून मंदवारी उदपुडी बनुरचे नजीक आहे. तेथे मु॥ जाहाला आहे. काली मंदवारी राजश्री सुबराव घाटगे व बापू जगताप लष्करास गेले आहेत बनूर वगैरे गाव तोरगलचे आहेत तेथे रखवाली घेतले आहेत बोलणेचा मार तरी राजश्री आपजी निपाणकर याणी वसली साहेब याची ताकीद जनराल केमल यासी लाविली आहे कीं निपाणकर याचे कारकून सांगतिल त्या प्रमाणे काटकाचा बंदोबस्त करावा व तलूरकर यासी कुमक दिल्ही आहे हे निमित्य तोरगलकर याजवरी ठेविले हे बोलावयासी गेले त्यास राजश्री नरहरपंत यासी बोलणे अगर बालासाहेब सेनाधुरंधर यासी घेऊन येणेविसी सांगितले नंतर नरहरपंत यासी बोलणे करिता रोज गु॥ ठराव करून गेले आहेत त्यानी पांच कलमे मुदा घातला आरे त्याजविसीचा ठराव जाहालेनंतर तलूरकर याजकडे लष्कर जाणार मुदेबि॥

१ मनोलीकर याचे कुल याजकडून पांच हजार रुपये निशा करून घेतले आहेत ती चिठी माघारी द्यावी. कलम

१ तळूरकर याचे मध्यस्तीचे बोलणेत चार आसामी आत भले लोक आहेत त्यास हवाली करावे.

१ मनोली तालुकेची खराबी जाहाली सर्वच पडला याजविसी मखलासी करावी. कलम

येणे प्रमाणे ठर जाहाले नंतर तोरगलच्या उपद्रव तुटतो करिता निवेदन होईल साहेबाचे पुण्य प्रतापे सांवताकडून उलगडा कोणतीही आडचन न पडता होऊन पुढे बराथे कामाचे वचन देऊन यादी करार दास्त बोलण्याचे माहित निकडीने घेऊन येऊन दसऱ्यापूर्वी बोलण्याचे फडशे व्हावे आपल्या येण्याचा निश्चय होऊन पत्रे व सांवताची पावती यावी बहुमानपूर्वक आपले येणे घडऊन येताच तूर्त दोन कामाचे यश देऊन महिन्या आत रवानगी करु आणि माहितगार येऊन घेऊन यादीवरहुकूम कामे उलघडून देऊ ऐसे निश्चयाआत्मक वचन होऊन रवाना केले याची पैरवी करून आविलंबे सिद्ध पाहून घेणार सर्वज्ञ आपण आहेत बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ३२९ तारीख २१-१२-१८०३

रु. नं. १

अ. नं. २११

श्रीमन्माहाराज............शिव छत्रपति

राजे माहाराज याचे सा।।सी

अज जेर्नेल वलजली बाआदज

छ २१ रजबच व छ १० शाबनच १ येस ईनायेतनामा पाटविल ते पोहचून मुफासील मा।।र जाहीर जाहलं हुजूर माहाराजाच तर्फेकडून आजम सिदोजीराव निंबालकर याची गावासी कांही इजा जाहल नाही म्हणून कलमी केले त्यासी इज्यानीबासी बिसियार खुषी व खुरमी हासील जाहाली निपाणीकर मोसूफ याजकडून मनोली वगैरे ठाणसी सोडचिठी पाटवावी म्हणून आमाहाराजानी फर्माविला होता तरी या गोष्टीस यंदा दरियात्फ करून जवाब देत अस तूर्त जलदीस हे काम होऊ शकणार नाही व गदगासी आमची पलठण राहिल आहे त्यासी येक खत हुजूरच हरयेक काम करून देतेस लिहून पाठवणे म्हणून कलमी केले होते तरी आमाहाराजाची आमची दरम्यानेत बिसियार दोस्ती आहे अम्हाकडील लोकाकडून कोणासीही इजा न होईल आसोबाकडून कांहीं इजा न व्हावी अगर आमाहाराजासी कांही कुमक जरूर जाहाली या इज्यानीबा लिहून पाठऊ आणि आरमारच बाबेत बंदरवालेसी खत लिहून पाटवणे म्हणून माहाराजानी इस्काम केला होता तरी त्या कामात आम्ही कोणते प्रकार ही दाखल होऊ सकत नाहीं व घोडच जीन व दुर्बीन बारुदवास्ते कलमी फर्माविला होता याबाबेत इज्यानीबा मुंबाईस लिहून पाटविल अस तेथून ते जिनस येताच आमाहाराजाची हुजूर बेतहमूल

रवाना करीत असे रोषन होये. रा॥ माहे डिसेंबर २१ रो मुताबिक छ ५ रमजान सन १८०३ इसवी जियादाचे
पौ। छ १६ माहे शौवाल सु॥ आर्बा
मयातेन आलफ दर जागा चिकलदिनी.

लेखांक ३३०   तारीख २८-१२-१८०३

श्री

रु. नं १
अ. नं. २१२

सेवेशी विनंती सेवक खंडोजी नाईक भोसले वाडीयातील मूल मु॥ पुणे कृतानेक सेवेशी विज्ञापणा ता॥ छ १३ माहे रमजान स्वामीचे कृपावलोकने वृथ येथास्थित आसे विज्ञापणा येसीजे स्वामींनी कृपाळू होऊन आज्ञापत्र पाटविले ते मस्तकी वंदून सनाथ जांहालो आज्ञापत्रीं आज्ञा जे हुजूरने गलेपासून कांहींच विनंती पत्र येऊन वर्तमान निवेदनात येत नाही अशी आज्ञा आज्ञे प्रमाणे येथे आलेनंतर राजश्री सखाराम बावा घाटगे सर्जाराव याची भेटी घेतली नंतर लागलेच सेवेशी विनंती पत्र लिहिले ते शेवेशी प्रविष्ट जाहाल असल नंतर मशारनिलेनी राजश्री बाजीराव पंडित प्रधान याची भेटी सत्वरच करून निरोप लागलेच देवितो यैसे बोलिले यास्तव चार दिवस पत्र पाटविले नाही हली भेटी करऊन दोन तीन वेळा दरबारात घेऊन जाऊन समक्ष बोलणे जाल्या ती पाहाता काय ढोणे जाहाले ते सेवेशी येऊन समक्ष विनंती करील त्याचे बोलणेत हुजूरच्या बहुत उपयोगाच्या गोष्टी आहेत मागेही आम्ही आलो व्होतो परंतु आसे बोलणे कांहीं जाहाले नव्हते हाली हुजूरचे चरणासी त्याचा लक्ष बहुत दिसोन आला राजश्री दाजीबा देशमुख रोज गुदस्ता राजश्री बापूनी वाडीयात जाऊन सर्व समेटाचा जाबसाल टरावात आणून शिंदे होल्कर व भोसले याजकडे पत्रे पाटऊन सर्वत्रानी येक विचारे व्होऊन जलचरास माघारे लाऊन द्यावे याप्रमाणे सर्वत्राचे निच्छयात टरऊन जाहलेला आहे. परंतु तूर्त त्याची प्रबलता बहुत कैसे घडते पाहावे शिंदे व भोसले व जलचर गाईलगडानजीक बारा कोशाचे तफावतीने आहेत गाईलगड लढत आहे रोज गुदस्ता पत्रे आली त्याचे उत्तर मशारनिल्हेनी दिल्हे आहे त्याप्रमाणे वारंवार स्मरण करून त्याप्रमाणे पत्रे घेऊन चो राजाचे आत निघोन येतो स्वामीची आज्ञा सत्वर येणेचीच होती परंतु पुणेतील कारभार आतां म्हटले आसता चार दिवस लागतात महार्गता हली येथे धारण पांच शेराची आहे पुढे दिवसेदिवस कैसी आणखी होती समजेना सिंदे भोसले व जलचर समानस्कंदे आहेत येक दोन किले मात्र फितुराने घेतले आंबोजी इंगले यानी जलचराची आगरेचे मैदानी बारा पलटणें बुडविली जनरेल करनेल सुद्धा साफ केली बाकी तीन पलटणे सिकस्त व्होऊन साहा कोश माघे हटून येऊन राहिली व्होलकरही माघे फिरले आसे आहे. सेवेशी श्रुत व्हावे हे विज्ञापणा.

को. घ. ३...१७

लेखांक ३३१

इ. स. १८०३-०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २२९

राजासाहेब कारपरदराज

राजासाहेब छेत्रपति

आज तर्फ कृष्य साहेब ठाणा सगोली किल कमेडर बाद बंदगी दरिवीला आयकबालमंदाच फौज बेलगाव तालुकेस आला आहे म्हणून जहेनेत आल कितूर देसाईच सरद व बेलगाव व शाहपूरच सरद मुतसील आहे तर सरकार पेशेवाने श्रीमंत बहादर व सरकार कुंपणी इंग्रीज बहादर दोनी सरकारच दोस्त कितूरकर आहे. करिता साहेबाचे फौजच लोकानी याचे सरदेत रयेत लोकास ईजा वगैरे न होयेस ताकीद करविली पाहिजे जियादा काय लिहणे.

सही इंग्रजी

लेखांक ३३२

तारीख १३-१-१८०४

रु. नं. १

अ. नं २१७

राजा साहेब कारपरदराज

राजा साहेब छेत्रपति

अजतर्फ कृष्यसाहेब टाणा संगोली किले कमेडर बाद बंदगी

दरिवीला मोहिबी खत पाटविले ते पावले कितूरकर सवस्थानीक यानी हजूर चाकरी करावी नजर द्यावे म्हणजे त्याच तालुकेस उपद्रव होणार नाही म्हणोन लिहिला यैशास कितूरकर संस्थानिक पेशवे व इंग्रज बहादूर याच हुकुमासिवाये कांहीं करणार नाही आपण कितूरकराच खेडे धामणे मुचंडीस स्वार बैसविले आहे त्यासी उटऊन न्याहवे तेथून पेशवे व हजरत जर्नेल वसलीसाहेब बहादूर याचा हुकूम येईल त्याप्रमाणे वर्तणूक करतील. परभारे खटला न होये ते करावा जयादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे

सही इंग्रजी

पौ छ २९ माहे रमजान सुा आर्बा मयातैन व आलफ दर जागा नजीक बेलगाव नदी कग्नालीतीर.

लेखांक ३३३ तारीख २०-१-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं २२०

ता गुडदपा नाईक मजरे चिकलदिनी पा। पाछापूर सुा आर्बा

मयातेन व आलफ आज राजमंडलाचे लष्करचे कूच होऊन मोरहालबे बारीने पाछापुरास गेले तुम्हीही बहुत हुशारीने राहून पाछापुरास कुमक करणे चिकलदिनीकडे शह लागल्यास ताबडतोब हिकडे लिहून पाटवणे दोनशे लोक व दारुगोली पाटऊन देऊ हिंमत धरणे पाच्छापुराकडे रातबिरात कुमक करणे. जाणिजे छ ६ सवाल मो सुद्र.

लेखांक ३३४ तारीख १३-३-१८०४

रु. नं. १

अ. नं. २२६

श्रीमन्माहाराज——————सिव छत्रपति राजे

माहाराजाचे सा।सी

आज जर्नल वलजली बहादर बाआदज

राजे सेनासाहेब सुभा व माहाराज दौलतराव सिंदे अलीज्याहाबाहदर या उभयेता सरदारासी सुला ठराऊन आम्ही दखन रोखेशी आलों तेवेलेस कितेक बंडवालेनी जमा होऊन दखन सुभेदार याच मुल्कात फसाद करीत होते त्यासी आम्ही मारून दानादान केले ते खब्र आमाहाराजाची येकणेत आल्च असल हे बंडवालेच्च फौजेत विश्वासराव घाटगे व मल्बा दादा वगैरे होंते त्यासी दौल्तराव शिंदे बाहदर यानी हुकूम लिहून पाटविले जे कुंपणी सरकारची व आपली दरम्यानेत सुला ठरल आहे आता तुम्ही कांही फसाद करणे गरज नाही आमच लस्कर बुराणपुरावरी आहे तुम्ही त्या मुलक सोडून निघून येऊन आम्हास मिलणे म्हणून येस ताकीद पाठविले होते करिता आम्ही त्या बंडवालेच्च फौजेसी जवलही गेले तेसमई त्यानी निघून जाणेस्तव फुरसद सहीत दिल्ह होतो परंतु त्यानी आपल खाविंदाची हुकुमेसी वा अमच ताकिदेसी सहीवर मानिल नाहींत करिता त्यासी नसीहत जाहल त्यानी तिनीतेरा होऊन पळून गेले ते विश्वासराव घाटगेनी सर्जेराव घाटगेच्या भाऊ त्यावेलेत सर्जेराव घाटगेनी श्रीमंत पेशवा बाहदरच दरबारात होते सर्जेराव याजकडील बकशीयानी जो जमियेतसुद्धा ज्यावेली बंडवालेसी लढाई केलो की त्यावेलेत बंडवालेच्च फौजेत होते करिता हरप्रकार आमच दरियात्फेत येत आहे कीं सर्जेराव घाटगे यानी पेषवा साहेबाचे दरबारात रहात असताना

त्याच बकसीयानी विश्वासराव यासी मिळून आम्हासी लढाई केले बादज विश्वासराव घाटगेनी कोल्हापुरासी पळून गेले सर्जेराव घाटगेही वाईहून करवीरास गेले या लोकाची आमाहाराजाची खानदानेत निसबत आहे म्हणून इज्यानीबासी निस ठाऊक आहे व कोणी लोक आपल घरी फरमाबारदारीत उगच राहणारासी आसरा न देते सारिख करणेच आमच सरकारच दस्तूर नाही व आमचा इरादाही नाही यावास्ते आम्ही ते लोकासी आमच स्वाधीन करणे म्हणून बोलत नाही अगरचे त्या लोकासी स्वाधीन करणे म्हणून बोललीयाही लाजम आहे परंतु आमाहाराजानी त्यासी आसरा दिल्हावरी माहाराजाशी जाहीर आसावे जे येंदा त्यांनी हरकोणेत काया केल तरीही त्याबाबेत माहाराजानी जवाब ध्याव आणिखी येकदफा दुसर सरकार राज्यात इजा देणे-वास्ते त्यानी फौज जमीयेत जमा करितील तरी ते हरफ माहाराजावरी येईल त्यानी केले ते कामासी आमाहाराजानी जवाब द्यावा लागल अश्यासी आम्ही दोस्त आहो म्हणून दोस्तीच राहोन खबर माहाराजासी जाहीर केल असावे पहिलेपासून हिंदुस्थान व दखिनेत बहुत बखेडा पडले आहे करिता हाल तमाम राज्यात आरामीयेत होणे जरूर आहे हे सलामोकर जाहल आहे त्यासी हरकोणाकडूनही कुंपणी सरकार बिलकुल बिगडू देणार नाहीत हे गोष्टी चांगल मजबूत आमाहाराजाचे खातीर मुबाकेत आणावा जाहीर होय हमेषा आमाहाराजाची खैर खुषाली नामेसी कलमी फर्माऊन न्याहायेत खुषी करवीत असावा. रा॥ छ ३० जिल्काद मु तारीक १३ मार्चें सन १८०४ इसवी
पौ छ ११ माहे जिल्हेज सुा आर्बा
मैयातैन व आलफ (पा ता. २४–३–१८०४)

लेखांक ३३५ तारीख १८–३–१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २२८

हुजूरून अजम ज्यानार्दन डंकन ईस्कायर प्रजिदेत गोवर्नंदार जनराल जंजिरे मुंबई यास इनायतनामा

दरीविला हुजूर कडून खत खुष नमते येऊन शादमानी हासील होत नाही हे कदीम दोस्तीचे जागा वाजीब व लाजीम नसे त्यास हमेशा खैरियत कलमी करून माहाराजास खुषवख्ती हासील होय ते करीत जावे येकबाल पनाह कोपणी बहादर याची व हुजूर कदीम दोस्ती चालत आली आसता जंजिरे सिंदुदुर्ग येथील बंदराची आमदरफ्तीं न चालता नस्तावरी बोट व फते-मारया राहून साहुकारास आमदारफ्ती करावयास हरकत करावी हे कदीम दोस्तीचे जागा लाजीम नसे याजकरिता कलमी फर्माविले असे तरी जंजिरे सिंदुदुर्ग येथील बंदराची

आमदरफ्ती होऊन पूर्वी प्रमाणे कौलावण चालते करावे वरकड मजकूर अजम सुबराव घाटगे सर्ज्याराव आज्ञे प्रमाणे बोलतील त्यावरून मालूम होईल रवाना छ ५ जिल्हेज सु॥ आर्बा मयातेन व आलफ.

लेखांक ३३६ तारीख ३--४--१८०४

हु॥

रु. नं. १
अ. नं. २८४

अजम जनराल वजली बहादर कामयाब बाशद

अमारत व अयाल्त पनाह शोकत व हाशमत दस्तगाह बाआदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिविल हुजूर खतुत छ ३० जिल्कादचे फिरिस्ताद केले ते रसीद होऊन तमाम कैफीयत दर्याप्तीत येऊन इजहार जाहाली राजश्री विश्वासराव घाटगे सर्ज्याराव व राजेश्री सखाराम घाटगे सर्ज्याराव याणी आपले घरास आलेस फिकीर नाही लेकीन बंडवालेकडे न जाईत ऐसी ताकीद व्हावी म्हणोन निगारीष केले बा मोमिले सरज्याराव यासी हुजूर ताकीद फमाविली असे सरज्याराव याही जनाब मुबारिकेत माअलूम केले जे आंपण राजश्री दौलतराव सिंदे याजपासी नोकर होते त्यास सिंदे याही यावे म्हणोन खत फिरिस्ताद केलेस त्याजकडे जाऊ त्यास माआलुम व्हावे बईसबाब इनायतनामा जाहीर फर्माविला असे पेदरपे अखबार खैरियेत असार कलमी करून शादमानी हासील होय ते करावे जियादयेचे निगास्तष आयद रवाना छ २१ माहे जिल्हेज आयाम मुदामबादऊ सु॥ अर्बा मयातेन व आलफ रवाना दर जागा क॥ वडगांव छ मा.

लेखांक ३३७ तारीख २०–४--१८०४

रु. नं. १
अ. नं. २३३

श्रीमन महाराज सिव छत्रपति राजे महाराजाचे सोसी अजम

जर्नेल वलजली बहादर बाआदज इस्तियाक दरिविला माहाराजानी छ १९ जिल्हेजच्च पत्र पाटविले ते पावल त्यात आजम सिदोजीराव नाईक निबाळकर निपाणीकर पुण्यात चिकोडी व मनोलीच बोलणे फितना फिसादीचे राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यासी बोलत आहेत म्हणून हुजूर ज्याहीर जाहाले त्यास हुजूर तालुकेचा मजमून मनोलीसुधा कलमी फर्माविला आहे मनोली चिकोडी चिटी वापस लष्कर फिरलेवरी घेऊंन फिरिस्ताद

करितो म्हणून खतूत इबलाग केले असता हा मजमून इजहार जाहलेवरून बिसीयार ताजूब जाहाल येकबाल पन्हा कुंपणी बाहादर याची व हुजूर कदीम दोस्ती चालत आली असता याची बोलणी महकूब करावी हे कदीम दोस्तीस वाजीब व लाजीमतर नसे याजकरिता फिलहाल इनायत-नामा खातर फर्मावि‌ला असल्यास प्रधानपंत यासी खतूत निगारस कराव जे चिकोडी व मनोली हे तालुके हुजूर याविषी निपाणीकर व आणखी कोणही गैर राहाचे बोलणे बोलतील त्यास एकबाल पन्हा कुंपणी बाहादर यासी व हुजूर कदीम दोस्ती त्या अर्थे आपण हुजूर हुजूरचे तालुकचे बोलणे गैरमजकूर न ऐकाव आणि निपाणीकर यानी हुजूर तालुकेतील गाव घेतल आहेत येबाबे ताकीदपत्र लिहून करावी म्हणून ऐस सविस्तर मजकूर दर्शविला होता तरी चिकोडी व मनोली श्रीमंत राव पंडित प्रधान पेशवा साहेब बहादर याचा आहे कीं या आ माहाराजाची आहे कीं आम्हासी ठाऊक नाही हे करणेचा मोकदमा आहे त्यास हे काम आपण उभयताच मनोभाव लाऊन घेऊन त्यात चांगल चवकसी करून वाजवी प्रमाणे इनसाफीच रुयेन चुकाऊन घ्यावा लागतो लेकीन आ माहाराजानी श्रीमंत पेशवा मोसूफ याची मुलकात हंगामा न करावा त्याची मुलकात माहाराजाची इलाखेची गावा वगैरविसी संदेह असलीया त्यासी माहाराजानी न घ्यावा हे खबर आम्ही आम्हाकडून महाराजासी इतला करणे लाजीम आहे हे माहाराजानी यादीगिरी ठेवावी पेषवासाहेबाच हकेसी कुंपणी बाहादर सरकार कुमक कराव म्हणून तह मोर (मोकरर) जाहल आहे बहूशा त्यानी करारा प्रा करतील जाहीर होय हमवारे अखबार खैरियत असार निगाषन मुदेशादमानी हासील होय ते करावी र॥ छ. २० एप्रिल सन १८०४ इसवी मु॥ बि॥ छ. १० मोहरम जियादाचे जसारत खंद.

पौ छ. २१ माहे मोहरम सु॥ अर्बा
मयातेन व आलफ.
(पौ ता. २-५-१८०४)

लेखांक ३३८ तारीख २७-४-१८०४

रु. नं. १
अ. नं. २३५
श्री मन्महाराज———सिव छत्रपति राजे
राजाचे सेवेशी———

अजमु जर्नल वलजली बाहादर बाअदज इस्तियाक माहाराजानी छ ५ जिल्हेजच पत्र पाटविल ते पोहचल त्यात पेषजी चिरंजीव राजेश्री

हैबतराव गाईकवाड विश्वासराव यासी हुजूर घेऊन याव करिता पाटविल होत त्या वतनी सांगितल जे माघारी जाणेसमई या मार्गे येऊन हुजूर रसीद होऊन मुलाकत हासील करून जातो त्यास जातें समई या मार्गे येऊन पटणास जावे. पेषजी जंजिर सिंधुदुर्ग येथील बंदराची अमदरफ्ती होऊन पूर्वी प्रमाणे कौलावान चालावी याबाबे इनायेतनामे सादर जाहाले होत जे कदीम दौस्ती चालत आली आसता बंदराची अमदरफ्ती न चालता नस्तावरी बोट व फत्तमारया राहून साऊकारासी अमदरफ्ती करावयास हरकत होती त्यास अजम हनराद्ब्येल जानादन डंकन ईस्कोयर प्रचिदेत गोवर्णदार जनराल जंजिर मुंबई यास सांगून जंजिर सिंधुदुर्गच बंदराची अमदरफ्ती होऊन पूर्वी प्रमाणे कोलावाने चालते कराव फिलहाल सुब्राव घाटगे बालाजीपंत यासी हमराहा राहून माघारी येतील ते समई बराबर येणेबाबे आज्ञा सादर फर्मोविल आहे म्हणून कलमी केला होता तरी माहाराजाची मनोदयेनुसार ज्यावेलचे संदर्भ घडल ते समई माहाराजाची मुलाकात हासील होईल आणि माहाराजाच बंदरा सिंधुदुर्गच बाबेत मुंबईच हाकीमेच हुकूमे करून माहाराजाची बंदरा बंद जाहल आहे या गोष्टीत आम्ही बोलणेसी होत नाही म्हणून पेषजी येखलास दस्तगाह हैबतराव गायेकवाड विश्वासराव व सुब्राव घाटगे यासी जवाब दिल्हा होतो तो माहाराजासी चांगल विदित जाहल नाही. सांप्रत इज्यानीबा मुंबईस आल्यावरी याबाबेबा आजम गौरनर डंकीन सोब यासी या विद्येमानी अनेक वेली गोष्टी बोलिलोस्तव अता हे कैफियत जाहीर जाहाल्या करिता या विद्येमानी आमाहराजासी श्मरणार्थ कलमी केल जात जे पूर्वीपासून माहाराजाकडील गलबतात तोफा व हत्यार व मानूस वगैरेसी ठेऊन सवदागार व फतेमार वगैरे चढोण त्या वगैरेसी लुटणेसी पाटवीत आहा बाजेवख्ती कुंपणीच इलाखेदाराकडील डोणी वगैरेसी लुटून घेणेस्तव पाटविला तर बहुशा कुंपणी सरकार यैसे कामासी पाहून उगच राहाणेसी होत नाही यास्तव आपण कुंपणीसी केले तें लुकसानेसी घ्याव म्हणून करार जाहल व त्यानी मागितल त्यासी इतला देस असेत म्हणून ते समई आमाहाराजानी कबूलही केले त्यासी हावेले पर्यंत कांहीं पावत करून दिल्ह नाहीत बंदरच अमदरफ्ती अस जोपर्यंत पैसाही आदा केले नाही व सवदागारावरी हंगामा करणेच विषईही कांहीं कसूर जाहाल नाही यास्तव साहेबासी हे मसलहत इजहार करणे लाजम आहे कीं माहाराजाचे मुल्काच ब्राषंदेनी दुसर मुल्कासी जाऊन कांही लेवादेवी करावी म्हणून इरादा असल्यास माहाराजाची इलाखेदारानी यैसे चोरीच कामा हरगीज न करावा गुजरल ते कामास मुंबईचे सरदार गौरनर डंकीन साहेबासी करार करून बंदोबस्त करावी जे येईदा आम्हाकडील लोकांनी कोणी येणार जाणारासी कांही लुटी वगैरे करून लुकसान न करतील हरकत न होईल म्हणून या गोष्टीस माहाराजानी जामिनी द्यावा माहाराजानी जेव्हा पर्यंत येणे प्रमाणे न कराल तवपावेतो बंदर बंद असल. माहाराजाची खातिरमुबारकेसी रोषन होये हमेशा खेरखुषालीनामोसी कलमी फर्माऊन न्याहत खुषी हासील करवीत असले पाहिजे. रा॥

छ २७ येप्रील सन १८०४ इसवी मुताबिक छ.१५ माहे मोहरम मोकाम मुंबई पौ छ ३ माहे सफर सुा (पौ. ता. १३–५–१८०४)
आर्बा मयातेन व आलफ

लेखांक ३३९ तारीख २७–४–१८०४

रु. नं. १

अ. नं. २३६

मेहरबान दोस्ता दिनकर पंत सलाम हू.
अजतर जर्नेल वलजली बहादर सलाम आंकी यैसीजे खुषी जाणोन आसाहेबी आपली खुशी कळमी करणार असल्याहीजे दरिविळा आपण छ ५ मोहरमच खत पाटविले ते पोहचोन कलमी केले मजकूर जाहीर जाहाला तुमच इरादा प्रमाणे आम्ही कर्नल कुल्स साहेब बहादर यासी चिकोडी व मनोलीच बाबेत लिहून पाटविले आस आणि जंजिरे सिंधुदुर्गच बाबेत महाराज राजे साहेबासी एक खरिता करऊन पाटविल अस त्याची नक्कल येक तुम्हासी कलणेस्तव पाटविल अस तर हे तुम्ही वाचून पाहणेवरून आमची मनातील भाव तुम्हास कलल हे खरितसी[१] पुढ जलद पाटवणे मौसुफ याजकड रवाना करून पाटवणे कलल पाहिजे ता छ २७ येप्रील सन १८०४ इसवी मु॥ छ १६ माहे मोहरम जियादा काय लिा प्यार असे कीजे हे किताबत हू.

लेखांक ३४० तारीख १०–७–१८०४

श्री

रु. नं. १ तालीक

अ. नं. २८६

सो मेहरबान दोस्ता सिदोजीराव नाईक निंबाळकर साहेब

जनरेल वजली बाहादर सलाम डंकी येथील खुषी जाणोन आपली शादमानी कलमी करीत असले पाहिजे दरिविला अजम दौलतराव घोरपडे गजेंद्रगडकर याची चिरंजीव राजेश्री संभाजीराव घोरपडे हिंदुराव यासी सोनी आपले भेटीस्तव म्हणोंन बोलाऊन पाटवून त्यानी आपणासी येऊन भेटल्यानंतर त्यासी कैदेत ठेविला आहा म्हणोन जाहीर जाहल्यावरून साहेबासी कलमी केले असे तरी याबाबेत त्यानी घराणदार उमदेलोक आहेत त्यासी ऐस करणे मुनासिब नव्हे सांप्रत साहेबानी मेहरबानी करून मशारनिलेसी कैदेतून सोडून पाटऊन देणे आया होय. याबाबेत दराज लिहिणें काय असे रा॥ छ १०

१ (लखोटा)

जुलई सन १८०४ इसवी. मुताबिक छ २ रबिलाखर ज्यार मोहबत असो दीजे ह किता-ब्रती लाखोटेवर लिहिले असे

सो मेहरबान दोस्ता सिदोजीराव नाईक निंबाळकर
सो

थैलीचे चिटीवरी लिहिले असे सो मेहरबान दोस्ता सिदोजीराव नाईक निंबाळकर सो

रवाना पत्र हुजूरुन वि।। राजश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर तो राजश्री हरि रघुनाथ नि।। घोरपडे मा।।रनिले छ १२ माहे जमादिलावल सुा खमस मयातैन व आलफ श्रावण शुद्ध त्रयोदसी रविवासर दर जागा करवीर.

(ता. १९-८-१८०४)

लेखांक ३४१

पौ तारीख २२-७-१८०४

श्री तालीक

रु. नं. १

अ. नं १६३

सेवेशी देवी नाईक याची विज्ञापणा पेशजी नागोजीराव घाटगे झुंजारराव हे वकलात करीत होते त्याचा काल जाहाला हली इंग्रजी सरकारची वकालतीची आज्ञा राजश्री उमदेतुलउमराव बाहादर यासी करावी म्हणोन माहाराज स्वामीची आज्ञा जाहाली म्हणोन राजश्री महिपतराव पारसनीस व व्यंकटराव याणी सांगितलेवरून मान्य जाहाले स्वामीचे आज्ञेप्रो स्वामी सेवेत चालणेत आंतर होणार नाही सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा पौ छ १४ माहे रा।।खर उर्फ आषाढमास सु।। खमस मयातैन व आलफ याप्रमाणे त्याचे पत्र

लेखांक ३४२

तारीख १४-८-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २४०

श्रीमंत माहाराज राजश्री———————छत्रपति
स्वामी याचे चरण सेवशी

विनंती शेवक देवजी नाईक वाडीकर कृतानेक विज्ञापना रक्ताक्षिनाम संवच्छरे श्रावण शुद्ध ९ परयंत स्वामी याचे कृपाकटाक्षे सर्व यथास्थित असे विशेष माहाराजाकडून निरोप घेऊन आलो तो सुखरूपे येऊन पोहचून हजरत बाहादर याचें मुलाखतीमुले

स्वामीनी हमराहा दिले ते पत्र सुध्रा वस्त्र जिनस हजर ठेऊन निरोपिले मजकुराची अर्जी करून घेतलेवर ते वस्त्र ठेऊन घेऊन (फाटलें आहे) रवाना करून दिले आहेत ते मजकुरास हजरतानीही लि॥ अहात तेणेवरून संन्निधाणास विदिता होईल पुण्यशील लक्ष्मीबाई सो भोसले सरदेसाई याचा आपआपलेमध्ये बखेडा पडले समई माहाराजाकडून कुमकीस फौज आणविले होते त्याचे खर्चाबा यैवज निमित्य त्यानी या मुलुकातील गाव आपले कैदेत आणवीत आहू म्हणून निरोप जाहाला होता त्यांच प्रमाणे येथे हजरत खावंदाकडस दखल केलेवरून अजम लक्ष्मीबाई भोसल सरदेसाई यानी आपले कुमकीसच म्हणून आणविले त्यास येकीकडे ठेऊन त्याचे दुसमानास मदत करून आबादेत ठेविले तयावरून बाई भोसले सरदेसाई याजकडून सिबंदी खर्चाचे पैके कोणते सनदेवर घ्याल? येकंदर त्याजवर व त्याचे मुलुकावर तंटा बखेडा करणे काम मुनासब नाही म्हणून स्पष्ट जवाब कां दिल्हा नाही यैसे आम्हावर फारयत्राज मर्जी करून हुकूम फर्माविले करिता संन्निधानी विनंती करून घेतली आहे विदित होय प्रसंगी सामोपच्यारे स्वालजवाब करून माहाराजाकडील काम होत असल्या करावे न हून बलत्कार योजिलेवर काम ठीक नाही आम्ही खावंदानी फर्माविले ब॥ स्वामी याजकड जाऊन वाजबी सरकारचे नमकहलालीने स्वालेजवाब करून आलेस तमाम हे प्रांती आपणाकड कांही गैबत रुशवतचे काम होऊन वाडी वगैरे मुलुकावर शरावत बेलाशक करावे कुंपनी सरकारातून कुमकही देविले जाईल येसे कितेक बेवखुबी जवाब सवाल येकाचे मान प्राण हरण होणेचें बाद आवाई जाहालेकडून काय म्हणावे आपले सनिधानी कोणकोणते जवाब सवाल जाहालेचे ध्यानी ठेविले असाल व आमचे मानसनमान काय काय केले आहात अगर आम्हास काय दिल्हे आहात हे आपले ध्यानी असेलच यैसे असता याप्रकारे चोहीकड झूट छिल्लक लौकीक घडलेने कैसे व्हावे यावरून आपलें मातबरी दरबारचे किमत होत असते हे कामाची चांगली दर्याप्त करून यैसे बे ज्या टी क पु का रा (फाटलें आहे) ध्यानी घेऊन लिहून पाठवीतसे केले पाहिजे आजतागायत आमचे दरबारचे (फाटलें आहे) काडीमात्र आम्ही करणेस आम्ही जाणार नाहीत आगर स्वामीनीही आम्हास निरोपणेचे दम नाही यावर माहाराजाची मर्जी विलायती रिवाजाचे जिनस कांही खरेदी करून पाटविणेविसी आज्ञा करून १५०० पंधराशेह रुपये पनाली देविले त्यास गोवे ११२५ अकराशेह पंचवीस ठरलेच रास जिनसचे पटी केली आहे त्याजप्रो हशलचे मकादम याजकडून जिनस रुजू करून घेतलेस निरकाप्रो रुपयेही ध्यानी घेतले पाहिजे राजेश्री शिवरामराव भोसले यांजवर पाचशेहे रुपये सरोसमदीप होता पण आजलग आम्हास रुपये पोहचले नाहीत हेविसी विस्तारे लिहून घेणेस लागत नाही सदैव सेवकावर कृपाविष्ठचित असून समाचार घेणेस समर्थ असा हे विज्ञाप्ती वाकूमर हेलनाईक ताजा कलम-

हजरत बहादर याणी लिहिले ते कागद व मौतीचा कंटासुदा येहूर मार्गाने संनिधानी विदित होय.

पौ. छ १९ माहे जमादिलावल सु॥ खमस
मयातैन व आलफ दर जागा करवीर

(पौ २६-८-१८०४)

लेखांक ३४३ तारीख २६--८--१८०४

श्री हू

रु. नं. १
अ. नं. २८८

अजम कर्नेल कलोस बहादर कामयाब बाशंद शौकत व एकबालपनाह शाहामत व मवाकत दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिविला हुजूर नी इजत असार दिनकर आपाजी या हमराह खतूत फिरिस्ताद केले ते रसीद जाहाले त्यावरून व मोभिइले याचे जुबानीवरून मुफसील मजमून इजहार होऊन शादमानी हासील जाहाली आजम सिदोजीराव नाईक निंबाळकर याजकडील हुजूर ठाणी मनोली तालुके सुधा व चिकोडी तालुकेतील गावे हुजूर येणेस दिवसगत करून जाली हे कदीम दोस्तदारास लाजीम नसे अशास निपाणकर मशारुनइले यास ठाण मनोली तालुकेसुधा व चिकोडी तालुकेतील गाव जे असतील ते हुजूर देणे म्हणोन ताकीद सख्त इबलाग करावी व पटवर्धन याजकडून हुजूर प्रांतास हरजमरज होतो व पांढरे पाडाव गेले ते यावे येबाबे अजम जनराल वसली बाहादर यास इनायेतनामा फिरिस्ताद जाहला त्याज वरून आजम रामचंद्र परशराम यासी जनराल बहादर याही ताकीद रवाना केली त्याची नकल हुजूर आली त्यात पांढरे याजविसी निगारीश केले नाही तरी पांढरे याची खलासी होऊ नये इत करावे या समयी हुजूरचे कार्य भाग करून कदीम दोस्तीचा नामनामोस तमाम आलमात मशहूर होय ते करावा हे लाजीम असता बिसयार कलमी करणे काय आस बाकी मजकुराची आज्ञा मोमिइले यास जाहाली आहे आज्ञे मवाफी कलमी करतील त्यावरून मालूम होईल जियादयेचे निगास्त्र आयेंद. रवाना

छ. १९ माहे जमादिलावल आयाम बकाम बाद सिक्याचे मोर्तब.
सु॥ खमस मयातैन व आलफ

शौकत व अवाली पनाह

अजम कर्नेल कलोस बाहादर मुकाम पुना कामयाब बाशंद

लखोटेवर लिहिणेचा मजकूर.

लेखांक ३४४ तारीख २६-८-१८०४

रु. नं. १

अ. नं. २८९

छत्रपति

तालीक

साहेब मेहरबा करम फर्माये दोस्ता अजम करनेल कलोस बाहादर दाम मोहबत हू दिनकर आपाजी बाअदज सलाम आंके येथील खैरियत तौा छ १९ जा।वल पर्यंत जाणोन शादमानी कल्मी करून दिलखुषी करीत असावे दरिविला आपणापासून रुखसत होऊन निघालो ते छ ४ जा।वली श्रीमन्महाराज राजश्री स्वामी याचे पोहोचून खतूत खुशनमत बमे थैली प्रविष्ट केल जुबानीही बयावार मजकूर ज्याहीर केला त्यावरून इनायतनामा बमे थैली घेऊन आसाहेबाकडे पाठविला आहे त्यावरून मालूम होईल कुंपणी इंग्रज बहादर याची व हुजूर कदीम दोस्ती हर करार असता या समयी माहाराजाचे मनोदयानरूप कार्यभाग उलगडून येणेस दिवसगत लागली सबब कोणत समयी जवाब जाहाला त्यास यावख्ती माहाराजाचे मनोदयानरूप कार्यभाग करून कीर्ती अलमात मशहूर करावयाची शरम आसाहेबास असता एखलासमंदानी बिसीयार कल्मी करणे काये आहे मनोली ठाणे तालुकेसुधा व चिकोडी तालुकेतील गाव राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर निपाणकर याजकडे आहेत ते सुटून हुजूर आले नाहीत यैस वाजबी जाबसाल उलगडून येणेस दिवसगत लागो नये तैसच्च पटवर्धन याचा सिलसिला प्रांतास लागतो व पांढरे याचाही जाबसाल जाहाला नाही याप्रमाणे आज्ञा जाहाली त्यास आंसाहेबाचे लक्षात इतक्या गोष्टी आहेत माहाराजाचे मनोदयानरूप कार्यभाग होऊन येतील याजप्रमाणे आंसाहेबी सांगितले आहे यैसी विनंती केली आहे परंतु ही कामे हाली उलगडण्यांत आंसाहेबी आणली पाहिजेत म्हणजे येखलासमंदासही येण्यास चांगले जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो दीजे हे किताबत रवाना सु॥ खमस मयातैन व अलफ.

लेखांक ३४५ तारीख ३०-८-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २९०

आज्ञापत्र राजमंडल ता॥ मोकदमानी मौजे लाट क॥ इचलकरंजी सुा खमस मयातैन व अलफ शत्रूकडील जमाव पेंढारी वगैरे जागाजागा कुरुंदवाड वगैर ठिकाणी

जाहाला आहे म्हणोन निवेदनात आले परंतु मौजे मजकुराकडून बातमी वतमान विनंती पत्री लिहून पाटविले नाहीं हे ठीक नसे तरी मौजे मजकुरी सावधपणे राहून नदीच्या तोंडास लोक ठेऊन बंदोबस्त करून कुरुंदवाड मिरज वगैर जागेची बातमी बरचेवरी आणवित जाऊन बातमी वर्तमान हुजूर विनंती पत्री लिहून पाटवीत जाणे. आणि करवीरासही बातमी लिहून पाटवणे जाणिजे र॥ छ २३ जा॥वल मोा सुद.

लेखांक ३४६ तारीख ९-९-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २३९

स्वस्ति श्री राज्यभिषेक शके १३१ रक्ताक्षिनाम संवत्सरे भाद्रपद शुध्ध पंचगी रविवासरे क्षेत्रिय कुलवतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजश्री देवीनाईक दुभाषी यास आज्ञा केली यैसीजे स्वामीचे सेवेशी तुम्ही विनंती पत्र पाटविलत हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला मेणा व जिनस हुजूर पाटविला त्यास यादीबरहुकूम प्रविष्ट जाहाला राजश्री प्रीतीराव चवाण उमदेतुलउमराव बहादर यासी तुम्ही व राजश्री व्यंकेटराव कृष्णा याणी पत्रे पाटविली ती निवेदने जाहाली यावरून तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी समक्ष आज्ञा जाहाली आहे त्याअन्वये आजम कर्नल सर उलीम कलारक याच खतुत घेऊन व्यंकेटराव मारनिले यासी हुजूर पाठऊ देणे प्रस्तुत वाडीकर सांवतानी मेढतील लोक जाया करून व कांहीं जखमी करून मेढ उठविले याजकरिता त्याचे बंदोबस्तास राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा याची रवानगी फौजेसुधा जाहाली आहे. हा मजकूर कलारक यासी कलवणे.

लेखांक ३४७ तारीख १२-९-१८०४

रु. नं. १

अ. नं. २९१

छ ७ माहे जमादिलाखर उर्फ भाद्रपदमास शके १३१ रक्ताक्षीनाम संवत्सरे सुा खमास मयातैन व आलफ

हुजरून अजम करनेल कलोस बहादर यास इनायते

नामा पटवर्धन याजकडून हुजूरचे प्रांतात उप-

सर्ग होत होता तो न व्हावा असे अजम जनरल वजली बहादर कर्नाटकांत जातेसमई हुजूरचे वकीलाचे विद्यमाने ठरले असता आलीकडे हुजूरचे फौजेकडून उपसर्ग जाहाला म्हणोन तुम्हास सांगितले त्यावरून खतुत पाटविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लिहिला मजकूर

जाहीर जाहाला आसता त्याजकडून पेंढारी येऊन चिकोडी तालुकेतील मौजे भिरडी वगैरे गावची व रायबाग व वारणे नजीकचे गावची गुरे नेहली याचा बंदोबस्त न होता जाबसाल सांगतात याजकरिता तुम्हास इनायेतनामा सादर जाहाला आहे त्यास जनरल बाहादर याणी हुजूरचे प्रांतात उपसर्ग न करणेविसी पटवर्धनास ताकीद केली आहे त्याप्रमाणे चालत ऐसे खत पाटवून हुजूरचे प्रांतात उपसर्ग न लागे ते करावे पेशजी राजश्री दिनकर आपाजी याणी तूर्त हुजूरचे जाबसाल तुम्हाघडून उलगडून यावेत व पांढरे व यादव याची सुटका व्हावी येविसीचा मार म॥निले याणी तुम्हास सांगितला आहे त्यास हुजूरचे जाबसाल उलगडावेत व पांढरे व यादव याची सुटका करून हुजूर उभयेता येत ते करावे तसेच ठाणे मनोली तालुकेसुधा व हुकीरी तर्फेतील गाव निंबाल्कर याजकडून हुजूर सुटून यावे त्यास दिनकर आपाजी याणी तुम्हासी बोलिले तेव्हा मशारनिल पुणीयासी आल्यावर दर्याप्त होऊन मोकलीक होईल ये यैस सांगितले त्यास तेही पुण्यास गेले आहेत त्यास ताकीद होवून त्याच्या सोडचिठ्या पाठवून द्याव्या.

१ बारीक पानाचा नवा वजन८८१
येक सेर पका व च्याहदानी येक
येणेप्रमाणे आगत्य पाटवणे.

याद होऊन त्याच्या सोडचिठ्या पाटवून द्याव्या पांढरे व यादव याची मोकलीक व्हावी येविसी आज्ञा याही सांगोन पांढरे व यादव याची मोकलीक होऊन हुजूर येत करावे.

लेखांक ३४८ तारीख १८-९-१८०४

तालीक

रु. नं. १
अ. नं. १६६

आजम करणेल कलोस बाहादर कामयाब
बाशंद

शौकत व एकबाल पनाह शाहामत व मवाकत दस्तगाह बाअदज इस्वियाक फिरावा मशहूद आंकी दरिविला पटवर्धन याजकडून हुजूर चे ताअलुकियात हरज मरज करितात तो न व्हावा येबाबे आमारत व अयालत पनाह अजम जनराल वजली बहादर कर्नाटकात जातेसमई हुजूर वकीलाचे विद्यमाने ताकीद केली असता हुजूर चे फौजकडून उपसर्ग जाहाला म्हणोन सांगितले त्यावरून खतुत फिरिस्ताद केले ते प्रविष्ट होऊन कलमी केला मजमून इजहार जाहाला असता फिलहाल पटवर्धन याजकडून पेंढारा याने

चिकोडी तालुकेतील मोजे भिरडी वगैरे रायबाग व वारणे नजीकचे गावची गुरे नेहली असता जाबसाल सांगतात बइसबाब इनायेतनामा सादर जाहाला आहे त्यास जनराल बाहदर याही हुजूर चे ताअलुकियात उपद्रव न करणे म्हणोन पटवर्धन यास ताकीद केली आहे बंदा मोसिफ पटवर्धन यास खत इबलाग करून हुजूर ताअलुकीयात उपसर्ग न लागे ते करावे आणि ठाणे मनोली ताअलुकेसुधा व चिकोडी तालुकेतील गाव राजश्री शिदोजीराव नाईक निंबाल्कर निपाणकर याजकडील हुजूर यावे येविसी दिनकर आपाजी यानी सांगितले तेव्हा निपाणकर मोमिइलेणी यास आलेवर दर्यास्त करून मोकलीक चिठ्या घेऊन इबलाग करितो येसे सांगितले त्यास दरिविला निपाणकर मशारुनइले पुणीयास गेले आहेत त्यास ताकीद करून सोडचिठ्या घेऊन फिरिस्ताद करवाव व पांढरे व यादव या हरदोची मोकलीक व्हावी येविसी मौसुफ याणी सांगितले आहे अशास पांढरे व यादव या उभयताची मोकलीक होऊन हुजूर येत ते करावे हमखाली अखबार खैरियेत असार निगरीष करून शादमानी हासील होय ते करावे जियादयेचे निगास्तष आयेद रवाना छ ७ माहे जमादिलाखर

मोर्तब शिक्याचे

रवाना छ ९ माहे सु॥ खमास मयातेन व आलफ उर्फ भाद्रपद मास शके १३१ रक्ताक्षिनाम संवत्सरे.

तारीख २०–९–१८०४

लेखांक ३४९

श्री

रु. नं. १

अ. नं. २९२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षि नामसंवत्सरे भाद्रपद बहुल प्रतिपदा गुरुवासरे क्षत्रिय कुलवतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी समस्तसेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रामचंद्रराव घोरपडे सेनापति यासी आज्ञा केली यैसीजे वो राजश्री गंगाधरभट व रामकृष्णभट बिन बापूभट गोत्र भारद्वाज सूत्र अश्वलायन उपनाम मुनेश्वर श्री पूजक क्षेत्र करवीर यानी स्वामी सन्निध करवीरचे मुकामी विनंती केली कीं श्रीस निरंतर नैव्यद्य समर्पण होऊन आपला योगक्षेम चालावा याजकरिता पेशजी कसबे लाट प्रांत हुकेरी या गावी इनाम जमीन करून दिल्ही आहे त्याप्रमाणे स्वामी कृपाळू होऊन जमीन करार करून देऊन भोगवटियास सनदा सादर व्हाव्या म्हणोन विदित केले त्याजवरून स्वामी कृपाळू होऊन का मार येथे इनाम जमीन बिघे ८३ इतर

८३ माल जमीन बिघे ८७ मालकी इनाम बिघे

८१०

येकूण जमीन बिघे दाह कुलबाब कुलकानु हालीपटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून दिल्ही असे तरी आपण सदरहू जमीन चतुःसिमा करून स्वाधीन करावी आणि इनाम जमीन यास व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवावी सालदरसाल नवीन पत्रांचा उजूर न करिता त्या पत्राची तालीक लेहून घेऊन असल पत्र भोगवटियासी वोकडे द्यावे जाणिजे बहुत लिणे तरी सुज्ञ असा मोर्तब शिकेचे.

हे असल पत्र करवीरी बार बार बार
पुजारी याजकडे देणे

लेखांक ३५०　　　　तारीख २०-१०-१८०४

तालीक

रु. नं. १
अ, नं. २९५

आजम' करनेल कलोस बहादर कामयाबशंद

शौकत व थेकबाल पनाह शाहामत व मवाकत दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके दरिबिला हुजूर

खतुत फिरिस्ताद केले ते रसीद होऊन तमाम मजमून इजहार जाहाला अमारत व अयालत पनाह अजम जनराल वजली बाहादर याचे आगमन थोडके दिवसात पुणेस होणार म्हणोन निगारीष केले त्यावरुन हुजूर

शादमानी हासील जाहाली जनरल बहादर याचे येणे पुणेस होताच कलमी करून जाहीर होये ते करावे पटवर्धन याणी हुजूर सरदार पांढरे व यादव या हरदो उभयतास धरून नेहले आहेत त्यास पटवर्धन यास ताकीद सक्त करून पांढरे व यादव या उभयताची मोकलीक करून हारदोस हूजूर फिरिस्ताद करावे जियादयन्चे निगास्त आयेद रवाना छ १५ माहे रजब.

रवाना फडनाईक सु॥ खमस मयातैन व आलफ—दरजागा करवीर आश्विन बहुल त्रितीया रविवासरे.

लेखांक ३५१　　　　तारीख २१-१०-१८०४

हु॥

रु. नं. १
अ. नं. २९४

रफअत व अवाली पनाहत व आकारपरदाजा दस्तगाह अजम

कडून खतुत येऊन शादमानी रुयेदाद होत नसे तरी पैदरपै खतूत मरकूम करून हुजूर खुषवख्ती हासील

होये ते करीत जाणे फिलहाल हुजूर जाबसालाची आज्ञापत्री राजश्री श्रीनिवास गणेश यास फर्माविली आहे आज्ञेमवार्फीक जवाबसवाल करतील बाआदज शोकत व अवाली पन्हाह अजम करनेल कलोस बाहादर यासी बोलून चिकोडी तालुकेतील गाव व मनोलीचे ठाणे तालुकेसुध्दा अजम सिदोजीराव नाईक निंबाळकर निपाणकर याजकडे आहे ते सुटून हुजूर येई ते करणे आणि पांढरे व यादव या हरदो उभयताची मोकळीक करून हुजूर येऊन रसीद होय ते करणे जाणिजे र॥ छ १५ माहे रजब जियादा काय लिहिणे रवाना छ मजकूर उगफडनाईक सु॥ खमस मयातेन व आलफ दरजागा करवीर आश्विन बहुल त्रितीया रविवासरे

लेखांक ३५२ तारीख २४-१०-१८०८

हैदरी सरकार
रु. नं. १
अ. नं. २४१
(शिक्का)

श्रीमंत राजश्री शिवाजी महाराज
छत्रपति

साहेब मेहरबान आजीदिल येखलास

आली नवाब सलाम बादज सलाम आंकी येथील खैरयत जाणून आसाहेबी आपल खुशालीनामोसी कलमी करून दिल ताजा करणेसी खावंद विशालगढ पंत प्रतिनिधीकडे भेटीसी आला होता भेट होऊन आमच त्याच खुलाष होऊन पुढे पंढरपुरकडे जात होतो हजरतासी इतिला करून मुलाजमेतसी यैसीच इराद कडून मारुज केले आसे रुबरु जाहीर कराव म्हणून कलमी केल आसे विनंती चितासी आणून दरजवाब कलमी केल पाहिजे आमचे बडे ती॥ हजरत सुलतानच पोटी बरा लेक व भाई करीमसो येक येकून तेरा ग्वाविंद आहे हाली हजरत करीमसाचे लेक फत्तेआलीसो षाहाजादे मात्र बंदातून पार होऊन येऊन तो येशवंतराव होलकराजवळ आहे त्याशिवाय खासे षाहाजादे कोणी भाहीर आल नाही जे सुलतानाच लेक म्हणून नांव करून आले ते सर्वेही तोत्या आहे बिदित होये. आमही तरी सुलतानच हस्तबंदी दाखल त्याच करी कदीम आहे करिता हजरत फत्तेआलीसो षाहाजादे हमरहा आले होत त्यासी आमच नावी षाहाजादेच परवान सादर जाहाल आहे जे रो॥ यशवंतराव होलकर व दौलतराव शिंदे व नागपूरकरचा राजा भोसले वगैरेनी आमच स्वाभिमान धरल आहे कुमक करणार आहे तुम्ही बेफाम आसू नका थोडेबहुत जमेयत करून सरहदेश असव आम्ही नवे

जमीयेतसुदा होऊन दाखल होते असे म्हणून माहाराजासी पत्र लि॥ पाट-
विल तरी स्वाभिमान धरून कुमक करतील म्हणून आल आहे बमोजीब हुकूमजमयेत
करावा लागतो आपण खाविंद आहा सर्व गोष्टीसी सरबराई करून आमच उभारणी
करून आमच बंदी खलास करणेचा भार माहाराजास मिलाल असे आम्ही तरी बिलफैल
मिरजवरून पंढरपुरास जाऊन तेथे जमीयेत करणार आहो वाटेत माहाराज ता॥ लागत
आहे राहदारी करून कराव जे घास लकडी देणार उत्तरल जाता चौवकी पार आसण
म्हणून राहदारी लि॥ पाटवावे हजरत सलामत आपण खावंद

येक उंट येक घोडा दोनीहीं आपणाकडून आले म्हणजे आमच
काम फत्ते आहे करिता विनंती लिहील असे विदत होये याबाबे जादा लिहिणे काय अस
प्यार मोहबत असे हे किताबत तो छ १९ माहे रजब दरजागा मल्कापुर

शिका

पौ छ २० माहे रजब सुां खमास मयातैन व आलफ दरजागा करवीर.

लेखांक ३५३

तारीख ३०-१०-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २९६

राजश्री देवीनो दुभाषी गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बाहादर
रामराम विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जावे विशेष वाडीकर
सांवत याणी लबाडी केली याकरिता याच्या बंदोबस्तास राजेश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा
याची रवानगी फौजसुधा जाहली आहे हा मार सो मेहरबा आजम कर्णेल सरउलीम
कलारक बहादर यासी कलवावा वर्कड बोलणे तुम्हासी समक्ष जाहाले आहे त्याप्रो नमो-
दात आणोन राजश्री व्यंकटराव यासी पाटवून द्यावे चिकोडी तालुकेतील गाव व
मनोलीचे ठाणे तालुकेसुधा राजश्री सिदोजीराव नो निंबाल्कर निपाणकर याजकडे आहेत
ती सुटून हुजूर सत्वर येई ते करावे पंडित राजाआज्ञा वरचेवर तुम्हास पत्रे पाटवितील
त्याप्रमाणे जाबसाल करून उतरे पाटवीत जावी. कलावे रा॥ छ २५ माहे रजब बहुत काय
लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

सु॥ खमस मयातेन व आलफ आश्विन मास

लेखांक ३५४ तारीख ३१-१०-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २४३

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षि नाम सवत्सरे अश्विन बहुल त्रयोदसी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजेश्री देवीनाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे वाडीकर सांवत यानी लबाडी केली याजकरिता त्याचे बंदोबस्तास राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा याची रवाणगी फौज सुद्धा जाहाली आहे हा मार अजब कर्नेल सर उलीयेम कलारक यासी कलवावा वरकड बोलणेची आज्ञा समक्ष जाहाले आहे त्या प्रो नमोदात आणोन विनंती पत्र व राजेश्री व्यंकटराव कृष्ण यासी हुजूर पा द्यावे राजश्री सिदोजीराव ना निंबाळकर निपाणकर याजकडे चिकोडी तालुकतील गाव व मनोलीचे ठाणे तालुकेसुधा आहेत हुजूर सत्वर सुटून येत ते करावे वरकड मजकूर राजश्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बाहादर आज्ञेप्रो तुम्हास लिहितील त्यावरून कलल जाणिजे.

लेखांक ३५५ तारीख ३-११-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २४५

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १३१ रक्ताक्षि नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध प्रतिपदा मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री देवी नाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे वाडीकर सांवतानी लबाडी केली याजकरिता हुजूरून त्याचे बंदोबस्ताकरिता राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा याची फौज सुधा रवाणगी जाहाली आहे येविसी पेशजी तुम्हास आज्ञापत्रे सादर जाली आहेत पंडित मारनिले यासी रेडीचे किल्लेस जाऊन तेथील बंदोबस्त करावा म्हणोन आज्ञा होऊन तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे हली रेडीचे किल्लेचा बंदोबस्त करणे आणि फिरंगियाचे तालुक्यात उपसर्ग न करणेविसी आज्ञा जाली आहे तुम्हास हुजूर येणेविसी आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यास स्वामी आज्ञेनरूप कामकाजे उलघडोन घेऊन सत्वर निघोन हुजूर यावयाच करणे वरकड मजकूर राजेश्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बाहादर यासी आज्ञा जाहाली आहे अज्ञे प्रमाणे लिहितल त्यावरून कलो येईल जाणिजे रेडीचे बंदोबस्ताकरिता पंडित मशारनिल रवाना जाले आहेत तेथील बंदोबस्त करून येतील तुमचे प्रांतास उपसर्ग होऊं नये ऐसी आज्ञा समक्ष जाहाली आणि हलीही आज्ञापत्र सादर जाहाले आहे इंग्रजाचे दोस्तीत इकडून फेर यावयाचा नाही दुसरेच सांगणेवरू न जाता स्वास्त चित्त असू बाहेर वरकड कामकाजाचा मजकूर सांगितला आहे त्याप्रमाणे निपाण-

कर याजकड चिकोडी तालुकेचा गाव ठाणे मनोली तालुके सु॥ हुजूर यावयाचा मजकूर तुम्हास सांगितला त्याप्रमाणे नमोदातात आणून तुम्ही हुजूर जलदीने येणे ऐवज अद्याप तुम्हासी देणेचा यादीवर लि॥त्याप्रमाणे तोही ऐवज हुजूरन देऊन तुमची रवानगी केली जाईल सर्वत्र अजमं कलारक बहादर यास समजूत देऊन तुम्ही सत्वर हुजूर येणे.

लेखांक ३५६ तारीख ३-११-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २४४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षि नाम संवत्सरे कार्तिक शुद्ध प्रतिपदा मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री देवीनाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे वाडीकर सांवतानी लबाडी केली याजकरिता हुजूरून त्याचे बंदोबस्ताकरिता राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी फौजसुधा रवानगी जाहाली आहे येविसी पेशजी तुम्हास आज्ञापत्रे सादर जाहाली आहेत पंडित मशारनिले यासी रेडीचे किलेस जाऊन तेथील बंदोबस्त करावा म्हणोन आज्ञा जाली आहे तेथील बंदोबस्त करून येतील तुमचे × × यात उपसर्ग होऊ नये ऐसी आज्ञा समक्ष जाहाली आणखी हालीही आज्ञापत्र सादर जाहले आहे इंग्रजाचे दोस्तीत इकडून फेर यावयाचा नाही दुसरेच सांगणेवर न जाता स्वस्त चित असो देणे वरकड कामकाजाचा मजकूर कीं आज्ञा समक्ष जाहाली आहे त्या प्रो राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर निपाणकर याजकडील चिकोडी तालुकेतील गाव व मनोलीचे ठाणे तालुकेसुधा सुटून हुजूर यावयाचा मजकुराची तुम्हास आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे नमोद्यात आणोन तुम्ही हुजूर सत्वर यावयाचे करणे आषाढमासी याद ऐवज देणेचा टरला आहे त्या प्रमाणे तोही ऐवज हुजूरून देऊन तुमची रवानगी केली जाईल सर्व मजकूर आजम कर्नेल सर उलीम कलार्क यास कलवावा वरकड मजकूर आज्ञे प्रमाणे राजश्री प्रीतीराव च्व्हाण उमदउलउमराव बाहादर लिहितील त्यावरून कलेल आज्ञापत्र सादर होताच तुम्ही सत्वर निघोन हुजूर येणे.

लेखांक ३५७ तारीख ६-११-१८०४

रु. नं. १

अ. नं. २९७

अजम करनेल कलोस बहादर कामयाबबाशंद

शौकत व अवाली पनाह शाहामत व इजलाल दस्तगाह बाअदज इस्तियाक फिरावा मशहूद आंकी दरिविला हुजूर कडून खतूत खुश-

नमत येऊन कैफीयत इजहार होत नाही त्यास पैदरपै खैरीयत निगरीश करून शादमानी हासील होय ते करीत जावे पटवर्धन याजकडील पेंढारी येऊन चिकोडी व बागेवाडी व रायबाग तालुकेतील गुरे नेहली आहेत व गावगना उपसर्ग वरचेवर करीत आहेत याजकरिता माहलूम होणेकरिता कलमी जाहाले आहे पटवर्धन फिसाद फितना अंगेजी करीत असा तालुकीयात न व्हावा म्हणोन कलमी होते त्यावरून ताजूब आहे पांढरे व यादव ताहाल सुदून हुजर

आले नाहीत पटवर्धन यास हुजूर प्रांतास उपसर्ग न करणे म्हणोन ताकीद जाहाली असता वर्तणूक होत नाही त्यास ताकिदी बमोजीब पटवर्धन याजकडून वर्तणूक होय ते करून पांढरे व यादव याची मोकलीक होऊन येई ते

करावे गावगन्नाची गुरे पेंढारी याणी नेहली आहेत त्या गावच्या अर्ज दासबी आल्या त्याच्या तालका करून फिरिस्ताद जाहाल्या आहेत त्यावरून माअलूम होईल

कडून पटवर्धन याचा बंदोबस्त ताकिदी जाहालेस उत्तम नाहीतर त्याचा मोबदला करणेची आज्ञा होईल जियादयेचे निगास्तआयंद रवाना छ. १ माहे शाबन मोर्तब सीका

सुा खमस मयातैन आलफ रवाना छ २ माहे शाबान जासूद गु॥ कडे नाईक.

लेखांक २५८ तारीख १५-१२-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २५१

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातुश्री सुंदराबाई साहेब यानी चिरंजीव समस्त राजकार्यधुरंदर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर यासी आज्ञा केली ऐसीजे साहेबाचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र पाटविले ते प्रो होऊन लेखनार्थ श्रवण जाहाला नेरलीकराकडील व इंग्रजाकडील वर्तमान राजश्री मानसिंगराव पाटणकर याचे पत्री लिहिले आहे शेवेसी विनंती करतील म्हणोन विनंती पत्री लिहिले त्यासी मशारनिलेचे पत्रावरून व विनंती केलेवरून सविस्तर निवेदन जाहाले याजप्रमाणे वरचेवरी चौहूकडील वर्तमान विनंती पत्री लिहून पाटवीत जाणे जाणिजे सुा आर्बा मयातैन व आलफ रवाना छ १२ माहे रमजान बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३५९ तारीख २३-१२-१८०४

श्री

रु. नं. १

अ. नं. २५०

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षिनाम सवत्सर मार्गसीर्ष बहुल सप्तमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजमान्य राजश्री बाबूराव आंग्रे यासी आज्ञा केली ऐसीज चिरंजीव विजयीभव राजश्री राजे आबासो छेत्रपति याचा व्रतबंध फाल्गुन शुा द्वितीयेस व विवाह लग्नोउत्साह शुद्ध त्रयादसीस सुमुहूर्ते पाहून वधु राजेश्री नारायणराव खानवलेकर याची कन्या नेमस्त केली आहेत तरी समारंभास येणेविसी तुम्हास आज्ञा पत्र सादर जाहले असे आज्ञेप्रमाणे सहेपरिवारे तुम्ही व्रतबंधाचे व लग्नोउत्साहचे समारंमास यावयाचे करणे जाणिजे बहुत काय लिहिणे मोर्तब असे. राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षि नाम सवत्सर मार्गसीर्ष बहुल सप्तमीचे आज्ञापत्र मीरखान यांस श्रियासह चिरंजीव व विजयीभव राजेश्री राजे आबासाहेब छत्रपति याचा विवाह लग्नोत्साह फाल्गुन शुद्ध त्रयोदसीस बार करार होऊन वधु राजश्री नारायणराव खानवल्कर याची दुस्तर नेमस्त जाहाली आहे म्हणोन सन खमस मयातैन व अलफचे साली

हुजूरचे सेवसी विनंती पत्र आषाढ ७ सप्तमीचे रेणूकादास धुंडीराज नबाबाकडील कामदार याचे आले त्या विनंती पत्रात मजकूर श्रीमंत राजेश्री आबासाहेब माहाराज यांचा व्रतबंध फाल्गुन शुद्ध २ द्वितीयेस व विवाह लग्न शुद्ध त्रयोदसीस निश्चय जाहाला आहे म्हणोन मांगल युक्त लग्न पत्र राजेश्री मालजीराव घाटगे झुंजारराव याचे विद्यमाने प्राप्त होऊन अतिशय आनंद जाहला सांप्रत विवाहासंबंधी सिष्टाचारी त्या बहुमान वस्त्रे झुंजारराव मजकूर याचे विद्यमाने शेवेसी पाटविली आहेत तरी कृपा करून स्वीकार होऊन प्रत्यांतरी सनात करीत असिले पाहिजे म्हणोन पौ छ २४ माहे जमादिलाखर सु।। सीत मयातेन व आलफ दरजागा करवीर.

(ता. १८-९-१८०५)

लेखांक ३६० तारीख ३०-१२-१८०४

हु

रु. नं. १

अ. नं. २५२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३१ रक्ताक्षिनाम सवत्सरे मार्गसीर्स बहुल चतुरदसी रविवार क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजश्री देवीनाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्हाकडून राजश्री विठोजी नाईक जाधव

व राजश्री व्यंकटराव कृष्ण हुजूर आले त्यानी सविस्तर मजकूर निवेदन केला त्यावरून अजम करनल सर उलीम कलारक यासी इनायतनामेची थैली उभयता मशारनिले बराबर देऊन तुम्हाकडे पाटविले आहेत येऊन पोचतील वरकड सविस्तर मजकुराची आज्ञा उभयतास जाहाली आहे आज्ञे प्रमाणे तुम्हास सांगतील त्याप्रमाणे स्वामी सेवा करून विनंती पत्र पाठवावे जाणिजे लेखन सिमा

लेखांक ३६१ इ. स. १८०४

श्री

रु. नं. २

अ. नं. २ ५

फोंड सांवत रेडीस होत व सोम सांवत बायकामुलेसुधा वाडीस होत त्या घरावर लक्षुमीबाई सांवत व राजश्री श्रीराम सांवत याचे लोक चालून जाऊन घरास आग लाऊन जीवे मारावे त्यावरून सोम सांवत यानी सांगितले की आपणास जीवदान द्यावे आपण कौल घेऊन हुजूर जातो आणि तेथून आज्ञा घेऊन श्रीमाहायात्रेस जाईन ऐस म्हणत असता जबरदस्तीने घरास आग लावली तेथे दारूची बारल होती त्यामुले सोम सांवत कुटुंबासुधा दारूचे बारलेस आग लागून उडाले त्यावेळेस फोंड सांवत रेडीस होत त्याचाही बंदोबस्त करावा आणि किलाही घ्यावा म्हणोन रेडीस लोक पाटवून चौकी दिली तेव्हा फोंड सांवत याचे विनंती पत्र हुजूर आले जे यासमयी आपलेस जीवदान देऊन घेऊन जावे त्याजवरून राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी आज्ञा करून फौजसुधा पाठवून फोंड सांवत यासी आणविले ते समयी रेडीचा किला प्रांत सुधा हुजूर फोंड सांवत यानी स्वाधीन केला. तरी तुम्हाकडून रेडीच्या किल्यास व प्रांतास तोसीस लागू नये.

लेखांक ३६२ तारीख १-१-१८०५

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १३१ रक्ताक्षिनाम संवत्सर पौष श्रुध्द प्रतिपदा भौमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजेश्री देवी नाईक दुभाषी यास आज्ञा केली ऐसीजे राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा याजकडून विनंती पत्र हुजूर आले त्याची तालीक लेहून तुम्हाकड पाटविली आहे त्याजवरून कलेल वरकड आज्ञा होणे ती राजेश्री विठोजी नाईक जाधव व राजेश्री व्यंकटराव कृष्ण यासी होऊन आलाहिदा आज्ञापत्र सादर जाहाली आहेत त्याज प्रमाण जाबसाल उलघडून विनंती पत्र हुजूर पाटवणे हली व्यंकटराव कृष्ण याजबराबर रुपये पनाली एक हजार १००० पाटविले आहेत घेऊन पावलियाचे विनंती पत्र हुजूर पाटवणे.

लेखांक ३६३ तारीख १२–२–१८०५

श्री

रु. नं. १

अ. नं. २५४

राजेश्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव

बाहादरजी गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री॥ देवीनाईक रामराम विनंती उपरी येथील कुशल तागायत छ २३ माहे सवाल जाणोन स्वकीये कुषल लेखनी संतोषवीत असिले पाहिजे विशेस माघाराहून जलद राजेश्री विठोजी नाईक जाधव आपणाकडे येतील त्याजवरून कलो येईल थैली हुजूर विनंती पत्र पाठविले आणि हे प्रविष्ट करून कार्यभाग लिहिला तो गलवताचा रेडीत आहे गहाण ते देणेविसी आज्ञापत्र घेऊन पाटवावे गलवताचे जरूर असे याजकरिता मुजरत गडी पाठविला आहे वरकड मागाहून कलो येईल याविसी बहुत काय लिहिणे कृपालोभ असो दीजे. देवनाईक-

पौ॥ छ २ माहे जिलकाद सु॥ खमस मयातेन व आलफ दरजागा करवीर.

लेखांक ३६४ तारीख २५–८–१८०५

म/५२८

श्री

रु. नं. १

अ. नं. २५६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३२ क्रोधीनाम संवत्सरे भाद्रपद शुध्द प्रतिपदा रविवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रति स्वामी याणी राजश्री देवी नाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे पेशजी राजश्री व्यंकटराव कृष्णराव यासी हुजूर पाठवून देणेविसी तुम्हास आज्ञापत्रे सादर जाहाली असता मशारनिले यासी हुजूर पाटविले नाहीत याजवरून हल्ली तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले असे तरी मशारनिले यासी आज्ञापत्र सादर होतेक्षणी सत्वर हुजूर पाठवून देणे वरचेवरी तुम्हाकडील वर्तमान विनंती पत्री लेहून निवेदन होय ते करीत जाणे सूर्यकांती कुप्या हुजूर येऊन पोचल्या नाहीत तरी सूर्यकांती कुप्या पांच हुजूर पाठवून द्याव्या वरकड मजकूर आज्ञेप्रमाणे राजश्री प्रीतीराव चव्हाण उमदेउलउमराव बाहादर तुम्हास लिहितील त्यावरून कलो येईल जाणिजे.

लेखांक ३६५ तारीख १३–९–१८०५

श्री

रु. नं. १

अ. नं. ३०३

श्रीमंत महाराजे छत्रपति साहेब सलामत

करनेल कलोस साहेब बहादूर बाद सलाम
येथील खैरियेत ता छ १३ माहे सबटंबर पावेतो जाणून हमेशा तल-
दुफनामा पाटऊन शादमानी जावी दरिविला येकिण्यात आले कीं आपले
सरकारचा सरदार रघुनाथराव माने व हरीपंत भावे हे उभयता कोलापुराहून रुखसत
होऊन आजम सिदोजीराव नाईक निंबाल्कर याचे तालुकीयात येऊन मुकाम केला व
फौजबंदी करितात त्यासी आवल गोष्ट कीं हरीपंत भावे बंडवाले याणी बंड करून श्रीमंत
राव पंडत प्रधान बहादूर याचे तालुकीयाची खराबी केली हे गोष्ट माहाराजास रोशन
आहे सबब कलमी केले जाते कीं आपले सरकारचे सरदाराशी सामील होऊन

करीत असता हे काय मुनासब आहे व शिदोजीराव निंबाल्कर श्रीमंताचे नोकरी-
वर हजर आणि आपले सरदारानी त्याचे सरहदीवर फौज फशी केलीवरी तालुकीयाचे
नुकसान होऊन मा॥रनिले नोकरीत हजर होऊ सकनार नाही पेशजी मेहरबान जनराल
वलजलीसाहेब बहादूर याणी आपनास व सर्वत्र सरदारास सांगितले कीं आपलाल
तालुकीयात आसावे कोणी काणासी बोलू नये त्यासी शिदोजीराव कोणासी उपद्रव देत
नाही तरी महाराजानी आपले सरदारास बोलाऊन आणावे व हरीपंत भावे याजला
हुजूरीहून दूर करावे ज्यादा काय लि॥ फर्मावीत जावी हे किताबत
फर्मावित जावी हे किताबत

सही इंग्रजी

पौ छ २४ जा॥खर सु॥सीत मयातैन व अलफ दरजागा करवीर

लेखांक ३६६ तारीख ३-१०-१८०५

श्री

रु. नं. १

अ. नं. २५९

श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति माहाराजाचे

शेवेसी

शेवक गोविंद नरसिंव्ह तपाल मुछदी निसबत इंग्रज बहादर मुकाम लकडकोट
कृष्णानदी विज्ञापना प्रार्थना ऐसीजे मौजे सारापूर येथे अचीचे जासूद होते दरम्यान सारा-
पुरास वस्ती नाहीसी जाली म्हणून दुसरे गावी टपा बसविला हली सारापुरास वस्ती
जाहाली सबब पेशजीचे टप्यावर जासूद असावे म्हणोन सरकारची आज्ञा त्यावरून
दफेतदार व जासूद अचीचे सारापुरास गेले असता राजश्री हिंमतबहादर याजकडील
नरसिंगराव यानी पयादे पा जासूद बाहर घालविल आणि उत्तर केल कीं सरकारचा
हुकूम नाही स॥ माहाराजास विनंती पत्र लिहिले आहे माहाराजानी हिमतबहादर यास
ताकीद होऊन नरसिंगरावास ताकीद पत्र पा द्यावे सरकार कुंपनीचे कामाची नुकसानी
होऊ नये सारापुरावर टपा जर्नेल वसली बहादर गेले त्यावेळेस ठेऊन गेले आहेत

माहाराजानी विनंती मान्य करून ताकीद चिटी गावकरास व हिमतबहादर याजकडील नरसिंगराव यास पा देण्याची आज्ञा व्हावी शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पौ छ ९ माहे रजब सु॥ सीत मयातेन व आलफ दर जागा करवीर.

लेखांक ३६७ तारीख ८-११-१८०५

हु.

रु. नं. १

अ. नं. ३०५

अजम कर्नेल क्लोस बाहादर कामयाब बाशंद शौकत व अवाली पनाह शाहमत व मवाकत दस्तगाह बाआदज इस्तियाक फिरावा मशहूद आंके हरि गोपाल भावे व हरि बल्लाल केलकर याजविसी राजश्री बाजीराव पंडित प्रधान याची विनंती पत्रे व आ शौकतपनाहाची खतुते हुजूर आली ते समयी भावे पोसिंदा छपून होते ते जाहिरीत न आले बईसबब भावे गेले म्हणोन इनायेतनामा सादर जाहला होता भावे छपून होते त्याचा तलास लागताच भावे व त्याजबराबरील कारकून येक असामीसुधा धरून आणून कैदेत ठेविले आहेत केलकर याजविसी पेशजी हुजूर राजश्री सुबराव पंडित अमात्य यासी आज्ञापत्रे बावडेस सादर फरमाविली आहेत फिलहाल ही आज्ञापत्र पंत अमात्य याजकडे रवाना जाहाली आहेत येकबालपनाह कोंपणी इंग्रज बहादर याची कदीम दोस्ती चालत आली आहे व पंतप्रधान राज्यातील यख्तीयारी सेवक बाइसबब बंडवालेस आसरा द्यावयाचा नाही हे आ शौकत पनाहाच्या व त्याच्या समजण्यातच असता निगारीष करणे काये आहे लेकीन हुजूर
ची काजकामे होऊन येणे ती करून देण्याविसी पंतप्रधान याचे व आ शाहामतपनाहाचे लक्षात येत नाही हे वाजीबतर नसे त्यास कदीम दोस्तीवर नजर देऊन हुजूर
ची काजकामे करून कदीम दोस्तीचा नामनामोस अलमात मशहूर होये ते करावे ठाणे मनोली तालुकेसुधा व चिकोडी तालुकेतील गाव निपाणकर यानी दाबले आहेत ते सुटून यावे व पांढरे पटवर्धन यानी कैदेत ठेविले आहेत ते सुटावे ऐसे बोलणेत येऊन दोन वर्षे जाहाली असता अद्याप सुटत नाहीत दोस्तीचे जागा दिवसगती लागू नये पटवर्धन याजकडील ठाणे अष्ट व भिलवडी वगैरे गावातून प्रांतातील वतनदार चोर ठेऊन घेऊन दावे होतात आणि गावखेडी मारितात शरारत लाविली आहे पारपत्य करणेविसीची आज्ञा जाहाली असता गैरवाका लिहितात त्याचा धरबंद करावा अगर पारपत्य जाहाले असता त्याचा बोभाट न ऐकावा निपाणकर याचे तालुकेस उपसर्ग जाहाला नसता त्यानी गैरवाका लिहिल्यावरून आ शौकतपनाहाचे खतूत आले होते याला वाफीक तमाम सुगावा आहेत सांगणाराचे सुगवावरून अगर गैरवाका लिहिणेवरून येअतीबार न धरावा याची चवकसी होत असावी हे बेहत्तर

आहे. जियादयेचे निगास्त आयेंद. रवाना छ. १५ माहे शाबान
मोर्तब सिक्याचे.

रवाना छ. मजकूर सु॥ सीत मयातैन व आलफ कार्तिक वद्य द्वितीया भृगुवासरे बराबर सुभाना बापू यादव हुजूरे मौजे भाटणवाडकर

लेखांक ३६८ तारीख ९-१-१८०६

श्री

रु. नं १

अ. नं. २६२

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३२ क्रोधननाम संवत्सरे पौष बहुल पंचमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजश्री रामदास मनोहरदास नगरशेटे यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री रघुनाथ पै यानी हस्तीदंत प्रेमचंद मोदी आमदाबादी यासी हस्तीदंत खंडी सुमारी पावणे चौतीस खंडी मुंबईच्या

३३·।।।·

त्यास

बुरती

२५।=॥ सवा पंचवीस खंडी आडीच मण

दरमणी रुपये ५४॥= एकूण रुपये ४०७१९॥।= रती पंन्नवीस साडेसाहा आणे

२५।=॥

सवा पंचवीस खंडी अडीच मण दर मणी रुपये ५४॥= येकूणचाळीस हजार सातशेहे पावणेवीस रुपये दोन आणे जाहाल रुपये २७७१९॥।= सतावीस हजार सातसेहे पावणवीस व कर्जाऊ तारू व रुपये सन अरबा तिसैन मया व अलफ या सालात विकला त्या १३००० तेरा हजार रुपये ४०७१९॥।= सहली सन सीत मयातेन व अलफ पर्यंत वर्षे तेरा जाहली.

लेखांक ३६९ तारीख ९-१-१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २६३

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके १३२ क्रोधननाम संवत्सरे पोष बहुल पंचमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री रामदास मनोहरदास नगरशेटे यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंतीपत्र पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला व यादी दोन कलमबंदीच्या पाटविल्या त्या हुजूर

अवलोकन होऊन मखलासी युक्त मोर्तबी यादी दोनी सादर जाहाल्या आहेत व राजश्री गोपाळ सेट साफले व गोपाळ सेट कुसे या उभयतास तुमची खातरजमा करून देणेविसी आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे उभयताकडून खातरजमा करून घेऊन जंजिरे सिंधुदुर्गांचे नस्तावरील बोट व फतेमाऱ्या माघाऱ्या जंजिरे मुंबईस घेऊन जाऊन जंजिरे सिंधुदुर्गचे बंदर चालते करून स्वामीचे शेवेसी विंनतीपत्र पाठवणे वरकड मााराची आज्ञा सरूपजी खीरसागर हुजरे यासी जाहाली आहे. तुम्हास सांगेल त्याप्रमाणे स्वामी सेवा करावी.

लेखांक ३७० तारीख १४–१–१८०६

रु. नं ४

अ. नं. ३०७

श्रीमंत महाराजे छत्रपति साहेब सलामत अजी करनेल कलोस साहेब बहादूर सलाम खैरियेत मारुज आंके पेश आजी छ १५ शाबानचा होऊन मजमून दरजे इतला जाली मरकूम कलम जाला होता कीं दरिविला राव पंडत प्रधान बाहादूर याचे विनंतीपत्र व इज्यानबाचे खत आले त्याजवरून भावे याचा तलास करून त्याजला दस्तगर करून येक आसामी कारकून व भावे याजला धरून कैदेत ठेविले हे येकून बहुत खुषख्ती जाली व त्या खताचा नकल गौरनूर जनरल बहादूर याजकडे रो केली सरकार दौलत मदार कुंपणी बहादूर व सरकार या दोहि सरकारचे इस्तस्वाबामुळे हरिपंत भावे याजला धरून कैद केले त्याजवरून या मुकदमयाचा कार फर्माई पाहून गौरजनराल याचेपासी हे काम बहुत गुंतला व पडले व आमहरबानाचा तारीफ करून इज्यानबास इरशाद फरमाविली कीं याचा इतला असल्यास न्हावी सबब मजकूर लिहिण्यात आला रो छ १४ जानवारी १८०६

सही इंग्रजी

पौ छ २ माहे जिल्काद
सुा सीत मयतैन व आलफ
दरजागा करवीर

लेखांक ३७१ तारीख २९–१–१८०६

हु

रु. नं. ४

अ. नं. २०९

श्रीमंत माहाराजे छत्रपति साहेब सलामत अजी कर्णेल कलोस साहेब बहादूर बाद सलाम अंके येथील खैरियेत जाणोन हमेशा पाटवून सरफराजी

करीत असिले पाहिजे दरिविला रावसाहेब राव पंडत प्रतिनिधि याचे घरात मागती फिसाद नमूद जाला आहे हे वर्तमान श्रीमंत राव पंडत प्रधान बहादूर याजला जाहीर जाहाली यावर फिसादाचे फैसल्या करिता अजम बापूजीपंत गोखले याजला रवाना केले आहे तरी राव गोखले फिसादाचा फैसला करतील आपले खिदमतीस इतला व्हावी सबब मरकूम केले आहे रवाना छ. २९ जानेवारी जादाच

लेखांक ३७२ तारीख ३१--१--१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २७०

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी

शेवक फोंड सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल व महालानिहाय विज्ञापना तागाईत छ १० जिलकाद जाणून स्वकीय कुशल लेखनाआज्ञा केली पाहिजे विशेष आम्ही वाडीहून कुडाळास आलो हे वृत्त राजेश्री राणोजी नाईक निंबाळकर यानी लिहून पाठविले त्याजवरून सर्व विदित स्वामीस जालेच असेल आजपर्यंत स्वामीनी माझा अभिमान धरिला तो सिध्दीस पाववेतील हा भरवसा धरून आजपर्यंत राहिलो परंतु वनवास सुटेना दैवयोग आमचा त्यास स्वामी तरी काय करतील येरवी चित्ती धरिल्यास आमाहाराजास आगाध आहे असे नाही तीर्थरूप मातोश्री बाईसाहेब मोठ्या संकटात आहेत त्यास माहाराजाने मन्या म्हणविले हा लौकीकन धन्य आहे त्याचा अभिमान धरून मातोश्रीचे संकट दूर करून सर्व मनोदयानरूप सिधीस पाववणार स्वामी समथ आहेत खासा स्वारी खाली येणार हे ऐकीलेवरून आजपर्यंत मार्ग प्रत्यक्षा करीत होतो परंतु विलंभ दिसतो त्यास आमचे सर्वोपरी लक्ष स्वामीच्या चरणाकडे सत्यापक्षी वचन दिले पार पाडणार स्वाम समर्थ आहेत तूर्त हरयेक साहित्य करणेविसी राजश्री राणोजी नाईक निंबाळकर व राजश्री बच्चाजीपंत यास आज्ञा देऊन कार्यसिद्धी करणार माहाराज मनेजकर देसकते मनुष्य केवढे समर्थ ते किती परंतु पुस्तपाना त्यानी करून परागंदा जाहाले त्यास स्वस्थ कसे आणोन ठेविले माझेत सर्वप्रकारे स्वामी हा लवकीक सर्वत्रिक सिध्द असे असता अद्यापि श्रम सुटत नाही तस्मात दैवयोग माहाराज तरी काय करतील नाहीतर चिती आणीलयास माजा मनोरथ सिध्दीस पाववयास क्षीण लागणार नाही ही विनंती ध्यानी आणून आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना पौ छ २५ माहे जिलकाद सन सीत मयातेन व आलफ शके १३२ क्रोधननाम संवत्सरे माघ बहुल स्थिरवासर

लेखांक ३७३ तारीख १–२–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २६६

स्वस्ति श्री राज्याभिषेक शक १३२ क्रोधनाम संवत्सरे माघ शुद्ध त्रयोदसी मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजश्री देवी नाईक दुभासी यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंती पत्र राजश्री व्यंकटराव कृष्ण या समागमें पाटविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला हुजूर पिस्तुलाची जोडी तुम्ही पाटविली ती प्रविष्ट जाहाली शाहामत व अवाली पनाह अजम कर्नल सर उलीम कलारक यासी जनरालीची किताब जाहाला म्हणून तुम्ही विनंती पत्री विनंती लिहिली त्यावरून संतोष जाहला त्यास सर उलीम कलारक याचे खत हुजूर आलेवर हुजूरुन अनायतनामा सादर होईल हल्ली तुम्हास रुपये पनाली एकंदर रुपये आठशे व सनगे तिवट कंदी एक व दुपेटा लाल येक व सेलारी हिरवी येक व खण येक येकूण सनगे च्यार रवाना मशारनिलेबराबर जाहाली आहेत त्यास आठशे रुपये व सनगे चार पावली याचे विनंतो पत्र हुजूर पाठवून देणे. वरकड मजकूर आज्ञेप्रमाणे राजश्री प्रीतीराव चव्हाण उमदउलउमराव बहादर लिहितील त्यावरोन कलो येईल.

लेखांक ३७४ तारीख ५–२–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. ३०८

स्वस्तिश्री राज्याभिशेक शके १३२ क्रोधनाम संवत्सरे माघ बहुल द्वितीया सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजश्री देवी नाईक दुभासी यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र राजश्री व्यंकटराव कृष्ण यासमागमे पाटविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला हुजूर पिस्तुलाची जोडी येक तुम्ही पाटविली ती हुजूर प्रविष्ट जाहाली शौकत व अवाली पनाह अजम कर्नल सर उलीम कलारक यासी जनराल म्हणोन किताब जाहाला म्हणोन तुम्ही विनंतीपत्री विनंती लिहिली त्यावरून जनराल सर उलीम कलारक बाहादर म्हणोन अनायेतनामा सादर जाहाला आहे आणि हुजूरचे मनोलीचे ठाणे तालुकेसुधा राजश्री सिद्दोजीराव नाईकनिंबालकर निपाणीकर याजकडे आहे त्यास मनोलीचे ठाणेचा जाबसाल राजश्री सखारामराव घाटगे सर्ज्याराव याचे विद्येमाने पेशजी पुणेत तुटोन सर्ज्याराव याची सोडचिठी आली असता निपाणकर याणी मनोलीचे ठाणे हुजूर दिले नाही येविसीचे मजकुराची आज्ञा तुम्हास पेशजी समक्ष जाहाली आहे याजकरिता हली त्या

चिटीची तालीक कलारक बाहादर यास माअलूम होणेकरिता पाठविले आहे त्यास निपाणीकर यास ताकीद तुम्ही घेऊन पाटवावी जे हुजूरचे मनोलीचे ठाणे तालुके सुधा हुजूर देणे हली तुम्हास हुजूरून पनाली रुपय आठशे व सनग तिवठ कंदी १ येक व

८००

दुपटा लाल १ येक व सलारी हिरवी जरीकाठी नारली पदरी १ येक व खण हिरवा जरीकाटी १ येक येकून सनगे चार व रुपये आठशे पनाली मशारनिले बराबर रवाना जाहाले आहेत त्यास सनगे चार व रुपये आठशे पनाली पावले याचे विनंतीपत्र हुजूर पाठऊन देणे वरकडे मजकूर आज्ञे प्रमाणे राजश्री प्रीतीराव चवाण उमदेतुलउमरावबहादर लिहितील त्यावरून कलेल हाली हुजुरून यादी तुम्हास सादर जाहाली आहे त्याप्रमाणे जिनस व फुलझाडाची कलमे व बी यादी प्रमाणे द सामान व्यंकटराव याजबराबर देऊन हुजूर पाटवून देणे जाणिजे लेखन सिमा मार्तब रवाना छ. १७ जिल्काद सुा सीत मयातैन व अलफ दर जागा करवीर.

लेखांक ३७५ तारीख १५–२–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २६७

चिरंजीव राजमान्य राजेश्री सिदरामराव भोसले सुभेदार व राणोजी नाईक निंबाळकर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री फोंड सांवत भोसले सरदेसाई प्रांत कुडाल व माहालानिहाय याची हुजूर विनंती पत्रे आली त्याच्या तालका तुम्हाकडे पाटविल्या आहेत त्यावरून कळेल ऐसीयासी तुम्ही व ते येकविचारे असोन काजकामे कर्ण हुजूर लग्नोत्साहा जाहालेनंतर खासा स्वारीही सत्वरच होत आहे जाणिजे सुा सीत मयातेन व आलफ रवाना छ २५ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे.

लेखांक ३७६ तारीख १५–२–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २६९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३२ क्रोधननाम संवत्सरे माघ बहुल द्वादसी स्थिर-वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमान्य राजश्री फोंड सांवत भोसले सरदेसाई प्रांा कुडाळ व माा हाय यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे

शेवेसी तुम्ही विनंतीपत्र पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला विनंती पत्री तपसिले निष्टेची भाव लिहिला त्यावरून तुमचे विनंती पत्र येताच चिरंजीव राजेश्री सिदरामराव भोसले सुभेदार याची रवानगी करून पाटविली आहेत आणि राजेश्री राणोजी नाईक निंबाळकर किले प्रसिद्धगड यासी आज्ञापत्र सादर जाले आहे तुम्हाकडील कारकून हुजूर पाठवून देणे तुम्ही आपले व पुण्यसील लक्ष्मीबाई याचे पुरावाविसी विनंती लिहिली त्यास तुमचे पुरावाविसी हुजूरने आज्ञा होतच आहे तुमचा लक्ष हुजूरचे ठाई राहून वर्तणूक खातरपण होत असावी लग्न समारंभामुले स्वारी मकूब जाहाली लग्न कार्ये जालेवरी खासा स्वारीही होत आहे वरकड मजकुरची आज्ञा उभयतास जाहाली आहे त्याजकडे कारकून पाटवून देणे आणि त्यासी तुम्ही मार समजून देणे तेही हुजूर विनंती पत्रे पाठवितील त्यासही आज्ञापत्रे सादर होतील र।। छ २५ जिल्काद सन सीत मयातेन व अलफ शक १३२ क्रोधनाम सवत्सर माघ बहुल द्वादसी स्थिरवासर राजश्री पंत राजाज्ञा याचे पत्राचा जाब हुजूराचे आज्ञापत्रावरून कलो येईल.

लेखांक ३७७ तारीख २२-३-१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. २७३

राजेश्री रत्नाकर पंत अपा राजाज्ञा गोसावी यासी सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। मल्हारराव आंग्रे वज्यारतमाआब सरखेल मु।। बंदर मुंबई रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत असावे विशेष आपणास पेशजी विनंती पत्र पाटविले ते पावले असता उत्तरच पाठविले नाही तरी ऐसे नसावे सदेव हरयेक येणारा वार्तिका समवेत पत्र पाटवून सांभाल जाहला पाहिजे यानंतरी संस्थान प्रकर्णी आपणास विदितच आहे प्राण राहाणे दुरापस्त म्हणोन पांच सहा वर्षे येथे काल क्रमणा केली सांप्रत खर्चावेचाची तंगचाई व खुराकी पोशाकीचा कसाला बहुत तो पत्री कोटवर ल्याहाव प्राप्त प्रसंगामुळें साहाकरी आपणा व्यतिरिक्त भरवसा आणिकाचा नाही येथे फाके कसीने प्राण जातो त्या अर्थी आपणास व माहाराजास विनंती पत्रे लिहिली आहेत त्याच मनन होऊन बंदोबस्त जाला पाहिजे निघोन येण्याविसी महाराजाची आज्ञापत्राची मार्गप्रतीक्षा करीत आहो त्यास आपण मन घालोन आज्ञापत्र घेऊन व आपले पत्राची उत्तरे आली म्हणजे येऊ सारांष स्वाम चरणाजवळ चाकरी व्हावी हाच भाव समजोन सेवेसी पत्रे लिहिली आहेत कलावे रवाना छ १ मोहरम बहुत काय लिहिने कृपालोभ कीजे हे विनंती पौ छ २७ मोहरम सु।। सीत मयातैन व आलफ.

लेखांक ३७८ तारीख २३-३-१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. १७४

राजश्री शिवाजीराजे छत्रपति संस्थान

कोल्हापूर स्वामी गोसावी यास

श्री सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्री सवाई बसवलिंग राजे संस्थान सोंधा कृतानेक रामराम विनंती उपरी येथील कुशल क्षेम सवत्सरे चैत्र शुद्ध त्रये रविवासरे जाणोन स्वकीयानैथदैभवास लेखन करून संतोषाधिवृध्दी विशेषात्कारे व्हावी तो अर्थ केला पाहिजे विशेष पेशजी हसनखान नामे समागमे आम्हाकडील कित्येक मजकूर पत्रान्नी आपलेस त्रिध्यानास प्रसिला आसता योगानिरूप प्रत्योतराचा लाभ प्राप्त जाहाला नाही आमित्राचे प्राबेल्यात स्थल च्युत होऊन परस्यली हरतरेकडून आजवरी काल हरण करीत आलो दुष्ट लोकाचे आश्रयापास्तवपन्नाचेत सिध्दीस प्रविष्ट होणे सर्वथव होणार नाही व याजवर हरयेक विषईचा निर्वाह करणे दुस्तर तत्रापि विश्वविख्यात प्रताप सूर्य श्री शंकरावतारी कैलासवासी राजश्री छत्रपति याही दुष्ट शाषेन सत्यर्थ स्वपानार्थ भूलोकी आमानुष्य चरित्रे प्रवर्तल्या पासोन आमचे वडिलपरंपरा या संस्थानाठाई बहुतेक कृपा ममतायुक्त चालऊन सांभाल करीत आले आहेत प्रस्तुतचे औवतार असर मूर्ति आपण आहा या भावेनिच्या श्रेयन कर्तव्य कर्तव्य मैयदा श्रेय हा निच्छय करून हली मिनाजखान यास सन्निध्यानी निवेदन करणेचा अर्थ निरोपून रा केला आहे सन्निधीचे दर्शनांती सविस्तर अन्वये विनंती करील दिव्य अंतकरणी आणून आपले मर्जीत येईल त्यामार्गे संस्थानी स्थापणा करऊन शाश्वत यषः कीर्तीच्या अंगीकार केला पाहिजे कायावाचामाणशे आपले पदरी प्रविष्ट झालेने असोव्हा आपले मनोवथीचा सिधांत असोन प्रत्योतराचे अनघर्य लाभाविषई तत्परते दंभावलोकन करीत असो म्हणजे तदनरूप प्रर्वत करावयास येईल येद्रिशईची उपेक्षा आपले संनिध्यानास योग्यता पावणार नाही राजश्री यशवंतराव होळकर यास एक पत्र आम्हाकडून पाटविला असे आपणा तर्फेचे आज्ञापत्र जात असतील त्यासमागमे प्रविष्ट होऊन उत्तर आल्यास आम्ही सर्व प्रकारे आपले सन्निधाणाचा आश्रय केला आहे म्हणायाचे अर्थस तेथवर भलाचे प्रसंगी दाखला होईल याजविशी सर्वज्ञतेचे जागा विस्तारे लेखन करणे नलगे कृपालोभ कीजे श्रुत.

पौ छ १७ माहे सफर सु॥ सीत
मयातैन व आलफ दर जागा
करवीर.

को. घ. ३ १९

लेखांक ३७९

तारीख १९-४-१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. ७७४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३३ क्षयनाम सवत्सरे वैशाख शुद्ध प्रतिपदा स्थिरवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी राजश्री रामदास मनोहरदास नगरसेट यासी आज्ञा केली ऐसीजे पेशजी तुमच्या विनंती लिहिले अन्वये हुजूर यादी करारान्च्या स्वरूपजी खीरसागर हुजरे याजबरोबर सादर जाहाल्या आहेत त्याज प्रमाण जाबसाल उलघडून घेऊन जंजिर सिंदुदुर्गंच नस्तावरील बोट व फतमार या माघाऱ्या जंजिरे मुंबईस लेहून जंजिर सिंदुदुर्गंच चालत कराव वरकड मजकुराची आज्ञा आज्ञापत्री राजश्री बाळाजी बापोजी यासी जाहाली आहे त्यावरून कळल जाणिजे लेखन सिमा मार्तब सिक्याचे सु॥ सीत मयातैन व आलफ छ २९ मोहरम उर्फ चैत्रमास दर जागा करवीर.

लेखांक ३८०

तारीख ७-८-१८०६

श्री

मसुदा तालीक

रु. नं. १

अ. नं. १७८

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके १३३ क्षयनामसवत्सरे आधिक श्रावण बहुल आष्टमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री मल्हारराव आंगरे सरखेल यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र पाटविले ते प्रा होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला व स्वरूपजी खीरसागर हुजरे यानी तुम्हाकडील मजकुराची विनंती केली त्यावरून निवेदनात आले आशास येविसीची आज्ञा होणे ती राजश्री बालाजी बापूजी व खीरसागर मार यासी जाहली आहे. तुम्हास सांगतील त्यावरून कलेल जाणिजे.

लेखांक ३८१

तारीख ७-८-१८०६

श्री

मसुदा

तालीक

रु. नं. १

अ. नं. १७९

स्वस्ति श्री राज्याभिषेक १३३ क्षयनामसवत्सरे अधिक श्रावण बहुल आष्टमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजश्री रामदास मनोहर-

दास नगरसेटे बंदर मुंबई यासी आज्ञा केली यैसीज स्वामीचे शेवशी तुम्ही विनंती पत्र पाटविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला व सरूपजी खीरसागर हुजरे याने विनंती केलेवरून आवगत जाहाले अशास राजश्री गोपालशेट सापले व गोपालशेट कुशे या उभयतास हुजूर आणोन त्याची व राजश्री बालाजी बापोजी याची रुजवात होऊन उभयता साउकार यासी समक्ष आज्ञा जाहाली आहे उभयता साहुकार याणी हुजूर विनंती केली जे तुम्हाकडे गुमस्ते तुमची खातरजमा होये यैसे पाटऊन देऊन तुमची खातरजमा करून देतो याप्रमाणें होऊन बालाजी बपोजी याची व खीरसागर हुजरे याची रवानगी जाहाली आहे तरी पेशजीच्या यादी प्रमाणें जंजिरे सिंधुदुर्ग येथील बंदरचा जाबसाल उलगडून घेऊन हुजूर विनंती पत्र पावणे.

लेखांक ३८२ — तारीख ७–८–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. १८० — मसुदा तालीक

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३३ क्षयनामसंवत्सरे आधिक श्रावण बहुल आष्टमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री धोंडो बलाल यास आज्ञा केली येसीजे स्वामीचे सेवेशी तुम्ही विनंती पत्र पाटविले तेथे लिहिले सरूपजी खीरसागर हुजरे जंजिरे सिंदुदुर्गाचे जाबसालाकरिता येथे आले होते ते हुजूरचे सेवेशी आले आहेत त्याजपासी स्वामीचे सेवेशी विनंती करावयाविसी सांगितले आहे विनंती करतील सेवकास मुंबईस जावयाचे आहे गेले नंतर हुजूरचे काजकामाविसी आजम जनराल डंकीण यासी बोलऊन जाबसाल नमोदात आणितो सेवक स्वामीचे आज्ञेचा आहे स्वामी सेवेविसी आंतर पडावयाचा नाही म्हणोन तपशीले विनंतीपत्री लिहिले व खीरसागर याणीही विनंती केली त्यावरून सविस्तर निवेदनात आले आशास येविसीची आज्ञा राजश्री बालाजी बापूजी व खीरसागर यासी जाहाली आहे तुम्हास सांगतील त्या प्रमाणें काजकामे नमोदात आणोन हुजूर विनंतीपत्री लेहून पाटवणे गावचे मा।राविसी विनंती लिहिली त्यासी येविसीची आज्ञा उभयेतास जाहाली आहे तुम्हास सांगतील त्यावरून कलेल.

लेखांक ३८३ — तारीख १२–८–१८०६

श्री

रु. नं. १

अ. नं. १८२

राजश्री सुभानजी माने हुजरे यास आज्ञा केली ऐसीजे सु।।सबा मयातेन व आलफ हुजूरून राजश्री येशवंतराव होलकर यासी सुपारी लवंगी वजन पके ८८२ दोन

शेर विठोजी यादव जासूद या समागमे रवाना जाहाली आहे त्यास पावती करून पाव-लियाचे विनंती पत्र घेऊन स्वामीचे सेवशी पाटऊन देणे जाणिजे रवाना छ २६ माहे जमादिलवल.

लेखांक ३८४ तारीख २०-११-१८०६

श्री

रु. नं. ४

अ. नं. २१९

यादी स्मरणार्थ कलमबंदी येणे प्रो माहाराज जवल विनंती करावयाची कलमे सु॥ सबा मयातेन व आलफ

१ राजेश्री भगवंतराव प्रतिनिधि याजकडील गाव इनामी पेशजी पासून आहे दरम्यान श्रीमंत नाना फडणीस कैलासवासी जाल्यापासून गावची जप्ती करून वसूल घेतला आहे तो माघारा द्यावयाची आज्ञा व गावास सोडचिठी पेशजी वहिवाटी अन-वये चालवणे म्हणोन आज्ञा कलम.

१ इंग्रजची आपली दोस्ती पुढे नेहमी चालली पाहिजे यास्तव कामकाज उलगडल्या-नंतर मेजवानी इंग्रज बहादूर यास केली म्हणजे चांगले पडेल मुत्सदीही संतुष्ट होतील संतुष्ट जाले असता किरकोळ कामास दिकत पडावयाची नाही व माहाराजाकडून पेशजी पोषाक आले होते परंतु दोस्ती जाल्याच्या पूर्वी घेणार नाही म्हणून बोलून परत जाले पुढे तुमची आमची दोस्ती जाहल्यानंतर तुम्ही आम्हास द्यावे व आम्ही तुम्हास देऊ ऐसे बोलण्यात आले आहे यास्तव माहाराजाची मर्जीस आल्यास उत्तम. या खर्चाचा अजमास रुपये पांच हजार येणे प्रो कलम.

१ सेवक माहाराजाचा पूर्वापार बाळाजी जनार्दन याचे घर व माहाराजाचे घर दोन नाही तेव्हा ते सोडून कैलासवासी जाले त्याचे मागे आम्हास माहाराज कुटुंबाची बेगमी व अब्रू उर्मत चालत आल्याप्रमाणे चालवणे माहाराजाकडे येविषी सरूपजी खीरसागर हुजरे याजला विनंती करावयास सांगितले व हली रघुनाथ पै याजला विनंती करावयास सांगितले आहे त्याप्रमाणे विनंती करतील त्या अन्वये योग्यास योग्य गाव नेमून इनाम द्याव याची आज्ञा कलम.

१ पेशजी राजश्री बालाजीराम याचे विद्यमाने करार सावकार याचे देणे नागावा बद्दल ठराव याचे बोलने पै यास माहीत आहे ते सविस्तर विनंती करतील सरूपजी हुजरे गेल्यानंतर दुसरे दिवसी खटला निघाला तो इतकियात पै येऊन पोहोचले यास विचारता कांही खटला आहे असे बोलले त्याजवरून सेवेसी पै विनंती करिता येईल त्यापैकी एक सावकार याचे म्हणे आहे की वीस हजार रुपये सरकार तिजोरीत पावले बाकी पस्तीस हजार रुो येणे स्मर्णार्थ यादी कलमेबंदी येणे प्रमाणे राहिले ते मागतात

त्याचा खटला हली आहे हल्ली सावकार फिर्याद जाला त्याचे बोलणे सेवेशी विनंती लिहिली आहे———कलम

१ रघुनाथ पै मुंबईत पिस्तोले जोडी व कुत्री याची जोडी येणेप्रमाणे पाहात होते ती माहाराजाच्या पसंती योग्य न मिले त्यास आम्ही मुंबईस माहाराजाच्या पत्राचे उत्तर आल्यानंतर जावयाचे आहे तेसमयी तलास करून दोनी जोड्या मिळवून माहाराजाकडे रवाना करू.

—
५

येणे प्रमाणे पांच कलमे लिहिली आहेत समजून घेऊन उत्तरे व कर्णेयात यावी. छ ९ रमजान.

लेखांक ३८५ इ. स. १८०६–०७

श्री

आज्ञापत्र राजमंडळ ताो मोकदमानी मौजे बोरीवडे तर्फ सातवे सु॥ सबा मयातैन व आलफ मौजे मजकूर पैकीं पडजमीन बिघे ५ श्रीचे काठीचे खर्चाबद्दल इनाम करून दिली असे तरी सनदे प्रमाणे जमीन पांच बिघे नेमून घेऊन वंशपरंपरेने अनभऊन सालदरसाल श्रीचे उत्साहास काटी करवीरी घेऊन येत जाणे.

लेखांक ३८६ इ. स. १८०६–०७

श्री

रु. नं. १

अ. नं. १९३

यादी किले सामानगड सुा सबा मयातैन व अलफ माहे शौबाल

जखीरीचे सामान

	कैली जिनस		वजनी जिन्नस
१०	भातखंडी सिवरात्र सुद्धा	१	तेल खंडी एक
		·।·	शिवरात्री बद्दल
१	मीरशेंगा खंडी	·॥·	कोटीकडे
१	उडीद खंडी	——	
१	धने खंडी	१	
·॥·	मीट	१०	दारु खंडी
——		८२	सिसे
१३॥.		——	
		११८२	

सुमारी गोल्या
१५००, तोफेचे आणि
अदगडा
४०००० बंदुकीची
———

कारखाना येशवंत दरवाजे नजीक फण-
साचे झाडा नजीक विहीर नवी काढीत
आहेत..............................कलम
१

लोक
१०० पाहारी चौकीचे
१५० सदरस
———
२५०
७० इतलाखशिबंदी
३० पेठ रखवाली बा।
२० पेटेत
१० भेटासभोवते
———
३०
———
३५५

लेखाक ३८७ तारीख २-१-१८०७

श्री

रु. नं. ४

अ. नं. २२१

श्रीमंत सकल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित मातोश्री सुंदराबाई साहेब यानी समस्त राजकार्यधुरंदर विश्वासनिधि राजमाने राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी आज्ञा केली ऐसीजे आपण साहेबाचे सेवेसी विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रीवण जाहला ओला हरभरा पाटविले प्रमाणे येवूण शेवेसी प्रविष्ट जाहला जाणिज सुा सबा मयातैन व आलफ रवाना छ २२ माहे सोवाल बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

लेखांक ३८८ तारीख ४-१-१८०७

रु. नं. ४

अ. नं. २२३

श्रीमंत माहाराजे छत्रपति साहेब दाम
येकबाल हू
अजी कर्णेल कलोस साहेब बहादूर
आके येथील खैरीयेत जाणून हमेशा शादमानी करीत जावी दरिविला श्रीमंत साहेबाचे

आज्ञेवरून अज्ञ्म बापूजी पंत गोखले हे पंतप्रतिनिधि याचे तालुकियाचे बंदोबस्ताकरिता रवाना जाहाले आहेत ऐसीयास याबाबे मेहरबान सदाशिवपंत भाऊ यानी आ मेहरबानास कलमी केले आहे तरी आपणसही या सरकारचे खैरखुसी आहेत तरी राव गोखले यासी होऊन श्रीमंत साहेबाची आज्ञा व मरजी रजावंद ठेवतील. जादा काय लिहिणे रा। छ ४ जानेवारी सन १८०७ इसवी.

हे किताबत

लेखांक ३८९ तारीख २१-१-१८०७

श्री

रु. नं. १
अ. नं. ११३

यादी सांवताकडील मार विचारला त्याचा वाका
लिहून दिल्हा त्याचा तपशील

१ संभु माहाराज सातारीयाहून अरैनबे पातशाहा याची स्वारी दक्षेणकडे आले ते समई सातारियाहून धरून नेले ते समई रामराजे पनाल्कर चंदी चंदावरास गेले मुल्कास धनी कोन्ही नाहीसा जाला तेव्हा सांवत देसाई याणी चार लोक बळाऊन मुलुख कोंकण-बंधारी राखोन राहिले पुढे महाराज आपल्या संस्थानावर पनालियास आले मग देसाई सांवत यानी मर्दुमी करून मुलुख राखिला सबब सरफरास होऊन तीन लक्षाचा सरंजाम देऊन चाकर केले नंतर तैसेच चाकरी करून होते पुढे कालेकरून महाराजाची कमती पाहून कधी चाकरीस आले कधी न आले त्यात रामराजे आसताना याप्रमाणे जाले त्या आलीकडे जबरदस्तीमुळे संभु महाराजाच्या कारकीर्दीत आगदीच आले नाहीत त्या आलीकडे शिवाजी महाराज हाली आहेत याबराबर सिंद्याचे हिमाइतिने वाकडे पडून लढू लागल येणे प्रमाणे हाकीकत ———————— कलम.

१ हली तोंडीचा जाबसाल इंग्रज बहादर यास सांगितल्याने पुण्यशील लक्ष्मीबाई भोसले याचा मुलुख तीन लक्षाचा आहे त्यापैकी फिरंगी याजकडे पाऊन लक्षाची जिल्हे आहे ती आसो द्यावी व श्रीमंत पेशवे याजकडे पनास हजाराचे जिल्हे आहे व आपणाकडे पंचवीस हजाराची ठेवावी आणि पुण्यशील लक्ष्मीबाई यास तूर्त बेजमीस पनास हजार याची जिल्हे द्यावी बाकी मुलुख महाराजाकडे आसावा येणे प्रमाणे कलम

२

येणे प्रमाणे दोन कलमे लिहून दिली परंतु महाराजाचे विनंती पत्रात लिहिले आहे कीं इंग्रज बहादर यानी विचारिले कीं महाराजाकडील नांवनिशी व सांवताकडील मुलुख कसा आहे तो लिहून हाली तोंडीचे जाबसालाचे कलम लिहिले त्यात पंचवीस हजाराची इंग्रज बहादर याजकडे जिल्हे आसावी असे लिहिले परंतु माहाराजाकडून उतर येईल त्या आज्ञेप्रमाणे करू. येणे प्रमाणे जाबसाल मिती पौष्य शुद्ध १२ शके १७२८

लेखांक ३९०

तारीख ४–६–१८०७

श्री

रु. नं. १

अ. नं. २७६

अजम जोनाथन डंकन साहेब गोवर्णदोर जनराल जंजिरे मुंबे अर्जदाद स्वरूपजी हुजरे नि॥ शिवाजी माहाराज पत्रकाय कोल्हापूरकर अर्ज करितो की रा धोंडोपंत निदसुरे याचे विद्यमाने जबाबसाल जाहाला होता की राज्याची पत्रे आणून घ्यावी नंतर मालवणच्या नस्तावर बोटी आहेत त्या उठवितो त्याजवर माहाराज याचे कागद धोंडोपंतानी आणून घेतले बोटी अद्यापपर्यंत उटवावयाचा बेत जाला नाही व धोंडोपंत साष्टीस निघोन गेले आपल्या दिलाशावरून हिमत धरून राहिला आहे प्रजन्यकाल समीप आला मसलतीचा बेत कांहीच नजरेस येत नाही साहेबाकडून मसलतीचा पका दिलासा आहे तैसी आसावा का जर याकामासंबंधे माहाराजानी आपल्या कदमापासी ठेविले आहे व ह्या कामाचे येश फिदवीस यावे उमेद फार आहे त्यात साहेबाचा दिलासा असल्यास पाऊसकाल आला म्हणून फिदवी करितो धोंडोपंत याच्या सांगितल्यावरून राज्याची खातरजमा करून आलो होतो कीं येका महिन्यांत मसलतीचा फैसला करून येतो मसलत तर पकी जाली यात गुंता नाही याचप्रमाणे साहेबाकडूनही दिलासा जाहाला होता कीं आरमार ठेऊ नये तेही राज्याने कबूल केले परंतु अद्याप त्याचे खातरजमेसारिखा जाबसाल जाला नाही आपण तर खावंद आहेत फिदवीस येश देणार साहेब धनी समर्थ आहेत.

मिती शके १७२९ प्रभावनाम संवत्सरे वैशाख वद्य १३

लेखांक ३९१

तारीख ८–१०–१८०७

स्वस्ते श्री राज्याभिषेक शके १३४ प्रभव नामसवत्सर अश्विन शुद्ध सप्तमी गुरुवासरे क्षेत्रिय कुलावतस श्री राजा शिव छत्रपति स्वामी यानी रघोतम हैबतराव बहादर यासी आज्ञा कली ऐसीजे स्वामीचे शेवेसी आपणाकडून विनंती पत्र येऊन साकल्यार्थ निवेदनात होत नाही तरी विनंतीपत्री सविस्तर वृथ लेहून निवेदनात येईल ते करीत जावे प्रस्तुत चिरंजीव सखल सौभाग्यादिसंपन्न वज्रचुडेमंडित बन्याबाई घाटगे याची रवाणगी नागपुरास जाहाली आहे त्यास गंगातीरास नागपुराहून सरंजाम येऊन पोचणार तोपर्यंत गंगातीरी वाणेखेड येथे मोकाम व्हावयाचा याजकरिता आपणास आज्ञापत्र सादर झाला आहे तरी आपले अमलदार वाणेखडास असतील त्यास ताकीद पाठवावी जे सरंजामसुद्धा ठाणेत येऊन जागजुगीची सोय करून देऊन येथास्थित उस्तवारी करावी नागपुराहून सरंजाम येऊन पोचल नंतर पुढे निघोन जाजतील जाणिजे—

सु॥ समान मयातैन व अलफ छ ७

माहे शाबान

लेखांक ३९२ तारीख २०-११-१८०७

श्री

रु. नं. १

अ. नं. २७७

यादी निपाणकराकडील व घोरपडे सेनापति याची कामे सरकारातून होऊन येणे सुा समान मयातेन व आलफ बी तपसील कलमे

१ निपाणीकर

१ मजती कर्यातीतील कमते; ताकीद देविली उभयतास आज्ञा जाहाली आहे

१ हडलगेच्या सनदा; सनदा देविल्या आहेत

घोरपडे सेनापति

१ गाव भुदरगड तनख्यातील ध्यावयाचे मोबदला गाव येणे औरनाळ शिपूर हे दोनगाव मोबदला साडेचार गावे पावती सदरहू साडेचार गावचे येणे

१ नारो सदासिव याचे विद्यमाने सरदेशमुखी पनाळा पंचमहाल पैकी गल्ला व नक्त येणे

२२२॥ का कोडोली

१०० किले पावनगड व गला खंडी ३॥।

७६ वाडी रत्नागिरी

१८९ ता खानापूर गड घेरा गाव ४० व गल्ला कैली ८३

५८७॥। ३॥।३

रामचंद्रराव घोरपडेच दाखले प्रमाणे नारो सदासिव याजकड स्वाधीन केली

१ वस्त्रे राजश्री सरलष्कर याचे विाने यावी ती वस्त्रे राजश्री सरलष्कर याजकड दिली

१ ~~वंटमुरकराचे वतनाचा अमल रा॥~~ ज्यानराव जाधव याचे विद्यमाने बोलणे ठरले आहे त्या प्रो ताकीदपत्र व हुजूरे देऊन अमल बसऊन देवावा

कलम

ज्यानराव जाधव याचे वि॥ ठराव बोलणेचा जाहला त्या प्रमाण ताकीद देविली असे

येणे प्रमाणे कलमाचा फडशा करून देवावयाची आज्ञा व्हावी हुजूरची ठाणी भोज व भिरडी व शिरगूर तिनी उदईक प्रातकाली राजश्री सरलष्कर याजकडे जाऊन सदरहू तिनी ठाणी हुजूरची हुजूर स्वाधीन करून देतो छ १९ रमजान.

लेखांक ३९३ तारीख २४-५-१८०८

श्री

रु. नं. १

अ. नं. ३२०

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री नारायणराव पाटणकर सरलष्कर यासी आज्ञा केली ऐसीजे किले सोनगड येथे राजश्री सखाराम शंकर यासी पेशजी असामी करार करून देऊन नेमणूक रुपये १०० शंभर दर सालीना देऊन सेवा घेत जाणेविसी आज्ञा पत्र सादर जाहाले होते त्याप्रमाणे मा।।रनिलेची आसामी चालत नाही म्हणोन हुजूर विदित जाहाले याजवरून हाली आज्ञापत्र सादर जाहाले आहे तर साल दरसाल नेमणूक देऊन सेवा घेत जाणे फिरोन आज्ञापत्राचा उजूर न धरिता आसामी चालवीत जाणे येविसी किले मजकुरास तुम्हाकडील ताकीद देऊन आज्ञेप्रमाणे मा।।रनिलेची आसामी वेतन देऊन चालवणे जाणिजे सु।। समान मयातेन व आलफ रा।। छ २७ माहे रबिलावल

लेखांक ३९४ तारीख २७-११-१८०८

श्री

रु. नं. ४

अ. नं. २३२

समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्ये राजेश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी आज्ञा केली ऐसीजे राजेश्री सुब्राव पंडित आमात्य याच्या बाबती गावगनानी आहेत त्या हुजूरने आज्ञा होऊन मोकल्या जाहल्या आहेत तरी आपण जिकडील तिकडे मोकलचिट्या देऊन बाबती पंडित मशारनिले याजकडे पावत्या होय ते करावे सदर्हू गला व नक्तीसुद्धा पावते करवावे जाणिजे सु।। तिसा मयातेन व आलफ रवाना छ ८ माहे शवल सदरहू अरब याचा उपसर्ग राजेश्री मोरेश्वरराव पंडित यासी लागो न द्यावा छ मजकूर बहुत लिहिणे तर सुज्ञ असा.

लेखांक ३९५ तारीख २०-३-१८०९

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३२५

पौ छ ४ माहे सफर उर्फ चैत्र शु।। पंचमी सु।। तिसा मयातेन व अलफ दर जागा करवीर

राजश्री रत्नाकरपंत आपा राजाज्ञा गोसावी यासी सकलगुणालकरण अखंडित लक्ष्मी

अलंकृत राजमान्य श्नो॥ सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलस्कर दंडवत विनंती उपरी येथील क्षेम त॥ छ ३ माहे सफर पावतो जाणोन स्वकीय लेखन करीत असले पाहिजे विशेष आपणाकडून कृष्णाजी जासूद आला त्याणी जबानी सांगितले जे राजाज्ञा व नानासाहेब याची स्वारी श्रीचे डोंगरास आली त्याणी लस्कर कूच होऊन पुढे गेले सडी स्वारी मोकामी असल्यास सत्वर पाहून येणविसी सांगितल आहे म्हणोन जासुदान जबानी सांगितले आपले पत्र अगर पूर्व सूचना कांहीं नव्हती आणि राजश्री गोविंदराव घाटगे व भगवंतराव मोरे आले त्याचे बोलणेतही आपली स्वारी येणेचा संकेत कांहीच बोलले नाहीत त्यास आपण याप्रमाणे जासुदास सांगितल होत किंव्हा याणेच आपले मने बोलिला हे समजले नाही यास्तव लिा असे बहूत काय लिहिणं लोभ कीज ही विनंती.

लेखांक ३९६ तारीख–१४–११–१८०९

श्री

रु. नं. १

अ. नं. २८१

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३६ शुक्लनाम सवंत्सरे कार्तिग शु॥ सप्तमी भोमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमाने राजश्री चंदुलाल यासी आज्ञा केली ऐसीजे नवाबवालाजेनाब याही राजेश्री प्रीतीराव चव्हाण हिंमतबाहादर ममलकतमदार उमदेउलउमराव बाहादर यासी कदीम जाहागीर किल्ले नलदुर्गसुधा बाहाल करून देतो त्यास राजश्री उदाजी चव्हाण हिंमतबाहादर याची रवानगी जमयेतसुद्धा करून द्यावी म्हणून इनायतनामा फिरिस्ताद जाहला होता याजकरिता उमदेउलउमराव बहादर याही कारकून राजेश्री बाळाजी मल्हार पाटविले आहेत सर्व मजकूर नवाबवालाजनाब यासी जाहीर करून कदीम जाहागीर किले नलदुर्ग वगैरे तालुकेसुद्धा पूर्वतप्रमाणे भाली करून देऊन हुजूर विनंती पत्री लिहुन पाटवावे म्हणजे राजेश्री उदाजी चव्हाण हिमतबहादर जमीयेतसुद्धा येऊन पोहचतील जाणिजे बहुत काय लिहिणे पुढ मोर्तब.

लेखांक ३९७ तारीख–७–६–१८१०

श्री

रु. नं. १

अ. नं. २८४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३६ प्रमोद नाम संवत्सरे जेष्ट शु। पंचमी गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमान्य राजश्री धोंडो बल्लाल यासी आज्ञा केली ऐसीजे पेशजी तुम्हास हुजूरचे रुपये चार हजार मुंबई

सिका राजेश्री सरूपजी खीरसागर हुजूरे वकील याचेविद्यमाने तुम्हा जवळ आहेत ते रुपये व्याज सुधा चार हजार साडेसातशेहे जाहाले ते सरूपजी खीरसागर हुजूर वकील याचे पदरी असे चार हजार साडेसातसेहे घालून हुजूर पाटवून देणेविषी तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले असता खीरसागर हुजूरे वकील यासी तुम्ही पत्राची उतरे छ ५ रा।-करच व ७ रा।करचे पाटविले त्याच्या नकला हुजूर निवेदन जाहाल्यावरून तुम्हास आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी आज्ञे प्रमाणे रुपये चार हजार साडेसातसेहे मुंबई सिका स्वरूपजी खीरसागर हुजूरे वकील याचे पदरी घालून हुजूर पाटवून देणे येविसी दुसरे आज्ञापत्राचा उजूर न धरणे जाणिजे. बहुत काये लिहिणे.

लेखांक ३९८ तारीख २०–९–१८१०

श्री

रु. नं. १

अ. नं. २८७

सेवेशी विनंती शेवक आज्ञाधारक चरणरज सरूपजी खीरसागर मु।। मुंबई दोनी कर जोडून चरणावर मस्तक ठेऊन विज्ञापणा त।। भाद्रपद व।। ७ सौमवासरे पावेतो चरण-रजाचे वर्तमान यथास्थित असे हुजूरुन कृपा होऊन आज्ञापत्र छ २७ माहे जमादिलाखर व छ ५ रजबचे असी विठू जासुदाबरोबर सादर जाली ती छ १ माहे शाबानी शेवकास पावले पावोन मस्तकी वंदोन स्त्रति जाहालो हली आज्ञापत्र छ १ माहे शाबनचे सादर जाले ते छ १६ माहे शाबनी शेवकास पावले पावोन मस्तकी वंदोन स्नात जाहालो आज्ञापत्री आज्ञा जे आज्ञापत्र सादर होताच पेशजी समक्ष अज्ञा जाहाली आहे त्या-अन्वये जनराल याजकडून कार्यभाग करून हुजूर येवोन पोहचणे येविसी दुसरे आज्ञा-पत्राची उजूर न धरणे जनराल आहेत तो पर्यंत आज्ञेच्या अन्वये कार्यभाग करून घेवोनं तुम्ही हुजूर येणे जनराल यासी कलसाचे पत्र आले आहे त्याची तालीक व तुम्हा बरोबर इंग्रजी लखोटा दिल्हा त्याची तालीक इंग्रजी मराठी करून घेवणे हुजूर पाटवणे व सिंदुदुर्ग येथील लावलावणी पूर्वीपासून चालत आली त्याप्रो जंजिरे मजकुरची लाव-लावणी जनराल यासी विचारून सावकाराकडून लावलावणी पूर्वी प्रमाणे चालती करून घेणे व खासगीस बंदुखा चापाच्या दोन चांगल्या उंच पसंत पडेल ऐशा जनराल याज-पासून मागोन घेवोन पाटवणे ऐसी आज्ञा त्यास मुख्य कामाचे बोलणे चैत्र वद्य त्रयो-दसीस गुडवीन यानी मजला बोलाऊन नेऊन विचारिले तेव्हा घटका चार बोलणे त्याचे व माझे जाहाले तेव्हा हुजूरची आज्ञा समक्ष होती त्या अन्वये त्यास सर्व मा।र समजा-विला तो येकोन घेऊन त्यानी पत्रे डाकेवरून पुण्यास पाटऊन दाखला आणिला नंतर बंगाल्यास पत्रे पाठविली याची बातमी राजश्री नारायण श्रीरंग याणी मजला सांगितली त्यावरून सेवेशी विनंती लिहिली होती तेव्हा त्याच्या नकला जनराल याजपासी प्रतक्ष मागता येत नाहीत कारण कीं बंगाल्यास वगैरे पत्रे पाटवितात हे आम्हास समजू देत

नाहीत बातमी मात्र आम्ही काढितो ही खचितच परंतु केवल बातमीवरून त्यास बोलावे हे चांगले दिसत नाही याशिवाय बातमी हली येथील मा।र जनराल यासी हुकूम बंगाल्याचा आहे कीं कोणाच्या राजकारणात पडो नये म्हणोन स्पष्ट पत्रे आली आहेत तेव्हा यानी येथे कोणाची बोलणी आली आहेत ती राहू द्यावी येसे ठरवून उत्तरे स्पष्ट करितात कीं आम्हास कोणाच्या कार्यात पडावयाचे नाही आणि आमचा सिधा श्रावण मासापासोन मना केला म्हणोन आम्ही गुडवीन यासी विचारिले तेव्हा त्यानी उत्तर केले कीं तुमचा दरमाहा मना जाहाला हा मा।र आम्ही जनराल यासी विचारावा तो ते प्रस्तुत आपले मसलतीत आहेत कोणाची बोलणी होत नाहीत आट चहू रोजी बोलणी होऊन काय ठरेल ते विनंती पत्री विनंती लिहीन येथील मा।र याअन्वये आहे तेव्हा आशा समयात आपले बोलणे बोलावे तर ते आपल्या कामाच्या घालमिलीत आहेत तेव्हा उत्तर चांगले करतील ऐसे दिसत नाही आम्ही चैत्र वद्यात येथे आल्यावर पूर्ववत प्रमाणे आमचा सिधा चालू होता तो कांही कामाचा उलगडा न होता मना केला तेव्हा यातील भाव कांही समजण्यात येत नाही बारकाऊ शोध बहुत केला परंतु बातमी कांही फुटत नाही समक्ष गाठ पडल्यानंतर काय बोलणे होईल त्या अन्वये शेवेशी विनंती पत्री विनंती लिहीन आथवा माझे येणे जाहाले असता चरण शेवेशी मीच येतो जिनसाविसी आज्ञापत्री आज्ञा त्यास दुरंगी सकलादा एक आंग तांबडे व एक आंग हिरवे येसी येथे या दो वर्षा आलीकडे आलीच नाही येक आंग तांबडे व एक आंग काले आशा आहेत तोही रंग पाहावा तो केवल जुनाट दिसतो पसंत व्हावया योग्य नाहीत याजमुळे पाटविल्या नाहीत आतनासी तागे दोन आज्ञेच्या अन्वये पाटवावयाचे त्यास मालवणाकडून गलबत आल्यानंतर गलबतावरून शेवेशी पाटवितो व सोमकांती उपनेनेयाविसी शोध करितो परंतु कोठे मिलत नाही मिलाल्यास शेवेशी पाटवितो वरकड जिन्नस मिलेल तो मी येतेसमई शेवेशी घेवोन येतो हली हुजूर जिनस मेनबाया शेर मुंबईचे तीस सुमारी मेनबाया एकशे साट व सकलाद पांढरी वार चार व दोती विलायती

१६०

कथलाच्या दोन व पेट्या चिणाई रेसमी फडिकच्या सुंदर येणे प्रो हुजूर जिन्नस पाटविला आहे सेवेशी प्रविष्ट होईल येथे बातमी चांगली सांगत होते कारण कीं आम्ही त्यास पहिली आसा दाखविली त्या आशेने आज पा। बातमी सांगत गेले आम्हाकडून आज-पावेतो त्यास कांहीयक पावती न जाहाली तेव्हा बातमी चांगली लागत नाही त्याविसी हुजुर येक दोनवेला विनंती पत्री विनंती लिहिली होती त्याची आज्ञा कांहीच आली नाही त्यास ते आमच्या कामात मन चांगले घालीत नाहीत येसे दिसण्यांत येतें येथील रंग जसा पाहावा त्याप्रो केले असता काम सिद्धीस जाते आपल्याच कार्यावर द्रिष्टी द्यावी आणि त्याचा मा।र ध्यानास न आणिला तर काम हिसक्यांत पडते यामुले त्याचेही मन राखावे लागते धोंडोपंताकडील यैवज येवोन आज्ञेप्रमाणे याची समजी करावी तो तोही यैवज अद्याप हातात पडत नाही. येणे करून सेवकास कितेक गोष्टीच्या आडचणी

पडल्या आहेत हुजूरच्या पुण्ये करून घडेल ते खरे सेवेशी श्रुत होय हे विज्ञापणा.

पौ छ २९ माहे शाबान उर्फ भाद्रपद मास सुा

इहिदे आशर मयातेन व आलफ दरजागा करवीर.

(पौ २९-९-१८१०)

लेखांक ३९९ तारीख ३-१०-१८१०

श्री

रु. नं. ४

अ. नं. २६९

माहाराज राजेश्री————शिवाजी राजे छत्रपति

दाम येकबाल हू

दौलत व येकबाल पनाह शमत व शौकत दस्तगाहा निशाबुलंद मकान ——अजी येखलास हनरावेल जोनाथन डंकीन ईस्कोयेर प्रजिदेत गोवर्नदोर जंजिरे मुंबई बाआदज

आ शौकत पन्हाचे पत्र ब तारे छ ११ माहे सफर सन १२२५ हिजरीचे कौलनामेची याद कची व त्याजबरोबर इंग्रेजी खत आलीशान कारनल कलोज साहेब याचे नांवे राजश्री सरूपजी हुजरे खीरसागर तुमचे वकील याजबरोबर पाटविले ते पावले आणि सरूपजी मजकूर याचे जबानी मालूम जाहाले कीं हनरावेयल जनराल वेलजली साहेब बहादर यादी बरहुकूम तुम्हासी तह करणार होते हुजरे येथून रवाना करतेसमई हुजूरचे पत्राचे उत्तर मागू लागले याजकरिता इतीला देतो यैसाजे साहेब मवसुफा जनराल याचे पत्र जे होते ते मशारनिल्हे कारनल कलोज साहेबाकडेस पाटविले परंतु त्या गोस्टीचा कांही ठिकान लागला नाही तुमचे वकीलाचे ख्वाहीषी करितो तुमची याद असल होती ती वापस केली असे याजखेरीज तुम्ही हमेशा याहजुरात बेफायदा लिहिता कीं आमचे राज्याचा बंदोबस्त करावा म्हणून हे गोष्टीचा मजकूर व यादीचे बाबद शहर बंगालचे हजुरात लिहिला आहे त्याचे आज्ञेवरून तुम्हास इसिला देतो एसाजे याद पाटविली होती त्याची नकल दप्तरात येकंदर नाही. सारे दरबारात आलेक खसुस इंग्रेजी राज्यातील चाल ऐसी आहे कीं हरयेक परराज्यांत कौल करार केले तर त्याची नकल करून आपले दप्तरी ठेवावी अगर पुरा कौलनामा जाहाला आसता तर तुम्ही ही त्यामवाफीक लिहून पाटविले असते याजकरिता ह्या गोष्टीचा ज्यादा मजकूर ल्याहावयाचे जरूर नाही कारण कीं तुमचे वकीलानी अर्जीत लिहून दिले होते कीं जनराल वेलजली साहेब याचे चितात ऐसे होते कीं पुण्याचे मुकामी कारनल कलोज साहेबाचे मारफतीने पक्का बंदोबस्त करावा अमा तुम्ही यादीचा मजकूर पुर्ता दरयाप्त व कबूल करून मशारनिल्हे कारनल साहेब याजकडेस पाटवावा ते न पाटविता सिरंगपटणास

जेथे जनराल वेलजली साहेब गेले होते त्या ठिकाणी वकीलाबरोबर पाठऊन तेथे जाऊन त्या साहेबापासून पका बंदोबस्त करून घ्यावा परंतु तुमचे वकील तेथे रवाना जाहाल्याचे पूर्वी जनराल साहेबाची स्वारी सिरंगपटणाहून बंगालेस गेली याज वास्ताहा कच्चा मजकूर तसाच पडून राहिला आहे याजखेरीज ह्या सरकारचा दावा तुमच्या हुजूरातून आमच्या दप्तरमवाफीक वाजबीचे रुबेने तुम्हाकडील बालाजीराम याचे मारफतीने ता० २५ माहे नवेंबर सन १७९२ इसवी मुताबिके छ १० माहे रबिलाखर सने ११९३ हिंदवीत केला आहे त्याचे रुपये १२०००० बारा लाख जाजती येणे ते ताहाल तुमच्या जनाबआली-तून आदा न जहाले असता आणि त्याज उपरात तुमच्या आरमारानी दुजदी बहत केली तुमचे लुटारे लोकानी आमचे लोकास खून व कतल करून बेअदबी जाजती केली अलक-खसुस सन १७९२ व ९३ व दुसरे सालात चोऱ्या केल्या त्याचा बदला घ्याल तोपर्यंत हनरावयेल सरकार कंपनी बाहादर व जनराल वेलजी साहेब याजकडील कची याद दर-याप्त येकंदर होणार नाही आणि तुम्ही ह्या सरकारात असे थोरले गुन्हेगार असता बिलफोल आपली खाबिष ऐसी ठेविता जे हनरावयेल कंपणीचे पन्हेत याबे ही गोष्ट ताजूब असे समजावे की मागले वक्ती बेअदबी व दुजद्या केल्या त्याची तुम्हास सजा पोहचली नाही दरपेश असल्या नालायेक गोस्टीची बरदास्त होणार नाही कारण जे

आहेत ते असल्या बातेचा रवा ठेवीत नाही बमोजिब धोंडो बलाल मरहूम याही करारनामा तुमच्या हुजूरातून करून घेतला आहे आणि सरकारचे पत्री व ता० १३ माहे डिजेंबर सन १८०७ इसवी तुम्हास लिहिलेच आहे आणि आईदा तुमचे तर्फचे आर-माराची किस्ती दर्यात आमदरफ्ती येकंदर करू देणार नाही आणि करारमजकूर मवा-फीक जंजिरे मालवणचे बंदर खुले ठेविले असे कदाचित पुढे तुम्हाकडून किंवा तुमचे पन्हे-तील हरकोणाकडून कांहींयेक कराराचे खिलफ नजरेस आल्यावर पुन्हा बंदर बाजुदबंद केले जाईल आपणास व आपले मुतसद्दीयान यास वाजीबतर असे कीं असल्या गोष्टीचा उतम प्रकारे बंदोबस्त ठेऊन तुमच्या राज्यास आताच्या मवाफीक आमन होये ते करावे ज्या समई इज्यानेबाची खासा स्वारी येथे जाहाली ते वख्ती दर्यात बहुत मुल्कातील व आपणा-सुधा चोरटे फिरत होते फजल इलाहीत असे बसोन गेले आहेत की त्याचे नांव राहिले नाही बहुत थोडके आईकण्यात येतात तेही खुदाचे मेहरबानीने व ह्या सरकारचे खबर-दारानी थोडेके रोजात मुलासुधा काढले जातीलच खुनाचे ह्या मजकुराविसी हुजुरातून दर-वेश कोताई होणार नाही ता छ ३ माहे रमजान सुा ईहिदे आशर मयातेन व आलफ मुत्ताबिके ता ३ माहे आक्टोबर सन १८१० इसवी ज्यादा काय लिहिणार मोहबत असो दीजे हे किताबत.

सही इंग्रजी

जी. एम्. डि.

लेखांक ४०० तारीख १९-१०-१८१०

हु०

रु. नं. ५

अ. नं. ५५८

हुजूरून अजम जनराल जंजिरे मुंबई यास इनायतनामा दरविला आपणाकडून खतूत खुशनमत येऊन वर्तमान इजहार होत नाही त्यास वरचेवरी पत्री शिलाल्यार्थ लेहून हुजूर निवेदन होय ते करीत असावे राजश्री माणसिंगराव पाटणकर हुजूरचे शेवक याही जंजिरे सिंधुदुर्ग येथील गुराब दोन घेऊन गुराबाच्या नाली कापून सौदागिरी करावया करिता तयार करून सवदागिरीच आमदरफ्ती करणार याजकरिता आपणास इनायतनामा निगारीस जाहला आहे त्यास राव मशारनिले याचे नांव कौल दोन गल्बताचा करून द्यावा आणि बंदर मुंबईत वखार घालावयास घर एक नवीन द्यावे म्हणजे त्याज निसबद गुमास्ते सौदागिरीची आमदरफती करतील वरकड मजकुराची आज्ञा आज्ञापत्री राजश्री सरूपजी खीरसागर हुजुरे वकील यास जाहाली आहे आपणास दुबाजी तपसील वार मजमून सांगतील त्यावरून कलो येईल अजम जनराल जंजिरे मुंबई यास पत्र राजश्री मानसिंगराव पाटणकर याचे नांवचे विशेष आपणाकडून बहुत दिवस खत येऊन दोस्तदारास शादमानी हसील होत नाही अशास येखलासमंदास हमेशा खत पाठवून खुशवक्ती हसील होईल ते करीत असावे प्रस्तुतचे हुजूरचे शेवेसी विनंती करून साऊकारी आमदरफ्ती करावया करिता जंजिर सिंधुदूर्ग येथील गुराबा दोन घेऊन नांली कापून सावकारी आमदरफतीस तयार करून हुजूरचा इनायतनामा आपणास घेऊन खतूत लिहिले आहे त्यास हुजूरचे इनायतनामेच आन्वय दोन गुराबाचा कौल व वखार घालावयास घर बंदर मुंबईत द्यावे म्हणजे गुमास्ते सौदागिरीची आमदरफती करितील आपला श्नेह व्हावा ही ख्वाइश एखलासमंदाची अज दिल व जान पासून आहे आपणास मालूम व्हाव याकरिता पत्री लिहिले आहे सु॥ इहिदे आशर मयातेन व आलफ. छ. २९ रमजान ऊर्फ आश्विनमास मसुदे प्रमाणे पत्रे ल्याहावयाची आहेत.

लेखांक ४०१ तारीख २०-१०-१८१०

श्री

रु. नं.४

अ. नं. ३३१

राजश्री व्यंकटराव हरिहर यास श्नो पूर्णया नमस्कार उपरी कोलापूर वकील रो हणुमंतराव यानी मैसुरास आल होता ते परतून आपले गावास जात आहे याबराबरी कोलापूर श्री माहालक्ष्मी देवीस एक हाती देऊन पाठविले आहे तरी सदरहू हाती व याच सामान सरंजाम घोडा तटू माणूस वगैरे नदीपार करवाऊन पाठवणे तेथ जाऊन

म्हणजे कागदपत्र आणील ते तुम्हाकडे घेऊन सरकार आंची वरी हनुरास रवाना करून पाटवितेस करणे पुन्हा तेथून कोलापूरच दिवाण वगैर मातबर ग्रहस्तास बोलाऊन घेऊन हाती व घोडा तट्टू माणूस वगैरे सामान सरंजाम ×× मोरनिआली या येणे जाणेस हरकत न होई जसे टोकरेच हासेल न घेता नदीपार करवाऊन पाटवणे जाणिजे मरकुम आस्विन वदी ८ स्तिरवार प्रमादुत सवसर ब ता
छ २० माहे आगटंबर सन १८१० इसवी

लेखांक ४०२ तारीख २५–१०–१८१०

श्री

रु. नं. ५

अ. नं. ५५५

राजेश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील

यासी आज्ञा केली ऐसीजे सुा इहिदे अशर मयातेन व आलफ पुणेत राजेश्री खुरदसजीसेट मोदी याजपासी जाबसाल निपाणकर याचे थकले आहेत याजकरिता मुंबईत अजम जनराल याजवळ संधान करणेकरिता त्याजकडून राजश्री वासुदेव जिवाजी व धोंडो बलाल निदसुरे नि॥ अंताजी पांडुरंग कारकून हे तत्पक्षी मिलोन उभयता मुंबईस जाणेकरिता पुणीयास गेले आहेत तेथून मुंबईस जाणार याजकरिता तुम्हास निकडीने आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी जनराल यासी हा सर्व मजकूर समजून देऊन तेथे त्याचे कारकुनाचा काट न चाल ते करून विनंती पत्र हुजूर पाटवणे राजश्री मंजी नाईक साहुकार कुंदापूकरर याजकडील कारकून राजश्री रामचंद्र सातदेव सेणवी कौलावणीचा जाबसाल जनराल याजकडून करून घेतो म्हणून हुजूर आला आहे हुजूरचा इनायतनामा जनराल यासी द्यावा जे पूर्वी प्रमाणे कौलावण जंजिरे सिंधुदुर्ग येथील चालत आली आहे त्या प्रमाणे चालते करावे त्यास जनराल यास इनायतनामा लिहिला आहे त्या इनायतनामेत सर्व मजकूर राजश्री सरूपजी खीरसागर हुजूर वकील सांगतील म्हणून कलमी जाले आहे त्याचे इनायतनामेची तालीक तुम्हाकडे अगाऊ रवाना जाहाली आहे मंजी नाईक याचे कारकुनांचे जाबसाल खरे असिलेस त्यास गवसून जनराल याजकडून कोलावणीचा जाबसाल करून घेणे रामचंद्र सातदेव सेणवी याचा जाबसाल मतलबी असलेस जनराल याचे उत्तर घेऊन त्याची रवानगी करून देणे वरकड मजकूर जासूद जबानी अज्ञेप्रमाणे सांगतील. जाणिजे रवाना छ २५ माहे रमजान लेखन सिमा.

को. घ. ३...२०

लेखांक ४०३ तारीख २९-१०-१८१०

श्री

रु. नं. १

अ. नं. २९१

राजेश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा इहिदे आशर मयातेन व आलफ हुजूरून पेशजी राजश्री हणमंतराव तमाजी याची रवाणगी श्रीरंगपटणास इनायतनामेच्या थैल्या व आज्ञापत्रे देऊन जाहाली होती त्यास श्रीरंगपटणास पोहोचवून तेथे आजम कोलीस बाहादर यास व राजश्री राये पूर्णया यास थैली व आज्ञापत्र देऊन सर्व मजकूर हुजूरचे आज्ञेच्या अन्वये समजून दिला व तहाच्या यादीही बरोबर दिलेल्या दाखविल्या तेव्हा हुजूरचे कार्यभागाचा खातरजमा जाहाली त्यावरून उभयतानी आपले नांवची पत्रे जनराल चेनापटणकर यास दिली व हणमंतराव याजसमागमे हुजूरचे इनायतनामेची थैली चेनापटणकर जनराल यास दिली होती ती घेऊन हणमंतराव चेनापटणास भाद्रपद शुधात पोहोचले भाद्रपद शुद्ध सप्तमीस दुमजनराल याची भेट जाहाली हणमंतराव याणी जबानी निपाणकर याचा व पटवर्धनाचा मजकूर जाहालेला सांगितला नंतर दुमजनरल यानी उत्तर केले जे उदईक थोरले जनरल याची भेट करवितो भेट जाहालेवरी तहच्या यादी व आजम कोल्स बहादर याचे पत्र व राजेश्री रायपूर्ण याचे पत्र पाहून जाबसाल करून देतो याप्रमाणे वर्तमान पुणेचे आखबारीत छ २५ शाबानी आले तीच बातमी हुजूर आली हणमंतराव याची पुरवणी राजश्री रायपूर्णया वरचेवरी करीत आहेत याप्रमाणे पुणेत बातमी आलेवरी राजश्री मोदी वगैरे मुतसदी तत्पक्षी यास धास्त पडली हे वर्तमान तुम्हास समजावे म्हणून आज्ञापत्री आज्ञा जाहाली आहे तरी हा सर्व मजकूर अजम जनराल जंजिरे मुंब्रई यास समजून देऊन चेनापटणाची आखबारी मुंब्रईसही येत आहे त्यातील बातमी जी येईल ती वरचेवरी विंनंतीपत्री लिहून पाठवणे चेनापटणात हुजूरचे जाबसाल ठरतील त्याप्रमाणे हुजूरचे जाबसाल करून द्यावे म्हणोन चेनापटणकर जनराल याची पत्रे जनरल मुंब्रईकर यास येतील त्यास चेनापटणाचे पत्राचे शोधात तुम्ही राहून बातमी राखणे राजश्री वासुदेव जिवाजी व धोंडो बलाल निदसुरे नि।। अंताजी पांडुरंग पेशजी तुम्हाबरोबर हुजूर आलेल तत्पक्षी मिलोन मुंबईस जाणेस गेले आहेत येविसी तुम्हास जंजिरे सिंदुदुर्ग इकडून आगाऊ आज्ञापत्र सादर जाले आहे त्याप्रमाणे बंदोबस्त राखणे परभारे मुंबईत जाबसालाचा काट न जाहालेस सौदागरीचे बखारीचे निमित्ये जनराल याजवळ काट करून पुढे बोलणे बोलणार याप्रमाणे मतलबी लोकाचा बेत आहे त्यास येविसीचे यत्नाचे मसुदे आगाव तुम्हाकडे पुढे रवाना जाहाले आहेत हे सर्व पक्के जनराल यास समजून देऊन जनराल याजवळ मतलबी मनुष्याचा यत्न न चाले असा बंदोबस्त करुन विनंती पत्र पाठवणे मसुदे पाहून कोणास न दाखवणे जाणिजे रवाना छ २९ रमजान लेखन सीमा

लेखांक ४०४ तारीख २९-१०-१८१०

श्री

रु. नं. १

अ. नं. २८६

राजेश्री स्वरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ इहिदे आशर मयातेन व आलफ जंजिरे सिंदुदुर्ग येथील कवलावणीचे बोलणे अजम जनराल जंजिरे मुंबई याजपासी करून घेतो म्हणोन राजश्री मंजी नाईक साहुकार कुंदाफूरकर याजकडील कारकून राजेश्री रामचंद्र सातदेव हुजूरे आले त्यास जनरालाचे नांवची इनायतनामेची थैली देऊन रामचंद्र सातदेवयास मुंबईस रवाना जाहाले आहेत येविसीचे मजकुराचे तुम्हास आगाव आज्ञापत्र जंजिरेकडून सादर जाहाले आहे इनायतनामेची तालीक ही हाली मशारनिलेबरोबर तुम्हाकड रवाना जाहाली आहे त्यास रामचंद्र सातदेव व तुम्ही मिळोन तुम्ही जनरालाकडून जंजिर सिंदुदुर्ग येथील कवलावणीचा जाबसाल पूर्वी-प्रमाणे चालतें करून घेऊन रामचंद्र सातदेव याजसमागमे जनरालाकडून कोणी मनुष्य कवलावणीचे जाबसालाचे बोलणेस हुजूर पाटवून देण आणि तुम्हास जासुदासमागमे आज्ञापत्रे निकडीने सादर जाहाली आहेत त्याप्रमाणे सर्व जाबसाल जनराल यास समजून देऊन आज्ञेच्या अन्वये जनरालाची खातरजमा करून देऊन तुम्हास पेशजी आज्ञा जाहाली आहे त्या अन्वये जनरालाकडून कार्यभाग करून घेऊन सत्वर हुजूर येणे आणि वरचेवरी विनंती पत्री बातमी वर्तमान तपसीलवार लेहून पाठवीत जाणे. जाणिजे र॥ छ २९ माहे रमजान.

लेखांक ४०५ तारीख १६-२-१८११

श्री

रु. नं. १

अ. नं. १८८

राजश्री सरूपजी खोरसागर हुजरे मुकाम किले सदाशिवगड गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ नारायेणजी श्रीरंगजी प्रभु रामराम विनंती येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे तुम्ही गेल्या-पासोन कांहीच वर्तमान कलत नयेत त्यास हली तुम्ही विठू मणुशे याजबरोबर पत्र पाट-विले ते उत्तम समई येऊन प्रविष्ट जाले लेहिला मजकूर सर्व ध्यानास आला बरे असो कांही चिंता नाही तुम्हीं इकडे पांच सहा महिने जाल्याशिवाय येण्याचा बेत न करावा आम्ही येथील बंदोबस्त सरकारचा ठीक करून ठेऊ अनी तुम्हास ताबडतोब जासूद पत्र देऊन हुजूरचे मुकामी रवाना करू म्हणजे त्याप्रमाणे तुम्ही सत्वर निघोन येणे कांही

चिंता नाही बेफिकीर असावे कालजी किमपि करू नये आम्ही ज्यापेक्षे तुमचे म्हणवितो त्यापेक्षे तुमचे कामकाज हारयेकविसी पार पाडून देऊ अंतर करणार नाही वारंवार पत्र आलया मनुशाबरोबर पाटवीत जाने तेनेकरून चिताचे समाधान होत जाईल विठू मनुष्ये मुखजबानी सांगता कलो येईल बहुत काय लिहिणे कृपालोभ करीत जाव हे विनंती मिती शके १७३२ माहे माघ वद्य ८ वार शनवार.

लेखांक ४०६ तारीख ११-३-१८११

श्री

पारसनिसी

रु. नं. १

अनु. नं. २८८

यादी कलमबंदी नि॥ राजश्री नारायणेराव व्यंकटेश घोरपडे इचलकरंजीकर सु॥ इहिदे अशर मयातैन व अलफ

१ श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी कृपालु होऊन नजरे बा॥ यैवज पनाली रुो १०००० दाहा हजार राजश्री चिंतामणराव पांडुरंग याचे वि॥ घेऊन को वडगाव प्रो पनाला व को सिरोल व को कुंभोज प्र॥ रायबाग व को आलते प्रो हुकेरी व प्रो कागल पै॥ देह ५॥ येथील सरदेशमुखी व को रुकडी व को इचलकर्जी व क॥ उदगाव व क॥ सिरहटी प्रो मिरज येथील सरदेशमुखी व देशमुखीचे वतनाची मोकलीक करून मामले चिठ्या द्यावयासी आज्ञा जाहली त्यास निखालसपणे वतन चालून सेवकापासून सेवा घेतली पाहिजे पेशजी वहिवाटी प्रो सरदेशमुखी व देशमुखी चालवणेविसी सोस आज्ञापत्रे हुजूरने सादर जाहली आहेत तरी तुम्ही इमानइतबारे वर्तणूक करीत जाणे चौघे वतनदार याजकडून जे साली पटीची मखलासी हुजूर होईल त्याप्रो तुम्हाकडील सरदेशमुखी व देशमुखीवर जीवनमाफीक मखलासी हुजूर घेणेची आज्ञा होईल

१ नजरे बा॥ यैवज पनाली रु॥ १०००० राजश्री चिंतामणराव पांडुरंग याणी दिल्हे ते राजश्री रामचंद्र जोसीराव व राजश्री रायाजी जाधव जन्तनमुल्क याचे वि॥ सरकारांत पोहचले म्हणोन राजश्री नारायेणराव व्यंकटेश घोरपडे याचे नांवे पावती द्यावियासी आज्ञा जाहली पाहिजे. कलम

सदरहू प्रो पावती सादर जाहली असे.

१ हुजूरची स्वारी मोहिमशेर जाहल्यास आम्ही पनास स्वार व शंभर पायदलानिसी येऊन चाकरी करावी त्यात घोड माणूस पाहून पोटास हुजूरून द्यावे. कलम स्वारीची मोहीम होईल ते समई दोन महिने हुजूरने खर्चास पावणार नाही दोन महिनेचे पुढे जाजती दिवस लागलेस हुजूरने पोटास देणेची आज्ञा होईल.

१ हुजूर दर्शनास आलेस मानकरी याचे सिरस्ते प्रो बहुमान वस्त्रे हुजूरने द्यावी. कलम
पेशजीचे दाखले प्रो हुजरून बहुमान होईल.

१ ता। आजरे येथील गावगना किले भूदरगड नि।। यैवज येणे व तर्फ मा।।रचा यैवज किल नि।। गावगना येणे तो पेसजी चालत आले प्रो उभयतानी चालवे त्याजविसी खटला होऊ नये म्हणोन गडकरी यासी आज्ञापत्र द्यावयासी आज्ञा जाहली पाहिजे.
कलम

पेशजी वहिवाटी प्रो चालवणेविसी भुदरगडास आज्ञापत्र सादर जाहले आहे व तर्फे आजरेकडूनही पेशजी वहिवाटी प्रो किलेकडे चालवणे.

१ मौजे म्हापणे ता। पाट प्र।। कुडाल हा गाव पुरातन पासून आम्हाकडे इनाम चालत आहे त्यास जंजिरे सिंधुदुर्गकर सालाबाद यैवज घेतात त्या प्रो घ्यावा जाजती गावास उपद्रव होऊ नये म्हणोन जंजिरेकर यासी आज्ञापत्र द्यावयाची आज्ञा जाहली पाहिजे.

मौजे मा।।र हा गाव वाडीकर सांवत याजकड आहे.
कलम

१ मौजे चंदूर का। इचलकर्जी येथे सिवेनजीक कुरणमोला आहे तो पेशजीपासून आम्हाकडे चालत आहे त्याजप्रो चालावा म्हणोन गावकरी यासी आज्ञा जाहाली पाहिजे.
कलम

सदरहू कुरणाची चौकसी होऊन आज्ञा होणे ते होईल.

७

येकूण कलमे सात करार सदरहू प्रो का। मा।।रातील जे गाव दंगमुले पडसर जाहाले असतील तेथील ऐवज आकाराबरहुकूम घ्यावा जाजती उपसर्ग करू नये. छ १५ माहे सफर रुजू मोर्तब.

लेखांक ४०७ तारीख १३-७-१८११

श्री

रु. नं. १

अ. नं. २८९

पौ छ २४ जमादिलाखर उर्फ आषाढ ब।। एकादसी सु।। इसने आशर मयातेन व आलफ दर जागा करवीर

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे शेवेसी विनंती सेवक अमृतराव गायकवाड सेनाखासकील समसेरबहादर बडोदेकर कृतानेक शेवेसी विज्ञापना ऐसीजे येथील क्षेम ता। छ २१ माहे जाकर पावेतो सेवकाच वृत यथास्तित अस विशेष शेवकास आपला प्रांत सोडून तीन वर्षे जाहाली आज पर्यंत मुमईस इंग्रजाचे कैदत होतो तेथून

पळून निघोन आलो त्यास आज पंधरा दिवस जाहल गोसावियाच रुपये घेऊन येका खिसमतगारानिसी मार्ग काटीत आलो साहेबाचे प्रांतात आलेवर चितात स्वस्थ जाहल या समयास साहेबाचे पायासिवाय कोणाचा आधार नाही ती।। राजेश्री गोविंदराव बाबा गाईकवाड याचे माग साहेब धनी मायबाप आहेत मांडीवर उस ठेविल आहे वाल्कास आंतर देऊ नये सेवक कोणाचा फितूरफानडा करून आला नाहीं घर खटलेमुळ इंग्रजानी अटकेत ठेविल होत शेवक कारभारी याचे कहेत नाही म्हणोन इंग्रजाचे स्वाधीन केल होत साहेबाचे कृपे करून बंदातून निघोन आलो कारभारी व इंग्रज मिळोन राज्यास अपाय केला यास परामर्ष करणार साहेब धनी समर्थ आहेत राजश्री दमाजी बावा व गोविंदराव बाबा यानी साहेबी सेवा करून राजे मिलिवल आम्ही त्याचे पोटी कुपुत्र होऊन गमावल आता सर्व प्रकार साहेब बाप आणि मी चिरंजीव आहे सेवकास अन्न-वस्त्र देऊन सेवा चाकरी घ्यावी सर्व प्रकार आधार आपला आहे. सेवेसी श्रुत होय ही विज्ञापना.

लेखांक ४०८ तारीख १४-९-१८११

रु. नं. ४
अ. नं. २९८

यादी नोकर व पालेगार व जमीदार यानी सरकार तालुका घेतला आहे त्याची अजमासे बेरीज सुा इसने आषार मयातेन व आलफ छ २५ साबान.

रुपये	
३०००००	तालुके चिकोडी
३०००००	तालुके मनोली
२५०००	ठाणे सेंडूर
३५००००	तालुके रायबाग व हुकेरी व बागेवाडी मिळून
२५००००	फूट खेडी तालुके सिराले पैकी वगैरे
१२२५०००	तसलमात निपाणीकर
५०००००	कितूरकर देसाई व सुरापुरकर बेरड वगैरे पाल्गार व जमेदार मिळून
१७२५०००	

सतरा लक्ष पंचवीस हजाराचा तालुका नोकर व जमेदार व पालेगार याजकडे सरकारी असे.

लेखांक ४०९

तारीख ३०-९-१८११

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३०४

राजेश्री रामचंद्र रघुनाथ यासी आज्ञा केली ऐसीजे सुा इसन आशर मयातेन व आलफ तुम्ही विनंती पत्रे व यादी बोलण्याच्या पाटविल्या त्या हुजूर निवेदन जाहाल्या आजम कोटलेर इस्केलर ब्रुटीस नवाये बहादर गोवा यासी मुंबईचा उजूर लिहिला आणि तुम्ही यादीत मुंबईस पत्रे गेली आहेत म्हणोन विनंती लिहिली त्यास मुंबईहून इनतअसार महमद इब्राम मुनसी हुजूर येऊन पोहोचले त्यास हुजूरून समक्ष आज्ञा जाहाली आहे जे गोवेहून हुजूरचे जाबसालाविसीची पत्रे इस्केलर याची गेली आहेत त्याची उतरे हुजूरचे जाबसाल करून घेणेविसी गोवेस पत्रे सत्वर पाटवून कुमक होय ते करणे ऐसी आज्ञा मुनसीस जाहाली आहे आणि विनंती लिहिली अन्वये बोलणेची यादी व इनायतनामे व आज्ञापत्रे सादर जाहाली आहेत त्यास तुम्ही आज्ञेच्या अन्वये जाबसाल उलगडून घेऊन सत्वर सरंजाम सुधा पलटणे घेऊन हुजूर येऊन पोहोचणे जाणिजे रवाना छ ११ माहे रमजान.

लेखांक ४१०

तारीख २६-१०-१८११

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३०९

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३८ प्रज्यापतिनाम सवत्सरे कार्तिक शुा नवमी भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वाभी याणी राजश्री देवी नाईक दुभासी यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंतीपत्र आश्विन वहुल येकादशीचे राजश्री मानको कोनेर या समागमे पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला आशास येविसीचे मजकुराची आज्ञा मशारनिलेस जाहाली आहे तुम्हास सांगितले त्याप्रमाणे इंग्रज बाहदर याजकडील तहाची यादी ठरऊन घेऊन इंग्रजी पलटणे रवाना करुन चारी तालुकेत हुजूरची ठाणी बसऊन शत्रूचे पारपत्ये करणे येविसीचे बोलणेची यादी कोंडी जासूद याजबरोबर राजश्री रामचंद्र रघुनाथ याजकडे रवाना जाहली आहे इंग्रजी पलटणे तालुक्यात आणनेविसीही दिकत न घेणे इंग्रजाची व हुजूरची दोस्ती पूर्वापार चालत आहे त्याप्रमाणे पुढे चालून राज्याचे उर्जित होऊन स्वामीसेवा करून कृपेस पात्र होणे

लेखांक ४११ माहे नोव्हेंबर इ. स. १८११

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३१०

राजश्री देवी नाईक दुभासी मुकाम बंदर

गोवे गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलकृत राजमान्य श्ने॥ रत्नाकरराम राजाआज्ञा आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत जावी विशेषप्रस्तुत राजश्री माणकोपंत आले त्यानी तुम्हाकडील सविस्तर मजकूर जबानी सांगितला त्यावरोन संतोषावाप्ती जाहाली हुजूरचे विनंती पत्राचे आज्ञोतर घेऊन पाटविले आहे इकडील सर्व मजकूर मानकोपंत याचे जबानी सांगून पाटविल आहे त्या आन्वये सर्व जाबसाल उलगडोन घेऊन सत्वर निदर्शनास येई ते करावे तुमच्या खातरजमेवर हे काम हाती धरिले आहे याची शरम धरून स्वामीसेवा करून दाखऊन कृपेस पात्र व्हावे.

लेखांक ४१२ माहे नोव्हेंबर इ. स. १८११

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३१२

राजश्री रामचंद्र रघुनाथ दांडेकर यास आज्ञा केली यैसीजे सुा इसन आशर मयातैन व आलफ स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र छ २५ रमजानचे राजश्री मानको कोणेर या समागमे व छ १ सोवालचे जोती जासूद याजबरोबर पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला इंग्रज बहादर याजकडून पकेपन कागदीपत्री तह करून घेऊन पेशजी कराराची यादी पाटविली आहे त्याप्रमाणे चारी तालुके वगैरे शत्रूचे पारपत्ये होऊन ठाणी बसऊन द्यावी सदरहू तालुके मजकूर पैकी चौथाई इंग्रज याजकडे चालावी इंग्रजी पलटणे येक कराराप्रमाणे आज्ञेच्या लक्षोन राहून दोस्ती चालवी याप्रमाणे तह ठरऊन दस्ताऐजी इंग्रज बहादर याचा घेऊन

(अपूर्ण)

लेखांक ४१३ तारीख १-१२-१८११

श्री

रु. नं. ४ तालीक

अ. नं. ३१४

राजश्री रामचंद्र रघुनाथ दांडेकर यासी आज्ञा केली येसीजे सु॥ इसने

आशेर मयातैन व आलफ स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंती पत्र छ ४ जिल्कादचे राजश्री माणको कोनेर या समागमे पाटविले ते छ १४ मिनहूस प्रविष्ट जाहाले त्यावरून व मशारनिलेचे विनंतीवरून सविस्तर मजकूर निबेदन जाहाला तुम्ही विनंती लिहिल्या-अन्वये आजम अलपिस्टन बहादर यासी इनायेतनामाची थैली सादर फर्माविली आहे त्याची तालीक तुम्हाकडे रवाना जाहाली आहे ती तालीक अजम कोटलेर इस्केलर ब्रुटीसनेवय यास दाखऊन त्याप्रमाणे इस्केलर याचे खत आलपिष्टीन बहादर यास घेऊन सत्वर पुणेस तुम्ही जाऊन आज्ञेच्या आन्वये कार्य करून येणे राजश्री दिनकर आपाजी पुणेत आहेत त्यासही आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी तुम्ही विंनंतीपत्री विनंती लिहिले प्रा पुणेस जाऊन जलदीने कार्य करून येणे निंबे सुमारी पांच व पुदिन्याचे अर्काची सिसी येक पाटविली ती प्रविष्ट जाहाली आज्ञेच्या अन्वये राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा तुम्हास लिहितील व आज्ञे प्रा माणको कोनेर सांगतील त्या-वरून कलेल आणि (फाटलें) जे रवाना छ १४ माहे जिल्काद लेखन सीमा.

लेखांक ४१४ तारीख २-१२-१८११

श्री

राजश्रियाविराजित राज्यमाने राजेश्री रामचंद्रराव स्वामी गोसावी यास

पो रत्नाकर राम राजाज्ञा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय लेखन करीत जाणे विशेष तुम्ही पत्र मार्गसीर्ष शुध्द दशमीच राजेश्री माणकोपंत याज-समागमे पाठविले ते प्रविष्ट जाहाले त्यावरून व मशारनिलेचे जबानीवरून सविस्तर मज-कूर कलोन शष जाला हुजूरचे सेवेसी तुम्ही विनंतीपत्र माणकोपंत यासमागमे पाठविले ते प्रविष्ट करून आज्ञोतर घेऊन पाठविले आहे त्यास आज्ञेच्या अन्वये स्वामी शेवा सत्वर हुजूरचे निदर्शनेस येई ते तुम्ही कराव वरकड मजकूर समक्ष माणकोपंत यास सांगितला आहे जबानी तुम्हास सांगतील त्यावरून कलल रवाना छ १५ माहे जिल्काद बहुत काय लिहिने भरवसा जाणून लिहिले असे हे विनंती.

लेखांक ४१५ तारीख २-१२-१८११

श्री

तालीक

राजमान्य राजश्री दिनकर अपाजी यासी

आज्ञा केली ऐसीजे राजेश्री रामचंद्र रघुनाथ गोवेहून खलित घेऊन पुण्यास आले आहेत त्यास मशारनिले याचे व तुमचे विचारे कार्य करणे व वरचेवर बातमी वर्तमान विनंतीपत्री लिहून पाठवीत जाणे जाणिजे सुा इसने आशर मयातेन व आलफ रवाना छ १५ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे.

लेखांक ४१६

तारीख २-१२-१८११

श्री

रु. नं. ४

अ. नं. ३१३

राजेश्रियाविराजित राज्यमान्य राजश्री रामचंद्रपंत दांडेकर स्वामी गोसावी यासी पौ रत्नाकरराम राजाज्ञा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीय लेखन करीत जाणे विशेष तुम्ही पत्रे दोन छ ५ जिल्कादची राजश्री माणको पंत यासमागमे पाठविली ती छ १४ मिनहूस पावली त्यावरून व मशारनिलेच जबानीवरून सविस्तर मजकूर कलो आला तुम्ही लिहिल्याअन्वये अजम आलपिस्टी बाहादर यास हुजूरची इनायतनामेची थैली व तुम्हास पुणेस जाणेविषयी आज्ञापत्र घेऊन पाठविलें आहे त्यास इनायतनामेचे तालकेप्रमाणे अजम कोटलेर इस्कील्र ब्रुटीस नेवाय याचे खलित बहादर यास घेऊन तुम्ही पुणेस जाऊन लिहिल्या अन्वये सत्वर कार्यभाग करून घेवा राजश्री दिनकरपंत पुण्यात आहेत त्यासही आज्ञापत्र घेऊन तुम्हाकडे पाटविले आहे वर्कड सविस्तर मजकूर समक्ष माणकोपंत यास सांगितला आहे जबानी तुम्हास सांगतील त्यावरून कलो येईल कोंडी जासूद याने सांगितल्या प्रमाणे माणकोपंत याची रवाणगी जाहाली आहे निंबेच्या पुदिन्याचे आर्कोची शिसी एक पाटविले प्रमाणे पावली खर्चवेचविसी कोणताही संषय न धरिता राजश्री देवनाईक दुभाषी सांगतील त्याप्रमाणे सत्वर जाऊन कार्य करून येण कार्य जाहलेवर तुमचे श्रमाचा परिहार होईल रवाना छ १५ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे लोभ कीजे कार्य सत्वर जाहालेस उत्तम नाहीतर तुम्हामुल आम्ही राज्याचे अपेशास पात्र व्हावे ऐसे न करावे पत्र पावतोक्षणी आटपंद्रा रोजात निदर्शनास येई ते करणे. गुराबा राजश्री देवनाईक याकडे रवाना केली आहे हे विनंती.

लेखांक ४१७

तारीख २-१२-१८११

श्री

रु. नं. ४ तालींक

अ. नं. ३१४

राजेश्री देवी नाईक दुभासी मुकाम बंदर
गोवा गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य--------श्नो रत्नाकर राम राजाज्ञा आशीर्वाद विनंती उपरी येथीले कुशेल जाणोन स्वकीये कुशले लेखन करीत जावे विशेष तुम्ही पत्र मार्गेसीर्ष श्रुध दशमीचे राजश्री मानकोपंत या समागमे पाटविले ते पावले त्यावरून व मशारनिलेचे जबानी वरून सविस्तर मजकूर कलो आला तुम्ही लिहिल्या-अन्वये आजम आलपिष्टन बहादर यासी हुजूरची इनायेतनामेची थैली वरून राजश्री

रामचंद्रपंत यास पुणेस जाणेविसी आज्ञापत्र घेऊन पाटविले आहे त्यास मा॥रनिलेचा रवानगी तुम्ही लिहिल्याप्रमाणे सत्वर करून जलदीन कार्य होय ते करणे पुन्याहून कार्य उलगडण्यास चार दिवस लागलेस पलठणे पाटऊन ठाणी बसऊन द्यावी! मानकोपंत यास तुम्हाजवल राहाणेविसी हुजूरची आज्ञा घेतली आहे त्यास मा॥रनिलेस तुम्ही गोवेत ठेऊन घेऊन रामचंद्रपंत यास पुणेस पाटऊन द्यावे इनायेतनामेची थैली सादर जाहाली आहे त्याची तालीक तुम्हाकडे पाटविली आहे त्यास आजम कोटलेर इस्केवर ब्रुटिस नेवाय (ब्रिटिशएन्हॉय) यास दाखऊन त्याआन्वये त्याचे खतुत लेहून घेऊन सत्वर रवानगी रामचंद्रपंत याची पुणेस करावी वरकड सविस्तर मजकूर मानकोपंत जबानी तुम्हास सांगतील त्यावरून कलो येईल पुण्यास पाटवणेविसी तुम्हास लिहिले यामुले थैली रवाना केली आहे व रामचंद्र-पंतास जाणेविसी आज्ञापत्र पाटविले आहे त्यास मोदीचा पक्ष निपाणकर याजकडे आसतो पुणेस जाऊन काम सिदीस कसे जाईल याचे विचार तुम्ही पाहून करावे आम्ही तुमचे भरवसेवरी स्वस्थ आहो तुम्हाकडे राजकारण लागले हे समजून निपाणीकर तूर्तच दंगा आरंभिला आहे. सत्वरच काम करून येश करून संपादावे.

छ १५ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती

लेखांक ४१८ — तारीख २५-१२-१८११

श्री

रु. नं. १ — मसुदा

अ. नं. ३३४

चिरंजीव राजमान्य राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री गणो केशव या समागमे तुम्ही पत्र पाठविले ते हुजूर अवलोकन जाहाले त्यास राजश्री रत्नाकर पंडित राजाआज्ञा राजश्री बाजीराव पंडित प्रधान याजकडे गेले आहेत तिकडून आलेनंतरी तुम्ही विनंती सांगून पाटविले प्रमाणे तिकडे पंडित राजाज्ञा जाऊन बंदोबस्त करतील तोपर्यंत तुम्हाकडून सामानगड प्रांती व इकडील गावगन्ना उपसर्ग लागू न द्यावा पंडित राजाज्ञा तिकडे गेले आहेत म्हणोन त्याविसी चितात आंदेशा न ध्याव बंदोबस्त खातरजमेनच होईल येविसीची आज्ञा करून गणो केशव यासी पाटविले आहेत आज्ञेप्रमाणे तुम्हास सांगतील त्याजवरून कलेल जाणिजे सुा इसने आशर मयातेन व आलफ र॥ छ ८ माहे जिल्हेज.

लेखांक ४१९ इ. स. १८११–१२

श्री

रु. नं. ५

अ. नं. ३६२

अजम महमद इबराहिम मुनसी वकील यासी आज्ञा केली यैसीजे सु॥ इसने आशर मयातेन व आलफ

हल्ली हुजूरून अजम मिस्तर जोन फदिसोन व आजम मिस्तर लुईज फर्नांदज यासी इनायतनामेची थैली सांडणीस्वार याजबराबर सादर ज़ाहाली आहे त्यास थैली देऊन पलटणे सरंजाम सुद्धा जलद जलद तुम्ही येऊन येऊन पोहोचणे येविसी दुसरे आज्ञापत्राचा उजूर न धरणे वरकड मजकुराची आज्ञापत्री आज्ञा राजश्री त्र्यंबक आवजी यासी जाहाली आहे तुम्हास सांगतील त्याजवरून कळेल.

लेखांक ४२० इ. स. १८११–१२

हु॥

रु. नं. १

अ. नं. ३३५

यादी पुणे मुकामी खर्च विद्यमान महमद इब्राहिम मुनसी वकील सु॥ इसने आशर मयातैन व आलफ

दरमहा रुपये

४०० भोजन खर्च वगैरे
१७५ शागीर्द पेशा माणसे
१०० कारकून कामकाजास ठेविले आहेत त्यास भोजन खर्च वगैरे मिळोन
१०० घोडी रास ५ यास चंदी वैरण
———
७७५

हुजूरून स्वार व पायदळ याचे खर्चाचा बंदोबस्त करून येण्यास आज्ञा जाली पाहिजे

१० स्वार अ॥
२५ पाईचे लोक
४ जासूद
———
३९

एकूण सातसेहे पंचाहत्तर रुपये व स्वार दाहा अ॥ व पाईचे लोक पंचवीस व जासूद च्यार येणेप्रमाणे आज्ञा जाली पाहिजे.

लेखांक ४२१ इ. स. १८११-१२

श्री

रु. नं. १

अ. नं. २०५

राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील

यासी आज्ञापत्र आज्ञा केली येसीजे

समक्ष आज्ञा तुम्हास जाहाली आसता आज्ञेच्या अन्वये तुमचे विनंती पत्र व पलटणाचा जबाबसवाल ठरलेला मजकूर आद्याप हुजूर निवेदन जाहाला नाही याजकरिता आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यास आज्ञापत्र सादर होताच आज्ञे प्रमाणे सत्वर कार्यभाग करून हुजूर येणे आणि पुण्यातील इंग्रज व मोदी यासी ताकिदी हुजूरचे काजकामाविसी घेऊन पाटवणे तुम्ही येणेस दिवसगत न लावता इंग्रेजी लखोटा व पत्र व मोदी दाखवून खातर जमा करून देऊन आज्ञेच्या अन्वये कार्यभाग करून सत्वर येऊन पोहचणे पेशजीचे आज्ञापत्राप्रमाणे राजश्री धोंडो बलाल याजकडील रुपये घेऊन यादीप्रमाणे रुपये हुजूर पाटवणे पेशजी तुम्हास आज्ञा पत्र सादर जाहाले आहे त्याप्रमाणे सखलाद दुरंगी व सोमकांती आरसी हुजूर खासगी पसंद उंच पाटवणे आज्ञेचे आन्वये जनराल याची निखालसता करून पलटणेचा कार्यभाग करून जलद हुजूर येणे दिवसगत न लावणे.

लेखांक ४२२ इ. स. १८११-१२

श्री

रु. नं. १

अ. नं. २९२

यादी कलमबंदी आजम कोठलर ईस्कोलर ब्रुटीस नेबाय बंदर गोवा याजबल जवाबसवाल उलगडून घेण्याचे सुा इसने असीर मयातेन व आलफ

१ चिकोडी तालुका वमनोली तालुका व रायबाग तालुका वगैरे निपाणकर याणी घेतले आहेत व पालगार जमीदार निमकहराम आहेत त्यास आजम कौपनी इंग्रज बहादर याही पलटणे पाटऊन त्याचे पारपत्ये करून हुजूरचे तालुकात ठाणी हुजूरची निपाणी सुधा घालून द्यावी त्यासंमधे मसलतीस खर्च होईल त्यास मनोलीचे ठाणे व तालुका बारीआलीकडील व पलीकडील कौपनीकडे हुजूरून दिल्हा आसे तेथे कौपनीकडील पलटणे ठेऊन बंदोबस्त करावा मसलतीचे खर्चाचा यैवज फिटलेनंतर तालुकेचा येवज जमाबंदी करून त्यात येक पलटणे नेहमी मनोलीचे ठाणेत ठेवावे त्याचा खर्च वजा घालून बाकी येवज राहील तो हुजूर द्यावा हुजूर काजकाम जे समई पडल ते समई पलटण येक चाकरीस यावे निरोप जाहालेवरी मनोलीचे ठाणेस जाऊन राहावे जाजती पलटणेचे काम लागलेस आणऊ त्याचा खर्च हुजूरुन देऊ या प्रमाणे करणे कलम

१ चिकोंडी तालुका व मनोली तालुका व रायबाग तालुका वगैरे निपाणकर याणी घेतला आहे व पालेगार व जमीदार व निमकहाराम अहेत त्याचे पारपत्ये करून हुजूरचे तालुके हुजूर घेऊन द्यावे निपाणीसुद्धा व निपाणकराकडे हुजूरचा जो गाव आहे तो हुजूर यावा त्याविसी पलटणेस लढाईसमंधे जो खर्च पडेल तो राजश्री देवी नाईक दुभासी तुमचे विचारे कौपणीचे विद्यमाने साऊकाराकडे घाणे ठेऊन निमा यैवज कौपणीचे कर्जास वयाव निमे येवज हुजूरचे खर्चास द्यावयाचा ठराव तुम्हा उभयेताचे विचारे साऊकारी कौपणीचे विद्यमाने करून घेऊन यैवज कौपणीचा फिटलेनंतर ठाणी तालुकेसुधा हूजूरची द्यावी याप्रो करार करणे. ———— कलम

१ सदरहू दोन्ही कलमे लिहिली आहेत त्यातील तुम्हा उभयताचे विचारे ठरेल ते कलम करार करून पलटणे घेऊन कराराप्रमाणे निपाणीस येऊन आधी ठाणे निपाणीचे घालून देऊन नंतर सारी ठाणी घालवयाचा करार करणे देवी नाईक दुभासी याणी आंदेशा घेतला त्याचा मजकूर कौपणी इंग्रज बहादर याही पेशजी जंजिरे सिंदुदुर्ग घेतला आसता हुजूर देतील ऐसे कोणाच्या दिलात नव्हते ते समई तीर्थरूप कैलासवासी मातुश्री साहेब यासी कौपणी इंग्रज बहादर याही बहिण म्हणऊन आजिंक किला तो हुजूरचा हुजूर देऊन बहिणीचे राज्ये समजून हा कालपर्यंत कौपणी इंग्रज बहादर दोस्ती चालवीत आले आहेत हली हा तालुका त्याचे घरी घाण ठेविला असता यैवज फिटलेनंतर तालुका हुजूरचा हुजूर सोडून देतील हा भरवसा पुर्तेपणे हुजूर आहे तुम्ही कोणे गोष्टीविसी चितात संवशय न धरिता आज्ञेप्रमाणे करार करून पलटणे घेऊन येऊन ठाणी घालावी येविसी फिरोन आज्ञेचा ऊजूर न धरणे. ———— कलम

१ पांच हजार रुपये दरबार खर्चास व पाचशे रुपये तुम्हास खर्चास देणेविसीची आज्ञा व्हावी म्हणून विनंती लिहिली त्यास जंजिरे सिंधुदूर्ग येथील गुराबे येक प्रोक्त करणे करिता देवी नाईक दुभासी याचे स्वाधीन करणेविसी हुजूरने जंजिरेस आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी देवी नाईक दुभासी याजकडील दर्यावर्दी जंजिरेस पाटऊन गुराब घेऊन जाऊन प्रोक्त करून पांच हजार रुपये दरबार खर्चाचे पांचशे रुपये तुम्ही आपले खर्चास घेणे त्यापैकी आबदागिरीचा जिनस तेथे घेऊन तुम्ही आबदागिरी करणे हुजूर जिनस पाटवणेविसी तुम्हास समक्ष आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे जिनस हुजूर पाटऊन देणे गुराब प्रोक्त करून किंमतीची यादी हुजूर पाटवणे. ———— कलम

१ याप्रमाणे देवी नाईक दुभासी याचे विद्यमान बोलणे करून लढाऊ सामान तोफा व दारूगोला व पलटणेसुधा देवी नाईक दुभासी यासी घेऊन येणे. ———— कलम

१ तुम्ही विनंती लिहिली त्याप्रमाणे देवी नाईक दुभासी यासी १लुगडे व चिरड्या दोन पाटविल्या आहेत घोडेविसी विनंती लिहिली त्यास घोडे दोन तयार आहेत मागाऊन येऊन पोहचतील.

१ आजम महमंद शुकुर साऊकर बंदर गोवे यासी तुम्ही विनंती लिहिलेअन्वये इनायतनामा सादर जाहाला आहे.
१ तुम्ही विनंती लिहिलेअन्वये गोवेकर फिरंगी यास खतुताच्या थैल्या दोन सादर जाहाल्या आहेत.

लेखांक ४२३ तारीख ३-१-१८१२

हु०

रु. नं. ५ छत्रपति-

अ. नं. ३६३

मिस्तर लुईज फरनांदज मुकाम घोड नदी लष्कर कंपणी इंग्रज बहादर तसलीमात व कुरनुशात बादमारूज पेशजी आर्जनामा दर खिजमत माहाराज साहेब फिरिस्ताद जाहाले त्यावरून सर्व मुफसील ध्यानास आलाच असेल फिलहाल मुनसी मााद इब्राहिम बकील याचे अर्जीवरून तमाम कैफीयत जाहीर होऊन येईल व राजेश्री सरूपजी खीरसागर हुजरे व इब्राहिमखान हे उभयता आर्ज करिता हुजूर दर्यात्फीत येईल आणि कामाचे बंदोबस्ताच बोलण मशारनलेस माहीत केल आहे ते इजहार करतील नंतर मुनसी मााद इब्राहम याचे वकालतीच्या बंदोबस्त जाहाल्याशिवाय जाबसाल होणार नाही हुजूर बंदोबस्ताचा कारभार चालला पाहिजे

ताा छ. १७ माहे जिल्हेज सन १२२६ हिजरी
सही इंग्रजी.

लेखांक ४२४ तारीख ६-१-१८१२

श्री

रु. नं. १

अ. नं. १८९

राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुाा इसन आशीर मयातैन व आलफ हली हुजूरचे प्रांतात निपाणकर याणी फौज व पेंढार पाटऊन प्रांताची बहुत खराबी करीत आहेत याजकरिता आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी आज्ञापत्र सादर होतेक्षणी हा मजकूर आजम महमंद इब्राहिम मुनशी वकील यासी समजाऊन पेशजीचे आज्ञेप्रमाणे पलटणे सरंजामसुधा सत्वर घेऊन हुजूर येणे येविसी क्षणाचा विलंब न करणे जाणिजे रवाना छ २० माहे जिल्हेज.

लेखांक ४२५ तारीख २३-२-१८१२

श्री

रु. नं. १

अ. नं. २९३

श्रीमन्ममहाराज छत्रपति साहेब दाम हू

अर्जी हनराबल मोट इस्टवारीत इलफीसतन साहेब बाहादूर बाद सलाम आंकी येथील खैरीयत जाणून पाटवून दिल आराम करीत असल पाहिजे दिगर भरतगडचे वर्तमान कृष्णराव गोपाळ याचे लिहिल्यावरून ज्याहीर जाहाले त्यास खत पावताक्षणी गोवा बंदर येथे कपतान इस्केल साहेब बहादूर याजला व दुर्गाबाईस भरतगड फिरोन देण्या करिता बहुत अगत्यवादे लिहिले कीं दुर्गाबाई साहेब भोसले सांवत याजला ताकीद करून कटीन किल्ला मजकूर खाली करून देण्याविसी पत्रे रवाना जाहाली आहेत येकीन आहे कीं साहेब मसुफ चांगल्या प्रकार त्यासी बोलोन किला लवकरच देवतील ये माहाराजानी खातरजमा असो द्यावी श्री भाऊ माहाराज व दिनकरराव आपा व वकील वगैर हमेशा इजानीबाकडे येऊन महाराजाचे कामाविसी कोसीस फार करीत आहे इजानिबा चे कामामध्ये मुतवज व कबूल करीत नाही इनशाआलाहुताला माहाराजाकडील लोक लौकरच नमुदात येतील. तारीख छ. २३ माहे फेबुरवारी सन १८१२.

सदरहू थैली पुणेहून माहाराज सरकारात येऊन मजकूर जाहीर जाहालेवर असल थैली श्री बाबा माहाराज यास पाहाणेकरिता पाटविली असता ती थैली परत पाटविली नाही पुढे सन समान अशरीनचे साली श्री भाऊ माहाराज याचे व माहाराज सरकारचे वाकडे सन इसने अशरीन साली आलेमुळे भाऊ माहाराज यानी आपले रुमाल करवीराहून मौजे चिंचवाड तर्फ आळते या गावी नेहून ठेविल होत ते रुमाल सन समान आशरीन साली माहाराज सरकारात आणून त्या रुमालातील थैल्या व कागद माहाराज सरकारचे होते ते काढून घेऊन श्री भाऊ माहाराज याचे रुमाल परत दिले त्या रुमालात सदर्हू थैली होती.

लेखांक ४२६ तारीख १०-३-१८१२

हु॥

रु. नं. १

अ. नं. ३३९

रफअत व अवाली पनाह जलादत दस्तगाह अजम मिस्तर ज्योज व आजम मिस्तर लुईज फर्नादज बाशंद दरिविला हुजूर चे चिकोडी तालुका व मनोली तालुका व रायबाग तालुका वगैर निपाणकर यानी घेतले आहेत व पालेगार व

जमीदार निमकहाराम आहेत त्यास आंअसमत पनाहानी इंग्रज बहादराची इंग्रजी पलटने घेऊन येऊन त्याचे पारपत्य करून हुजूर तालुकेत ठाणे हुजूर ची घालून द्यावी त्यासंबंधे मसलअतीस खर्च होईल त्यास मनोलीचे ठाणे व तालुका बारी-आलीकडील व पलीकडील हुजूर पनाहाकडे महमद इबराहिम मुनसी वकील व राजश्री सरूपजी खीरसागर हुजूर याचे विद्यमाने दिल्हा असे तेथे इंग्रजी पलटणे येऊन बंदोबस्त करावा मसलहतीचे खर्चाचा ऐवज फिटल्यानंतर तालुकेचा ऐवज जमाबंदी करून त्यात एक पलटण नेहमी मनोलीचे ठाणेत ठेवावे त्याचा खर्च वजा घालून बाकी ऐवज राहील तो हुजूर द्यावा हुजूर काजकाम जे समयी पडल ते समयी पलटण एक चाकरीस यावे निरोप जाहाल्यावरी मनोलीचे ठाणेस जाऊन राहावे ज्याउती पलटणाचे काम लागल्यास पलटणे आणवावयाची आज्ञा होईल त्याचा खर्च हुजूर देण्याची आज्ञा होईल जाणिजे सु॥ इसने आशर मयातैन व अलफ रवाना छ. २५ माहे सफर जियादा काय लिहिणे. सदरहू प्रमाणे इनायतनामा राजश्री त्रिंबक आवजी व केशव मनोहर या उभयताबराबर सादर जाहाला असे दरजागा करवीर फाल्गुन वद्य द्वादसी रोज भोमवासर.

लेखांक ४२७ तारीख १०–४–१८१२

श्री

रु. नं. ५

अ. नं. ३७०

अजम महमद इब्राहिम मुनसी वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सु॥ इसने आशर मयातेन व आलफ आजम मिस्तर ज्योजफदीसोन व आजम मिस्तर लुईस फर्नांदज यासी इनायतनामेची थैली सादर झाली आहे त्यास देणे राजश्री गुंडो जिवाजी निपाणीहून हुजूरचे कामास विक्षेप मांडावया करिता पुण्यास गेले होते तेथे उपाय न चाले यास्तव मुंबईस जाणार म्हणून अकबरअल्ली त्यासह सर्व मजकूर शोकत पना आजम आलफिन-ष्टीन बाहादर यास समजोन देऊन तथील बंदोबस्त पका रखोन बाहादर याचे हातून मुंबईकडील बंदोबस्त पका करवाव जाणिजे र॥ छ २७ माहे रोवल.

लेखांक ४२८ तारीख १०--४–१८१२

श्री

रु. नं. ५

अ. नं. ३६८

राजश्री त्रिंबक आवजी यासी आज्ञा केली ऐसीजे सुा इसने आसीर मयातेन व आलफ स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंती पत्रे छ १८ व छ २२ रोवलची पाटविली ती छ

२६ मिनहूस प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला तुम्ही विनंती लिहिले अन्वये जंजिरे सिंधुदुर्गास आज्ञापत्र सादर होऊन राजश्री खंडोजी नाईक भोसले याची रवानगी जाहली असे हुजूर तोफा व बंदुखा चापाच्या याचे उपयोगी असतील त्या दारू गोळ्यासुधा तयारी होणेची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती लिहिली त्यावरून तोफा तयार करणेची आज्ञा जाहाली दारू वगैर सामान जे तेथे मिळेल ते बरोबर घेऊन येणेचे करणे आणि तुम्ही विनंती लिहिल्या बेता प्रमाणे पलटणे सरंजामसुधा जलद जलद हुजूर येऊन पोचते करणे येविषी दुसरे आज्ञापत्राचा उजूर न धरणे छ २४ रोवलचे आज्ञापत्र सादर जाहले आहे त्याप्रमाणे तेथील बंदोबस्त करणे आज मिस्तर ज्योजफदेसोस व आजम मिस्तर लुईन फर्मादज यासी इनायतनामेची थैली व अजम महमद इब्राहिम मुनसी बकील यासी आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी थैली व आज्ञापत्र त्यास देणे वरकड मजकूर आज्ञे प्रमाणे राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा तुम्हास लिहितील त्यावरून कलो जाणिजे रा॥ छ २७ माहे रबिलावल लेखनसीमा.

लेखांक ४२९ तारीख १२–४–१८१२

श्री

रू. नं. ५
अ. नं. ३७१

अजम महमद इब्राहिम मुनसी वकील यासी
आज्ञा केली ऐसीजे सुा इसने आशर मयातेन

व आलफ राजेश्री त्रिंबक आवजी याचे विनंती पत्र छ २४ रबिलावलचे हुजूर आले त्यावरून तुम्हाकडील सविस्तर मजकूर निवेदन होऊन संतोष जाहला साहुकारी खातरजमा तुम्ही करून सत्वर पलटणे सरंजामसुधा घेऊन येऊन पोचणे ज्याप्रमाणे तुम्ही साहुकाराची खातरजमा कराल त्या प्रमाणे साहुकारी उलगडे करून देणेची आज्ञा होईल तरी तुम्ही कोणताही संवशय न घेता सरंजामसुधा पलटणे घेऊन सत्वर येणे श्रीचेही आसीरवाद पत्र सादर जाहाले आहे येविसी राजेश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा तुम्हास लिहितील त्यावरून कलेल जाणिजे रा छ २९ माहे रावल.

लेखांक ४३० तारीख १४–५–४८५

श्री

रु. नं. ४
अ. नं. २७७

विज्ञापणा ता छ २ माहे जमादिलावल रोज गुरुवार पर्यंत मुकाम पुणे येथे आसो विषेश मिस्तर लुईज रोज गु॥ छ १ रोजी जंजिरेस जाणेकरिता येथून निघोन मौजे वडगांव

येथून आडीच कोष आहे तेथे मुकाम केला सत्वरच जाऊन पोहचणार याज प्रमाणे मिस्तर ज्योन फदीसोन यार्ची थैली पाटविली आहे त्यावरून निवेदन होईल येवजाचे भरणे करिता दोन पत्रे पाटविली आहेत त्याप्रमाणे सत्वर पुरवणी जाहाली आसता त्वरीतच लढाई घेणार येवजाची दिकतीमुले आणि दरबारी प्रधानपंताच्या बहुत बोभाट जाहाला याजकरिता मिस्तरजी याणी येथून सरंजाम बहुत घातला नाही मुंबई व गोवे व घोडनदीवरून रवाना करणार करारा प्रमाणे येवज पटताच खुद हुजूर दाखल होणार दरबारी प्रधानपंताचे दरबारातून शत्रूकडील वकीलानी बाहादर आजम आलफिनस्टीन यास बहुत बोलणे लाविले आहे जे लढाई होऊ नये तह करून द्यावा हा मजकूर तपशीलवार मुनसी लिहितील त्याजवरून कलेल परंतु मिस्तरजीचे म्हणणे जे आजम यास आहे जे विना लढाई दिल्हे शिवाय दरबारी बोलावयाचे नाही याप्रमाणे इंग्रेजी काम याजकरिता येवजाची आज्ञा सत्वर व्हावी आणि जंजिरेस कोण आसतील त्यास आज्ञापत्र पाटवणेची आज्ञा आसावी आम्हास तोफा पांच आम्हाकडील पाहिजेत म्हणून बोलिले आहेत त्यास परभारे त्याजकडून पाहाणेस हुजूर येणार आहेत त्यास त्याचे उपयोगी पडे येशा आसल्या त्याची आज्ञा जंजिरेस व हुजूरीत आसावी सविस्तर मजकूर झाडेनिशी येवज येथे येऊन पोहचताच येऊन विनंती करितो तपोनिधीकडील ऐवज होईल तितका करून घेतो वडिलाप्रती विशेषकाय लिहिणे हे विज्ञापणा

विज्ञापणा येसीजे मी येऊन सेवेशी पोहचेपर्यंत लढाईची गडबड होऊं नये आठ रोजाचे आत येऊन पोहचतो मिस्तरजी यांणी कितेक प्रकारच्या मसलतीचा विचार सांगितला आहे येवजमात्र सत्वर पाटऊन द्यावया आज्ञा आसावी बहुत काय लिहिणे हे विज्ञापणा.

पौ छ ६ माहे जमादिला
वल सुा इसने आशर मया-
तैन व आलफ

लेखांक ४३१ तारीख २४-५--१८१२

हु॥

रु. नं. १

अ. नं. ३३३

रफआत व अवाली पनाह व जलादत दस्तगाह आजम मिस्तर ज्योज फदीसोज आशंद दरिविला हुजूर पणाहानी खतूत खुष नमत छ ६ जमादिलावलचे राजेश्री त्रिंबक आवजी या फिरिस्ताद केले ते छ ११ मिनहूस रसीद जाहाले त्यावरून व मोमिइले याचे जुबानीवरून बयावार मजमून निवेदन होऊन हुजूर शादमानी हासील जाहाली वीस हजार रुपये चांदवडी त्रिंबक आवजी याचे विद्यमाने पावले म्हणोन पनाहानी निगारीष केले तरी जाहीर

जाहाले बाकीचा ऐवज पन्हाहानी कलमी केल्याअन्वये हुजूरला जंजिरे सिंधुदुर्गास रवाना होणेची आज्ञा जाहाली आहे त्यास इनायतनामा रसीद होताच बमये सरंजाम पलटणेसुधा सत्वर जंजिरेस येऊन पोहोचावे यबाबे दुसरे इनायतनामेचा उजूर न धरिता सरंजामसुधा जंजिरेस येऊन रसीद होणे अजम महमद इब्राहिम मुनसी वकील याचे खर्चाबाबे कलमी केले अशास पन्हाह हुजूर येऊन पोहोचल्यावरी येविसीची आज्ञा होईल बाकी मुफसील मजकूर आज्ञे मवाफीक त्रिंबक आवजी कलमी करतील त्यावरुन पनाहास माआलूम होईल. जाणिजे. सु॥ इसने आशर मयातेन व अलफ रवाना छ १२ माहे जमादिलावल जियादा काय लिहिणे.

लेखांक ४३२ तारीख १५-७-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. ३१७

स्वस्ति श्री राज्याभिषेक

शके १३९ आंगिरानाम संवत्सरे आषाढ श्रु॥ सप्तमी सौम्यवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी यानी राजमान्ये राजेश्री आपाजीराव निंबाळकर यासी आज्ञा केली ऐसीजे शौकत व अवाली पन्हाह अजम अलफिष्टीन बाहादर यासी हुजूरून इनायतनामेची थैली रवाना जाहाली आहे त्यास ती थैली तुम्ही समक्ष बहादर यासी देऊन उत्तर घेऊन पाटवावे आणि इंग्रेज बहादरास हुजूरून अजम मिस्तर ज्योजफदीसोन व आजम मिस्तर लुईज फर्नांदज याचे विद्यमाने पलटणाचे सरंजामाचे उटावणीस ऐवज पावलियावरी अजम मिस्तर लुइज फर्नांदज पलटणाचा सरंजाम घेऊन माहाडापर्यंत येऊन माघारी पुणीयास गेले या मसलतीची शोध पकेपणे तुम्ही करून जाहाली मसलतीची उभारणी आपले मार्फतीने करून मसलत सिधीस पोहोचवणे राजश्री त्रिंबक आवजी यास तुम्हाकडे रवाना जाहाले आहेत त्यास जाहाले मसलतीचा मजकूर तुम्हास समजाऊन देतील तो समजून घेऊन त्यातील पके जे असतील ते तुम्ही करून मसलत सेवटास पोचवावी वरकड मजकुराची आज्ञा त्रिंबक आवजी यास जाहाली आहे आज्ञेच्या अन्वय तुम्हास सांगतील व राजेश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा तुम्हास लिहितील त्यावरून कलो येईल जाणिजे.

लेखांक ४३३ तारीख ६-८-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २५७ नकल

आज्ञापत्र राजश्री शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता। मोकादमानी तर्फ पनाला सुा सलास असेर मयातेन व आलफ तर्फ मजकूर येथील सालमजकुरी ठाणी बसवली होती ती श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपती स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरोन हे पत्र सादर जाहाले असे तरी सदरहू तर्फेचे पौ। दिगरी गाव खेरीज करून बाकीचे गावकर छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलित देत जाणे जाणिजे छ २७ रजब मोा असे.

लेखांक ४३४ तारीख १३-८-१८१२

श्री

रु. नं. ५

अ. नं. ४०३

राजमान्य राजेश्री घ्यंकटराव नलवड नामजाद जंजिरे सिंधुदुर्ग यासी आज्ञा केली ऐसीजे वे। राजेश्री रघुनाथ भट बिन बालकृष्णभट उपनाम × × × गोत्र अत्रि सूत्र आश्वलायन जोसी मौजे नांदोसी हल्ली वस्ती × × × मजकूर हे ब्राम्हण कुटुंबवत्सल याचे कुटुंबाची योगक्षेम चालविलिया राज्यास कल्याणवह जाणून धर्मादाय बागायत जंजिरा मजकूर येथील सरकार बाग पैकी इनाम जमीन झाड सुधा करार करून दिली असे झाडे सुमार बी तपसील नारळ माड सुमार ४२ सुपारीची फोपली सुमार ३२ एकूण झाडे सुमार ७४ याची हद्द बी तपसील पूर्वेस मरसरणाबात उत्तरस माहापजी पश्चमेस नील दक्षणेस बादर पूर्वेस मरसरनाब्रत याची कुप्राची उत्तरस महादजी नाा घाटगेच घर पश्चिमेस नीलकंठ विठल याचे घर दक्षिणेस बदरकुपाची (फाटलेलं आहे येणे प्रमाणें चतुःसिमा पूर्वक (फाटलेल आहे) सादर जाहाली असे तरी आज्ञे प्रमाणे बागाईयत चतुःसिमा (फाटलेल आहे) कवे।कड जमीन देऊन यासी व याचे पुत्रादिवंशपरंपरान चालवीत जाणे धर्मादाय इनामबागेस पट्टी माफ असे तरी साल दरसाल नवीन आज्ञापत्राचा उजूर न करता या पत्राची तालीक लिहून घेऊन असल पत्र भोगवटेस वहिवाटीकडे देणे जाणिजे सुा सलास आशर मयातेन व आलफ र। छ ५ माहे शाबान बहुत काय लिहिण.

लेखांक ४३५ तारीख १९-९-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २४४

आपण पत्रे दोन व तहनामेची याद राजश्री कृष्णराव गोपाळ व सरूपजी खीरसागर हुजरे याजसमागमे पाठविली ती प्रविष्ट जाहाली हुजूरचे कार्यभागाविसी आपण खातरजमेच वचन इजत आसीर महमद इब्राहिम मुनसी वकील व सरूपजी खीरसागर यास दिल्हेवरून तहनामेचे यादीवरी मोर्तब करून व हुजूरचे तहनामेची याद व आल्ताफनामेची थैली डाकेवरून पाठविली आहे त्यास हुजूरचे तहनामेवरी सही करून पाठवून हुजूरचे कार्यभाग सत्वर होये ते करावे सरूपजी खीरसागर याजबरोबर तीच करारनामेची याद आपणाकडे पाठविली आहे बईसबब आलताफनामेची थैली माअलुम होणेकरिता डाकेवरून रवाना जाहाली आहे सु॥ सलास आशर मयातेन व आलफ रवाना छ १२ माहे रमजान.

लेखांक ४३६ तारीख ३०-९-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. ३३९

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी

चे शेवेसी

विनंती शेवक आज्ञाधारक चरणरज सरूपजी खीरसागर हुजूरे मु॥ पुणे कृतानेक दोनीकर जोडून चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग विज्ञापना तागायत भाद्रपद वद्य १० पावेतो साहेबाचे कृपावलोकने करून वर्तमान यथास्तित असे सेवेसी विज्ञापना ऐसीजे मसलत तरी बहुत बिघडली तरी साहेबानी कृपाळु होऊन दुसरे तिसरे ध्यानात न आणिता सात कलमाची तहाची यादी इंग्रज याची जी हुजूर सेवकाबरोबर आली आहे तिजवर सिका मोहोर रूजू करून सत्वर आज पासून पांच दिवसात येऊन आजम हनराबल मोट इष्टवारीट आलफिष्टीन बाहादर याजपासी सेवकाचे हातून पोहोचली असता फौजेची मनाई राहून तह अन्वये घडून येईल नाहीतर कांहीच मनोदयानरूप होणार नाही शत्रूचे मनात जसे आहे तसे होते हुजूरचे कामाचे होणे ते कांहीच होणार नाही पलटणे साडेबारा पंढरपूरची व पुणे मुकामची रवाना जाहाली आहेत त्याचा खर्च जो देईल त्याजकडे सर्व इंग्रज करून देतील तेही देण्यास राजी आहेत त्यापेक्षा याजवर टाकून केले असता सर्व बंदोबस्त मनोदयानरूप घडोन येईल आणि कालचे बोलण्यात सेवकाने ही

जिमी हुजूरून येते समयीं सेवकास आज्ञा केली तीच खूण बहादर यासी सांगितली आहे त्यास हा मजकूर सविस्तर संक्राजी कदम याजवल जबानी सांगितला आहे शेवेसी निवेदन करील त्या अन्वये आलपेष्टी बहादर यासी पत्रात अन्वये लिहिण्यांत आला असावा म्हणजे सेवक आलपेष्टी बहादर याजपासी खुणेच्या स्वामीकडील बोलण्यातील भाव सांगितले आहेत त्याचा दाखला पूरक पाहिजे याजकरिता तसे पत्रात भाव बहादर याच्या असावे सात कलमाची तहाची यादी शिकामोहोर रुजू करून संक्राजी कदम याज बो देऊन आलफेष्टी बहादर यासी पत्र लिहिल्याअन्वये निखालस या वेली स्वामीकडील खातरजमेविषीचे सांगोन पाठविलो होते त्यास तुम्हास खीरसागर याने सांगितलेच असेल सर्वप्रकारे इकडील आगत्य धरून काजकामे जाहाली पाहिजे म्हणोन अन्वये यथास्तित पत्रात लाऊन जलद येवोन कदम मार तहाची यादी सुद्धा पांचवे दिवसे येऊन पोहचे असे रवाना व्हाव तहाच्या यादीच्या नकला करून इंग्रजाकडील वकील कृष्णाजी-पंत करवीरी आहेत त्यासपासी देऊन इंग्रजाकडील पलटणे येत आहेत त्याजकडे मारगी येऊन निकडीने पोहचत अशी आज्ञा जाहाली पाहिजे डाकेवरून छ १६ रमजानचे आज्ञापत्र आले ते प्रविष्ट सेवकास जाहाले आलपेष्टी बाहादर याजकडून चितात विसम येऊन चवदा कलमाचे यादीवरून परभार आले त्याजवरून कललेवरून दोन यादी तहाच्या दाहा कलमाची व नऊ कलमाची यादी व पत्र गेले आहे त्याजवर शिका मोर्तब हुजूरून होऊन आले असता पुढे बोलण्यास जागा राहात नाही सात कलमाची यादी प्रथमता त्याजकडून जाहाली आहे त्याजवर सिका मोर्तब रुजू होऊन आली असता बोलण्यास जसे म्हटले तसे आहे तरी प्रथमता यादीवरच रुजू व्हावे म्हणजे इंग्रज यासी खुषी वाटेल म्हणजे सेवकाचे बोलण्यातील भाव बाहादर याजवल जाहाले आहेत त्यास ठीक पडेल राजेश्री बाजीराव पंडित–

(यापुढील बंद गहाळ)

लेखांक ४३७ माहे सप्टेंबर इ. स. १८१२

श्री

रु. नं. २
अ. नं. २४५

राजेश्री सरूपजी खीरसागरे हुजूरे यासी आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ तुम्ही हुजूरची आज्ञा घेऊन गेलेवरी शौकतपनाह आजम आलफिष्टीन बहादर याचे खत राजश्री कृष्णराव गोपाळ यासी आले तेचे पत्र मारनिलेनी हुजूर दाखविले नंतरी सात कलमाचे यादीवरी नवे अक्षर न लिहिता त्याही लिहिल अन्वये

* टीपः- ता. २३-९-१८१२.

रुजू मोर्तब होऊन छ १६ रमजानी * बुधवारी डाकेतून रवाना जाहाली आहे व बहादर यासी आलताफनामेची थैली व तुम्हास आज्ञापत्र येणेप्रमाणे रवाना झाले आहे हली छ २१ रमजान अजम महमद इब्राहिम मुनसी वकील याची विनंती पत्रे दोन छ १३ व छ १५ रमजानची हुजूर आली त्यातील मजकूरही सात कलमाचे यादीवरी नवे अक्षर न लिहिता रुजू मोर्तब होऊन सत्वर रवाना व्हावी म्हणजे हुजूरचे कार्यभाग होतात ऐसे विनंतीपत्री लिहिले आहे त्याचे आज्ञेतर तुम्ही विनंती लिहिलअन्वये सात कलमाची यादी रुजू मोर्तबा होऊन छ १६ रमजानी बुधवारी डाकेवरून रवाना जाहाली आहे म्हणोन मुनसी वकील यास आज्ञापत्र सादर जाहाले आहे त्यास तुम्ही व मुनसी बहादर यासी बोलून तुम्हास जात समयी समक्ष आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे यादीवर मखलाशा करून घेऊन तालुक्याच्या सोडचिटया घेऊन तुम्ही जलद हुजूर येऊन पोहचणे. सारांष बहादर याची मर्जी संतोष राहून हुजूरचे कार्यभाग करून सत्वर येणे.

लेखांक ४३८ तारीख ३-१०-१८१२

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. २४६

चिरंजीव राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आशीरवाद उपरी तुम्ही गेल्यापासून तुम्हाकडील कागदपत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सविस्तर लिहून पाटवणे हिकडून सरकारी कामाविसी तुम्हास समक्ष आज्ञा जाहालीच आहे व हली इजत सार महमद ईब्राईम मुनशी वकील याचे पत्र आले होते त्याचे उत्तर त्यास सविस्तर लिहले आहे त्याजवरून कलेल तरी तुम्ही व ते मिलोन या प्रसंगी सक्त मेहणत करून काम करून वेणे सात कलमाची यादी या × × × × × × × × × प्रमाणे करोत हुजूरून कोणताही आग्रह × × चुरचा विश्वास कशावरून म्हणाल तरी दुसऱ्या दोन यादी पाटविल्या त्याजवर रुजू मोहर करून कर्नेल मुप्रंजर बहादर याजकडे निशान करून तीन रोजाचे आत रवानी कराव्या असे बहादर याणी लि॥ त्यास विश्वास पडण्या करिता कर्ण त्यास महाराजाकडून दुसरा विचार नाही या समयही खातर जमा होणे बा पाटविल्या आहेत कामी तीन दोन जाहाले तरी दुसरी तरा होईल म्हणोन लि॥ त्याजवरून पाटविल्या आहेत परंतु पहिली सात कलमाची याद × × × × भाद्रपद व॥ नवमीचे पत्र तुम्ही पाटविले ते भाद्रपद व॥ १२ रोज सुकरवारी दोनप्रहर रात्रीस येऊन पावले त्यातील भाग लिहिला तो कलम सात कलमाची यादी मंजूर करून पुढे इनसाफाने चिकोडी व मनोली घ्यावी असे ठरविले हे उत्तम केले तुमचे पत्र येताच रात्रीस वाडेतील बोलावणे आले त्यावेलेस जाऊन दुसरे अक्षरी आधिक उणे ज्या ज्या रुजू मोर्तब करून यादी पाटविली आहे जरी तुम्ही बहादर यासी समजून सांगितले जे आपण जे दस्तऐवज दिले व वाजवी इनसाफाने कराल ते हुजूर मान्य आहे × × ×

व्हावे यासी हुजूरची मर्जी खुशे आहे तरी त्यास तुम्ही बालइनेमी निगोदव कबूल केली ती महाराज मातेधणी त्यानी कबूल करून त्या तहास मान्य त्या प्रो आपणही चालवावे लिहिण्यात आदिक उणे येखादे चुकून पडल म्हणोन केवल तह माहराजानी गैर मंजूर करून आपल्यासी फेर सांगितला असे नाही हुजूरचा विश्वास आपल्यावर आहे येसी खातरजमा तुम्ही मुनसी करुन पाहिले सात कलमाचे यादीचे वेलेस ठरले आहे त्याप्रमाणे करून घेणे यादी बहुदीमध्ये वाकडे पडूनही माल्ल येणेस कारण व तुम्हास येश येऊ नये हे काणी × हे तुम्हास माहितच आहे व रामजी जबानीही सांगेल सा × पुा चिरंजीव राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील यासी आसीर्वाद उत्तरीश मागील दोन्ही यादी दोन्ही यादी राकून पेशजी सात कलमाची यादी आहे ती करार करून घेणे मागील दोनही यादीतील येक कोणतीही यादी करार जाहाली अस्ता हुजूरचा नाशे आहे व हुजूरून त्यानी म्हणने दिल्हे आसता पहिला करार राहून दुसरा करार करा म्हणतात यात दिल खुलासा हुजूरचा राहात नाही मुनसीस पत्र लि॥ आहे व तुम्हासही हे लि॥ आहे तरी तुम्ही व मुनसी दोन्ही पत्रे येकमेकाची आक्षेरशा मनन करून हुजूरचे राज्याचे कल्यान होय ते इमाने इतबारे करणे ही सात कलमाची यादी करार होऊन सदरहू लि॥ प्रो जाहाले आस्ता येश येऊन उभयेताची खासगत कामे होणेचा समये आहे तुमचे पत्र हाली आले ते पाहून भरवसा मानून स्वास्त आहेत सारांश बहादर याची मर्जीही संतोष राही व हुजूरचेही काम होय ते करणे रवाना छ २६ माहे रमजान सुा सलास आशर मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे आशीरवाद.

लेखांक ४३९ पौ तारीख ७-१०-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २४३

चौ छ १ माहे शोवल सु॥ सलास आशर मयातेन
व आलफ

शेवेसी गोविंद भानजी त्रिकाली चरणी मस्तक ठेऊन स॥ नमस्कार विज्ञापना त॥ बुधवार प्रातकाल पर्यंत स्वामीचे कृपावलोकन करून शेवकाच वर्तमान यथास्थित असे शेवेसी विज्ञापना ऐसीजे लष्करचे मु॥ कृष्णाजी जासूद परभारा प॥ होता त्यान वर्तमान सांगितल जे पलटणचा मुकाम कुंडल नजीक आहे भोमवारी दोनप्रहरी श्रीमंत राजेश्री नारायणराव पंडित व राजश्री दिनकरराव आपा याची व इंग्रजाची भेटे जाहाली नरसीपूरचे व श्रीरामलिंगाचे नजीक मध्येभागी कराडच्या नावा दोन आणऊन ठेविल्या आहेत त्या मार्गे उतरून आलीकडे येणार इंग्रजाकडील शेंभर आसामी व खासा येकजण मौजे इटकर येथे येऊन तळाची जागा पाहून भोमवारी प्रातकाली तांबवेचे मु॥ माघार गेले

वारण' कोणते ठिकाणी उतरतात याचा निश्चेय नाही याप्रो वर्तमान आहे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४४० तारीख १८-१०-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २४७

राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे यासी आज्ञा केली येसीजे सु॥ सन सलास आशर मयातैन व आलफ स्वामीचे शेवेशी तुम्ही विनंतीपत्र छ ९ माहे शौवाल दशमीचे पाटविले ते छ १२ मिनहूस प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला निपाणकर यानी चार सालात हुजूरचे तालुके व किल्ले व ठाणी वगैरे घेतली आहेत ती व राजश्री रावजी भोसले व शिवराजगिरी गोसावी व राजश्री नरहर बापोजी याचे पुत्र व सामानगड येथील राजश्री दत्ताजीराव खानवेल्कर वगैरे गावगनाचे बोली व कतबे काय जे घेतले असतील ते झाडेनिशी सोडून देणेविसी शाहमत पनाह आजम बाहादर यास बोलोन ताकिदपत्रे सत्वर पाटऊन देणे जाणिजे रवाना छ १२ माहे शौवाल लेखन सीमा

मोर्तब

लेखांक ४४१ तारीख २२-१०-१८१२

भाऊमहाराज

रु. नं. २

अ. नं. २४८

राजेश्री सरूपजी खीरसागर हुजूरे

यासी आज्ञा केली ऐसीजे सन सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंतीपत्र आस्वीन शुध्ध त्रियोदसीचे पाटविले ते छ १६ माहे शोवली प्रविष्ट होऊन लेखनार्थे निवेदन जाहाला राजश्री कृष्णराव गोपाळ यानी मालवणचे सोडचिटीविसी विनंती केली व तुमचे विनंती पत्र हुजूर आले त्यावरून मालवण किलेची सोडचिटीं तुम्हाकडे पाटविली आहे येविसी कृष्णराव गोपाळ तुम्हास लिहितील त्याप्रमाणे शाहामत पुन्हा अजम आलफिंष्टीन बहादर यासी चिठी दाखवून तुम्हापासी ठेवणे श्रीची स्वारी आज × × रात्र जाहाल्यानंतरी पुणीयास यावयाकरिता कूच होऊन येत आहेत गुरुवारी तेथे येऊन पोहोचतील नंतरी समक्ष भेट होऊन बाहादर यासी चिठी देतील वरकड मजकूर कृष्णराव गोपाळ लिहितील त्यावरून कलेल जाणिजे र॥ छ १६ माहे शोवाल येविसी श्रीनीही लिहिले आहे. छ मजकूर लेखन सीमा.

लेखांक ४४२ तारीख २३-१०-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २४९

राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे यासी आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ मालवण येथील च्यार किल्याचे गडकरी याच्या जमीनी खर्चाच्या याजकडे देऊन आरमारचे वहिवाटीस लोकाच्या जमीनी व आरमारचे खर्चाचा तालुका एकंदर याची वहिवाट तुम्ही करून झाजाची वहिवाट जंगी सामान न ठेविता रुजवातीने इंग्रज बहादर याचा दरोगा राहील त्यास जंगी सामान नाही ऐसा झाडा दाखवून साहूकारी वहिवाट करीत जाणे याप्रमाणे शाहामत पनाह अजम आलफिष्टीन बहादर यासी बोलून केले तैसेच मालवण येथील सामान काडावयासी वायदा करून घेणे सामान निघावयासी पाहिजे यास्तव दोन महिनेचे पुरसतीने वायदा करून घेणे जाणिजे. रा। छ १७ माहे शोबाल लेखन सीमा.

लेखांक ४४३ माहे आक्टोबर इ. स. १८१२

श्री

रु. नं. १ मयातेन व आलफ

अ. नं. १३६ श्री मदार

सास्टांग नमस्कार सप्रेम नमस्कार विज्ञापना विज्ञापना ऐसीजे सुा सलास आशर माहे शोवाल

सांां नमस्कार विज्ञापना ऐसीजे

१ सन समान सबेन कारकीद माधवराव नारायण पंडित प्रधान विाो महादजी शिंदे करवीरास आले ते समयी फौजच खर्चाबद्दल ठराव करून करवीरचा शह उठविला दरम्यान हुजूरून सुबराव कृष्ण आमात्य व आबाजीराव कृष्ण पंत प्रतिनिधि देऊन ऐवजात चिकोडी तालुका व मनोली तालुका सदरहू कर्जाचे देण्यात द्यावा किंवा ऐवजाची परनिशा सावकारी हप्तबंदी प्रमाणे × × × × सदार याचे हातून घेतली

कलम

कलम दुसरे सन इहिदे समानीन साली परशराम रामचंद्र करवीरावर आले कारण सिंदे याचे वि॥ सनदा दिल्या ते तालुके हुजूरून कमाविसदार याजकडोन वहिवाट घेत होता हा मजकूर पंत प्रधान यास गैरवाका समजाविले जे राजमंडलचे तालुके आपले लगत्यास आहेत असे समजाऊन करवीरावर आले ते समयी पंतप्रधान याचा तह ठरला त्यात चिकोडी मनोली तालुके हूजूरचा हुजूर असावे. ते समयी सिंदे याचे विद्यमाने सनदा दिल्या आहेत त्या माघारा मागितल्या त्या समयी शिंदे पुणे मुकामी नव्हत सबब सनदा

तिकडोन आणोन माघाऱ्या देऊ राहिल्या तरी माहालासी + + द आहेत म्हणोन तहात करार करून दिले असे.

लेखांक ४४४ तारीख ८-११-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २५२

राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे यासी आज्ञा केली यैसीजे सुा सलास आशर मयातैन व आलफ स्वामीचे सेवेशी तुम्ही विनंती पत्र छ २५ शौवाल मंदवारचे पाटविले ते छ २ जिलकादी हुजूर प्रा। होऊन लेखनाथ निवेदन जाहाला शौकत पनाह आजम हनराबल मोट इष्टवारीट आलफिष्टीन बहादर याचे व तुमचे बोलणे जाहाले त्याचा मजकूर तपशील विनंतीपत्री लिहिला तो निवेदन जाहाला श्रीचे स्वारीचा बेत बाहादर यासी बोलून सामोरे येऊन श्री ची स्वारी घेऊन जावी याविसीची विनंती लिहिली ती निवेदन जाहाली जंजिरे सिंधुदुर्ग येथील लोकाची सनदी जमीनी व देवधर्म व धर्मादाये याच्या यादी सेवकाकडे पाटवणेची आज्ञा होऊन सादर व्हाव्या म्हणोन विनंती लिहिली त्यावरून जंजिरा येथून यादी आणवणेविसी राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी जंजिराहून यादी पाटवणेविसी आज्ञापत्र सादर जाहाले आहे यादी हुजूर येताच तुम्हाकडे रवाना होतील राजश्री दिनकर आपाजी यासी पाटऊन देणेची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती लिहिली त्यास भशारनिले श्री चे स्वारी समागमेच गेले आहेत निपाणकर याजकडील वसुलाची मनाई आद्यापि होत नाही तुम्हास कलावे तुम्ही विनंती लिहिले-अन्वये राजश्री कृष्णराव गोपाल यासी हुजूर आणून तुम्ही लिहिल्याआन्वये जंजिरे येथील लोकाविसीचे निपाणीकर याजकडील वसूलाचा तगादा प्रांतात कोणता विचार चालला आहे याविसी सर्व आज्ञा त्यास जाहाली आहे त्याचेही लिहिणे आकबरीतून येईल किले सामानगड येथील पत्रे हुजूर आली त्याच्या तालुका कृष्णराव गोपाळ याजकडे दिल्या आहेत त्याही आकबरीतून येतील निपाणकर मनस्वी गिला हुजूरच लिहितात हे तुम्हास समजतच आहे हुजूरून हा कालपर्यंत तिलप्राये उपद्रव त्याजकडील प्रांतात व हरएक ठिकाणी नाही वरकड सविस्तर श्रीचे पत्रावरून कलेल जाणिजे रा। छ ३ जिलकाद चिकोडी मनोलीकडील देखील वसुलाची निकड बसविली आहे याजकरिता वसुलाची रवानगी सत्वर मनाई होय येसे करणे छ मा। लेखन सीमा.

(मोर्तब)

लेखांक ४४५ तारीख १४-११-१८१२

श्री रामचंद्र

रु. नं. १ पो छ १४ जिलकाद सन

अ. नं. १९७ सलास आशर मयातेन कार्तिक वा। १

गुरुवार

चिरंजीव राजश्री छत्रपति यासी आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता। कार्तिक शुद्ध दशमी मंदवार प्रातःकाल मुक्काम पुणे येथास्थित असे. विशेष परवाचे दिवशी मुनसी व सरूपजी खीरसागर बहादर याजकडे गेले होते यास त्यानी विचारिले जे भेटीच्या समई सनगे व जवाहीर वगैरे मर्तबा प्रमाणे घ्यावयाची त्यास तुमचा सिरस्ता काय तो सांगणे त्याजवर खीरसागर याणी सांगितले जे तुमचे खुषीस येईल ते करणे येसे तेथे बोलले तेव्हा त्यानी पुन्हा विच्यारिले जे कोणकोणास काय द्यावे लागते याची माहितगारी बोलणे मग याणी सिरस्ता सांगितला नंतरी घरास येऊन आम्हास सांगितले जे बहादर याप्रमाणे बोलले त्यास आम्ही उभयता वकीलास बोलली जे आम्ही कांही बहुमान घ्यावयासी आलो नाही माहाराजाचे कल्याण होऊन जाते समई जो बहुमान करतील तो करोत नंतरी दुसरे दिवशी उभयेता वकील बेटांत गेले तेथे बहादर याणी सांगितले जे काल तुम्हासी बोलल्या प्रमाणे सिधता करून ठेविली आहे व बोलावयासी कोणास-तरी पाटवितो भेटीस यावे त्याजवरून वकील याणी उत्तर केले कीं आपण तो सिद्धता केलीच आहे परंतु ते घेतील न घेतील हे न कले बहादर यानी विच्यारिले कीं त्याची मर्जी काय आहे वकील बोलिले जे महाराजानी दोन गोष्टी बोलावयासी सांगितल्या आहेत त्या बोलून नंतरी काय करणे तो बहुमान करावा बहादर बोलले जे उत्तम आहे मगच करू येसी बोलणी होऊन उभयतानीं बिराडास येऊन सांगितले आज भेटी व्हावयाच्या तयारी व्हावी तो इतकेत बहादर याणी राजश्री बापू साने नि।। मोदी बिराडास पाटविले ते येऊन बोलले जे भेटीस चलावे याजवरून तयारी करून आम्ही व चिरंजीव राजश्री दिनकरराव गाईकवाड उभयता बराबर सर्वत्र मंडली घेऊन बेटास गेलो ते बहादर याचे बंगल्यापर्यंत जाऊन पालखी थोपली पुढे सूचणेस मुनसी व खीरसागर गेलेच होते त्यानी सूचना करिताच बहादर बंगल्याचे बाहीर येऊन तेथे टोपी काढून भेटी जहाल्या नंतरी आंत बैठकीच्या ठिकाणास चला म्हणो लागले त्याजवरूण आंत गेलो खुरशा बसावयासी टाकिल्याच होत्या त्याजवर जाऊन बसलों व बहादरही दुसरे खुरशीवर बसले नंतरी बहादरानी विचारिल जे महाराजाची प्रकृती कैसी आहे त्यास आराम आहे म्हणून सांगितले कामकाजाची बोलणी काही बोलावयाची असतील तर बोलावी राबता काढतो म्हणोन बहादर बोलले त्याजवर आम्ही उत्तर केले जे आज पहिली भेट आहे याप्रसंगी काय बोलावयाचे आहे तुम्हाकडे बोलावयासी आलोंच आहो दुसरे ठकीस महाराजानी दोन गोष्टी बोलावयासी सांगितल्या आहेत त्या बोलू नंतरी पुढे

कामेकाजाविसी सर्वभार तुम्हावरच आहे येसे बोलून सामोपचार सभासदी बोलणे त्यानी आम्हाकडील वर्तमान विचारिले जे महाराज खुषी आहेत तेव्हा आम्ही उत्तर केले जे आपली दोस्ती जाहाली आता खुशीच आहेत आराम करणे आपणाकडेस आहे त्यावरून बहुत संतोष जाहाले येसी बोलणी होऊन त्यानी विडयाची तबके आणली ती घेऊन बिराडास आलो भेटी काल सायकालचे दोन घटीका दिवसास जाहाल्या आपणास कलावे बहुमान अगोधर घेतला आसता कामकाजास ठीक पडत नाही हे आतून समजले यामुले घेतला नाही बहादर याचे भेटी समई त्याजकडून आजम पोटसाहेब मुनसी यैसे होते छोटा करनेल कुलूस व मोदी ऐसे नवते राजश्री सदाशिव माणकेश्वर याजकडे उभयता गेले होते बहादूर यानी निपाणकर यासी प्रांताचा वसूल न घेणेविसी ताकीद केली असता वसूल घेतात यामुले तिकडे आजम करनेल मुतंजर सरदार लष्कर कुंपणी इंग्रज बहादर याजकडे आंतून सांगून पाटवून इंग्रजी पलटणे कागलच्या नदीवरी आलेविना ठाणीही सुटत नाहीत व वसूलही तहकूब होत नाही असे खीरसागर बोलला त्याजवरून त्यातील विचार पाहव असे बोलले त्याजवरून पलटणे येतील असा सुमार दिसतो तरी आपण कांहीं आपेशा घेऊ नये बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद.

लेखांक ४४६ तारीख १९-११-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२९

पौ छ १४ जिल्काद सन सलास आशर मयातेन कार्तिक

वा १ गुरुवार

यादी हुजूरचे प्रांताचा वसूल निपाणकर नि॥ कमाविसदार घेत आहेत सु॥ सलास आशर मयातेन व आलफ हली वसूल घेत आहेत

१ मोजे टिकेवाडी तर्फ खानापूर व खानापूर तर्फेचा वसूल घेत आहेत

१ मौजे बलिवड तर्फ हवेली येथील दिपवालीचा हबता म्हणून वसूल चालीस लाविला आहे

१ क॥ कोडोली येथील वसूल घेत आहेत

१ मौजे कबनूर तर्फ रुकडी येथील वसूल घेत आहेत

१ मौजे मुडसिंगी वगैरे गावगनाचा वसूल घेत आहेत म्हणोन बोभाट येतात याची चौकसी करून मागाहून लेहून पाठवू

५

येकूण कलमे ५ येथे इंग्रज बाहादर याजकडे यादी लिहून दिली असे-

तारीख २३-११-१८१२

लेखांक ४४७

श्री

रु. नं. २

अ. नं. २५३

राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे यासी

आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र छ १२ जिल्कादचे पाठविले ते छ १७ भिनहूस प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला शाहामत पनाह अजम हनराबल मोट इष्टवारीट आलफिष्टीन बाहादर यासी परवाचे दिवसी सविस्तर समजाविले आहे परंतु कालचे बोलण्यात बहुतेक बोलणी होऊन चिठ्याविषी बाहादर यासी निकड केली तेव्हा ते बोलिले जे तुम्ही आम्हास बोललेच अगोदरआम्ही पेशवे बहादर यासी निकड लाविली आहे आणि राजश्री सदासिव पंत भावे (भाटे) ही निकड राजश्री चिंतोपंत देशमुख यासी करीत आहेत परंतु त्याचे पूर्वीचे कागदपत्र जे होते ते होळकरांचे दंग्यात गलबटले आहेत म्हणोन सांगतात आणि-यादीचा शोध करीत आहेत दो रोजात त्याजकडून आम्ही सर्व ऐकूण घेऊन पेशवे याज-कडील राजश्री चिंतो वामन व आपाजी लक्ष्मण यासी आणवितो आणि हुजूर निसबत राजश्री मोरो बाजीराव चिटणवीस व दिनकर आपाजी या उभयतास तुम्ही घेऊन यावे म्हणजे समक्ष रुजवातीने उलगडा होईल ऐसी बोलणी जाहाली म्हणोन विनंती लिहीली आश्यास पेशवे याजकडून बोलणेस कोणी आलेस हुजूरचे कोणी जाऊन समक्ष बोलावा-याचे नाही जे बोलणे ते इंग्रज बहादर यासी बोलावयाचे तिकडे बोलणे ते बाहादर यानी बोलावे येविसी सविस्तर श्री चे पत्री लिहिले आहे श्री आज्ञा करतील त्याप्रमाणे करणे इंग्रज बहादर श्रीकडे येऊन समक्ष बोलावयाचे आहे ते बोलणार म्हणोन तुम्ही विनंती लिहिली ती निवेदन जाहाली चिकोडी मनोलीविसी तुम्ही बहादर यासी बोलला ती विनंती लिहिली ती निवेदन जाहाली इंग्रज बहादर याचे मनोदयानरूप हुजूरने कामे करून दिली असता हुजूरचे कार्यभाग कांहीच घडोन आले नाही येविसी श्रीचे पत्रावरून कलेल जाणिजे रा। छ १८ जिल्काद लेखन सीमा.

तारीख २३-११-१८१२

लेखांक ४४८

श्री रामचंद्र

रु. नं. १

अ. नं. १९८

पौ। छ २ जिलकाद सन सलास आशर मयातैन

श्रियासह चिरंजीव विजयीभव राजश्री छत्रपति यासी आसीर्वाद उपरी येथील क्षेम ता। छ १८ माहे जिल्काद रोज इंदुवार सायेंकालपूर्व चार घटकारात्र पर्यंत सकल वृत येथास्थित असे विशेष आपण पत्र छ १२ मिनहूचे जासुदासमागमे पाटविले ते आज

सायंकालचे दोन तास दिवसास येऊन पोहचले पत्रातील सविस्तर मजकूर कलों आला व वडिलाचे आसीर्वाद पत्रावरूनही साध्येत कलो आले गावगनाचा वसूल निपाणकर घेतात त्याच्या वसुलाच्या यादी तारीखवार केल्या येथील मार पत्री तपशील लिहिले ते कलले त्यास आम्ही येथे बोलावयाचे ते बोलून सारीतच आहो परंतु आपणास जितका शोध लागेल तितकाच लिहून पाटवीत जावा चिकोडी × × × × × × राजश्री रामचंद्र रघुनाथ नेरेलीकर येथे आहेत त्यास × × विचारिले परंतु पुर्ती माहितगिरी नाही तशात कार्य कर्याती लागतील त्या आम्ही येथे लिहून काढीतच आहो जसीजसी बोलणी पडतील तसी पाहून करू आपणाकडे कर्यातीचा शोध लागलेस लिहून पाटवावे निपाणकर याची ठाणी गावगन्ना बसली आहेत त्याची यादी येक व त्याणी येक दोनवेला खंडण्या घेऊन गुरेढोरे न्हेऊन गावकराची खते घेऊन वोली नेऊन आठकाविल्या सबंध गाव पडसर जाहाले त्याची यादी येक येकून दोन यादी पाटविल्या त्या पावल्या व गावच्या आर्ज्या आलेल्या पाठविल्या तेही पोहचल्या येथील मजकूर तरी रोज गुदस्ता बहादर याची बोलणी उभयता वकीलासी जाहली तो मजकूर आज प्रातःकालीच आपणास लिहून पाटविलाच आहे त्या नंतरी आज आपणाकडून दोन गावच्या आर्ज्या आल्या त्या उभयता वकीलापासी देऊन बहादर याजकडे पाटवून दिल्ये नंतरी बहादर यासी अर्ज्या वाचून दाखविल्या नंतर बहादर बोलिले जे येविसी निपाणकर यास पत्र परवाचे दिवसी पाटविलेच आहे ऐसे बोलिलेवर ह्यानी उत्तर केले जे काली आपण पत्र निपाणकर यांसी पाटविलेच आहे त्याचे बाणदार ते उटवून नेहतील येसे आपण काली बोलिला त्यास त्याचे बाणदार उठून जातील न जातील हे आम्हास कसे कलेल त्यास आपण सांगितले तरी आम्ही गावगन्ना लोक पाटऊन देऊन गावात ठाणी घालतो येसे उभयता वकील बोलिलेवर बहादर याणी उत्तर केले जे त्याचे बाणदार उठून गेले येसी बातमी आणून नंतरी तुम्ही आपली ठाणी घालावी नाहीतरी रिकामा खटला होईल तो होऊ नये याप्रमाणे बोलिलेवर वकीलानी उत्तर केले जे आपण सांगितले प्रमाणच करू येसे बोलिले नंतरी बहादर बोलिले जे काल आम्ही तुम्हास सांगितले होते की राजश्री सदाशिव माणकेश्वर याजकडे आजम छोटा कुलुस या कामाकरिता पाटवून देतो येसे बोलिलो होतो त्याप्रमाणे सदाशिव माणकेश्वर याजकडे आम्ही निरोप पाटविला तेव्हा सदाशिव माणकेश्वर याणी उत्तर केले कीं आम्हास आसोच आहे चार रोज फावत नाही येसे सांगून आम्हास पाटविले त्याजवर आता आम्ही आपलेकडील दुसरा कोणी ग्रहस्त सदाशिद मानकेश्वर याजकडे सांगून पाटविला आहे कीं तुम्हाकडे आम्ही तालुक्याच्या यादी दिल्या आहेत त्या आमच्या आम्हास माघाऱ्या ध्याव्यात याप्रमाणे सदाशिव माणकेश्वर यासी सांगून पाटविले आहे त्याचा जाब काय येईल तो पाहूण उदैक तुम्हास सांगू याप्रमाणे ब्रहादर वकीलास बोलिले माहाराजाचे शरीरप्रकृतीस हल्ली किंचित आराम जाहले आहे म्हणून उभयता वकीले बोलिले त्यास बहादरानी उतर केले जे राजश्री कृष्णराव गोपाल याणी

आम्हास लिहून पाठविले होते श्री माहाराजाचे प्रकृतीस फारच आराम नाही म्हणून लिहिले होते त्यावरून आम्ही दिलगीर होतो आता तुम्ही आराम जहाले आहे म्हणून सांगितले त्याजवरुण आम्हास बहुत खुसी जाहाली येसे बहादर बोलिले येणेप्रमाणे आजचा मजकूर जाहाला तो आपपणास कलावयाकरिता लिहिला आहे बहादर याणी सदरी सांगितल्या प्रमाणे गावगन्नाचा शोध आणून × चे बाणदार निघोन गेले येसे जहालेवरी मग आपण लोक पाटवून देऊन ठाणी घालावी बातमी मात्र पक्की आणून करावे नाहीतरी बाणदार आसलेस खटला होईल तो होऊ नये खटला जाहाला असता येथे व्यत्यय पडेल यास्तव सूचनार्थ लिहिले आसे आलीकडील सोडचिठ्याही लवकरच येतील येसे दिसते आपणास कलावे आपले शरीर प्रकृतीचे व श्रियासह चिरंजीव विजईभव राजश्री आबासाहेब छत्रपति याचे प्रकृतीचे व चिरंजीव सकल सौभाग्यादि संपन्न वज्रचुडेमंडित सौभाग्यवती कमलजाबाई वहिणी याचे प्रकृतीचे वर्तमान लिहिले ते कलले त्यास वरचेवरी पत्र सुखरूपतेच वृत लिहित जावे आपणास येषद्यास पदइवान याची कुपी अर्धी भरून परवाचे दिवशी चिरंजीव राजश्री दिनकरराव गाईकवाड याचे गड्याबराबर आपणाकडे पाठविली आहे. येऊन पोहचली याचे उत्तर पाटवावे बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.

लेखांक ४४९ तारीख २९-११-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. ३१८

राजेश्री सरूपजी खीरसागर हुजूरे

यासी आज्ञा केली ऐसीजे सूर सन सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्रे छ १४ जिलकादचें व छ १५ जिलकादचे ऐसी दोन पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहला इंग्रज बहादर याचे व तुमच्या सोडचिठ्या-बिसीचे बोलणे जाहाले ते विनंती पत्री लिहिले ते निवेदनात आले बाहादर यानी हुजूरची काजकामे करुन देणेविसी अंदेशा न ध्यावा हुजूरचे काजकामाविसी कसे झटत आहो हे तुम्हास दखल आहे आम्ही झटत असता पेशवे जिकर खातात याजमुले दोन रोज अधिक उणे लागल तरी चिंता नाही परंतु हुजूरचे मनोदयानुरूप कामे होऊन येतील म्हणोन बहादर यानी तुम्हास हुजूर विनंती लिहणेविसी सांगितले त्यावरून तुम्ही विनंती पत्री हिले ते निवेदन जाहाले आशास बाहादर याचे लक्ष हुजूरचे जागा चांगली आहे त्या पेक्षी कामे मनोदयानुरूप उलगडोन येतील ही खातरजमा हुजूरची आहे निपाणकर यास बहादर यानी तालुकेतील वसूल न घेणेविसी दोनचार ताकिदी पाठविल्या परंतु वसूल घेणेचा बाद जाहाला नाही वसूल झाडून घेतला श्रीची स्वारी बेटात बाहादर याजकडे जाहाली

होती तेथे श्रीचे व बहादर याचे बोलण जाहल तेव्हा बाहादर श्रीचे दर्शनास त्रिन्हाडी आले होते बरोबर आजम कल्र्स व पोर्ष्ट व कपितान व मोदी व बापू साने असे आले होते त्यासी श्रीनी वस्त्रे व जवाहीर देऊन बहुमान चांगला जाला बाहादर याची मर्जी खूष होऊन अस्तमानी निरोप घेऊन मावारी बेटात गेले येविसी तुम्ही विनंती लिहिली व श्रीनी आसीरवाद पत्र लिहिवरून साद्यंत निवेदनात आले वरकड सविस्तर श्रीचे पत्री लिहिले आहे त्यावरून कलेल येलीकडील ठाणी अद्यापि मोकली जाहाली नाहीत जाणिजे रा। छ २४ माहे जिलकाद लेखनसीमा.

लेखांक ४५० तारीख १०-१२-१८१२

श्री रामचंद्र

रु. नं. १
अ. नं. १९९
पै।। छ १० जिल्हेज मार्गशीर्ष
शु।। द्वादसी सन सलास
अशर मयातैन

श्रियासह चिरंजीव राजश्री छत्रपति थासी आशीरवाद उपरी येथील कुशल ता। मार्गशीर्ष श्रु ७ रोज गुरुवासरे वर्तमान यथास्थित असे विशेष आपणास हली जिल्कादची पत्रे ज्यानी जासुदाबरोबर पाटविली ती पत्र जिल्हेनीस प्रहर दिवसास येऊन पावली लिहिला मजकूर कलला निपाणीकर याची ठाणी तालुक्यात बसली आहेत ती अद्यापि मोकली जाहली नाहीत व वसूल निकड करुन घेत आहेत त्याप्रमाणेच घेतात म्हणोन लि। त्यास बहादर याणी आपाजी लक्ष्मण याजपासून करार करून घेतला आहे हा मजकूर पेशजीच्या पत्री आपणास लिहिलाच आहे त्याप्रमाणे ठाणी मोकली जाहाल्यास उत्तम न जाहाल्यास ठाणी सोडवून देविणार ते बल्गट आहेत पलटणासिवाय तालुका सोडीत नाहीत व सादुला-खानाचे धरणे बसून दंगा जाहाला आहे येविसीचा मजकूर बहादर यासी बोलण्यात यावा म्हणोन लि। त्याजवरून वकीलाणी त्यासी बोलले त्याचे उत्तर त्यानी केले तो मजकूर तीर्थस्वरूप श्री याचे पत्री लिहिला आहे त्याजवरूण कलो येईल सादुलाखाणाचे धरणे बसले आहे त्यास निपाणीकर याजकडून जमाव आणवून धरणी उठवावी ऐसा विचार होऊन रिकामी अफवा जाहाली आहे त्यास निपाणीकर याचे लक्ष हुजूरचे ठाई कैसे आहे ते आपणास विदितच आहे त्यास येविसी बहादर यासी परभारे समजून विक्षेप येईल यास्तव येविसीचा बंदोबस्त होऊन बहादर याची खातरजमा करावी म्हणोन लि। त्यास त्याप्रमाणे खातरजमा करितो परंतु निपाणीकर याची फौज अथवा लोक अगर कागदपत्री सिलसिला जाला असता गोष्ट विपर्यास जाईल आपले येथे चौघे चऊ प्रकारचे आहेत भलतेच समजावून वेव्हार करवितील यास्तव सावधपणे बंदोबस्त

असावा ऐसीच राजकारणे पूर्वी उभी जाहाली होती तेव्हा ऐसेच करूण मसलत जाहली तेसेच हल्लीही करावे ऐसे विचारात आहेत हे येथे समजलेवरून लिो आहे त्यास ऐसे जाहाल्यास परिछिन्न काम नासून राज्यास अपाय होईल यास्तव लिो आहे सांप्रत येथील डौल चांगला पडत चालला आहे त्यात येसे घडल्यास मग विचार कलतच आहे गुराबचा मजकूर लिहिला तो कळ्ला त्यास बहादर यासी विचारून काय ते उत्तर मागाहून लिहून पाटवू बहादर याचे मर्जीसिवाय दुसरा अर्थ नाही म्हणोन लिो त्यास आपले लक्षे दुसरे रीतीचे नाही हेच त्याचे मनात पके बसून त्याजवर बोग्ते आहे व मनोधर्मही आपल्याविशी तसाच आहे ते लिहून कलवावे ऐसे नाही चिरंजीव राजश्री दिनकरराव गाइकवाड याची रवानगीचे पाशदेवी (?) करिता जेजुरीस केली आहे एक दोन दिवशी माघारे येतील आपणास कलावे निपाणीकर यानी ठाणी लवकर न सोडावी यात आपले काम बहुत आपले काम चांगले आहे बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद घू

लेखांक ४५१ तारीख १२-१२-१८१२

श्री

रु. नं. २

अ. नं. २५४

राजेश्री सरूपजी खीरसागर हुजरे यासी

आज्ञा केली ऐसीजे सु॥ सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंती पत्र मार्गसीर्ष शुद्ध प्रतिपदा भ्रगुवारचे पाठविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला इंग्रज बहादर याची व श्रीची बोलणी बहुल एकादसीस जाहाली तो मजकूर श्रीनी लिहिलेवरून निवेदन जाहाला शौकत पनाह अजम हनराबल मोट इष्टवारीट अलपिष्टीन बहादर याची मरजी श्रीचे बोलणे ऐकून बहुत संतोष आहे म्हणोन विनंती लिहिली ती निवेदन जाहाली अशास इकडील सविस्तर श्रीचे पत्री लिहिले आहे त्यावरून कलो येईल इंग्रज बहादर यानी हुजूरची काजकामे सत्वर करून दिल्यास संकटे दूर होतील हुजूर सिबंदीची वगैर धरणी बसून संकटे प्राप्त जाहाली आहेत खासगीचा खर्च देखील चालवयाचा राहिला याजकरिता कुंपणी इंग्रज बहादर याचे दोस्तीत संकटे राहू नये याचा अभिमान कुंपणी इंग्रज बहादर यासी असावा येविसी तुम्हास आज्ञापत्री आज्ञा होऊन कलवावेसे नाही श्री आज्ञा करतील त्याप्रमाणे इंग्रज बहादर यासी बोलून हुजूरचे मनोदयानुरूप कार्यभाग होऊन सत्वर निदर्शनास येई ते करणे जाणिजे रा। छ ७ माहे जिल्हेज लेखन सीमा.

लेखांक ४५२ तारीख १५-१-१८१३

श्री

रु. नं. २ नकल
अ. नं. २ ८

आज्ञापत्र राजश्री शिदोजीराज नाईक निंबालकर सरलष्कर ता॥ मोकादमान तर्फ ठाणे सु॥ सलास आशर मयातैन व आलफ तर्फ मजकूर येथील गाव श्रीमन्मोराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधी करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी सदरहू तर्फचे गावकर छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ ११ मोहरम प्रो सुद मो॥ असे.

लेखांक ४५३ तारीख १९-१-१८१३

रु. नं. २
अ. नं. २५९

शेवेसी विज्ञापना तो॥ छ १५ माहे मोहरम रोज भौमवासरे पर्यंत सकल यथास्थित असे विशेष सादुलाखान जमातदार याचे धरणे बसले होते × × मजकूर पेशजीचे पत्री सविस्तर लिहिले आहे त्यावरून निवेदनात येईल राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यानी हुजूर न समजाविता राजेश्री गोपाल याजपासी जमातदार याजला घोडी देणेचा करार × × हुजूर निवेदनात आला नाही तेव्हा जमातदार याची देणेची फेड राजश्री कृष्णराव गोपाळ याचे विद्यमाने करून दिल तेव्हा घोड्याचा उलगडून घ्यावा म्हणोन कृष्णराव गोपाल याचे बोलणे पडले ते हुजूरची आज्ञा न घेता राजाज्ञा यानी कदीच घोडी कबूल × × तंट्यामुळे हुजूरचा व कृष्णराव गोपाळ याचा विध × × जाणिला याजमुळे राजाज्ञा याजवरी गैरमर्जी होऊन त्याजला कामकाजे दूर केली आणि कृष्णराव गोपाळ यासी जी घोडी जमा × याची उमगतील ती घ्यावी या प्रमाणे करार ठरून जाबसाल जाहाला हे आपणास कळावे याजकरिता लिहिले आहे हुजूरची लक्ष बाहादर याजविसी दुसरे प्रकारची नाही चौकशी पाहता × × याजकडोन अंतर दिसोन आले तेव्हा सहजी इतराजी होऊन त्याजकडील कामे दूर जाहाली वरकड सविस्तर मजकूर उदाजी घाटगे सरज्याराव करतील त्यावरून निवेदनांत येईल शेवेशी श्रुत होय विज्ञापना पौ॥ छ १९ माहे मोहरम उर्फ पौषमास सु॥ सलास आशर मयातैन व आलफ हस्ते उदाजी घाटगे सरज्याराव.

लेखांक ४५४ तारीख २१-१-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २६० नकल

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर बा। मोकादमान मौजे हेरले सुा सलास अशेर मयातैन व आलफ मौजे मजकूर हा गाव श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर ज्ञाहले असे तरी सदरहू गाव छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ माहे मोहरम मोर्तब सुद मो। असे.

लेखांक ४५५ तारीख २१-१-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २६१

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर ता। मोकादमानी तर्फ रुकडी सुा सलास अशेर मयातेन व आलफ तर्फ मजकूर येथील गाव श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी सदरहू गाव छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल होऊन सुरळीत देत जाणे जाणिजे छ १७ माहे मोहरम मो। सुद मोर्तब.

लेखांक ४५६ तारीख २१-१-१८१३

श्री नकल

रु. नं. २

अ. नं. २६२

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता। मोकादमानी तर्फ शिरोल प्रा। रायबाग सुा सलास आशर मयातैन व आलफ ता। मजकूर येथील गाव श्रीमन्ममाहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मा। सुद मो। असे.

लेखांक ४५७ तारीख २१-१-१८१३

श्री

रु. नं २ नकल

अ. नं. २६३

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर ता। मोकादमानी मौजे

खोची सु॥ सलास आशेर मयातेन व आलफ मौजे मजकूर हा गाव श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले त्याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी छत्रपती स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल मुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मो असे.

लेखांक ४५८

तारीख २१–१–१८१३

श्री

नकल

रु. नं. २

अ. नं. २६४

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता मोकादमान तर्फ खानापूर सु॥ सलास अशेर मयातेन व आलफ तर्फ मजकूर येथील रद्द कर्जाचे गाव श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी सदरहू तर्फ मजकूर पैकी रद कर्जाचे गाव खेरीज करून बाकीचे गाव छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मो सुद मोर्तब असे.

लेखांक ४५९

तारीख २१–१–१८१३

श्री

नकल

रु. नं. २

अ. नं. २६५

आज्ञापत्र राजश्री शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता मोकादमान कर्यात कुंभोज सुा सलास आशेर मयातेन व आलफ का मजकूर येथील गाव श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी सदरहू गाव छत्रपति स्वामी याजकडे रुजू देऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मो सुद असे.

लेखांक ४६०

तारीख २१–१– १८१३

श्री

नकल

रु. नं. २

अ. नं. २६६

आज्ञापत्र राजश्री शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ता मोकादमान तर्फ वडगांव सुा सलास अशेर मयातैन व आलफ तर्फ मजकूर येथील गाव श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र

सादर जाहाले असे तरी सदरहू गाव छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरळीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मो सुद्र मोा असे.

तारीख २१-१-१८१३

लेखांक ४६१

श्री

रु. नं. २

अ. नं. २६७

आज्ञापत्र राजश्री शिदोजीराव नाईक निंबाळकर सरलष्कर ताा मोकादमान तर्फ तारले सुाा सलास आशेर मयातैन व आलफ तर्फ मजकूर येथील गाव श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरलीत देत जाणे जाणिजे छ १७ मोहरम मोर्तब सुद्र मो असे.

तारीख २१-१-१८१३

लेखांक ४६२

श्री

नकल

रु. नं. २

अ. नं. २६८

आज्ञापत्र राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर ताा मोकादमान तर्फ हवेली सुाा सलास आशेर मयातैन व आलफ तर्फ मजकूर येथील गाव श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करावे असे ठरावात आले याजवरून हे पत्र सादर जाहाले असे तरी छत्रपति स्वामी याजकडे रुजू होऊन वसूल सुरळीत देत जाणे जाणिजे छ १७ माहे मोहरम मो सुद्र मो असे.

तारीख २३-१-१८१३

लेखांक ४६३

श्री

नकल

रु. नं. २

अ. नं. २६९

राजश्री गुंडो जिवाजी व नारो वेंकाजी मु॥

निपाणी गोसावी यास

स्ने॥ सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर दंडवत विनंती उपरी मौजे आकीवाट हा गाव ठाणे सुधा श्रीमन्महाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन कराव असे ठरावत आले याजवरून हे पत्र लि॥ असे तरी सदरहू ठाणे छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करून पावती घेणे र॥ छ १९ मोहरम सुाा सलास आशेर मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ४६४ तारीख २३-१-१८१३

श्री

रु. नं. २ नकल

अ. नं. २७०

राजश्री गुंडो जिवाजी व नारो व्यंकाजी मु॥ निपाणी
गोसावी यास

स्ने॥ सिदोजीराव नाईक निंबालकर सरलष्कर दंडवत विनंती उपरी मौजे कोडोली हा गाव श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन कराव असे ठरावत आले याजवरून हे पत्र लि॥ असे तरी सदर गाव ठाणे सुद्धा छत्रपति स्वामी याजकडे स्वाधीन करून पावती घेणे र॥ छ १९ मोहरम सुा सलास अशेर मयातैन व आलफ बहुत काय लिहिणे हे विनंती.

लेखांक ४६५ तारीख १०-२-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २७१

राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे यासी

आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंतीपत्र माघ शुद्ध ५ भ्रगुवासरचे पाठविले ते छ ८ मिनहूस हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाले इंग्रेज बहादूर याचे व तुमचे बोलणे येकोती बहुत प्रकारची जाहाली त्यात दस्तऐवज काय जो असेल तो यासमयी सत्वर रवाना होऊन यावा राजश्री प्रधान पंत कोकणातून दशमीस पुणीयास येणार नंतर लागलेच कोपरगावास जाणार याजकरिता दस्ताऐवज काये जो असेल तो निकडीने रवाना होणेची आज्ञा व्हावी म्हणोन सविस्तर मजकुराची विंनंति पत्री लिहिलेवरून साद्यंत निवेदनात आले आशास तालुके हुकेरी व यंकणमुरडी व बागेवाडी येथील जमाबंदीच्या यादी ठरावाच्या करार करून देऊन मामलत ज्याकडे रसद घेऊन सांगितली होती त्याजकडून बेहडची यादी त्यावेलच्या अणवून सादर जाहल्या आहेत वरकड गाव परभारे श्रीकडे वगैरे ज्याकडे होते त्याजकडील ताळेबंद काय हुजूर आले ते हली रवाना जाहाले आहेत आणखी वरचवरच ताळेबंद जमा होतील तसे रवाना होऊन येतील बहादर याजवरी सर्व भिस्त हुजूरची आहे त्यापेक्षी आज्ञा होऊन कलवावे येसे नाही बेहेडेच्या यादीच्या तालका सादर जाहल्या आहेत सरकारचा वाडा दग्ध जाहाला त्यांत प्रांतातील वहिवाटीचे रुमाल दप्तरचे झाडेनिसी होते ते विलेस लागले याजकरिता परभारे ज्याजकडे गावखेडी सरंजामास होती त्याजकडील तालबंद आणऊन वरचेवर रवाना होत आहेत बाहादर याणी अभिमान हुजूरचा धरिला आहे त्यापेक्षी राज्याजे कल्याण होणेस अगाद नाही हुजूरचे सर्व संकट

बाहादरासिवाय दूर करणार दुसरा कोणी नाही हे आज्ञा होऊन कळवावे ऐसा अर्त नाही. वरकड सविस्तर श्रीचे पत्रावरून कळेल. जाणिजे रा। छ ८ माहे सफर लेखन सीमा.

लेखांक ४६६ तारीख १६–२–१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. २

अ. नं. २७२

चिरंजीव राजश्री स्वरूपजी खीरसागर

हुजरे वकील यासी आसीरवाद उपरी तुम्हास चिरंजीव राजश्री भाऊ याणी अबदागिरी दिली परंतु तुम्ही घेत नाही म्हणून कलले त्यास सरकारच्या कामाचा लक्ष जाणून चिरंजीवानी दिल्ही आहे त्याप्रमाणे घ्यावी अनमान न करणे तुमचे खासगत कार्याविसीचा मजकूर चिरंजीव राजेश्री सदाशिव अनंत यास सांगितले आहे कांहीं चिंता न करणे बहुत काय लिहिणे हे आसीरवाद रवाना माघ वद्य १ भौमवासर प्रथम प्रहर हे आसीर्वाद पौ छ १९ माहे सफर सुा सलास आशर मयातैन व आलफ शके १७३४ ऊर्फ माघमास.

लेखांक ४६७ माहे मार्च इ. स. १८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २७५

राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे यासी

आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ स्वामीचे शेवेसी तुम्ही विनंति पत्र संकु कदम याजबरोबर पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ निवेदन जाहाला संकु कदम याने विनंती केलेवरून सविस्तर निवेदन जाहाले इंग्रज बहादर हुजूरचे काजकामविसी साभिमान धरून झटून करीत आहेत परंतु राजश्री प्रधान पंत याच्या चितात अद्यापि चांगले भरले नाही सबब दिवसगत आहे हे सर्वभाव श्री नी पत्री लिहिले आहे म्हणोन विनंति लिहिली ती निवेदन जाहाली अशास बहादर याची दोस्ती हुजूर जाहाली आहे त्यापेक्षा प्रधानपंत याजकडील आंदेशा घेणेच कारण ते काय ? सर्व भिस्त बहादर याजवर आहे त्यापेक्षा राज्याचे कल्याण करणे ते बहादरच करतील श्रीची स्वारी जाऊन चार महिने जाहाले अद्यापि काजकामाचे उलगडे जाहाले नाहीत याजविसी बहादर यासी बोलोन सत्वर काजकामाचे उलगडे होऊन श्री ची स्वारी माघारी होय ते करणे वरकड मजकूर श्री याचे पत्री लिहिला आहे त्यावरून कळेल हुजूरची काजकामे मनोदयानरूप उलगडून आलेनंतर तुम्हास गाव देणेविसी आज्ञा जाहाली आहे त्याप्रमाणे काजकामे उलगडून श्रीची स्वारी आल्यानंतर श्रीचे विद्यमाने गावचा जाबसाल

उलगडून देणेची आज्ञा होईल येविसी चितात दिकत न धरिता श्री आज्ञा करतील त्याप्रमाणे कामकाजाविसी मेहनत करीत जाणे जाणिजे र।। छ माहे सफर लेखन सीमा.

लेखांक ४६८ तारीख ७-३-१८१३

श्री रामचंद्र

रु. नं. १

अ. नं. २०१

याद कामे स्मरणार्थ सु।। सलाश आशर मयाते-
न व आलफ छ ३ माहे रावल उर्फ फाल्गुणमास

१ सरंजामी यानी हुजूर येऊन चाकरी करावी पुरवलेस चाकरी करतील नाहीतर सरंजाम सरकारात घ्यावा याप्रमाणे पूर्वी ठरले आहे त्यास त्या प्रमाण बहादराची ताकिदी होऊन श्रीच्या इतल्याने सरकारात रुजू व्हावे ऐसा बेत घडवावा.— कलम १

१ आळते कसबा पूर्वीपासून सरकारात चालतोच आहे व हलीही कसबा इकडे चालतो आणि त्याखालील खेडी जबरीने घेऊन वहिवाटतात ती ठाणी आम्ही बसवितो त्याचा बंदोबस्त तुम्ही तेथे व्यत्ययास न पडे ऐसा राखाव. — कलम १

१ नूल तालोका किल्ले सामानगड येथील खर्चाची त्यास सांप्रत किलेंच्या खर्चाची हलाखी यास्तव किल्याचा बहुत तारंबला तर नूल तालोक्याच्या मोकलचिठ्या जलद पाटवाव्या तर किल्ला संरक्षण होतो यास्तव हे आधी घडवाव आळते व हाताकला दोनी चिकोडी वहिवाटखाली वहिवाट नाहीत हे बोलणे पेशजी झालेंच आहे तरी हा उद्योग आधी व्हाव. — कलम १

१ मौजे इंगली ठाणे कर्यातीत आहेच तेथे ठाणे बसावयाचा उद्योग करतो येविशयीचा बंदोबस्त राखावा. — कलम १

१ नरोबा आण्णा याचा पुत्र व दत्ताजीराव खानवेलकर व सुलतानजीराव कदम या त्रिवर्गाची मुक्तता व्हावी. — कलम १

१ हुपरीच्या ठाण्याची मोकळचिटी आली नाही ती जलद्या द्यावी. — कलम

१ आजरे तालोख्याखालील खेडी येथे सामानगड नि।। अमल आहे तो सुरळीतपणे हिशा प्रमाणे इकडे चालण्याविषयीचा उद्योग जैसी भुदरगडा खाली नऊ खेडी आहेत त्याचा केला त्याअन्वये करावा. — कलम

१ हिंमतबहादरीचा सरंजाम चाकरीबद्दल करून घेतला आणि चाकरी केली नाही सबब रुपये चार वर्षाचे लक्ष सुमारी आहेत त्यास कर्जाची खेडी साहा लाऊन दिली त्यास वर्षे जाहाले तर गतवर्षाचा ऐवज काय पावला असेल तो वजा जाऊन बाकीचा ऐवज कर्जाऊ असेल तो हिमतबहादरीचा ऐवज ठरल त्यापैकी वजा देऊन बाकीचा ऐवज व साहा खडी व पंचवीस हजार अयवा काय व नकिंतीचा हिंमतबहादरीचा असेल तो सरकारात द्याव असे ठरले आहे त्याप्रमाण घडोन याव आदीं याव. — कलम १

१ मिरज प्रांतातील चार कर्याती हुजूर चालतात त्यापैकी रुकडी कर्यातीचा मात्र मोकळचिटी आली आहे बाकी तीन कर्यातीची मोकल चिट्या नाहीत त्यास चिरंजीव सौ माई याजकडून कर्यातीच नांवानी वर याद पा। आहे त्याप्रमाणे मोकलचिट्या ध्याव्या येथे याद तुम्ही पा। त्यात चार कर्याती मात्र लि। होत्या परंतु मोकलचिट्या नव्हत्या याजमुले लि। आहे त्याप्रमाण बेत घडाव. —————— कलम

—
९

येकूण कलमे नऊ आहेत यास कांही हुकेरीच्या जिकरोचा आडती नाही पूर्वीपासून बोलणे होऊन ठरावात आली आहेत त्यासही आधी घडऊन यावी आणि सरंजामीयाची आजम हानराब्रल मोटइष्टवरीट इलफिसतन साहेब बहादर याच्या चकत्या श्रीच्या इतल्याने श्रियासह चिरंजीव विजयभव राजेश्री छत्रपति यास भेटून चाकरी हुजूर करीत जाणे ऐशा कराव्या आस सदरी लिा प्रो कामेही जलद घडून यावी कलावे. हे आसीरवाद.

लेखांक ४६९ तारीख १९-३-१८१३

श्री

रु. नं. ५
अ. नं. ४३४

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३९ अंगिरानाम संवत्सरे फाल्गुन बहुल त्रितिया भ्रगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजेश्री भगवंतराव पंडित प्रतिनिधी यास आज्ञा केली ऐसाजे वेदमूर्ति समस्त साने उपाध्ये को देवरूख याजविसी वेदमूर्ति राजश्री गणेशभट बिन दामोदर भट साने यानी स्वामीसंनिध विनंती केली की कसबे मजकुरी देवस्थानें श्री वाडेश्वर व श्री रघुवीर व गणेश व मारुती व केशव ही देवस्थाने जाग्रत तेथील पूजा व पुराण वगैरे अधिकार पूर्वीपासून साने उपाध्ये याजकडे चालत आहे तेथील पुराण व रामनवमी व सिवरात्र येथील उत्साहाची मोईन पेशजी कसबे मजकुरी नेमणूक करून देऊन इनामपत्रे करून दिली त्याप्रमाणे चालत आहे माहाराज कृपालु होऊन पेशजीच्या सनदे प्रमाणे देवाची जमीन करार करून देऊन भोगवटियास सनदा सादर व्हाव्या म्हणून विनंति केली त्यावरून मनास आणिता देवस्थाने परम जाग्रत येथील पूजाउर्च्या नैवद्य नंदादीप व सिवरात्र वगैर मोहोत्साह याची बेगमी को मजकुरी पेशजी लाहारीची जमीन करार करून दिली लाहारी दाभोली बी तपसील

श्रीवाडेश्वर कदीम भात सेत जमीन ब्रिघे ८१० येकूण लाहारी दाभोली श्रीगणेश व श्री रघुवीर व केशव व श्री मारुती यास कदीम ठिकाणे येकूण लाहारी दाभोली

किता

६० नजीक दवाल येमक व ताल जमीन बिघे ८२

८० मट जमीन वर्कस पूर्वेस परज्याची वाट उत्तरेस आवलीची सारण प. खाणीचे भाटले दक्षणेस दिवाण भाटले येकूण जमीन ०।१०

१४०

किता

३० रामनवमीचे शेत बिघे ८२ एकूण लाहारी

२६ वायगणे पुराणाचे बिघे ८१॥।
येकूण लाहारी

४ श्री हणमंताचे ठिकाण ०।०
पांच पांड येकूण लाहारी

६०

१४० तेरीज

२००

येकूण साडेतीनसेहे लाहारीची वृती श्रीचे उर्जंबद्दल करार करून दिली असे तरी यास सदर्हू जमीन पुरविले भोगवटे प्रमाणे कुलबाब कुलकानु हल्ली पटी व पेस्तर पटी जलतरुपाषाणनिधीनिक्षेपसहीत खेरीज हकदार व इनामदार करून दिली असे तरी यासी व याचे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जावे सालदरसाल नवीन पत्राचा उजूर न करिता या पत्राची तालीक लिहून घेऊन असल पत्र भोगवटियास भडजी मारनिले याजकडे द्यावे सदरहू इनामाची इनाम तिजाई माफ केली असे बहुत लिहिणे तरी सुज्ञ आसा मोर्तब असे.

बार बार बार

लेखांक ४७० तारीख २७-३-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३२०

यादी हानराबल मोठ इस्तवरीट इलफिस्तन बहादर याचे बैटकेत हुजूर निसब्रत राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे वकील व आत्माराम जाधव व मोरो बाजीराव चिटणिवीस व रामचंद्र रघुनाथ नेरलीकर व बापूजी————श्री कडील व बाबा फडणीस नि॥ दिवाण पागा व राजश्री पंत प्रधान नि॥ आनंदराव मल्हार व बाबा चोलकर याचे विद्यमाने हुजूरचे जाबसाल होऊन उलगडणेत यावे येसे बैटकेत ठरले सुा सलास आशर मयातैन व आलफ छ २३ माहे रबिलावल रोज मंदवार ऊर्फ फालगुन वद्य दशमी कलमे बीा येसीजे

२८ परगणे रायबाग

२० किता

१ का। रायबाग	१ मौजे निलजी
१ मौजे यल्गूड	१ मजरे हुबरवाडी
१ मौजे नांदणी	१ मौजे यकसंबे
१ मौजे भोज	१ मौजे नसलापूर
१ मौजे मोरब	१ मौजे बोमनाल
१ मजरे कचकरवाडी	१ मौजे भिरडी
१ मौजे दानवाड	१ मौजे शिरगाव
१ मौजे शिरगूर	२ सितोले नि॥
१ मौजे येडराव	१ मौजे आंकली
१ मौजे निडगुंदी	१ मौजे सिदापूरवाडी
	१ मौजे डिगेवाडी

२०

४ किता

१ मौजे चिंचली कर्यात हवेली देसाई जाधवराव
१ मौजे घोसरवाड कर्यात येकसंबे देसाई शिंदे
१ मौजे कवटे गुलंद जाधवराव देसाई याजकडील
१ मौजे जलालपूर का॥ रायबाग देशपांडे याजकडे

४

३ किता धर्मादाय

१ मौजे संवदती का॥ हवेली कर्णगिरी गोसावी याजकडे
१ मौजे नागराल का॥ हवेली चिकोडीकर ब्राह्मणाकडे
१ मौजे तेरवाड का॥ शिरोल श्री येकनाथ बावा याजकडे

३

१ मौजे हेरवाड का॥ शिरोल हरीपंत याजकडे

२८

९ मामला मिरज प्रां॥ पनाला

१ मौजे लाट	१ मौजे टाकली वाडीसुद्धा
१ मौजे रेनदाल	१ मौजे बस्तवाड

१ मौजे इंगली
१ मौजे हुपरी
१ मौजे सुलकूड
—
५

१ मौजे शिरदवाड
१ मौजे दटवाड
—
४

—
९

१ कागल प्रांत
५ आजरे तर्फ
३ हुजूर
१ मौजे शिपूर
१ मौजे जरली खुर्द
१ मौजे इचनाल
—
३

२ किता
१ मौजे महागांव प्रतिनिधीकडील
१ मौजे किणे नेरलीकर याजकडील
—
५

७ काटकोल तालुका सेनाखासकील याजकडील
१ को मजकूर
१ मौजे तोरणकटे
१ मौजे भडकल्लूर
१ मोजे मरकटनाल
—
४

१ मौजे भडारहली
१ मौजे बचबाल
१ मौजे चारबागी
—
३

देह
७

२१ हिंमतबहादरीचा सरंजाम

४ ठाणे हलकर्णी नि॥

१ ठाणे मजकूर
१ मौजे चदंणकाडे का नूल
—
२

१ मौजे बरसगे बु॥
१ मौजे बसर्गे खुर्द
—
२

—
४

१ मौजे कुब्रलहल का नूल
१ मौजे आरळगंडी का नूल
७ ठाणे करमली ता आजरे

१ ठाणे मजकूर
१ मौजे लिंगनूर का नूल
१ मौजे लकीकटे
१ ठाणें नि॥ हरली
—
७

१ मौजे आल्याहक
१ मौजे वाटंगी
१ मौजे हारली बु॥

७ देसक याजकडील सालाबाद प्रमाणे पटीचा येवज

१ मौजे मडगांव
१ मौजे तेरणी
१ मौजे भुतनाल
१ मौजे हिडदुगी
—
७

१ मौजे निलजी
१ मौजे बुगडीकटे
१ मौजे इदरगुची

१ किले गंधर्वगड नि॥ बांबा
—
२१

६ निपाणकर यास लग्नाचे येवजात गाव लाऊन देवविले

३ नूल प्रांत

१ मौजे डुडगे
१ मौजे गिजवणे
—
३

१ मौजे खनदाल

३ तर्फ खानापूर

१ मौजे वाघापूर
१ मौजे गंगापूर
—
३

१ खानापूर मजरेवाडी खेरीज करून

—
६

येकूण कलमे सात येणे प्रमाणे जाबसाल आज ठरवून यादीची यादीची तालीक बाबा चौलकर याणी म्हराठी व बहादर याणी इंग्रजी लिहून घेतली असे आठा रोजान याचा जाबसाल सांगतो म्हणून चौलकर याणी बहादर यासी करार केला त्यास इतके दिवस लाऊ नये येसे बहादर बोलिले त्यास चौलकर याणी उत्तर केले कीं थोडेबहुत जाबसाल दोन तीन रोजात उलगडून देतो बाकीचे सारे जाबसाल आठा रोजी होतील येसा करार केला असे ——————————

लेखांक ४७१ माहे मार्च इ. स. १८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. ३१९

यादी सरंजामी राजमंडल म॥ लस्कर सु॥ सलास आशर मयातेन व आलफ माहे सफर

१ नारायणराव घोरपडे सेनापति
१ निंळकंटराव सिंदे साहेबसुबा
१ इचलकरंजीकर घोरपडे
१ नेरलीकर
१ म्हाराव घोरपडे मुधोलकर
१ कितूरकर देसाई
१ वंटमुरीकर देसाई
१ नणंदीकर देसाई
१ घोसरवाडकर
१ चिंचणीकर देसाई
१ निपाणकर देसाई
१ नेसरीकर शिंदे
१ जांबोटीकर देसाई
१ यकसंबेकर देसाई
१ तळुरेकर देसाई
१ दौलतराव घोरपडे हिंदुराव गलगलेकर
१ बेडकीहालकर
१ विश्वासराव घाटगे सरज्याराव
१ चिखलदिनीकर देसाई
१ सेखमिरा देसाई पाच्छापूरकर
१ नवलगुंदकर देसाई
१ कृष्णराव देशपांडे सावनूरकर
१ आथणीकर देसाई
१ जमखिंडीकर देसाई
१ यादवडकर
१ राजगुळीकर
१ आटकूरकर देसाई
१ कागलकर देसाई घाटगे सर्ज्याराव
१ दोनवडकर सांवत
१ दत्तवाडेकर घोरपडे
१ यल्गुडकर बागल
१ मानसिंगराव घोरपडे हसूरकर
१ रामदुर्गकर
१ सोंडूरकर घोरपडे
१ केंचनगोडा नाडगोडा कुपगोलकर
१ हुबळीकर देसाई
१ मुरगुडेकर देसाई
——
१८

१ महादजी सितोले नेज
१ बस्तवाडकर मागले इसबबागे
१ कुडचीकर
१ हेरवाडकर
१ डंबळकर
१ कोपीकर

२५

येणे प्रमाण हुजूर चाकरीस होते त्याच्या हाजेरीच्या यादी होत्या व तैनातजाबिते होते ते त्या यादी वाडा दग्ध जाहाला त्यात ते सारे विलेस लागले याजकरिता त्यावेळेचे माहितीने नांवनिसीची यादी पाठविली आहे. कारण पडलेस दाखवावी.

लेखांक ४७२ तारीख १–४–१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. २७७

यादी हनरावेल मोट इष्टवारीट आलफिस्तन बहादर यासी सरूपजी खीरसागर हुजरे वकील याचे बोलणे जाहालेला मजकूर सु॥सलास आशर मयातैन व आलफ छ २८ माहे र॥वल उर्फ फालगुन वध आमवाशा

१ श्री भाऊ महाराज याची स्वारी उद्या परवा येणार म्हणोन बोलिले उत्तम आहे म्हणून बोलिले नंतरी वकील बोलिले जे कामकाजास बहुत दिवस जाहाले आद्यापि उलगाडत नाहीत काय थोडबहुत मुलख सुटला तो आजवर आम्ही खर्च खाला या कर्जाचे ऐवजी गेला हुजूर कांहीं नफा जाहाला नाही हुजूरने तरी आपल्या तहअन्वये कामे उलगडली यैसे आहे आणि हुजूर राजश्री सदाशिव पंत व आत्माराम बावा ज्यावेलेस गेले त्या समई यास हुजूरून विचारिले जे आम्ही आपलेकडून इंग्रज बहाद्दराचे तह अनवये आम्ही काम उलगडून दिल्ही आता बाहादराच्या मर्जीस येईल तैसे करोत आम्हास मात्र निकड करून सहा कलमाचा तह मोडून दाह कलमाचा तह केला यास महिने पांच जाहाले यैसी बोलणी पडतात तेव्हा आमचा विचार काय ? नंतरी बहादर यानी उत्तर केले जे तुम्ही सात कलमाचे तहास राजी नव्हता सबब दाह कलमाचा केला तेव्हा वकील यानी उत्तर केले जे आज पांच महिने कामे करून देतो देतो म्हणून पेशवे याही नादमात्र लाऊन लबाडी सांगत आसता तह कां मोडला नंतरी बहादूर यानी उत्तर केले जे तुम्ही तालेबंद दाहा रोजात आणतो म्हणून करार केला त्यास तालेबंद दीड महिन्याने आले तरी वकील याणी उत्तर केले जे आमचा वाडा जलल्यामुळे कमजास्ती दिवस लागले नंतरी बहादर यानी उत्तर केले कीं पेशवेही बोलण्यात जे आमचेही कागद होलकर याच्या गर्दी गेले कांहीं होते ते वाडयात दग्ध जाहाले हली तुमचे ठाणी तुमचे

स्वाधीन जाहाली आणि सदाशिव पंत भाऊ याचेही पत्र आले आहे जे आले आहे जे निपाणकर प्रतिपदेस येतो आल्यानंतरी सर्व कामे हुजूरची करून येतो यैसे लिहिले आहे येसे बोलिले नंतरी सादुलखान याचे बोलणे घोडेविसीचे होऊन उठले.

लेखांक ४७३ तारीख १०-४-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २७९

यादी हनराबल मोठईष्टवारीठ इलफिसतन बहादर याचे बोलणे सरूपजी खिरसागर हुजरे वकील यासी बेटात जाहलेला मजकूर सु॥ सलास आशर मयातैन व आलफ माहे रा॥खर उर्फ चैत्रमास

१ छ १ रोज गुरुवारी कुल्रूस साहेब यासी वकील याचे बोलणे जाहाले की आलफिस्टन साहेब हे हिंदुराव घाटगे सर्जाराव याची ज्याफत घेणार म्हणून आफवा ऐकितो हे खरे जाहाल्यास माहाराजास पसंथ पडणार नाही साहेब तो येसा अर्थ करावयाचा नाहीत परंतु घाटगे याजकडील मध्येस्त भलतच समजोन देऊन अर्थ घडवतील म्हणून अर्ज केला त्यास साहेबासही आपण राग न पाव येसा समजून सांगावे आणि श्री ची व दिनकरराव याचीही मजला आज्ञा येसी आहे जे बहादरास राग न याव आणि ज्याफत होणेची न घडावी असा अर्थ सांगून येणे तेव्हा कुल्रूस याणी उत्तर केले जे साहेब तो त्याची ज्याफत घ्यावी येसे मजला दिसत नाही कदाचित ज्याफत घेतल्यास हुजूरचे कार्यास खिलाफ न येई तोच आर्थ करतील नंतर वकील बोलिले जे बहुत चांगले आहे परंतु त्याची मर्जी येसी आहे जे ईश्वरराव भोसले हुजूरचे चिरंजीव दाखल हुजरून कांही हारफ त्याजवरी आला सबब हुजूरची गैरमर्जी जाहाली म्हणून निघोन येथे आला त्यास सर्जाराव याणी आपल्या जवळ ठेऊन घेतला म्हणून श्रीनी व दिनकरराव आपा याणी बहुतप्रकारे सांगितले परंतु याणी मतलब दाऊन ठेऊन घेतला आहे याच प्रमाणे बहुतेक हुजूरचे बखेडे करितात तेव्हा कुल्रूस बोलिले जे आणखी येकवेला तुम्हाकडून सांगून पाहावे आल्यास उत्तम आहे नाहीतरी साहेबास सांगून ताकीद करावयाची येईल.

कलम

१ छ ८ राकरी रोज भृगुवारी वकील बेटात गेले होते सायंकालपर्यंत बहादर याची गांठ पडली नाही परंतु बातमी पक्की आहे जे श्रीमंत पेशवे यासी पत्र आजच बहादर याणी लेहून डाकत घातले याचा तपशील सारांष लाट साहेब याची मर्जी यैसी आहे जे महाराज छत्रपति याचा तहाच्या शर्ता आमलात येण्यास बहुत दिवस गुदरले याजकरिता लाट साहेब फौजे धाडून माहाराजाचा उजूर न धरिता महाराज छत्रपति याची कामे आमलात आणीत आहेत हाच अर्थ लिहिला आहे येसे वकील याचे बोलणे पत्र पाहून आलो म्हणून सांगितले. त्यावरून लिहिले आहे. कलम.

लेखांक ४७४

तारीख ११-४-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २८०

यादी हनराबल मोट ईस्टवारीट इलफिस्तन बहादर यासी बोलणे सरूपजी खीर-सागर हुजरे वकील याचे जाहलेला मजकूर बोलणेचा बीा सुा सलास आशर मयातैन व आलफ छ ९ माहे रबिलाखर उर्फ चैत्र शुद्ध ११ येकादशी

१ आज वकील बेटा जाऊन बहादर याची भेटी होऊन बोलणे जाहाले जे हरीश्वर साहुकार यास आपण सांगावे आलत त्याची खातरजमा करून द्यावयाची ती दिली आहे नंतरी बहादर बोलिले जे तुम्ही साहुकारास मुलूख लाऊन देणार तो अगोदर येकाद्या साऊ कारास दिल्हा आसिला यैसे आसेल तरी त्याचा वार याणी संभालाव याजकरिता आम्हास आंदेशा येतो नंतरी वकील बोलिले जे येसा अर्थ आपल्यास श्री व दिन:रराव करणार नाहीत आणि हुजूरूनही बंदोबस्त करून घेतला तेव्हा आपल्यासी बोलणे घातले आंदेशा न घेता साहुकारास खातर जमेने सांगितले पाहिजे आधिच साहुकार तेव्हा हा अंदेशा तुम्ही त्यास सांगितला आसता काम होणार नाही यास आपण खातरजमेने सांगावे तेव्हा बहादर बोलिले जे हरेश्वर यास आम्ही बोलून नंतरी तुम्हास सांगू ———— कलम

बातमी वर्तमान बेटात ऐकलेले जे आज राजश्री पंत प्रधान याच्या पत्राची नकल राजश्री सदाशिवपंत भाऊ यासी पत्र लेहून ही नकल घालून पाटविली त्या पत्रात माार चिकोडी व मनोली इचा फैसला होणेस साहा महिने गुदरले नंतर बाबा चोल्कर फैसल्यास आले त्यानीही कागल वगैरे जाबसाल आठ दिवसात काय ते सांगतो म्हणोन बारा दिवस गुदरले आणि पुढे आज्यार जाहाला आहे या गोष्टीस पंधरा दिवस जाहाले असो ईश्वर सत्ता आता आम्हास चिकोडी मनोलीविसी कैसे आसेल तैसे वास्तविक बंगाल्यास लिहिणे प्राप्त जाहाले आणि बंगाल्याचाही हुकूम यैसा येईल कीं महाराज छत्रपति करवीरकर याचा मुलूक कराराप्रमाो द्यावा हेच लिहिणे येऊन मुलूक त्याचा त्यास देतील मग कोणीकडेही लागू यास्तव आपल्या करारात किंवा वचणास बटा न लागे येसेच केले पाहिजे येणे प्रमाणे सारांष पत्रे बंगाल्यास व कलकतेस व मुंबईस पाटऊन दिली भाऊ याच्या पत्राच्या तालका व पेशवे याच्या पत्राची तालीक व आपली पत्रे येसी चौकडे आजी रवाना केली आहेत. कलम

लेखांक ४७५

तारीख १५-४-१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २८१

यादी हनराबल मोट इष्टवरीट इलफिसतन बहादर यासी सरूपजी खीरसागर

हुजरे वकील याचे बोलणे जाहालेला मजकूर सुा सलास आशर मयातैन व आलफ छ १३ शौवाल उर्फ चैत्रशुद्ध पोर्णिमा रोज गुरुवार

१ आज वकील बेटात जाऊन गेले ते समई पेशवेकडील वकील आणंदराव मल्हार येऊन बाहादरासी बोलत होते तो वकीलाची परवानगी लागली नंतरी वकीलास बोलाऊन विचारिले जे सुलकूड याचे वर्तमान तुम्हास कांहीं आले कीं काये वकील बोलिले जे काल आज कांहीं वर्तमान आले नाही तेव्हा बहादर बोलिले जे आम्हाकडील वर्तमान आले त्यात लिहिले आहे कीं सुलकूड गावात ठाणे हुजूरचे बसले आसता निपाणकर याणे फिरोण घेतले येसे आहे वकील बोलिले जे आमचेही आज उद्या लिहिणे येईल वर्तमान आहे ही खरच आसेल तेव्हा आनंदराव यासी बहादर बोलिले जे माहाराजाकडून टाणी निपाणकर याणी सोडून दिली ती कोणते रीतीने हे वर्तमान येकदोनवेळा तुम्हास आम्ही सांगितले आहे तो इतक्यात वकील बोलिले जे झाडून गावगनाची व आकीवाटची रयेत वलवाडे व गुरेढोरे झाडून घेऊन गेले तेव्हा आबाजी मल्हार नि॥ सदासिव पंत भाऊ याच्या कारकुनाने (फाटलें आहे) तर केले जे रयेतसुधा नेहली आहेत कीं काय तेव्हा वकील बोलिलें जे हे आठच्यो रोजाचेमागे आमचे पत्र आले होते त्यात लिहिले होते जे आकीवाटची रयेत न्हेऊन सदलगेत ठेविले आहे येलीकडे सोडून दिल्हे आसिलेस न कले इतकेत बहादर बोलिले जे तुम्ही बाहेर बसावे आम्ही यासी बोलतो यासी बोलून निरोप दिल्हेनंतरी बहादर निघोन गेले आणि कलोस साहेबायासी बोलिले वकीलाचे आणखी काय बोलणे आहे ते ऐकून घ्यावे आणि आम्ही त्याचे कामाविसी सता बोलणे केले ते सांगावे तेव्हा कलोस साहेब याणी वकीलास बोलिले जे तुमचे कामाविसी साहेबानी आज आनंदराव यासी बहुत बोलिले तेव्हा उत्तर केले जे सर्व साहेबास आमचे कामाचा अधिकारच आहे आम्हास कलवाव येसे नाही परंतु हली निपाणकर याणी दंगा आजरे प्रांतात केला आहे आजरे प्रांतही धोरपडेकडील आहे हेही आपल्यास माहीत आहे तेव्हा कुलूस बोलिलेवर साहेबाचे कानावरी घालितो येणे प्रमाणे बोलणे जाहाले येकून .... कलम.

लेखांक ४७६ तारीख १८–४–१८१३

श्री

रु. नं. २

अ. नं. २८२

पौ छ २२ र॥खर चैत्रमास सुा

सलास आशर डाकेवरून

राजश्री सरूपजी खीरसागर हुजूरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ तुम्ही काजकामाविसी बहुत मेहनत करीत आहा म्हणोन श्रीनी आसीरवाद पत्री लिहिलेवरून निवेदन जाहाले आशास मेहणतीविसी कसूर न

करिता स्वामीचे मनोदयानरूप चिकोडी व मनोली दोन्ही तालुके सुटोन हुजूर यावे आणि निपाणीवरी पलटणानी गोले मारावे ऐसे घडणे ती गोष्ट केली पाहिजे निपाणकर याणे बहुत त्रास दिल्हा आहे त्यापेक्षा निपाणीवरी गोले उडाले म्हणजे चितास समाधान होईल सदहू दोनी तालुके हुजूर आलेनंतर दोन हजार रुपये बेरजेचा गाव तुम्हास देणेचा करार पेशजीच जाहाला आहे त्याअन्वये गाव देणेविसी दिकत पडावयाची नाही तरी गावाविसी अंदेशा न घेता स्वामीचे मनोदयानरूप काम सत्वर घडोन येई ती गोष्ट करणे वरकड श्री आज्ञा करतील त्यावरून कलेल. जाणिजे र॥ छ १६ माहे रबिलाखर लखन सीमा.

लेखांक ४७७ तारीख १८–४–१८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. २७४

राजश्री सरूपजी खीरसागर

हुजरे वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा सलास आशर मयातेन व आलफ तुम्हास अब्दागिरी द्यावयाविसी श्रीचे शेवेसी विनंती लिहिली आहे त्याप्रमाणे श्री अब्दागिरी देतील ती तुम्ही घेऊन बालगीत जाणे.

जाणिजे र॥ छ १६ माहे रब्लिाखर
लेखन सीमा.

लेखांक ४७८ तारीख २४–४–१८१३

श्री

रु. नं. १
अ. नं. २०२

यादी हनराबल मोट इष्टवारीट इलफि
स्टन बहादर यासी वकील याचे बोलणे
जाहलेला मजकूर सुा सलास आशर मया-
तेन व आलफ

१ छ २२ माहे रबिलाखर रोज मंदवार सरूपजी खीरसागर हुजूरे वकील बेटात जाऊन कुल्र्स साहेब याची भेटी होऊन बोलणे जाहाली जे वाडीकडील वर्तमान कांही आले आहे कीं काय कलवे साहेब बोलिल जे कांही विशेष आले नाही परंतु साहेबानी महाराजाबिसीची काजकाम हातात चांगले धरिले आहे सेवट करणार ईस्वर आहे सतत वकीला बोलिले जे हल्लीच्या काली आपणच कसे म्हणाल तर सत्य इन्साफ करून ज्याचे

मुलूख त्यास देऊन लौकिक करिता हे जनामध्ये चांगले आहे यास्तव ईश्वराने तुम्हास पुढे केले आहे नंतरी कुलूस बोलिले जे तुम्हाकडील हुजूरचे वर्तमान कांही आले आहे कीं काय त्यास उत्तर केले जे डाकेतून लखोटे आले आहेत ते नेऊन श्रीस देऊन काल वर्तमान ते उदेक येऊन सांगतो याप्रमाणे बोलणे आले. ——————————— कलम

१ छ. २३ रबिलाखर रोज रविवार वकील बेटात जाऊन कुलूस साहेब याचे गाट पडून बोलणे जाहाले जे आज श्रीची स्वारी येणार आहे आणि वर्तमान आले आहे जे हुजूरचे प्रकृतीस आराम नाही सबब स्वारी येणार तेव्हा कुलूस बोलिले जे भावना कैसी आहे हे लिहिणे आले आहे की नाही त्यास उत्तर केले जे ज्वरांश होऊन उचकी लागली होती ती कांही मंध जाहाली आहे आणि हुजूरची स्वारी श्रीदेवी जवळ राहिली आहे नंतरी कुलूस बोलिले जे साहेबास कलवितो म्हणोन जे चिटी लिहिली उत्तर आल्या-नंतरी बोलिले जे श्री येतात मतलब काय आहे मतलब हाच की साहेबाचे पत्र येखादे हुजूर यावे प्रकृतीचे वर्तमान आराम जाहालेले सत्वर कलवावे यास्तव येत आहेत नंतर बोलवावे म्हणून सांगितली नंतरी श्रीची स्वारी जाऊन एक घटिका खलबत जाहालेंनंतरी स्वारी सायंकाली अस्तमानी आली त्याप्रमाणे मा।र ——————————— कलम

लेखांक ४७९ तारीख २५-४--१८१३

श्री

रु. नं. २ बाबासाहेब

अ. नं. २८३ छत्रपति

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १३९ श्रीमुखनाम सवत्सरे चैत्रबहुल नवमी स्थिर-वासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शंभु छत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजेश्री बाजीराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे तीर्थ-रूप माहराज साहेब छत्रपति याचे शरीरी स्वस्थ नहुते दैवी मानवी उपाय बहुत केला परंतु कांही यत्न चालला नाही वद्य अष्टमी भ्रगुवारी सायंकाळीं तीन घटका दिवसास कैलासवास केला ईश्वरे मोठी गोष्ट आनुचित केली होणारास उपाय नाही आपणास कलावे जाणिजे बहूत लिहिणे तर सुज्ञ असा मोर्तब.

१

१ सदरहू प्रमाणे राजमान्य राजेश्री सदासिव

माणकेश्वर यासी

२

आज्ञापत्रे दोन.

लेखांक ४८०

माहे एप्रिल इ. स. १८१३

श्री

रु. नं. २
अ. नं. २८५

राजश्री सरूपजी खीरसागर हुजरे

वकील यासी आज्ञा केली ऐसीजे सुा सलास अशर मयातेन व अलफ तीर्थरूप माहाराज साहेब छत्रपति यासी चैत्र वद्य त्रितिया रविवारी ज्वर येऊन दुसरे रोजी उचकीचा उपद्रव जाहाला दैवी मानवी उपाय बहुत केला परंतु कांहीच यत्न चालला नाही वद्य आष्टमी भ्रगुवारी माहाराज साहेब कैलासवासी जाहाले तुम्हास कलावे श्री आज्ञा करतील त्याप्रमाण करीत जाणे इंग्रज बहादर याचे मांडीवरी तीर्थरूप माहाराज साहेब छत्रपति याणी उसे ठेविले आहे त्याचा अभिमान बाहादरानी धरून राज्याचे कल्याण होय ती गोष्ट करावी जाणिजे र॥ छ + माहे रबिलाखर लेखन सीमा.

लेखांक ४८१

श्री

रु. नं. १
अ. नं. १९४

श्रीमन्महाराज राजेश्री छत्रपति स्वामीचे
सेवेसी—

विनंती सेवक आज्ञाधारक व्रनगोजी नाईक निंबाल्कर हवालदार व कारकून किले मनोहरगड शेवेशी प्रार्थना विनंती तागायत छ २९ माहे रजब पावेतो स्वामीचे कृपाद्रिष्टी करून किल्ले मजकूरचे व शेवकाचे वर्तमान यथास्तित असें शेवेशी विज्ञापना ऐसीजे हुजूर तली पक्षाबद्दल नक्त रुपये ३५ पस्तीस व असोली नारल व पाने विडेची व सुपारी शेवेशी पाठविली आहे हुजूर प्रविष्ट जाहाले याचे आज्ञापत्र किले मजकुरी सादर करवणार स्वामी धनी मायबाप समर्थ किले मजकुरी आलंग नौबतचे वफी पाहार घस्ती व घाटमेठाचा बंदोबस्त करून सावधगिरीन आहो स्वामीच्या निवेदनार्थ विनंती लिहिली आहे स्वास्ती. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

सी
का

लेखांक ४८२

श्री

रु. नं. १
अ. नं. १९५

राजश्री रत्नाकरपंत आपा
राजाज्ञा गोसावी यास

सकलगुणालंकरण आखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नेो॥
सिदोजीराव नाईकनिंबालकर सरलष्कर दंडवत विनंती उपरी येथील क्षम ता॥ छ ६ माहे सफर पावेतो जानोन स्वकीये लेखन करीत आसिले पाहिजे विशेष आपण राजश्री भाऊ जोशीराव याचे शेरीरी स्वास्थ नाही राजश्री सखारामबाबा घाटगे सर्ज्याराव यासी पाटवून ध्येन म्हणोन लिहिले त्यास तेही कार्यामुळे गावास गेले आहेत आपणास कळावे बऊत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ४८३

श्री

रु. नं. १
अ. नं. १९६

वेदशास्त्रसंपन्न राजमान्य राजश्री
भाऊ जोशीराव स्वामीचे सेवेसी

श्नेोपूर्वक सिदोजीराव नाईकनिंबालकर सरलष्कर दंडवत विनंती उपरी येथील क्षेम ता॥ छ ६ माहे सफर पावेतो जाणोन स्वकीये लेखन करीत असले पाहिजे विशेष आपण पत्र पाटविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ कळू आला शेरीरास स्वास्थ नाही यास्तव राजश्री सखारामबावा घाटगे सर्ज्याराव यासी पाटवून द्यावे म्हणोन लिहिले त्यास सर्ज्याराव कांहीं कामाकरिता गावास गेले आहेत आपणास कळावे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विज्ञापना.

लेखांक ४८४

श्री

रु. नं. १
अ. नं. २४०

सेवेसी बालकृष्ण माहादेव बाल कृतानेक
सास्टांग नमस्कार विनंती येथील कुशल
ता॥ जेष्ट व॥ १० परियंत यथास्तित असे

विशेष स्वामीकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळत नाही याजकरिता चित्त उदासीन आहे तर निरंतर पत्री संतोशाचे वर्तमान लिहून दर्शनाचा लाभ दिला पाहिजे मी पुणेयाहून चिरंजीव गोविंदराव नाना पटवर्दन जावई यानी कैलासवास केला याजकरिता मिरजेस आलो भेट होईल तो सुदिवस यानंतर चिरंजीव राजश्री विनायकराव लागू जावई यानी राजश्री बापूजी शंकर जोगलेकर याजकडून आजरे महाल ठाणेसुद्धा वीस हजार रुपये रसद देऊन केला ऐवजाचा फडशा व्याज मनोतीसुद्धा जाहाली याजवर

माहालची घालमेल होईल असें हामीदार जोगळेकर यानी राजेश्री नारायणराऊ घोरपडे याजकडील माहाल ठाणे करून घेऊन लागूचे हवाली केले दोन वर्षे वहिवाट लागूनी केली नेसरी कर्यात राजमंडलाकडून लागूनी करून घेतली हें राजश्री जिवराव शिंदे यास समजल्यावरून आजरे माहालात अणेक प्रकारचा उपद्रव केला तसनस बहुत केली हे एक निमित्य व कागदपत्रा हिशेब ध्यावे म्हणोन घोरपडे यानी लागूना इचलकरंजीस नेले आणि अटकाव करून ठाणे माहाल घेतला चिरंजीवाची मुंज घरी असता निरोप दिला नाही लागूची दाद कोठे न लागे याजकरिता शेवेसी विनंतीपत्र लिहून पाठविले आहे तर कृपाकरून श्रीमंत माहाराजास विनंती करून घोरपडे याचा चाळीस हजार रुपये याचा सरंजाम जप्त करवून लागूचा ऐवज व व्याज मनुतीसुद्धा उगवून देविला पाहिजे नंतर घोरपडे याजपासून वीस पंचवीस हजार रुपये नजर घेऊन मोकलीक व्हावी असे मात्र जाहाले पाहिजे माझे जावई आणि वाजबी असे चितात आणून लागूस पार पाडावे श्रीमंत माहाराज थोरले कैलासवासी जाहले ते शेवकावर कृपा कसी करीत होते हेई विदितच आहे पुढे महाराजानी चरणरजावर कृपेदृष्टी ठेविली पाहिजे कैलासवासी नाना फडणिवीस यानी बालकावर कृपा केली ते तो विष्णुलोकास गेले माहाराजानी कृपा केल्यास सेवकाचे कुटुंबास रक्षण होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४८५

हु.

रु. नं. २

अ. नं. ४७०

अजंम मेस्तर च्यारलीस ब्रुम दाम मोहबत हू

यशवंतराव सिंदे सरसुभेदार बाअदज

सलाम आंकी येथील खैरखुशी जाणोन आपली खैरियत कलमी करून शादमानी हासील होय ते करीत असिले पाहिजे दिगर बहुत रोज गुजरले असता आं यखलासमंदाकडून मोहबतनामा महसूर होत नाही हे दोस्तीमध्ये वाजीबतर आहे असे नाही तरी यैसे न करिता हमेशा खत किताबत इरसाल करून शादमानी हासील होय ते करीत जावे तुम्ही किले पनालियाचे मुकामी हुजूर महाराजाचे किदमतीमध्ये येऊन तहरह ठरऊन गेला त्या तागायत प्रांताची खराबी जाहाली आहे ते कलमी करून कलवावीसी नाही परभारे आ यखलासमंदास मालूम

जाह्हालेच असेल प्रस्तुत पेशव्याकडून फौज येऊन कुली प्रांत खराब केलियाचा मजकूर आजम जनराल यास कलमी केला आहे व अजम [illegible] शाहा कलमी करतील त्या मवाफिक जनरालास सागोन यावख्ती सरंजामी पोहचोन तुमची नामनामोशी संपूर्ण अलमात जाहीर होय ते करणे जनरालाची व महाराजाची दोस्ती कदीम चालत आली आहे त्याची मोहकमी होऊन कारसुरत दर्जीर होऊन येईल ते करणे तुम्हास वाजीब व लाजीमतर आहे. जियादा काय लिहिणे प्यार मोहबत असो देणे.

लेखना शिका

वधी

———

——

सूची भाग ३

व्यक्तींपुढील आंकडे लेखांकांचे आहेत.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग चवथा)

छत्रपति शिवाजी महाराजांची कारकीर्द इ. स. १७६१ ते इ. स. १८१३

व

कालखंड इ. स. १८१९ ते इ. स. १८४४

संपादक

मा. वि. गुजर, बी. ए.

शके १८८४ इ. स. १९६२

प्रस्तावना : ४

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाच्या साधनांचा हा चौथा भाग आहे. यांत दोन विभागांत मिळून २०२ लेख छापले आहेत. विभाग अ मध्यें छापलेले लेख पेशवेदप्तरांतून निवडलेले आहेत. या लेखांची संख्या ८५ असून त्यांपैकी ६७ लेख छत्रपति शिवाजीमहाराज (इ. स. १७६१ ते इ. स. १८१३) यांच्या कारकीर्दीतील आहेत. बाकीचे लेख इ. स. १८१९ ते इ. स. १८२९ या कालखंडांतील आहेत. त्याचप्रमाणें विभाग ब मध्यें छापलेले लेख डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँन्ड रिसर्च इन्स्टिटयूट, पुणें, मराठा हिस्ट्री डिपार्टमेंट ऐतिहासिक कागदपत्रसंग्रहांतून निवडलेले आहेत. यांत छत्रपति शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींतील १०८ लेख असून बाकीचे लेख इ. स. १८२१ ते इ. स. १८४४ या कालखंडांतील आहेत. हे सर्व लेख अनेक प्रसंगांची व घडामोडींची माहिती देणारे असे आहेत. या लेखांतील ऐतिहासिक मजकूर सारांशरूपाने पुढें दिला आहे.

विभाग (अ)

छत्रपति संभाजीमहाराज, करवीर समाप्त झाल्याचे वर्तमान बाळाजी बाजीराव ऊर्फ नानासाहेब पेशवे यांना पोंचतांच त्यांनीं हरिपंत व विसाजीपंत यांना करवीर राज्याचा ताबा घेण्यासाठीं फौजेनिशीं पाठविलें. तेव्हां महाराणी जिजाबाई यांना जो संताप आला त्याची हकीकत ले. १ मध्ये आहे. कै. संभाजीमहाराजांनीं सर्वत्रादेखत शपथपूर्वक आज्ञा केली होती कीं, 'तुम्ही समागमे न येणे, चौघीजणी राहणे. गरोदर आहेत त्यास पुत्र होतो, संदेह नाही म्हणोन ठेऊन गेले, चहू महिन्याचा आवकास आहे.' हा मजकूर शेषोत्रिमलने करवीर मुक्कामाहून रघुनाथ बाजीराव ऊर्फ राघोबादादा यांना लिहिलेल्या पत्रांत आढळतो. ले. २ करवीरकरांनीं स्वारी करून रघुनाथराव मंत्री यांजकडील तालुक्यांत खंडणी घेतली हें वृत्त ले. ५ मध्यें आहे. म्हैसूर राज्याचा हैदर-अल्ली याने कर्नाटक प्रांत काबीज केला. तेव्हां महाराणी जिजाबाईनीं राघोबादादास लिहिले की तुमच्या येण्यास विलंब लागल्यानें शत्रु सबल होऊन तमाम संस्थानें हस्तगत केली. मातबर फौजेचा गाहा करून त्वरेने यावे. शत्रूचा पराभव होऊन यश संपादावे. हा मजकूर ले. ६ मध्ये आहे.

माधवराव बल्लाळ पेशवे यांनीं नरसिंगराव उद्धव या सरदारास फौज देऊन करवीर प्रांतांत महाराणी जिजाबाई यांची ठाणी बसवून देण्यासाठीं रवाना केलें ही माहिती ले. ८ मध्ये आहे.

इंग्रजांनीं मालवण घेतलें. यामुळे त्यास गर्व बहुत झाला. पुढें इंग्रजांचें आरमार मुंबईस आले. त्यांना हबशी सामील झाले. हरयेक निमित्य ठेवून एखादी जागा काबीज करावी हे इंग्रजांचे मानस होते. त्यांनीं हैदरनाईकासहि दारुगोळे व तोफा असें तीन लक्षाचे सामान दिले; ही हकीकत ता. २३-६-१७६५ च्या पत्रांत सांपडते (ले. १५). याच विषयासंबंधीं अधिक माहिती ले. १६ व १७ मध्ये आहे.

करवीर छत्रपति महराजांच्या जंजिरे सिंधुदुर्ग येथील आरमारास उपसर्ग न देण्याबद्दल आणि त्या जंजिऱ्याच्या खर्चासाठी ठरल्याप्रमाणें त्या त्या तालुक्यांतून वसूल देण्याबद्दल ताकीदपत्रें महाराणी जिजाबाईनीं जानोजी धुळप, सुभेदार आरमार बाळाजी हरि सुभेदार प्रांत साळसी, बावडेकर पंतअमात्य व खेमसावंत भोसले सांवतवाडीकर यांना पाठविली ही माहिती ले. २० मध्यें आहे. करवीर छत्रपति महाराजांचे पेशवाईपद नारायणराव बल्लाळ पंतप्रधान यांना दिले, तेव्हा जो करारमदार ठरला तो उभयपक्षाकडून अमलांत यावा, हा उल्लेख सन १७७३--७४ च्या एका कागदांत आढळतो (ले. २२). राजश्री येसाजी राम व रामचंद्र नारायण व दादाजी त्रिंबक याजकडील गांवे हुजूर सरकारांत येण्याचा करार पूर्वी नारायणराव पेशवे यांच्या वेळेस झाला असता ती गांवे हुजूर सरकारांत आजपावेतो आली नाहींत. त्याकरितां वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री फांडेकर व आप्पाजी शामजी यांना हे कार्य करण्यास आज्ञा केली; परतु त्यांच्याशीं देखील वरील त्रिवर्ग केवळ रेटाईचा जाबसाल करतात तेव्हां ठरलेल्या कराराप्रमाणे या तीन लोकांकडील व अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांजकडील गांवें हुजूर सरकारांत द्यावींत हा मजकूर शिवाजीमहाराजांनीं सखाराम भगवंत बोकील बारभाईतील एक मुख्य कारभारी यांना लिहिलेल्या आज्ञापत्रांत आहे (ले. २३). बावडेकर पंत अमात्य व येसाजी सिंदे सरसुभेदार करवीर राज्य यांचा तंटा चालू असल्याचा उल्लेख ले. २४ मध्यें आहे. लाट व रांगोळी ही दोन गांवे आणि सरदेशमुखी वतन व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांच्याकडे पूर्वीपासून चालत आल्याप्रमाणे चालवावें असे सखाराम भगवंत बोकील ऊर्फ सखारामबापू यांनीं येशवंतराव सिंदे सरसुभेदार यांस कळविलें; तेव्हां कराराप्रमाणेच हुजूरची ठाणीं बसली आहेत, उलट व्यंकटराव घोरपडे व शेषोपंत व सेनापति व बावडेकर पंत अमात्य एकत्र मिळून हुजूरच्या तालुक्यात अमर्यादा वर्तणूक करतात, ही हकीकत येसाजी सिंदे सरसुभेदार यांनीं सखारामबापू यांना माहे मे इ. स. १७७५ मध्यें लिहिलेल्या पत्रांत आहे (ले. ३०).

छत्रपति महाराज करवीर यांच्या पायाशीं अमर्यादा वर्तणूक होऊं नये म्हणून संभाजीमहाराज व महाराणी जिजाबाई यांच्या सेवेसी नानासाहेब पेशवे व त्यांचे चुलतबंधु सदाशिवरावभाऊ यांनीं पूर्वी शपथपूर्वक करारमदार केला. पुढें आतां त्यांत चल न पडतां पंतप्रधानांनीं छत्रपति महाराज करवीर यांची कृपा संपादून यश मिळवावे. हा मजकूर यशवंतराव सिंदे सरसुभेदार यांनी बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस

यांस लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. २७). अनुबाई घोरपडे इचलकरंजीकर यांजकडील उतूर हा गांव करवीर राज्यांत घेतला तो त्यांना परत द्यावा, ही विनंती नाना फडणीस यानीं केली. त्याप्रमाणें छत्रपति महाराजांकडून तो गांव त्यांना परत देण्याची आज्ञा होत असताना इचलकरंजीकरांच्या फौजेनें हुजूरचें ठाणें शहापूर या ठिकाणास तोफा लाविल्या. तेथील लोकांस विश्वास दाखवून कौल दिला. पुढें हुजूरच्या लोकांनी त्यांच्या शब्दावर विश्वास ठेवून हत्यारे खालीं ठेविली असतां इचलकरंजी-करांच्या फौजेने हुजराच्या पन्नास पाऊणशेपर्यंत आसामीस तासणीने कच घालतात याप्रमाणें तोडले. छत्रपति महाराजांच्या सेवकाचे चाकर अनुबाई घोरपडे असे असताना त्यांची इरे (ईर्ष्या) याजप्रमाणें आहे तेव्हां महाराजांच्या सेवेच्या अगत्यापेक्षां अनुबाईचे अगत्य पुणें दरबारास विशेष वाटते ही हकीकत छत्रपति शिवाजीमहाराज यांनीं बाळाजी जनार्दन ऊर्फ नाना फडणीस यांस लिहिलेल्या आज्ञापत्रांत आहे (ले. २८). या विषयासंबंधी माहिती ले. ३१ मध्यें आहे. महादेवशास्त्री फोंडेकर यांनीं याच प्रसंगासंबंधी अधिक माहिती देऊन शेवटी असा अभिप्राय दिला कीं, ‘ श्रीमंत कैलासवासी नाना तागायेत करार व क्रिया देऊन येथील समजाविसी करोन करारात पुढें अंतर आणोन अलीकडे राज्ये साधिले तस्मात क्रियालोप हेच राज्याचें साधन यसी परिनालिक आपले दरबारची आहे ’ ही हकीकत ले. ३२ मध्यें सांपडते. छत्रपति महाराज करवीर यांनी रांगणा किल्ल्याचे घेऱ्यांत राहून सांवताबरोबर कलह केला. त्यामुळे सांवतांचा मुलूख वाडीसुद्धां तमाम फुटून त्यांची रयत पेशवे सरकारच्या साळशी प्रांतांत आली. सांवताचा भ्रम बहुत ऐकण्यांत होता; परंतु त्यांना करवीरकरांची आंच सांभाळण्याचे सामर्थ्य नाहीं; हा मजकूर जिवाजी गोपाळ यानीं जंजिरे विजयदुर्गांचे मुक्का हून नाना फडणीसास लिहिलेल्या पत्रांत आढळतो (ले. ४७). याच विषयाची माहिती ले. ५० मध्यें आहे. पुढे सांवतवाडीकर यानी गोवा बंदरचे पोर्तुगीज ऊर्फ फिरंगी यांना करवीरकरांचे विरुद्ध मदतीस बोलाविले तेव्हां करवीरकरांनी फिरंग्याशी रेडी या ठिकाणी सामना केला. त्याचे वर्णन ले. ५१ मध्यें आहे. शेवटी श्रीमंत महाराज करवीरकर यांचे व सांवतवाडीकर याचे विरुद्ध वाढून हेरे व नरसीगड व भरतगड ही सांवताची ठाणी करवीरकरानी घेतली (ले. ५२). श्रीमंत महाराज छत्रपति करवीर यांनी फौजसुद्धा श्रीमंत छत्रपति महाराज, सातारा यांच्या मदतीस जाण्याचे ठरविलें. ही माहिती ले. ५६ मध्ये आहे. करवीरवासी महाराजांच्या बंदोबस्तास पेशवे सरकारांतून गणपतराव पानसे यांस फौज व तोफखाना देऊन रवाना केले. तसेच दौलतराव शिंदे यांजकडील पलटणे व तोफा पाठविल्या. ही फौज रामचंद्र परशराम पटवर्धन यांस सामील होणार असें ठरले होते (ले. ५९). या प्रसंगी सखाराम घाटगे सर्ज्याराव यानीं राज्योपयोगी स्वामी सेवा खातरजमायुक्त करून दाखविली त्या वरून छत्रपतिमहाराज करवीर यांनीं कृपाळू होऊन त्यांस पादशाही वडिलार्जित पुरातन सनदा बरहुकूम ६९॥ गांवें इनाम करार करून दिली (ले. ६०). शेवटी श्रीमंत महाराज

राजश्री सिव छत्रपति व कुंपनी सरकार विद्यमान सरदार आलिशान हनराबल मोट इष्टवरिट आलफिष्टीन बहादूर मुक्काम पुणें यांच्यामध्ये ता. १६-९-१८१२ रोजी जो करारनामा झाला त्याची एक यादी माहिती ले. ६५ मध्ये आहे. तसेच राज्यकार-भारासंबंधी खातेवार व नांवनिसीवार विस्तृत हकीकत ले. ६७ मध्ये सांपडते.

कालखंड इ. स. १८१९ ते इ. स. १८२९

बाजी राम साठे यांना इंग्रजांनीं कोल्हापुर येथे अखबारनवीस नेमले होते. श्रीमन्महाराज छत्रपति करवीरकर यांच्यासंबंधी जी बातमी उपलब्ध होत असे ती हे अखबारनवीस इंग्रजांना पुणें मुक्कामी कळवीत होते. ले. ६९, ७१, ७२, ७३ हे लेख अशा प्रकारची बातमीपत्रें आहेत. पुढे चिंतोबाजी साठे व रामापा हे बातमीदार म्हणून कोल्हापुरांत होते. ले. ७४ ते ले. ८१ व ले. ८४ हे लेख वरील गृहस्थांनीं पाठविलेलीं बातमीपत्रें आहेत. हुजूरचे इलाख्यांतील नोकरलोक, सरंजामी व जमीदार यानी हुजूरचे आज्ञेप्रमाणे वर्तणूक करीत जावी याबद्दल ताकीद व्हावी म्हणून छत्रपति महाराज, करवीर यानीं धारवाड सुभ्याचे सरकलेक्टर याना ता. २१-१-१८२१ रोजीं एक कलमबंदी यादी पाठविली ही हकीकत ले. ७० मध्यें आहे. श्रीमन्महाराज छत्रपति याची स्वारी फौज तोफासुद्धा सितोळे यांच्या गांवाकडे जाऊन उपद्रव करणार; पुढे निपाणी व इचलकरंजी या गांवाकडे जाऊन तेथे उपद्रव करणार, हे वृत्त ले. ८२ मध्ये आहे. करवीरकरमहाराज यांनीं फौज तोफा सुद्धा येऊन अंकली व मांजरी या ठिकाणी आपली ठाणी बसविली, तेथील जिंदगी दाणागोटा, गुरेढोरे, घोडीघोडी एकंदर दरोबस्त सामान लुटून घेऊन गेले. त्याबद्दल आपाजीराव सितोळे यानी वेबर साहेब सरकलेक्टर सुभा धारवाड यांच्याकडे सन १८२५ च्या सप्टेंबर महिन्यांत एक अर्ज पाठविला. ही माहिती ले. ८३ मध्ये आढळते. सिंदे सेनाखासखेल या घराण्याची कैफियत ले. ८५ या लेखांत आहे.

विभाग (ब)

छत्रपति संभाजी महाराज कैलासवासी झाल्याचे वर्तमान नानासाहेब पेशव्यांना पोंचतांच त्यांनीं विसाजी नारायण व सदाशिव अवधूत यांस महाराणी जिजाबाईकडे रवाना केले. त्यांच्याबरोबर महादजी भोसले मुंगीकर यांचा धाकटा भाऊ यांस पाठविले. त्यांनीं करवीरांत जाऊन उमाजीस तेथे राजा करावें असा पेशव्यांचा मतलब होता. त्यासंबंधी एक करारपत्र पेशव्यांनीं वरील दोन आसामींना दिलें, ही हकीकत ले. ८६ मध्ये आहे. करवीरकरांनीं फौज उठवून नेल्यावर पटवर्धन व इचलकरंजीकर घोरपडे यांच्या फौजेनें हुजूराच्या प्रदेशांतील गुरें वळवून नेली अशी तक्रार करवीरकरांनी नाना फडणीस यांच्याकडे केली. हा उल्लेख ले. ८८ मध्ये आहे. आळते, शिरोळ या

भागांत करवीरकरांच्या फौजेबरोबर कान्हेरराव पटवर्धन यांनीं आपल्या फौजेनिशी मुकाबला केला. करवीरकराकडील जाबसालाचा ठराव आपाजी शामजी यांनीं हुजुराच्या वतीने किल्ले पुरंदरावर करून, कोनेरराव पटवर्धनासाठीं बारभाईचे पत्र व कराराच्या यादी घेऊन त्या करवीरास पाठविल्या; परंतु वेदशास्त्रसंपन्न महादेवशास्त्री फोंडेकर यांनीं करवीरकरांचे जाबसाल चढी लावून ओढ धरिली आणि आपाजी शामजीकडे पुनः पत्रें पाठविली. हें वृत्त जिवाजी गोपाळ मुक्काम इचलकरंजी यांनीं पंतप्रधानास पुरंदर मुक्कामी कळविले. यावेळीं पुरंदर किल्ला हें ठिकाण पेशव्यांची राजधानी होती. ले. ८९ करवीरकरातर्फे महादेवशास्त्री फोंडेकर यांनीं करारमदारासंबंधी जे धोरण स्वीकारिले त्याची माहिती जिवाजी गोपाळ यानी ले. ९१ ते ९४ या लेखांत विस्तृत दिली आहे. हे जिवाजी गोपाळ नंतर करवीरकरांचे लढाईत पाडाव गेले, हे वृत्त माहे ऑगस्ट सन १७७६ इसवीच्या पत्रांत आढळतें (ले. ९९).

भगवंतराव प्रतिनिधींचा साह्यकर्ता हणमंतराव माणकेश्वर गुळवणी यास नागोजीपंत चिकोडीकर बेगमपूरच्या मुक्कामावर येऊन भेटले. त्या समयी दोघांनीं करार केला कीं पांच हजार फौज घेऊन जाऊन येसाजी सिंदे सरसुभेदार यांचे पारिपत्य करावे. हा मजकूर व करवीरकरानीं प्रतिनिधींना आपल्या पक्षास वळविण्याची केलेली मसलत यासंबंधीं मजकूर ले. ९६ व ले. ९७ मध्यें आहे. पुढे पेशव्यांच्या वतीनें केसोपंत नांवाचे एक गृहस्थ येसाजी सिंदे, सरसुभेदार यांच्याकडे बारभाईचे जाबसाल उलगडून घेण्यास गेले. त्यांच्या संभाषणाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे. येसाजी सिंदे म्हणतात, ‘ हे राज्य सांबाचे आहे ! मराठी सरदारी, पाटीलबावाहि मराठे सरदार यांत पुरंधरकरांचा व आमचा सलुक करून द्यावा हे उत्तम. पूर्वी येविसी आम्ही पाटीलबावास पत्रें पाठविली परंतु उत्तरे येथास्थित न आली; याजकरितां आम्हांस हैदरखानाकडे सूत्र लावणे प्राप्त जाहाले. त्यास हाली पाटीलबावा इकडे येतात, उत्तम आहे. पाटीलबावानीं दरम्यान पडोन सलुक करावा विहित आहे.’

त्याजवरून केसोपंत बोलिले कीं, ‘ पाटीलबावांनीं याजकरितांच पाठविले. पुरंधरकरांचा तुमचा कलह याजमुळे तुमचेहि मुलुकाची खराबी, सरकारचीहि खराबी; मुलुक लुटला गेला. फौजेसहि चालीस पन्नास लाख रुपये खर्च जाहले. तुम्ही हैदरखानाचे सूत्र लाविले त्यात हैदरखानानें राजे घेतली त्याचे बंदोबस्त किती करून दिल्हे ते तुमचे होतील ? आमचे श्रीमंत राजेश्रीस मुजरा तरी करितात. हैदराकडून तेंहि घडणार नाहीं.’ वरील संवाद महादजी बल्लाळ गुरुजी यानीं पुरंदरकरास कळविला (ले. १०६).

करवीरचे सटवोजी भोसले व येसाजी सिंदे सरसुभेदार यानीं येलगूड, बारघाड, भोज या भागांत ज्या लढाया केल्या त्यांचें वर्णन गोपाळभट कविठेकर यांनीं चिकोडी मुक्कामाहून नाना फडणिसांना लिहून पाठविले; ही हकीकत ले. १०९ मध्यें आहे. शिराळे व वाळवे प्रांतांतील गांवावर करवीरकरांचे सरदार मानाजी सिंदे व सटवोजी

भोसले फौजेनिशी स्वारी करतात यासंबंधीं माहिती ले. ११२ मध्यें आहे. करवीर व पन्हाळा किल्ला यांस घांसदाण्याचा मोठा पेंच पाडून करवीरकरांना आयास आणण्यासाटीं पंचगंगेच्या दक्षिणतीरीं चिकोडी तालुक्यांत कागल, कोडोलीपासी व पंचगंगेच्या उत्तरतीरीं सिरोळ आळत्यापासी अशी दोन जागा फौज ठेविली पाहिजे, ही मसलत परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं नाना फडणिसांस सुचविली (ले. ११४). या समयीं करवीरकरांच्या फौजेनें येऊन जयरामस्वामीचें वडगांव मारून नेलें. पुढे येसाजी, मानाजी व सटवाजी ह्या करवीरच्या त्रिवर्ग सरदारांनीं वाघापुरावर चाल केली. तेथे झुंज होऊन येसाजी सिंदे यांचा मोड झाला. तें वृत्त परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं नाना फडणीस यांना कळविलें (ले. ११५). या वाघापूरच्या झुंजाचें वर्णन ले. ११६ व ११७ मध्यें आहे. पुढें करवीरकरांशीं तहाचें बोलणें चालू होतें. त्या वाटाघाटीची सविस्तर हकीकत परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं नाना फडणीस यांस कळविली. (ले. १२१,१२४, १२५, १२६). राजमंडलकरांचा तह व भूदरगड किल्ल्याचा बंदोबस्त यासंबंधी करवीरकर व पुणें दरबार यांच्यामध्यें ज्या वाटाघाटी दीर्घकालपर्यंत चालल्या त्याची माहिती ले. १२८. १२९, १३५, १३६ व ले. १३८, ते १४५ आणि ले. १५३, १५७, १५८, १५९ या लेखांत आहे.

किल्लेगगनगडकरी व सुबराव कृष्ण अमात्य यांच्यामध्यें विपर्यास बहुत आला. त्या स्थलास अपाय होतो असें समजलें. तेव्हां तें स्थळ रक्षण्यासाठी बंदोबस्त केला (ले. १४६). परंतु इकडे किल्ले पन्हाळ्याहून छत्रपति महाराजांनीं गुजाजी गायकवाड, सरखवास यांस त्या गडकऱ्यांशीं बोलणें करण्याकरितां पाठविलें. गडकऱ्यांचें व त्यांचें बोलणें लागलें असतां येकायेकी महाराजांची स्वारी पन्हाळ्याहून कूच होऊन किल्ले गगनगडच्या पेठेनजीक दाखल झाली. महाराजांच्या बरोबर तीन हजार पायदळ व सात-आठशें राऊत होते. किल्ले गगनगडाच्या पेठेस उपद्रव करावा ही परिस्थिति निर्माण झाली तेव्हां अमात्यांनी नाना फडणीस यांच्या कानावर घालून स्थलाचा बंदोबस्त केला. परंतु त्याबद्दल करवीर छत्रपति महाराजांनी चित्तांत विपर्यास आणून स्थळास शह दिला. या सुमारास आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि यांनीं नाना फडणिसांस कळविलें कीं, 'पन्हाळ्याहून राजमंडलाची फौज इकडील टाण्यालगती येऊन प्रांतांत दंगा केला. पांच-च्यार गांव लुटून नेले, व मलकापूरचे ठाण्यावर चढाई करून फौज आली तेव्हां परस्परें लढाई दोनच्यार जाहल्या. उपरांत फौजेचा तळ उठोन दोन कोश मागे गेला. तेथे आठ दिवस मुकाम होता. तेथून निघोन बावडयानजीक फौज गेली. तेथे श्रीमंत महाराज स्वामीची स्वारी पाराशराहून (पन्हाळ्याहून) फौजत जाहाली. बावडयास शह द्यावा येसी मसलत होत आहे.........कारकून धण्याचे (महाराजांचे) सेवेसी पाठविला. त्यास तेथील बोलणें जे खंडणी द्यावी..................ऐशास नाना, आम्ही तो सर्व प्रकारे संस्थान आपले पूर्ण अभिमानी, आपण बाहेरील कोणेक गोष्टीचे संकट पडो

देणार नाही येसे आश्वासन आपले आहे.त्यापक्षी दुसरा अर्थ धरिला नाही.सारांश आपण वडील संस्थान कर्जाचे पेचांत याची चिंता आपल्याविना आणखी कोणास आहे. राजश्री परशरामपंतास (परशुराम भाऊ पटवर्धन, तासगांव यांस) पत्र आपले परभारे यावे जे राजमंडलाकडील उपसर्ग प्रतिनिधि याचे प्रांती जाहला आहे व पुढें होईल येविसी राजमंडलचे वकील तासगांवी आहेत त्यांस निक्षून सांगावे कीं, एकंदर त्याचे प्रांती उपसर्ग करावयाचे कारण नाही व त्यापासोन खंडणीचा पैका मागों नये. खंडणी देणे ते तिगस्ता त्याणी दिलीच आहे. हाली उपद्रव करावयाचे कारण नाही. येसे निक्षून पत्र आपले आले तरीच संस्थानाचे संरक्षण होते. नाना, आपल्याविना आमचे संकट निवारण करणार दुसरा कोणी नाही. आपले मांडीवर उसें ठेविले आहे. युक्तीस येईल ते करावे '. ही हकीकत ले. १४८ व १५० या लेखांत सांपडते. या विषयासंबंधी अधिक माहिती ले. १४९, १५१ १५२ व १६० मध्ये आहे. संताजी घोरपडे सेनापति हुजुरांच्या आज्ञेप्रमाणें वर्तणूक करीत नाहींत ही माहिती ले. १६४ मध्यें आहे.

महादजी शिंदे ऊर्फ पाटीलबावा यानीं खेम सांवत भोसले सांवतवाडीकर यांना राजेबहादर हा किताब व मोर्चेल मोंगल बादशहाकडून मिळवून वाडीस पाठविलें; परंतु हें सन्मान स्वीकारण्यास व कागदोपत्रीं मरातिब लिहिण्यास व मोर्चेल वापरण्यास छत्रपति महाराज करवीर यांनीं हरकत घेऊन विरोध केला. त्यासंबंधीं विस्तृत हकीकत ले. १६५ व १७३ मध्यें आहे. पुणे दरबाराने सदाशिव रघुनाथ व बालाजी गणेश यांना सांवतवाडीकर यांचे जाबसाल उलगडून द्यावयाविषयीं आज्ञा केली. सावंतवाडीकरांच्या प्रकरणाचे जाबसाल उलगडून देण्याबद्दल ज्या वाटाघाटी सुरू झाल्या त्यांची सविस्तर हकीकत सदाशिवरघुनाथ यांनीं करवीर मुक्कामाहून पुणे दरबारास पाठविलेल्या पत्रांत आहे (ले. १७२, १७३, १७६, १७९). या प्रकरणासंबंधीं अधिक माहिती ले. १७४, १७५, १७७ या लेखांत आहे.

रखमाजी राजे भोसले यांनीं करवीर छत्रपति महाराजांची भवानीगड व तुरुकवाडी हीं दोन ठाणीं घेतलीं. पुढें रत्नाकरपंत राजाज्ञा यांनीं तीं परत जिंकून तेथे हुजूरची ठाणीं बसविलीं. या समयीं जी गडबड झाली त्यांत रखमाजी राजे भोसले ठार झाले. हें वृत्त ले. १६६ व १६७ मध्यें आहे. छत्रपति महाराज करवीर, म्हैसूर राज्याचा टिपू सुल्तान व त्या मुलखांतील इतर जमीनदार यांच्या कर्नाटक प्रांतांतील हालचालीसंबंधीं वृत्त ले. १७० व १७१ मध्यें आहे.

राजमंडळकर व जांबोटकर यांनीं सांखळी डिचोली हा फिरंग्याचा मुलुख जाळून लुटून फस्त केला, ही माहिती ले. १८३ मध्यें आहे,

करवीरकराचे रत्नाकरपंत राजाज्ञा दीड हजार स्वार व दोन हजार प्यादा बरोबर घेऊन सामानगडाहून हेलेवाडीस आले. तेथून अडकूर वेनझडीपर्यंत तलाव्यास आले.

हे वृत्त सखो रामचंद्र यानीं किले कलानिधी तालुके चंदेगड येथून लिहिलेल्या पत्रांत आढळते (ले. १८६). कमलजाबाई भोसले सांवतवाडी यांनीं नाना फडणीसांस सादर केलेली कैफियत ले. १८७ मध्यें आहे. सदर कैफियतीत सखो रामचंद्र, लेखांक १८६ च्या पत्रलेखक यांच्या नांवाचा उल्लेख आढळतो.

कालखंड इ. स. १८२१ ते इ. स. १८४४

छत्रपति महाराज करवीर यांच्या बंदोबस्ताविषयीं विठ्ठलभट पुजारी यांनीं जी माहिती सांगितली ती ले. १९४ मध्यें आहे. सयाजी बाजी मोहिते व त्याचे भाऊबंद व लेक एकूण सहा आसामी यांनी छत्रपति संभाजीमहाराज करवीर यांना दगा करून ठार मारिले. सबब त्यास दाखवून देणारास अगर धरून आणणारास सरकारांतून २००० रुपये बक्षीस मिळतील, हा जाहिरनामा ले. १९५ मध्यें आहे. श्रीमन्महाराज छत्रपति साहेब सातारा यांची स्वारी श्रीचे दर्शनास करवीरास येणार, त्या प्रसंगी छत्रपतिमहाराज करवीर व छत्रपति महाराज सातारा यांच्या भेटी होऊन मेजवानी होणार त्यावेळीं तोफांचे बार करण्याचा जो रिवाज होता त्याबद्दल माहिती ले. १९६ मध्यें आहे. बेळगांवचे पोलिटिकल एजंट न्यूससाहेब यांनीं सामानगडचे फौजेंतून एक गुप्त पत्र पाठविलें त्याचा उल्लेख ले. १९८ मध्यें आहे. आजपर्यंत फौजेचा मुक्काम करवीरास होता. उदईक ता. ६-११-१८४४ रोजीं येथून कूच होऊन कागल येथे मुक्कामास जाणार. जनराल डिलीमीट साहेब याची फौज सामानगडाहून कूच होऊन भुदरगड येथें लढाईस जाणार. या फौजेस कर्नेल ब्रोफसाहेब याची फौंज जाऊन मिळणार, अशा प्रकारे या प्रसंगीं त्यांनीं ज्या हालचाली केल्या त्याची हकीकत ले.२०० मध्यें सांपडते. या सुमारास पन्हाळगड येथें झालेल्या लढाईबाबत उल्लेख तारीख २२-१२-१८४४ च्या अर्जीपत्रांत आढळतो (ले. २०१). सुभानजी निकम यानीं कांहीं माणसें जमवून जिल्हा बेळगांव तालुके चिकोडी येथील आकीवाट गावांत ठाणें घालण्याची तजवीज चालविली होती. त्यास धरण्याचा यत्न करावा असें न्यूससाहेब पोलिटिकल एजंट, बेळगांव यानीं कोल्हापूरच्या कारभाऱ्यांना कळविलें, ही माहिती ले. २०२ मध्यें आहे.

अशा प्रकारें या पुस्तकांत [अ] व [ब] विभागांत छापलेले कागद मी वाचकांस सादर करीत आहें.

१३२१ कसबा पेठ, पुणे नं. २
राज्याभिषेकदिन श्रीशिवशक २८९
मिति ज्येष्ठ शुद्ध १३ शके १८८४ ता. १६-६-१९६२

मा. वि. गुजर

दुरुस्ती : भाग ४

पृ ३ ओळ खालून ११ 'माहे जानेवारी इ. स. १७६१' च्या ऐवजी 'माहे डिसेंबर इ. स. १७६३' वाचावें.

पृ. ३१ ओळ ८ 'घ्यावयाचा' च्या ऐवजीं 'द्यावयाचा' वाचावे.

पृ. ४८ ओळ १३ 'लैभाग्यवती' च्या ऐवजी 'सौभाग्यवती' वाचावें.

पृ. ५० ओळ ८ 'धान' च्या ऐवजी 'प्रधान' वाचावें.

पृ. ९४ ओळ १३ 'फिर (तो) तो च्या ऐवजी 'फिरतो' वाचावें.

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस. आय., बी. ए.,

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर



जन्म :

फाल्गुन कृष्ण ९ शके १८३१

समर्पण

श्रीमन्महाराज सर श्री शहाजी छत्रपति, जी. सी. एस्. आय्., बी. ए

हिंदुपदपातशहा महाराज सरकार करवीर

यांना

महाराजांच्या प्रतापशाली राज्यकर्त्या

पूर्वजांसंबंधीं ऐतिहासिक माहिती देणारीं

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें, भाग ४

हें पुस्तक

संपादकानें प्रेमादरपूर्वक समर्पण केलें असे.

मा. वि. गुजर.

करवीर छत्रपति घराण्याच्या इतिहासाचीं साधनें

(भाग चवथा)

विभाग (अ)

पेशवे दप्तरांतून निवडलेले कागद

लेखांक १ तारीख १९-१-१७६१

चि. द. रु. नं. ६

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राज-
श्री शेषोपंत आपा स्वामीचे सेवेसी

सेवक शेषो त्रिमल स॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल पौश शुध चतुर्दसी सोमवार प्रहर रात्र जाणोन स्वकीये स्वानंदलेखन करीत गेले पाहिजे विशेष आपण पैठणीच्या मुकामाहून पत्रे तीन पाठविली ती पावली वर्तमान कलले श्रीमंत राजश्री पंत प्रधान पडदुराहून मजल दरमजल बऱ्हानपुरास गेले आम्हीही त्वरेनेच जाऊन लस्करास पोहचतो श्रीमंताचे दर्शन जाहाले नंतर कसी काये आज्ञा करितात त्यासारिखे आपणास लिहून पाठवितो म्हणून लि॥ तेही कलले श्रीमंतानी हरीपंत व बिसाजीपंत यास इकडील बंदोबस्ताकरिता रवाना करून दिल्हे ते काली पोष्य शुध त्रयोदसीस कृष्णातीरी बुरली अमनापुरावरी येऊन उतरले आहेत येथोन धणीयास पत्र पाठविले जे श्रीमंतानी फौजसुधा आपणास पाठविले आहे साहेबास कलावे म्हणून पत्र लिहिले होते त्यावरून धनियाच्या चित्तास परम विकृती भासली लौकीक मुखातरे वर्तमान येत होते जे हरीपंत व बिसाजीपंत या उभयेतास श्रीमंतानी शांतवनार्थ रवाना केले आहेत म्हणून चौंकडोन वर्तमान येत होती त्यास उभयेता समीपतेस येताच प्रकारांतर वर्तमान लिहिले आलेवरून बहुत श्रमी आहेत श्रीमंत महाराज यानी कैलसवास केला त्यासमागमे जावे हा तर निश्चये होता परंतु महाराजानी समागमे न येणे तिघी राण्या आहेत त्यासही ठेऊन घेणे येकटी राहिल्यास राज्यलोभास्तव राहिली म्हणतील यास्तव चौघी राण्या

येकत्र असणे धाकटी राणी गरोदर आहे तिचे संगोपन करून राहणे ईस्वर कृपा करी तो पुत्र होतो आग्रहे करून मजसमागमे याल तर माझे वधाची शफत आहे ऐसी आज्ञा जाहीर होती हे एक दुसरी गोष्ट गत वर्षी प्रधानपंत येऊन सातारेस घेऊन जाणार तेसमइ धणणीने राजश्रीस अर्ज केला तुम्ही सातारियास जाता आपण येथे राहणार त्यास कांहीं आश्रय असावा म्हणोन अर्ज केल्यास धणणीच्या मनोदयानरूप चौघाचे साक्षी-निसी आज्ञा केली त्यास कुसाबाईसाहेब गरोदर याची चार महिने वाट पाहोन पुढे सहजच रूढीस येणे ते येईल या अन्वये करून राहिली आहेत प्रस्तुत उभयेता ग्रहस्त आले येणे करून बहुत उदासीन जाहाली आहेत साहेबी राजश्री प्रधानपंत याचे मनो-दयानरूप लक्ष रक्षणे (पुढील बंद गहाळ)

लेखांक २ तारीख २१-१-१७६१

श्री

चि. द. रु. नं ६

श्रीमंत राजश्री दादासाहे-
ब स्वामीचे शेवेसी

विनंती आज्ञाधारक शेशो त्रिमल दोनीकर जोडून सां नमस्कार विनंती येथील कुशल पौश वद्ये प्रतिपदा पर्यंत करवीरी येथास्थित आसे विशेष राजश्री नारायेणराव तात्यानिया राजश्री बापोजीपंत सरफडणीस साहेबाकडेस पाठऊन स्वामीच्या निष्ठेचा भाव धणीण साहेबास फडणीसपंताच्या मुखे करून कलविले तेणेकरून धणीसाहेब माहाराजा चिंता सोडून आपल्या भरोशावरी निश्चितरूपे करून असता श्रीमंताकडून राजश्री हरीपंत व विसाजीपंत फौज व ग्रहस्तासी घेऊन कृष्णेवरी येऊन जबरदस्ती-चाच मजकूर सांगोन पाठविले त्यास येथून आज्ञा जाहाली जे धाकटी राणी गरोदर आहेत विस्वजनासी ठाऊक आहे आम्ही कांही राज्यलोभाकरिता राहिलो असाही प्रकार कांहीं नाही राजश्री स्वामीनी शेफतपूर्वक सर्वत्रादेखत आज्ञा केली जे तुम्ही समागमे न येणे चौवेजणी राहणे गरोदर आहेत त्यास पुत्र होतो संदेह नाही म्हणोन ठेऊन गेले चहू महिन्याचा आवकास आहे आसे असता आम्हा राण्यावरी गहजब करीत असिला तरी आम्ही आपला परिणाम पाहून घेऊ मग सुखरूप ज्यास उभे करतील तो श्रेष्ठ होईल म्हणोन निष्टंकच आज्ञा जाहाली त्या उभयेतानी आज्ञेप्रमाणेच आपणासी वर्तिले पाहिजे म्हणोन पत्र पाठविले हे निदानासी टेकले स्वामीस वर्तमान कलवणे म्हणोन आम्हासी साहेबाची आज्ञा जाहाली त्यावरून सेवेसी विनंती समर्पिली आहे धणियानी आज्ञापत्रही पाठविले आहे राजश्री तात्या+ व राजश्री सखाराम बापू सेवेसी

+ नारायणराव व्यंकटेश घोरपडे (इचलकरंजीकर)

विनंती करितील त्यावरून श्रुत होईल सांप्रतच्या मजकुराविसी येश घेणार स्वामीविना दुसरे कोणीही नाही राजश्री बापोजीपंत बावास रुबरू आज्ञा जाहली आहे ते सेवेसी लिहून कलवतील. सुज्ञाप्रती विशेष काये लिहिणे हे विज्ञापना.

लेखांक ३ तारीख २१-१-१७६१

श्री

चि. द. रुमाल नं. ६

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
तात्या स्वामीचे सेवेसी

सेवक शेषो त्रिमल कृतानेक स॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुषल जाणोन स्वकींये लेखन केले पाहिजे यानंतर आपण राजश्री बापोजीपंत सरफडनीस यासी पत्रे पाठविली ती पावली धणीसाहेबास बजिनस पत्रे दाखविली तेणेकरून परमसंतोषी आपणावरी होऊन फडणीसबावा यासी आज्ञा बहुताप्रकारे केली आहे प्रारंभी आपण येथील राजकारणाविसी मध्यस्त तदनंतर हे ग्रहस्त आणि सेवटासही हेच आले आहेत याजकरिता आपण जीवाभ्य श्रम करून हे राज्य रक्षावे सर्वत्रास उपयोगी आहे श्रीमंत पुढे गेले मागे आपले राहाणे राजश्री दादासाहेबापासी जाहाले हाच लाभ मानिला आहे येत्नास अंतर न होता अमका मजकूर जाहाला अमक्यानी रक्षिले असें व्हावे श्रीमंत मातुश्री बाईस पत्र दिवाणाचे व आमचे पुणियासी पाठविली आहेत तीही परभारे आपणास लेहून पाठवितील त्यावरून कलेल फडणीसबावा तेच आम्ही दुसरा प्रकारच नाही इतकेही आपल्या लिहिणेवरून जाहाले बहुत काये लिहिणे कृपा कीजे उतर सत्वर पाठवावे मिती पौष वद्य प्रतिपदा हे विनंती.

लेखांक ४ माहे जानेवारी इ. स. १७६१

चि. द. रु. नं. ७

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
शामजीपंत स्वामी गोसावी यासी

सेवक शेषो त्रिमल व विठल शेषाद्रि कृतानेक नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकींये लेखन करीत गेले पाहिजे विशेष आपणाकडील यैवजाविसी श्रीमंताची निकड आहे म्हणोन मातुश्री बाईची व राजश्री शेषोपंताची पत्रे आम्हास व राजश्री बापूजीपंत सरफडनीस यास येतात त्यावरून मशारनुले यानी राजश्री लिंगोपंतास आम्हाकडे पाठविले होते जे यास आपणाकडे पाठऊन यैवजाचा निकाल त्वरेने करविणे म्हणून लिहिले होते हली फडणीसबावाचा मु॥ चिकोडीस होऊन आपलेस यैवजाविसी निकड सांगितली

त्यावरून आपण दोनवेल पत्रे रवीस पाठविली म्हणोन चिरंजीव राजश्री नरसिंगरायास आपणाकडे पाठविली आहे त्याची आपली गाठी पडोन बोलणे चालणे जाहले असेल अशास फडणीस बावाचे व चिरंजीवाचे विचारे यैवजाची रवानगी करावी तिकडील निकड वारंवार होती हे आपणास दखलच आहे वरकड सविस्तर वर्तमान मुक्ता राजश्री लिंगोपंत सांगितील त्यावरून कलेल चिरंजीवाचे व आपले विचारे आठ चार दिवस मशारनुलेस ठेऊन घेऊन यैवजाची रवानगी करावी राजश्री मोरबा नाईक परडेकर याजकड यैवज पाठऊन पुणेस रवाना करावा किंवा परभारे पुणेस आपले विचारे रवानगी होयेसी आसिलिया करावी धण्यानी आपणाकडील फौज्ञ अद्याप न आली म्हणोन विचारिले आशास फौजेची तयार करून चिरंजीवाबरोबर कराराप्रमाणे पाठवावी करवीरासही फौज्ञ पाठवावी त्याजबराबरी कोणी बरा माणूस देऊन पाठऊन द्यावे चिरंजीवासमागमे फौज पाठविणे त्याची रवानगी जलदीने व्हावी त्यास वारंवार पत्र पाठऊन परामृश करीत असावे आपले भरवसेवर पाठविले आहेत चिकोडीहून निघोन गेलेचे वर्तमान लिहून पाठवावे कृपा केली पाहिजे हे विनंती.

लेखांक ५ तारीख २२-६-१७६१

चि. द. रुमाल नं. ८

श्री

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य
राजेश्री नारायेणराव व्यंकटेश स्वामी गोसावी
यासी

पे॥ बालाजी बाजीराव प्रधान नमस्कार विनंती उपरी राजश्री रघुनाथराव मंत्री याजकडील तालुकियात करवीरकरानी स्वारी करून खंडणी घेतली व गावगनाचे पाटील व पेटेचे वाडीचा खोत धरून नेला आहे जामीनकतबे व नागावा घेतला तो त्याजकडून सोडून आणून ज्याचे त्याचे हवाली करावे म्हणून पेशजी आज्ञा जाली असता हाली पत्राचा उजूर करिता म्हणून हुजूर विदित जाहले त्याजवरून हे पत्र आपल्यास लिहिले असे तरी आपल्यास पेशजी आज्ञा जाली आहे त्या बमोजीब राव मशारनिलेचे तालुकियातील खंडणीचा ऐवज काये त्याजकडे गेला असेल व कतबे काय घेतले असतील ते व पेठेचे वाडीचा खोत धरून नेला आहे तो येणे प्रमाणे याचे हवाली करवावे पुढे याचे तालुकियात उपसर्ग न लागे ते करावे जाणिजे छ १८ जिल्काद सु॥ इसने सितैन मया व अलफ बहुत काय लिहिणें.

लेखांक ६ तारीख ५-२-१७६२

चि. द. रुमाल नं. १४

श्री शंभु प्र॥

राजश्री रघुनाथ पंडि-

त यासी

श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब उपरी सांप्रत आपणाकडून विनंती पत्र येऊन वर्तमान श्रवण होत नाही यैसे नसावे निरंतर विनंती पत्री साकल्यार्थ लेहून संतोष पावीत जावे सध्या आपला मुकाम कोणे ठिकाणी आहे कर्नाटक प्रांते यावयाचा सित्धांत जाहला असता बहुत दिवस लागले तन्मुले हैदरअल्लीने कर्नाटक प्रांत अगदी काबीज केला तुमच्या येण्यास विलंब लागल्याने शत्रू सबल होऊन तमाम संस्थाने हस्तगत केली मातबर फौजेचा गाहा करून त्वरेने यावे शत्रूचा पराभव होऊन येश संपादावे आपणाकारणे मकरसंक्रमणप्रयुक्ततिलशर्करा पाठविली आहे घेऊन स्वीकार केला पाहिजे सविस्तर आज्ञा करून माहदजी निकम वाडियातील मूल व नरोजी लोंढा दिमत हुजरात यासी आज्ञा करून पा। आहेत व राजश्री शेषो नारायेण यास आज्ञा केली आहे आज्ञे प्रमाणे सांगतील त्यावरून कलेल. जाणिजे छ १० रजब बहुत लिहिणे तरी मुज्ञ असा.

लेखन

सीमा

लेखांक ७ तारीख २९-१-१७६३

पेशवे रोजनिशी रु. नं. ६३

स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ सलास माहे रजब

तेरीख १४ रोज माघ शुध्र पोर्णीमा मंदवासरे शके १६८४ चित्र भानूनाम संवत्सरे मु॥ का॥ मिरज कृष्णा उतरतीर

जामदारखाना जमा

जमा कमावीस भेट राजश्री माधवराव यांस ह॥ घांटगे कागलकर गु॥ राणोजी जाधव खिजमतगार सनगे येकूण

१२ तिवट कलसपाक १

१५ सेला जाफरखानी १

२७

लेखांक ८ तारीख २४-२-१७६३

पे. रो. रु. नं. ६३ रोजकीर्द

राजमंडल

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥

सलास छ १० साबान रवासुदगी

देणे वे॥ राजश्री बालकृष्ण शास्त्री यासी खर्चास रसानगी चिठी

रु॥ १०००

येक हजार रुपये शेशो नारायेण दिमत जिजाबाई साहेब याजकडे साल मजकुरी फुटगाव वगैरे ठाणी बसवून द्यावयाचा करार केली आणि यैवज करार केला रुो १९५००० पैकी देविले

....

बदल देणे श्रीमंत माहाराज राजश्री स्वामी यासी पौशाखा बदल

गु॥ शेषो नारायण नख्त यादी रुपये

१०००

येक हजार रुपये फुटगाव वगैरे वि॥ शेषो नारायेण याजकडे यैवज करार केला आहे त्यापैकी देणे म्हणून नरसिंगराव उधव यास पत्र म॥रनिले करून सदरहू येक हजार देविले.

राजमंडल तारीख २४-२-१७६३

स्वारी राजश्री पंतप्रधान सु॥ सलास छ १० साबान दफाते

पत्रे

नरसिंगराव उधव याच्या नांवे सनदा

तुम्हास करवीर प्रांती फौज देऊन ठाणी वगैरा वसवावयास रवाना केले आहे त्याच्या सनदा आलाहिदा आहेत त्या प्रा वर्तणूक करणे यैवज येणे प्रा करार केला वि॥ रु॥

१००००० फुटगाव देखील कागल

७५००० आपाजी शामजी

२०००० येमकनमुर्डी व शेंदूर

१९५०००

यकून येक लक्ष पंच्याणव हजार रुपये सदरहू प्रो करार केले असेत याच्या सनदा आलाहिदा तुमच्या नांवच्या आहेत तर सदरहू यैवजा पैकी राजश्री मल्हारजी भिकाजी रास्ते व राजश्री लक्ष्मण खंडेराव व तुम्ही वसूल श्रीमंत माहाराज मातुश्री बाईसाहेबाच्या तालुक्या पैकी राजश्री शेशो नारायेण व भगवंत आपाजी याजकडील इनाम गाव वगैरा आहेत त्या पैकी जो वसूल घेतला असेल तो वजा करून बाकी यैवज जो राहिला तो एक महिन्या आलीकडे निशा करून घेऊन वसूल करून घेणे म्हणोन पत्र १

किता पत्र राजश्री शेसो नारायेण व राजश्री भगवंत आपाजी वगैरे ग्रहस्त दिमत श्रीमंत माहाराज मातुश्री जिजाबाई साहेब याचे इनाम गाव वगैरा बारा मिलोन पंचवीस तीस हजार रुपयेचे आकाराचे आहे त्याची याद मा॥रनिले जवल आहे ते तुम्हास समजा-वितील त्याप्रा तुम्ही याजकडील गावास उपद्रव न देणे सुदामत पूर्वी पासून चालत आल्या प्रमाणे चालवणे मा॥रनिलेचे गाव जे असतील ते त्याचे हावला करणे म्हणून पत्र १

मौजे यमकनमुर्डी तालुका सुभा देखील चिकोडीकराची खंडणी सालमजकुरी करार रुपये २५०००० दोन लक्ष पनास हज़ार पैकी वजा यैवज रुपये

१८०००० चिकोडी बा॥ परभारा निकाल

५०००० आपाजी शामजी याजकडे इनाम गावची नजर वगैरे मिलोन

२३००००

येकून दोन लक्ष तीस हजार रुपये वजा करून बाकी येमकनमुर्डी सेंद्रबाबत साल मजकुरी श्रीमंत माहाराज मातुश्री जिजाबाई साहेब याणी फौजेच्या खर्चास यैवज द्यावयाचा करार रुपये २०००० वीस हजार केला त्याप्रो तुम्हास सदरहू यैवज हरदू ठाणियाबाबत घ्यावयास (सनद) सादर केली असे तर वीस हजार रुपये सदरहू ठाणी खासगीस बाईसाहेबाकडे आहेत सबब येकसाल वसूल सुरलीत घेणे पुढे सदरहू ठाणियास खंडणीचा उपद्रव सरकारचा लागो नये याप्रमाणे करार करून सालमजकुरी सदरहू यैवज येकसालचा वसूल घेणे म्हणोन पत्र १

....

किता पत्र कीं बदल देणें श्रीमंत माहाराज राजश्री स्वामी यासी पोशाख बदल रुपये १००० येक हजार देविले आसेत राजश्री शेषो नारायेण याजकडे सदरहू यैवज देणे म्हणोन पत्र १

....

विरूपाक्ष येमाजी चिकोडीकर यांचे पुत्र येमाजी विरूपाक्ष–लाहान मूल सबब त्याचे चुलते राजश्री आपाजी शामजी सर्व प्रकारें वडील मुलास. छ १० साबान सलास सितैन.

(ता. २४–२–१७६३)

त्या प्रो तेरा ठाणी वगैरे बसवून द्यावी आणि सरकारात फौजेच्या खर्चाबदल येकून पाऊण लक्ष यैवज सदरहू प्रो घ्यावयाचे करार करून सनद सादर केली असे तर तुम्ही सदरहू ठाणी वगैरे आपाजी शामजी याची बसवून देऊन यैवजाचा निकाल करून घेणे रा॥ आंबाजी नागनाथ याणी वस्तभाव वगैरे जे नेली असल ती त्यास ताकीद करून आपाजी शामजी याजकडे देवणे मा॥रनिले येमाजी विरूपाक्ष यास पावती करितील

तर तुम्ही लिहिले प्रा ठाणी आधी बसवून देऊन यैवजाचा निकाल करून घेणे.

म्हणोन पत्र १

नरसिंगराव उद्धव यास पत्र दिल्हे.

(ता. २४-२-१७६३)

लेखांक ९ तारीख ८-३-१७६३

पे. रो. रु. नं. ६३

सु॥ सलास सितैन छ २२ माहे साबान रवासुदगी

....

बदल देणे कारकून सिलेदार यास तैनात पैकीं बदल मुशाहिरा

रसानगी यादी रुपये

२००० रामचंद्र गणेश

२००० कृष्णराव बलाल काले

४०००

च्यार हजार रुपये बा यैवज मातुश्री जिजाबाई यांकडे करार केला आहे त्यापैकी शेषो नारायेण याणी हवाला घेतला त्यापैकी देविले.

लेखांक १० तारीख ४-५-१७६३

पेशवे रोजनिशी रु. नं. ६३

राजमंडल

स्वारी राजश्री पंत प्रधान सु॥ सलास (सितैन) छ २० सवाल रवासुदगी बा देणें पंचवीस हजार रुपये नरसिंगराऊ उधव याजकडून सेशो नारायेण याजकडे पा कागल वगैरे येथील खंडणीचा यैवज करार केला त्याचा हवाला नरसिंगराव यांजकडे आहे त्या पैा देविले.

लेखांक ११ तारीख २०-७-१७६३

शाहू दप्तर रुमाल नं. १५

श्री

विनंती उपरी राजश्री बाबुराव पंडित अमात्य याजकडे किले प्रतापगड येथील सबनिसीची आसामी कैलासवासी शिवाजी महाराज याणी वंशपरंपरेने देऊन राजपत्रे करून दिल्ही

आहेत त्याअलीकडे कैलासवासी मातुश्री आईसाहेब याणी ही सनद देऊन आा चालती केली आहे त्या पासून पंडित मारनिलेकडे चालत आहे त्याप्रो हाली राजश्री स्वामीची राजपत्रे भोगवटियास करून द्यावी रा। छ ८ मोहरम सुा आर्बा सितैन मया अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

लेखांक १२ तारीख १२–८–१७६३

रुमाल नं. ५४ जमाव दप्तर
कर्नाटक जमाव
नं. ३३७

श्री शंभु प्र ॥

श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब याणी तमाजी रवलोजी निंबाळकर देसाई सरनाईक प्रो हुकेरी यासी आज्ञा केली यैसीजे सु॥ आर्बा सितैन मया व अलफ गुदस्ता राजश्री नरसिंगराव उधव याजकडे सिवाजी भोसले चाकरीस राहून तुमचे इनाम गाव पैकी मौजे कुरली हा गाव घेऊन सरकारचे तालुकेस स्वाऱ्या करू लागला यास्तव साहेबी फौजेस आज्ञा करून मौजे मजकुरास वेढा घालून कुरली व हदनाल दोनी गाव सरकारात घेतले व पेशजी मौजे पडलेहल राजश्री शेषो नारायण याजकडे इनाम देऊन सरकारची इनाम पत्रे करून दिली मौजे मतीवडे व मौजे सुलगाव हे दोनी गाव तुमचे वडिलास कैलासवासी संताजी घोरपडे सेनापती याणी इनाम देऊन इनाम पत्रे करून दिली कानोजी भोसले याणी का। सदलगे प्राा मजकूर येथे स्वारी करून गाव लुटला तुमचे वतनी कागदपत्रे तेथे गमावले गावाचा भोगावटा पूर्वीपासोन तुम्हाकडे चालत आहे मौजे पडलेहल व हदनाल याचे मुबदला सदरहू सुलगाव व मतीवडे प्राा सावगाव हे दोनी गाव पूर्वी सेनापतीनी दिल्हे प्रो साहेबी तुम्हास इनाम करार करून दिल्हे असेत तुम्ही वडिलाचे वंशपरंपरेने अनभवून वतनी सेवा करून सुखरूप राहणें कुरलीचे मुबदला तुम्हास दुसरा गाव प्राा मजकूर पौ देविला जाईल येविसी साहेब आज्ञा करितील जाणिजे राा छ २ माहे सफर.

लेखन
सीमा

लेखांक १३ तारीख १३–१२–१७६३

चि. द. रु. नं. १४
पौ छ १८ जाा खर
सु॥ आर्बा सितैन

श्री

राजश्री जानोजी धुलप गो-
सावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो माधवराव बल्लाल प्रधान
आसीर्वाद सुा आर्बा सितैन मया व अलफ तुम्ही विनंती पत्र पाठविले ते पावले गुराबा व गलबते मालवणास पाठविली फिरंगी याणी आरमारासी लढाई मातबर करून येक डंगी व व येक मंजी दोन धरून आणिल्या त्याजवर माल पांचा हजाराचा आहे मालवणचा वेढा उठविला याउपरी तीन गुराबा स्वारीस रा करितो म्हणोन तपसिले लिहिले ते कलले ऐशास मालवणास सरकारच्या गुराबा पाठवून लोकानी मर्दुमी करून जुंझाने फिरंगीचा वेढा उठविला डंगी व लोकानी घरून आणिल्या उत्तम केले पुढे सरकारचे आरमार स्वारीस जाऊन मातबर स्वारी जाल्याने खावंद चाकरीचा मजुरा होईल सारांश हरयेक आरमारासी गांठ घालणे ते घावदाव पाहावा आपली सलाबत त्याजवर पडोन काम कारीगार होये या रीतीने स्वारी करावी तुम्ही शाहाणे लोक कामाचे आहा तुम्हास लिहावे असे नाही. जाणिजे छ ७ जमादिलाखर. बहुत काय लिहिणे.

लेखन
सीमा

लेखांक १४ पौ तारीख २१–१२–१७६३

श्री

चि. द. रुमाल नं. ७

पौ छ १५ जमादिलाखर

मुकाम चिकोडी

विनंती उपरी करवीराहून आपणाकडे पत्रे प्रविष्ट जाली म्हणून ग्रहस्तानी लिहिले होते सांडणी स्वाराबरोबर जलदीने रवाना करून द्यावी आपला मुकाम काली दानवाडावरी होता आजी कूच करून चिकोडीस मुकाम होईल चिकोडीकराकडे पत्र पाठवून उतर आणविले असल फौज तयार करून इकडे उतर पाठवितो म्हणोन निरोपिले होते त्याचा पर्याये कैसा जाहला न कले आम्ही आज्ञे प्रमाणे आजी निघोन आपणाकडे येतो राजश्री हरीपंत व विसाजीपंत याजकडे राजश्री येसाजी पंत व रामचंद्रपंत यास पाठविले आहे अद्यापि उतर न आले तिकडून उतर येताच आपणाकडे लिहून पाठवितो खासगत जासूद जोडी तीर्थरूपाकडे रवाना करून देतो आपणाकडून पत्र पाठवणार म्हणून सूचना केली होती पत्रे लिहून पाठवावी करवीरास आजी जातो तेथील आशय समजले प्रमाणे सविस्तर लिहून पाठवितो आपले मनोली

प्रांते जाणे होऊन कार्याचे उद्यशानरूप धण्याकडील फौजेच कारण पडल्यास लिहून पाठवावे घेऊन येऊ जे जमावे मिलल तितका आपले पत्र पावतेक्षणी घेऊन येऊ सर्व प्रकारे आमचा भर आपणावरी आहे आम्ही आपले आज्ञे प्रमाणे मात्र सादर राहणार करवीराकडील साधनाविसी वरचेवर निरोपावे तदनरूप घडवूं चिरंजीव नानास आजी दीपाराधन समई येथून पाठवितो आपण आसाल तेथे रातोरात येऊन मिलवितील नेणते आपण कडीवर घेतले आहे त्याचा शेवट लावणेविसी वारंवार प्रार्थना करावी तरी नणुतपण कडीवर मात्र बसावे इतके कलते राजश्री लिंगोपंतास करवीरास पाठविले आहे तेथून पत्रे घेऊन चिकोडीस येतील तेथील मजकूर काय असल तो आपण व चिरंजीवानी बोलून विलस लाऊन पुढे जावे नणदीकराविसी येथे विनंती केली होती आपले आस्वासन घेऊन राजश्री श्रीनिवास राऊ नणदीस गेले त्याजकडून कोणी कारकून अगर श्रीनिवासराऊ आपणाकडे आले तरी सर्व प्रकार धीर भरवसा द्यावा कारस्थान आपले पदरीचे आहे दुसरा अर्थ नाही कृपा केली पाहिजे हे विनंती. चिकोडीत आपली मोकाम किती होतील ही आज्ञा करावी. तदनुरूप निघोन सेवेसी येतो हे विनंती.

लेखांक १५ तारीख १–५–१७६५

श्री

पौ छ १५ जिल्काद
सन खमस

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाल बलाल च्यरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १० जिल्काद पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीची आज्ञा घेऊन मुंबईस आलो येथे येऊन साद्यंत वर्तमान मनास आणिले इंग्रजाने मालवण घेतले यामुले गर्व बहुत जाला आहे सांवताचा रेडी किल्ला घेतला होता तो त्यास देऊन मुबदला मसुरे इंग्रजाने घेतले व लाख रुाची जागीर किल्लेयासी घेऊन सांवतासी सला करून आरमार मुंबईस आले पुढेही लढाईचे सामानाची तरतूद होत आहे हबसी सामील आहे हरयेकनिमित्य ठेऊन येखादी जागा ठिकाणावर घालावे हे मानस इंग्रजाचे आहे हैदर नाईकासही येथून दारूगोले व तोफा तीन लक्षाचे सामान याणेच दिल्हे जे ठिकाण कजियास निमित्य होईल तेच ठिकाण इंग्रज घेईल निमित्यास जागा पाहतो याप्रमाणे वर्तमान आहे तोफाचे गोले दर हजार वट रुा १६ प्राा मिलतात व गरनालीचे गोले दर हजार वट रुा २४ प्राा मिलतील याप्रमाणे गोले यासी पाड आसे सिसे सुरती मण रुा ७ व जस्त रु ७ा प्राा पाड आहे मी आजच निघोन साष्टीस गेलो तेथून वसईस

जाऊन नासिकास जाईन सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना तुलाजी आंगरे याचे लेक पलाले ते व्राणकोटास जाऊन तेथूं जंजीरेयासी गेले तेथूं काल येथे मुंबईस आले इंग्रजानेही यास अस्वासन दिले आहे कीं आम्ही तुम्हास येकावे ठिकाण देऊन तुमचे चालऊ यैसे वर्तमान परभारे आइकीले परंतु ते द्रीस्टीने पाहिले नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १६ पौ तारीख २३–६–१७६५

श्री

चि. द. रुमाल नं. १४

पौ छ ४ मोहरम

सीतसितैन आषाढ

मास.

पु॥ श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे शेवेसी

विज्ञापना छ ९ सवालचे आज्ञापत्र रवाना ते छ ३ जिल्कादी सादर जाले तेथे आज्ञा कीं इंग्रज दुर्बुधीस प्रवर्तला आहे राज्यातील मालवणासारीखी जागा घेऊन सांवताची रेडी घेतली बंदर किनारा सोडवीत चालिला त्याचा गर्व हत होऊन पूर्वतप्रमाणे हालखुद राहिला पाहिजे याचा विचार कसा करावा तुम्ही बहुत देखिले व स्वता अंगेज करून तरवार मारिली जागे साध्ये केले आपले सामान बरेबरे लोक जथ चांगला राहून शत्रू पादाक्रांत व्हावा याचा विचार कर्तव्या कर्तव्येतेचा लेहून पाठविणे तदनरूप केला जाईल तुम्ही आपले तालुकियातील किंले कोटाची भरती जेथील तेये राखून चौकी पाहारा करून खबर राहाणे या कामास बालकोजी सिर्का खिजमतगार पाठविला आहे सविस्तर सांगता कलेल म्हणोन आज्ञा आज्ञे प्रो किलेकोटाची खबरदारी व अलंग नोबत चौकी पाहारा करीत आहे शेवकाचे तालुकियाचे बंदोबस्ताचे वर्तमान साद्येत खिजमतगार सेवेसी आले आहेत निवेदन करिता विदित होईल शत्रू पादाक्रांत व्हावा याचा अर्थ स्वामीचे पुन्यप्रतापापुढे आगाध काये आहे? त्याचे पराभवास सामान सरंजाम नवीन करावेनलगं स्वामीचे पदरीच आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १७ तारीख ८–९–१७६५

चि. द. रुमाल नं. १४

श्री

राजश्री बालाजीपंत लेले

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने॥ आनंदराव धुलप मुकाम जंजिरे विजयदुर्ग रामराम विनंती येथील कुशल तागायेत छ २१ रे॥वल जाणोन स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष आम्ही आरमारसुधा स्वारीस निघोन गेलो त्यास बाहीर मालवणांत वीस जांबावर इंग्रजी बंगाली तरांड्याची गाठ पडली तेव्हा आरमारचा येक जडाव करून तरांडे बाजूबाज राखोन लढाई देऊन आडावणी करून पाडाव केले श्रीमंताच्या पुण्यप्रतापे फते होऊन छ २० रे॥वली जंजिरे मजकुरी आलो नारायण[2] पालास घामत[1] फार होतो यास्तव तेवढा बंदरी ठेऊन वरकड अरमार नस्ता-वरून परभारे पुनः स्वारीस रवाना केले आहे पैदास्ती तरांड्यावर माल बंगाली कापड व रेसीम कचे व साकार व हस्तीदंत सुपारी हे जिनस आहेत. कलावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनंती.

लेखांक १८

तारीख १–२–१७६६

शाहू दप्तर रु. नं. १८

श्री

तैनात जाबिता सटवाजी भोसले रांजनकर प्रा॥ मिरज सु॥ सन सीत सितैन मया अलफ. खडबोली

साहमाही	३०० रुपये
ता॥ छ २० माहे शाबान सन ११७५	
सोमाजी भोसल रांजनकर	१५०
शाहाजी भोसले रांजनकर	
यत्राजी भोसले रांजनकर	३००
मन्याजी भोसले रांजनकर	३००
कामाजी भोसले रांजनकर	३००
मानाजी भोसले रांजनकर	३००
लिंगोजी भोसले रांजनकर	२७५

“ सारेच तांडेल तर घमत कोण सांडेल ? ” ही म्हण प्रचारांत आहे..

१ तरांड्यात झिरपून येणारें समुद्राचें पाणी त्यास घमत म्हणतात.

२ नारायण व दत्त पाल महादेव पाल फत्ते जंग पाल हीं धुळपाचीं प्रसिद्ध लढाऊ जहाजें होतीं.

लेखांक १९ तारीख १७-९-१७६६

चि. द. रुमाल नं. १७

श्री

राजश्री रघुनाथ
पंडित यासी

श्रीमंत माहाराज मातुश्री जिजाबाई साहेब याणी आज्ञा केली यैसीजे सामानगडकरी यानी चिरंजीव राजश्री जिवराव शिंदे यासी सातारेहून किला घेऊन येऊन चिरंजीव नरसिंगराव सिंदे यास किल्यातून लाऊन देऊन बदराहा वर्तू लागले त्यास राजश्री प्रधान-पंतासी वर्तमान कलून किलेदारास व राजश्री नारायेणराव घोरपडे यास व आजिरेकरास ताकिदी पाठवून दिल्या जे धण्याचे कहेमाफीक वर्तणूक करणे दिगरराहा वर्ताल तरी केले पावाल म्हणोन त्यास ता। तैसेच नारायणरायास पत्र लिहिले जे धण्याची येख्तीयारी आपणावरी असता किलेकरानी लबाडी केली त्यास तुमचा आसच आहे यैसे कलले हे उतम नाही सुदामत वर्तवणे हा दाखला कामाचा नाही म्हणोन पत्रे आली भवती न भवती घडावी तो धण्यानी वैकुंठवास सेवकजनसहीत केला तदनंतर गरगशाच जाहला सांप्रत विठल विश्राम सामानगडच्या मदतीस येऊन येकदोनी गाव घेऊन बदलवर्काक साहेबाचा व तुमचा करीत बसिला आहे हे तुमच्या चितास येते कीं काय किंवा तुमच्या निरोपानेच आला आहे कीं काय हे तेथे साहेबासी कलण × × (तु) मच्या निरोपासिवाय आपखुसीने वर्तत आसल्यास केले पावेल. जाणिजे छ १२ रबिलाखर बहुत काये लिहिणे.

लेखन
सीमा

बार.

लेखांक २० इ. स. १७७१-७२

श्री

चि. द. रु. नं. १४

यादी ताकीद पत्रे किले सिंधुदुर्ग

श्रीमंत मातुश्री आऊसाहेबाकडील सु॥ इसने सबैन

१ जानोजी धुलप सुभेदार आरमार यासी कीं किले मजकूरचे आरमार स्वारीस जाते त्याची तुमची गांठ पडते त्यास हरयेकविसी त्याचे साहित्य करीत जावे पाणी उदक घ्यावयास आपले तालुकियात येतील त्यास कोणेविसी उपसर्ग लागो न देणे म्हणोन पत्र

१ बालाजी हरी सुभेदार प्रांत सालसी यासी कीं प्रांत मजकुरी किले मजकूर व बावडेकरी मिलोन हिसा आहे त्यास हिश्याच्या यैवज बावडेकर घेतात किले मजकूरच्या हिसा येथ विभागे देत नाहीत म्हणोन विदित जाले त्यास प्रांत मजकुरी सुदामत हिसा असेल त्याप्रो किले मजकुराकडे देत जावा बावडेकरी लबाडी करितात यास्तव वाटणी बा। यैवज देत जावा किल्याचे तुमचे सानिध्य आहे याजमुले हरयेकविसी त्याचे साहित्य करीत जाणे म्हणोन

१ किले बावडेकरी यास कीं सालसी प्रांती तुमचा व मालवणकरी याचा हिसा आहे तो यैवज तुम्हीच घेता यथाविभाग वाटणी देत नाही म्हणोन विदित जाहाले त्यास सुदामत चाल असेल त्या प्रो उभयताही वाटणी प्रो यैवज घेत जाणे येविसी बोभाट येऊ न देणे म्हणोन.

१ खेमसांवत भोसले यास कीं वाडी प्रांती सिंधुदुर्गचा हिसा आहे तो यैवज साल्सुद पावत नाही म्हणोन विदित जाहाले त्याजवरोन हे पत्र लिहिले असे तर किले मजकूरचा हिसा सुदामत आपले तालुकियात असेल त्याप्रो देत जाणे म्हणोन पत्र.

—

४

लेखांक २१ तारीख २१–१०–१७७३

श्री

शाहू दप्तर रु. नं.३९

विनंती उपरी वेदमूर्ती ब्राह्मणास जमीन इनाम श्रीमंत माहाराज सौवती मातुश्री दुर्गाबाई साहेब थोरली धनीन वाडा पहिला याणी इनाम जमीन चावर

१ रघुनाथभट बिन गणेशभट पराडकर वा। मौजे उबरे ता। हातखंबे प्रा। राजापूर गोत्र ज्यामदग्नी सूत्र आस्वलायेन

॥ गणेशभट बिन भास्करभट उपनाम आल्कर वे। मौजे कसेली ता। राजापूर प्रांत मजकूर गोत्र ज्यामदग्नी सूत्र आस्वलयन

।१० लक्षुमणभट बिन गोपालभट अभयंकर वा। मौजे कोंढे ता। सौंदाल प्रांत राजापूर गोत्र वसिष्ठ सूत्र हिरण्यकेसी

—

२

दोन चावर जमीन दिली आहे याची राजपत्रे करून द्यावी रा। छ ४ साबान सु। आर्बा सबैन मया व अलफ हे विनंतीः

लेखांक २२ इ. स. १७७३--७४

श्री तालीक

चि. द. रु. नं. २३

यादी राजश्री नारायणराव बलाल प्रधान सु॥ आर्बा सबैन मया व अलफ स्वामीकडून जिवाजी भोसले व माहादेव शास्त्री व आकोजी नेवरे व आपाजी शामराव शेवकाकडे येऊन कितेक करारमदाराच्या यादी ठरल्या आहेत व शेवकास पेशवाईचे पद स्वामीनी कृपाकरून दिल्हे त्या प्रमाणे निखालसपणे साहेबाकडून चालावे सेवकाखेरीज दुसरे लक्ष धरू नये व राजकारन किंवा कोणे गोष्टीचा बखेडा व सेवकास विरूध ती गोष्ट होऊ नये येविसी स्वामीचे शफतपूर्वक अभय असावे.

श्री तालीक

पेशवाईचे पद स्वामीनी कृपाकरून तुम्हास दिल्हे येविसी वगैर कितेक करारमदाराच्या यादी ठरल्या आहेत त्याप्रमाणे तुम्हाकडून अंतर होऊ नये स्वामीकडूनही यादी प्रमाणे निखालसपणे चालेल तुम्हा खेरीज दुसरें लक्ष धरून राजकारण किंवा बखेडा तुम्हास विरुद्ध ती गोष्ट होणार नाही. बेलभंडाराचा शपथपूर्वक अभय असे.

लेखांक २३ तारीख १९-११-१७७४

श्री

चि. द. रु. नं. ८

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १०१ जयनाम संवत्सरे कार्तिक बहुल प्रतिपदा मंदवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री सखाराम भगवंत यासी आज्ञा केली यैसीजे राजश्री येसाजी राम व रामचंद्र नारायण व दादाजी त्रिंबक याजकडील गावे हुजूर सरकारात यावयाचा करार पेसजी नारायेणराव पंडित याचेवेळेस जाहला असता अद्याप सरकारात येत नाही येविसी वेदशास्त्र संपन्न राजश्री महादेव शास्त्री फोंडेकर व आपाजी शामजी यासी आज्ञा जाली आहे यासी त्रिवर्ग रेटाईचा जाबसाल करितात हुजूर जाऊन अर्ज करू यैस बोलतात म्हणोन हुजूर विदित जाहले तुमचे विद्यमाने करार असता अद्याप सरकारचे करारापैकी त्रिवर्गाकडील व पुण्यसील अनूबाईकडील गावे येत नाहीत याचा अर्थ काय ? राजश्री नागो शामजी हुजूर विनंती करितात जे राजश्री रामचंद्र महादेव याचा फडशाचा मात्र गुंता सरकारातून राहिला आहे रामचंद्र महादेव याणी सरकारचे तालुके अडथळून ठेवून तालुकेतील त्याजकडील व अनुबाईच्या वगैर याच मतलबात सिरोन बखेडा करावयाचे कारण काय ? सावकारी जो जाबसाल वाजबी असेल तो तुमचे विद्यमाने होत असता बखेडा कर्णे हे उत्तम नसे याचे बंदोबस्ताविसी ताकीद करून आनुबाईकडे अथवा हरकोणाकडे सरकार तालुकेतील कुमक न जाविसी करावी मिरजकर याणी बावडेकर व सेनापति व शेषो नारायण व रामचंद्र

भगवंत सर्वत्र कुमक पाठवणार त्यास सर्वत्रास ताकीद करावी जे अनुबाईकडे कुमकी लोक परिछिन्न पाठवू नये व शेषो नारायेण व रामचंद्र भगवंत याजकडून कुमक गेल्यास याचे पारपत्य होईल व येसाजी राम व रामचंद्र नारायेण याजकडीलही कुमक जाऊ नये येविसीची ताकीद तुम्ही केलीच आहे इतके उपरी पाठवितील तरी जिकडून उपराला होईल तिकडे त्याची खराबी होईल येविसी तुम्हास अनेक प्रकारे समजावितील तन्मुले तुमची विनंती पत्रे येतील यास्तव स्वामीनी अगोदर आज्ञा केली असे. सर्वत्रास ताकीद करावी त्रिवर्गांकडील वगैरा करारा पैकी गावांविसी उभयता मशारनिले यासी आज्ञापत्रे सादर जाहली आहेत त्याप्रमाणे निकड करितील ते सरकारात हुजूर अर्ज करू येसे बोल्तील तरी त्याची रदबदली चालणार नाही आज्ञे प्रमाणे गावे व वसूल करारा तागायत देवावी येविसी तुम्ही ताकीद निक्षून केली पाहिजे करारात लडा राहू नये निभावणी जाहली न जाली हे तुम्हास न समजेसे काय आहे? वारंवार येविसी सरकारची आज्ञापत्रे सादर आसता करारा पैकी गावे व हारामखोरं यत नाहीत हे उतम नसे. जाणिजे बहुत काये लिहिणे.

मर्या
देय विरा
जते

(पत्राचे पाठीमागें)
बार सुरु सुद बार समत सुरु सुद बार.

लेखांक २४ तारीख ८-१२-१७७४

श्री

चि. द. रु. नं. २१
पो छ १८ सवाल
सन खमस सबैन
दोनप्रहर दिवस

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक बालाजी गणेश चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग नमस्कार विज्ञापना तागायेत छ ४ माहे सवालपावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे व तालुके देवगडचे वर्तमान येथास्थित असे विशेष हाली बाहुडेकराचे व सिंदे पनलेकर याचा कज्या लागला आहे यामुळे वाडीकर सांवताकडील मदतीस लोक पाचशे पावेतो गेले पुढे हमदरत्फी लागलीच आहे. सांवताचा जमाव सालसी माहालचे सरदेस जागा जागा जाहाला आहे पुसिले तर आम्ही बाहुडेयासी जावयासी जमा जाहालो आहो ऐसे सांगतात शेवकाने सर्देच्या किल्या कोटाचा बंदोबस्त करून हुशार आहे गोमांतकाकडील बातमी तर दोन तरांडी येणार म्हणोन वर्तमान होते ती आली नाही फिरंगी सावकारी तरांडी घेऊन

वलावा पाहावयास निघाला आहे तो बाहेरून जात आहे त्याच्या बाऱ्यावर कृष्णाजी धुलप दोन गुराब व चार गलबते घेऊन त्याच्या पिछावर आहे उदैक सारे आरमार घेऊन राजश्री जानराव बाहीर निघतात आताच त्याचे पत्र आले गोमांतकात येथील बातमीदार ठेविला आहे.
सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक २५ तारीख ३०-१-१७७५

श्री

चि. द. रु. नं. २०
यादी करारा प्रो ताकिदपत्रे पाहिजे
राणोजी घोरपडे सेनापति याचा लेक बापू व नानानीं सांगितल्या प्रो सरकारातून हैदरखानाकडे न जावा याविसी ताकीद केली ती अलक्ष करून गेला आहे त्यास आणवावा लागेल येविसी मातुश्री आनुबाईनीही पस्ट ताकीद करावी सेनापतीचा पक्षपात धरू नये
कलम १
सेनापतीचा पुत्र हैदरखानाकडे चाकरीस गेला असल्यास त्याजला आणवावयाविसी ताकीद होईल करार करावे.
राणोजी घोरपडे व बावडेकर अमात्य व प्रतिनिधि सांवतवाडीकर व हेरेकर यासी पत्र जे शेशो नारायेण याचे कारकीर्दीच्या अन्वये तुम्हाकडे जाबसाल असतील त्याचा फडशा करणे म्हणोन पत्र.
श्रीमंत माहाराज स्वामीचे पत्रें उभयेतासी श्रीमंताच्या ज्यन्मोत्सव जाल्यापासून येताल त्याची उतरे होत नाहीत ती आम्हावर कृपा करून पत्राची उतरे द्यावयाचा करार करून द्यावा.
पत्रे वाचून पाहून उतरे देत जाऊ.
करार करावे.
मानाजी बागुलाचे चौकसी क्रियामुखे होऊन मोरो हरि बोलल्या प्रो फडशा करावा.
कलम १
याची मखलासी खालील कलमात आली आहे.
यासी वाइदा आमचे पत्र करवीरास पोहचल्यानंतर पंधरा दिवसात फडशा व्हावा येणे प्रो
कलम १
सदरहू दोन कलमे मानाजी बागलाविसीची आहेत त्यास तुमच्या करारा प्रो उपद्रव तुटला म्हणजे क्रिया देऊन पंधरा रोजात निवाडा करू निवाड्या प्रो वर्तावे आनुबाईनी येणे प्रो करार करावे.
सारांश पेशजी करारोची याद जाली आहे त्यात रांगोली लाट निराली करून वरकड पत्रे देऊ.
करार करावा.
छ २७ जिल्काद पौश वद्य चतुर्दसी सन खमस सबैन मु॥ बाभुलगाव श्री गंगातीर.

लेखांक २६ तारीख २४-३-१७७५

चि. द. रुमाल नं. २३

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी

चे सेवेसी

सेवक येसाजी राम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील वर्तमान ता। फाल्गुण वद्य ७ पर्यंत मोकाम + + स्वामीचे कृपेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष स्वामीची आज्ञा घेऊन आलो तें अ.ठवे रोजी गावास सुखरूप पावलो याउपरी कोकणांत जाऊन कार्य उरकोन सवच माघारे येत आहो यानंतर विनंती येता करवीरवासी माहाराज याजकडील जमाव होऊन खेडिया उपसर्ग होणार त्यास ताकिदीविसी आज्ञा जाहली होती हाली येथे आल्यावर मजकूर मनास आणिता चिकोडीस जमाव जाहला आहे तोफा तयार करून नेल्या कोणाच्या गली पडतात याबा। तूर्त विचार पाहता राजश्री शेषोपंत आपाचे खेडियाचे पारिपत्य करोन मागोन सेवकाचे खेडियाचा परामर्ष करावा या अर्थे साधन आहे यास्तव राजश्री रामचंद्रपंत विनंती करतील ते ध्यानी आणोन अमृत वचन दिल्हे प्रमाणे राजश्री गोविंदपंत मिरजेस आहेत त्यास उपरालेविसी प्रसंग पडलियास यैवज व येक पत्र राजश्री राचंद्रपंती द्यावे आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत विदित होये हे विनंती.

लेखांक २७ तारीख २८-३-१७७५

चि. द. रु. नं. २३

श्री शंभू प्र॥

राजश्री बाळाजीपंत फडनीस

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्ने॥ येशवंतराव सिंदे सुभेदार दंडवत विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ २५ माहे मोहरम जाणून स्वकीय लेखन करीत गेले पाहिजे विशेष तुम्हाकडून वेदमूर्ती माहादेव शास्त्री आले त्याणी सविस्तर अर्थ सांगितले त्याजवरून कलो आले आणि श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब व माहाराज राजश्री छत्रपति साहेबी रुबरू जी आज्ञा करणे ती वेदमूर्तीस केली आहे वेदमूर्ती तुम्हास लिहितील त्याजवरून कलल मुख्य गोष्टी राजश्री प्रधानपंताकडून धणी याचे पायासी आमर्यादा न व्हावी यास्तव तीर्थरूप श्रीमंत माहाराज राजश्री आबासाहेब व मातुश्री आईसाहेब याचे सेवेसी राजश्री बालाजी पंडित व राजश्री सदाशिव पंडित याणी शफतपूर्वक क्रियापुरसर करारमदारनिसी गुंतले आहेत त्यात चल न पडता धणियाची कृपा संपादून येशास पात्र होये ते करावे कलले पाहिजे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक २८

तारीख ९-५-१७७५

श्री

कर्नाटक जभाव
रु. नं. ९६४

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०१ मन्मथनाम संवत्सरे वैशाख शुध नवमी भौमवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली ऐसीजे राजश्री रामचंद्र मोरो हुजूर आले त्याणी स्वामीचे सेबेसी विनंती केली जे पुण्यसील अनुबाई याजकडील उतूर हा गाव सरकारात घेतला आहे तो द्यावा त्याची आज्ञा होणेची रीतीने होत असता सरकारचे ठाणे शहापूर येथे तोफा लाविल्या लोकास विस्वास दाखवून कौल दिल्हा लोकानी हातेरे ठेविली असता तासणीने कच घालितात याप्रमाणे लोकास पनास पावणासेहपर्यंत आसामीस तोडून सोडिले स्वामीचे सेवकाचे चाकर अनुबाई याची इरे याजप्रमाणे स्वामीस तो श्री भवानी शंकराचा वर आहे वरदी राज्य याची ईरेशा श्री भवानीशंकरास आसे स्वामी सेवेच्या आगत्यापेक्षा आनुबाईचे आगत्य विशेष आहे तुमचा आग्रह जाणोन स्वामीनी उतूर हा गाव राजश्री नागो शामजी याचे स्वाधीन आज्ञा करून केला असे तुम्हास कलावे यास्तव आज्ञा केली आहे. जाणिजे बहुत काये लिहिणे.

मर्या
देयं विरा
जते

लेखांक २९

माहे मे इ. स. १७७५

चि. द. रु. नं. २३

श्री शंभु प्र॥

राजश्री बालाजीपंत नाना
फडनीस गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ येशवंतराव शिंदे सरसुभेदार दंडवत विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपणास श्रीमंत धणीसाहेबाची आज्ञापत्रे सादर जाहली आहेत त्याजवरून सविस्तर आज्ञा चितारूढ होइल वेदशास्त्रसंपन्न राजश्री माहादेव शास्त्री फोंडकर यानी तिकडोन आलेले वृत्त श्रीमंत धणीसाहेबाच सेवेसी निवेदन केले येविसी मशारनिल्हे आज्ञा जाहली आहे ते आपणास लिहितील त्याजवरून कलेल. कलले पाहिजे बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक ३० माहे मे इ. स. १७७५

चि. द. रुमाल नं. २३

श्रीं शंभु प्र॥

राजश्री सखारामपंत काका

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे॥ येशवंतराव शिंदे सरसुभेदार कृतानेक दंडवत विनंती उपरी येथील कुशल ता छ माहे शौवाल जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष आपण पत्र राजश्री वेंकटराव घोरपडे याजविसी पाठविले ते पावल लिहिला मजकूर कलला लाट व रांगोळी व सरदेशमुखीचा हक्क पूर्वीपासून चालत आल्या प्रमाणे चालविणेविसीचे अगत्यवादि पूर्वीपासून आहे त्याप्रमाणें सर्वत्र चालविले पाहिजे येविसी कितेक प्रकार अगत्यवादेपूर्वक लिहिला तो श्रीमंत धणीसाहेबाचे सेवेसी समजोन विनंती केली येविसीची आज्ञा जाली जे कैलासवासी महाराज मातुश्री आईसाहेब याचेवेलेस माधवराव पंडित याणी चिकोडी व मनोली तालुके वगैरे रायबाग कागल वगैरे अमर्यादा वर्तोन सरकारात गैररुजू होऊन गावे होती ती येकंदर सन आर्बा सितैनात नजर करून सफतक्रियानिसी पत्र लेहून दिल्ही त्या आलीकडे समजाविणारामुले आवक्रिया करून तालुके जप्त केले ते समई लाट व रांगोली ही सरकारचे ठाणें उठोऊन आपली ठाणी घातली तालुके मजकूर राजश्री रामचंद्र नाईक याजकडे जप्ती सांगितली त्याणी राजश्री व्यंकटराव घोरपडे याजकडे दिल्हेवरी नारायणराव पंडित याणें करारमदार करून सफतक्रियानसी पेशजीच्या करारा प्रमाणे लाट व रांगोलीसुधा करारमदाराचे या यादी व ठाणी याच्या चिठ्या देऊन राजश्री जिवाजी भोसले व वे॥ महादेवशास्त्री व आपाजी पंत व आकोजी नेवरे याजबराबरी पाठविल्या त्याप्रो राजश्री रघुनाथ पंडित याणीही त्याच कराराच्या यादी ठरावून मारनिले बराबरी ठाणी बसून द्याबियाबद्दल तोफखाना व फौज देऊन पाठविलेवरी येथे करारप्रमाण सरकार ठाणी न बसली व्यंकटराव घोरपडे व शेषोपंत व राजश्री सेनापति व बावडेकर याजकडून मनस्वी आचरण करून सरकार तालुकेत अमर्यादा जी केली आहे ती वरीचवरी सरकारचे आज्ञेप्रमाणें आपणास कलविली राजश्री रघुनाथराव पंडित याणे लस्करसह वर्तमान गणेशवाडी कृष्णातीरी मोकाम केला तेसमई राजश्री नागोजीपंत सरकारातून आज्ञापत्रें घेऊन प्रधानपंताकडे जाबसालाविसी पाठवणेविसी आपण लिहिले प्रमाणे गेले तेथे पंडित मशारनिले यास मानाजी बागुल

व माहदजी सितोले व व्यंकटराव घोरपडे व बावडेकराकडून राजश्री सदाशिव रामचंद्र व राजश्री शेषोपंत याणी नानाप्रकारची मसलत देऊन आपले लक्षानरूप आम्ही आहो आपले आमचे आजादता आहे हे समजाऊन सेनेसह वर्तमान किले पनालियासनिध मोकाम करून उपसर्ग करावे सरकार तालुकेत दोनी लक्षाची खराबी केली नागोजीपंत यासी चौकीत ठेवून पंत मशारनिलेस आपले ममतचा भ्हणोन आबरु खात्री करबिली हे वर्तमान सविस्तरे वे।। शास्त्री व नागोजीपंत याणी समक्ष सांगितलेच आहे त्या उपरांतीक आपण राजश्री बालाजीपंत याणी सरकारात दम पाठविली जे पेशजी कैलासवासी नारायेणराव पंडित यांचेवेलेस जी यादी ठराव जाहला आहेत त्याप्रमाणे ठाणी सरकारची बसवून देऊ जमस हाली असतील ती बसवून देऊ त्या करारात अंतर होऊ देणार नाही यैस कितेक निष्ठापूर्वक त्याप्रो श्रीमंत धणीसाहेबा सेवेसंनिध निवेदन करून आपले वचन सत्य मानून सर्वची अमर्यादा जाहली त्याजविसी क्षमा करावी याविसी अर्ज करून मर्जी संभा-लली यैस असता त्याजकडून किल्या नजीक खेडियात फारच उपसर्ग केलियावरी आपणा-कडे लेहून पाठविलेवरी आपण सर्वासी ताकीद करून लाट व रांगोलीविसी राजश्रीस माधोराव पंडित प्रधान यांचे पत्र घोरपडे यास सरकारची ठाणी बसून देणेविसी पाठविली त्यांचे प्रत्योत्तर जासुदासी मशारनिलेने काये केले व आपण समक्षही उभयतानी सांगितले तेही अभान्य करून मनस्वीच आचरण केलेवरी आपण व वे।। शास्त्री उभयेतानी यास सांगितले जे याउपरी पारपत्य सरकारातून करावे यैस निरोप वरचेवरी आलेवरी श्रीमंत धणी साहेबाचे शेवेसी अर्ज केला तेव्हा आज्ञा जाहली कीं करारमदार तीन पिडीपासून केला असता सरकारातून खर्चवाच दुबारा करावयाचे कारण काये ? सारांश आपलेवरी द्रिष्टी देऊन पारपत्याविसी फौज दाहा बारा हजार पर्यंत ठेऊन पारपत्य करावे या अर्थी त्यांचे खेडियावरी रवाना केलियावरी राजश्री शेषोपंत याणे त्याजकडे कुमक पाठवून स्वारी करऊ लागले हेही आजीपर्यंत सोसितच आले हली आपण सरदेशमुखी सुरलीत चालवावी सदरहू दोनी गाव त्याजकडे द्यावे पुढे यास कटकट करू नये त्याचे अभर्यादा चालत आले प्रो चालोन द्यावे सर्वांचे चालवावे लागतो येविसी मागोन घेतो येस कितेक-प्रकारे घरोब्याने वडिली लि।। हे केस समजोन लिहिले येविसी सर्व अर्थ आजीपर्यंत त्याजकडील वर्तणूक ध्यानांत न आली आसी आडचण पत्री कशास्तव लिहिले आज-पर्यंत त्याजकडील आमर्यादा सोसून सिबंदीबदल खर्चवेच करून मनरवी खर्चवेच वाढवून त्याची भीड आपणास पडिलियावरी आमचा उपाय काये ? माहासज आईसाहेब कैलासवास केला तेसमई आम्हास आज्ञा केली कीं वरकड तुम्हास जोडी कांही केली नाही बापू आपला कैलासवासी नाना सिंदे तसा आपण तुम्हास अंतर देणार नाहीं त्यांचे विचारान राहावे ते सर्व काल चितात स्मरोन आपले लक्षतेचा निजध्यास यैस चालत आहो यैस असता आपण चौगांचे भिडेमुले पत्र लिहिलें हे अभिमान आपणास नाहीसा जाला तेव्हा जनात अर्थ आसल तो वडिलाचे ध्यानात असेलच आम्हास

जे आगत्य ते आम्हास आहेच आमचा अभिमान ईश्वरास आसावेसे जाहले यैस जनात दिसोन येत आपलेसिवाय दुसरा प्रकार तिलतुल्य नाही येविसीची आज्ञा श्रीमंत धणीसाहेब वारंवार सावध करीतच आहेत तेव्हा आपले पत्र आलेले निवेदन करावयासी जागा न राहिलासा जाहला आपण तो सपक्ष आविलंब्राण हेच करीत आले पुढेही चालत आले सर्वासही अनुभव असाच आहे आम्हासही आहे भिडेमुले आडचण आपणास आमर्यादा वर्तणूक करणाराचे सेफतक्रियेचे आगत्यास पक्षाहून पडल्यास आपलातरी उपाये काये आहे ? आपणास अडचण दोनी खेडी खेरीज दुसरे तालुकात सरकार तालुकेशिवाय द्यावयास अडचण ब हीच द्यावी या विना अडचन वारत नाही यैस आसिल्यास आपणास आडचण ते अम्हासच आहे आपण अडचण खेरीज क्षेम असलियावरी सर्व राज्याची भिस्त आपणावरीच आहे त्यापक्षी आपली अडचण वारणे श्रीमंत धणीसाहेबास विशेष कार्य सदरहू अर्थ अक्षरशः ध्यानांत आणोन पेशजी प्रो उतर पाठविल्यावरी श्रीमंत धणी साहेबाचे शेवेसी अर्ज करून आज्ञा होईल तें वडिलास लेहून पाठवू राजश्री शेषोपंत याचे खेडियावरी तोफखानाचे कामगारीस सुताराविसी रोख सरकारातून केले गावकरानिही रोखे माघारे केले व पंत मारनिले याणी घोरपडे याजकडे जाऊन मुधोळकरास आणावयाबद्दल मुधोळास गेल आहेत यामुले अमर्यादा फारच जाहलेवरी हे वृत्त सरकारात निवेदन जाहलेवरी इतराजी जाहली ती पत्री कोठवर ल्याहावी. चौकहून बखेड्याचा मजकूर राजश्री नागोजीपंत व आम्ही बा। महादेव शास्त्री यास व राजश्री आपाजी पंत यास आपणास कलावे याविसी लिहिणी येतच आहेत श्रीमंत धणीसाहेबापुढे उपाये चालत नाही त्याजकडोन आमर्यादा राहत नाही तेव्हा उपाये सेवक लोकानी कैसा करावा धणी याची मर्जी आपणास अनभव आहे लिहून सुचवावेसे काये आहे बहुत काये लिहिणे हे विनंती.

लेखांक ३१ — तारीख ९–६–१७७५

चि. द. रु. नं. २३

श्री शंभू प्र॥

तीर्थस्वरूप राजमान्य राजश्री
सखारामपंत काका वडिलाचे
सेवेसी

वालके येशवंतराव शिंदे सरसुभेदार कृतानेक दंडवत विनंती आत्रत्य कुशल ता। छ १० माहे रोवल पर्यंत वडिलाचे आसीर्वादेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष वडिला पत्र पाठविले ते पावले तेथे लि॥ जे राजश्री रामचंद्रपंत पाठविले आहेत हे सांगतील ती आमची वचने येसी मानून कार्यभाग करावे म्हणोन लि॥ त्याजवरून श्रीमंत धणीसाहेबाचे सेवेसी आर्जही केला आणि रामचंद्रपंत यास रुबरु आज्ञाही जाहली ते समई

मशारनिलेस सांगितल जे तुम्ही आज्ञचा आग्रह पाहून बापूस पत्र लेहून पाठविणे आणि च्यार दिवस हुजूर राहणे ते ध्यानी न आणिता निघोन गेले रामचंद्रपंती अर्ज केला त्याजवरून आजरवर मोकाम होता तेथून कूच होऊन स्वारी निपाणीस जाहली उपरांत रामचंद्रपंताकडील कारकून हजूर आले होते त्यास आम्ही रुबरू राजश्री नागोजीपंत याचा विद्यमाने सांगितल जे रामचंद्रपंतानी हुजूर यावे त्याचे हवाली उतूर करवितो इचलकरंजीकरानी अमर्यादा वर्तणूक न करावी येस सांगितले तेव्हा रामचंद्रपंतास घेऊन येतो म्हणोन गेले बरोबरी नागोजीपंत याजकडील कारकून पाठविले होते परंतु हुजूर न येता निघोन गेले त्याणी आपणास सविस्तर सांगितल असल वडिली लिहिले त्यावरून सर्व अर्थ येकीकडे ठेवून श्रीमंत धणीसाहेबाचे सेवेसी अर्ज करून उतूर हा गाव व तेथील कमाविसदार राजश्री नागोजीपंत याचे हावाला केला आणि वडिलाची चिठी येईल त्याजप्रो वर्तणूक करणे येस सांगितले आहे वडिलास कलावे यास्तव लिहिले असे सिबंदीचा खर्च व राजधानीचा खर्चामुले संकटात आहो त्यास सर्व आधार वडिलाचा आहे श्रीमंत धणी साहेबाची आज्ञापत्रे सादर आहेत त्याजवरून सविस्तर अर्थ कलेल. कलले पाहिजे बहुत काय लिहिणे कृपालोभ कीजे हे विनंती.

लेखांक ३२ तारीख ११-६-१७७५

श्री

चि. द. रु. नं. २३

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री
मोरोपंत दादा यासी

प्रति स्नेहाभिलाषी माहादेव शास्त्री कृतानेक आसीर्वाद उपरी येथील क्षेम तागायेत येथे ज्येष्ठ शु॥ त्रयोदसी पावेतो मौ कोडोली येथास्थित आस विशेष आपला निरोप घेऊन येथे आल्यानंतर पत्र पाठविले होते परंतु त्याचे उतर आले नाही तरी येस न करिता पत्री परामृश होत असावा त्या आलीकडील वर्तमान तरी मातुश्री अनुबाईकडील उतूराची चिठी दरम्यान गतीने राजश्री नागोजीपंतापासी दिली ती पुरंधरास राजश्री रामचंद्रपंतासमागमेच परभारे राजश्री आपाजीपंताकडे पाठविली ती आपणापासी त्याणी दिली त्याजवरून कललेच असेल आम्ही येथ आल्यानंतर बावडेकरास व सेनापतीस आणावयाबद्दल सरकारची आज्ञापत्रे पाठविली तेही वर्तमान आपानी कळवलच असेल ते आल्या नंतर त्याचा जाबसालाचा फडशा सत्वरच होईल वगैरे किरकोळ जाबसालाचा फडशा करीतच आहो याप्रो कराराची आज्ञापत्रे सरकारची राजश्री बापूस व राजश्री नाना या उभयेतास पाठविली तेहि श्रुत जालेच असेल येस असता उतूरची चिठी दिल्या अलीकडे इचलकरंजी नजीक दोन चार गाव मातुश्री बाईनी जाळून गाव कुसवे पाडली कौलाना बाहीर माणसे काडोन तोडली तेही उभयेतास लि॥च आहे त्याजवरी आमचे करारपत्र पुरंधरास

पोहचून मग उतर येईल त्याप्रो राजश्री कोनेरराव यानी कर्णे ते करावे येसे निवते समई उभयतानी सांगितले होते त्या विस्वासावरी आम्ही येथे येऊन बोलिलो व फौजेच्या हिसेब करून निरोपही देवीत होतो थोडया थोडयाबहुतास निरोपही देविला होता आणि मातुश्रीकडील वगैरे हरकोणाकडील गावखेडयास उपद्रव तिळमात्र लागोन दिल्हा नाही पुरंधरास तहा प्रो वर्तणुकीची पत्रे पाठविली यैसे मातुश्रीस व पांडुरंगराव यास व राजश्री कोनेरराव येताच त्यास कळविले असता जे आले तेच नीट सरकारच्या तालुक्यात उतरोन आर्जुनवाड व धरणगुती व हरोली यैसी तीन सामान्य गावे गुदस्ता राघोबा दादानी लुटून पाडली होती त्यात दाहावीस माणसे आलीकडे गावे नीट करोन रखवालीस ठेविली होती ती याणीही कौल देऊन भाहीर काडोन गळे कापले हेही वर्तमान उभयतास लि॥ परंतु कोणाकडून बंदोबस्त होईनाच जाहला त्यानंतर मौजे कोडोली येथे माहाराजाचा मोकाम आहे तेथे येऊन उपद्रव करू लागले याजमुळे नदीवरी महाराजाचे फौजेचा मोकाम होता तो तळ उठवून गावानजीक आणिला तरीही उपद्रव राहिला नाही तेच दिवसी संध्याकाळीं पंचगंगेपलीकडे फौज व तोफा राव आपण उभे राहून पुढे पेंढारी पाठवून तळ आम्हाकडील जाळिला आणि दुसरे दिवशी ज्येष्ठ शुध नवमी बुधवारचे दिवसी (ता. ७-६-१७७५) नदी अलीकडे फौज तोफासुध्दा उतरोन येऊन हुपरी जवळ आहे त्या गावाचा आसरा करून तोफेचे गोळे फौजेवरी व गावावरी व माहाराज राहिले होते त्या घरावरी नेमून टाकू लागले येक दुसरा गोळा गावात येऊन पडला येथवरी उभयेताचा शब्द लागल यास्तव सोसिले तदनंतर फौजेची तयारी करोन चालून घेतले जुंज मातबर जाहले येविशीचे सविस्तर परस्परे किंवा आपाचे पत्रावरोन कलेल त्या आलीकडे येथील मर्जीचा अर्थ आपास लि॥ आहे तो ध्यानात आणोन उभयेताची मर्जी काये आहे ते शोध करोन जरूर कळवावे रा कोनेरराव इकडे आलेनंतर पुरंधराहून पत्रे येतील त्याप्रो तुम्हीही असावे व आम्हीही राहतो ऐसी दोन चारी पत्रे लिहिली त्यास त्याणी पत्रे घेऊन जाणार जासुदास नागऊन घेऊन मुसक्या बांधोन गाडदी याचे हवाला करू लागले बरे असो सारांश अर्थ श्रीमंत कैलसवासी नाना तागायेत करार व क्रिया देऊन येथील समजाविसी करोन करारात पुढे अंतर आणोन आलीकडे राज्ये साधिले तस्मात क्रियालोप हेच राज्याचे साधन यैसी परिनालिका आपले दरबारची आहे तैसीच येथीलही सदासिव अवधूत नानासाहेबानी निकर्ष करून पाठविले त्याप्रो रायानी व धाकट्या रायानी निकर्ष करोन राज्यास अपाये करावयाची इच्छा धरिली त्या त्या समई ईश्वर रक्षितच आला आहे तोच पुढेही करील तेच प्रमाणे यैसा समज येथील आहे याच बलावरी राज्य आसे देशकाल वर्तमान न पाहता म्हणवीत आहेत यातील उचितानुत ध्यानात आणोन कर्तव्यता करणार सर्वज्ञे आहेत तेथे विस्तारे काये ल्यावे हे आशीर्वाद.

लेखांक ३३ इ. स. १७७५

श्री

चि. द. रु. नं. २१

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री बापूजीपंत स्वामीचे सेवेसी

पोष्य अंताजी राम सरदेशपांडे ता। खिलणा कृतानेक सा नमस्कार विनंती यानंतर चिरंजीव राजश्री गुंडो विनायेक यास विशालगडाहून गाव इनाम व हक आहे त्यास विशालगडकरी यास पुण्याचे रुपये पडिले त्यास याच्या गावचा व हकाचा मनस्वी हिसेब करून रुपये दीड हजार केले आणि वसूल द्या म्हणतात वरकडही इनामदाराजवल वसूल मागत आहेत यैशास याचे इनामत द्यावयास कारण विशालगड पादशाहा याणी घेऊन उदसिंग राजा तेथे ठेविला तो पुढे निघोन जाता किला विसोबा नाईक व कैलासवासी कृष्णाजी भास्कर मुतालिक सरदेसाई याचे स्वाधीन किल्ला करून याचा कतबा किल्याचा लेहून घेतला आणि राजा निघोन गेला तेसमई श्रीमंत कैलासवासी रामचंद्रपंत आपणास किल्ला द्या श्रीमंत कैलासवासी परशरामपंत हे किल्ला आपणास द्या तुमचा काय आडमुद्दे असतील ते सांगा करून देतो तेव्हा किला यास दिल्हा तेसमई इनाम गाव व संगमेस्वर माहाली पनास बिघे जमीन इनाम करून दिल्ही श्रीमंत पंताचे पत्र आबेच्या शफत जे आपल्या वंशी जो होईल त्याणे चालवावे प्रस्तुत श्रीमंत राजश्री आबाजीराव प्रतिनिधि करीत आहेत त्यापासी शागीर्दपेशाचा कारभार ? आमचे ग्रहस्त मोडून देशांतरास घालवावे द्वेष कलतच आहे धणी धनलोभाचे ठाई प्रवर्तले आहेत यैशास श्रीमंत राजश्री भगवंतराऊ प्रतिनिधि यास पूर्वीचे वर्तमान सरदेसाई याचे चालवावयास कारण हे ठाऊक नाही तरी आपण खासा कराडास जाऊन साद्यंत वर्तमान निवेदन करून येथे त्याचे चिरंजीव सरदेसाई याच्या सरंजामास उपद्रव न करीत यैसी शफतपूर्वक पत्रे राजश्री हणमंतराव याचीदेखील पाठवावी. लोभ करावा ही विनंती.

लेखांक ३४ माहे मार्च इ. स. १७७७

चि. द. रु. नं. २५

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री हरीपंत तात्या स्वामी

चे सेवेसी

पे।। रामचंद्र गणेश सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीये लेखन

करावे विशेष अलीकडे आपणाकडील पत्र येऊन कांहीच वर्तमान कलत नवते हाली राजश्री बाजीपंत आणा व विसाजीपंत यास पत्रे आली तिच्यातून सविस्तर अर्थ विदित जाहला हिकडील वर्तमान करवीरकरास घोरपडे घाटगे वगैरे मिलोन जमाव भारी करून वडगांव करवीर पनाल्याचे आश्रये सरकारचे फौजेचा शह धरून आहेत मैदानी निखालस येऊन गाठ पडल्यास श्रीमंताचे प्रतापे होणे ते होईल ती गोष्ट नाही त्यापक्षी ठाण्यास शह द्यावयास दुसरी फौज तोफ पलेदार असून कार्य व्हावे त्यांत येथील फौजेस पोटास नाही गवगवा मोठा अशा बेदील फौजानी निकड करण्यास विचार पडतो यास्तव पोटाची सोय काही तरी पाहिजे यास्तव तिसरे हप्त्याचा यैवज घोरपाडे याजकडे येणे तो यैवज आपण श्रीमंतास विनंती करून हिकडे देवण्यात उपयोग फार आहे जरूर करावे परजन्यकाल समीप येतो चहूकडून मसलती उभारल्या आहेत अशात आपले कूच होण्याने फार कार्य होती ती गोष्ट घडत नाही आपण एकनिष्ठपणे जिवदारम्य श्रम बहुत केले असता अद्याप संकट परिहार नाही नाही कालमाहात्म्य वरकड श्रीमंताचेप्रतापे सर्व गोष्टीचा निर्वाह होऊन येईलच कालचरित्राची क्षीत करून काय ? आपण सूज्ञच आहेत विसाजीपंत आमचे आज्ञेत आहेत त्याजविसी कोणेविसी चिंता न करावी निर्वाह होईल तसा करीतच आहो सारांश तुम्हाजवळ यैवज नाही याजमुले मुकाम जाले हे समजले परंतु जसा प्रकार आला तो हरकसा सेवटास न्यावा याची पैरवी करीतच आसाल आम्ही तुम्हासतरी काये ल्याहावे ? तुमचीच गत जाली आहे सर्व भार ईस्वरावर आहे येथे हरकोठे चार रुपये गावगना ध्यावयासी कार्या येतील यैसे जालियास उभयता पाहून लिहून पाठवावे. बहुत काये लिहिणे लोभ करावा ही विनंती.

लेखांक ३५ तारीख १६–३–१७७७

चि. द. रु. नं. २०

श्री

सेवेसी विसोबाचे साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता॥ छ ६ सफर मुकाम सायगाव सिराड येथास्थित आसे विशेष आलीकडे पत्र येऊन स्वामीकडील वर्तमान कांहींच कलत (तीन ओळी मजकूर फाटला) जमाव भारी त्यात + + फा पलेदार याजमुले चांगला नेट करण्यास पेच आहे निखालस आश्रा सोडून मैदानी आल्यास श्रीमंताचा प्रताप समर्थ आहे चिंता नाही आम्ही उभयताच मर्जानुरूप वर्तणूक करून आहो प्रसंगी निदर्शनास येईल ती खरी वरकड वर्तमान यथास्थित आहे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना येसाजी सिंद्याकडील मजकूर देशातील फौजा राणोजी नाईक निंबाळकर वगैरे कोणी कोणी येणार हैदरखानाकडून बाजीराव बर्वे फौजसुधा येऊन मिलोन मोठा मनसबा बसवावा असी बातमी येते. काये घडेल ते + +

विसिंचा सविस्तर मजकूर.

लेखांक ३६ इ. स. १७७७–७८

चि. द. रु. नं. २१

श्री नकल

यादी जंजिरे सिंधुदुर्ग उर्फ मालवण देव सांवत व रामाजी अनंत जंजिरे मजकूर येथील राजकारण करून हुजूर येऊन विदित केले त्यास तुमचे हातून सरकारात जंजिरे मजकूरचे राजकारण होऊन सरकारचे लोक व निशाण वरते चढोन हस्तगत जाल्यावर तुमचे येणे प्रो चालवावयाचे सु॥ समान सबैन मया व अलफ

देव सांवत परोलकर यास रुा

(डावी बाजू)

१२०० तैनात

७०० तैनात खुद खासा

५०० पालखीचे

१२००

१००० इनाम गांव मालवण प्रांतीं

२२००

(उजवी बाजू)

५०० तैनात खासा दिवट्या आत्फागिऱ्या

१००० गांव इनाम कोंकणप्रांती.

१५००

लेखांक ३७ इ. स. १७७७–७८

चि. द. रु. नं. २१ नकल

श्री

यादी किले मालवण देव सांवत याणे राजकारण करून ठिकाण सरकारात हस्तगत जालियावर करार करून द्यावी सु॥ समान सबैन मया व अलफ

नख्त रु॥

३०००

हुजूरचे लोक व निशाण किल्यावर चढवून हस्तगत जाहलियानंतर येणे प्रो रु॥ दिल्हे जातील.

१०००० रोख तेथे पावतील
२०००० समस्त सरदार वगैरे
हुजूर आलियानंतर
३००००
येणे प्रो निभावणी केली जाईल
येणे प्रा.
इनाम गाव बा रु॥
३५००
तपसील
१००० स्वदेशी करार करून द्यावे
२५०० त्या देशी ठिकाण आलियावर
तेथील करार करून द्यावयाचे
३५००
साडेतीन हजार रुपयेयाचे गाव चालविले जातील येणे प्रो.
हवालदार व सरनोब्रत व समस्त सरदार मेटकरी व दर्यावर्दी व किल्यावरील नेहमी लोक त्यास खुद सेती लोक असतील त्याचा खुद शेतीचा धारा आगर वाडीचा वगैरे दस्त असेल तो तैनातेत कब्ज होईल त्यात मजुरा पडोन जाजती धारा निवेल तो वसूल घेतला जाईल खेरीज राजपत्री इनाम वगैरे पूर्वापार भोगवाटे चालत असतील त्याप्रमाणे चालविले जातील म्हणोन सनद १
सदरहू प्रमाणे
देव सांवत याचा भाऊ सरकारात चाकर ठेवून तैनात केली पाहिजे
७०० तैनात देखील पोरगा
आल्फागिऱ्याखेरीज
५०० पालखी
१२००
सदरहूप्रमाणे चालविले जाईल
कारकुनास आा येणे प्रमाणे किल्यावर आहेत त्यास येणें प्रो तैनात रु॥
३०० बापूजी अनंत यास फडणीसीचा दरक सांगावा तैनात
पोरगा खिजमतगार सारे.
३०० रामब्रा दलवी सांगावी खे॥ पोरगा आल्फागिऱ्या
६०० किता आसामी चालवणुकी
३०० लक्ष्मण अनंत
३०० विठल राम
६००

५०० रामाजी अनंत यासी तैनात खासा पोरगा व आत्फागिऱ्या
१७००
सत्राशे रु॥ याच्या अ॥ करार देतील.

लेखांक ३८ तारीख २८–४–१७७८

चि. द. रु. नं. २३

श्री शंभू प्र॥

राजश्री माधवराव पंडित
प्रधान यासी

श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गा आईसाहेब उपरी सरकार नि॥ व तुमचा तह हुजरून चिरंजीव राजश्री येशवंतराव शिंदे सरसुभेदार व तुम्हाकडील राजश्री महादजी शिंदे याचे विद्यमाने हुजूरचे राजश्री . सटवोजीराव भोसले व सिंदे नि॥ राजश्री बालाजी गोविंद व राणेखान याचे गुजारतीने जाहला त्याची यादी जाबता आलाहिदा करार करून येकवीस कलमाचा दिल्हा आहे त्याजप्रमाणे सरकारातून निभावणी होईल जाणिजे र॥ छ २९ माहे रबिलावल बहुत लिहिणे तरी सूज्ञ असा.

लेखन
सीमा

लेखांक ३९ तारीख २८–४–१७७८

चि. द. रु. नं. २३

श्री शंभू प्र॥

राजश्री माधवराव पंडित
प्रधान यासी

श्रीमन्महाराज मातुश्री दुर्गा आईसाहेब उपरी तालुके चिकोडी व तालुके मनोली दोनी तालुके कैलासवासी नारायेणराव पंडित याचे कारकीर्दीत सरकारात दिल्हे ते हाली राजश्री महादजी शिंदे याचे तहात तुम्हाकडे घ्यावे येविसी विनंती त्याजवरून तहाची यादी आलाहिदा करार करून दिल्ही आहे त्याजप्रमाणे तालुके चिकोडी व तालुके मनोली दोन्ही तालुके दरोबस्त तुम्हाकडे दिल्हे आसेत इतःपर सदरहू दोन्ही तालुकियासी उपसर्ग होणार नाही जाणिजे रवाना छ २९ माहे रबिलावल. बहुत लिहिण तरी सुज्ञ असा.

लेखन
सीमा

लेखांक ४०   तारीख २९-४-१७७८

श्री

चि. द. रु. नं. २३   छत्रपति

श्रीमंत राजश्री पंत
प्रधान स्वामी गोसावी यासी

शेवक सटवोजीराव भोसले कृतानेक दंडवत विनंती यैसीजे येथील क्षेम जाणून स्वकीये लेखन आज्ञा करीत असिले पाहिजे विशेष श्रीमंत माहाराज राजश्री स्वामी याणी राजश्री माहादजी शिंदे याचे विद्यमाने सिबंदीचे खर्चा ब।। ऐवज घ्यावयाचा ठराव केला त्याज पै।। रुपये ११००००० अकरा लक्ष रुपयाची हामी आम्ही घेतली त्यास मोर्चे उठल्यानंतर सा महिन्याने सदरहू अकरा लक्ष रुपये आम्ही तुम्हास देऊ बहुत काय लिहिणे लोभ असो द्यावा हे विनंती.

छ १ माहे रबिलाखर   वि।। भिकाजी राम
सन समान सबैन मया   कारकून दि।।
व अलफ   मशारनिल्हे.

लेखांक ४१   तारीख ६-५-१७७८

श्री रामचंद्र

चि. द. रु. नं. २३

राजश्री माहादजी सिंदे
गोसावी यासी

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्ने।। सुबराव कृष्ण अमात्य हुकुमतपन्हा आसीर्वाद विनंती उपरी करवीरास आपण मोर्चेबंदी केली सबब श्रीमंत माहाराज छत्रपति स्वामी याचा व राजश्री पंतप्रधान याचा तह आपले विद्यमाने ठरला त्यास माहाराजानी राजश्री येशवंतराऊ शिंदे सरसुभेदार याचे विद्यमाने राजश्री पंत प्रतिनिधि व राजश्री आपाजी शामराव व आम्ही त्रिवर्गाकडून फौजेचे खर्चाबद्दल रुपये ५००००० पांच लक्ष आपणास देविले त्याचा तपसील

२००००० राजमंडलची ठाणी आपणाकडे आहेत ती कराराचे यादी प्रमाणे आपण आमचे स्वाधीन करतील ते तेरखेपासून दोन महिन्याचे मुदतीने तुम्हास देऊ

१००००० येक लक्ष रुपये सामहिन्याचे मुदतीने ठाणी आमचे स्वाधीन जाले तेरखेपासून आम्ही देऊ

———
३०००००

येकूण तीन लक्ष रुपये सदरहूप्रमाणे आम्ही आपणास देऊ बाकी दोन लक्ष राहिले त्यास

आपण राजमंडलची गाव खेडी व ठाणीं याचा वसूल घेतला त्याची रुजुवात येकंदर यैवजाची तुम्हाकडील व आम्हाकडील कारकून भाहाली राहून रुजवता करितील त्यास रुजुवातीमुले वसूल दोन लक्षावर आपल्याकडे ज्याजती जाहला तरी सदरहू तीन लक्षात आपण आम्हास मजुरा द्यावा रुजुवातीमुले दोन लक्षात कमती आल्यास सदरहू कमतीचा यैवज आम्ही त्रिवर्ग आपणास देऊ सदरहू पांच लक्षाचे यैवजासी महाराजानी दोन लक्षाची वसुली ठाणी व गाव खेडी नेमून आमचे स्वाधीन केली आहेत कराराप्रमाणे महाराजानी ऐवजाची निभावणी आमची न केल्यास सिबंदी ठाण्याची व गाव खेड्याची माहाराजाचे सरकारातून नेमून देतील त्याप्रमाणे सिबंदीचा यैवज ठाण्याचा व गावखेड्याच्या यैवजी मजुरा घेऊन ठाणी व गावखेडी दोन लक्षाची तुमचे स्वाधीन आम्ही करून देऊ र।। छ ८ माहे रबिलाखर सु।। समान सबैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंती हू हू

मुद्रा

तारीख २६–१०–१७८०

लेखांक ४२

चि. द. रु. नं २३

श्री गणपती

पो छ २८ सवाल

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री

हरीपंत तात्या स्वामीचे सेवेसी

पौष्य परशराम रामचंद्र सं।। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ २७ शवाल जाणून स्वकीये कुशल लिहित जावे विशेष सटवोजी भोसला करवीराहून आला त्याची भेट मिरजेचे मुकामी जाली कराराच्या यादी जाल्या होत्या त्याप्रा। करार करून देत असता पथकात सरकारचा फडणीस नसावा म्हणोन निरोप घेऊन परांड्याकडे जातो याप्रा। म्हणू लागला त्याप्रा। निरोप देऊन रहदारीची दस्तके सिद्ध केली असता छ २५ माहे मजकुरी रात्रौ निरोप न घेता पळून गेला त्याची व चिरंजीव राजश्री जनार्दनपंत फौजसुधा आलत्याचे (आलते गांवाचे) मुकामीं होते त्याची गाठ वडगावचे नजीक पडून झटपट जाली श्री जोतीबाचे डोंगरापर्यंत पाठलाग केला तो त्याजकडील निशाण व नौबत व कोतल मिळून पांच हाती व दाहा पंधरा ऊंठ व दोन अडीचसे घोडे लष्करात चिरंजीवाकडे पाडाव आले भोसला मात्र सडा तीसपस्तीस स्वारानिसी पळून गेला याप्रमाणे श्रीमंताचे पुण्य-प्रतापेकडून बेइमानाचे पारिपत्य जाले. आपणास कळावे. बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

लेखांक ४३ तारीख २-९-१७८३

श्री

रु. नं. ६४५ कोंकण जमाव

यादी कलमे निा किले भूदरगड
सुा आर्बा समानीन मया व अलफ
(डावी बाजू)

नरसिंगराव सिंदे यास नेसरी सोडून द्यावयाचा करार पेशजी होता त्यास दिनमेक लागला सबब परभारें राजकारण करून ठाणे घेणे प्राप्त जाहले समई कैलासवासी अंताजीपंत आपा यासी पुसिले तेसमई त्याणीही वचन दिल्हे जे परस्परे नेसरीचा मजकूर उलगडून घेणे त्यास मधे पैका पडल त्याचा उलगडा करू याप्रमाणे वचन दिल्हे तेव्हा पैका कबूल करून ठाणे सोडवून घेतले त्याचे रुपयाची उगवणी व्हावी त्यासिवाय त्याचे पुत्रास त्याचे स्वरूपानसार येक आसामी करून द्यावी सिवाय त्याची खासगत इनाम खेडी नूल प्रांतातील चालत होती ती हाली येसाजी सिंदेचे कारकीर्दीस चालत नाही ती सोडवून द्यावी.
कलम १

पेशजी परशुराम रामचंद्र याणी ठराव करून नेसरी सोडून दिल्ही आहे त्याप्रो चालविले जाईल येणे प्रो करार करावे. दंगेमुळे प्रांा दुसाला उज्याड जाहाला त्यास सालमजकुरी कौल देऊन जुजवी लावणी केली आहे त्याप्रो चालवावे. कलम १

राजमंडळाचे तहाचे समई वाजवी मनास आणोन पेशजी चालत आले असेल त्याप्रमाणे चालविले जाईल येणे प्रो करार करावे.
कलम १

राजमंडलचे व आमचे वैमन आले तागाईत आजीपर्यंत जो वैवाट जाहला असेल व दंगेमुले येकाचे बरे वाईट येकत्यारीने कारभार केला आहे याविसीचा दोष मनास आणू नये याप्रमाणे चिकोडकरापासून वचन प्रमाण घेऊन कैलासवासी अंताजी शामराव याची शपथ घेतली आहे त्याचप्रो सरकारचे वचन असावे.
कलम १

किल्याचे घालमेलीत कारभार केला आहे त्यात वतना खेरीज कारभार केला असेल तो माफ असे येणे प्रमाणे करार करावे.

(उजवी बाजू)

बेजमीसिवाय आसाम्या आहेत त्याची बेजमी नूतन वतन व्हावे कलम १

सरकार कामाच्या आसाम्या पाहून जदीद करार करून देविल्या जातील येणे प्रो करार करावे. पुरातन सिवशाई तागायत श्रीमंत माहाराज मातुश्री जिजाबाईसाहेब याचे कारकीर्दीपर्यंत जो वैवाट किलेवरील व मुलकी ज्याप्रमाणे चालले आहे व गडकरी याची सेतेभाते कदीम डाग व नख्ती व सरंजाम जे चालत आला आहे त्याप्रो चालवावे. कलम १

पेशजी जिजाऊ साहेब याचे कारकीर्दीत चाल्त आले असेल त्याप्रो चालविले जाईल येणे प्रमाणे करार करावे. छ ४ सवाल भाद्रपद

को. घ. ४...३

माहे डिसेंबर इ. स. १७८४

लेखांक ४४

(पत्राचे आरंभींचा भाग त्रुटित)

चि. द. रु. नं. २१

(डावी बाजू)

टिपूची फौज वरती आहे ही सालसी माहालापासोन सरासरी दोन रोजाचे मजलीवर त्यास आणखी नामजाद शंभर माणूस सिंहगडकरी व पनास राऊत सरंजामी यैसे स्वामींनी रवाना केले तर दक्षणेच्या शत्रूची गडबड आहे तो सर्देवरून ठेवावयाचे उपयोगी पडतील येविसी आज्ञा जाली पाहिजे. कलम १

किले बावडा येथे चिटको माहादेव याचे व राजश्री पंतअमात्य याचे लागले आहे येकही प्रकार होत नाही त्याचे गाव व सरकारचे गाव हा खारेपाटण माहाल येक राजे याकडील व सुब्राव अमात्य याजकडील उपद्रव खालील गावास से दोनसे लोक पाठऊन कुले धरून नेतात दोन ब्राह्मण धरून नेले व घरे सर्वस्व लुटून नेली याजमुले तिकडील कुले या तालुक्याचे गावात येऊ लागली येऊन दिले तर ठीक दिसत नाही आली तर ते पाठलाग करणार याजकरिता चौक्याच्या बंदोबस्तास कमसेन्याचे प्रांतस्त लोक दोनसे पेसजी ठेविले होते त्या पौ। हलके सेन्याचे शंभर लोक चौक्याचे बंदोबस्तास राखोन सेवेसी दोन वेल विनंती लिहिली परंतु उतर आले नाही नामजादी लोक आहेतच परंतु चहुकडून सर्देचा तालुका यास्तव आणखी लोक प्रांतस्त शंभर लागो लागले छ २१ मोहरमी सुब्राव याची व गडकरी याची सालव्यास लडाई चांगलीच जाली कांहीं सुब्राव याजकडील जखमी जाले व किल्यावरील सूर्याजी कदम वगैरे पाच चार चांगलेच ठार पडिले व कांहीं जखमी जाले या प्रो दिवसे दिवस कलह वृध्दिगत आहे येणेकरून बावडा घाटास उपद्रव होतो म्हणून करवीरास वगैरे पत्रे पाठऊन घाट तूर्त चालता केला आहे परंतु फिरोन वारंवार उपद्रव होतच आहेत यैशास कोणताही येकप्रकार जाल्याने मुलुक आबादान व घाट सुरलीत चालेल व जागा जागा चौक्याही नसल्यास कामास येईल यैशास त्याचा कोणतो तरी येकप्रकार रीतीवर येई तोपावेतो शंभर माणूस कमसेन्याचे ठेविले आहेत हे असो द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. कलम १

(उजवी बाजू)

वाडीकर सांवत याजकडे बातमीस माणसे पा। होती त्यास जमाव केला तो तूर्त तसाच आहे वकील यास सरकारचे पत्र आले तें त्याजकडे पाठविले आहे प्रस्तुत त्याजकडील मनसबा स्थिर आहे अधिकोतर आढलल्यास सेवेसी लिहीन. कलम १

राजश्री आनंदराव धुलप याणी येथें राहून आरमाराची तयारी करावी म्हणून मी सेवेसी विनंती लिहिली होती त्साजवरून आज्ञापत्र आले परंतु आज्ञापत्राचे पूर्वीच ते निघोन सेवेसी गेले. कलम १

आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

लेखांक ४५ तारीख १८-१२-१७८५

श्री

चि. द रु. नं. २१

पौ छ २५ सफर

सु॥ सीत समानीन

मुकाम रेडा.

अपत्ये गंगाधराने चरणावर मस्तक ठेवून सा नमस्कार विज्ञापना ता॥ छ १५ सफर पावेतो स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष राघोजी जाधव याणे जलमार्गी चोरी करून सावकारी गलबतावरील जिनस लुटून मालवणास नेऊन ठेविला त्याविसी पेसजी सविस्तर विनंती लिहिली त्याजवरून स्वामींनी राजश्री परशुरामपंत भाऊ यास लेहून पनालेयास पत्रे पाठविली पनालेयाहून पत्रे व हुजरे मालवणास र॥ केले व येथून कारकून पनालेयास पाठविला होता तो येथे आल्यावर यैवजाकरिता मालवणास पाठविला तेथे उतर केले कीं येविसीचा मजकूर पनालियास लिहितो जाब येईल त्याप्रमाणे करू ऐसे उतर केले त्याजवरून कारकून माघारा आला व हुजरे पनालियास गेले याज वरून यैवज येता दिसत नाही फिरोन येथून पत्रे पाठविली आहेतच परंतु आणखी येकवेल स्वामीचे पत्र परशुरामपंत यास निक्षून असावे कीं ऐवज मालवणास राघोजीने आणिला असेल तो झाडून विजयदुर्गाकडे देवावा म्हणजे ते पनालियास लेहून निकड करितील स्वाम म्हणतील कीं मालवणकरी याचा ऐवज तालुके विजयदुर्गाकडे सालसी महालचे दीड तक्षिमेत आहे तो अटकाऊन घ्यावा त्यास सालसीत अवघा दोन हजार ऐवज मालवणकरी याचा आहे तो तीन वर्षे घेत गेले पाहिजे तेव्हा त्याजबराबर विरुद्ध करून तीन साला सिबंदी राखावी ऐसे घडेल यास्तव तपसिले विनंती लिहिली आहे तर त्याचे गाव वरघाटी आहेत त्या गावचा ऐवज राघोजीचे मुबदल्यास विजयदुर्गाकडे येई याअन्वये परशुरामपंत भाऊ यास पत्र द्यावयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

लेखांक ४६ तारीख १८-१२-१७८५

श्री

चि. द. रुमाल नं. २१

पौ छ २२ सफर

सन सीत समानीन

मार्गसीर्ष

अपत्ये गंगाधराने चरणावर मस्तक ठेवून सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १५ सफर पावेतो स्वामीचे कृपेकरून मु॥ जंजिरे विजयदुर्ग वर्तमान यथास्थित असे विशेष

(डावी बाजू)
तालुके मजकुराहून लोक सरंजाम घेऊन किले बहिरवगड येथे गेले आहेत यैसे पनालेयाहून तासगावी राजश्री परशुरामपंत भाऊ यास लिहिले त्याणी सेवेसी लिहिले त्यास चिरंजीव भास्करपंतापासी आज्ञा जाली कीं आज्ञेविना गोष्ट कसी केली म्हणोन त्याजवरोन चिरंजीवाने मला लिहिले. ऐशास बहिरवगडास मजकडोन माणूस गेलेच नाही कोणतीही गोष्ट आज्ञेसिवाय करावयाचीच नाही असे असोन स्वामीस लिहिले तर याची चौकसी चांगली जाली पाहिजे वरघांटे बेलगांवापासून आठ कोशावर शत्रूचे प्राबल्य यैकोन तालुके मजकुरी आपले हदेने खालीं पंचवीस माणूस चौकीस ठेविले आहे व घाटांनी दर चौकीस पांच आसामी प्रो चौक्या ठेऊन बंदोबस्त केला आहे बहिरवगडास लोक सरंजाम देऊन पाठविले असी गोष्ट लागू जाल्यास स्वाम आज्ञा करतील ते सिरसा आहे भान सांवत भीरवाडीकर याचा मूल केवल लहान नेहमी तो बालप्रवेसी येथे मजपासी असतो इतके करावया जोगा नाही असे वर्तमान आहे याजकरिता ये गोष्टीची चौकसी स्वामींनी केलीच पाहिजे. कलम १

राजश्री गणपतराव जिवाजी हे येथें येऊन आठ दिवस जाले आरमारचे तयारीचा बंदोबस्त करीत आहेत लौकरच तयार होऊन स्वारीस रवाना होईल येविसीचा मजकूर त्याणी सेवेसी लिहिल्यावरून विदित होईल कलम १

(उजवीकडे)
टिपूची फौज बेलगांव लगते शाहापूर वगैरे ठाणी घेतली जवलचे गावामध्यें आधीच वस्ती राहिली नव्हती त्याजवर शत्रूची फौज येऊन ठाणी बसली ऐसी बातमी सेवेसी श्रुत असेलच गोंवेकर यास तसदी करावयास फोंडा या प्रांताने खालीं उतरावयाचा मजकूर होता यास्तव गोवेकर याणी त्या घाटाचा बंदोबस्त केला व वाडीकर याणी घाट व पांजा जेथे होत्या तेथे चौक्या ठेवून बंदोबस्त केला आहे व तालुके मजकूर सरकारचा किला भगवंतगड याचे लगता पलिकडे भरतगड सांवत याजकडे आहे तेथे से दोनसे लोक वाडीहून येऊन बंदोबस्त करीत आहे. सेवेसी कलावे. कलम १

कलमे सेवेसी विदित होऊन आज्ञा होईल त्याप्रो करीन आज्ञेखेरीज वर्तणूक करणार नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्त.

लेखांक ४७ तारीख ८-३-१७८६
चि. द. रु. नं. २१

श्री गणराज

पौ छ २३ जौवल
सु॥ सीत समानीन
फालगुनमास

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक जिवाजी गोपाल कृतानेक सां। नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ जमादिलोवल पावेतो स्वामीचे कृपावलोकने करून मुकाम जंजिरे विजयदुर्ग सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष कुटनूरचे मुकामाहून स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते चवदा मजलानी राजापुरास दाखल जालो तेथोन मुकाम मारी आलो लोकाची नेमणूक जाहाली आहे त्यास अद्याप कोणत्याही तालुक्यापैकी पांच माणूस येऊन पोहचले नाही तालुकदारास ताकीद होऊन नेमणुके प्रो लोकाची रवानगी जलदीने करवावी म्हणोन राजश्री + अमृतराव यास पत्र लिहून पाठविले आहे स्वामीनी परभारे लोकाचे रवानगी विषई त्यास पत्र पाठऊन लोक लौकर येत ते आज्ञा केली पाहिजे लोकाचा जथ पडल्यावर पुढे वाडीचे सुमारे जाऊ व तव गोवेकर फिरंगी याचा जमाव घेऊन आज्ञेप्रमाणे पुढील पैरवी होईल करवीरकर माहाराज रांगण्या किल्याचे घेऱ्यात राहून सांवतासी कलह लाविला होता त्यामुले सांवत याचा मुलुक वाडी सुधा तमाम फुटोन सरकारच्या तालुकियात सालसी प्रांती रयत आली सांवताचा भ्रम बहुत ऐकण्यात होता परंतु पाहाता जमाव अवघा तीन चार हजार पर्यंत पायदल आहे खर्चाची वोढ बहुत करवीरकराची आंच संभालावयाचे सामर्थ्य नाही यास्तव सांवत उपराल्याविसी अ + + [जीज ?] होऊन चिरंजीव राजश्री गणपतराव यास पत्रे पाठवीत होते त्याजवरून याणी दोन गुराबा व पांच गलबते मालवणच्या सुमारे रवाना केली होती इतकियात आम्ही राजापुरास येऊन पोहचतो ही बातमी करवीरकरानी ऐकून सलाबत खाऊन घांट चढोन निघोन गेले मालवणही फुटले सांवताचा शह आम्ही आल्यामुले सहजात तुटला आम्ही जवल कांहीं जमाव जथला म्हणजे वाडी प्रांती जाऊ परंतु सांवतास खर्चास दिल्हयावाचून पोख्त जमाव त्याचा सामील होईल असे दिसत नाही तेथे गेल्यावर त्याचे बोलणे समजोन जसे सोईस पडेल तसे करितो र॥ आनंदराव धुलप याचे रवानगी विशई दोन पाल व गलबते सर्व सरंजाम भरोन लोकास वाटणी देऊन चिरंजीवानी सिद्धता केलीच होती आनंदराव यानी मुहूर्त पाहून प्रस्थान ठेविले आहे आम्ही आल्यावरही त्याचे मर्जी प्रमाणे मागतील ते देऊन लौकर निघावे म्हणतो.....................

कांही जमाव जथला म्हणजे पाच सात रोजानी वाडीस दाखल होतो सुवर्णदुर्गचे आरमार हुकमी असोन अद्यापि येऊन या आरमारास मिलाले नाही. + + [आंग] त्याचे आरमार येईल न ये पाहावे असो स्वामीचे पुण्ये करून आनकूलता होईल तैसा मनसब्यास रंग पडोन सेवकाचे हातोन सेवा घडोन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ४८ तारीख ६–७–१७८६

चि. द. रु. नं. २०

श्री गणराज

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नारोपंत नाना स्वामीचे सेवेसी

पो गणपतराव जिवाजी साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। छ ९ रमजान पावेतो वर्तमान येथास्थित जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपण बावडेकरी यांचे पारिपत्यास रवाना केलें त्यास हुजूरचे लोक व मसलती वगैरे च्यार साडेच्यार हजाराचा जमाव जाहाला या दहशतीमुळें बावडेकरी याजकडून तहाचे बोलण्यास राजश्री बालाजी माहादेव आले त्यांचें बोलणे दाहा पंदरा हजार रुपये खंडणी व पांच चार हजार नाश जाहला ते मिलोन वीस हजार रुपयें पर्यंत त्यास गावखेडी व दीढ तक्षीमेचा ऐवज दोन साले लाऊन देतो याप्रो घेऊन तह करावा याउपरी सरकार तालुकेयात दंगा करणार नाही याअन्वयें बोलणी पडली आहेत त्यास तह न करावा तरी बावडेकरी यांचे घेऱ्यांतील गावचा आकार दाहा बारा हजार रुपये पर्यंत व दीढ तक्षीम सरकार तालुयात आहे ते मिलोन वीस पंचवीस हजार रुपयाचा आकार होईल त्यात घेऱ्यांतील गाव प्रस्तुत बेचिराख वोसाड पडिलें दीड तक्षिमेचाही बहुतेक वसूल नेला याप्रो येथील विचार स्थल हस्तगत जाहल्यास मग चिंता नाही परंतु किला पाहाडी झाडी रान बिकट बाऱ्या कठीण आठाबारा बहुत करावा लागेल कोकणांतून हला करू गेल्यास बारीतून लोकाचा नाश फार होईल वरघाटीहून कांहीं लोकाचा भरणा करून चंद्रूकडोन शह बसोन जरबेत आल्यास येईल ठिकाण हस्तगत जाहाल्यास बरे नाहीतरी मग शह सोडिता येणार नाही शहास गुंतोन बसणे प्राप्त सिबंदी च्यार साडे-च्यार हजार आहे त्यांचे रोजमरे याचा आकार पाहता दरमाहा वीस हजार रुपये होतो त्यांचे ऐवजास ठिकाण नाही व या प्रांती महर्गता बहुत दाणागला वगैरे जिनस मिलत नाही आजपर्यंत दुसरेकडून दाणागला आणून चालविले पुढे मसलत वाढविल्यास दाणा-गला मिलणे कठीण माणसास पोटास तरी पाहिजे हे येक व सरकार तालुकेयात वसाहात होऊन लावणी होणार नाही तह केल्याने सरकारची जरब त्याजवर बसोन च्यार हरामखोर याजकडे जाऊन प्रांतात दरोडे घालून दंगा करितात ते आज हाती येऊन पुन्हा बावडेकरी याणी दंगा करू नये असे कागदोपत्री गुंतोन सरकारचा दाब त्याजवर बसतो येणे करून प्रांतातील वसाहत होऊन रयतेचा बच्याव होतो मसलत वाढ-विल्याने सरकार तालुकेयात वसाहत होऊन लावणी होत नाही सरकार नुकसानी बहुत होते हे दोन्ही विचार आपणास विदित व्हावें म्हणोन लिहिले आहे याचा विचार होऊन मसलत वाढऊन ठिकाणास बिलगावें असे जाहल्यास सिबंदीचे रोजमरे याचे ऐवजाची तर्तूद होऊन आज्ञा जाहाली पाहिजे त्याअन्वये करावयास येईल बहुत काय लिहिणे लोभ करावा ही विनंती.

लेखांक ४९ तारीख २४–४–१७८७.

चि. द. रुमाल नं. ६

श्री रामचंद्र

अपत्ये कृष्णराये सिर साष्टांग नमस्कार विज्ञापना उपरी येथील क्षेम ता। छ २

माहे रजब पर्यंत वडिलाचे आसीर्वादे करून वर्तमान येथास्थित आसे विशेष किल्ले बलवंतगड घेऊन आजी तीन वर्षे जाली अद्याप त्याची उस्तवारी न होय पांच सांतसे लोक किल्यावर इतलाख[1] आहेत त्यास आज आठ नऊ महिने कर्ज घेऊन रोजमुरा चालविला पुढ कर्जही न मिले यैसे जाले माहाराज किल्याची उस्तवारी करणार सरंजाम देवणार या आबावर लोकास धीर भरवसा देऊन आजपावेतो किल्लाचे संरक्षण केले रिपू सबल आहेत त्यामध्ये सांवता कडील येश संपादिले त्यावरून आहंता प्राप्त होऊन वरकड जे आहेत ते तृण तुच्छ यैसे चितात येऊन किल्ले बलवंतगड हस्तगत करावा या अर्थे छ २२ जमादिलाखरी हजार माणूस निवड करून सिड्या व तख्ते देऊन रवाना केले होते त्यास आमची ठिकाणची बातमी होती तेसमई रातोरात पांचसे माणूस किल्यास रवाना करून इशारतीची भांडी करविली स्वारी आंगरेयाकडील रायपाटणच्या खोरीत आली होती ते माघारे नामोहरम होऊन गेली वडिलाचे आशीर्वाद करून यैश्या गोष्टीने त्यास आम्ही बघत नाही आम्हाकडील स्वारी त्याचे पाठीवर होनगाव पर्यंत लागली होती परंतु गाठ पडली नाही मग किल्यास आली आंगरे याजकडील फिरस्ती स्वारी हमेशा किल्या भोवती फिरत आहे आम्ही ज्या प्रकारे किल्याची बंदोबस्ती करणे त्या प्रकारे केली परंतु आंगरे याणी निश्चय केला आहे जे खामखा दाहा पांच माणूस जाया करून किल्ला घ्यावा हा निजध्यास लागला आहे तरी याउपरी वडिली माहाराजाजवल अर्ज करून पोख्ती बेगमी व सरंजाम व हावलदार मागोन घेऊन सत्वर पाठऊन द्यावे नाहीतर किल्यास अपाय होईल मग माहाराज व वडील आम्हास शब्द लावितील तर आम्हावर बोल नाही बेगमी पोख्ती होऊन आली तर लोकाची समजाविसी करून किल्याची उस्तवारी करून कलेल त्याप्रकारे आंगरे यास टक्कर देऊ आयास येऊ हे गोष्टी होणार नाही. पत्राचे उतराचा मार्ग चातकन्याये लक्षीत आहो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

लेखांक ५० तारीख २-९-१७८८

श्री

छ २२ रा॥खर सन
समान समानीन

श्रीमंत राजश्री पंत प्र-
धान स्वामीचे शेवेसी

चि. द. रु. नं. २१

विनंती शेवक गंगाधर गोविंद मु॥ जंजिरे विजेदुर्ग चेरणावरी मस्तक ठेवून सिरसाष्टांग

१ नख्त पगार द्यावयास लागतो ती फौज.

नमस्कार विज्ञापना ता। छ २२ रा।लपावेतो स्वामीचे कृपावलोकने करून तालुके मजकूरचे व शेवकाचे वर्तमान यथास्थित आहे विशेष राजे करवीरकर याचे व सांवतवाडीकर याचे विरुध वाढले आहे राजे याची स्वारी पलिच्या हुडयावर राहून नरसिंगगड किल्ला सांवताचा यासी मोर्चे लागू केले हे वृत्त पेशजी सेवेसी लिहिले आहे त्यानंतर तो किला राजे यानी घेतला आणि पुढे त्याजकडील फौजा खाले सांवताच्या मुलकात उतरोन कुडाळच्या कोटावर हला करून कोट जेर केला सांव्रताचा जोरा कमी दिसतो त्यास आपल्या तालुकेयाच्या सरदेलगते सांवताचे दोन किले आहेत कदाचित सांवताने दोन्ही किले आटपून बंदोबस्त करा म्हणून लिहिलेयासी कसे करावे यास्तव विनंती लि।। आहे सांवताने लिहिल्यास दोन्ही किल्ले स्वाधीन करून पुस्तपना करावा किंवा न करावा याची आज्ञा जाहली पाहिजे सांवताचे व या तालुकेयाचे गांव लगते याजकरिता पेशजी दोनसे माणूस जदीद करून सर्देवर पाठविले होते आलीकडेसा आणिखी तीनसे पावतो ठेवून किलेकोटाचा बंदोबस्त केला आहे पुढे त्याजकडील रंग पाहून आणिखी ठेवावे लागल्यास ठेवितो दोहीकडेस कारकून बातमीस पाठविले आहेत बातमी येईल ते वरच्यावर लिहित जाईन सांवत याणे राजे करवीरकर याज कडील मजकूर हुजूर लिहोन पाठविलाच असेल त्याजवरून त्याजकडे हुजरून कोणी शाहाणा माणूस येऊन बंदोबस्त जाहला असेलच साल तिगस्ता असे जाहले त्याकाली वरघाटी गणेशपंत बेंहरे फौजसुधा होते त्याजमुले दोहीकडेस दब्राव होता तेच मध्यस्त होऊन सोईवर आणिले सालमा।री सरकार फौजा घाटमाथा नाहीत करवीरकराचे बल अधिक पडोन किले घेत गेल्याने पुढे अवघडात यास्तव सर्वार्थ ध्यानात यावयाकरिता विज्ञाप्ति लिहिली आहे बंदोबस्त होऊन येई ते करणार स्वाम सर्वज्ञ आहेत आपला तालुक्यातील बंदोबस्त करून हुशार आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

लेखांक ५१ तारीख १५-२-१७८८

श्री

चि. द. रु. नं. २३
पौ छ १७ जमोदिलोवल
सन समान समानीन

अपत्ये गंगाधराने चरणावर मस्तक ठेवून शिर सां। नमस्कार विज्ञापना ता। छ ७ जावल पावेतो मुकाम भगवतगड तालुके विजयेदुर्ग येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष किले सिदगडचे बंदोबस्ताचे विनंती पत्र पाठविले ते पावलेच असेल आलीकडील वर्तमान सांवताने फिर्गी यासी मुलूक देऊ करून मदत आणिला रेडी व वेंगुर्ले येथे करवीरकराकडील मोर्चेबंदी जाली होती तो रेडीवर अकस्मात च्यार तरांडी थोर व लहान असा फिर्गी आला तीन गुराब राज्याकडील मालवणच्या रेडीच्या बाऱ्यावर होत्या त्याजवर चालून घेतले गुराब खटार लहान त्याची त्याची मारामार होत

मालवणच्या खाडीत गुराब घातल्या त्या भयाने मोर्चे उठवून राजे घाटाच्या आगासी मैदानात मौजे नाद्रोसी गाव आहे तेथे मुकाम केला आहे फिर्गी मालवणच्या नस्तावर आहे च्यार थोर आठ लहान गलबतवजा आहेत याप्रो जाल्यावर राज्याकडील आज वर्तमान आले कीं मुंबईस इंग्रेजाकडे मदतीविसी व धारवाडास टिपूकडील कोणी आहे त्याजकडे पा पके वर्तमान आले म्हणजे लिहितो जर हैदरचे या प्रांती प्रवेश जाल्यास कठीण याजकरिता सेवेसी विदित व्हावे म्हणोन लिहिले आहे राज्याने कर्णे नाही परंतु शत्रूचा प्रवेश जाल्यास कठीण याज करिता नामजाद लोक पाठविले व राऊत मर्जीस आल्यास पा आज्ञा जाली पाहिजे याची समजूत व्हावी हेही केल्याने उतम स्वाम सर्वज्ञ तेथे सेवकाने काये ल्याहावे ? किले भरतगडी राज्यानी दिल्यास घेतो का देतील त्यास खर्च पाहिजे त्याच्याने खर्च करवत नाहीं खाली मुलुक उज्याड जाला तेंव्हा आज फौजेस भक्षावयासी नाही असे जाले माहागाई जाली च्यार दिवस लुटारू मिलाले लूट जाली गाव वस्ती राहिला नाही आता लुटारू राऊत जाऊ लागले टोपीकरासी गाठ घोड्याची किंमत कोण देतो असी गडबड फौजेत जाली झाडून लूट वरघाटी चढावावयासी बहुतेक चालले यामुले राजे यास अवघड पडले असे वाटते च्यार दिवसात कलेल मजकडे त्याचे कारभारी येणार असी बातमी आहे आज उद्या आल्यावर सेवेसी लिहीन मागाहून तपसीलवार विनंती लिहितो किल्याचे जाल्यास घेतो. नामजादी लोक व कांहीं थोडेसे राऊत पाठविले पाहिजेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

लेखांक ५२ तारीख २६–३–१७८८

चि. द. रुमाल नं. २५

पु।। तालुकेहाय वगैरे येथील पत्रे आली त्याचे जाब वगैरे सु।। समान समानीन माहे ज।।खर तालुके आरमार विजेदुर्ग

तुम्ही पत्रे पाठविली ती पावली श्रीमंत माहाराज करवीरकर याचे व सांवतवाडीकर याचे विरुध वाढोन सांवताची ठाणीं हेरे व नरसीगड व भरथगड ही घेतली तेसमई सिद्गडचे सूत्र आम्हाकडे आले त्यावरून सरकारचे निशाण पाठवून किल्याचा बंदोबस्त केला त्यास सिद्गड किल्ला हा तालुके विजयदुर्गचे सरदेवर आहे यास्तव लोक पाहिजेत त्यास नामजाद पाठवावे अगर जदीद ठेवावयाची आज्ञा असावी व माहाराजाकडील कोणी बोलावयासी येणार आहे व आरमार स्वारीस रवाना केले म्हणोन विस्तारे लिहिल ते कलल ऐशास सिद्गडावर निशाण चढवून बंदोबस्त केला व आरमार स्वारीस रवाना केले उतम आहे लोक तूर्त नामजाद पाठवावयाचे नाहीत व जदीदही ठेवू नयेत माहाराजाकडील बोलावयास येणार आहे तो आल्यावर बोलण्याचा मजकूर लिहून पाठवावा समजोन उत्तर जाईल त्याप्रो करावे उभयता कडून सरकार तालुकियास कोणेविसी उपद्रव होणार नाही म्हणोन गंगाधर गोविंद व्यास बालाजी जनार्दन याणी लिहिले असे छ १७ ज।।खर पत्र १

लेखांक ५३

इ. स. १७९०-९१

श्री गणपती

कर्नाटक जमाव

रु. नं. ३०६

यादी आपाजी शामजी व आबाजी अनंत येबिने शामजी रुद्र चिकोडीकर गोत्र गौतम सूत्र आस्विलायेन सु॥ इहिदे तिसैन मया व अलफ करवीरच्या बंदोबस्ता करिता सरकारातून राजश्री माहादाजी सिंदे यासी फौजसुधा सन समान सबैनात पाठविले तेसमई त्याजसमागमे आपाजी शामजी यासी रवाना केले तेव्हा त्याणी आपाजी शामजी यासी येसाजी सिंदे याजकडे सरकारचे जाबसालाकरिता करवीरास पाठविल्यावर माहादजी सिंदे यासी फौजसुधा तेंचसाली हुजूर आणविल्या नंतर करवीरचे मसलतीचे राजकारण तुम्हीच केले ऐसे येसाजी सिंदे याणी बोलून आपाजी शामजी याचे दोनी डोळे जबरदस्तीने काढून कैदेत ठेविले पुढे करवीरकर याचा तह जाहाल्यानंतर सोडून आणविले ऐसियासी त्याचे कुटुंबाचा योगक्षेम चालला पाहिजे व अंताजी शामजी यानी किले भूदरगड येथील राजकारण सरकार आज्ञा प्रमाणे करून कस्त मेहनत बहुत केली तो मा।रनिल्हे मृत्य पावले त्याचे चिरंजीव आबाजी अनंत याणी राजकारण प्रो किल्याची मसलत शेवटास नेऊन किला घेऊन सरकारात दिल्हा सा उभयेतास कुटुंबाचे योग्यक्षेमार्थ दर अडीच हजार प्रो पाच हजार रुपये कमाल आकाराचे दोन गाव इनाम नूतन सरकारातून द्यावयाचे ठरऊन छ २६ रमजान सन आर्बा समानीनात कराराची यादी करून दिल्ही आहे.

(ता. २५-८-१७८३)

लेखांक ५४

इ. स. १७९१-९२

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. १०१२

यादी सरकारचा ऐवज येणे तो सन इसने तिसैन अखेर बाकी ओढत आहे

रुो

१ स्वारी करवीर वि॥ माहादजी सिंदे श्रीमंत माहाराज राजश्री सिव छत्रपति स्वामी याजकडून खर्च घोडी व सिबंदीचे खंडणी बा॥ वगैरे ऐवज करार सन सबा सबैन छ २४ रोवल

(ता. ३-५-१७७७) रुपये

१५००००१ ऐन खंडणी सिबंदीचे वगैरे

४००००० पडल्या घोड्या बा॥ व जखमी वगैर

१००००० दरबार खर्च मारफत प्रतिनिधीची व अमात्य

२००००01

पौ वसूल सन इहिदे सभानीनात रुो ४००००१ बाकी सन तिसैन

रुो

५००००० राजश्री आबाजी कृष्ण प्रतिनिधि व सुब्राव कृष्ण आमात्य व आपाजी शामजी त्रिवर्गाची हमी दरम्याने ठेऊन दिल्ही बा। पत्र

११००००० सटवोजी भोसले याचे माहाराज छत्रपति स्वामी याणी सरकारचे नावाचे हमीपत्र देविले कीं राजश्री माहादजी सिंदे याचे वि॥ सिबंदीचा ऐवज खर्चा बा। ध्यावयाचा ठराव जाला त्याजपै॥ आकरा लक्षाची हमी आम्हाकडून देविली त्यास मोरचे उठल्यावर सहा महिन्यानी सदरहू अकरा लक्ष रुपये तुम्हास देऊ म्हणोन हमीपत्र.

१६०००००

लेखांक ५५ तारीख २४-३-१७९४

चि. द. रु. नं. २५

श्री

राजश्री येसाजी गोविंद स्वामी

गोसावी यासी

शेवक परशराम रामचंद्र नमस्कार विनंती उपरी तुम्ही पत्रे पाठविली ती पावली लोकाचा शेरा पाच रुपयाचा आहे त्यास कांही जाजती जाले पाहिजे म्हणोन व धोंडजीच्या दंग्याचा व कमाविसदाराच्या वर्तणुकेचा मजकूर लिहिला तो कलला यैसीयास शेरा जाजती करावयाचा नाही करवीरचा तह जाला लवकरच तिकडील बंदोबस्तास फौज पुढे रवाना करितो तुम्ही सिबंदी खर्च वाढवू नये फौज पोहचल्यावर बंदोबस्त साराच होईल वरचेवर बातमी लिहित जाणे जाणिजे छ २१ साबान सु॥ आर्बा तिसैन मया व अलफ बहुत काये लिहिणे हे विनंती.

लेखांक ५६ माहे मे इ. स. १७९८

श्री

चि. द. रु. नं. ८

सेवेसी गणेश महादेव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना काल सिरगावकर याचे पत्र आले कीं श्रीमंत महाराज करवीरकर वर्षप्रतिपदेस डेरेदाखल जाहले रोख श्रीमंत महाराज सातारकर याजकडे फौजसुधा जावे ऐसी वदंता आहे व सातारियाहून राजश्रीची पत्रे गेली कीं किला आमचे स्वाधीन आहे व फौजही कांहीं लगामी आहे आपण यावे म्हणून पत्र सातारियाहून गेले सा बाहेर डेरे दिल्हे ऐसी बातमी आली जाणोन सेवेसी निवेदन व्हावे यदर्थ विनंती सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ५७ तारीख १२-६-१७९९

श्री

चि. द. रु. नं. २३

पौ छ २२ मोहरम

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णाजी थोरात कृतानेक दंडवत विज्ञापना ता छ ७ मोहरम पावेतो स्वामीच्या कृपेवरून सेवकाचे वर्तमान क्षेम असे यानंतर इकडील मजकूर या प्रांती कर वीरवासी महाराजाचा दंगा पांच च्यार वर्षे आम्हावरी पडला आहे सेवकाकडील तालुक्याचे सात आठ गाव आटकाविले ते सोडीत नाहीत ठाणेवरीही दोनच्यार वेला येऊन गुदरली परंतु स्वामीच्या पुण्यप्रतापे पराभव होऊन गेले सांप्रत मातुश्री बाई सिंदी याची स्वारी या प्रांती जाली यामुले कांहीं प्रांताची बाकी राहिली नाही राजमंडलचा सिलसिला अद्यापि तुटेना सेवकास नेहमी सिबंदी बालगून स्वामीच्या सेवेसी या तोंडावरी कसाला सोसित राहणे पडले आहे स्वामीच्या सेवेसी येविसीच्या बंदोबस्ताविसी पाच चार विनंतीपत्रेही गेली परंतु अद्यापि बंदोबस्त करावयाची आज्ञा होत नाही आसे नसावे सिरालेत राजमंडलचे ठाणे पडून सिलसिला वाढल्यामुळे वारंवार आम्हावरीही येऊन गुदरत आहे हे सविस्तर ध्यानास येऊन बंदोबस्त सत्वर होय तो अर्थ जाला पाहिजे सेवकास स्वामीच्या पाया खेरीज दुसरे दैवत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ५८ तारीख १५-१२-१७९९

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ३२१ (अ)

समस्त राजकार्य धुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री रत्नाकर पंडित राजाज्ञा यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे शेवेसी आपण विनंती पत्रे छ ९ रोज व छ १२ रजेब्रची पाठविली ती हुजूर प्रा होऊन लेखनार्थ श्रवण जाहला राजश्री शहाजी पांढरे समसेरबहादर यासी आज्ञा जाहलेस पतकसुधा हुजूर पाठवितो पतकसहीत आंपणाजवल ठेऊन ध्यावे इलाचबेगाविसीचा मार हुजरे आले आहेत विनंती करितील त्यावरून निवेदन होईल म्हणून विनंती पत्री लिहिले ते निवेदन जाहले सिवापुरावरी मुकाम करून कितूरकराडील बोलणे तूर्त पटेल ते घेतो म्हणोन विनंती यैसीयासी आपले विचार पटेल तसे खंबीरपणे बोलणे पटवून घेउन त्याजकडून फेर न पडता निभावणीत येई ते करावे राजश्री सुबराव घाटगे सर्ज्याराव यासी व राजश्री सटवोजीराव यादव यासी आज्ञा होऊन पो म्हणोन विनंती लिहिले त्यावरून उभयतास आपणाकडे जाणेची आज्ञा जाहली

आहे मागाहून येऊन पोहचतील राजश्री लक्ष्मण हरि यासी किले वलभगडास रवाना केलेपावेतो येक दो रोजात पाठवून देतो किलेवरी लोक आहेत व लस्करात आहेत त्याची काजकामे जाहली आहेत व नेबाद[१] देणे येविसीची आज्ञा माारनिलेस व्हावी किल्ले वरील लोक काढून आणावे किंवा ठेवावे याची आज्ञा व्हावी म्हणोन विनंती लि।। त्यास पेशजी पासून लोक आहेत तेच असावे त्याणी माारनिलेचे विचारे स्वामीसेवा करावी त्याचे नेबद व बक्षिसा द्याव्या याप्रमाणे लक्ष्मण हरि यासी आज्ञापत्र सादर जाहाले आहे तरी लोक आहेत तेच किले मजकुरी असो द्यावे परशुराम रामचंद्र याचे पुत्राकडील व इंग्रज व फरासी याजकडील बातमी बर्तमान विनंती पत्र लि।। ते श्रवणात आले कितूरकर व तचूरकर याचा जाबसाल आपले विचारे काय ठरतो तो ठरऊन विनंती पत्री लिहावे मनोलीचा माार व मुरगुडचे ठाणेचा माार व राजश्री रघुनाथराव सिंदे नि।। हुजूर पागा याणी विनंती लिहिली आहे म्हणोन विनंती त्यास राजश्री रायाजी जाधव जप्तनमुलक यासी माारनिलेचे पत्र आले त्यावरून निवेदन जाहले या माराचे आलाहिदा खास दस्तुरचे आज्ञापत्र सादर जाहले आहे त्या प्रमाणे करवावे कितूरकर देसाई यासी जमावसुधा येत असलेस आणवावे जाणिजे सु।। मयातैन व अलफ रवाना छ १७ रजब बहुत लिहिणे तरी सुज्ञ असा.

विलस — पौ छ २३ रजब मे।। अहिरकोंड

तिलेख

नावधि — सन मयातेन व अलफ.

लेखांक ५९ — तारीख ३१–१२–१७९९

चि. द. रु. नं. २३

श्री

राजश्री नागोपंत स्वामीचे शेवेसी विनंती उपरी तुम्ही छ २० रजबची दोन पत्रे पाठविली ती पावली लिहिला मजकूर सविस्तर कलला करवीरवासी महाराजाच्या बंदोबस्तास सरकारातून राजेश्री गणपतराव पानसी याजसमागमे फौज व तोफखाना व सिंदे याजकडील पलटणे तोफासुदा व फौज रवाना जाहली आहे ते राजश्री रामचंद्र पंत आपा यास सामील होतील तुम्हास महाराजाची कृत सर्व माहीत आहे याजकरिता राजश्री रामचंद्रपंत आपा व गणपतराव पानसी तुमास जमावसुधा बोलाऊ पाठवितील याअन्वये तुम्ही तेथे जाऊन उभयेतास माहितगारी वरचेवर सांगोन राजेश्रीचा बंदोबस्त उतमप्रकारे होई ते करावे बातमी वरचेवर लिहीत जावी तुमचे गांवखेडयास वगैरे उपद्रव लागो नये.

---

१ खर्चासाठीं आगाऊ दिलेली रक्कम.

म्हणोन उभयेतास पत्रे लिहून पाठविली आहेत वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षितबावा-कडील मजकूर लिहिला तो कलमबंदी लावून आज्ञा येईल ती वरचेवर लिहीत जावे. रवाना छ ४ साबान हे विनंती.

(नाना फडणवीस याचे पत्राची नकलाची नकल.)

लेखांक ६०

तारीख ४-४-१८०१

चि. द. रू. नं. २५

श्री

नकल

चिरंजीव राजमान्य राजश्री सखाराम घाटगे सर्ज्यारांव यासी आज्ञा केली यैसीजे तुम्ही करवीरचे मुकामी स्वामीसंनिध विनंती केली कीं परगणे कागल देहाये सुधा आम्हाकडे पुरातन पासो चालत असता हाली दंग्यामुळे कांहीं देहाये चालत नाहीत याजकरिता नूतन सनदा भोगवटियास देऊन चालविले पाहिजे म्हणून विदित केले त्याजवरून मनास आणिता तुम्ही स्वामीचे राज्याचे उपयोगी राजश्री रामचंद्र परशुराम याणी राजश्री पंतप्रधान व सिंदे याजकडोन व आपली फौज आणून राज्य आपतरीस आणिले करवीरास शह देऊन राज्याचा उच्छेद करविणे लक्ष धरून राज्याचा नाश केला तेसमई तुम्ही राज्योपयोगी स्वामीशेवा खातरजमायुग्त करून दाखविली त्यावरून स्वामी तुम्हावर कृपालु होऊन पुरातन तुमच्या वडिलार्जित पादशाई सनदा आहेत त्याबरहुकूम साडे येकूणहातर देहायेसुधा दरोबस्त इनाम कुलबाब कुलकानु हलीपटी जलतरू पाषाणनिधीनिक्षेपसहित खेरीज हकदार व इनामदार करून दिल्हे असेत गाव बि तपसील.

किता	गाव	किता	गाव
१३	कसबा कागल	१२	कसबे वालवे
१४	कसबे मुरगुड	१२	कसबे चिखली
९	कसबे दिगरज	७॥	कसबे मांजरी
		२	किता

यो देहे साडेयेकूणहातर इनाम करार करून दिल्हा आसे तरी तुम्ही व तुमचे पुत्रपुत्रादी वंशपंरपरेने चिरकाल पुरातन भोगवटेप्रा॥ आनभऊन राज्यासी येकनिष्टपणे असोन सुखरूप राहाणें जाणीजे सु॥ इहिदे मयातेन व अलफ रवाना छ १९ माहे जिल्काद बहुत काय लिहिणे मोर्तब असे.

लेखांक ६१ इ. स. १८०२

श्री

कर्नाटक जमाव

रु. नं. ३५०/७

आज्ञा केली यैसीजे तुम्ही स्वामीचे सेवेशी विंनती केली कीं पूर्वी कुडालच्या कोटास सांवतानी ठाणे घालोन जेर जाले याजकरिता कृष्णाजी परशराम प्रतिनिधि यासी कैलासवासी संभाजी महाराज याणी कोट मा।रचा उपराला करून गनीमास नतीजा पोहच-वावा या बदल रवाना केले त्याजवरून किले पनालीचे मुकामी स्वार ठेऊन खाली उतरले आणि तुमचे पणजे सिदोजी निंबालकर देसाई प्रां मजकूर यास स्वामी कार्या-बदल जमावसहित यावे याविसी पत्रे व भैरू वाकाजी यास पाठविले त्याजवरून तुमचे पणजे जमावानसी मसलतीच्या कार्यास आंगीजी करून आले आणि प्रति-निधि याजपासी बोलिले जे आपण वतनदार वतन समधे आपले परगणेत सेवा करावी मसलतीचा धंदा म्हणजे सरदार लोकाचा आहे त्याहीमधे माहाराज शाहू राजे याज-कडील फौजा पनाले प्रांती आल्या यामुले आपले परगणेत धामधुमी फारच जाहाली आशा प्रसंगात यावे तेव्हा आपले समागमे वतन समधे जमाव आहे मसलतीस तेव्हा जमावाची बेजमी करावी लागती मागे धामधूम जाहाली याजमुले लोकानी आड घातला आणि स्वामीनीही मसलतीस यावे याची आज्ञा केली त्यावरून स्वामीकार्याचे जरूर जाणोन आपण वतनदार मसलतीस यावे लोकाची बेजमी व्हावी त्यास आपणामधे ताकत नाही तरी स्वामीनी मेहरवान होऊन नूतन इनाम गाव करून दिल्हीयाने त्या आश्रयावर कर्जवाम करून लोकाची बेजमी करून देऊन मसलतीस जमावानिसी येऊन शेवा करू म्हणोन प्रतिनिधि यास बोलिले याणी मनास आणिता कुडालचा कोट बहुत जेर जाहाला आणि मागे शाहू माहाराज याजकडील फौजचा शह जबरदस्त पडला लोक कोणी पाठ न घेता आज्ञासमई तुमचे पणजे आंगीजी करून जमावानिसी येऊन सामील जाहाले बहुत निष्ठेने सेवा केली याजबा। पूर्वी प्रतिनिधिपंत याणी तुमचे पणजे यासी इनामगाव करून दिल्हे बि।।

---×---

१ सिदोजीराव नाइक आपा निपाणीकर देसाई याणी परशराम पंत भाऊ याजकडे नोकरीस होता त्यानंतर सन १२१० फसलीत दौलतराव सिंदे याजकडील कंपू दोन हजार फौज कोल्हापूरकर माहाराजानी आपले कार्यानिमित्य आणविले होते त्याणी आपले कार्य जाहाल सबब त्यास रजा दिल्यानंतर निपाणीकर याणी आपल्याकडून सखाराम घाटगे यास पाठऊन त्याचे विद्यमाने सदरी दोन कंपूस आणऊन त्यास दरमहा देऊन कर्नाटक प्रांतात त्याचे आश्रेने ठाणी घातले ता।

....

येणे प्रो वगैर प्रांत कांही श्रीमंताचे मुलक व कांही कोलापूर राजाच मुलक ठाणा घालून अलिकडे इंग्रज बहादूर याचे आसरा करून श्रीमंत बाजीराव साहेब यास भेटून वस्त्रें घेऊन निपाणीस आला तेव्हा करवीरकर माहाराजाचे व याचे लढाई लागली स्वार व पायेदल बहुतेक जमा करून माहाराजाबरोबर लढाई केली तेव्हा निपाणीकरास यश आले नंतर पुणेस जाऊन श्रीमंत याची भेट घेऊन हे मजकूर सर्व अर्ज करून घेतलेवरी सरकारातून जरीपटका दिल्हा ते घेऊन निपाणीस आला.

लेखांक ६२ तारीख १७–४–१८०४

रु. नं. १६८

पे. रोजकीर्द

आर्बा मय्यातैन छ ६ मोहरम

खासुदगी

बा। देणे श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति संस्थान करवीर याची कन्या सौभाग्यवती बयाबाई याचे लग्न जाहाले सबब बाळोजी थोरात वगैरे हुजरे आसामी पांच वस्त्रे घेऊन आले त्यास निरोपसमई इनाम रुपये १००

लेखांक ६३ तारीख २१–४–१८०७

बाजीराव रघुनाथ प्रधान खासगी जमाखर्च सबा मयातैन माहे सफर ५०० करवीरकर राजाचे वकिलास निरोप दिनकरपंतास दिल्हा सबब छ १२ सफर

लेखांक ६४ इ. स. १८२०

कर्नाटक जमाव

रु. नं. १२०० (अ)

श्री

राजश्री स्वरूपजी

खीरसागर हुजरे वकील

गोसावी यासी

श्नो। रत्नाकरपंत राजाज्ञा आसीर्वाद उपरी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते हुजूर प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला त्याजउपर जे आज्ञापत्र सादर जाहले आहे त्यावरून कलेल कागल प्रांताच्या सोडचिठ्याचा मजकूर सखाराम घाटगे सर्ज्यारावं यास सनदा आहेत म्हणोन लि॥ त्यास जशा निपाणकर याणी सनदा हिमतबहादरीच्या लेहून

घेतल्या त्याप्रोच सिंद्याची फौज व फलटणे करवीरास घेऊन आले याजमुले सनदा व तालुका जसा मागितला त्याजप्रो दिल्हा हुजूर चाकरी करावी याप्रो करार असता निपाणीकर याजकडे निघोन गेले याजमुले तालुकेच्या सोडचिठ्या कागल तालुका घोरीवाड जिलेसुधा हिंदुराव याजकडे जी आहेत ती झाडेनिसी सोडचिठ्या घेऊन पाठवून देणे राजश्री येशवंतराव घाटगे सर्ज्याराव हे मुख्य वडील त्याजकडे पेशजी चालत होत याची गावगनासुधा माहितगिरी तुम्हास आहे हिंदु रुजू राव विश्वासराव वाटगे सर्ज्याराव व राजश्री हिंदुराव घाटगे सर्ज्याराव वजारतमाब याची चौघा भावा प्रो गाव व कमते नेमून दिल्ही आहेत ती खावून पेशजी वैवाटी प्रो सेवा करावी याप्रो नि (अपूर्ण)

(पुढील बंद गहाळ.)

लेखांक ६५ तारीख १६–९–१८१२

श्री

चि. द. रु. नं. ४४

यादी करारनामा दरम्यान श्रीमंत माहाराज राजश्री सिवछत्रपति व सरकार दौलतमदार कुंपणी सरकार कुंपणी इंग्रज बहादूर विद्यमान सरदार अलिशान हनराबल मोट इष्टवरीट आलफिष्टीण बहादूर आज तर्फ सरकार कुंपणी इंग्रज बहादूर मुकाम पुणे यासी लिहून दिल्हा करारनामा सु।। सलास आशर मयातैन व अलफ छ ९ माहे रमजान सन इसवी १८१२ छ माहे शपटेंबर

१ कैलासवासी तीर्थस्वरूप शाहू महाराज याचा तह आहे त्याप्रो कुंपणी बहादुरानी प्रांत सोडून द्यावा त्यापैकी तूर्त चिकोडी व मनोली व रायबाग तालुके व नूल प्रांत वगैरे ठाणी निपाणीसुधा हुजूरचे स्वाधीन कराबी नंतर तहाची चौकसी करून जो मुलुक बाकी तहापैकी राहिला असेल तो द्यावा. कलम.

१ निपाणकर याजकडे हुजूरचा नागावा हाती व तोफा व नगारा व निशाण वगैरे काये असेल तो हुजूरचा हुजूर यावा व राजश्री राजजी भोसले व सिरदालगिर गोसावी व नरहर बापोजी देशपांडे याचे पुत्र वगैरे मनुष्ये पाडाव करून त्यानी नेली आहेत ती व गावगनाच्या वोली व खते घेतली आहेत ती यैसी येकंदर सोडून द्यावी तैसेच हुजूरचे सनदापत्रे व यादी जबरीने त्याने करून घेतली आहेत ती सनदापत्रे व यादी माघारी हुजूर यावी. कलम.

१ राज्यातील इनामदार व जाहागीरदार व देशमुख व देशक व जमीदार व सरमजामी याची तगिरी व बहाली पारपत्य होणे ते हुजूरने होईल. त्यातील कोणी कुंपणी बहादुराकडे फिर्याद आले असता त्यासी कुंपणी बहादुरानी आश्रा न देता हुजूरची कुमक करीत जावी. कलम.

१ राज्यावर जो शत्रू येईल त्याचे पारपत्य तुमचे तुम्ही करावे. खर्च मागू नये. कलम.

१ मालवनचा किला हुजूरने द्यावयाचा करार होऊन यादीवर सही व मोर्तब जालेवर सरकारचे तालुके बरहक न्यायाने सोडून देतो यैस खचित वचन सरूपजी खीरसागर हुजरे यास इनाम पुरस्कार हातावर हात मारिला त्यापैकी तूर्त तालुक्याच्या सोडचिठ्या पाठऊन द्याव्या चिकोडी व मनोली व रायबाग तालुके व नूल प्रांत वगैरे ठाणी निपाणी-सुधा सोडचिठ्या पाठऊन द्याव्या आणि ठाणी घालून द्यावी वरकड बोलणी राजश्री पंत-धान याजकडून होणयाची त्यासी वाजवीचे रीतीने करून देऊ याप्रो लिहिले त्याची पंचाईत होणे तरी कैलासवासी तीर्थरूप शाहू महाराज यांचा तह आहे त्याप्रो कुंपणी बहादुरानी करून द्यावे कुंपणी बहादुराचे विश्वासावर जंजिरे समंधी यादी पाठविली त्यासी तालुकाखेरीज करून करार करून दिल्हा असे.

१ कुंपणी बहादुरानी हुजूर विनंती केली त्याजवरून हुजूरून मालवनचा किला तालुका-खेरीज करून कुंपणी बहादुरास दिल्हा असे तरी तूर्त चिकोडी व मनोली व रायेबाग तालुके व नूल प्रांत वगैरे ठाणी निपाणीसुधा हुजूर स्वाधीन करून मालवणचा किला कुंपणी बहादुरानी आपले जिमा करून घ्यावा यानंतर कैलासवासी तीर्थस्वरूप शाहू महाराज यांचे तहाप्रो वाजबी प्रांत सोडून द्यावा मालवण येथे बुर्जावरील तोफा व जकीऱ्याच्या सिलकी तोफा वगैरे जिकीरा काढून घेऊन किला तुमचे स्वाधीन होईल किल्यात श्री देवाची पूजाउर्जा करिता ब्राम्हण व मनुष्ये आत आहेत त्यासी राहू देऊन पूजाउर्जा करावी इकडून कोणी देवाची पूजाउर्जा घेऊन येतील त्यासी किल्यात जाऊ येऊ द्यावे जे समई हुजूरची स्वारी किल्यात श्री देवाचे दर्शनास होईल त्यावक्ती किल्यात जाऊ येऊ द्यावे. कलम.

१ हुजूरची आरमारे ठेवणेस व वखार घालण्यास जागा कुंपणी बहादुरानी नेमून द्यावी. कलम.

१ हरवक्त हुजूरची काजकामे जी पडतील ती कुंपणी बहादूर याणी करून देत जावी. कलम.

१ हुजूरची व कुंपणी बहादुराची दोस्ती चालत आली आहे त्या प्रो दिवसानी दिवस अधीक दोस्ती चालोन राज्याची ज्याजती व्हावी. कलम.

१ हुजूरचा प्रांत हुपरी व आकेवाट व कटकोलसुधा वगैरे ठाणी निपाणकर याजकडे आहेत ती झाडेनसी सोडून द्यावी येविसी सोडचिठ्या पाठवून द्याव्या.

१ मालवण येथे देव ब्राह्मण भट वगैरे इनामदार त्यासी हुजरून इनामती ठिकाणी करून दिल्हा आहे व किल्याकडून नगदी व गला व धमदा चालतव आहे त्यासी राज-पत्राप्रो ज्याचे त्याजकडे चालवावे. कलम.

१ पुणेचे मुकामी आजम मिस्तर ज्योजफ दिसोज व अजम मिस्तर लइस फर्थदज त्याजकडोन पलटणे आणावयासाठी यैवज दिल्हा तो यैवज व दस्तायैवजी कागदपत्रे व यादी येणे प्रो माघारी हुजूर यावी. कलम.

१ बावडा व विशालगड याचे तालुक्यास घाटाखालीं राजश्री पंतप्रधान याचे मामलेदाराकडून उपद्रव जाला आहे तो मना होऊन उपद्रव होऊ नये. कलम.

१ मालवण येथे हुजूरची आरमारे व गलबते व तरांडी व साहुकारी तरांडी व हुजूरून सावकारास तरांडी दिल्ही आहेत त्यासी कौल माफीचा चालवून सावकारी आमदोरफ करू द्यावी. कलम.

१४

एकूण कलमे चवदा रास रुजू

लेखांक ६६

चि. द. रु. नं. २०

श्री

विज्ञापना यैसीजे नारायणराव घोरपडे सेनापति याचे लक्ष स्वामीच्या चरणासी आहे आजच त्याचे चिरंजीवाचे तैनातेचा ठराव जाहल्यास लौकिकात तेथील दरबारी एक-प्रकार दिसतो मोघम जाबसाल असलियास ते महत्व साहेबाचे आसीरवादाचे आहे राणोजी घोरपडे येथे आल्यावर आपण खावंद आणि वडील आहेत चरणाजवल से ा करावी ही इच्छा स्वामीचे मर्जीस येईल तसा बंदोबस्त करून देवावा ते तेथे आल्यावर जो स्वाम आख घालतील तो मान्य आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ६७

चि. द. रु. नं. २९

श्री

यादी आजमास

पनाली रु॥

१५९००	देवस्थानाकडे	
	७५००	श्री करवीरनिवासनीकडे
	५९००	श्री केदारलिंग
	५००	श्री मारुती संवस्थान सातारड
	५००	श्री गणपती मटी कासीकरबावा याजकडे
	१५००	श्री दत्तात्रय वि॥ परडकर मौजे हिंगणगाव

२०७००	श्री स्वामी जगद्‌गुरु संस्थान		
२५५००	श्री बाबामाहराज याजकडे		
१९१००	धर्मादाय		
		१०००	मौनीबावा पाटगांवकर
४०००	फकिराकडे		
३०२१००	नेहमी सरंजामाकडे		
		२२००	देवघराकडे
		७५०००	पंत अमात्य बावडा वगैरे
		७५०००	पंत प्रतिनिधि विशालगड वगैरे
		७५०००	सेनापति
		१०००	पंत सुमंत डबीर
		२५००	मंत्री
		३०००	पारसनीस
		२९००	पंडितराव
		८००	मजुमदार
		५००	वाकेनीस
		१५५००	उपाध्यबावा
		४०००	सचीवनंदगांवकर
		८००	न्यायाधीश
		७०००	येशवंतराव घोरपडे अमिर उल उमराव दतवाड
		७००	मानाजी घोरपडे अमिर उमराव मौजे माधले
		१४००	भाऊ जोसीराव
१३३५००	वतनी सरंजाम		
		५०००	रायबागकर देसाई मौजे घोसरवाड
		४००००	नंदीकर व निपाणकर देसाई
		८०००	तेरणीकर देसाई
		५०००	भडगांवकर देसाई
		२००००	वंटमुरीकर देसाई
		२५००	हुकेरीकर देशपांडे
		२५००	मुतनाल्कर देशपांडे
		४०००	इंगलीकर देशपांडे
		१५००	हुकेरीकर नाडगौडे
		४५०००	नेरलीकर

४१८८०० तैनाते ऐवजी सरंजाम

८०००० घाटगे कागलकर याजकडे कागल तालुका समस्त घाटगे

८०००० नाना पाटणकर

५४००० चव्हाण हिमतबहादर

६५०० हैबतराव गायकवाड

३७००० येशवंतराव घाटगे सरज्याराव

२००० विश्वासराव घाटगे सरजेराव

३०००० खरडेकर

८००० दानोली

१२००० वलभगड हली निपाणकराकडे

१०००० कोथली

३००००

८००० नागपुरकर

६००० सेनाखासगल

५००० खोची

१००० नंदवाड

५७०० भगवंतराव भोपे

२१००० रघुनाथराव माने

६२०० सरूपजी भोसले

१२०० तिटवे

५००० दानवड हली निपाणीकराकडे

४००० च्यावरे शहाजी भोसले

१५०० रामचंद्रराव भोसले मिनचे

३००० बाबूराव भोसले

१५०० आरे

१५०० सावरडे

१००० नाथाजी घाटगे कावणे

२००० राजजी भोसले सडोली

१२०० बाबाजी यादव मौजे कोलव

१००० गोविंदराव पाटणकर सिरोली

८०० नागोजीराव पाटणकर

३००० आनंदराव घाटगे जुंजारराव

५००	राघोबा निंबाल्कर कलनकवडी
३०००	रघुनाथराव जप्तनमुलुक
७००	सुभानजी जाधव मौजे सुल
७००	येशवंतराव विचारे कोगील
२०००	बागल हली निपाणकराकडे येलगुद
३०००	नाना सिंदे नेसरीकर
१८१४००	पागेकडे सरंजाम
१०४०००	म॥ हुजूर पागा वि॥ रायाजी जाधव
२५०००	दिवाण पागा
९०००	राजाज्ञा हुजूर पागा २
२००००	भवानी शंकर पागा
८०००	जोसीराव पागा
२०००	जिलीब पागा
५०००	वडगाव पागा
८४००	बालकृष्ण पागा

३२७००० हुजूर मामलती

८००००	वि॥ पंत राजाज्ञा
१२०००	किले प्रसिधगड
२००००	जंजिरा सिंधुदुर्ग
२५०००	किले पनाला वि॥ आबाजी राम
१५०००	किले सामानगड वि॥ खानवीलकर

लेखांक ६८

तारीख १८–७–१८१९

कर्नाटक जमाव

श्री

रु. नं. २८४

यादी कैफियत येमाजी दिनकर मुतालिक देसाई परगणे हुकेरी व नाडगोडा मामले मुर्तजाबाद याणी कैफयत लिहून दिल्ही सन १२२९ फसली सुा आशरीन मयातेन व अलफ शके १७४१ प्रमाथिनाम संवत्सरे छ २४ माहे रमजान उर्फ आषाढ वद्य ११ येकादसी परगणे मिरज येथील नाडगोंडीचे वतन आमचे याजविसीची कैफयत कलमे बि तपसील

१ प्राचीन विज्यापूर पादशाई याचे कालकीर्दीत चिंतो चिमणाजी मनसूबदार

विज्यापुरात होते त्यास पादशाई याणी परगणे मिरज येतील नाडगोंडीचे वतन करार करून दिल्हे ते कांहीं दिवस त्याणी आनभविले. कलम

....

१ पुढे श्रीमन्महाराज छत्रपति करवीरकर याजकडील पिराजी घोरपडे सेनापति हे लाखो फौजबंदी करून तमाम मुलुकाची वहिवाट कांहीं दिवस त्याणी केली ते समई पिराजी घोरपडे सेनापति याणी चौकसी करून परगणे मिरज येथील नाडगोंडीच्या सनदा आम्हास करून दिल्हया त्या सनदा हाली हजर आहेत सनदा होऊन अजमासे शंभर वर्षे जाहली. कलम.

सदरहू नाडगौडींचे वतन प्रकरणी इनाम पत्रे व सनदा वगैरे आम्हाजवळ हाजर आहेत बि तपशील

१ पिराजी घोरपडे सेनापति याची इनाम पत्रे वगैरे आहेत सन आशरीन मया व आल्फ. इ. स. १७१९--२०

१ श्रीमन्माहाराज मातुश्री आईसाहेब यांची इनामपत्रे वगैरे सन इसने खमसेन मया व अलफ सन ११६१ फसली प्रजोपतीनाम संवत्सरे. (इ. स. १७५१--५२)

लेखांक ६९ तारीख २४–८–१८१९

श्री

चि. द. रु. नं. ४४

तारीख २४ माहे आगस्ट सन १८१९ इसवी मुताबीक छ. १ जिल्काद हजरत सरदार अलिशान खुदावंद न्यामत फैयाजजमा खुदाये गान वाब साहेब दाम येकबाल हू आर्जदास्त फिद्वी बाजी राम साठे बंददाये तसलीमात कुरनिशात बजपायेर देमारुज मेरसानद अके येथील खेरसला ता छ १६ अगोष्ट सन १८१९ इसवी मुताबीक छ २६ सेवाल सन १२३४ हिजरी रोज बुधवार पावेतो साहेबाचे मेहेरबानगीने मु॥ कोलापूर अखबार देवडी श्रीमन्महाराज छेत्रपति करवीरकर

१ प्रातःकाली उठोन मुखमार्जन करून दरबारात आले तमाम कारभारी व हालकरे व मानकरी वगैरे हाजर होऊन सलाम मुजरा जाहला बाअदज श्नानास उठले श्नानसंध्या देवपूजा पुराणश्रवण नित्यनेमसारून स्वारीची तयारी करऊन घोड्यावर स्वार होऊन हामरहा लोक बरोबर घेऊन निघाले ते श्री महालक्ष्मीचे दर्शन घेऊन तसेच श्री बाबा माहाराज याचे वाड्यात जाऊन त्याचे पाई पडोन तसेच राजश्री भाऊ माहाराज याचे वाड्यात गेले आणि चार घटका खलबत करून स्वारी वाड्यात आली आणि कचेरीस बसोन स्वारीचे लोकाचा मुजरा घेऊन उठले तों जेवणाची ताटे जाली तेथे जाऊन घर-मंडळीसुधा जेवण करून विडे घेऊन निद्रेस गेले ते तिसरे प्रहरी उठोन कागदपत्रावरी

निशान मोर्तब करावयाची ती करून बसले होते तो राजश्री भाऊ माहाराज आले त्यासी आई माहाराज व माहाराज सुधा खलबत केले राजश्री नारायणराव प्रकरणी चार पाच घटका तो दिवटी सलामाची वेल जाली दिवटी सलाम घेऊन संध्येस उठले संध्या करून जेवण करून विडे घेऊन दीड प्रहर रात्रीचे सुमारें माहालात निद्रेस गेले. कलम.

१ राजश्री नारायेणराव रत्नाकर हे पेशजी बेलगावचे मुकामी साहेबाकडे आले होते तेथून साहेबाचा निरोप घेऊन निघाले ते किल्यास न जाता परभारे येथे येऊन आपले वाडयात राहिले माहाराजाच्या भेटी जाहाल्या किला भूदरगड हा श्री भाऊ माहाराज याचे वि॥ सरकारात स्वाधीन करून दिल्हे सरकारचे कारकून व हुजरे किलेस जाऊन ठाणे घातले मा॥रनिल्हेचा बंदोबस्ताचा ठराव अद्यापि जाहाला नाही बोलण लागले आहे इतके दिवस विलंब लागावयासी कारणतरी माहाराज याची राणी वारली व बहिणी उभयेता बाळाबाई निंबाळकर व आऊबाई घाटगे यासी देवआज्ञा जाहाली याजमुळे विलंब लागला आता बोलणे लागले आहे काये ठरेल ते मागाहून लिहून कलवीन. कलम

१ राजश्री राणोजीराव सेनापति यासी माहाराजानी वस्त्रे देऊन दोन वर्षे जाहाली त्यास त्याजवर सरकारची इतराजी होऊन राजश्री संतोजीराव घोरपडे यासी सेनापतीची वस्त्रे दिल्ही ठाणी घालावयासी सरकारची पागा वगैरे लोक देऊन पाठविणार आहेत. कलम

१ कैलासवासी प्रीतीराव चवाण याचे पुत्र दोघे वडील उदाजीराव धाकटे नारायणराव त्यास नारायेणराव यासी देवआज्ञा जाहली तेव्हा उदाजीराव याचे चिरंजीव मधले राजश्री जोत्याजीराव यासी कैलासवासी प्रीतीराव याणीच बाईचे वोट्यांत दत्तक घातला आणि वाटणीही आपण असतानाच करून दिल्ही पुढे त्यास देवआज्ञा जाहाली तेव्हा राजश्री उदाजीराव याणी जोत्याजीराव यासी कांहीं न देता सर्व आपणच अनभविले याजमुळे सरकारानी मनासी आणून मा॥रनिल्हेस सांगितले कीं निमे विभाग याचा यास द्यावा यैस सांगितल परंतु त्याणी यैकील नाही त्याजमुळे जोत्याजीराव चवाण ममलकतमदार हे साहेबाकडे फिर्यादीस पुणेस आले तेव्हा श्री भाऊ माहाराज याणी पुणेचे मुकामी तुमचा बंदोबस्त करून देतो म्हणोन सरकारचे आज्ञापत्र व आपले पत्र पा त्यास आणविले आहे मागाहून काये होईल ते लि॥ पाठवीन.

यादी कलमे

१ छत्रपति याचे पुढील कर्तव्यतेचा मजकूर साहेबाकडे आले असता आम्ही पाच स्वारानिसी त्याचे भेटीस जाऊ आणि राज्य तुमच आहे पाहिजे तैस करावे यैस बोलू म्हणतात व आमचे राज्याचे मुखत्यार आम्ही पाहिजे तस करू साहेबानी आम्हास विच्यारावयाचे कारण काय ? आसही बोलतात व साहेब यैकत नाहीत यैस जाहल्यास लढाईही करू यैसही बोलतात यातून कोणत होईल ते मतलब समजत नाही.

१ किल्यानजीक पेठेतील घरे पाडावयास हुकूम जाहला आहे अद्यापि पाडावयास लागले नाहीत.

१ श्री स्वामी जगद्‌गुरू याणी सरकारास मेजवानी केली कंटी व सिरपेच व पोशाख दिल्हा भोजनपात्रे येक हाजार पर्येत जाहाली सरकारानी येकगाव स्वामीस इनाम करून दिल्हा मौजे यरकट यमकणमुरडी ता (लु) केतील द्यावे यैस ठरल होत परंतु मौज मासतोली हा गाव दिल्हा

१ नाना पाटणकर यास सरकारानी श्री स्वामी यासी दरम्याने देऊन मारनिल्हेकडे साठ हजार रुपये करारा पो येणे ते मागू नयेत आणि पाटणकर याणी आपले घर व जिनगी व चीजबस्त काये असल ती न घेता सरकारचे स्वाधीन करोन निघोन जाव याप्रा स्वामीचे विद्यमाने ठरोन स्वामी याची स्वारी त्याचे घरास येऊन त्यास आपले मटात घेऊन गेले नंतर पाटणकर याचे घरातील जिनगी सरकारानी जाऊन पाहिली त्यात कांहीं जीव नाहीं सबब त्याजला परवानगी खेरीज जाऊ देऊ नये म्हणोन स्वामीकडे सांगून पाठविले त्यावर हाली सरलस्करच्या सनदा व सिकेकटार देऊन जाव यैस बोलतात पाटणकर याच म्हण श्री स्वामीसी जे आम्हास वचेन देऊन बाहेर आणल्या प्रा पार करून द्यावे असी जिकर पडली आहे पुढे होईल ते लिहू.

१ स्वार व पायेदल वरचेवर येईल ते चोरून चाकरीस ठेवितात फौजेचा भरणा स्वार पायेदल येकंदर साहा हजार पर्यंत होईल.

१ किलेच सारे वेसीस नवे लोक आरब व सिदी ठेऊन बंदोबस्त केला आहे.

१ वरुणतीर्थवेसीस बुरुजाचा कोपरा पडला होता तो नीट करीत आहेत व सफली खबीर बांधीत आहेत.

तारीख २१-१-१८२१

लेखांक ७०

चि. द. रु. नं. ४४

श्री

तारीख ११ जानेवारी सन १८२१
यादी कलमबंदी इलाखा धारवाड

१ नीलकंटराव सिंदे हुजूरचे इलाखेतील सरंजामी याणी हुजूर रुजू होऊन हुजूरचे आज्ञे प्रमाणे वर्तणूक करीत जावी हे न करिता शेनाखासकील याचे गाव मारिले तली वगैरे ठेऊन खटले करितात त्याचा बंदोबस्त हुजरून होत आहे त्यास मशारनिलेस हुजूर रुजू होऊन हुजूरचे आज्ञे प्रा वर्तणूक करणेविसी ताकीद व्हावी. कलम.

१ दतवाडकर घोरपडे हे हुजूरचे सरंजामी त्यास हुजूर बोलाविले असतां येत नाहीत त्यास जेसमई बोलावणे येईल तेवेलेस हुजूर येत जावे. येविसी ताकीद व्हावी. कलम.

१ शेनाखासकील हे हुजूरचे इलाखेतील हे हुजूर इतल्याने न राहता त्याचें जावाई हिंदुराव घाटगे सर्ज्याराव सिंदेचे लष्करात आहेत त्याजकडे इतला करून तिकडील पत्रे आपणाकडे आणिली आहेत म्हणोन हुजूर समजण्यात आले त्यास हे हुजूरचे सेवक हुजूर इतल्याने असावे हे न करिता हिंदुराव घाटगे याची इतला राखतात त्यास तिकडील पत्रे आणिली आहेत ती आपणाकडे येतीलच त्यास निक्षून ताकीद व्हावी जे तुम्ही हुजूरचे पदरचे सेवक हुजूरचे इतल्याने वागत असावे हिंदुराव यासी स्नेह करणेचे कारण नाही याप्रमाणे शेनाखासकील यासी ताकीद व्हावी. कलम.

१ हुजूरचे इलाखेतील नोकरलोक सरंजामी व जमीदार वगैरे कोणी फिर्यादीस आलेस त्यास हुजूरचा जाबसाल हुजूर जाऊन बोलत जावा याप्रमाणे ताकरीन साहेब याजकडून ताकीद व्हावी. कलम.

लेखांक ७१ पौ तारीख २७-२-१८२१.

चि. द. रु. नं. ४४

श्री

हाजरत सरदार आलिशान खुदावंद
न्यामत च्यापलेनसाहेब बहादूर
दामयेकबाल हू

अर्जदास्त फिदवी बाजीराम साठे पौ तारीख २७ माहे फेब्रुवारी सन १८२१ इसवी

१ माहाराज छत्रपति माहाराज याजकडील मोकदमा तरी धाकटे माहाराज यास वाठारकर निंबालकर याची कन्या दिल्ही होती ती वारली सबब दुसरी राजश्री दवलतराव मोहिते सांवताचे वाडीकर याची कन्या आणोन मार्गशीर्षमासी लग्न जाहाले.

१ पेशजी कैलासवासी सिवाजी माहाराज याचे नावेचे सिके चालत होते ते हाली बाद करून संभाजी माहाराज याचे नांवचे नवे सिके तयार केले आणि पंत अमात्य व प्रतिनिधि यासी बोलावणेकरिता आज्ञापत्रे गेली होती परंतु ते काही आले नाहीत त्यास त्याचे मुतालिक येथे आहेत त्यास व सेनापति पंडितराव सचीव वगैरे अष्टप्रधान यास बोलाऊन आणून सिके पूजेनाचा मुहूर्त माघ वद्य त्रितिया दोनप्रहर सोला घटकेचा मुहूर्त निश्चये केला आणि वाड्यात सदरेस बैठका घातल्या व सिलेदार मानकरी वगैरे लोक यासी बोलाऊन आणोन कचेरी केली बादज माहाराजाची स्वारी चवदा घटका दिवसास तख्तावर बसोन पुण्यावचेन केलेनंतर सोला घटकेच्या मुहूर्तास सिके पूजन करून कागदावर सिके ठोकले उपरांत सर्वत्रास विडे व साखरा वाटल्या श्री स्वामी जेगद्गुरु यासीही बोलाऊन नेऊन पुजेन जालेनंतर शालजोडी व धोत्रजोडा व दक्षणा अशी श्री स्वामीस दिल्हे वगैरे सिष्ट ब्राह्मण यासीही सेला पागोटी व दक्षणा दिल्ही प्रहरभर नाच होत होता नंतर पाचपंचवीस तोफाचे बार केले व स्वाराकडून करोली करविली.

गावातून घरोघर गुढ्या उभ्या केल्या बादज तसेच पालखीत स्वार होऊन समारंभाने स्वारी निघाली ती श्री पंचगंगेवर कैलासवासी माहाराज याची छेत्री आहे तिचे दर्शन घेऊन बादज स्वारी वाड्यांत गेली आणि जेवण केले. कलम.

१ राजश्री येशवंतराव घाटगे कागलकर हे हालीच माहाराजाचे मेवणे त्यास बहीण दिल्ही होती ती गुदस्ता वारली तेव्हा त्याजकडे सरंजाम पनास साठ हजाराचा होता तो आजपर्यंत चालिला हाली सरकारांत त्याजकडील सरंजामा पैा पांच गाव च्यालीस हाजाराचे घेतले. साहेबास माल्रम होणेकरिता कलमी केले आहे. कलम..

लेखांक ७२

तारीख १६-७-१८२१

निवडलेले कागद रु. नं. ४४

ता। १६ जुलई कोलापुर अकबारीचा मजकूर सोमवार

तिसरे प्रहरी माहाराज आंबाईचे चौकात बसले होते तो राजश्री सयाजी बाजी मोहिते यासी कैलासवासी महाराज याणी मौजे मरली गाव सरंजाम दिला होता तो गाव बाबाजी मंत्री याचा पेशजी होता हाली थोरले माहाराजे याणी नवा सिका आपले नांवचा करून तख्तावर बसले तेव्हा मंत्री याणी अर्ज केला कीं आमचा गाव मोहिते यासी दिल्हा आहे तो माघारा घ्यावा तेव्हा तो गाव मोहिते याजकडून गाव जप्त करून सरकारात ठेविला तेव्हा मोहिते माहाराजास रोज येऊन अर्ज करीत होते परंतु माहाराज याणी यैकिले न यैकिले करीत होते तेव्हा छ मजकुरी मोहिते रोज येतात तसेच येऊन अर्ज करीत होते तो माहाराजानी उत्तर केले कीं साफ गाव द्यावयाचा नाही यैसे बोलता असता मोहिते याणी जबरी केली तेव्हा भुजंगराव भो व आबाजी भोसले हे उभये जवल होते त्याचे लोकाचा दंगा होऊन तरवारा वाडल्या ते वेलेस मोहिते याणी भाऊबंद व लेक पाच सहा आसामी होते त्यानी तरवारा वाडल्या तेव्हा भुजंगराव व आबा भो दोघास ठार मारिले नंतर मोहिते याणी आनखी पिस्तुलाचा बार माहाराजावर टाकिला तो गोली डाव्या कुसीतून लागोन उजवे कुसीतून पार जाहली याजवर माहाराजास मोहिते घेऊन बसले उपरांत राजश्री भाऊ माहाराज वगैर कारभारी वाड्यात येऊ लागले तो मोहिते कोणास आत येईनात यैसे जाहाल्यावर मोहिते यासी कारभारी याणी बोलणे लाविले कीं तुमचे बोलणे काये आहे तेव्हा मोहिते मा।र बोल्लिले कीं आमचे तलबेचा फडशा करून द्यावा तेव्हा भाऊ माहाराज याणी पुसिले कीं किती तलब यावयाची तेव्हा मोहिते याणी सांगितले की येकूण तीस हजार रुपये द्यावे आणि जिवास दरम्याने द्यावा म्हणजे माहाराजास सोडून आम्ही भाहीर जाऊ पल्यास पोहचाऊन द्यावे येणे प्रा। करार करून नंतर माहाराजास सोडून भाऊ माहाराज याचे वाड्यास गेले तेथे च्यार घटका बसोन नंतर त्यासी बसावयासी घोडी देऊन बरोबर सदासिव अनंत नि।। श्री यासी देऊन

मंगलवार वेसीने भाहीर काढून दिल्हे नंतर श्री वाड्यात आले तो माहाराजाचा वाखा फार आहे वाचले असता पुनर्जन्म तेव्हा प्रहर रात्रीस माहाराजाचा काल जाहाला. आतां त्याचे कनिष्ट बंधू वीस बेवीस वर्षांचे आहेत व मुख्यासहि चिरंजीव दो सवा दो वर्षांचे आहेत. मग गादीवर कोणाची योजना होते न कले.

(इंग्रजी सही)

लेखांक ७३ तारीख २०–७–१८२१

निवडलेले कागद रु. नं. ४४

ता। २० जुलई मु।। छ १९ सवाल शुक्रवार

१ माहाराजाकडील मजकूर तरी राजश्री सयाजी बाजी मोहिते याणी माहाराजावर गर्दी केली तेसमई दरम्यान आरब देऊन त्यास रात्रौ बाहीर काढून दिल्हे म्हणोन पेशजी आर्जी मारुज केली होती त्यास मोहिते म।।र मोजे येलगुड म्हणोन गाव माहाराजांकडील येथून पांच कोस आहे तेथे जाऊन पोहचले उपरांत इकडे माहाराजानी व आई माहाराजानी बेत केला कीं माहाराजावर गर्दी करून गेले त्या पेक्षा त्याचे पारिपत्य केले पाहिजे म्हणोन सेंदीडसें स्वार व से दोनसे पायदल येणे प्रो रवाना केले ते ठाणे म।।री मोहिते याची गाठ घातली तेव्हा त्याजकडे राजश्री सदाशिव अनंत कारकून निस्बत श्री भाऊ माहाराज हे मोहिते याजकडे बोलीस होते त्याजवर गर्दी करू लागले तेसमई बाहेरील लोकानी तहकुबी केली आणि जंग्यातून दोघे मोहिते बसले होते त्यास बंदुकीचे गोलीने मारिले तेव्हा दोन आ। ठार जाहले उपरांत सदोबा आबा तेथून निघोन बाहीर आपले जमातीत येऊन दाखल जाहलेनंतर मोहिते यासी समजले कीं आम्हावर गर्दी करावयासी आले आहेत यैसे समजले आणि च्यार आसामी हात्यारबंद होते त्याणी बाहेरले लोकावर चालून घेतले तेव्हा गोलीने मारून साहा आसाम्याची डोचकी कापून येथे माहाराजाकडे आणिली आणि साहा वेसीस साहा बांधिली मोहिते याचे घर येथे होते त्याजवर जप्ती बसवून झाडानसी चीजबष्त सरकारात आणिली त्याचे बाइकोपोर होती त्यास जीवे मारून किल्याच्या वाटेस बांधून टाकिले येणे प्रमाणे त्याचे घरचे बाइकास व मुलास जीवे मारून पारपत्य केले.

१ माहाराजाचे दहन जाहाले ती राख चार गोण्या भरून श्री कृष्णाबाईत राख टाकणेस बरोबर ब्राह्मण देऊन रवाना केली आहे येथेही तीर्थ आहे त्यात थोडी घातली आहे.

(इंग्रजी सही.)

लेखांक ७४ तारीख २-१-१८२२

श्री

निवडलेले कागद रु. नं. ४४

हाजारत सरदार आलिशान खुदावंत
न्यामत फैयाजमंद खुदाये गां
च्यापलेनसाहेब बहादूर दाम यक-
बाल हूं

अर्जदास्त चिंतो बाजी साठे छ २ माहे जानेवारी सन १८२२ इसवी मु॥ कोलापुर अखबार देवडी श्रीमन् महाराज छत्रपति करवीरकर

१ कैलासवासी माहाराज याचे चिरंजीव बालासाहेब माहाराज यासी गोवर आला होता आणि पोटातील रोग होऊन बहुत हैराण होते त्यास काल तीन प्रहर रात्री देवाज्ञा जाली..

१ राजश्री नारायेणराव घोरपडे इचलकरंजीकर याचा देशमुखीचा अमल माहाराजाचे प्रांतात आहे त्यास मौजे तारदाल येथे इचलकरंजीकर याणी आपले देशमुखीचे यैवजा-करिता रोखा करून लोक पाठविले तेव्हा गावकर याणी रोखा माघारे देऊन लोकास गावात घेतले नाही सा मशारनिल्हेनी पांचपंचवीस स्वार व लोक पाठऊन गावकर धरून नेऊ लागले ते समई गोलागोली होऊन दोन च्यार आसामी ठार व दाहा पाच जखमी दोनीकडील जाले हे वर्तमान तारदालकर याणी माहाराजास कलविले त्याजवरुन माहा-राजाची मर्जी रुष्ट होऊन देशमुखीचा अमल जप्त केला व मौजे ठाकवड येथे पागा व लोक पाठवून त्याचे खेडीयातून कहीकबड वरचेवर आणीत आहेत हाली पेंढारी शे दोनशे आणिले आहेत स्वारी जावी असा बेत माहाराजाचे चितात आहे श्री भाऊ माहाराज याजकडेही पत्रे पाठविली आहेत तिकडून जाणेविसी पत्रे आलेस जाणार म्हणोन समजणेत आले घोरपडे म॥रनिलेकडील कारकून येथे बोलण्यास आले आहेत परंतु बोलण नमोदात येत नाही. कलम

१ तमाम सरंजामी पंत अमात्य व प्रतिनिधि सेनाखासकील व सेनापति याजला आज्ञापत्रे पाठविली आहेत कीं तुम्ही जमाव करून करवीरचे मु॥ निघोन यावे म्हणोन पुढे काये मोकदमा होईल तो मारूज करितो. कलम

येणे प्रा॰ मजकूर समजणेत आला तो साहेबास मारुज व्हाव म्हणोन मारुज केला आहे हे अर्जदास्त.

लेखांक ७५ तारीख २९-४-१८२२

निवडलेले कागद रु. नं. ४४

श्री

च्यापलन साहेब
अर्जदास्त चिंतो बाजी साठे

येथील खैरसला ता। छ २९ माहे इप्रेल सन १८२२ इसवी मु॥ छ ७ माहे साबान सन १२३७ हिजरी रोज सोमवार

मु॥ कोलापुर आखबार देवडी श्रीमन माहाराज छेत्रपति करवीरकर १ हाली नाथाजी म्हणोन खिजमतगार माहाराजा जवल पेश जाहला आहे याजमुले थोर माणसास जवल बसण्यास बहुत कठीण वाटते याचे कारण म्हटले तरी माहाराज खिजमतगार याचे समागमे करून वागतात त्या अर्थी आमचे स्वरूप जवल बसणेचे नाही हा आंदेशा मनात वागून कोणीयेक जवल बसत नाहीत याप्रमाणे सांप्रत दिसण्यात येत आहे आणि कोणास काये बोलावे हा विचार नाही श्री भाऊ महाराज याचे सांगणे यैकून घेतात त्याप्रो वागून माहालचा व किल्याचा व चोराचा वगैरे दौलतीचा बंदोबस्त व्हावा तो विच्यार कांहीं येक नाही बेजवा होऊन मनास येईल त्याप्रो आई महाराज याचे सुधा न ऐकिता वर्तणूक होत आहे नाथवा व महाराज यामध्यें कांहीं मर्यादा नाही येके ठिकाणी बसणे उठणे निजणे होते याप्रो वागणूक आठ च्यार दिवस चालली आहे ती हाली ऐकिण्यात आली त्याजवरून जाहीर होणेकरिता कलमी केले आहे नाथवा खिजमतगार व मदार माहात व रामसिंग राजपूत व गोपाळा सेवडया ब्राम्हणाचा मूल हे सांगतील त्या प्रो वागू लागले स॥ आई महाराज याणी सदरी लिहिलेल्या आसाम्या च्यार याजला बाहीर घालविले होते त्यास आणखी माहाराज याणी आणिले त्यात नाथवा सांगेल त्याप्रो वागतात त्यापुढे कोणाचे सांगणे ऐकत नाहीत मदार महात व नाथवास सोन्याचे कडे दिल्हे आहे असे सरकारचे काम कोणते केले हे दिसण्यात व ऐकण्यात आले नाही. कलम.

लेखांक ७६ ११-५-१८२२

निवडलेले कागद रु. नं. ४४

छ ११ माहे मे सन १८२२ इसवी मु॥ कोल्हापूर

१ माहाराज याजकडील मोकदमा तर प्रातःकाली श्नानसंध्या करून स्वारीची तयारी करून श्री आंबाबाईचे दर्शन घेऊन माघारी वाडयात येऊन ताटास गेले ताटे होऊन नंतर स्वारी शिकारीस जाणार म्हणोन राजश्री नारायेणराव राजाज्ञा व नारायणराव पाटणकर सरलष्कर व दिनकरराव गायकवाड वगैरे मानकरी व सिलेदार पागा व पाईचे लोक मिलोन सात आठशे जमावानिशी मौजे इंगली व मौजे कडोली येथील रानात जावयाची अवई घालोन बाहेर निगाले उपरांत मागाहून दोन तोफा सरंजाम दारू गोल्यासुधा गेल्या हे येकवल्यावर जासूद बातमी करिता रवाना केला तो बरोबर होता तेव्हा राजश्री नारायेणराव व्यंकटेश घोरपडे इचलकरंजीकर याजकडील गांव मौजे रांगोलीस गेले नंतर तेथे साहा सात आसामी सिपाई लोक होते त्याणी बुरुजावरून दोन च्यार बार केले तेसमई एक जखमी जाला नंतर माहाराजाकडील लोकानी हाला करुन गावात

सिरोन लुटालुट गावाची केली सिपाई याज पौ दोन ठार जाहले बाकी च्यार आसामी पळाले माहाराजानी लुटू नये म्हणोन ताकीद केली असता ऐकेनात हे पाहून माहाराजानी तरवार घेऊन पाच सहा आसामी माणसे आपल्याकडीस तोडिली तेव्हा लुटीचा बंदोबस्त करून माधवराव निंबालकर यास स्वार दोनशे व पायदल दोन तीनशे या प्रमाणे ठेऊन स्वारी माघारी हुपरीस येऊन मुकाम केला मौजे मजकुरी ठाणे बसलेवर पुढे इचलकरंजी पर्यंत फौज माहाराजाकडील गेली तेव्हा त्याजकडून पुढे तोंडावर स्वार पंचवीस व पायदल शे दीडशेपर्यंत आले तेसमई त्याची व याची लढाई होऊन कांहीं जखमी व कांहीं ठार जाले त्यात कारकून आला त्यास भाल्याची जखम लागोन जेर जाला वाचावयाचा नाही याजप्रमाणे जाले नंतर मौजे लाट येथे ठाणे घालावे याप्रमाणे बेत होता तो आई माहाराज व श्री भाऊ माहाराज याणी पत्रे लिहिली कीं तुम्ही पुढे लाटेवर जाऊ नये माघारे निघोन येणे असे शपथ घालून पाठविली तितक्यात स्वारी माघारी करवीरास यावयासी निघाली तो पत्रे वाटेस पोचली नंतर तसेच करवीरास प्रहर दिवसास सडी पाच पनास लोकानिसी दाखल जाले ते श्रीचे वाड्यात आले वरकड फौज मागाहून आली याप्रमाणे जासुदान येऊन सांगितले त्यावरून आसाहेबास जाहीर होणेकरिता मारूज केले आहे. कलम.

१ माहाराजाच्या इलाख्यात चोऱ्या व दरवडे पडतात याचा बंदोबस्त व्हावा तो कांहीं अद्याप होत नाही. कलम.

येणे प्रमाणे दीनचर्येचा मजकूर समजण्या व ऐकण्यात आला तो आसाहेबास जाहीर होणेकरिता मारूज केले आहे हे आर्जदास्त.

लेखांक ७७ तारीख १४-११-१८२२

निवडलेले कागद रु. नं. ४४

१ छ १४ माहे नवंबरी रात्री माहाराज हजार फौजेनिंसी कागल येथे गेले याच कारण कोलापुरात मसलत केली असता बोभाट होतो सबब गेले आणि कारभारी व सिलेदार यास कागलास बोलावणे पाठऊन नेहल म्हणून यैकले ते लिहल आहे लौकीक उरसास गेले असा केला आहे व उरसही आहे पागा च्यारणीस कागलास ठेविली असा लौकीक करून जमाव कागलासच करणार यैस यैकल ते लिहिल आहे रामराव वकील बरोबर गेले आहेत.

४ फौजेची जमाव खासा पागा १००० हजार व सिलेदार १००० व जुमला स्वार २००० पायदल आरब २५० सिदी २५० बारवाले १०० रोहिले व गाडदी वगैरे ४०० जुमला १००० खासबारदार ४०० बंदुकदार ३५० किरकोल ३५० जुमला ११०० पायदल जुमला २१०० सिपाये हुजरे जासुद ३०० वगैरे येणे प्रो तोफा किल्यावर १८० ठेविल्या त्या व रविवार पेठेत तोफखान्यात ७५ व श्री भाऊ महाराज याचे वाड्यात मोठ्या १३ व तयार होणे ३५ च्या येणे प्रो जुमल्ला अजमास १२५ होतील

तोफा मी पाहून आलो ते लिहिल आहे दारूगोली भारी आहे यैस यैकील आहे गोलंदाज ५० आहेत गला जोरी व तांदूळ वगैरे ५०० खंडी आहे यैस म्हणतात ते यैकलवरून लिहिल आहे.

लेखांक ७८

तारीख ४-१२-१८२२

निवडलेले कागदपत्र रु. नं. ४४

च्यापलेन साहेव बहादूर

आर्जदास्त फिदवी चिंतो बाजी साठे मुकाम श्री नरसोबाची वाडी छ ४ माहे दिसेंबर सन १८२२ इसवी अखबार देवडी श्रीमन्माहाराज छत्रपति करवीरकर

१ माहाराजाची स्वारी नेव्हमी सिकारीस जात असती सिकार खेलणेचा शोक बहुत आहे बराबर नाथवा व त्याचे मंडळ वगैरे स्वारी बराबर असतात त्यास माहाराजाची स्वारी मौजे चिपरी जैनापुरचे रानात जाऊन माहाराजाची स्वारी घोड्यावरोन खाली उतरोन हरणावर बंदुकीची सिस्त धरिली तेव्हा बार निघोन गेला तोडा येकीकडे पडला त्यास माहाराजाचे आंगात रुदार आंगरखा होता त्यास उजवे आस्तणीस आग लागली तेव्हा जवल हुजरे मंडळ बराबर होती त्याणी माहाराजाचे अंगातील आंगरखा काढिला त्या गडबडीत माहाराज घाबरे होऊन उजवा हात जमिनीवर घासला तेवेलेस हाताचे कोपरे जवल दोन पैसे एवढेचकारां कातड्याची निघोन हातास रक्त आले नंतर तसेच स्वारी माघारी वाडीस येऊन त्या हातास मलमपटी बांधिली हे वर्तमान माहाराजानी कोणास कळू दिल्हे नाही आई महाराज रागे भरतील याजकरिता कळू दिल्हे नाही हाली माहाराजाची स्वारी बाहीर जाता येताना हातास लागले हे दृष्टीस पडले त्याजवरून त्याची चौकशी करिता या प्रा मा॥र समजण्यात आला. कलम.

१ कृष्णराव नुलगुंदकर येथे आले आहेत त्याची व नाना पाटणकर सरलष्कर व हिंदुराव घोरपडे याची खलबते होतात त्यातील मजकूर समजण्यात आला जे धारवाडास वकीलीचे कामावर माहाराजाकडोन पाठवावे म्हणोन पेशजी ताकरीन साहेब बहादूर याजकडे कलमी केले होते महाराजाकडील हिंदुराव घोरपडे हे मा॥रनिल्हेकडे वकीलीचे काम सांगावे म्हणोन बोलतात परंतु महाराजाचा रुकार अद्यापि कांहीं पडला नाही.

लेखांक ७९

निवडलेले कागद

रु. नं. ४४

छ १३ माहे दिसेंबर सन १८२२

१ हजरत गोरनर साहेब बहादूर व आसाहेबाची स्वारी मिरजेस येणार आलियानंतर माहाराज सामोर जाऊन ठाणे सिराल येथील रानात डेरे दिल्हे आहेत तेथे घेऊन

येणार यैसा बेत करून सरंजाम मेजवानीचा समारंभ करावयाचा याजकरिता जवाहिर व पोशाख वगैरे सरंजाम याची तयारी करून छ १७ दिसेंबरचे रात्रीस वाडी मुकामी इकडेस रवाना करून दिल्हे माहाराजाची स्वारी बराबर रविवार पेठेपर्यंत आले तेथे उभे राहून पुढे सरंजाम लाऊन दिल्हा माहाराजाची स्वारी फकीरबाबा याचे दर्शन घेऊन माघारी वाड्यात गेली.

कलम.

१ राजश्री नारायेणराव पाटणकर सरलष्कर व अनंत शास्त्री माहाराजाची स्वारी करवीरास येणेचे पूर्वींच आले ते श्री आंबाईचे चौकात येकीकडे बसोन खलबत केले नंतर माहाराजाकडे गेले तेथे बोलणी जाली.

श्री भाऊ महाराज याची ठेवरेव वगैरे वेव्हार तुम्हाकडे आहे[1] त्यास तुमच्या वह्या सरकारात आणोन दाखवावे म्हणजे तगादा उठेल नाहींतर उठणार नाही याप्रो बोलले.

लेखांक ८० तारीख १७-१२-१८२२

निवडलेले कागद

रु. नं. ४४

श्री

च्यापलीन साहेब

अर्जदास्त फिदवी

चिंतो बाजी साठे

ता। छ १७ माहे दिसेंबर सन १८२२ इसवी

मुकाम श्री नरसोबाचीवाडी अखबार देवडी श्रीमन्माहाराज छत्रपति करवीरकर

१ तिसरे प्रहरी स्वारीची तयारी होऊन निघाले ते सिरालेचे रानात डेरे दिल्हे आहेत तेथे झाडून लस्कर उतरविले आहे व विशालगडकर पंतप्रतिनिधि व बावडेकर पंतअमात्य व सरंजामी देसाई वंटमुरीकर व नेरलीकर व पागेपतके व सिलेदार व मानकरी वगैरे लोक यास येणविसी आज्ञापत्रे हुजूरोन गेली आहेत तेही आले म्हणजे तेथे उतरणार याप्रो लस्कर उतरणेचा बेत केला आहे तेथे स्वारी जाऊन कोणकोण पागेपतके व मानकरी आले आहेत त्याचे कायदे प्रो त्यास जागा दाखवून उतरविले आहेत ते पाहून तसीच स्वारी सिकारीस जाऊन दोन हरणे चित्ते सोडून मारविले व येक हरणावर महाराजानी जातीने घोडा भरदाव घालोन भाल्ने ठार मारिले भाल्याची जखम हरणाचे दोही फरेचे

१ आत्माराम नाईक काडोलकर व वामन नाईक वाडेकर. बाजी नाईक, रामाजी नाईक (सावकार) या लोकाकडे

मधे लागोन हरण ठार मेले याप्रो माहाराजास सिकारीचा बहुत शोक आहे तेथून स्वारी निघाली ते सायंकाली माघारी सिरालास येऊण जेवणाची ताटे होऊन माघारी चार तास रात्रीस वाडीस आली. कलम.

लेखांक ८१ माहे जानेवारी इ. स. १८२३

निवडलेले कागद
रु. नं. ४४

श्री

पौ छ ४ माहे
जेनेवारी सन १८२३ इसवी
हजरत सरदार उलिय च्यापलेन
साहेब बहादूर

अर्जदास्त फिदवी चिंतो बाजी साठे मुा श्री नरसोबाचीवाडी श्रीमंत महाराज छत्रपति करवीरकर

१ माहाराज छत्रपति याजकडील मोकदमा तरी ज्याजती प्रातःकाली माहाराजानी हजरत गोरनर साहेब बहादूर याची स्वारी काडापुराहून निघाली ती सिरोलानजीक आली ही बातमी माहाराजानी आघोधर राखून स्वारीची तयारी सर्व सिधता करून तयार होऊन बसले होते तोइकत बातमी आली नंतर माहाराज घोडयावर बसोन बराबर पंतप्रतिनिधि विशालगडकर व पंतअमात्य बावडेकर व शेनापति घोरपडे नारायेणराव रत्नाकर राजाज्ञा व नाना पाटणकर सरलष्कर वगैरे मानकरी व सिलेदार व बारगीर व हातीवर नौबत व दोन हातीवर अंबाऱ्या व कोतवाल घोडी व पागे वगैरे सरंजाम बराबर घेऊन जाऊन समारंभाने हजरत गोरनर साहेब बहादूर यासी सामोरे आडवे गेले तिकडून साहेबाची स्वारी आली नंतर माहाराजाची स्वारी घोडयाखाली उतरली साहेबाचीही स्वारी घोडयाखाली उतरोन माहाराजाच्या व साहेबाच्या भेटी वाटेवर जाहल्या आगोधर माहाराजानी तेथे डेरा दिल्हा होते तेथे सदर करून ठेविली होती तेथे साहेबाची स्वारी जाऊन बसली नंतर क्षणभर बसोन साहेबाची स्वारी डेरेकडे गेली व माहाराजाची स्वारी डेरेकडे आली नंतर माहाराजानी कचेरी केली गोरनर साहेब याजकडून हजरत तवाथीण साहेब व बालाजीपंत नातू व घोरपडे वगैरे लोक येऊन माहाराजासी आमंत्रणे देऊन गेले तिसरे प्रहरी माहाराजाचे स्वारीची तयारी होऊन हतीचे अंबारीत बसोन पाठीमागे उजवे बाजूस पंतप्रतिनिधी विशालगडकर व डावे बाजूस पंत अमात्य बावडेकर उभयेतानी हाती मोरचले घेऊन उडवीत गेले स्वारीबराबर आस्टप्रधान व मानकरी व सिलेदार वगैर पायदल व हाती व कोतवाल घोडी व हातीवर साहेबनौबत वगैर इतमाम घेऊन आसे समारंभाने स्वारी साहेबाचे डेरेस गेली तेथे

साहेबानी बैठकी घालून भेटी होऊन दोन घटका कचेरीस बसोन नंतर अतर गुलाब विडे वगैरे माहाराजास देऊन पंत प्रतिनिधि व पंतअमात्य वगैरे मंडलीस देऊन कचेरी बरखास्त जाली नंतर माहाराजाची स्वारी माघारी चार घटका रात्रीस डेरेस आली.

१ राजश्री सिदोजीराव नाईक निंबालकर सरलस्कर याची स्वारी हजरत गोरनर साहेब याची स्वारी येणार याजकरिता सरलष्कर हे निपाणीहून निघाले मौजे लाट येथे आले तेथून पुढे मिरजेचे रोखेस गेले आहेत.

लेखांक ८२ तारीख २०-९-१८२५

निवडलेले कागद

रु. नं. ४४

यादी श्रीमन्माहाराज छत्रपति याची स्वारी फौज तोफासुधा सदलगे व नेज नजीक मुकाम जाहला आहे तेथून सितोले याच गावाकडे व निपाणीस वगैरे उपद्रव करणार असी वदंता आहे व इजलकरंजीसही येणार म्हणतात म्हणोन श्रीमंत राजश्री नारायेणराव साहेब घोरपडे याचे पत्र इचलकरंजीहून आले कोणते वेलेस काये करतील याचा भरवसा लागत नाही याजकरिता छत्रपति यास इचलकरंजीकडे हरयेकविसी उपसर्ग होऊं नये म्हणोन थैली जाऊन उपद्रव न होई ते जाहल पाहिजे. तारीख छ ७ माहे सफर सन सीत अशेरीन मयातेन व अलफ.

(इंग्रजी सही)

लेखांक ८३ माहे सप्टेंबर इ. स. १८२५

निवडलेले कागद रु. नं. ४४

साहेब मुषफक मेहेरबान दोस्ता बेबर साहेब बहादूर सरकलकटर सुभा धारवाड दामोबत हू

आजदिल येकलास आपाजीराव सितोले सलाम बाजतसलाम आकी दिगर येथील खैरखुषी जाणोन आपलेकडील षादमानी कलमी करून दील ताजा करीत असिले पाहिजे दरियां आम्हाकडील वर्तमान करवीरकर माहाराज फौज तोफा सुधा सदलगेचे मुकामी येऊन उतरले आणि दुसरे दिवसी आंकलीस हजार स्वारानिसी येकायेकी येऊन गावाचे सभोवत राहून आम्हाकडे सांगून पाठविले कीं तुम्ही भेटीस येणे त्यास आम्ही उत्तर केले कीं पहिलेपासून पेशवे सरकारचे इलाखेतील येलीकडे कुंपणी सरकारचे अमल जाहालेपासून तिकडे वागत आहे तिकडील हुकमासिवाये कस याव? याजप्रो सांगून पाठविले तेव्हा त्यानी सवाच्र आंकलीच रानात पेंढारी पाठवून आमची उंट तीन व बैल कोठीचे भरताड गोण्यासुधा खेरीज गुरे येणेप्रो रानातून नागऊन नेहले आणि बेमुरवत गावात लुटणे करिता

सिरले तेव्हा आम्ही भेटीस न गेल्येस गावाची खराबी होती हे जाणून त्यासी सांगून पाठविले कीं खातरी केल्येस भेटीस येतो यैस त्याजवरून त्याणी निंबालकर वाटारकर यासी व सरनोबत व बागल या त्रिवर्गासी खातरी सांगितलेवर आम्ही वाडेतून भाहीर गेलो त्रिवर्ग व छत्रपति म्हणो लागले कीं सदलगेचे मोकामी याव म्हणजे जे बोलणे ते तेथे बोलायास येईल याजप्रो सांगोन बरोबर लष्कराचे मुकामी घेऊन गेले तेथें म्हणो लागले जे तुम्ही नजरणा द्यावा आणि नेज गाव हा इनाम करून द्यावा पुढे तुम्ही आमचे इलाखेत वागून दाहा स्वारानसी चाकरी करावी याजप्रो खातरी द्याव म्हणो लागले तेव्हा यासी उतर केले कीं आम्हीं पहिलेपासून पेशवे सरकारचे इलाखेतील हाली कुंपणी सरकारचे इलाखेत वागत आहो येजविसी धारवाडास मेहेरबान सो याजकडे लिहितो त्याच हुकूम येईल त्याजप्रो करावयास येईल त्याचे हुकुमाखेरीज आम्हास बोल्ता येत नाही याजप्रो आम्ही म्हणताच आम्हास अटकेत ठेवून नेजेस फौज व तोफा रवाना करून तो घ्यावा याजप्रो बेत जाहला ते समई मध्यस्त यानी छत्रपतीस सांगोन आम्हास अंकलीस पोचविले आणि सवाच तयारी होऊन कसबे नेज हा गाव आमचा इनाम येथ येऊन तोफा लाऊन प्रहरपर्यंत गोळा मारून माघारे गेले दुसरे दिवसी फौज व तोफा घेऊन येऊन हाल्येन (हल्लयानें) नेजचे ठाणे घेतले दरोबस्त गाव लुटला आग लावून गावाची घर जाल्ली हाल्येच समई पंचवीस तीस मनुष्ये जखमी व दाहा पंधरा मनुष्ये ठार जाहाल आम्हाकडील गावात कमाविसदार होता त्यास धरून पाहरेत ठेविले आहे आसी अवस्था करून दुसरे रोजी येऊन अंकली मांजरीस ठाणी बसविली जिंदगी दाणागोटा गुरेंढोरे घोडीपिडी येकंदर दरोबस्त लुटून घेऊन गेले आशयास आम्ही पहिलेपासून पेशवे सरकारात वागलो येलिकडे कुंपणी सरकारचे इलाखेत वागतो नेजचे मुकामी गोरनर साहेब आले समई आम्ही भेटीस गेलो होतो तेसमई सितोले आमचे इलाखेतील आहेत याचा गावखेडेसी हरयेकविसी उपसर्ग करीत जाऊ नये यैस राजश्री आनंदराव वकील नि॥ छत्रपति करवीर यासी ताकीद जाहाली त्यानंतर मेहेरबान ताकरीन साहेब बहादूर याणी सन १२३२ फसलीत करवीरचा इलाखा नाही कुंपणी सरकारचा इलाखा याज प्रो करवीरचा वकीलाच नांवी यादीच ठरवून दिली त्याची तालीक साहेबाकडे पाठविली आहे. परवा व्हागलचे मुकामी जाहीर केल कीं करवीरकर याणी आम्हास येणेविसी पत्र पाठविले आहे आम्ही तो साहेबाचे इलाखेतील हुकुमा प्रो करावयाचे याजप्रो विनंती करिताच साहेबानी आम्हाकडील इनाम गाव तिनी याच्या असल सनदा सातारेकर माहाराज याच्या व पेशवे सरकारच्या पाहून व खातरजमा करून घेऊन नंतर करवीरकर माहाराज यासी आम्हाविसी थैली दिल्ही आहे

आस आसता करवीरकर माहाराज याणी जबरदस्ती करोन आमची इनाम गाव मांजरी अंकली नेज येणे प्रो तीन गावास ठाणी बसवून जिंदगानी लुटून घेऊन गेले आम्ही कुंपणी सरकारचे म्हणवीत असता तोफा लाऊन जबरीन ठाणी घेतली आमची आवस्था

ऐसीं जाहाली याचा अभिमान साहेबासच आहे सांभाल केला पाहिजे. ज्यादा काये लिहिणे प्यार मोहबत कीजे हे किताबत.

लेखांक ८४ तारीख ६–४–१८२६

निवडलेले कागद
रुमाल नं. ४४

मेस्तर च्यापलीन साहेब बहादूर
कमिशनेर हुजूर पुणे साहेबाचे
खिजमतेस

अर्जदास्त फिदवी रामापा अखबारनवीस छ ६ माहे येप्रील सन १२३५ फसली मु॥ लस्कर नजदीक परळ श्रीमन्महाराज छत्रपतिसाहेब याणी विषाळगड नजीक टेकाडापर्यंत जाऊन हुजरे याजबरोबर सांगून पाठविले कीं गडीस खासा सवारी येत आहे सुरळीत येऊ देणार या गोळी चालविणेचा इरादा आहे म्हणून सांगून पाठविलेवरून सदर हुजरे याणी गडचे आघाडी चौकीपर्यंत जाऊन येणे प्रमाणे विच्यारिल्या त्याणी बोलिल कीं आता खासा सवारी गडास येऊ नये आलिया गोळागोळी चालतील जमियेत सुधा येथून कूच करून वापस मलकापुरास जाऊन नंतर दाहा पाच हुजरे लोकानिसी गडास यावा हे दौलत वगैरे माहाराजाच आह येणे प्रमाणे सांगितल म्हणून हुजरे याणी वापस येऊन माहाराज छेत्रपति साहेब यास जाहीर केल इतकियात महाराजाकडील सिंग्यानी टेकाडावर जाऊन सिंग वाजऊ लागिल करिता गडावरून कितियेक बंदुखेच बार व तोफाच बार झडली नंतर खास सवारी वापस गजापुरास येऊन दाखल होऊन तेथून कूच करून माघारे येताना गजापुरास व रस्तेतील चौक्या वगैरेस आग लाविलवरून गडातून ३।४ तोफाच बार व कितियेक बंदुखेच बार झडल गडच बाहीर असणेच चौकीतील लोक डोंगराचे आश्रेने बाजूस येऊन बंदुखच बार काहडील हिकडूनही बंदुखच बार जाहली येणे प्रमाणे चालून रातघटे ८ सुमारास खास सवारी जमियतसुधा लस्कर परळच मुकामी येऊन दाखल जाहले.

राजु रामापा आखबरनिविस
(रुजू) मु॥ कोलापूर

लेखांक ८५ तारीख २८–५–१८२९

कर्नाटक जमाव
रु. नं. १२०० (अ)

श्री

यादी कैफियत संमत कटकोल येथील गावगनाची ठाणी देसकाकडील घेण्यास श्रीमन्माहाराज मातुश्री जिजाआईसाहेब याणी आज्ञा करून स्वार व लोक नरसिंगराव सिंदे

नेसरीकर याजबरोबर देऊन रवाना केले नंतर नरसिंगराव सिंदे याणी ठाणी घालून आईसाहेब याजकडे स्वाधीन केली नंतर ठाणे व गाव बहुत दिवस सरकारातच होते पुढे पेशवे यानी चिकोडी व मनोली दोनी तालुके हुजूरचे जबरीने घेतले ते समई समत कटकोलचा गावसुधा ठाणी घेतली नंतर हुजूरचा व पेशवे याचा बालाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस याचे विद्यमाने तहनामा तारीख छ २६ मोहरम सन इहिदे समानीन मया व अलफ शके १७०२ शार्वरीनाम संवत्सरे पौष्रमासी जाहाला त्या तहनामेतील प्रथम कलम प्रांत हुकेरी तालुका व मनोळी तालुका व फुटगाव व प्रांत कागल व रायबाग व कटकोल तालुक्यासुधा पेशजी चाललेप्रमाणे स्वामीकडे चालावे मधे सांगणाराचे गोष्टीवरून विपर्यास पडला पुढे होणार नाही याप्रमाणे करार करून शफेतपूर्वक विनंती पत्रे यावी म्हणोन कलम लिहिले आहे सन इहिदे समानीनात तह जाहलेवर सिबंदीचे यैवजाचे मखलासीचे रकमेत समत कटकोल देहेसुधा परशुराम रामचंद्र याजकडे गाहाणवटीस साल गुदस्ता सन समानीन मया व अलफ ता। सन खमस तिसैन मया व अलफ येकून साले १६ सोला देहेसुधा ठाणे दिल्हे होते नंतर सन सबा तिसैन मया व अलफचे साली चिकोडी व मनोली तालुका हुजूर आला ते समई समत कटकोल देहेसुधा ठाणी हुजूर आली नंतर कांहीं दिवसानी तीर्थरूप कैलासवासी श्रीमन्माहाराज सिवाजीराजे छत्रपति याचे कारकीर्दीस दंगे होऊन लढाया जाहाल्या तेसमई शंकरराव सिंदे सेनाखासकील जमावसुधा हुजूर येऊन सेवा केली याजमुले सिबंदीचे देणेचे पेचात आले ते समई हुजूर विनंती केली जे सिबंदीचा पेच माझे सरंजामात निभावत नाही याजकरिता सिबंदीचे कर्ज फिटेपर्यंत कटकोल तालुका सेवकाकडे द्यावा त्याजवरून माहाराजानी शंकरराव सिंदे सेनाखासकील याजकडे कटकोल कर्यात सिबंदीचे यैवजात दिल्ही होती नंतर निपाणीकर याणी खटला करून चिकोडी तालुका व मनोळी तालुका घेतला तेसमई कटकोळचे ठाणेस निपाणीकर याणी वेढा घालून देहे सुधा ठाणी घेतली नंतर गिरा + रुतबात गोरनर साहेब बहादूर याणी हुजूरचा व एकबाल पनाह कंपनी सरकारचा तहनामा तारीख छ १ माहे आक्टोबर सन १८१२ इसवीस पुणे मुकामी करून दिल्हा नंतर गोरनर साहेब बहादूर यानी समत कटकोल सुधा देहे साहा व फुटगाव देहे चार एकूण दाहा गावाची सोडचिठी सदाशिव माणकेश्वर याजकडून रा। आनंदराव याची बापूजी कृष्ण याचे नांवे छ ९ माहे जिल्हेज सन आर्बा अशर मयातैन व अलफचे साली देविली त्या प्रा। समत कटकोलसुधा। सहा गाव स्वाधीन करून घेण्यास हुजरून सुभानजी देवणे हाजुरे यास रवाना होऊन सदरहू समत कटकोलसुधा साहा गाव शंकरराव शिदे सेनाखासकील याचे स्वाधीन केले होते पेशजी पुण्याहून सोडचिठी हुजूर आली त्याची तालीख व सेनाखासकील यासी कटकोल कर्यात स्वामीनी + बहाल याचे विनंतीपत्र हुजूरचे सेवेसी पाठविले त्याची तालीक एकूण तालिका दोन मजकूर मालूम होणेकरिता पाठविले आहेत. सु॥ तिसा अशरीन मयातैन व अलफ छ २४ माहे जिल्काद.

विभाग (ब)

डेक्कन कॉलेज पोस्ट ग्रॅज्युएट अँड रिसर्च इन्स्टिट्यूट, पुणें, मराठा हिस्ट्री डिपार्टमेंट ऐतिहासिक कागदपत्र संग्रहांतून निवडलेले कागद.

लेखांक ८६ तारीख ३०-१२-१७६०

श्री गेजानन

रुमाल नं. ६९
फाईल नं. १५
पत्र नं. २१७
यादी
(डावीबाजू)

माहदजी भोसले मुंगीकर याचा भाऊ समागमे न्यावयाची आज्ञा आज्ञेप्रमाणे येतील तेथे गेल्यानंतर त्याचे केवल जवलचे खानुटकर भोसले आहेत त्याचा मूल त्याचे मते घ्यावा आणि आपले आज्ञेत चालवे येणे प्रमाणे जाल्यास काये करावे करार

येथून आज्ञा जाल्या प्रो तेथे घडोन न ये आणि तिथून किले बल्काऊन बसली तरी काये आज्ञा करार

आम्ही जाऊ तो पूर्वीच त्याणी खानुटकर भोसले याचा लेक घेतला असला तरी काये आज्ञा करार

(उजवी बाजू)

किले तीन पन्हाला रांगणा सिंधेदुर्ग हे तीन घ्यावयाची आज्ञा आज्ञे प्रमाणे जाल्यास उत्तमच कदाचित पन्हाळा त्याणी आपणाकडे ठेवून रांगणा व सिंधेदुर्ग दोनी दिली तर घ्यावी न घ्यावी हे न होता येक मालवणच दिल्हे तर घ्यावे न घ्यावे करार

त्याचे आमचे ममतेतील लोकास वचन प्रमाण देऊन करारमदार करून आणू त्याचे आमचे वचनाप्रमाणे चालवावे करार

१
येणे प्रमाणे येकांती दोघानी विचार करून समयोचित करावे दोघानी येकदील होऊन करावे परस्पर शपथपूर्वक क्रत्रीम मानअपमान पाहू नये अंतर पडल्यास उतम नाही येकदिली जे सर्व प्रकारे तुटी सोसून केलिया श्री कृपा होईल छ २१ जमादिलावल सु॥ इहिदे सितेन सु॥ नजीक श्री गंगा

लेखांक ८७ इ. स. १७६४-६५

नं. ४५ श्री नरहरी

यादी श्रीमंत रावसाहेब कैलासवासी याचे कारकीर्दीस बालाजी केशव सर्फे यास येणे प्रो पावत होते. सु॥ खमस सितेन.

टीप : १ करार हीं अक्षरें आणि आकडा १ यापासून पुढें असलेला मजकूर नानासो पेशवे यांच्या हातचा आहे. त्यावेळीं पानिपतचा प्रसंग असून पेशवे उत्तरेकडे चालले आहेत. छत्रपति संभाजी महाराजांचा मृत्यु तारीख २०-१२-१७६० रोजीं झाला.

१५०० पा। मनोली व चिकोडी येथील सनद केशवराव बलाल व रामचंद्र नाईक याचे नांवे होती वेतन रुपये तीन हजार त्याज पैकी निमे.

लेखांक ८८ तारीख २-३-१७७५

रुमाल नं. ६४

फा. नं. ७

श्री गणेश

नं. १

पे।। छ ५ मोहरम खमस

श्रीमंत राजश्री नाना फडणीस

स्वामीचे शेवसी

विनंती सेवक पांडुरंग गोविंद कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील वर्तमान ता छ २९ जिल्हेज जाणून स्वकीयें कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष करवीरकरानी फौज उठऊन नेलेवर घोरपडे यानी व तुमचे लोकानी गुरे वळून आणिली म्हणून करवीरचे लिहिले आले हे ठीक न केले म्हणून आज्ञा येशास करवीरकर उठोन गेले हे इचा मर्जीस न कलता त्यानी दाहा वीस गुरे आणिली हौती परंतु मातुश्री बाईस वर्तमान

\+ + (दोन ओळी मजकूर फाटला) +

किमपि कटकट नाही इची मर्जी + + + झाडून फौजेस निरोप दिल्हा करवीरचा जमावही सालवण बावडेकराकडून याजवर गेला आहे आनुबाईनी लढे आसतील ते उरकोन देवावे येसा आम्ही करार केला आहे म्हणून आज्ञा यैशास राजश्री व्यंकटरावहि तेथेच आहेत जसा बोलून करार केला असेल तसी वर्तणूक करतील आम्हाकडून तिकडे किमपि उपद्रव नाही सरकारचे आज्ञेवरून बाईकडून साहित्यात होतो तथापि गुरढोर अथवा गाव खेडयानी आमचा तिलमात्र उपद्रव लागला नव्हता यैवज मातुश्रीचा जमाव मिळून मात्र द्यावयाचे कारभारात आम्ही होतो करवीरकर आणखीही जमाव ठेवीत आहेत राजश्री शंकराजी घोरपड याचा मा।र पुरश्रांस[१] गेलेवर लिहून पाठवितो म्हणून आज्ञा उतम आहे हजार बारासे राऊत सुधा तयार आहेत बहुत काय लिहिणे कृपालोभ कीजे हे विज्ञापना.

---

१ पुरश्रांस म्हणजे करवीरास.

लेखांक ८९ तारीख १-७-१७७५

श्री गणराज

पत्र नं. ४

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक जिवाजी गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ २ जमादिलोवल मु॥ इचलकरंजी येथे स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीचे छ २३ र॥खरचे आज्ञापत्र सादर जाहले ते काल पावले तेथे आज्ञा कीं कितुरकराचा जाबसाल अद्याप निर्गमात आला नाही तो चढी लागला आहे त्यास तुम्ही राजश्री कोनेरराव त्रिंबक याजवल जाऊन पोहचलाच आहा हे फौज तिकडे जाऊन पोहचली नाही तो फौजेच्या दबावाने येणार हेच आवईने त्यासी सलूख करणे येक दोन गोष्टी त्याच्या आइकोन काळावर नजर देऊन सरकारचे मतलब करून घेणे लांबणीवर पाडून हे फौज जाऊन मिळाली आणि पारपत्य न जाहाले म्हणजे ठीक नाही यास्तव फौजेच्या दबावाने काम करून घेणे म्हणोन आज्ञा ऐसीयास प्रस्तुत कितूरकर याणे बेटगीर घेऊन धारवाड किल्याभोवती लाहान मोठी ठाणी घेऊन किल्यापासून कोसावर वोढ्यावर उतरला आहे र॥ येसाजी राम किल्याचा बंदोबस्त करून किल्यात आहेत फौज बाहेर किल्याच्या आसपास उतरली आहे र॥ कोनेरराव त्रिंबक करवीरकराकडील फडशा करिता येथे गुंतले त्यास करवीरकराकडील जाबसालाचा टराव आपाजी शामजी याणी हुजूर पुरंदरी करून यादी कराराच्या व कोनेररायास पत्र घेऊन करवीरास पाठविले परंतु वे॥ राजश्री माहादेव शास्त्री याणी जाबसाल चढी लाऊन वोढ धरविली आणि फिरोन आपाजी शामजीकडे पत्रे पाठविली आहेत यादी आल्या त्याप्रो फडशा करावा ते गोष्ट किमपि बोलत नाही कितुरकराचा वकील करवीरास आला आहे त्यासही उत्तेजन देतात करवीरचा जाबसाल उरकत नाही यास्तव फौज येथे गुंतली म्हणोन कितुरकरास फुरसत पडून इतका आक्रम केला आज ताा दोन अडीच लाखाचा मुलुक घेऊन ठाणी बसवून ठाण्यावर श्रीमंत राजश्री दादासाहेबाचे निशाण लावितो हैदरखानाकडील सूत्र आहे बाजीराव बर्वे व विठल विश्राम फौज घेऊन येणार रवाना जाहाले म्हणोन नरगुंदाहून पत्र आले व लक्ष्मेश्वराहूनही लिहिले मिरजेस आले त्यास नरगुंदचे पत्र आले तेच सेवसी पेसजीच पाठविले आहे सलुखाचे राजश्री येसाजी राम याणी उपाय करून पाहिला जो जो सलुखाची गोष्ट बोलावी तो पोहची वळखून अधिकच शेर होतो र॥ कोनेरराव याच्या फौजेचा दबाव त्याजवर अद्याप पडला नाही कारण की करवीरकराचे त्याचे सूत्र होऊन वकील करवीरास बसला आहे करवीरकरानी लांबणीवर टाकिले येथील फडशा होऊन फौज येथून मोकली होऊन त्या रोखे येक दोन मजली गेल्यावाचून त्याजवर सलाबत पडत नाही करवीरच्या सूत्राबर तो तिकडे स्वस्थपणे किल्यास लागावे

न्या विचारात आहे फौज येथून निघोन तिकडे चालली म्हणजे आज्ञे प्रा॥ आवईवर साधल्यास सलुख करावयासी चुकत नाही तूर्त राजश्री कोनेरराव याणी अलत्याचे ठाणे मातबर होते ते घेऊन काली सिरोलावर जाऊन मोर्चे लाविले राजश्री पांडुरंगरावही जमाव घेऊन मिरजेहून आज आले रा॥ कोनेरराव व येसाजी राम यासही कितुरकराच्या सलुखाविसी पत्रे सादर जाली ती पोहचती करून पैरवी करवितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक ९०

तारीख ११-७-१७७५

फा. नं ११

श्री

रुमाल नं. ७४

पत्र नं. ३

श्रीमंत राजश्री नाना स्वा-
मीचे सेवेसी

विनंती सेवक भिकाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता छ १२ जमादिलोवल मुक्काम इचलकरंजी स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष येथील मजकूर तर पेशजीं करवीरकराची तहाची यादी आली त्याप्रमाणे फडशा पाडावा येविसीचे बोलणे त्याजकडून न येईल म्हणोन येथून राजश्री विठलपंत लेले पाठविले होते व त्याजकडूनही येसाजी मोठे सिलेदार आले होते परंतु तिकडील बोलण्याचा भाव व राजश्री माहादेव शास्त्रीबावाचा की राजश्री आपाजी शाम याचे विद्यमाने यादी करार केली ते जबरदस्तीने केली आहेत आपाजीपंत मान्य नसता बलेच यादी लेहून मखलासी करून करार केला यैसी बोलणी येथे बोलतात आणि स्वामीपासी विनंती करितात की यादीप्रमाणे मान्य असोन तह करीत असता राजश्री कोनेरराव मान्य न करून फडशा करीत नाहीत आणि गाव जालितात माणसे मारितात यावरून अपूर्वसे वाटते सेवकाचे मानस कीं येथील गुंता उरकून सरकार तालुक्यात सत्वर जावे परंतु त्या दरबारची रीत कीं बोलणे येक बोलावे निदर्शनास येक आणावे यैसा विचार आहे येविसी राजश्री जिवाजीपंतही माहित जाहाले आहेत सरकार तालुक्याची खराबी होत असता तिकडे तसेच ठेऊन हेच कार्य आवलंबित असावे हे मानस नाही आम्ही तो यादीप्रमाणे फडशा आज पाडून मजल दरमजल जाणार फडशा न करिता जावे तर दिसण्यातही येथास्थित दिसत नाही याजकरिता सरकार आज्ञेप्रमाणे मातबर कलमाचा फडशा होऊन करारात आले म्हणजे येक दोन कलमे बारीक मोठी मागाहून होतील यैसा ठराव करून राजश्री कोनेरराव याचे कूच करून जातो. (पुढील बंद गहाळ.)

लेखांक ९१ तारीख २८-७-१७७५

श्री गणराज

पत्र नं. ६

पै।। छ ४ जाखर सीत

सेवेसी विनंती सेवक जिवाजी गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। श्रावण शु।। १ मु।। इचलकर्जी स्वामीचे कृपेकरून येथास्थित असे विशेष स्वामीनी कृपाकरून छ ८ जावलचे पत्र सरकारच्या खिजमतगारा बा। पाठविले तें छ १४ जावली पावले पत्री आज्ञा कीं करवीरकराकडील याद गेली आहे त्याप्रा। उरकोन फौज लौकर धारवाडाकडे घेऊन जाणे र।। पांडुरंगरायासही पत्र जाण्याविशी लि।। आहे व रामचंद्र नारायेण यासही तुम्ही लिहिल्याआन्वये परभारे पत्र र।। केले व रास्त्यासहि लि।। आहे सारांश वरकडाचा भरवसा नाही सरकारची फौज वगैरे घेऊन जाऊन कांहीं दब्राव दाखवून त्याची वतनबाब निदान चालवावयाची कबूल करून समेट्न घ्यावे म्हणोन पत्री आज्ञा यैशीयास करवीरकराकडील याद आली परंतु कोनेररायाकडे त्याचे बोलणे न लगे तेव्हा आम्हाकडे संधान लागोन शास्त्री बोलावयास आले शास्त्री यास बोलण्यात घ्यावे लागले तर घ्यावे आशी आज्ञाही आली मग आमची त्याची भेट होऊन बोलणे होता यादीत सत्रा कलमे त्यात येकाही कल्माचा जाबसाल ठीक न करीत मनमानेसे भाषण करून ताळ बसो देईनात याद आली ते आम्हास कबूल नाही आपाजी शामजीस काये कळते त्याणे भिडेने कबूल केले असे आनचीत भाषण कोठवर ल्याहावे सेवटी मातुश्री आनुबाईकडील जाबसाल निर्वेधपणें उलगडणे फौज दूर करणे ब्राह्मण सोडणे हे तीन जाबसाल त्यास फौज दूर करतो परंतु समजूत पाहून दूर करावयास येक महिना लागेल यास भरवसा वचनाचाच ब्राह्मण हटातटाने सोडणार नाहीत विचारे विचारे सोडऊ परंतु हजीरजामीन त्याणी द्यावे ते हजीरजामीन मातबर आपल्या जिल्हेतील मागणार मातुश्रीची ठाणी सुटावी वतनाच्या मोकळचिठ्या द्याव्या त्यास करवीरकराचे आळते म्हणोन मातबर ठाणे घेतले आहे ते सोडले तर बाईची ठाणी सोडतो व वतनाच्या मोकळचिठ्या देतो म्हणतात मातुश्रीच्या गावखेडयास उपसर्ग याउपर देणार नाही येसा दरम्यान कोणी द्यावा म्हटल्यास मातुश्रीकडील जाबसाल पुरंदरीं जाऊन बोलणे आहेत तेथे बोलणे होऊन ठरे तो पर्यंत उपसर्ग देणार नाही यैसे पत्र शास्त्री आपले दरम्यानगतीचे देऊ म्हणतात पुरंदराहून याद ठरोन आली आता फिरोन तेथे बोलावयाचे काये म्हटले तर लाट रांगोलीचे बोलणे आहे म्हणतात आमात्य प्रतिनिधि सेनापति याचा जाबसाल आमच्या सोईस येऊन ज्याचा त्याणी उरकला तर आम्ही उरकून घेतो नाहीतरी पुरंदरी उरकून घेऊ म्हणतात या प्रकारचे जाबसाल जरब न बसली यास्तव आहेत धारवाडाकडे ताण भारी बसला म्हणोन उरकावेसे केले आहेत पर्जन्य फार लागला पंचगंगेस पाणी अतिशय आले यास्तव पंधरा दिवस खोळंबा जाहला आता लष्कर उतरत आहे उद्या पर्वा उतरोन

जल्द फौज धारवाड प्रांती जाईल पांडुरंगरायास पत्र प्रविष्ट केले त्याणी येत नाही म्हणोन उत्तर लि॥ आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ९२ तारीख ३१-७-१७७५

रुमाल नं. ९० फाइल नं. ३
पत्र नं. ७

श्री गणराज

पै॥ छ ७ जाखर सीत

सेवेसी विनंती सेवक जिवाजी गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशलता

श्रावण शुद्ध ४ इंदुवार मु॥ इचलकरंजी स्वामीचे कृपे करून येथास्थित असे विशेष स्वामीनी कृपा करून राजश्री पांडुरंगराव यास व राजश्री कोनेरराव यास व आम्हास पत्र पाठविली कीं लौकर करवीरकराकडील यादीचे आन्वये दोन चार मोठी मोठी कामे फडशात आणून किरकोल कामासाठी तट न धरिता फौज घेऊन धारवाडाकडे जाणे त्यास येथील प्रकार तर पांडुरंगराव शिरोळावरून उठताच निघोन मिरजेस गेले त्याजकडे सरकारचे पत्र पाठविले त्याचे उतर आम्हास साफच आले कीं धारवाडाकडे जावयास आनकूल पडत नाही कोनेररायाचे माहात्म्य ती पत्री लिहिता पुरवत नाही शिरोळावरून उठोन इचलकरंजीवर आल्यास महिना होत आला इचलकरंजीच्या आसन्यास येऊन उतरल्याने तो केवळच फौजेचा दाब उडाला आणि येथून बसोन त्याजवरही जरब नाही आणि नद्या भरल्या म्हणजे धारवाडाकडे जाण्यास खोळंबा होईल याजकरिता नदीस पाणी थोडे आहे तो तोफखानासुद्धा फौज पंचगंगा उतरून पलीकडे जाऊन करवीरच्या मुलकात व धारवाड तालुक्याची सरद जवळ करून उतरावे तो करवीरकराचा तह होईल तसा उरकतो शास्त्री याचा संदर्भ आम्हाकडे आलाच आहे म्हणोन सांगितले परंतु खातरेस न ये इचलकरंजीवरच राहिले इतक्यात शास्त्री यास रुईस आणविले आम्ही गेलो त्याची आमची भेट होऊन बोलणे लागले तहाची याद ठरोन आली ते याद कबूल नाही यादी प्रो। एकही कलम निर्गमात आणावयाचा सुमार नाही तेव्हा येक मातुश्री आनुबाईकडील जाबसाल सोईवर आणून त्यानी यानी भांडू नये वतनबाबेच्या मोकलचिठ्या व ठाणी घेतली असतील ती त्याणी सोडावी व त्याची याणी सोडावी फौज दूर करून वरकड जाबसाल येथे न उरकत तरी पुरंदरी जाबसाल करावे ब्राम्हणमात्र तूर्त सोडावे म्हणता फौज दूर करतो व ब्राम्हण सोडतो हे वचनावचनी ठरले खातरजमा व्हावयाजोगा दरम्यान कोणी नाही असो तेही कबूल केले तरी मातुश्रीकडील जाबसाल निखालस उलगडेना त्यासाठी आजरावेतो जाबसाल होतच आहे परंतु राजकारण तुटो न देता सिंद्याकडे जातात फिरून येतात असे आज

पावेतो होत आले परंतु आज उलगडेल पुरंदरास जाऊन बोलावयाचे आहे तोपावेतो परस्परे कलह करू नये इतकी दिकत ठेवतात असो पुरंदरी बोलू म्हणतात चिंता काये ? म्हणोन आम्ही निकालावर घेऊन कजिया तोड (तो) तो पाऊसाची झड लागोन नद्यास बेसुमार पाणी आले मग फौज पार व्हावयाचा मा॥र राहिला

(पुढील पांच सहा ओळीं मजकूर अवांतर सबब गाळला.)

किंतेक लोक आम्हास नालबंदी पैकी कांही पैका द्याल तर धारवाडाकडे येतो नाहीतर उतरत नाही म्हणो लागले स्वामीनी पथकास पत्रे पाठविली होती ती देऊन हुजरे आले त्यास सर्वांकडे पाठऊन बहुतेक उतरले राजश्री धारराव शिंदे याणी केवळच तट घातला की करवीरकराच्या कजियात चार घोडी पडली ती खंडून तूर्त पैका देणे तीस हजार रुपये नालबंदी पैकी द्याल तर पुढे येऊ नाहीतर घोड्याचा पैका रोख घेऊन व रोजमुरा येक घेऊन माघारे जातो म्हणोन तट घातला

(पुढील सुमारें ४५ ओळी मजकूर अवांतर सबब गाळला)

हैदराकडील वर्तमान इकडे यावयाची दाट आवई बोलतात परंतु पटणाजवलच आहे बरवे व विठल विश्राम कडुरबागावरावरी (होणावरावरी ?) आले म्हणोन हरीहराहून पत्र आले या प्रकारचा मा॥र आहे. श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ९३ तारीख १-८-१७७५

फा. नं. ३

रुमाल नं. ९०

श्री गणराज

पत्र नं. १०

पै॥ छ ९ जाखर सीत

सेवेसी विनंती सेवक जिवाजी गोपाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता॥ श्रावण शुध ५ मु॥ इचलकरंजी स्वामीचे कृपे करून येथास्थित असे विशेष स्वामीनी कृपा करून पत्रे पाठविली कीं करवीरकराकडील गुंता यादी प्रो लौकर उरकून कितुर-कराच्या पारपत्यास जलद जाऊन पोहचणे

............(पुढील ३० ओळीं मजकूर अवांतर सबब गाळला.)..................

करवीरकराची फौज गेली दीड दोन हजार राऊत आहेत त्यास येसाजी सिंदा करवीरी आहे लोक बाहेर दंगा करून बसले आहेत करवीरकर तहाची याद ठरोन आली त्याप्रो यैकेनात मग मातुश्री बाईकडील मात्र जाबसाल उलगड्यात आणिला फौज दूर करितो म्हणतात फौज बहुतेक गेली दोन हजार उणीच आहे त्याचाही दंगाच आहे समजावीस करून निरोप देणार कार्याकारण मातबराची थोडीबहुत समजावीस काढून वरकडास दगा देतीलसे दिसते ब्राम्हण सोडावेसा करार जाला आहे प्रतिनिधि आमात्य सेनापति याचा फडशा त्याच्या आमच्या विचारे जाहाल्यास उतम नाहीतर पुरंदरी होईल याप्रो बोलणें

होऊन ठरले आहे धारवाडाकडील प्रकार कांहीं लिहिता पुरवेना धारवाडच्या किल्यात येसाजी राम किल्याचा बंदोबस्त करून राहिले आहेत कितुरकराने तमाम ठाणी नवलगुंद देखील घेतली येसाजीपंतानी केवळच अवसान सोडून बसले.

(शेवटचा ५० ओळी मजकूर अवांतर सबब गाळला.)

लेखांक ९४ पौ तारीख ५-८-१७७५

फाईल नं. ३

रु. नं. ९० श्री गणराज

पत्र नं. ३

सेवेसी जिवाजी गोपाल सा नमस्कार विज्ञापना सविस्तर वर्तमान लि॥ आहे त्याजवरून विदित होईल कितुरकर तो फार बळावला आता तह करीन म्हटल्यासही येकत नाही त्याचे पारपत्य जरूर जाहाले पाहिजे त्यास फौजेचा व कोनेररायाचा अर्थ समजला येक धारवाड किल्ला व कोपळ गदग मात्र राहिले आहे व इकडे मिश्रीकोट व कलघटगी आहे त्यास मिश्रीकोट व कलघटगी ही केवळ हैदराच्या सरदेस आहेत त्याचा भरवसा नाही कोनेररायाची फौजही लौकर जाऊन काम करतीलसे वाटत नाही स्वामीनी त्यास ल्याहावयाचे ते ल्याहावे आशा विल्ग प्रकारात स्वामीनी सेवकास तो पाठविले तेव्हा हजार पाचसे राऊत या प्रांतचे चांगले माणूस पाहून आणखी ठेऊन घेऊन जातो नरगुंदकराकडून तीन हजार प्यादा शीध केला आहे नवलगुंदकर देसाई याणेही हजार दीड हजार प्यादा जमा केला आहे परंतु तो थोडासा कितुरकराच्या डौलावरसा दिसतो मग तो बळकट म्हणोन तिकडे डौल दिल्हा की काये न कले त्यास मिळाला तर नाही परंतु तो त्याचे वाटेस जातही नाही तोही त्याचे वाटेस जात नाही असे आहे आम्ही गेलियावर आमचे बळ पाहून सामील होईल मनोली रामचंद्र नाईकाकडे तेथे हजार दोन हजार लोक नाईकाकडील का॥दाराने जमा केले आहेत मनोलीपासून कोस दीड कोस हुलीचे ठाणे आमचे जुने ते परंतु कुमक करीत नाहीत रामचंद्र नाईकाचे पत्र कादारास सत्वर यावे कीं सामील होणे त्याचा जमाव आमचेही दोन हजार प्यादे गाडदी मिळोन जमा करविले आहेत खर्च महिना दोन महिने कामापुरता पडला तरी करून नरगुंदकर नवलगुंदकर मनोलीकर डंबलकर साऱ्याचा जमाव एकवट करून घेऊन कितुरकरावर खामखा जरब देतो स्वामीचे पुण्य समर्थ आहे राऊताचा भरणा इचल-करंजीच्या व करवीरकराच्या मलईमुलें चांगले लोक जमा जाहाले ते आता त्याणी निरोप दिल्हा यातून चांगली चांगली आसामी पाहून हजार पाचसे राऊत धारवाडकडे नेतो महिना दोन महिने ठेऊन तेच लोक हुजूर आणावयाची आज्ञा जाहाली तरी हुजूर घेऊन येतो येविसीची आज्ञा जाली पाहिजे शेवेसी श्रुत होये प्रस्तुत फौज करवीरकराची दोन हजार पावेतो आहे दोन अडीचसे घोडे लोकाचे पडले आहे तलबेचा तंटा फार आहे

करवीरकर लोकास दगा देणार यैसे दिसते लोकाची समजावीस करून कितुरकराच्या पारपत्यास त्याची फौज येणे दुस्तर आहे व ते फौज आल्याने सोयेही पडावयाची नाही सिंदे माघारे जातात यास पंचवीस हजार तूर्त द्यावे लागतात येविसीची सोये काढून त्यास इकडे राहावयाची आज्ञा करावयाची आसल्यास जलद पत्रे आली पाहिजेत मिरजकराचे सरंजामी च्यारसे राऊत पुरंदराहून आले ते तरी तिकडे त्याणी पाठवावे तेही नाही मग आपली फौज अधिक देणे अगर आपला येणे कलतच आहे तर येविशी त्यास निक्षूण लिहून दोघे खिजमतगार जलद त्याजकडे पाठवावे म्हणजे त्याची नेमली फौज ते व आणखी काही येईल तर न कले सरकार कामाचे अगत्य कोणीच करीत नाही राजश्री दाजी व सिवाजीपंत याजकडूनही पत्र तात्यास लेहून पाठवावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. पौ छ ७ जाखर सीत.

(ता. ५–८–१७७५)

लेखांक ९५ तारीख १७–१२–१७७५

श्री

श्रीमंत राजश्री बापू स्वामी

वडिलाचे सेवेसी

विनंती सेवक आबा काबरस कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम ता। मार्गसीर्ष वद्य १० रविवार पावेतो नेरगाव नजीक वर्धनगड सुखरूप असो काल श्रीमंत राजश्री भगवंतराव याची भेटी घेतली पत्रे दिल्ही त्याची उत्तरे त्याणी आपणास लिहून दिल्ही बोलणे बहुत जाहले आपल्या लक्ष्यासिवाये पूर्वीपासोन नाई खानापुराजवल श्रीमंत राजश्री भवानराव आले यामुले मानकरी फौज जमा केली तो जथा फौजेचा चांगला पडला आहे चौघे मानकरी याचे भाव याचे चांगले असावे भोसल्याकडील वलण व जिल्हेतील लोक आठ हजार जवल आहेत फुडे बोलाविले ते येतात अतःपर नवे लोक बलावीत नाही म्हणून बोलल आपण सांगितल तेच यैकावे यैसे आहे संकराजी घोरपडे येणार आम्ही आज निरोप घेऊन येतो त्यासी लांबऊ नये यैसे बोलणे जाहाले आहे आणखी बोलोन त्याचे भाव घेऊन सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

लेखांक ९६ तारीख १८–२–१७७६

फा. ६ नं. ४

श्री आईआदिपुरुष

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बाळाजीपंत स्वामी गों-
सावी यासी

सेवक भगवंतराव त्रिंबक प्रतिनिधि कृतानेक नमस्कार विनंती उपरी आम्ही कूच दरकूच

चिरंजीव राजश्री भवानराव याचे पाठीवर फौजसुधा वारणेवर आले ते निघोन मिरजेस गेले राजश्री पांडुरंगराव ते येकत्र जाहले आम्हासहि मिरज प्रांती जाणे प्राप्त जाहले तेव्हा प्रांताची खराबी होईल आणि त्याचेही पारपत्य करणे पडिले करवीराहून राजश्री छत्रपतीकडून वकील आले आहे त्याचे आपले सख्यत्व करून द्यावे म्हणऊन राजश्री हणमंतराव यासी घेऊन गेले येविसी बहुता प्रकारे सांगितले त्यावरून रा॥ कोनेरराव याजकडे कारकून पाठवून त्याचा सख्यत्वाचा विचार करून पाहू आम्ही उदइक कूच करून मिरजेकडे जातो फौज भारी मिलाली आहे परंतु खर्चाचा गवगवा भारी आहे याचा परिणाम ईश्वर लावील कांही फिकीर नाही आमचे शरीरी सावकाश नाही याजकरिता कराडाजवळ आठ नऊ मुकामे जाली वारणेवर पाच सहा मुकामे जाहली याजउपरी कूच करून मिरज प्रांती जातो. कलले पाहिजे र॥ छ २७ जिल्हेज लोभ असो देणे हे विनंती.

लेखांक ९७ तारीख १२-३-१७७६

श्री

फा. नं. ११९
नं. १

श्रीमंत राजश्री नाना स्वामी
चे सेवेसी

विनंती सेवक हणमंतराव माणकेश्वर कृतानेक सं॥ नमस्कार विज्ञापना ता॥ छ १५ मोहरम पर्यंत मुकाम मल्कापुर वर्तमान येथास्थित असे विशेष बेगंपूरच्या मुकामावरून कूच करून श्रीमंत राजश्री भवानराव याच्या पाठीवरी आलो त्यास श्रीमंताचा शरीरास बहुत समाधान नाही याजकरिता कऱ्हाडावरी दाहा पंधरा मुकाम जाहले तेथून तांदुलवाडीवरी दाहा पंधरा मुकाम जाहले कऱ्हाड घ्यावे तेव्हा ब्राम्हण लुटले जातील आणि शरीरास समाधान नाही आपकीर्ती होईल याजकरिता कऱ्हाड घ्यावयाचे राहिले नाहींतरी एका दिवसाचे काम होते बेगंपुरच्या मुकामावरी राजश्री नागोजीपंत चिकोडीकर येऊन भेटले ते वेलेस आमचा व त्याचा करार जाहला कीं पांच हजार फौज घेऊन जाऊन येसाजी सिंदे याचे पारिपत्य करावे ऐसा करार जाहला तो इतकियात येसाजी सिंदे याणी चिकोडी घेतली वे॥ राजश्री महादेवभट विरुपाक्षपंत धरून नेहले म्हणून वर्तमान आले तेव्हा निकडीने नागोजीपंत निघोन गेले त्या संधानावरी आम्ही तांदुलवाडीच्या मुकामावरून येसाजी सिंदे याजकडेस गेलो परंतु भेटीस ते पुढे आले नाहीत. आमच्या दहशतीने ते किल्यावर पलून गेले तो अर्थ सर्व राजश्री अंताजी गंगाधर याच्या पत्री लिहिले आहे श्रीमंत राजश्री भवानरायाकडून कारकून आला होता भेटीचा योग करावा ऐसे म्हणत होते परंतु श्रीमंतानी त्यास उत्तर केले. कीं शरीरास सावकाश नाही भेट होणे तरी राजश्री बापूच्या व राजश्री नानाच्या विद्यमाने होईल मध्ये भेट व्हावयाची नाही राजश्री रामचंद्र

गणेश याजकडील कारकून व पत्रे आली होती परंतु श्रीमंतानी वाववेच सोडून शरीर आरोग्य व्हावे हा अन्वय धरून श्री धोपेश्वरास निघोन गेले आम्ही फौज घेऊन श्रीमंत राजश्री भवानराव याजवरी जात होतो त्यावेलेस श्रीमंताची आज्ञा कीं आपल्या शरीरास बरे वाटत नाही तुम्ही जवळून जाऊ नये येसाजी सिंदे याणी श्रीमंताची भेट घ्यावी इमानास गुंतवावे याजकरिता बहुत उपाय करीत होते येकच होऊन पारपत्य करावे असे म्हणत होते परंतु श्रीमंतानी यैकीले नाही इमान एक तुम्हापासी गुंतले तेच इमान दुसरेकडेस इमान गुंतावयाचे नाहीत येसाजी सिंदे याजकडील कारकून आले होते त्या राजश्री आबा वाठारकर याच्या विद्यमाने दटावून लावून दिले. त्याजवरी मोरो महादेव पेशजी त्याजपासी होते त्या अन्वये त्यास बोलाऊन नेऊन लाख रुपये रोख देत होते श्रीमंतानी तो अर्थ अमान्य केला येक लक्ष बापूपासी व नानापासी आहे तेव्हा दुसरेकडेस इमान गुंतावयाचे नाहीत आम्हास कांहींच लागत नाही श्रीमंताचे शरीर भावना तरी जलोदर जाहले आहे सर्व लक्ष आमचे स्वामीपासी आहे दुसरा विचार नाही सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक ९८ माहे मार्च इ. स. १७७६

श्री

नं. ५

येसाजी सिंदे याजकडील कारकून आले होते त्यास राजश्री आबा वाठारकर याचे विद्यमाने घालवून लाऊन दिल्हे त्याजवरी मोरो माहादेव पेशजी त्याजपासी होते त्या अन्वये त्यास बोलावून नेऊन व नाईकजी घाटगे यास बोलाऊन नेऊन लाख रुपये रोख देत होते परंतु श्रीमंतानी तो अर्थ अमान्य केला एक लक्ष बापूपासी व नानापासी आहे तेव्हा दुसरीकडेस इमान गुंतावयाचे नाहीत.

लेखांक ९९ माहे आगस्ट इ. स. १७७६

रुमाल नं. ७४

फा. नं. ९

श्री

पत्र नं. ६

सेवेसी विज्ञापना ऐसिजे सन खमस सबैन साली येकंदर दरकाची रसद राजश्री जिवाजीपंत याणी सरकारात देऊन कोनेरराव याजबरोबर आले ऐवजाची उगवणी करावी तो तालुकियात कितूरकर याचा दंगा जाहाला त्यामुले महालचे दरकदाराकडून ऐवज झाडून उगवला नाही सरकारची फौज येऊन कितूरकराचे पारिपत्य करून तालुका सोडविल्यावर कांहीं कांहीं माहालाचे रसदेचा फडशा दरकदारापासून करून घेतला कांहीं राहिले तो जिवाजीपंत करवीरकराचे लढाईत पाडाव गेले त्याजवर राहिल्याचे फडशे

करून घ्यावे तो हैदरखानाचा दंगा होऊन साराच तालुका धारवाडचा किला खेरीज करून त्याकडे जाहला त्यामुले पंधरा सत्रा हजार रुपये रसदेची उगवणी होणे राहिली आहे हाली ज्याचे फडशे व्हावयाचे आहेत त्यास तगादे लाविले आहेत श्रोत्रीबावा-सारखे सर्वत्र फिराद करणार यास्तव येकाची वाट पडली म्हणजे त्याचप्रो राहिले ते फडशा करतील नाहीतर समयास जिवाजीपंत नाहीत बाकी फार गुंतली आहे येथ फडशा कोणीच करून देणार नाही यास्तव सविस्तर विनंती सेवेसी लिहिली आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०० तारीख २–४–१७७७

रु. नं. ९० फा. नं. २४

पत्र नं. ४

श्री गज्यानन

राजश्री येशवंतराव सिंदे

सरसुभेदार गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये स्ने॥ हैबतराव घाटगे झुंझारराव रामराम विनंती उपरी येथील क्षेम ता छ २३ सफर मुकाम मुंबई जाणून स्वकीये लिहीत आसिले पाहिजे विशेष यैसीयात आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही हरघडीस येणार वार्तिका बरोबर साकल्य वर्तमान लिहून परामृष केला पाहिजे आपले आहो कृपा करून वरचेवर पत्र पा सांभाल करीत आसावे जबानी सिवाजी पवार सांगिता कलनार बहुत काये लिहिणे. कृपालोभ असो दीजे हे विनंती.

लेखांक १०१ तारीख ३–४–१७७७

रुमाल नं. ९० फाईल नं. ३५

पत्र नं. ४

श्री हेरंब

श्रीमंत क्षत्रिय कुलावतंस

माहाराजश्री छत्रप-

ति स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक आबाजी माहादेव विज्ञापना ता फाल्गुन बहुल दशमी पावेतो आज्ञा-धारकाचे वृत कुशल असे यानंतर विनंती ऐसीजे माहाराज स्वामीनी कृपालु होऊन मकरसंक्रमण निमित्ये तिलशर्करा आज्ञाधारकास प्रेषिली ती पाऊन सिरसा वंदिली केवल आमृतातुल्य हा पदार्थ स्वामीचे कृपेचा होय विशेष सेवेत विनंती लिहिणे माझी शक्ति किती सदैव कृपालुपणे सनाथ करणार माहाराज स्वामी समर्थ आहेत सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १०२ तारीख ३-४--१७७७

पत्र नं. १

श्री हेरंब

राजश्री येसाजी सिंदे सुभेदार

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्रे।। आबाजी माहादेव आसीर्वाद विनंती उपरी येथील कुशल ता। छ २४ सफर जाणोन स्वकीय कुशल लिहित जावे विशेष बहुत दिवस आपणाकडून पत्र येऊन वर्तमान कलत नाही तरी सदैव आपले स्वामीचे व आपले कुशल वृत लिहून तोषवीत जावे यानंतर इकडील वर्तमान सविस्तर संक्राजी पवार व जानोजी भोंगला जबानी सांगता कलेल आपले कर्तेपणाची व तरतुद उपयोगाची रीत यैकोन फारच संतोष जाला आमचाही कस्त तिकडेच यावयाचा आहे व कितेक मसलतीची कामे आहेत भेटीअंती परभारे समजण्यात येतील घोरपडे घाटगे मातबर लोक आपल्यापासी आले आहेत म्हणून ऐकिल्यात आले हे फार उतम असे सर्वांचे समाधान रखून जमाव जाला आहे तो संरक्षण करावा पुणियाहून फौजा रवाना जाल्या आहेत म्हणोन वार्ता आहे त्या विषई येकायेकी कोणास गडबड्ड देऊ नये राजश्री बाजीराव बर्वे याची आपली यैक्यता जालीच असेल कदाचित नसली जाली तरी घडवावी आपण इतका उपद्वाप केवल येकधन्याचे नांवावर केला आहे तेथे सर्व रीती तोडजोडी प्रसंगोपात आपले ध्यानात आहेतच आमचेही मनात बहुत उमेद आहे श्री कृपेने भेटीअंती घडेल ते खरे बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंती.

लेखांक १०३ तारीख ३-४-१७७७

रुमाल नं. ९०

श्री

फा. नं. ३२

पत्र नं. १

राजश्रिया विराजित राजमान्ये

राजश्री परशरामपंत गणपुले

स्वामीचे सेवेसी

पोष्य नारो गोपाल कृतानेक सा। नमस्कार विनंती येथील कुशल तो फाल्गुन वद्य १० दशमी पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष तुम्ही पत्रे सरकारात व आम्हास पाठविली ती पावली त्याची उतरे सरकारचे जासुदाबरोबर पाठविली ती पावलीच असतील तुम्हास राजश्री बाजीराव तात्यानी करवीरास सरकार कामावर पाठविले तुम्ही येऊन सरकार काम चांगले केले म्हणोन तुम्हा उभयतावर श्रीमंताची मर्जी फार खुश आहे पुढे नबाबानी सर्व प्रकारे मसलतीच्या उपयोगी पडावे मागेही शत्रूस नवाबानी पायेबंद

बहुत दिल्हा आहे इकडूनही आंगरेजाचा लढाईच हुकूम लवकरच येऊन खासा स्वारी बाहेर लवकरच पडेल इकडून खासा स्वारी तिकडून नवाबाची फौज तात्यासह असल्यानें फितुरी याचे पारपत्य सहजातच होईल तुम्ही करवीरी कामावर आहा हे यैकोन आम्हास फार संतोष आहे हमेशा नवाबाकडील व राजेश्रीकडील सविस्तर वृत लिहित जावे मालवणच्या गलबता समागमे पत्र पाठवीत नाही आम्ही श्रीमंतापासी आहो कृपा बहुत करितात हे वृत सविस्तर माणकोपंती सांगितलेच असेल मागाहून तुम्ही दुसरे पत्र पाठविले तेही पावले बारभाईकडील बाराजण चहूकडे मनस्याब्याच्या रीतीने आलें आहेत कसे निभेल ते पाहावे श्रीमंत सौ बाईसाहेब रावसाहेब सुधा उजनीस देवदर्शनास गेली आहेत तेथून येऊन श्री मंडलेश्वरी राहतील यैसे दिसते तुम्ही हमेशा पत्र पाठवून सविस्तर वर्तमान लिहीत जावे. बहुत काये लिहिणे लोभकीजे हे विनंती.

लेखांक १०४ तारीख ३–४–१७७७

फा. नं. ३२

पत्र नं. ३

श्री

राजश्रियाविराजित राजमान्यें
राजेश्री माणकोपंत दाजी
स्वामीचे सेवेसी

पे।। नारो गोपाल कृतानेक सां नमस्कार विनंती येथील कुशल ता फाल्गुन वद्य १० दसमीपावेतो वर्तमान येथास्थित आसे विशेष तुम्ही गेल्यावर पत्रे सरकारात व आम्हास पाठविली ती पावली त्याची उत्तरेही सरकारचे जासुदा बराबर पाठविली ती पावलीच असतील त्याअन्वये करावे हाली राजश्री बाजीराव बर्वे यासही लिहिले आहे व हे तुम्हासही लिहिले सारांश नवाबाकडोन एवजाची बेजमी व मसलतीची पुरवणी होय तो अर्थ करावा तिकडील वर्तमान सविस्तर माहाराजाकडील व नवाबाकडील व सुभेदाराकडील व बाजीराव बरवे याजकडील व नवल विशेष वरचेवर लेहून पाठवीत जावे वरकड सविस्तर मजकूर रा।। परसरामपंत याचे पत्री लिहिले आहे त्यावरून कलेल. बहुत काये लिहिणे लोभ करावा ही विनंती.

लेखांक १०५ तारीख ३०–८–१७७७ नंतर

रुमाल नं. ६८ फा. नं.२

पत्र नं. १५ (अ)

श्री

यादी राजश्री चिटको आबाजी फडणीस दि।। श्रीमंत राजश्री पंत प्रतिनिधि याणी

सांगितले कीं फडणीसी व मजमू हे दोनी दरक आमचे पूर्वी पासोन आम्ही वैवाट करीत आलो त्यास कैलासवासी भवानराव सन आर्बा शितैनात मोंगलाईतून आल्यानंतर एक दोन दप्तरचे कारकून आमचे दरकात खलेल करू लागले.
पुढे सन शीत शितेनात भगवंतराव याजकडे प्रतिनिधि जाली तेव्हा भवानराव याणी राजश्री गणेशपंतास समागमे देऊन भगवंतराव याजकडे पाठविले
आपले दरकाचा बंदोबस्त करून घ्यावा तो भगवंतराव याणी फौज जमा केली व कोलपुरची मसलत पडली त्याउपरी करून घ्यावा तो भवानराव खानापुरास आले तेथे समाधान वाटेनासे जाले सबब बेलवडयाचे मु॥ गेले तेथे काळ जाला.

लेखांक १०६ इ. स. १७७७–पावसाळा

श्री

रुमाल नं. ७१
फा. नं. १७
पत्र नं. २३, २४

१

शेवेसी विज्ञापना तुम्ही तर लिहिता कीं लौकरच मुहुर्तांचा निश्चय होईल निघतील आणि आमचे ऐकण्यात तर फौजेस बोलावणी गेली होती त्यास फिरोन पत्रे पाठविली कीं पुढे आलियावर यावे तेव्हा यात काय समजावे म्हणोन आज्ञा यैशास याणी राजश्री येसाजी सिंदे याजकडे र॥ केसो अनंत पाठविले होते त्याणी पत्र पाठविले कीं आपण इकडे येणार यास्तव फौजेस बोलावणी पाठविली त्यास याची हिमत आपणासी लढाई द्यावयाची नाही वहुत करून सलुखच करितील किंवा किला धरितील घोरपडे माने वगैरे आपणास आनकूल आहेत आपण इकडे आलियावर शामील होतील तेव्हा विशेष फौजेचे काम काय? च्यार पांच हजार फौज पुरे इतकेहि आसोन आणखी पाहिजेसी आसल्यास इकडेहि आपली पथके आहेत चहु दिवसात जमा होतील आगोधर फौज बोलाऊन खर्चाखाली यावे इतके कामही नाही यैसे राजश्री आबा चिटणीसानी लिहिले व केसोपंतानी लिहिले त्याजवरून याणी लोकास चिठया पाठविल्या केसोपंतही येसाजी सिंदे यासी बोलून आले त्याचे बोलण्याचे आर्थ हे राज्य सांबाचे आहे मराठी सरदारी पाटीलबावाही मराठे सरदार ज्यात पुरंधरकराचा व आमचा सलुक करून द्यावा हे उतम पूर्वी येविसी आम्ही पाटील-बावास पत्रे पाठविली परंतु उतरे येथास्थित न आली याजकरिता आम्हास हैदरखाना-कडे सूत्र लावणे प्राप्त जाहले त्यास हाली पाटीलबावा इकडे येतात उतम आहे पाटीलबावानी दरम्यान पडोन सलुक करावा विहित आहे त्याजवरून केसोपंत बोलले

१ महादाजी बलाल यांचें पत्र.

कीं पाटीलबावानी याजकरिताच पाठविले पुरंधरकराचा तुमचा कलह याजमुले तुमचेही मुलुकाची खराबी सरकारचीही खराबी मुलुक लुटला गेला फौजेसही चालीस पनास लाख रुपये खर्च जाहले तुम्ही हैदरखानाचे सूत्र लाविले त्यास हैदरखानाने राजे घेतली त्याचे बंदोबस्त किती करून दिल्हे ते तुमचे होतील ? आमचे श्रीमंत राजेश्रीस मुजरा तरी करितात हैदराकडून तेही घडणार नाही यात जीव कांही नाही पाटीलबावाचा या राज्यासी घरोबा आहे ते इकडे देवास येणार तेव्हा बखेडा टाकोन जाता येत नाही तुमचा सलुख पडल्यास पाडावा नाही तर धन्याचे आज्ञेप्रमाणे चाकरी केली पाहिजे यास्तव आपले बोलण्याचे आशय समजले पाहिजेत त्याजवरून येसाजे सिंदे बोलले कीं पाटीलबावाचा सलुक व्हावा हे मानस आहे उत्तम आहे हाच खंबीर आसल्यास निश्चयात्मक पत्र पाठवावे त्याप्रो आम्ही आपले मतलब जाबसाल लिहून पाठऊ यैसे बोलोन केसोपंतास निरोप दिल्हा त्याजवरून केसोपंत आले येथून पत्रे पाठविली कीं आपणाकडील कितेक आर्थ समजणे व आम्हासही बोलणे त्यास तुम्हाकडील शाहाणा येख्तयारी कोणी पाठऊन द्यावा यैसी पत्रे पाठविली तिकडून कोणी आलियावर बोलवयाचे त्याचे आर्थ कलतील ते लिहून पाठऊ दुसरे काल तिकडून बातमी येथे आली कीं घोरपडे वगैरे मंडली याणी येसाजी सिंदे यास तलबेकरिता आडविले परंतु प्राप्त कांहीं जाहाले नाही सेवटी वाइदा मुदत करून राजश्री रामचंद्र गणेश याजकडे सूत्र लाविले कीं आम्ही येसाजी सिंदे यासी मिलोन सरकारी फौजेसी झुंजलो येविसीचे दोष माफ आसल्यास आम्ही निरोप घेऊन घरास जाऊ यैसे सांगोन पाठविले त्याजवरून रामचंद्रपंत तात्यानी वचन प्रमाण दिल्हे याकरिता घोरपडे वगैरे तात्यास भेटून आपल्याले घरास गेले येसाजी सिंदे गडावर गेले यैसे येथे वर्तमान आहे तथ्य आसल्यास आपणास लिहिले आले आसेल
+
आईकिले वर्तमान लिहिले आहे पुढे होईल ते लेहून पाठऊन शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १०७ तारीख १७-२-१७७८

श्री

रुमाल नं. ९०
फा. नं. ३१
पत्र नं. १

राजश्री येशवंतराव दिवाणजी
गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य श्नो। येशवंतराव संकपाल दंडवत विनंती उपरी

+ येथून पुढें हस्ताक्षर लेखकाचें.

येथील व्रत ता। छ १८ मोहरम मु।। करवीर येथे येथास्थित आपले दये करून असो विशेष पूर्वींचे आमचे वृत आपलियासी कचे कललेच आहे त्यावरून येथून निघोन राजश्री माहादजी सिंदे याजवल आलो त्याणी अभय देऊन जवल ठेविले करवीरावरी युध्य जाहले ते समई चिरंजीव मानाजी संकपाल यासी दंडासी जखम गोलीची लागली. बरी जाहाली घोडा दरवाजियापुढे ठार जाहाला काजकाम आपले कृपेकरून बरेच जाहाले पाटीलबावा दया फार करितात परंतु निजध्यासी आपला आम्हास रात्रदिवस लागला कीं चरणाचे अवलोकन येजमानाच्या करावे आणि आपले भेटीचा लाभ घडे ऐसे करणार आपण आहेत आम्ही आपले कुटुंबाचे आहो फार विस्तार ल्याहावा तरी उपरोध दिसतो येजमानासी विंनंती पत्र लिहिले आहे ते आपण प्रविष्ट करून श्रवण करावे सारांश आम्ही आपले पदरीचे आहो. बहुत काये लिहिणे कृपालोभ कीजे हे विनंती.

तारीख ६–५–१७७८

लेखांक १०८

श्री

रु. नं. ७४
फाइल नं. ४
पत्र नं. ३

श्रीमंत राजश्री नाना स्वा-
मीचे शेवेसी

विनंती सेवक रामचंद्र नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ता। वैशाख शु।। १० पर्यंत स्वामीच्या कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान यथास्थित आसे विशेष इकडील वर्तमान तरी किले कोपलास हैदरखान याणे येऊन वेढा घातला आहे चेनगिरीहून तोफा आणून लाविल्या आहेत तोफाची मारगिरी बहुतच होत आहे किल्लेकरी याणी आजपरयंत बरीच हिंमत धरून शत्रूबरोबर झुंजत आहे सत्वर उपराला करावा म्हणोन किल्यातून पत्रे आली त्याकरिता मनोलीहून लस्करापर्यंत आलो उपराल्याकरिता फारच येत्न केला परंतु फौजा माघारे फिरत नाहीत तेव्हा उपराला व्हावयाचा राहिला हे समजोन दोन चार पत्रे स्वामीस पाठविली आहेत पावली आसतील त्यावरून सविस्तर वर्तमान विदित जाहाले असेल कोपलासारखा जागा उपराला न जाल्यास स्थल कसे राहील तमाम जमीदार सावणूरकर सुधा शत्रूस मिलोन आहेत राहाता दोन लोक राहिले आहेत. स्वामीनी फौजेची रवानगी केल्यास किल्याचा बचाव होतो नाहीतरी कोणता जागा त्याच्या दहशतीने राहावयाचा नाही कोपलकरी याणी आजपर्यंत बराच दम धरिला आहे सत्वर उपराला जाहाल्यास शत्रू उठोन जाईल आणि किल्याचा बचाव होईल उप-राल्यास फौज रवाना जाहाली दोन चार मजली फौज आली हे वर्तमान त्यास कलतच तो तेथे बसणार नाही राजश्री महादजी शिंदे पाटीलबावा करवीराहून कूच करून च्यार

कोसी मुकाम केला आहे त्याची रवानगी उपराल्या करिता जाहाल्यास शत्रूस दुरकशा[1] बसेल किल्यास निकड फारच केली आहे फौज आली हे वर्तमान कलताच किल्यास निकड करणार नाही याप्रसंगी श्रीमंताचे पुण्यप्रतापे करून किल्लेकरी याणी त्याजबरोबर लढतात तेव्हा चार दिवस दम धरोन हिंमतीने झुंजत आहेत परंतु फौजेचा उपराला जाहला पाहिजे उपराला करून स्थलचा बचाव करणार स्वामी समर्थ आहेत कोपलास फौज पाठऊन उपराला केला तरी धारवाडच्या किल्याचा बचाव होईल कोपलाचा उपराला जाहाला नाही तरी मग कोणते स्थल राहाणार नाही याकरिता वारंवार सरकारात विनंती लिहितो किरकोल फौज पाठविल्याने कुमक होत नाही तेव्हा सेवकाचा उपाय चालत नाही मातबर फौज पाठवून कोपला बचाव करावा कोपल राहिले तर धारवाड राहाते कर्नाटकच राहाते कोपल गेलेवरी कोणते स्थल राहात नाही याकरिता सूचनार्थ विनंती लिहिली आहे. सेवेसी श्रुत व्हावे हे विनंती.

लेखांक १०९

तारीख ३-१-१७७९

फाईल नं. ५

रुमाल नं. ७३

पत्र नं. ५

श्री जगदंबा.

गोब्राह्मण प्रतिपालक धर्मपरायेण राजमान्य
राजश्री नाना प्रभुवर्यांन यासी

प्रति गोपालभट कविठेकर कृतानेक आसीर्वाद विज्ञापना येथील क्षेम ता पौष वद्य प्रतिपदा रविवार मे॥ चिकोडी जाणून स्वाभ्युदये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष जे आपला निरोप घेऊन आलो ते शुध चतुर्दशी शुक्रवारी चिकोडीस पोहचलो तो राजश्री येसाजी सिंदा याणी येलगुड घेतलेच होते बारवाड घेऊन भोज वगैरे खेडयास नदी उतरोन येणार असी बातमी आली भोजेस राजश्री बाबूराव याच पथक व त्रिंबकराव मामा याजकडील पथक मात्र होते वर्कड हुकेरीकडे सटवाजी भोसल्याचा दंगा जाहाला याजमुले राजश्री बचाजीपंत व राजश्री अंताजीपंत चिकोडीकर या उभयेता आपली फौज सुधा आले सटवोजी भोसले याणी बागेवाडी नजीक यादगोड म्हणोन लाहान गडी आहे तेथे त्यास वेढा घातला होता उभयेताणी फौज सुधा येऊन वेढा उठऊन सटवोजी भोसला मोडला पलोन हुकेरीस गेला दोन कोशपर्यंत पाठलाग केला होता नाश त्याचा बहुत जाहला तेथून येऊन उभयेताचा मुकाम चिकूडीसच जाहला होता इकडे येसाजी सिंद्याच्या चडावा मुले चिकोडीची फौज न्यावयास शुक्रवारी प्रातःकाली बाबूराव आले होते इतकियात माघे फौज स्वरूप आहे समजोन येसाजी सिंदे याणी शुक्रवारी संध्याकाली छापा

---

१ दोन्ही बाजूंनीं शह.

घालवयास आला पुढे त्याचा सबीना होता त्याणी ताबडतोब बातमी फौजेत कलविली त्यावरून लवकरी जीनबंदी करून सिंद्याचा राऊत व प्यादियाचा जथ आपणापेक्षा बहुत यामुले गावचा आश्रयाने राहिले त्याणी बारवाडास ठाणे घालोन भोजेच्या आखरावरी येऊन उभे राहिले रातोरात भोजेहून वर्तमान घेऊन कारकून चिकूडीस आला त्यावरून राजश्री बाबूराव याणी उभयेताची फौज घेऊन दाहा घटका रात्र बाकी असता निघोन गेले चारी घटका रात्र बाकी असता गाठ घातली जुंज चांगले जाहाले येसाजी सिंदा यास भाल्याची जखम आहे व तरवारेची जखम चिलक्षतावरी लागली गोविंदराव घाटगे पाडावा आले शे दोनशे हत्यारे घेतली प्यादियाचा नाश बहुत जाहला आठ दहा घोडी पाडाव आणिली इकडीलही भला माणूस येक ठार जाहाला कांहीं जखमी आहेत कोश-पर्यंत पाठलाग केला येसाजी सिंदा सांपडावा असाच योग परंतु ईश्वरीसूत्रापुडे उपाये नाही जाऊन सावगावच्या ठाणेवरी जथोन उतरले आहेत जाहाले वर्तमान सेवेसी कलावे म्हणोन लिहिले आसे श्रीमंताचे पुण्य विचित्र आहे मागाहून होईल ते वर्चेवरी लिहितो सर्व मानाभिमान माझा स्वामीस आहेच कृपा करून उतर पाठवून द्यावे. विशेष कार्ये लिहिणे दया असो द्यावी हे विनंती.

लेखांक ११०　　　　　　　　　　　　　　　　तारीख ९-४-१७८०

श्री

फाईल नं. १२

नं. ५

राजश्रियाविराजि राजमान्ये राजेश्री

गंगाधरपंत स्वामी गोसावी यासी

पे॥ श्रीनिवास शामराव नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणून ता॥ चैत्र शुध पंचमीपर्यंत कुशल असे करवीरकराकडील फौजेचा दंगा अधिकोत्तर जाला आहे पेशजी धरणाचे रेठरे लुटून जालिले बारा आसामी गावचे कुणबी ठार जाले हे व बिलासी व शिराले खुर्द वगैरे पांच सात गावचे पाटील स्वारी घालून धरून नेले हे पेशजी तुम्हास लि॥ गेलेच होते त्यावर मध्ये आठ दिवस स्वस्थ होते हाली काल परवाच्या दिवसात राजश्री परशुरामभाऊ फौजसुधा करवीराकडे व घुमटाचे शिरवळाकडे गेले त्यामुळे इकडे रान सुने पाहून राजश्री मानाजी सिंदे व सटवाजी भोसले याणी स्वारी करून शिराले व वालवे प्रांतीचे गाव लुटले व जालले ब्राम्हनाळाच्या संस्थानाकडे कारवे प्रा शिराले हा गाव आहे तो गाव लुटिला व जालिला गोसावी याचा वाडा जालला त्यात गोरगरीब चालीस पनास माणूस जलाले म्हणोन वर्तमान आहे थोरले शिरालियाची गुरे नेली होती त्याजवर भोसले याची स्वारी जाऊन लडाई जाली गुरे सोडविली परंतु इकडील तिकडील दाहा पाच माणूस जाया जाहले ऐतवडे याची गुरे नेली व वसी चिकुर्डे व

मांगले इंगरुल वगैरे गावची गुरे वळून नेली व पाटील धरून नेले याप्रमाणें या दो ती दिवसात त्याणी दंगा केला फौज तैसीच अजून आहे पुढे आणखी कोठवर धावतील न कळले या प्रा॥ वर्तमान कराड प्रांतीचे गाव पळोन कराडात आले कामेरी मंत्रीचा गाव मामलत सुरलीत चालो देत नाहीत खानापूरचा वसूल बंद माईणी माहालची तीच अवस्ता राजश्री गणेशपंत दादास येविसी सांगावे कीं भिवराव हुजूर मान्याचे वाड्यात कोणी गेला तर पारपत्य करू म्हणतात याविसीचा बंदोबस्त करावा. बहुत काय लि॥ हे विनंती.

लेखांक १११ माहे एप्रिल इ. स. १७७९

श्री व्यंकटेश प्र॥

फा. ७

नं. ८

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

सेवक वेंकटराव नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष स्वामीनी कृपा करून श्रीमंत राजश्री पंतप्रधान याचे वृतबंधाबद्ल तुम्हास राजश्री केसो लक्ष्मण व चिमाजी गायेकवाड व रघोजी चव्हाण यासमागमे तीवट एक व शालजोडी पाठविली म्हणोन कृपायुक्त आज्ञा केली आज्ञे प्रमाणे परिधान केली राजश्री सखारामपंत याणी पाचा लक्षाचा मजकूर लि॥ तो मान्य केला परंतु सावकारी निशा आजच व्हावयाची कठीण राजधानीत किमपि बाकी राहिली नाही मध्येस्थानी उभयेपक्षी नासून या थरास आणिले परंतु हे राज्य सिवशाई तेव्हा परमेश्वर याचे साभिमानी आपणास कले त्यापक्षी आपण बरे तेच करीतील हमीचा प्रकार तोडमोडीचा राजश्री सखारामपंत यासी लि॥ आहे ते विनंती करितील तो अर्थ ध्यानी आणून येश द्यावे सर्व प्रकारे स्वामीचा भरवं (सा) धरून स्वस्तःआहो + बहुत काय लिहिणे कृपाकीजे हे विनंती.

लेखांक ११२ तारीख २५–५–१७८०

श्री गणपति

पत्र नं. ३८

पै॥ छ २५ जमादिलावल

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

नाना स्वामीचे सेवेसी

पे॥ परशराम रामचंद्र कृतानेक सां॥ नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता॥ छ २० जमादिलोवल मु॥ गोकाक जाणोन स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष आपण

छ ७ जे॥वलची पत्रे पुरवण्यायुक्त पाा ती छ १४ मिनहूस सामानगडाचे मुकामी पावोन लेखनार्थ कलो आला पनवेलीस इंग्रज आले होते त्याजवर राजश्री बाजीपंत आणा व सखारामपंत पानसे सरकारांतून रवाना केले होते त्यानी गांठ घालोन पांचसे इंग्रज कापून काढले व पाच तोफा पाडाव करून आणिल्या याउपर परसीक व बेलापूर राहिले आहे तेही लौकरच येईल इकडे उभयता सरदारानी इंग्रजावर जरब चांगलीच बसविली आहे सरदाराचे कुमकेस राजश्री भवानी सिवराम याची रवानगी होत आहे म्हणोन लि॥ येशास पनवेलीस इंग्रज आले होते त्याचा तर रेच चांगला मोडला पांच तोफा पाडाव व पांचसे माणूस कापून काढले मोठीच गोष्ट जाली हे वर्तमान यैकून बहुत संतोष पावलो मुख्य श्रीमंताचा प्रतापच थोर आहे राजश्री भवानीपंत सुभेदार याची रवानगी सरदाराकडे केली उतम जाले सरदारानी इंग्रज आया आणिले आहेत त्यापक्षी याउपर तेही इंग्रज फजीत पावतील गोपाल भट कवटेकर अद्याप आले नाहीत आल्यावर सविस्तर समजेल करवीरकराचा ठराव निदान करावयाचा प्रकार तपसीलवार लि॥ तो कलला बालाजीराम येऊन गेल्याचा मजकूर वरचेवर आपणास लिहिलाच आहे त्याचे बोलणे सेवटास जाणे हा अर्थ समजलाच आहे पुढे होईल ते खरे प्रस्तुत करवीरकर बाहेर निघोन वालवे व मिरज तालुकिया परियेंत स्वाऱ्या सिकाऱ्या करतात म्हणोन वर्तमान आले आहे त्याच्या तोडावर दोन हजार फौजेनिसी राजश्री व्यंकटराव दादा घोरपडे इचलकर्जीस ठेविले आहेत हेही तलावे करीत असतात कितूरकर देसाई गोकाकेस आहे ही बातमी राखोन येथे आलो गावास वेढा दिला आहे हे वर्तमान परवाचे पत्री सविस्तर लिहिलेच आहे यावरून विदित जालेच आसेल मु॥ मजकुरास येऊन सहा दिवसं जाले मोर्चेबंदी करून तोफा सुरू केल्या आहेत गावात तीनसे पर्यंत राऊत व दीड हजारपावेतो प्यादा आहे श्रीकृपेकरून याउपर येथील फडशा लौकरच होईल येथील बोलणेही लागले आहे मागाहून सविस्तर लिहोन पाठवितो भोसल्याचे पथक पाठवावे म्हणोन लिहिले त्यास करवीरचा तह जाहाला नाही त्यापक्षी दोन हजार फौज छावणीस पाहिजे इतलाखी ठेवावी तर खर्चाचा आजमास ध्यानातच आहे यास्तव पाठविले नाही कितुरकराचा जाबसाल विल्हेस लागल्यानंतर करवीरचे सालमजकुरी विल्हेस लागेल नाहीतरी चिंता नाही दसरा जाहल्यानंतर जसे पाहिजे तसे विल्हेस लागेल. बहुत काय लिहिणे कृपा करावी ही विनंती.

लेखांक ११३ तारीख २९-५-१७८०

पत्र नं. ५२

पौ छ २८ जोवल

समानीन हा॥ सांडणीस्वार

श्री गणपति

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विंनंती सेवक परशराम रामचंद्र कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ताा छ २४ जमादिलोवल पर्यंत स्वामीचे कृपेकडून येथास्थित असे विशेष आम्ही गोकाकेस येऊन गावाभोवता वेढा घालून बसलो आंत कितुरकर देसाई यास कोंडिले ठाण्यास मोर्चे लाविले हे वर्तमान पेशजी सेवेसी दोन वेला लिहिले व त्याजकडून सलुखाचे बोलणे लागले हेही लिहिले आहे ऐसियास त्याजकडील खंडणीचा ठराव होता होता आम्हाकडील बाकीच्या ऐवजासुधा सरकारची खंडणी तेरा लक्ष रुपये ठरले व सरकार तालुका सोडावा याप्रो होऊन राजश्री गंगाधरराव रास्ते व चिरंजीव राजश्री रघुनाथराव व राजश्री दौलतराव घोरपडे व आंताजी शामजी चिकोडकर या मध्यस्ताचे विद्यमाने छ २३ रोजी रविवारी रात्रौ देसाई + + + बाहेर निघोन भेटीस आला ठाणे रिकामे करून दिल्हे सरकारचे निशाण चढले खंडणीच्या ऐवजाची निशा मात्र व्हावयाची आहे ती जाल्यानंतर देसाई यास कितुरास जावयास निरोप द्यावा याप्रो मध्यस्ताचे विद्यमाने करार आहे त्या बमोजीब निरोप देऊन आम्ही येथून कूच करून कडकोल पर्यंत जाऊन माघारे फिर(तो) तो करवीरकराकडील खंडणीचा बनाव बसत नाही त्याजकडील बालाजी राम वकील लस्करात आले आहेत परंतु त्यास ऐवज द्यावयास मिलत नाही व कारभारही ब्राष्कल सबब खंडणी होत नाहीं. प्रजन्याचे दिवस लस्करचा निभाव होणे कठीण याजकरिता राजश्री शाहाजी भोसले याजकडील पथक याप्रांती व करवीर प्रांती दोन हजार फौज ठेऊन बंदोबस्त करितो सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

रुमाल नं. ९० फाईल
नं. १

लेखांक ११४

माहे मे इ. स. १७८०

श्री गणपति

पत्र नं. ४३

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

१

विनंती उपरी करवीर तालुकियात फौज छावणीस ठेविल्याखेरीज ठीक नाही येक पंचगंगेच्या दक्षिणतीरी कागल कोडोलीपासी चिकोडी तालुका व पंचगंगेच्या उतरतीरी सिरोल अलत्यापासी असी दोही जागा फौज ठेविली पाहिजे त्यास रास्ते व आम्हाकडील कांहीं व जाधव वाघोलीकर व बारामतीकराकडील पागा याजप्रा सरंजामी व सरकारच्या पागापैकी व कांहीं इतलाख लोक येणे प्रो दोही तोंडी फौज राहिली म्हणजे त्याजकडील तालुकीयाची लावणी फार करून होणार नाही व चहुकडून दाणादुणा जाईल त्याची बंदी

१ परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं लिहिलेलें पत्र.

होईल करवीर व पन्हाला याच्या पश्चमेस कांहीं लावणी होईल तो मुलुक सालीचा पिके जाहली म्हणजे छावणीस फौज राहील ती पिके चारितील तेव्हा करवीरास व किल्यास दाण्याचा मोठाच पेच पडेल फौज छावणीस जरूर राहिली पाहिजे तीन हजार फौज करवीर तालुकियात राहिली पाहिजे पंचगंगा नदी आहे त्याच्या दक्षणतीरी तालुका आहे तिकडे सुमार दीड हजार व पंचगंगेच्या दक्षणतीरी दोन हजार याप्रो फौज राहिली पाहिजे तेव्हा बंदोबस्त होईल फौज राहिली म्हणजे नवे लोक तिकडे चाकरीस कोणी जाऊ पावणार नाहीत जुने आहेत वरचेवर उठोन येतील फौज राहिली म्हणजे आपल्या तालुकियाची लावणी होईल सिबंदी जाजती पडणार नाही शत्रूच्या तालुकियाची लावणी होणार नाही नित्यउपद्रव फौजेचा त्यास लागेल असे होता दसरापावेतो कांही आपनावर आले तर न कले असा प्रकार आहे यास्तव याप्रो तरतूद करून सरंजामी व इतलाख मिलोन पाहून ठेवितो. बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

लेखांक ११५ तारीख २–६–१७८० नंतर

श्री गणपति

पत्र नं ३५

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपर तुम्ही व्यंकटराव घोरपडे यासी करवीरकराच्या बंदोबस्तास ठेऊन गेला परंतु करवीरकराचा जमाव येऊन जयराम स्वामीचे वडगाव मारून नेले व्यंकटराव याचे वस्तु कांही जाहाले नाही त्यास आणखी फौज पाठऊन बंदोबस्त करणे म्हणोन लिहिले त्यास मी इकडे येऊ लागलो तेव्हा श्रीमंत रा॥ व्यंकटराव दादा समागमे फौज ठेऊन आले परंतु थोडे होते ते कामेस लागले तो करवीरची फौज तिकडे गेली म्हणोन कलले त्यास हे काम टाकून फौज पाठविता न ये यास्तव दोन दिवस लागले तो त्यानी वडगावास उपद्रव केल्याचे पत्र आले तो गोकाकचा फडशा जाहाला नंतर तेच दिवशी चिरंजीव राजश्री आपा समागमे तीन हजार फौज देऊन रवाना केले म्हणोन पेशजी लिहिले होते चिरंजीव जातो तो ते स्वारी घेऊन माघारे फिरले लागलेच स्वार होऊन वाघापूर म्हणोन परगण्याचा गाव तेथे सिवाजी भोसले आड्रूकर होते त्यानी करवीर प्रांत फार उपद्रव मांडिला कांहीं ठाणी घेऊन आम्ही त्याचे स्वाधीन केली होती यास्तव त्यास गाठले येसाजी व मानाजी व सटवाजी त्रिवर्गही होते हे बातनी इचलकरंजीस चिरंजीव आपास कलताच भृगुवारी सडे होऊन दोनप्रहरास वाघापुरास आले येथे जुंज[१] होऊन सिंदा मोडला सरकारचे फौजेस येश आले म्हणोन चिरंजीवाचे पत्र आलेचे पा। आहे त्याजवरून

परशुरामभाऊ पटवर्धन यांनीं लिहिलेलें पत्र.

१ वाघापूर येथे जुंज तारीख २–७–१७८० रोजीं झालें.

कलेल श्रीमंताचे प्रतापेकडून सरकारचे फौजेस येश आले याउपर तिकडील बंदोबस्त होईल स्वारी करू पावणार नाहीत. बहुत काये लिहिणे कृपा करावी हे विनंती.

लेखांक ११६ तारीख ३–६–१७८०

श्री गणपती

रु. नं. ७३
फा. नं. ४
पत्र नं. ३

पै।। छ २९ जमादिलावल सन समानीन जेष्ट सुध प्रतिप्रदा मु।। कोडलवाड ते।। मनोली

आपल्ये रामचंद्राने सिरसं।। नमस्कार विज्ञापना ता।। ज्येष्ट शुध १ मंदवार मु।। वाघापूर येथे वडिलाचे आशीरवादेकरून समस्त सुखरूप असो विशेष वडिलाची आज्ञा घेऊन निघालो ते गुरुवारी तिसरेप्रहरी इचलकरंजीवर आलो तो श्रीमंत राजश्री व्यंकटराव दादाकडील बातमीचे पत्र प्रहर दीडप्रहर रात्री कोगनोलीहून आले की वाघापुरास येसाजी सिंदे व सटवोजी भोसले व मानाजी शिंदे येऊन वेढा घातला त्यावरून आम्ही प्रातःकाली भृगुवारी जीन ठेऊन निघालो तो मु।। मजकुरी त्याजकडील फौजेची व आमची दोन प्रहरी गाठ पडली ल्ढाई जाली त्याजकडील स्वार हजार व दोन तीन हजार प्यादे याप्रमाणे होते वडिलाचे आसीरवादेकरून आपल्या फौजेस यश येऊन शत्रूचा मोड जाला तैसेच फौजसुधा पाठलाग केला दोन अडीचशे घोडी सांपडली व पालख्या तीन व गुरे हजार दोन हजार आली आम्ही माघारे उलटून गंगापुरावर येऊन राहिलो तो गावात त्याजकडील पलाले लोक व दोन तीन ब्राह्मण व हुजरे याप्रमाणे होते ते स्वाधीन करीनात यास्तव त्याचे पारिपत्य यथास्थित केले सेवेसी विदित होये रात्री मु।। मजकुरास आलो आज प्रातःकाली कूच करून कागनोलीस राहू उदैक इचलकरंजीस जाऊ हे विज्ञापना.

लेखांक ११७ तारीख ३–६–१७८०

श्री गणपती

नं. ४

पैा छ २९ जमादिलावल सन समानीन जेष्ठ सुध प्रतिपदा मु।। कोडलवाड विज्ञापना करवीरकराची व आमची वाघापुरावर गाठ पडली तेसमई येसाजी सिंदा व मानाजी व सटवोजी यैसे त्रिवर्ग फौजेत होते त्याचा मोड जाल्यानंतर भूदरगडाकडे पळू लागले त्याचा पाठलाग वाघापुरापासून दोन अडीच कोस भूदरगडच्या माचीपर्यंत केला ते गडास जाऊन दाखल जाले आम्हाकडील येक घोडा ठार व दोन च्यार जखमी व दोन च्यार माणूस जखमी वरकड सर्व खैर आहेत सटवाजीस गोळीची जखम लागोन जेर आहे म्हणोन वर्तमान आहे हे विज्ञापना.

लेखांक ११८ तारीख ६-६-१७८०

श्री गणपती

पत्र नं. ३२

पो छ ६ जमादिलाखर इहिदे समानीन

राजश्रियाविराजित राजमान्य

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य परशराम रामचंद्र कृतानेक.सां नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता।। छ २ जमादिलाखर जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष इकडील वर्तमान व आपले पत्राची उतरे आसी आलाहिदा पूरवण्या लिहिल्या आहेत त्याजवरून कलेल रा येसाजी सिंदे याचे पत्र आपल्यास आले ते आपण पाहावयासाठी पाठविले व उतराच जाब दिल्हा त्याची नकल पाठविली ती पाऊन संतोष जाहला रास्ते मध्यस्त आहेत त्याचेच विचारे करीत असता बनले नाही परंतु त्याणे आसे लिहिले चिंता काये आहे आपण रास्ते यासी लिहोन कोणी ओढले हे मनास आणू नये आसे आपण उत्तर दिल्हे ते चांगलेच दिल्हे बरे काये चिंता आहे ? श्रीमंताचे प्रतापेकडून लौकरच तह करील कार्तिकाचा महिना मात्र कोणीकडे गडबड नाही आसा व्हावा मग पाहातच आहो बहुत काय लिहिणे राजश्री सिवाजीपंत म्हसकर आपणापासोन निघाले ते काल येऊन पावले. बहुत काय लिहिणे कृपाकीजे हे विनंती.

लेखांक ११९ माहे जून इ. स. १७८०

श्री

फा. नं. ४

पत्र नं. ३७

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सदासिव आंणाजी व बाजी नीलकंठ कृतानेक सीरसाष्टांग नमस्कार विज्ञापना मुकाम आकीवाट सेवकाचे वर्तमान यैथास्थित असे स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते बागेवाडी प्रांत हुकेरी येथे लष्करात दाखल जाहालो श्रीमंत राजश्री व्यंकटराव घोरपडे याची भेट जाहाली पत्रे देऊन गणती घ्यावयाविसी पुसिले उपरांत म्हणो लागले की करवीरच्या तोंडावर पतके व गावगना स्वार पाठविले आहेत दुसरे रोजी कूच होऊन गोकाकेवर तेथे गेले गणती जी फौज तेथे होती त्याची घेतली तो राजश्री परशरामपंत भाऊ आले उपरांत उभयेतानी मिलोन गोकाकेवर हला करून पेठ घेऊन किल्यास मोर्चेबंदी करून बैसले दुसरे रोजी रात्रौ आतील लोक पलोन गेले ठाणे रिकामे जाले मग याणी ठाणे बसविले. (अपूर्ण.)

लेखांक १२० तारीख २०-७-१७८०

श्री

रु. नं. ७३

वडिलांचे शेवेसी अपत्ये समान पांडुरंग बाबूराव चरणावर मस्तक ठेवून सीर साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ १७ रजब पावेतो वडिलाचे आसिर्वादे करून क्षेम असो विशेष इकडील वर्तमान तर राजश्री बाजीराव गोविंद बर्वे व मानाजी फाकडे व सटवाजी भोसले वगैरे सरदार पाच सातशे रावतानसी आकस्मात साल्हेरीस येऊन वाघाब्याचे घाटे चिंचली पाड्यास उतरले हे वर्तमान राजश्री दुर्गोजी भापकर यासी कल्ल्याउपर यानी लगट करून केल खामले म्हणोन गाव आहे त्याचे रानात गाठ घातली त्याची याची चोटफेट चांगली जाली उभयताकडील माणसे पाडाव व जखमी बहुत जाले शेवटी भापकर माघारे सिरवडे नजीक वारसे येथे मुकामास आले त्यानी काल सिंनदेस मुकाम करून आज सादड विहिरीस गेले पुढे श्रीमंताकडे सुरतेस जात आहेत याप्रमाणे बातमी पत्र वारशाहून चिमणाजी वामन याचे आले तेंच बजिनस पाहावयासी पाठविले आहे भापकर पिपलनेरचे मुकामी दाखल लौकरच होतील त्रिवर्ग देशातून दंगा करून आले ते सुरत पावेतो चांगलेच निभाऊन गेले पुढे खुल (खूळ) सत्वरच होईलसे वाटते वडिलास श्रुत होय. हे विज्ञापना.

पै॥ छ १८ रजब

साईकाल मु॥ नामपूर.

लेखांक १२१ तारीख २३-८-१७८०

श्री गणपति

पत्र नं. ५०

पैा छ २५ साबान

इहिदे समानीन

राजश्रियाविराजीत राजमान्य

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पो परशराम रामचंद्र कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ २२ साबान बुधवार जाणून स्वकीये कुशल लखन करीत गेले पाहिजे विशेष आपण छ १९ साबान रविवारचे पत्र पा। ते भोमवारी दोनप्रहरी पावले अक्षरशा सर्व आर्थ समजला सारांश इंग्रजाची मसलत मोठी उभयता सरदार हिंदुस्थानातून कंपू येतात त्यास गुंतले देसी इंग्रजानी फैलाव केला गुजराथ तर गुदस्ताच गेली सालमजकुरी नंदुरबार सुल्तानपुरपावेतो ठाणी बसवीत आले विसाजी आपाजी व गणेश विश्वनाथ होते त्यात विसाजीपंत देसी आले गणेशपंत तिकडे आहेत त्याजवर गुदस्ता छापा पडल्यापासून

गलाठ्यात आहेत त्याचे हातून तिकडील सांभालत नाही तुम्हास करवीरच्या मसलतीस गुंतविता येत नाही चोहूकडील खुले सांभालत नाहीत आजपावेतो करवीरकराचा राजकारण ठीक नव्हते प्रस्तुत बोलणे लागले आहे त्यातील आर्थ पाहता दरबार खर्च सुध्धा पांच देतील परंतु निशा नाही कांहीं तूर्त व येसाजी सिंदे याचा जावई व आणखी दोघे बोलीस द्यावे परंतु लाट रांगोली द्यावी हे नवच बोलणे काढले आहे सावकाराकडील ठाणी आहेत ती सरकारात ठेवावी रुजवात ठरेल तैसे करावे हे न पटे तर इंग्रजास सामील करून घ्यावे आसे अंतरयामीचे मनसबे त्याचे पाहाता हियासिवाय (हिय्यासिवाय) गत्यंतर नाही लाट रांगोली द्यावी तेव्हा आजपावेतो केले काय न करता

१

गत्यंतर नाही येविसी नवाबानीही बहुतवेल लिहिले होते म्हणून लि॥ त्यास सर्व खरेच आहेत इंग्रजाची मसलत मोठी उभयता सरदार तिकडे गुंतले हे ठीक नाही गुदस्ता उभयता सरदार देसी होते म्हणूनच इंग्रजास जरब बसली देसी फौज फार आहे परंतु पैका नाही खर्चाची आडचण तेव्हा फौजचा जथ पडोन काम होणे याचा विचार आतापासून होऊन फौजेचा जथ पडेसी योजना व्हावी करवीरकराच्या तहचा मजकूर त्यास पाच ते देणेकर तेही तूर्त नाहीत बोली देणेकर त्याही पैका द्यावयाजोग्या नाहीत आजपावेतो या मसलतीस खर्च जाला पैका तो तर उगवतच नाही परंतु ठाणी घेतली आहेत त्याच्या सिबंदीचा ऐवज तर देऊन ठाणी मोकली जाली पाहिजेत किंवा नाही नाहीतर ठाणीतरी त्याचा पैका दिल्यासिवाय कसी सुटतील ? इंग्रजास करवीरकर मिलतील म्हणून मध्यस्थ बोलतात यास्तव तिकडे मिलतात याज करिता समेट करावा तर करवीरकराच्या वस्तू इंग्रजास मिलऊन घेवत नाही येक करवीर ठाणे राहिले आहे ते इंग्रजास देतील तेव्हा राहिले ते काय तोरा खरा परंतु माहाराज राज आमुक काज स्वता करितात आसे लौकिकांत कोठेही नाही जो आहे तो येसाजी सिंदा आहे आसे प्रकार आहेत तत्रापि पैकाची गोष्ट कबूल जाले तरी नानाप्रकारच्या कलमाच्या दिक्कती अनेक प्रकारच्या आहेत तेव्हा सेवटास जाईल असे वाटतच नाही रास त्याचा अथवा शेषो नारायण याच्या चिरंजीवाच्या मार्फतीचे बोलणे नाही + + बोलणे पकेच अस दर्शविले त्यास जे बोलावयास येतात ते पकेच बोलणे दर्शवितात परंतु तेथील आधिकारी हरदमख्याली त्याजपुढे बोलणारानी काय करावे ? सटवाजी भोसले याचे बोलणे कागदपत्र येतात पहिले पत्र आले होते त्याचा मजकूर लिहिलाच आहे अलीकडेही नित्य बोलणे लागले आहे बहुता आर्थी येतीलसे दिसते संताजी

२

फडतारे वगैरे आले बाकी येणार तेही आणविले आहेत येतील असे दिसते. सुचला प्रकार लिहिला आहे बहुत काय लिहिणे कृपा करावी हे विनंती.

---

१ राजवाडे खंड १९ : ले. १५०, तारीख १७–६–१७८० पाहा.

२ येथून पुढें हस्ताक्षर परशरामभाऊ पटवर्धन यांचें.

लेखांक १२२ तारीख १०-९-१७८०

रुमाल नं. ७३ फाईल नं. १ बी

पत्र नं. ४४५ श्री

सकलगुणसंपन्न राजमान्य राजश्री

अंताजी पंत आपा यासी

स्नेहपूर्वक चेनबसवया मण्याल गावीं मु॥ धर्महटी शेरणार्थी विनंती उपरी येथील कुशल ता। भाद्रपद शु॥ १२ जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे विशेष तुम्ही कोट-बागीकर प्यादे समागमे पत्र पा ते पावले लिहिला मजकूर राजश्री सरदेसाई आपास निवेदन केला परंतु आम्हासी ममतापूर्वक बोलतात परंतु प्रमाण वाटत नाही आम्हासी वाकडे दाखवीत नाही आंतरयामी सटवोजी भोसलेकडून कारकून नरसिपंत आला होता त्यासी बोलणें जाहले कीं तुम्ही आम्ही मिलोन आजरे व चांदगडेकड जाऊन तिकडील स्थल हस्तगत करून घ्यावे तुमची मदत आम्ही करावी तुमची कामे असतील ते आम्ही करून देऊ याप्रो बोलणे जाहाले येसाजी सिंदेकडील ही कागद पत्रे येतात त्यात लिहि-तात की चिकोडी व बागेवाडी व येमकनमोरडी वगैरे ठाणी बसवून द्यावी मग तुम्हाकडे मदतीस आम्ही येतो परंतु आजरे प्रांत आम्हाकडे द्यावा याप्रो लिहिल होते त्याचे उतर काये लिहून दिल्हे हे न कले सरदेसाई याचे मते कीं चांदगडेस मोरचे दिल्हे होते तेसमई राजश्री व्यंकटराव घोरपडे व तुम्ही मिलोन मोर्चे उठविले याची इरे चिताता फार आहे याजकरिता आजरे व चांदगडे घ्यावेया मनसेबा करीत आहेत भीमगड-करही येकवेल इकडे मिलोन कांहीं लोक व निशान घेतलेवरी करारा प्रो सरदेसाई आपाकडून निभावणी दिसेना याजकरिता इकडील लोक किल्याखाली घातले होते मागती त्याजकडील भला माणूस येऊन बोलणे करून गेला आहे त्यातील वर्तमान खरे समजले नाही चरती आया शापूर याकडून ठिकाण लाऊन मागाहून लिहितो तुम्ही आपले जागा सावध असावे चांगले बोलतात याजवरी न जावे दंगा करतील बेलगाव घ्यावे या मन-सब्यात आहेत फितव्यान हातास लागल्यास लागल तुमचे स्नेहास अंतर आणू नये परंतु वरवर चांदगडचा उपराला केला तेव्हा स्नेह ते काय म्हणतात ? परंतु आम्ही दोष लाऊन घेतला नाही श्रीमंताची फौज आली होती त्याणी उपराला करू लागल्यास आमचे कैस ऐकतील येस सांगतो परंतु येकवेल खरे वाटते फिरुन सटवोजी भोसल्याकडील कारकून सांगतात तेव्हा त्याचे खरे वाटते याजकरिता इतबार पुरत नाही श्रीमंताकडील फौज आल्यास किल्ले राहिल्यास न कले नाहीतरी भीमगडचा सधन (साधन) फार लागले आहे उगच बसून मातबर जागा हाताखाली घालितात हे तुम्हास कलावे करिता लिहिले असे कागदपत्र जे पा ते माहितगार माणसाबराबरी पा जावे बहुत काय लिहिणे हे शरणार्थी.

लेखांक १२३ माहे सप्टेंबर इ. स. १७८०

श्री गणपति

पत्र नं. ४९

पु॥ राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी[१] गोकाक व शाहापूर व काडकोल वगैरे ठाण्याच्या बंदोबस्तासाठीं राजश्री शाहाजी भोसले याजकडील हजार राऊताचे पथक ठेऊन आम्ही कूच करून कृष्णा दक्षिण-तीरास आलो राजश्री गंगाधरराव नाना रास्ते यास आपल्या लिहिल्याआन्वये बोलून निरोप दिल्हा ते फौजसुधा आथणीच्या सुमारे गेले कलावे आता त्यास ल्याहावयाचे असेल ते ल्याहावे करवीरच्या बंदोबस्तासाठी पंचगंगेच्या दक्षणतीरास व उतरतीरास दोही जागा फौज ठेविली पाहिजे याजकरिता कृष्णातीरास मुकाम केले आहेत छावणीच्या फौजेची नेमणूक करून दोन जागा फौज रवाना करून आम्ही मिरजेस जातो करवीरची मसलत दसरा होताच करावयाची यास्तव तोफखाना मिरजेस ठेवावा लागतो येविसी पत्रे पहिली पाठविलीच आहेत त्याची उत्तरे आली असल्यास उत्तमच जाले नाहीतरी लिहून पाठ-वावे म्हणजे तेणे प्रा तोफखाना ठेवावयाचे करू तूर्त तोफा येथे ठेविल्या आहेत बैल चारणीस रवाना केले कारखान्याचे माणूस कार्याकारण ठेऊन वरकडास निरोप दिल्हा पुढे तेथून रवानगीस दिवसगत लागले त्यासाठी ठेविला आहे यात जसी मर्जी असेल तसी सुचना करावी त्याप्रा करू बहुत काये लिहिणे कृपा करावी ही विनंती.[१]

लेखांक १२४ माहे सप्टेंबर इ. स. १७८०

श्री गणपती

रुमाल नं. ९०

फा. नं. १

पत्र नं. २५

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी आपण छ २७ साबानचे पत्र पा ते छ १ रमजानी पावले त्यात सारांश अर्थ करवीरचा समेट करावा दोन ताण संभालणार नाहीत आपणास इकडे यावे लागेल येविसी पेशजी लि॥ होते त्याचे उत्तर द्वामुष्यायण आले याजवरून काय समजावे ? त्यास कसे करावे याचा पुर्ता विचार करून उत्तर सत्वर पाठवावे विल्हेस लावावे लागते म्हणोन लि॥ त्यास आमच्या येण्याची पुरवणी आलाहिदा लिहिली आहे त्यावरून कलेल करवीरचा मजकूर तर आधी त्याचे बोलणे लबाड निभावणीचे नव्हे त्यातही न कले कोणी पैकेकरी विश्वासाने त्यात येऊन फसून बोलत असेल तर न कले परंतु परिणाम व्हावयाचा नाही राजश्री माहादजी शिंदे पाटीलबावा चार महिने करवीरास बसोन नाश

१ परशुरामभाऊ पटवर्धन यांचें पत्र

करून तह करून आले तो मागे मध्यस्त बोलणार होते त्यास कैद केले प्रांतात उपद्रव केला फिरोन सरकारच्या फौजा त्या प्रांती गेल्या ठाणी घेतली तेव्हा बोलणे लाविले मागती फौजा घरास जाताच बोलणे सोडून स्वस्थ होते तदोतरही गुदस्ता चिरंजीव राजश्री रघुनाथराव दादा याजकडे बोलणे लाविले आम्ही गेल्यावरही नेहमी घरास येऊ तो पर्यंत राजश्री गंगाधर-राव नाना रास्ते याचे विद्यमाने बोलतच होते सेवटास गेले नाही प्रस्तुत आपणासी बहुत निखालस बोलतात काळदेश पाहाता रिकामा खटला ठेऊही नये परंतु येसाजी सिंदे याचे स्वभाव नीट नाहीत आपण हे कार्य जाले असे समजोन इकडील फौज तिकडे आणवितील मागे समयास हा बखेडा करील समय साधील यात संदेह नाही त्यातही आपण कालदेश पाहोन करितात आम्हीही नका आसे म्हणो नये परंतु इकडील ठाणी घेऊन कोणाकोणाच्या स्वाधीन केली ? कागल वगैरे कांहीं ठाणी त्यानी घेऊन पाडली बांधून त्यात चार चारसे माणूस ठेऊन नाकेबंदी बहुत करून केली कितेकापासून पैका घेऊन ठाणे त्याचे हवाला केली सिबंदीखाले आले तो पैका ज्याचा त्यास पावल्यावाचून आपण वचन देतील ते कसे निभावेल ? करवीरकराकडील पैका येतो इतक्याने याचा निर्वाह होतो आसा अर्थ नाही चार महिने जेष्टापासोन फौज व गाडदी छावणीस ठेविले आहेत यास पैका काये खर्च जाला पुढे च्यार रुपये करवीरकराचा प्रांतात घ्यावयाचे दिवस व त्याजवरही यापुढे जरब बसावी असे दिवस येतात आसे पाहून त्याणी सल्याचा प्रकार लाविला आहे इंग्रजास मिळू हे भय दाखवितील त्यास करवीरकर इंग्रजास मिलतात आसा आर्थ नाहीं लटके भय मात्र दाखवितात त्यात कांहीं नाही सटवाजी भोसले वगैरे याची राजकारणे लागली आहेत बहुत करून निघोन येतील आसेच दिसते तेव्हा त्याजवल राहिले काय ? यातही आपण रा।। सदासिवपंत याची रवानगी केली आहे आल्यानंतर तदनसार समजोन लिहोन पाठवितो सारांश करवीरकराचा कारभार ठीक नाही करारप्रो निभाव-णार नाहीत आणिखी संकट आहे ते आहेच आसे प्रकार आहेत. बहुत काये लिहिणे कृपा करावी हे विनंती.[1]

लेखांक १२५ माहे सप्टेंबर इ. स. १७८०

श्री गणपती

पत्र नं. २९

राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती उपरी कोल्हापूरकराचे राजकारण न बनल्यास चिकोडकर यैवज देऊन तालुका हावाली करावा दोन हजार फौज सालमजकुरी ठेवावी हे बोलणे होते त्याचा मजकूर आलिकडे कोठे लिहिण्यात आला नाही मसलतीचाच विचार ठरलासा दिसतो म्हणोन लिहिले त्यास करवीरकराचे बोलणे पहिले लागले तेव्हा चिकोडीकर रा।। आंताजी

१ पत्र परशरामभाऊ पटवर्धन यांचें.

शामजी आम्हाजवल सिरोलच्या मु॥ बोलत होते पांच लाख रुपये देतो तालुका आमचे स्वाधीन करावा आम्ही राखतो त्याजवर कांहीं दिवस करवीरचे राजकारण चाललेच होते सिराले घेऊन पुढे गेल्यानंतर राजकारण होते नाही आसे दिसो लागले तेव्हा त्यासी विचारिले तुम्ही बोलत होता त्याचा मजकूर कसा ? यैवजाची निशा देऊन तालुका स्वाधीन घ्यावा तेव्हा त्याचे बोलणे तीन सालात यैवज देऊ. त्यात दोन सालची निशा अखरपावेतो करून देऊ परंतु यास निभावणीस दरम्यान तुम्ही आसावे परभारे राजकारणास उपर करवीरकराने लाविल्यास आमच्या पैवयाची निशा व्हावी व मागला आमचा यैवज गुंतला आहे त्याची निशा व्हावी पुढे फौज ठेऊन बंदोबस्त करणार त्याचा खर्च पडेल तो द्यावा येविसीची आमची खातरजमा करावी दरम्यान यात आम्ही पडू नाहीतर सावकारास पत पडत नाही व दोन हजार फौज ठेऊन आपलेकडील तोंड राखणार सिरालाकडे व मटब्रागकडे आणखी फौज ठेवावी पुढे करवीरचा बंदोबस्त करून द्यावा आणखी वतनदाराची बारीक मोठी कलमे कांहीं करावयाची कांहीं न करावयाची आसी पाहता येथे कारभार व्हावयाचा नाही व सरकारात मी जामीन व्हावे आणि पैकाही नाही तेव्हा मग छावणीचाच विचार केला राजश्री रामचंद्र नाईक याजकडे तालुका त्याचे कर्ज भारी त्यास आगदीच ठिकाण नाही दोन हजार फौजेचा खर्च व पाच लक्ष रुपये हालीचे व मागील म्हणता बहुतच हे कधी फिटावे तालुका सुटून नाईकाचा कधी पैका पावावा माझी जामीन कधी सुटावी ? कोणेसमई सरकारात कसी आडचणी पडून करवीरचा तहच जाहल्यास तोही पेचच असे जाणून ते राहऊन छावणीचाच सिधांत केला हे बरे अथवा ते बरे ध्यानात आणोन कसे करावे ते ल्याहावे म्हणजे तसे करू. बहुत काये लिहिणे कृपा करावी हे विनंती.

(हस्ताक्षर व पत्र परशुरामपंत भाऊ पटवर्धन यांचें.)

लेखांक १२६ इ. स. १७८०

रुमाल नं. ६५, फाईल नं ३

पत्र नं. ११

श्री गणपती वरद

सेवेसी विज्ञापना कलमबंदीचे यादीवरून आम्ही बोलू लागलो त्याच जाबसाल त्यानी केले :

करवीरकराचा मजकूर

याचे जाबसाल आम्ही सेवा करितो तंबी त्यास पोहचावितो तोफखानीयास व ठाणीठुणी घेतली आहेत त्याची सिबंदी देतो कर्जाच्या पेचात आलो ऐसे असता तह करणे तो परभारे होतो यात आमचा लौकीक राहतो कीं काये ? असो धण्याच्या कार्यास मान प्रतिष्ठाही धरीत नाही परंतु सिबंदीचा वगैरे टंटा वारून च्यार रुपये सरकारात येतात करारा प्रमाणे निशा होत असलियास तह करावा आमचा गुंता नाही ठाणी सिबंदी दिल्हासिवाये सुटणार नाहीत जे करणे ते समजून करावे.

भाऊनी इंग्रजाचे मसलतीस यावे याविसी त्याची आमची भाषणे बहुत जाहली त्यानी तापत्रये बहुत सांगितले लोकाच्या व देणेदाराच्या पेचात आहो कृपाकरून पेचातून काढावे पुढे फौज सांगतील त्याप्रमाणे वर्तणूक करू चाकरी करावी चौघानी बरे म्हणावे धण्याचे काम व्हावे कृपाकरून उर्जित करावे सेवा घ्यावी हेच मानस परंतु सेवा चाकरीवर मेले पाडाव गेले ते सुटेनात तेव्हा पुढे चाकरी करून उर्जित होईल करतील कलतच आहे असो श्रीमंतास संकट ते आम्ही पाहणार नाही निकडच पडलियास सरंजामी लोक आहेत त्यापैकी दोन च्यारसे मिरजेत ठेऊन करवीरकराचा पका तह जाहला म्हणजे निघोन येऊ आपले हाते जी चाकरी होईल ती करू यात अतर करणार नाही याविसी बोलणे जाहाले ते पत्री कोठवर ल्याहावे सारांष एक दोन जाबसाल खचित मनात आहेत त्याचा उदगार चितातून बोलतात.[१]

....

स्वामीच्या लक्षात अंतर पडो देणार नाहीत सर्व अर्थ चित्तात आणून ममता स्वाम करता ती निदर्शास याच्या येई ते करावे.[१]

लेखांक १२७ तारीख २-७-१७८१

श्री

रुमाल नं. ७६

फा. नं. ४१

पत्र नं. १

पै॥ छ १३ रजब इसने
समानीन आषाढमास

विनंती सेवक भिकाजी केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ ९ रजबपावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष रा। माधवराव तुकदेव व मानाजी सिंदे उभयता येकत्र होऊन पंढरपूरचे मुकामी होते तेथे प्रतिनिधीकडील फौज गेली त्याची व याज फौजेची गाठ पडून लुटले म्हणून तीर्थस्वरूप रा। सदासिवपंत मामा खाडीलकर याचे पत्र आले त्यावरोन सेवेसी लिहिले आहे कितुरकराकडील निशेचा जाबसाल रा। रामचंद्र नारायण बोलत आहेत परंतु अद्यापि निशा जाहाली नाही रा। सिवराव सुरनीस व जोसीराव करवीराहून आले आहेत तेही बाकीच्या ऐवजाचा फडशा करितो म्हणोन बोलतात निशा होऊन यैवज हातास आला नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

---

१ नाना फडणीसांस पत्र.

लेखांक १२८ तारीख २१-९-१७८१

रुमाल नं. ७३ फाईल नं. ३ पत्र नं. १४३

श्री

पैा छ २ जिल्काद

इसने

विनंती सेवक नागो शामराव कृतानेक सां नमस्कार विनंती विज्ञापना ताा छ २ सवालपावेतो स्वामीचे कृपाकटाक्ष करून सेवकाच वर्तमान येथास्थित असे विशेष किले भुदरगड येथील बंदोबस्ताविसी स्वामीनी राजश्री परशरामपंत भाऊ याकडे पत्रे पाठविली होती त्याप्रा बंदोबस्त होऊन यावा त्यास भाऊनी आम्हांस स्वामीकड जावयाविसी सांगितल त्यास सरकारचे आज्ञे प्रा बंदोबस्त व्हावा तो कांहींच न होता सरकारातूनच बंदोबस्त करून देतील याप्रा उतर करितात निरोपही दिल्हा सत्वरच सेवेसी येतो राज-मंडलकराचा तह हुजरून ठराऊन पाठवितो त्याप्रो विल्हे लावावा या प्रो पत्रे भाऊसी आपली येताती त्यासी किलेकराचा बचाव व सेवकाकडील बोलणेचा ठराव व्हावा त्यास किलेकरासी वचेन प्रमाण जाले ते स्वामीचे आज्ञेवरोनच केल हालीही बचाव होण तो स्वामीच करणार येविसीच वचन राजमंडलकरास देणे तो मी सत्वरच सेवेसी येतो निवेदन करीन तो आर्थ ध्यानात घेऊन ठराव जाल्यास बच्याव होईल यास्तव सुचेनार्थ विंनती लिहिल आहे स्वामीचे मर्जीस येईल तेच घडोन येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

लेखांक १२९ तारीख १८-९--१७८२

रुमाल नं. ७२ फाईल नं. ६५

पत्र नं.१

श्री

पै।। छ १७ सवाल

सन सलास समानीन

भाद्रपद

विनंती सेवक अंताजी रघुनाथ फणसे साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत भाद्रपद शु।। १२ पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते तासगावास सुखरूप पावलो आज्ञे प्रमाणे पत्रे देऊन यादी समजावून सविस्तर मजकूर राजश्री परशरामपंत भाऊस निवेदन केला पुढे आज्ञा काय ? त्यावरून उतर केले की तुर्त तुम्ही जाऊन भुदरगडचा फडशा करून आम्हाजवल येणे मग तुमच्या आमच्या बोलण्यात ठरेल त्या अन्वये चिकोडी माहालचा कारभार विल्हेस लाऊ आम्ही विनंती केली कीं श्रीमंताची आज्ञा आहे कीं तालुकियाचा जाबसाल विल्हेस लाऊन मग भुदरगडास जाणे होईल मजकूर तो वरचेवर लिहून पाठविणे आपण तर

आज्ञा करितात कीं आधी किल्याचा फडशा करून मग माहालाचा जाबसाल विल्हेस लाविता येईल तेव्हा लांबणीचा मजकूर दिसतो त्यास ते म्हणाले कीं विना भुदरगडच्या जाबसाल विल्हेस लागलियाखेरीज कोणताही कारभार करावयाचा नाही याप्रमाणे नित्या-नित्य बोलणी चालतच आहे करवीराहून तर नित्य पत्रे येतात कीं पुण्याहून जैसी ठराऊन आली आहे त्याअन्वये आधी तालुक्याचा कारभार सेवटास लाऊन मग भुदरगडचा फडशा करावा त्या लिहिण्यास येथील करण्यास कांहींच मिलत नाही तथापि तालुकियाचे बोलणे लावलियास जिदीस जाऊन सुरलीत बोलावयाचे नाहीत हा रंग पाहून राजश्री रामचंद्र नारायेण व नरसिंगराव शेषाद्री यास घेऊन विचार केला कीं पुढे कसे करावयाचे तेव्हा सर्वांचे मते ठरले कीं हा कारभार येथे व्हावयाचा नाही करवीरास जाऊन येथील बोलण्याचे आशय समजाऊन परशरामपंत बोलतात याअन्वये किल्याचा कारभार सेवटास न्यावा तरच मर्जी त्याची ठीक राहल्ये या पल्यावर आणून रुजुवातीस कारकून नेमून द्यावा व तुम्हाकडे पाठवावे + + अंताजी शामजी याचा + + थे जावे तो कारकून तुम्हा-जवल येऊन पोह + + ते तुम्ही मिलोन रुजवात करावी परंतु करवीरास रामचंद्रपंतास जावयास परवानगी पाहिजे म्हणोन भाऊस विनंती केली उतर मा॥ रनिलेचे रूबरू जाले कीं आम्हास विचारावयाचे प्रयोजन नाही ज्याप्रमाणे कारभार करून आम्हास पत्रे पुण्याहून आली त्या आन्वये जाणे तर जावे कारभार विल्हेस लावावा वारंवार आम्हास काये पुसतात ? जाण्याविसी आम्ही कोणासही मना करीत नाही बोझरती परवानगी घेऊन मा॥रनिलेनी प्रस्थान केले द्वादसीस निघोन करविरास उभयता जातात आम्ही नेमिल्या ठिकाणास भाऊची परवानगी घेऊन जातो स्वामीस कलावे म्हणोन लिहिले आहे प्रथम दिवस मुकाम मजकुरास आलो उतरतो तोंच भाऊनी गाडदी व कारकून पाठविला कीं नरसिंगराव याणी या गावात राहू नये याप्रमाणे येथून गेले तेव्हाच बोलण्यात आले होते म्हणोन दुसरे गावी जाऊन राहावे तेथून कारभार करणे तो करावा मी जाऊन विनंती केली कीं श्रीमंतानी मजबरोबर पाठविले आहेत सविस्तर आर्थ आइकोन घ्यावा मग मर्जीस येईल ते करावे कारभाराचा सविस्तर मजकूर सांगितला विचारास गोष्ट न आली आग्रहच पाहिला तेव्हा द्वादसीचे पारणे करून निघोन जातील या प्रो करून बिराडास आलो मा॥रनिले भोजन + + त्यानंतर युक्तीने चार गोष्टी समजाऊन गावात यावे जावे राहिल्यास चिंता नाही याप्रमाणे परवानगी घेतली त्यावरून आज दोन दिवस येऊ जाऊ लागले आहेत आम्हासी बोलो नये नमस्कारास येऊ नये ही आड आहे तीही आड कांहीं दिवसानी जात जात जाईल सविस्तर आर्थ मनन होऊन तालुक्याविसीची पत्रे निक्षूणतेची आली म्हणजे कामकाज होणे ते आपले प्रतापे करून होईल विना तेथील नेटाखेरीज कारभार विल्हेस लागावयाचा नाही दिवसगत न लागता केला कारभार नेटाने सेवटास लागल्यास पैक्याची कालजी नाही. कराराप्रमाणे पैका पावेल सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १३० तारीख २२-१२-१७८२

फाईल नं. १ पत्र नं. १०

यादी गीर्दनवाई छ १६ मोहरम रविवार निर्मलवाला धौशा याजकडील वकील मुसलमान महमद इसफ येथे पुनियात वकीलीस आहे त्यास धौशाने पत्र लिहिले होते कीं पुणे प्रांतातील मऱ्हाटी फौज सिबंदी मिलत असल्यास पाच हजार ठेऊन निर्मळस रवाना करावी म्हणोन धौशाने पत्र वकिलास पेशजी लिहिले होते.

कलम १

धौशाचे पत्रावरून वकिलाने पुणियातील सिलेदार सरदार रखमाजी राजे व संताजी राजे भोसले मुंगीकर वगैरे सिलेदार जाधव वाघोलीकर यास वकीलाने भासऊन उभयता भोसले यास ठीक केले फौज ठेऊन देतो म्हणोन रखमाजी राजे व संताजी राजे उभयेतानी वकिलासी बोलोन ठराव केला.

कलम १

धौशाकडे मुजरत आजुरदार जासूद व पत्रे पाठऊन धौशाकडील पत्राचा जाब कौल करार आणिविला कौल रखमाजी राजे याचे नावचा आहे.

कलम १

कौल आलियावर पुणियात सवेगवेचे सिलेदार ठेऊ लागले.

कलम १

रखमाजी व संताजी राजे फौंज ठेऊन कोठे जातात हें वर्तमान शाहाजी राजे भोसले चंदावरकर यास परस्परे कलले.

लेखांक १३१ तारीख ३१-१२-१७८२

रुमाल नं. ६८ श्री

फाईल नं. १

पत्र नं. १५

यादी गीर्दनवाई छ २५ मोहरम मंगलवार माहादजी राजे भोसले मुंगीकर याणी येक दोनवेला निरोप व पत्रे शाहाजीराजे भोसले चंदावरकर यास लिहित गेले कीं आम्ही तो सर्वश्वे सरकारचे आपराधी आहो परंतु पुढे मुलबालाचे चालले पाहिजे तुम्ही ते प्रसंगी श्रीमंतापासी आहा येथून चिरंजीव पाठविले आहेत श्रीमंतास विनंती करून भेटी करऊन मुलाचे चालवण्याविसी श्रीमंताची कृपा होये तो अर्थ केला पाहिजे म्हणून माहादजी राजे भोसले मुंगीकर याचे पुत्र बालकृष्ण राजे भोसले मुंगीकर उमर वर्षे साहा सात बरोबर स्वार चार पाच व येक पालखी येणे प्रमाणे आले आहेत गणेश पेठेत उतरले आहेत

छ २३ रोज रविवारी शाहाजी राजे चंदावरकर भोसले यान्चे विद्यमान तात्याची भेट जाली खासा माहदजी राजे भोसले मुंगीकर मौजे आलंदी श्री ज्ञानेश्वर येथे आले आहेत बरोबर स्वार पंनास आहेत.

लेखांक १३२ तारीख ८-४-१७८३

श्री

नं. ३४

यादी गीर्दनवाई छ ९ जमादिलावल
माहादजी भोसले मुंगीचे या येथे
पिराजी भोसले राजमंडल
आपाजी पाटील माने
रखमाजी भोसले
बापु शिंदे
२ ब्राह्मण

येकूण सात जण मिलोन माहादजी भोसले याच्या राहुटीस खलबत करीत होते.

कलम १

लेखांक १३३ तारीख २-५-१७८३

श्री

फाईल नं. ७
नं. १२

स्वस्तिश्री राज्याभिषक शके १०९ शोभकृत नाम संवत्सरे वैशाख शुध्द प्रतिपदा भुगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजश्री सखाराम शेषाद्री यासी आज्ञा केली ऐसीजे चैत्र बहुल अमावास्या गुरुवारी क्षेत्र करवीरी येशवंतराव शिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार याचा काल जाहाला (ता. १-५-१७८३) येविसी राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञापत्र सादर जाहाले आहे प्रविष्ट करून विनंती पत्र घेऊन हुजूरचे जासुदासमागमे पाठवून देणे ईश्वर सत्तेस मानवी यत्न आहे यैसे नाही ज्या ज्याकाली जे घडावयाचे ते घडते तुम्ही कोणेविसी चितात संशय न धरिता स्वामी आज्ञेचे ठायी लक्ष धरून स्वामीचे मनोदयानरूप आज्ञे प्रमाणे सेवेसी सादर असणे. जाणिजे निदेश समक्ष.

मर्यादेयं
विराजते

लेखांक १३४ तारीख २-५-१७८३

श्री

नं. १३

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके १०९ शोभकृत नाम संवत्सरे वैशाख शुध्ध प्रतिपद भृगुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजेश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली यैसिजे चैत्र वद्य आमावाश्या गुरुवारी क्षेत्र करवीरी येशवंतराव सिंदे सेनासाहेबसुभा सरसुभेदार याचा काल जाहाला तुम्हास कलावे यास्तव आज्ञापत्र सादर केले आसे जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

लेखांक १३५ तारीख ४-५-१७८३

श्री

रु. नं. ७३ फाईल नं. १
पत्र नं. ८९
पौ छ ७ जाखर

श्रीमंत राजश्री नाना स्वामी-
चे सेवेसी

विनंती सेवक रामचंद्र नारायेण कृतानेक सां नमस्कार विनंती येथील क्षेम ता वैशाख शुध त्रितीया मु॥ सिरगाव सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष आम्ही व राजश्री नरसिंगराव पनाल्यास जाऊन किले भुदरगडचा कारभार बोलणे होऊन ठरावात आणून सिबंदीचे यैवजाची कांही रोकड कांही निशायाती करून निरोप घेऊन चैत्र वद्य द्वादसीस निघोन येथे आलो राजश्री अपाजी शामजी यासी अगोधर बोलणे जाहाले होते त्याप्रा बोलून उरकावे इतकियात येशवंतराव शिंदे यासी मरीच्या दुखणेचा उपद्रव होऊन चैत्र वद्य आमावाश्येस देवाज्ञा जाहाले होणारास उपाय नाही स्वामीचे ठाई लक्ष पुर्तेपणी होते सचोटीने वर्तणूक करून लक्षानरूप वर्तणूक करावी असा मजकूर होता त्यास याप्रकारे घडले श्रीमन्माहाराज याचे चिती तोच मजकूर आहे आम्हास लिहोन पाठवणे-विसी निरोप आला त्यावरून विनंती लि॥ आहे भुदरगडचा कारभार बिलेस लाऊन तालुक्याचा कारभार कराराप्रो बिलेस लागावा असा माहाराजाचा मनोदय आम्हास लिहिणेविसी आज्ञा आहे त्यावरून विनंती लि॥ आहे सेवकास आधार सर्व स्वामीचे चरणाचा आहे केला कारभार कराराप्रो सेवटास नेऊन सेवकाचे हाती सेवा घेणार स्वामी समर्थ आहेत. वरकड मजकूर राजश्री सखारामपंत विनंती करितील सेवेसी श्रुत होये हे विनंती.

लेखांक १३६ तारीख ५-५-१७८३

श्री

नं. ४

विनंती सेवक अंताजी रघुनाथ सां। नमस्कार विज्ञापना ता। वैशाख शु॥ ४ चतुर्थी पावेतो मु॥ सिरगाव येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित जाणून स्वकीय कुशल लेखन करावयास आज्ञा केली पा। विशेष राजश्री रामचंद्र नारायेण व राजश्री नरसिगराव शेषाद्री उभयता करवीरास किल्याच्या सिबंदीच्या यैवजाचा ठराव आपाजी शामजीशी जाला त्याप्रो जाबसाल उरकून ध्यावा याजकरिता गेले तेव्हा येसाजी सिंदे यानी किंतेक बोलण्याचे पर्याय सांगितले कीं आमच्या कारभाराचा स्वाभिमान श्रीमंत राजश्री नानानी पुर्तेपणे धरून राजश्री परशरामपंतासी जाबसाल करावयाचे ते केले याउपर त्याचे आज्ञे वितरिग्त नाही आमची सर्व प्रकारे खातरजमा जाली आमच्या पत्राची उतरे येतात तेहि खातरजमेची येतात त्यास तुम्ही तोड काढून आला त्याप्रो काही रोख व काही सावकारी निशा करून देतो याप्रो घेऊन जाऊन किल्याचा फडशा करून उभयता लवकरच करवीरास येणे राजश्री भाऊची चिठी आम्हाजवल आहे ती व तालुक्याचे बाकीपत्र (हार्मी पत्र?) यैसे पुणियास पाठऊन देऊन तेथून सनदा आणऊन तुम्ही तालुका स्वाधीन करून घेऊन केला कारभार सेवटास नेणे याप्रो मध्यस्थाची खातरजमा करून बोलिल्याप्रो सावकारी निशा व कांहीं रोकड यैवज देऊन पा। ते चैत्र वद्य १३ दसीस कोगनोलीस आले तेथून तेच रात्रीस निघोन सिरगावास आलो करारा प्रो आपाजी शामजीशी बोलोन फडशा करावा तो बुधवारी चतुर्दशीस प्रहरा रात्रीस माहामारीचा उपद्रव होऊन येक दोनवेल वमन जाले दाहा पाचवेल बाहीर भूमीस जाऊन सर्वांगाची काहिली होऊन गुरुवारी प्रहर दिवसास देवआज्ञा जाली ईश्वरे फार वाईट केले या प्रतीचा मनुष्य दुसरा व्हावयाचा नाही मध्यस्त येथे बोलत होते ते स्वामीच्या वचनाच्या आधारावरून हा नेट जाणोन येसाजी सिंदे कामाकाजाचा फडशा करून देत होते ही तर गोष्ट याप्रकारे जाली येउपर घालमेल करणार ग्रहस्थ करितील तोही आर्थ लक्षात असोन सर्व प्रकारे मध्यस्ताचा स्वाभिमान पूर्ववत आहे त्याप्रो असोन याचे हातून कार्यभाग घेतलियास हे पार पडोन स्वामीच्या वचनाचा नक्ष राखोन सरकार उपयोगास पडतील केला कारभार सेवटास जाईल मुख्य सर्व आधार स्वामीच्या चरणाचा यास आहे श्री माहाराजाचे लक्ष आपल्या लक्षाखेरीज नाही सविस्तर मजकूर रामचंद्रपंतानी लिहिला आहे त्यावरून श्रुत होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १३७ तारीख ६-५-१७८३

श्री

रुमाल नं. ७६

फा. नं. ४९

पत्र नं. ५

विनंती सेवक भिकाजी केशव कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ता। छ ४ जाखर मुकाम तासगांव येथे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीच्या निरोप घेऊन निघालो ते काल सूर्योदई येथे पोहचलो. अंताजी शामजी चिकोडकर याचे शरीरी समाधान नव्हते त्यास चैत्र वद्य चतुर्दसीस देवआज्ञा जाहाली (ता. ३०-४-१७८३) येसाजी सिंदे करवीरकर ही दुसरे दिवसी आमावाश्येस बारा घटका रात्रीस मृत्यु पावले म्हणोन राजश्री परशरामपंत भाऊनी सांगितले ते सेवेसी विदित व्हावे यास्तव लिहिले असे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १३८ तारीख १९-५-१७८३

पत्र नं. ३ श्री

सेवेसी विनंती सेवक अंताजी रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना ता। वैशाख वद्य ३ पावेतो स्वामीचे कृपेकरून मु।। सिरगांव सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष भुदरगडचे रुजुवातीचा वगैरे आर्थ समजला त्यावरून मोघम बेरीज ठराऊन फडशा करावा हे ठीक जाणोन रामचंद्रपंत व नरसिंगराव आपाजी शामजी व विरुपाक्ष शामजी व अंताजी शामजी याचे आमचे सर्वांचे बोलणे येक वाक्यतेने होऊन येक लक्ष ऱ्याहातर हजार रुपये याजवर बेरीज ठराऊन पूर्ववत प्रो किलेकरी यानी किल्यावर असावे किलेकरी या + + त प्रो राजमंडलाकडून चालवावे याची खातर + + रामचंद्रपंत यानी व विठल शेषाद्री याणी करावी याप्रो जाबसाल ठरोन यैवजाऱ्या कारभाराकरिता उभयता करवीरास गेले स्वामीच्या प्रतापे करून नेट चांगला बसला हे येसाजी सिंदे यास समजले त्यावरून जाला मजकूर तो खातरजमेनिसी समजाऊन केला करार त्याप्रा फडशात आलेयास रुपया खर्च करून जाल्या अर्थी तुमचा रुपया माघारा आणून पोहचल याप्रो पत्र लिहून देऊन यैवज घेऊन आले तो सौंदलग्यास येऊन सिरगांवास आले दुसरे दिवसी अंताजी शामजी मृत्यु पावले त्याचे दुसरे दिवशी येसाजी सिंदे यास देवआज्ञा जाली त्यामुले आवकाश पडला पुढे आपाजी शामजीनी पूर्ववत करार जाल्याप्रो कारभार विल्हेस लाऊन घ्यावा उभयतानी फडशा करावा यैसे जाले तो नागो शामजीचे पत्र आले कीं तासगांवास जाऊन फठशा करून घेणे त्यामुले आपाजी

शामजीनी कारकून तासगावास पा।। यैवजाचे जागी यैवज अमानत तसाच राहिला उभयता कार्यभागी फसले यैसे जाले श्रीमंत राजश्री माहाराजाची पत्रे कारभारियास येतात कीं तासगावास न जाता किल्याचा फडशा करारा प्रो करून लौकर येणे तालुक्याच्या फडशा करिता येथूनच आज्ञा होईल यैसे वर्तमान जाले + + सरकारचे पत्र यावे अगर परशरामपंत भाऊ + + त्र यावे तर आर्थ कलव (वा?) ते तर नाही पुढे येविसीची आज्ञा जाली पा।। आम्ही करार करून ठराव केला आहे त्याप्रो कारभार विल्हेस लावावा यैसे आसलियास आपाजी शामजीस पत्र यावे कीं अंताजी रघुनाथ याचे विद्य-माने जाल्या करारा प्रो फडशा करून घेणे अथवा जे होणे ते तासगांवीच होईल तुम्ही तासगांवास जाणे यैसी आज्ञा जाली तर तेथे जाऊ येविसीची आज्ञा यावी म्हणोन विनंती पत्र लि।। आहे सविस्तर मजकूर रामचंद्र नारायेण यानी लि।। आहे त्यावरून ध्यानात येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

तारीख २३–६–१७८३

लेखांक १३९

नं. २

श्री

सेवेसी विनंती सेवक अंताजी रघुनाथ सा। नमस्कार विज्ञापना ता। जेष्ट वद्य नवमीपावेतो स्वामीच्या कृपेकरून तासगांवी सुखरूप असे विशेष राजश्री विरुपाक्ष षामजी भुदरगडकरी-सुधा सिरगांवीहून निघोन स्वामीच्या चरणासनिध यावे याअर्थी तासगांवास आले उदईक येथून निघोन पुणेयास जाणार राजश्री रामचंद्र नारायेण व नरसिंगराव शेषाद्री यैवजाच्या फडशाकरिता पुणेयास जाऊन श्रीमंताजवल विनंती करावी म्हणोन राजश्री परशरामपंत भाऊनी आज्ञा केली त्यावरून येक दोन दिवसी निघोन स्वामीच्या दर्शनास येणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

तारीख ९–९–१७८३

लेखांक १४०

श्री

रुमाल नं. ७२
फाईल नं. ६५
पत्र नं. ६

विनंती सेवक अंताजी रघुनाथ सां। नमस्कार विज्ञापना ता। भाद्रपद शु।। १३ पावेतो सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष अंतरभाव पाहता येथील मंडळीच्या बोलण्या-तील अर्थ तालुक्याचा रसदा घेऊन वसूल होईल वसूल तेथवर करावा सर्वात्मना तालुका सोडू नये या अर्थी मर्जी बिघडलियास मसलत पडेल त्या काली समेटून घेता येईल यैसे जालियाने दरम्याने कारभार करणार ग्रहस्त याची निभावणी होणार नाही पाहिल्या

आर्थी भास होतो परंतु समक्ष बोलण्यात सा + ला वृत दिसोन यत्ये राजश्री रामचंद्र नारायेण कारभारात सावकारी हामीच्या + + तर विठल शेषाद्रीचा कारभार सेवटास + ताहे कारभारात आलियाने सरकारात खातरजमा आणि कारभारही सेवटास जाईल म्हणोन मा॥रनिलेबरोबर अत्यंत वैमनश्च याजकरिता मा॥रनिले फार दिलगीर यास रक्षक आपले चरण मी बहुत प्रकारे खातरजमा केली निशा पटत्ये परंतु चितातील संशय जात नाही याजकरिता खातरजमेचे पत्र आलियाने संतोष होईल सारांष जाल्या कारभाराचा नेट बसोन फडशा जाला तरच उतम सर्वप्रकारे स्वामीनी अभिमान धरून सेवटास नेले पाहिजे किल्याचे रुजुवातीस कारकून मागितला द्यावयाचा नाही तुम्ही आहा हे आमचेच येसे म्हणोन बालाजीपंत भाऊकडील तेथे आहेत त्याची पत्रे तालुका द्यावा येविसी आली पा। येविसी ताकीद जाली पा॥
सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १४१ तारीख २–१०–१७८३

श्री गणराज

रुमाल नं. ९०
फाईल नं. १
पत्र नं. १८

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य परशराम रामचंद्र कृतानेक सां। नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। छ ५ जिल्कादपावेतो वर्तमान येथास्थित आसे विशेष किले भुदरगड येथे पाठवावया लोक रवाना केले त्यापैकी दीडशे येथे आले त्याची हाजिरीही जाली बाकीचे लोक व हावलदार लोकाचा जाबता व सनद आली नाही किल्यावर जुने लोक आहेत त्यानी व सरकारचे लोकानी मिळून किल्यावर असावे असे आहे किले येथील कांही लोकाचे राजकारण करवीराकडे आहे आलीकडे किल्यात फितवाई जाला होता त्याचा बंदोबस्त केला म्हणोन राजश्री नागो शामजी सांगतात किल्यावर सरकारचे लोक चढून बंदोबस्त जाल्यानंतर आपणास लेहून पाठऊ रा। नागो शामजीनी काल पंचमी बुधवारी सांगितले जे किल्यावर करवीरकराकडील राजकारण नाग्यास सोडून किरकोल लोक कांहीं आहेत त्याजकडे लाविले त्याची चौकसी करून पाच सात दाहा माणूस धरले यास्तव किल्याची मजबुदी जाहाली पाहिजे यास्तव आम्ही से दोनसे लोक नवे चढविती आपल्याकडीलही दोन च्यारसे लोक किल्याच्या आसीपासी पाठवावे आम्ही चांगला बंदोबस्त करून मग यासी किल्यावर घेऊ आथवा किल्लेकर लबाडीसच प्रवर्तले असे असल्यास हेच लोक जबरदस्तीने किल्यावर घेऊन जुने किल्लेकरी आहेत त्यास सारेच बाहेर घालऊ आसे सांगितले आम्ही मशारनिलेनी सांगितल्याप्रो। दोन च्यारसे लोक व से दोनसे स्वार आसे

किल्याजवल आसींपासी पाठवून देतो घडेल ते मागाहून लेहून पाठवितो करवीरकर जमाव ठेवितात पांच सातशे शिलेदार जुण आपले आहेत दोन तीन हजार पायेचे माणूस ठेवितात येसाजी सिंदे याचे वेलचे कारभारी आहेत त्याचे हाते कामकाज घेत नाहीत आपणच श्रीमंत माहाराज काम कारभार करितात कलावे येथे लोक हुजूरून गडास जावयासी आले आहेत त्यासीही पुढे रवाना करितो बहुत काये लिहिणे. कृपा करावी हे विनंती.

लेखांक १४२ तारीख ३०-१०-१७८३

पत्र नं. ५

पै।। छ ८ जिल्हेज

सेवेसी विनंती सेवक अंताजी रघुनाथ सं।। नमस्कार विज्ञापना त।। कार्तिक शु।। ५ पावेतो स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष
आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा कीं पेशजी दोन पत्रे येण्याविसी पा। आसता आला नाही हाली पत्र पाठविले आहे निघोन येणे त्यास पेशजी येक पत्र येण्याविसी आले होते परंतु निरोप नवता म्हणोन न आलो हाली पत्र आले त्यापूर्वीच राजश्री परशुरामपंत भाऊची आज्ञा घेऊन करवीरास श्री देवीच्या दर्शनास गेलो ते कालच सायंकाली तासगांवास आलो रोजमरियाच्या यैवजाची वरात चिकोडीवर दिल्ही तो यैवज वसूल जाला नाही र।। चिटकोपंत प्र।। आहेत यैवज घेऊन येताच निघोन सेवेसी येतो सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १४३ तारीख ३१-१-१७८४

श्री

नं. १५

स्वस्तिश्री राज्याभिषेक शक ११० शोभकृत नाम संवत्सरे माघ शुध दशमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिव छत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली ऐसीजे स्वामीचे सेवेसी तुम्ही विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहले भुदरगडचे मजकुराविसीची विनंती लिहिली येविसीचा मजकूर तपसिले राजश्री अग्नोजी सिंदे यासी राजश्री गुजाजी गाइकवाड सरखवास याणी आज्ञे प्रमाणे लिहिले आहे आपणास सांगितले ते चितात आणोन विनंती पत्र लिहून पाठवावे. जाणिजे बहुत काय लिहिणे.

मर्यादेयं
विराजते

लेखांक १४४ तारीख ३१-१-१७८४

श्री

रुमाल नं. ७३

फा. नं. ४

पत्र नं. ७५

छत्रपति

राजश्री अग्नोजी सिंदे मामा

गोसावी यासी

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने।। गुजाजी गाइकवाड सरखवास रामराम विनंती उपरी येथील कुशल ता।। माव शुध दशमी पर्येत जाणोन स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशेष तुम्ही पत्रे टोपाजी सांवत हुजरे याजबराबर पाठविले ते पावोन श्रीमन्माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी विनंती पत्राचे लाखोटे पाठविले ते हुजूर निवेदन करून साद्यंत मजकूर स्वामीचे सेवेसी निवेदन जाहला रघुनाथराव पंडित याजकडील कागदपत्राचा मजकूर राजश्री आबाजी गाइकवाड आले त्यास बहुतदिवस लागले यैसे लिहिले तरी टोपाजी सांवत हुजरे यासी हुजूरने आज्ञा घेऊन पाठविले त्याचा स्वालजाब हली मशारनिले समागमे पाठविला या स्वालजाबास तेथे येक मांहना लागला हे तो राजदरबार मासपक्ष चार रोज अधिक लागले म्हणून तेच पुढे आणावे यैसे नाही दरबारी कामकाज पकेपणे स्वालजाब खचित घडणेस दिवसगत लागतच आहे येकवेल खचित होऊन हुजूरचे आज्ञापत्र तिकडे गेले तिकडून विनंती पत्र हुजूर आले यैसे घडोन आले असता त्यात इकडून चल अमके प्रकारे पडिला आसे आसिलेस त्याहावे भूदरगडचा मा।।र पत्री लिहिला परंतु त्यात शोधून पाहणे राजश्री परशरामपंत भाऊ याचे बहुत दिवस पेशजीपासून लक्ष इकडील बोलणेत असावे तेमध्ये राजश्री बालाजीपंत नाना याचे अनुमते राजश्री विठलपंत याजकडून बोलणे लागले ते सर्व राजश्री नाना यासी दखलच आहे आलीकडे राजश्री परशरामपंत भाऊ याचे विद्यमाने बोलणे लागले बोलतात जे न घडावयाचे ते बोलत असोन फौज पाठवून प्रांताची खराबी करीत जाऊन टाणी घेतली हे प्रख्यात तुमच्या यैकण्यात आसलच भूदरगडास नवा जमाव पाठवून तिकडून हुजूरचे ठाणीयासी उपसर्ग केला तन्मुले हुजूरची फौज तिकडे रवाना जाहली ज्यापक्षी तुम्हाकडून राजश्री नाना याचे विद्यमानेचा खंबीरपणाचा स्वालजाब आला नाही बोलतो यैसे म्हणता इकडे राजश्री परशरामपंत भाऊ याप्रकारे उपसर्ग करून प्रांताची खराबी करीत आहेत याचा धरबंद तिकडून न होता इकडून आमके जाहले आसे पुढे दाखऊन लिहिता हेच अपूर्व श्रीमन्माहाराज राजश्री स्वामीचे चरणी राजश्री नाना याचे लक्ष आतःकरणयुक्त आहे त्यापक्षी बोलणार आपले स्वकार्य साधावयाचे आर्थी बोलतील ते न यैकता निदर्शन पाहवे जे तुमचे विद्यमाने राजश्री नानापासी स्वालजाब पेशजी कशराप्रो होत आहे त्याप्रो राजश्री

नानानीं खचितपणे बोलोन हुजूर विनंती पत्र पाठवावे हुजूरने कोण पाठवणार त्यास आज्ञा करून पाठविले जातील निक्षूण राजश्री नानाचे चिती स्वालजाब करून देणे आसिलेस सदरहु लिहिले अन्वये हुजूर मशारनिले याचे विनंती पत्र व तुमचे पत्र पाठविणे नच घडे येसे असिलेस त्याप्रमाणे पत्री लिहून पाठावणे हे राज्य श्री चे वरदी आहे ज्याकाली जे घडावयाचे ते घडेल राजश्री नाना येकवचनी पेशजी करारा प्रो श्रीमन्माहाराज राजश्री स्वामीचे निदर्शनास आणोन देतील हा पूर्ण खंबीर आहेच परंतु जाहला मजकूर सांगणेस तुम्हाकडोन अंतर न करावा हली आबाजी गाइकवाड पाठविले आहेत पूर्वसंदर्भानुरूप सांगता कलल पेशजी करारा प्रो निश्चयात आणोन उतर सत्वर पाठविणे दिवसगत न लागे ते करणे राजश्री नाना यासी हुजूरच आज्ञापत्र सादर आहे व आमच पत्र पाठविले आहे त्यासी प्रविष्ट करणे वरकड येविसीचा मजकूर टोपाजी सांवत हुजूरे व आबाजी गायकवाड सांगता कलेल. बहुत काये लिहिणे लोभकीजे हे विनंती.

लेखांक १४५ तारीख ३१-१-१७८४

रुमाल नं. ७३

श्री

छत्रपति

राजश्री बालाजी पंत नाना

गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य श्रे।। गुजाजी गाइकवाड सरखवास दंडवत विनंती येथील क्षेम ता। माघ शुध दशमी पर्येत जाणोन स्वकीय कुशल लिहित असावे विशेष आपण पत्र पाठविले पावले राजश्री अग्नोजी सिंदे यासी मजकूर बोलण्यात आला आहे लिहितील त्यावरून कलेल म्हणोन पत्री लिहिले प्रमाणे मशारनिलेचे पत्रावरोन कलो आले येविसी श्रीमन्माहाराज राजश्री स्वामीचे आज्ञेप्रो मशारनिले यासी पत्री लिहिले आहे आपणास सांगतील तो सकलार्थ चिती पुर्तेपणे आणोन स्वामीचे मनोदयानरूप आज्ञे प्रो निदर्शनास येई ते करून कृपेस पात्र व्हावे हेच श्रेयस्कर बहुत काये लिहिणे कृपालोभ कीजे हे विनंती.

लेखांक १४६ तारीख १८-११-१७८४

श्री रामवरद

नं. ९

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री

गंगाधरपंत स्वामी गोसावी यासी

सेवक नीलकंठ बाबूराव अमात्य कृतानेक नमस्कार विनंती उपरी किले गगनगडकरी

यामध्ये व तीर्थस्वरूप राजश्री सुब्रराव दादा यामध्ये विपर्यास बहुत आला येकमास पर्यंत किल्लाचे दरवाजे लागले गडकरी याचे त्यांचे विरुध फारच वाढले न बने स्थलास अपाय होतो ऐसे आम्हास समजणेत आले गडकरी याजकडून संकेत महद खटपटेने आणिला आणि राजश्री नाना याच्या कानावर घातले त्याणी सांगितले जे पूर्वार्जित स्थलाचा बचाव तुमचे हाताने होत असल्यास करावा त्याची पुरवणी सर्वात्मना आपणाकडे आहे म्हणोन सांगितले त्याजवरून जागेचा संकेत आणवून येथून चिरंजीव राजश्री रघुनाथराव यास पाठविले ते कार्तिक वद्य त्रयोदसीस किल्यास दाखल जाहलेचे पत्र आम्हास आले बंदोबस्त करणे प्राप्त वडिलार्जित जागा दोही राज्यात स्थल एक त्यापक्षी उपेक्षा करून परिणाम नाही याजकरिता बंदोबस्त करविला आपणास कलावे राजश्री नाना याजकडे कारकून रवाना केले आहेत स्वारी गांगातीरास जाहाली आहे च्यार दिवस अधिक लागतील तत्रापि लांबीमुले च्यार दिवस अधिक लागलेस आपण संनिध आहां आम्ही लांब आहो हरयेकविसी चिरंजीव लिहितील त्याप्रमाणे पुरवणी करावी.
र।। छ ४ मोहरम.
पै।। छ १५ मोहरम सन खमस.

लेखांक १४७ तारीख १९-११-१७८४

श्री

पत्र नं. १९३

राजश्री नाना स्वामीचे शेवे
सी

विनंती विशेष सटवोजी भोसले करवीराहून पंचवीस स्वार व पाइचे दाहा पंधरा माणूससुधा निघोन मौजे कुंडल ताो वालवे येथील सिवेतून जात असता मौजे मजकूरचे गावकरी मार्गसीर्ष शुध प्रतिपदा शनवारी आडवे गेले होते त्याणी कोठे जाता म्हणोन पुसिले (ता. १३-११-१७८४) त्याजवरून नागपुरास जातो म्हणून सांगितले आणि राजापुर कमलापुराकडे गेला याप्राो राजश्री परशरामपंत भाऊ यासही गावकरी याणी कलविले याप्राो कुंडलेहून वर्तमान येथे आले ते आपणास कलावे म्हणोन लिहिले आहे र।। छ ५ मोहरम भाऊनी गावकऱ्यास उतर पाठविले जे मा।।रनिलेस जाऊ देणे. करारात तसेच आले आहे हे विनंती.

लेखांक १४८ तारीख ३०-११-१७८४

श्री रामवरद

नं. ८

राजश्रियाविराजित राजमान्य राज-
श्री गंगाधरपंत स्वामी गोसावी यासी

सेवक नीलकंठ बाबूराव आमात्य कृतानेक नमस्कार विनंती उपरी चिरंजीव राजश्री रघुनाथराव कार्तिक बहुल त्रयोदसीस किल्यास दाखल जाहलेचे वृत्त आपणास लिहून पाठविलेच आहे त्यानंतर पनालेहून माहाराजाकडून राजश्री गुजाजी गायकवाड सरखवास यासी बरोबर राजश्री चिटको माहादेव देऊन गडकरी यासी बोलणेकरिता पाठविले ते मार्गसीर्ष शुध प्रतिपदेस पेठेस आले गडकरी याचे त्याचे बोलणे लागले असता आतून संकेत तीर्थस्वरूप राजश्री सुबराव दादाकडून होऊन येकायेकी माहाराजाची स्वारी पनालेहून जाहाली आस्तमानी पेठेनजीक दाखल जाले वडिलानी आतून लोकसुधा पेठेत स्वारी घ्यावी यैसी गडबड केली परंतु गडकरी याचा पेटेचा बंदोबस्त पका होता यामुले गोष्ट फसली स्वारी माघारे फिरोन सालवणचे चौकीवर बागात मुकाम केला दुसरे दिवसी वडील पागा सरंजाम सुधा जाऊन भेटले धण्याबरोबर तीन हजार पायदल व सात आठसे राऊत आहेत पुढेही आणखी जमाव करून पेठेस उपद्राप करावा यैसे आहे पेटेची बंदोबस्ती हजार बारासे प्यादा घालून येथास्थित केली आहे येकायेकी जुमस खात नाहीत दोही राज्यात येक स्थल आमचे तेथे बखेडा जाहला स्थलास अपाये जालेस सर्वस्वे घात याजकरिता राजश्री नानाचे कानावरी घालून चिरंजीवास पाठवून बंदोबस्त केला धण्यानी विपर्यास चिती आणून शह दिला आहे सविस्तर वर्तमान आपणास कलावे याजकरिता लिहिले आहे राजश्री नाना याचे लक्ष आमचे ठाई त्याप्रमाणे आपले आसावे हरयेक प्रसंगास संवस्थानाहून चिरंजीव लिहितील त्या प्रमाणे साहित्य करून संरक्षण करावे भरवसा आपला जाणून लिहिले असे वडिलार्जीत जागा श्रीचे स्थल आहे आपणास तेथील साभिमान असावा. र॥ छ १६ मोहरम. बहुत काय लिहिणे लोभ कीजे ही विनंती.

पै॥ छ १८ मोहरम सन खमस

मार्गसीर वद्य ६ दोनप्रहर गुरुवार. (पै॥ ता. २-१२-१७८४)

लेखांक १४९

तारीख ९-१२-१७८४

नं. ११

(आबाजीराऊ कृष्ण प्रतिनिधीचे बाळाजीपंतांस पत्र. अवांतर मजकूर गाळला आहे.)

यानंतर श्रीमन्माहाराज धणीसाहेब याणी दर्शनास येण्याबिसी आग्रहे करून आज्ञापत्रे पाठविली उपाये नाही यास्तव निघोन जाणे जाहाले येविसीचे सविस्तर वृत्त राजश्री तात्या यासी पेसजी लि॥ होते त्याणी आपणास श्रुत केले असेल हाली मार्गसीर्ष शुद्ध सप्तमीस आज्ञा घेऊन स्वस्थलास आगमन जाहले कलावे पाराशराकडे राजश्री परशरामपंत याजकडील फौज आली आहे त्यास लगता इकडील प्रांत व ठाणी आहेत त्यास उपसर्ग न व्हावा येविसी आपले पत्र मा॥रनिले यासी जाऊन इकडे कोणेकविसी उपद्रव न लागे ते करावे.

र॥ छ २५ मोहरम.

लेखांक १५० तारीख १०-१२-१७८४

श्री आई आदि पुरुष

नं. १०
पै।। छ १० सफर
सन खमस समानीन
पौष मास

राजश्रियाविराजीत राजमान्य राजश्री
बालाजीपंत स्वामी गोसावी यासी

पोष्य आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरी पेशजी आपणाकडे पत्रे रवाना केली होती त्यास राजश्री प्रधानपंत याचे स्वारी बार आपले जाणे गंगापुरास जाहले त्यामुळे जासूद पत्रे घेऊन माघारे आले हाली पुण्यास आल्याचे वर्तमान ऐकोन संतोष जाहला इकडील वर्तमान तर पनाल्याहून राजमंडलची फौज इकडील ठाण्यालगती येऊन प्रांतात दंगा केला पाच च्यार गाव लुटून नेले व मलकापुरचे ठाण्यावर चढाई करून फौज आली तेव्हा परस्परे लढाई दोन च्यार जाहल्या उपरांत फौजेचा तल उठोन दोन कोश मागे गेला तेथे आठ दिवस मुकाम होता तेथून निघोन बावडयानजीक फौज गेली तेथे श्रीमंत माहाराज स्वामीची स्वारी पाराशराहून फौजत जाहली बावडयास शह द्यावा येसी मसलत होत आहे पुढे काय घडेल ते पाहावे राजमंडलची फौज इकडे आली यास्तव इकडेही जमाव ठेवणे प्राप्त तेव्हा स्वार व प्यादे ठेविले व कारकून धण्याचे सेवेसी पाठविला त्यास तेथील बोलणे जे खंडणी द्यावी येशास तिगस्ता राजमंडलाकडील खंडणी राजश्री परशरामपंत याणी केली तेसमई आम्हाकडून खंडणीचा ऐवज घ्यावयाकरिता म।।रनिले याजबलून स्वार व रोहिले व कारकून मागोन घेऊन बरोबर राजमंडलचे कारकून व हुजरे देऊन पाठविले आणि खंडणीची निशा करून घेतली तो गुदस्ता पुण्यात खर्चवेच पडला व राजश्री परशरामपंत याणी तासगावाहून फौज व तोफा येऊन ठाण्यास बसले त्यासमईही खर्च देणे पडला येसी चहूकडून सावकारी देण्याचे पेचात तो हली राजमंडलाकडील खंडणी मागतात येशास प्रस्तुत रुपये द्यावयास शक्त राहिली नाहीं निरुपाय गोष्ट येविसी परशरामपंत याजकडे तासगावास लिहिले होते त्याणी उतर पाठविले कीं कारकून पाठवून द्यावा त्यावरून तिकडे कारकून पाठविले आहेत परंतु त्याचाही रोख कांहीं खंडणी कबूल करावी येशास नाना आम्ही तो सर्व प्रकारे संस्थान आपले पूर्ण अभिमानी आपण बाहेरील कोणेक गोष्टीचे संकट पडो देणार नाही येसे आश्वासन आपले आहे त्यापक्षी दुसरा अर्थ धरिला नाही सारांश आपण वडील संस्थान कर्जाचे पेचात याची चिंता आपल्याविना आणखी कोणास आहे राजश्री परशरामपंतास पत्र आपले परभारे यावे जे राजमंडलाकडील उपसर्ग प्रतिनिधि याचे प्रांती

पाराशर = पन्हाळा.

जाहला आहे व पुढे होईल येविसी राजमंडलचे वकील तासगांवी आहेत त्यास निक्षूण सांगावे कीं एकंदर त्याचे प्रांती उपसर्ग करावयाचे कारण नाही व त्यापासोन खंडणीचा पैका मागो नये खंडणी देणे ते तिगस्ता त्याणी दिलीच आहे हाली उपद्रव करावयाचे कारण नाही यैसे निक्षूण पत्र आपले आले तरीच संस्थानाचे संरक्षण होते नाना आपल्याविना आमचे संकट निवारण करणार दुसरा कोणी नाही. आपले मांडीवर उसे ठेविले आहे. युक्तीस येईल ते करावे रा॥ छ २६ मोहरम. बहुत काय लिहिणे लोभ असो द्यावा हे विनंती.

लेखांक १५१ तारीख १६–१२–१७८४

श्री आई आदिपुरुष

नं. १२

राजश्रियाविराजीत राजमान्य राज-
श्री बालाजीपंत स्वामी गोसावी यासी

पे॥ आबाजीराव कृष्ण प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरी यानंतर कर्जपटीचा व मातुश्री सकवारबाई याचा व तालुके रत्नागिरी येथील दुतर्फा अमल प्रकर्णी वगैरे जाबसाल होणे याविसी राजश्री सिवाजी बलाल यास सरकारातून आज्ञा जाली त्यावरून त्याणी आपणास लिहिले परंतु आपणाकडून समर्पक उतर येऊन जाबसालाचे फडशे होऊन येत नाही याजकरिता हाली हे पत्र आपणास लिहिले आहे तरी सर्वार्थ चितात आणून पत्राचे उतर पाठवावे म्हणजे त्याप्रमाणे विचार करावयासी येईल म्हणोन लिहिले यैशास दुतर्फा अंमल आहे त्यात कोणेविसी इकडून लढा आहे यैसे नाही अमलदार ज्या ज्याप्रमाणे सांगतात त्याप्रो अमल चालत आहे इकडून कोणेक अधिक जाहले यैसे नाही जमाबंदी दुतर्फा व्हावी यैसी चाल पेशजी पासून असता हली अंमलदार इकडील कारकून नसता एकतर्फीच जमाबंदी करितात त्याप्रमाणे वसूल इकडील येतो कमाविसीचाही ठराव तिकडूनच होऊन येतो त्याअन्वये इकडून मखलासी होत्ये व मनसुब्याही तिकडेसच होतात याप्रमाणे दुतर्फा अमलाचे वृत्त असून आपणापासी गैरवाका समजावितात अमलाची जात दुतर्फा असावी परंतु आपल्या लक्ष्यास्तव तेहि ध्यानात आणीत नाही मातुश्री सकवारबाईचा मजकूर तरी इकडील सरंजाम किती आहे त्यास खर्च कोणेप्रकारे आहे तो कोठवर ल्याहावा ? घरातील मातुश्र्याच च्यार आहेत त्यास येकयेक गाव दिल्हा आहे त्याअन्वये मातुश्रीसही येकगाव दिल्हा आहे.

मातुश्रीनी येथे यावे त्याचे सर्वप्रकारे चाल्वावयासी अंतर व्हावयाचे नाही कर्ज-पटीचा अर्थ तरी हे संस्थान कर्जाच्या पेचात कोणेप्रकारे आहे ते कोठवर ल्याहावे ? सिबंदी अनिवार करवीराकडील विचार सर्व आपल्या ध्यानात आहे राजश्री माहदजी सिंदे करवीरास आले तेव्हा राजश्री बालाराव येथे येऊन आम्हास घेऊन गेले तहाचे बोलणे

जाले उपरांत आमचा विचार कोणेरीतीचा घडोन आला हेही वर्तमान आपण आइ-किलेच आहे त्यापासून आम्हासी त्याणी विरोध लाविला आहे त्यामुले सिबंदीच्या पेचात गुदस्ता राजश्री परशराम रामचंद्र याणी राजश्री प्रधानपंत याचे पत्र देऊन करवीरचे हुजरे व कारकून व आपणाकडील स्वार व रोहिले व कारकून पाठविले त्यावरून आपणास पत्र लिहिले आपण राजश्री परशरामपंत यास पत्र दिल्हे परंतु स्वार रोहिले उठोन न गेले तेव्हा करवीरास कारकून पाठवून थोडयाबहुतानी विल्हे पाडून सावकारी निशा करून दिली तो रुपये अद्याप पावला नाही
यैशा चहूकडील वोढीमुले संस्थान पेचात आले आहे करवीराकडील अर्थ या प्रकारचा तथापि प्रधानपंताच्या श्नेहभावे आजपर्यंत कालहरण करीत आहो आपण वडील पेशजी तीर्थरूप याचे साभिमानपूर्वक आपण चालवीत आला. आपली ममता या जागा आहे म्हणूनच आजपर्यंत चालत आहे. रा॥ छ ३ सफर बहुत काये लिहिणे लोभ असो द्यावा हे विनंती.

लेखांक १५२ तारीख १६-१-१७८५

श्री आई आदिपुरुष

नं. ९

राजश्रियाविराजित राजमान्य
राजश्री बालाजीपंत स्वामी गो यासी

पोष्य आबाजीराऊ कृष्ण प्रतिनिधि नमस्कार विनंती उपरी राजश्री परशरामपंत यासी पत्रे पाठवून इकडील प्रांतास उपद्रव न व्हावा येविषई आपणास लि॥ त्यास आपण उतर दिल्हे तेथे लि॥ जे करवीरास जाऊ नये त्यास आपले जाणे जाहाले त्यापक्षी राजश्री परशरामपंतास पत्राचे प्रयोजन काय म्हणून लि॥ यैशास धणी यांच्या दर्शणास दाहा बारा वर्षे होत आली यास्तव धणी याही हुजरे व कारकून पाठविले त्यास एक दोनवेळा विनंती लिहिली परंतु उपाये नाही आग्रह बहुत जाणोन मलकापुरास निघोन गेलो तेथे राजश्री गंगाधर रघुनाथ याचे पत्र आले जे करवीरास जावयाचे न करावे परंतु हुजरे व कारकून बा॥र उपाये नाही यास्तव निघोन गेलो दर्शन जाहले उप्रांत धणीयाही कितेक आज्ञा केली परंतु आम्ही त्या गोष्टीचा स्वीकार न करिता आपल्या लक्ष्यास्तव आग्रहे करून निरोप घेऊन आलो त्यामुले धण्यानी आम्हावर अवकृपा करून कितेक कारणे उपस्थित केली आहेत ते आपल्या समजण्यात परभारे आले असेल नसल्यास कलो येईल यैसा विचार आमचा असता आपण आशा गोष्टी चितात इकडून अंतर नसता आणलीयाने उतम कीं काये हे चितात आणावे इकडील सर्व साभिमानी आपण इक-डील नाश जाहल्याने लौकीक आपला हे जाणोन जे करणे ते करावे आम्हास आपल्या लक्ष्यासिवाये दुसरा विचार नाही येविसी सविस्तर राजश्री रामचंद्रपंत यासी लि॥ आहे

आपणाजवल बोलतील त्याआन्वये राजश्री भाऊस लिहोन इकडे कोणेकबिसी प्रांतास उपद्रव न लागे ते करणार आपण वडील करवीराकडील तहाचा प्रकार घडल्यास धणीयाची आमचे जागा विकृत आहे त्यामुले आम्हाकडे वरात करून भाऊस यैवज देवावा ऐसेही येकिण्यात आले आहे त्यास येविसीही भाऊस लिहोन इकडे उपद्रव न लागे ते केले पाहिजे. रा। छ ४ रबिलोवल. लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

लेखांक १५३ तारीख १७-६-१७८५

श्री

रुमाल नं. ७२
फाईल नं. ९
पत्र नं. १

श्रीमंत राजमान्य राजश्री नाना
साहेबाचे सेवेसी

आज्ञाधारक दौलतराव पासलकर हवालदार किले भुदरगड कृतानेक दंडवत विज्ञापना ता छ ९ माहे साबानपर्यंत किल्याचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष किल्याच्या वगैरे बंदोबस्ताविसी दाहासात पत्रे पाठविली परंतु पत्राचीहि उत्तरे प॥ आज्ञा केली नाही व बंदोबस्तही कांहीच जाहला नाही त्याजवरून साहेबास पत्रे पावलीच नसतील त्यास हे पत्र पाठविले आहे तरी अवलोकन करून किल्याच्या भरतीचा वगैरे सर्व बंदोबस्त करून पाठविल्यास सेवकाचा निभाव होईल किले मजकुराचा निमोना करून पाठविला आहे पेशजी साहेबास व आम्हास पत्रे पे॥ आहेत त्या आन्वये बंदोबस्त करून देऊन आज्ञा करणार धणी आहेत किले मजकुरीचे माजी लोक फितुरापैकी पलोन राजमंडलात गेले आहेत त्याणी कबुलाती करून या प्रांती आले आहेत परंतु धणीचे पुणे करून चिंता नाही पराभवाते पावतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १५४ माहे जून इ. स. १७८५

श्री शांतादुर्गा

रु. नं. ६६
फा. नं. १०
नं. २

सेवेसी गंगाधर विश्वनाथ धारवाडकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे करवीरकराकडील वकील पेशजी पटणास गेले आहेत त्याणी हाली करवीरास बातमीचे पत्र पाठविले आहे त्यातील अर्थ कीं दाक्षणल्याने दौलतखाननामे सरदार याजबराबर पाच साहा हजार फौज व सात आठ हजार बार (गीर) व साहा तोफा यप्रमाणे सामान

देऊन त्यास आज्ञा केली जे नरगुंदचे संवस्थान व सिरटी व डंबल व कितुर व नवल्गुंद ही संवस्थाने व सरकारचे तरफेचे किले बेलगाव व बागडकोट ऐसी मातबर स्थळे सर्व घेऊन कृष्णा दक्षणतीरचा बंदोबस्त करून राहाणे मागाहून रमजानचे रोजे करून आम्हीही येतो याप्रो त्यास आज्ञा केली त्याजवरून दौलतखान याने फौजसुधा येऊन सिरटीचे ठाणे दग्याने घेतले आत देसाईण होती ती चोरवाटेने पळून गेली पुढे आता नरगुंद वगैरे संवस्थाने आहेत तीहि घेणार याप्रो बातमीचे पत्र आले त्यातील मजकूर स्वामीस निवेदन व्हावा याजकरिता विनंती लिहिली असे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

लेखांक १५५ माहे जून इ. स. १७८५

श्री शांतादुर्गा पूर्वी

फा. नं. १०

नं. ३

सेवेसी गंगाधर विश्वनाथ धारवाडकर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे करवीराहून बातमीचे पत्र आले त्यातील आर्थ कीं हाली दाक्षणत्याचे पत्र करवीरास आले जे पेशजी तुम्हास येकदोन पत्रे पाठविली परंतु अद्याप तुम्ही फौजसुधा आम्हाकडील सरदारास सामील जाहाला नाही तर आतःपर जलदीने सामील होणे नाहीतर पोख्त खंडणी देणे याप्रमाणे दक्षणस्थाचे पत्र आले त्याजवरून हे फौजेचे तरतुदेत आहेत या प्रांती गडबड व्हावी ही इच्छा याची होती त्याप्रमाणे योग घडो न आला त्या अर्थी यास अवशकच आहे परंतु बाह्यात्कारी दाक्षणत्याचे आज्ञेचे निमित्य करून आपणच या प्रांती

१

हंगामा करावा ऐसा ककारग्रामवासी याचा डोल दिसतो म्हणोन मार्मिकाने लिहिले होते तो मजकूर सर्व स्वामीस विदित व्हावा यास्तव विनंती लिहिली आहे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

लेखांक १५६ तारीख ३-८-१७८५

श्री

फा. नं. ३।३

नं. ३

श्रीमन्माहाराज क्षत्रिय कुलावतंस

राजश्री छत्रपति साहेबाचे सेवेसी

विनंती सेवक सुबराव कृष्ण कृतानेक विज्ञापना तागायेत छ २७ माहे रमजान पर्यंत

१ करवीरकर

साहेबाचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष सांप्रत साहेबाकडून आज्ञापत्र सादर होऊन सेवकाचा सांभाल होत नाही याकरिता चित सापेक्ष असे निरंतर आज्ञापत्री सनाथ करणार साहेब समर्थ आहेत वरकड वृत तीर्थरूप

मातुश्री बाई याणी सेवेसी विनंती पत्र पाठविले आहे व राजश्री विसाजीपंत पाठविले आहेत सेवेसी अर्ज करिता विदित होईल आम्ही पुरातन सेवक आहो साहेबी कृपा करून चालविणार समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १५७ तारीख १५–११–१७८५

श्री

पत्र नं. ४
पै॥ छ २३ मोहरम सन सीत
समानीन

श्रीमंत राजश्री नानासाहेब
साहेबाचे शेवेसी

आज्ञाधारक दौलतराव पासलकर हवालदार किले भुदरगड सिरसाष्टांग दंडवत विज्ञापना यैसीजे ता। छ १२ मोहरम पावेतो साहेबाचे कृपेकरून किलाचे व सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे

तदनंतर हैदराची फौज येथून साहा सात गावावर आहे डोले उठल्यावर कोणीकडे जाणे ते जातील ऐसे वर्तमान आहे.
सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १५८ तारीख २६–११–१७८५

पत्र नं. ५ श्री
पै॥ छ १ सफर
मार्गसीर्ष सीत

श्रीमंत राजश्री नानासा-
हेबाचे सेवेशी

आज्ञाधारक दौलतराव पासलकर हावलदार किले भुदरगड चरणावरी मस्तक ठेवून साष्टांग दंडवत विज्ञापना ता। छ २३ मोहरमपर्यंत वर्तमान येथास्थित आसे विशेष इकडील वर्तमान तरी किल्याखालील कडगांव दीड कोशावर आहे तेथे पनाल्कराचा जमाव हजार दीड हजार येऊन ते ठाणे घेतले व किल्याखालील देसाई तिकडे मिळाले आणखी जथ

एका दोहो दिवसात करोन किल्याच्या पेटा सही करोन दरवाजे बंद करावे आणि कितुरकरास पत्रे पाठविली आहेत त्याची फौज जलद आणोन किल्याचे पारिपत्य करावे याप्रमाणे वर्तमान जाहाले आहे येविसी मागे राजश्री आबा हशमनीस यास पत्र पाठविले होते परंतु कांहींच पुस्तपन्हा जाला नाही बरे असो स्वामीचे पुण्ये करून आम्ही चौघे भाऊ येथे बसलो आहो हे किल्यावर मेलेलें निघू परंतु जिते निघणार नाही स्वामीस शेवकाचे व जाग्याचे अगत्य असल्यास पुस्तपन्हा करावयास आज्ञा असावी कोल्हापुरापासून स्वाराचा व पायेचे लोकाचा सिरीस्वेत लागला आहे आम्हापासून सेवा जी घडेल ती स्वामीस विदित होईल लोकाचे रोजमरे तकूब केले आहेत ते द्याव यासी आज्ञा असावी लोकापासून कामकाज घ्यावे लागते. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १५९ तारीख २२-१२-१७८५

रुमाल नं. ७२ फाईल नं. ९

पत्र नं. ७ श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेबा--

चे शेवेसी

आज्ञाधारक दौलतराव पासलकर हवालदार किले भुदरगड सां। दंडवत विज्ञापना तागायत छ १९ माहे सफर पर्यंत किल्याचे व शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील मजकूर तरी मौजे कडगाव येथील ठाणे येसाजी सिंदा व उदाजी देसाई कडगावकर याणी घेतले होते ते फिरोन गडाहून स्वारी जाऊन हला करून छ १ सफरी घेतले तेथे जखमी व ठार मिलोन पाच साहा आसामी जाले उपरांतीक येसाजी सिंदा व देसाई याणी जमाव करून किल्यापासून तीन कोशावर ठाणे त्याचे होते तेथे राहून सरकार तालुक्यात उपद्रव करीत होते याजकरिता किलाहून स्वारी रवाना करून ठाणे घ्यावे त्यास जागा बहुत अडचणीची रान भारी परंतु लोकानी निकड करून ठाण्यास मोरचे लागू केले परंतु आतील लोकानी बारी धरून बहुत मारामार केली सरकारचे लोका पैकीं व माजी गडकरी याज पै।। मिलोन शंभर आसामी पर्यंत जखमी जाली व पंधरा आसामी ठार जाहली तेव्हा लोकानी जागा सोडून माघारे आले स्वारी समागमे राजश्री कुसाजी नलगे गडकरी व रामचंद्रपंत रायगडकरी ऐसे होते स्वामीस कलावे म्हणोन लि।। आहे हाली आम्ही आपले जागा ठाण्याचा व किल्याचा बंदोबस्त राखोन व स्वारी सिकारीहि करीतच आहो साहेबाचे पुण्यप्रतापे करून कोणे गोष्टीची चिंता नाही किल्याच्या जर्कीऱ्याच्या सरंजामाचा बंदोबस्त राजश्री भाऊनी केला आहे हुजूर पैकी लोक नामजाद आहेत त्यास कम तैनाती व तकुब रोजमरा आहे.

येसाजी सिंदा व देसाई याची पत्राच्या नकला पाठविल्या आहे सेवेसी विदित होतील. हे विज्ञापना.

लेखांक १६० तारीख ४-३-१७८६

श्री रामवरद

रुमाल नं. ६४
फा. नं. ३।१
नं. ७

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
बाळाजीपंत नाना स्वामी गोसावी यासी

पो नीलकंठ बाबूराव आमात्य कृतानेक नमस्कार विनंती उपरी आपली मनोलीच्या मुकामी भेट जाली त्यासमई संस्थान बावडा येथील बंदोबस्ताविसी बोलणे जाहले तेव्हा आपण सांगितले जे संवस्थान समधे पैका लागला असेल तो घेऊन स्थल सोडावे आगर हिमत असल्यास धरावी पुढे जसे घडेल तसे पाहावयासी येईल माहाराजाची ठाणी बल जाहालियास घ्यावी आम्हाकडून उभयतास कुमक व्हावयाची नाही व तुमचा नाशही करावयाचा नाही किंवा सरकारचा तह बिघडल्यास आपले कार्य सहजात घडून येईल यैसे कितेक प्रकारे भाषण जाले त्याच समई आपणासी उतर केले जे संवस्थानी कारभारी आहेत त्यास आणोन आपण सांगितला विचार मनन करून कलऊ तदनुसार बंदोबस्त करून द्यावा आपण सांगितले जे दिवसगतीवर घातल्यास नाश दिवसेदिवस कर्जाच्या पेचात म्हणोन सांगितले तदोतर निरोप घेऊन सातारियास येऊन संवस्थानच्या कारभारीयासी पत्रे लिहून राजश्री बाजी माहादेव यासी आणोन साद्यांत वृत सांगोन मा।रनिल्हेस आपणाकडे पाठवून द्यावे या अर्थे बोलाऊ पाठविले तो पत्राची उत्तरे आली त्यात श्रीमंत माहाराज खासा स्वारी कोंकणात जाऊन वाडीकर सांवताचा मुलूक जाळून तीन किले घेऊन वाडीवर सांप्रत गेले तिकडून माघारे करवीरास येतेसमई बावड्यास उपद्रव करून शह द्यावा यैशा योजनेत आहेत म्हणून लिहिले आले त्यास पेशजी पासून संस्थानाविषयी आश्रय आपला वरचेवर साहित्य पत्रेहि येतात परंतु काळानरूप कार्यभाग घडून येत नाही बाजी महादेव यासी तेथून तूर्त आणवावे तर प्रस्तुत संवस्थानच्या बंदोबस्तास तेच असल्याविना परिणाम नाही यास्तव राहिले फौजबंदी करून ठाणी घ्यावी मुलुक लुटावा येणे करून दहशत बसून कार्यभाग जाहालियास उतम यैसे करावे तर फोज ठेवावयासी द्रव्यबल नाही तशात त्याणी प्रयत्न करावा तर आपले परमाणगीसिवाये फौज येत नाही त्यास परमाणगी असावी म्हणजे कांहीं उपाये करू म्हणतात तरी परमाणगी आपली जाहली पाहिजे आपण सांगितले कीं संवस्थानास आम्हाकडून उपद्रव तिलमात्र व्हावयाचा नाही म्हणोन सांगितले असता राजश्री गंगाधर गोविंद[1] याजकडून वारंवार उपद्रव होतो तेणेकरून नाश यास्तव त्यास निक्षूण ताकीद जाली

१ विजयदुर्गचा सुभेदार.

पाहिजे येविसी सर्व प्रकारे आमचा अभिमान आपणास आहे वरकड साद्यांत वेदमूर्ति राजश्री सदासिव भटजी यासी लिहिले आहे ते सांगतील त्यावरून कलेल सर्व प्रकारे बडीलपणा आपलेकडे तेव्हा आरंभिले कार्याची सुसिधी करणे हे आपलेकडेस असे. विशेष लिहावेसे नाही.

रा॥ छः३ माहे जमादिलावल बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १६१ तारीख २९-५-१७८६

श्री शंभुः

रुमाल नं. ६४
फा. नं. १०
नं. १

राजश्री बालाजीपंत नाना
गोसावी यांसी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्ने॥ राजे खेम सांवत भोसले बहादर सरदेसाई प॥ कुडाल व माहालानिहाय रामराम विनंती येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लेखन केले पाहिजे विशेष माहाराज करवीरवासी जंजिरे सिंधुदुर्ग व प्रसिधगड येथे येऊन इकडेस कलह केला तदोतर त्याची फौज प्रसिधगडाखाली होती त्याच संधीमधे राजश्री जिवाजी गोपाल जमावासुधा राजश्री गणेशपंत बेहरे याजकडेस जावयास आले त्याच्या व इकडील भेटी होऊन कितेक मसलतीचे बोलणे व्हावे त्यास फौज माहाराजाकडील कूच करून घाट चढोन माघारे जावी आण जिवाजीपंताचे भेटीचा योग घडावा त्यास जिवाजीपंत बांदेहून निघोन पुढे जावयास गेले राजश्री गोपालराव रामचंद्र फिरंगी याजकडेस गेले आहेत त्याचे व फिरंगी याचे भेटीचा योग नाही फिरंगीही सरकारचे मसलतेस निघतो न निघतो तदविसीचे साधनास रा॥ जिवाजीपंतानी मणेरीस आसावे इकडून तीर्थस्वरूप राजश्री रघुनाथ सांवत दादा यासी त्याच्या भेटीस्तव रवाना केले त्याच्या व जिवाजी-पंताच्या भेटी होऊन गोपालराव रामचंद्र याच्या बोलण्यास बल पडावे हे इकडील मानस परंतु पंतानी दादासाहेब यांच्या भेटीचा योग न करतां मणेरीहून घाटाच्या तोंडी गेले दादासाहेब याच्या व त्याच्या भेटी जाहल्यास कितेक सरकार मसलतीच्याच गोष्टी होत्या येविसीचे व वरकड कितेक लिहिणे ते रा॥ गोपालराव रामचंद्र आपल्यास लिहितील त्याजवरून कलेल आमचे लक्ष आपल्या स्नेहावितरक्त दुसरे नाही.

रा॥ छ १ माहे शाबान बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती.

लेखांक १६२

तारीख १५-१२-१७८६

श्री

नं. १६

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ११३ पराभव नाम संवत्सरे मागसीर्ष बहुल दशम गुरुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री बाळाजी जनार्दन यासी आज्ञा केली यैसीजे हुजूरने बोलणेची आज्ञा होणे ते राजश्री बालाजी गणेश यासी जाहली आहे आज्ञेप्रमाणे मशारनिले तेथे आपणासी बोल्त आहेत मशार-निलेखेरीज अवांतर हरकोणी इकडील बोलणे बोलतील त्याजसी आपण बोल्त न जावे + जाणिजे बहुत काय लिहिणे.

लेखांक १६३

इ. स. १७८६-८७

रुमाल नं. ७३

श्री

यादी राजमंडळ करवीरकर नि॥ बोलणे सु॥ सबा समानैन मया आलफ

(डावी बाजू)

मनोली तालुका वगैरे ठाणी पेशजी साहुकाराकडे गाहाण होती त्याचा फडशा सन आर्बात जाहला नंतर सन खमसापासून सदरहु तालुका तिरायती साहुकाराकडे देऊन पाच लक्ष रुपये तीन वर्षात भाऊनी साहुकारापासून घ्यावे याप्रो ठरावात आले त्याज-वरी निशा देत असता अडचणी दाखऊन घेतली नाही सन खमसापासून सीत आव्वल पर्यंत अंताजी विठल पेशजीचे साहुकार याणी वैवाट केली पुढे सीतात टिपूची गडबड जाली तेव्हा मा॥रनिले याणी माहाराजाकडील सेनाखासकेल याचे हवाला तालुका केला हाली सन सबात भाऊ याणी फौजा पाठऊन तालुका घेतला त्यास सन खमस व सीत दुसाला वसूल जिकडे पडिला असेल त्याजपासून घेऊ त्यास आडथला सरकारातून व भाऊ याजकडून न व्हावा व भाऊ याणी आडथला केल्यास जो यैवज लागू होईल तो यैवज भाऊनी पाचा लक्षात मजुरा द्यावा व हाली सन सबा साल मजकुरचा वसूल भाऊ याजकडे पडिला असेल तो मजुरा द्यावा व बाकी यैवज देणे राहील त्याची हामी घेऊन हप्तेबंदी प्रो यैवज घ्यावा. तालुका आमचे स्वाधीन करावा.

साडेनऊ लक्ष रूपये सन आर्बात द्यावयाचा करार त्यापै॥ साडेपाच लक्ष रुपये हुजरून द्यावयाचे त्यापैकी यैवज आला असेल तो वजा घालून बाकी यैवज राहील त्याची निशा घे (अपूर्ण)

(उजवी बाजू)

राजश्री परशरामपंत याणी येसाजी सिंदे मृत्यु पावल्यावरी सन आर्बात ठराव केला त्याप्रो फडशा होईल याप्रो करार आले त्यास त्या सालात तह मा॥रनिले याणी

केला परंतु त्याची यादी आम्हास त्याणी ठरावाची दिल्ही नाही हुजूरून जोसीराव बोलणे बोलत होते त्यासी पुसिले कीं बोलण्याचा ठराव कसा कसा जाहला तेव्हा जोसीराव याणी आपले स्वदस्तुरची यादी बारा कलमाची लेहून दिल्ही ती येणे प्रो

१ हुकेरी तालुकेचे सरदेशकुलकर्ण व हुबलीचे गाव हचनाल
१ हुकेरी तालुके बरोबर फुटगाव गाहाण आहेत ती सुटावी
१ रामचंद्र नाईक याजकडे आपाजी शामजीचा कतबा बारा लक्षाचा आहे तो सुटावा.
१ मनोली निा सेनाखासकील याचे कागद कतबे गुंतले आहेत ते यावे
१ बारीपलीकडे मनोलीचा मुलूख हैदरखानाने घेतला आहे तो हैदराचा सला जालेनंतर सुटावा
१ तोरगलाकडील मोगलपटी बारी पलीकडे पूर्वी चालत आहे व कितूर प्रांाही चालते त्याप्रो ताकीद करून चालवावी.
१ तोरगल तालुकेत दहक सालमजकुरी घेतला आहे तो यैवज मजुरा यावा
१ राजश्री पंत प्रधान याजकडून हत्ती घोडे जवाहीर नजर यावे
१ मनोली तालुका तिराईत सावकाराकडे ठेवावा बाकी हप्तेबंदी प्रो फिटेल नंतर सरकारात यावा
१ आष्टे समडोली सिरोलात पागा आहे त्याचा राजमंडळांत ग

(अपूर्ण)

लेखांक १६४ तारीख २९-४-१७८७

श्री

रुमाल नं. ७३
फाईल नं. १ अ
पत्र नं. २११

चिरंजीव राजश्री बलवंतराव गणेश यासी बाजी बलाल आशीरवाद उपरी येथील कुशल ता।। वैशाख शुध द्वादसी रविवार पर्यंत येथास्थित आसे विशेष तुम्ही चैत्र वद्य त्रयोदसीचे पे।। ते वैशाख शुध नवमी गुरुवारी पावोन लि।। मजकूर हुजूर निवेदन केला हुजूरची स्वारी सामानगडास गेली होती येतेसमई वाटेने घोरपडे सेनापति याचे गांवावरी हुजूरचे लोक जाऊन दंगा केला येविसीची वर्तमाने येथे प्रकारांतरे आली तेविसीचे मजकूर तपसिले लिहिलात ऐशास स्वारी सामानगडास जाहाली तेथोन स्वारी माघारे जाहाली त्यास राजश्री संताजी घोरपडे सेनापति हे हुजूरचे सेवक धर्णीयाचे आज्ञे प्रो सेवेसी तयार आसावे हा मार्गही विहीतच त्याहीमध्ये त्यास पदाची वस्त्रे जेसमई दिल्ही ते समई त्याणी हुजूर करार करून दिल्हा ती करारनामेची त्याची पत्रे हुजूर आहेत त्याप्रो त्याजकडून घडत नाही बरे असो ते हुजूरचे सेवक तेव्हा हुजूरचे आज्ञेचे लक्षानरूप तत्पर

होतीलच हुजूरची स्वारी त्याचे प्रांतातून आली तेव्हा घांसदाणेचे रोखे गांवगणानी जाहले त्यामध्ये पटणकुडीवर रोखा जाहाला तेव्हा तो गांव सेनापतीकडून राजश्री रामचंद्र कृष्ण दातार याजकडे आहे मशारनिलेचे बंधू कासीत आहेत तेही कापसीचे मुकामी हुजूर जोहारास आले होते त्याजबा रामचंद्रपंत याचे कारकून आले होते तेव्हा त्यास आज्ञा जाहली पटणकुडी गाव तुम्हाकडे आहे तेथील घासदाणेची बोली उरकोन जाणे ते कारकून बोलिले गावचा रोखा मजजवल द्यावा मी रामचंद्र-पंताकडे लटेस लेहून पाठवून जाब आणोन विनंती करितो म्हणोन बोलिले तेव्हा त्या-जवल रोखा दिल्हा ते घेऊन गेले ते फिरोन बोलणेस न आले येक दिवस कापसीस मोकाम जाला तेथोन कूच होऊन गलगले गावाहून स्वारी आली गलगले गाव पिसाल याजकडे आहे कोणी हुजूरून आले तेव्हा तेथे स्वारी तासभर राहिली होती त्यास सांगोन पाठ-विताच त्याणी हुजूर येऊन विनंती केली गाव माहाराजाचा आम्ही सेवक हुजूराचे आज्ञेस हाजीर आसो याप्रो जाहले बोलीस मान्य जाहले मग तेथे कजिया कर्णेस कारण काय ? तेथोन चिखलीवरी येऊन मोकाम जाहला च्यार मोकाम जाहले परंतु पटणकुडीचे कोणी बोलणेस न आले येक दिवसी कहीस म्हणून फौज गेली गावाचे लांब उभे राहून त्या गावात सांगोन पाठविले हुजूर येऊन बोलणे करून जाणे याप्रो दोन तीन वेल सांगोन पाठविले कांहीं जाबसाल न देता प्रथम गावातून गोली वाजविली तेव्हा बाहीर उसाचे येक दोन फड होते ते नाश केले तरी कोणी आतून न पाठविता गोल्या टाका-वयासी लागले मग फौज गावाजवल गेली तेसमई कांहींसा कजिया जाहला हुजूरची दोन घोडी पडली येक दोन च्यार आसामी जाया होऊन दोन आसामी पडली आतीलही कांहीं पडले जखमी जाहलेच आसतील इतके होताच हे वर्तमान मोकामी हुजूर निवेदन होताच जासूद पाठविले जे जाहले ते जाहले गावावरी निकर्श न करिता माघारे येणे याप्रो ताकीद पाठऊन फौज माघारे आणिली दुसरे दिवसी तेथोन कूच होऊन स्वारी करवीरास आली स्वारी दाखल जाहलेवरी दुसरे दिवशी तुम्हास लेहून पो त्यात हा मजकूर काय लिहावा सेनापती हुजूरचे सेवक त्याणी आज्ञे प्रो वर्तावे हा मार्ग सरल त्यामध्ये घासदाणेचे रोखे जाहाले ते हाली त्याणी उरकोन द्यावी ते पटणकुडीने न करिता याप्रो केले त्यास सेनापती हुजूरचे सेवक त्याचे प्रांतातून स्वारी जाहाली असता गावकऱ्यानी येऊन रुजू थोडेबहुताने बोलणे करून घेऊन जावे ही विहितची गोष्ट सेना-पति हुजूरचे सेवक त्यास आज्ञा व्हावी आणि होईल हा विहितचा मार्ग याखेरीज राजश्री भाऊ याजकडील गावास अगर हारयेकविसी तोसीस हुजरूने जाहाला नाही राजश्री नीलकंठराव गोविंद हे करवीरास जावयासी निघाले साहा कोश गेले त्यास कोणाची पत्रे आली कीं या प्रांती दंगा जाहला आहे तरी तुम्ही न येणे त्यावरून मा।र-निले पुणीयासी माघारे गेले म्हणोन लिहिले इकडून कांहीं दंगेचा मजकूर हा वेलपर्यंत जाहाला नाही पुढेही इकडून व्हावयाचा नाही हरकोणी तेथे लेहोन पाठवोन करतील तरी तेथे विवेक आणि खरेखोटे हे पाहणे याची विवेचना होऊन खरे आसेल तेच

घडेल आसी रीत आहे या आर्थें आगोधर हा मजकूर तुम्हास लिहिला नाही यात लिहावा असा प्रकार इकडून घडिलाच नाही त्या पक्षीं काय लिहावे ? चिखलीहून कूच व्हावयासी कारण सेनापतीकडून बोलणेस राजश्री विसोबा नाईक सिदोरे हुजूर येऊन अर्ज केला सेनापति हुजूर दर्शनास घेऊन येतो ते येत आहेत स्वमुखे पटणकुडी वगैरे खेडियाचा घांसदाणेविसी विनंती करोन मखलासी करून घेतील याप्राो बोलिले मग दुसरे दिवसी कूच होऊन स्वारी करवीरास आलीदारभ्य विसोबा नाईक अद्याप हुजूर आले नाहीत याप्राो त्याच्या रीती हे समजणे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे आसीर्वाद.

लेखांक १६५

इ. स. १७८७–८८

श्री

रुमाल नं. ७३

यादी ठराव श्रीमंत राजश्री माहाराज छत्रपति स्वामीची स्वारी वाडीकर सांवत याजवर जाली तेथील जाबसाल माहाराजाकडून व्हावयाचे सु॥ समान समानीन

१ हेरे तालुका व तुरुकवाडी व नरसिंगड व भरथगड वगैरे घेतले आहेत त्यातून दोन स्थले माहाराजाकडे आसावी बाकी स्थले तोफासुधा माघारी द्यावी दोन स्थले राहातील ती पुण्यात ठराव होईल त्याप्रा॥ तोफासुधा द्यावी.

१ सालाबाद सिबंदी माहाराजाकडील घाटाखालींल किल्यात आहे त्याप्राो असावी.

१ हाली स्वारी महाराजाची घाटाखाली जाली आहे ती करवीरास फौजसुधा यावी.

१ पाडाव लोक सरदार नेले आहेत त्यास सोडून देवावे.

१ तालुकेयातील यैवज पाडाव लोक याजवळून नख्त घेतला असेल तो माघारा द्यावा.

१ मोर्चेल व मरातबाविसी माहाराज यासंनिध विनंती करावी आज्ञा होईल त्याप्राो चालावे त्याजवर सांवताकडील कारकून कृष्णाजी महादेव व सिताराम अनंत पुण्यास येऊन करार केला कीं मोर्चेले दोन्ही माहाराजास दाखऊन पुण्यास नेऊन पावती आणून देतो त्यास मुदत वीसा रोजाची घेऊन गेले त्या कराराप्रमाणे घेऊन यावी ते न करिता कृष्णाजी महादेव पनाल्यास गेले सिताराम अनंत वाडीत राहिले मोर्चेल घेऊन येतात म्हणून कृष्णाजी महादेव सांगतात परंतु मोर्चेल येत नाही कृष्णाजी माहादेव आता बोलू लागले कीं सिताराम अनंत लबाडीस प्रवर्तले आम्हास निरोप द्यावा हणजे श्रीगोंद्यास जाऊन सखुबाई सिंदे याजकडील पत्रे व माणसे घेऊन जाऊन सिताराम अनंत व मोर्चेले घेऊन येतो.

लेखांक १६६ तारीख १२–१०–१७८८

फा. नं. १ ब श्री तालीक
पत्र नं. १८५

श्रीमन्माहाराज राजश्री छत्रप-
ती स्वामीचे सेवेसी.

विनंती सेवक रत्नाकर राम कृतानेक सेवेसी विज्ञापना ता। छ ११ मोहरम पर्यंत स्वामीच्या कृपावलोकने करून वर्तमान येथास्थित असे विज्ञापना ऐसीजे किले भवानीगड व तुरुकवाडी दोनी ठाणी रखमाजी भोसले याणी घेतली होती ते आजी छ मा।री किले भवानगड व छ १० मोहरमी तुरुकवाडीचे ठाणे येणे प्रा। दोन ठाणी हुजूरची बसली त्या गडबडीत रखमाजी भोसला ठार जाला येक दोन दिवसात सेवेसी येतो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १६७ तारीख २२–१०–१७८८

श्री भवानी शंकर

रु. नं. ७३
फा. नं. १ बी
पत्र नं. ५

शेवेसी सदाशिव खीरसागर हवालदार व कारकून व नाईकवाडी किले कलानिधी सां। दंडवत व सां। नमस्कार विज्ञापना तागायत छ २१ मोहरम पावेतो सेवकाचे किल्याचे वर्तमान येथास्थित आसे विशेष इकडील वर्तमान आज दोन वर्षे आवर्षण पडोन माहागाई अतिशय जाहाली तेणेकरून रयत व लोक बहुत हैराण जाहाले आसी माहागाई पंचवीस तिसा वर्षात पडली नव्हती स्वामीचे कृपाकटाक्षे करून लोक वाचविले लोकाचा पूर्वील गैरआदा मोरोपंत भावे याचे कारकीर्दीची देणे आहे त्या पैा। कांहीं धणी कृपावंत होऊन देविल्यास लोकाचे जीवन राहील वरकड किल्याचे बंदोबस्तीचा मजकूर राजश्री आनंदराव गणेश किल्यास आले ते समई किल्याची दक्षणबाजू पडून अगदी नाजूक जाहाली होती त्यावर त्याणी इमारतीस प्रारंभ करविला बहुतेक करून काम तयारीस आले आहे किल्यास जी मेहनत जी सेवकाने केली आहे ती आनंदराव याणी व सरकारचे हुजरे याणी पाहिली आहे निवेदन केलीच असेल साहेबाचे पाय तोच हा जागा आसे जाणून सेवा करीत आहो राजश्री वासुदेव गोविंद याजकडील राजश्री सखो रामचंद्र मामलतीवर आहेत आजपावेतो जागेचा सांभाल बराच केला हाली थोडेशे वांकडेपण मोजितात याविसी आनंदराव यास लिहिले आहे ते बंदोबस्त करतीलच येथील लोक जुने आहेत धणी कामात बहुत येकनिष्ट आहेत त्याची थोडीसी आरवलपणही संभालावे

लागते ते मी संत्राळून चालवीतच आहे याचा विस्तार धण्यानी पुसलियास मशारनिले समजावितील चांदरातीच्या दोन तोफा किल्यास दरमाहा सोडाव्या आसी चाल वरकडा किल्यास आहे येथे दारूची नेमणूक नाही येविसी आज्ञा करणार धणी आहेत व किल्याचे इमारतीस दोन तीन साले मिळोन दोन हजार रुपये नेमणूक जाहल्यास बेदस्ती चांगली होईल धण्याकडून पाच रुपये पावल्यास पंधरा रुपयाचे काम आंगमेहनतीने करीत आहो येविसीचे आनंदराव यास धण्यानी पुसावे नवीन या प्रांतातील वर्तमान रखमाजी राजे भोसले इकडे आले हेरे गंधर्वगड व तुर्कवाडी जाहामर्दीनेच घेतली त्यावर कोल्हापुराहून श्वारी आली त्याचा याचा दाखला तुर्कवाडीवर जाहला करवीरकराची श्वारी हटून माघारे तीन कोश नेसरीवर राहिले नंतर राजश्री बहीर बाबूराव त्रिंबकराव येशवंत याकडे असतात ते व राजमंडळचे दोन चार सरदार सडे तुर्कवाडीस जाऊन ममतेचा मोह त्याजवर घालून बेलभंडार देऊन माहाराजाचे भेटीस म्हणोन बाहीर काडिले आण आकस मात्र घात दग्याने करून जीवे मारिले सिपाई आहे ल्ढाईत मारिल्यास चिंता नाही परंतु बेलभंडार देऊन दगा केला ही गोष्ट करवीरकरानी बहुत अनुचित केली परस्परे धण्यास लिहिली गेलीच असतील परंतु आम्हापासोन दोन कोसावर हे वर्तमान जाहाले म्हणोन सेवेसी विनंती लिहिली आहे सेवेसी श्रुत होये हे विदान्यापना. सेवेसी नारळ मोहाच पाच पा आहेत हे विज्ञापना.

लेखांक १६८ तारीख २२-११-१७८९

श्री

नं. १०

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ११६ सौम्य नाम संवत्सरे मार्गसीर्ष शुध्ध पंचमी रविवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्य धुरंधर विश्वास-निधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली यैसीजे स्वामीचे सेवेसी आपण विनंतीपत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला त्यासी येविसीची राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञापत्री आज्ञा जाहली आहे त्याजवरून कलेल जाणिजे बहुत लिहिणे तरी सुज्ञ आसा.

मर्या
देयं विरा
जते

लेखांक १६९ तारीख २२-११-१७८९

श्री

नं. १७

स्वस्तिश्री राज्याभिषेक शके ११६ सौम्यनाम संवत्सरे मार्गसीर्ष शुध्ध पंचमी भानुवासरे

क्षत्रिय कुलावतंस श्री राजा शिवछत्रपति स्वामी याणी राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली येसीजे स्वामीचे सेवेसी आपण विनंती पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ श्रवण जाहला सांवत प्रकर्णी मजकुराविसी विनंती लिहिली त्यासी येविसीची आज्ञा होणे ती राजश्री चिंतामण हरि व राजश्री बाजीराव बलाल चिटनिवीस व राजश्री बलवंतराव गणेश यासी सविस्तर आज्ञा पत्री जाहली आहे ते आपणासी बोलतील त्या आन्वये लक्षात घेऊन विनंतीपत्र पाठवावे. जाणिजे बहुत काये लिहिणे.

मर्यादेयं
विराजते.

लेखांक १७० तारीख २३-१-१७९०

श्री

रुमाल नं. ६६
फाईल नं. २
नं. ३

पै।। छ २३ जमादिलोवल
सन तिसैन माघ

सेवेसी आपाजी[1] रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ माहे जमादिलावल मु।। किले बेलगाव स्वामीचे कृपावलोकने करून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष छ ३ मजकुरी तालुके कितूर प्रांतात गुरुरुद्रापाकडील कारभारी याणी से दोनसे राऊत व काटक प्यादे मेळऊन दरम्यान नेसरी व देसनूर ही ठाणी घातली व सभोवती आणखी लाहान सहान दोन तीन ठाणी घाळून टिपूकडील लोक कांहीं तोडातोड करून मारामार केली रयेत लुटली दुसरे झाडीचे मार्गाने पुत्र गुरुरुद्रापा खासा व राकपाचा भाऊ भिकापा म्हणून आहे दोन हजार जमाव करून दुसरी नेसरी मानगाव म्हणोन करवीरकराची आहे बेलगावचे पछमेस सात कोसावर तेथे आले की जांबीटीवरून टिकरी खानापूर वगैरे घ्यावी या आर्थे नेसरीवर मुकाम होता तो राजश्री परशरामपंत भाऊकडील कारकून येऊन गुरुपुत्ररुद्रापास माघारा नेले इकडे देसनूर नेसरी तालुके कितूर येथे जो जमाव होता तो नेसरीचे वोढेणावर होता त्याजवर धारवाडाहून हजार फौज टिपूकडील येऊन त्याजवर छापा घातला आणि आगदी खराबी केली दोन दिवसात येणे प्रमाणे वर्तमान जाले हाली टिपूकडील फौज कितुरास हजार स्वार आहेत मागाहून आणखी दोन चार हजार वगैरे येऊन पातशाहापूर बेलगाव शाहापूर तालुकियात धामधूम करणार येणेप्रो पत्रे पातशाहपुराहून आली व सभोवतेही बातमी

१ आपाजी रघुनाथ (भावे) – (बेळगांवचा किल्लेदार)

येणे प्रमाणे येत आहे पातशाहापूरचे कमाविसदार बाबूराव हिसेबाकरिता पुणीयासी आले आहेत मजमदार राजश्री केसोपंताचे पुतने पातशाहापुरी आहेत त्याचे पत्र येथे पंत मा।रनिलेस आले कीं बारीचे तोंडाचा बंदोबस्ताकरिता पनास आसामी पाठवून द्यावी ते पत्र बजिनस मजकडे पाठविले त्यासी येथून पनास आसामी पातशाहापुरचे बारीस ठाणी आहेत ते रखवालीस रोहिले याजकडील पनास लोक पाठविले आहेत हाली तिकडील बातमीची पत्रे आमित्राकडील जमाव भारी होऊन सरकार तालुकियात उपद्रव करणार येणे प्रमाणे दाट आवाई आहे रोहिले याजकडील जमातदार हुजूर गेले होते ते आले सिदी मुबारक जमातदार याविसी दोनतीनवेला विनंती लिहिली की जमातदारास आज्ञा होऊन सत्वर यावा त्यासी त्याचे कारकुनाचा व त्याचा खटला पडला आहे सिदी मुबारक जमातदारास आज्ञा होऊन सत्वर रवाना करावे. इकडे गडबड भारी जाली आहे. हे विज्ञापना.

लेखांक १७१ तारीख २–२–१७९०

श्री

नं. ४

वै।। छ २७ जमादिलोवल

सन तिसैन माघ

सेवेसी आपाजी रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ माहे जमादिलोवल मुकाम बेलगांव

बदरजमाखा जमावासुधा नेसरीवर आहे पुढे कोठे तोंड टाकणार हे वर्तमान सेवेसी लिहिलेच होते उपरांत छ १४ जमादिलोवली बदरजमाखा नेसरीहून कूच करून पातशाहापूरचे बारीतून जमावसुधा आंकली प।। पातशाहापूर येथे मुकाम करून सभोवते गाव अगदी जाळून लुटून फ.णा केले आकली व आकतंगीहाल हे गाव मातबर लुटून जाळून टाकली पातशाहापुराबर बेदडे (पेंढारी) स्वारी पाठविली तो पातशाहापुराचे गुढे निघाले ते अगदी लुटले अतिशय लूट केली तो प्रकार काये परियंत लिहावा.

बदरजमाखास सेवकाने व येथोन राजश्री केसोपंतानी पत्रे लिहिली तुमचे विद्यमाने सला असता तुम्हीच खासा येऊन परगणा सरकारचा खराब केला तुम्ही जे करणे ते दूरवर नजर देऊनच केले असेल या पत्राचे उतर आले कीं त्याणी राकपा वगैरे गुरुरुद्रापाचे लोकास आश्रा देऊन आमचे तालुकियात देसनुर व नेसरी वगैरे यासी उपद्रव करविल्यामुले येथे येऊन पारपत्य करणे लागले.

दुसरे छ १४ मजकुरी तीन टोल्या पेंढाऱ्याच्या करून झाडीत सिरून वटबारी दिडी व व्यकटमुरडी वगैरे मुलकातून चिकोडी परियंत येक लाख गुरढोर वगैरे लुटून फणा केले मुलुख बेसावध असुधा होता येणेप्रो या मुलकास गडबड जाली छ १५ रोजी

मागती कूच करून नेसरीवर माघारा आले आज येथोन दीडा कोसावर धामणे नजीक बेल्गाव शाहापूर दीड कोस येथे येणार आहे पातशाहापुरचा वकील मात्र बोलाऊन घेऊन आपले मुलुकचा नागवा व घांसदाणा वगैरे लाविला आहे व चोर तुमचे मुल्कांत आहेत त्याची यादी लेहून पाठविली ते आसामी धरून देणे तंटा लाविला आहे त्याचप्रो शाहापुरासही तंटा लावणार याप्रो जाले आहे.
या प्रांती फौजेची रवानगी होऊन याचा बदला जाल्यास उतम आहे. हे विज्ञापना.

लेखांक १७२ तारीख १६–५–१७९०

श्री

रुमाल नं. ७२
फाईल नं. ४६
पत्र नं. ३

सेवेसी सदासीव रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता।। ज्येष्ठ शु।। द्वितीयापावेतो मोकाम करवीर स्वामीच्या कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष सांवतवाडीकर याजकडील प्रांताच्या चिठ्या घेऊन राजश्री चिमणाजीपंत व बच्याजीपंत गेले त्याणी सेवेसी विनंती केली आसेल त्यावरून कामे उलगडून येण्याचे आर्थ स्वामीच्या ध्यानी आलेच आसतील
सांप्रत माहाराजानी टिपूकडील साधन करावयाकरिता वेदशास्त्रसंपन्न राजश्री महेश्वर पाध्ये राजापुरकर याचे पुत्र शशीशेखर पाध्ये टिपूजवल आसंतात त्याजकडेस त्याचे बंधू वररुची पाध्ये यास पागेची घोडी व खर्चवेचास व वस्त्रे देऊन रा।। केले ते येथून घरास जातो म्हणोन निघोन गेले तेथून पुढे जाणार यैसे वर्तमान समजलेवरून सेवेसी विनंती लि।। आहे हा मजकूर येथील वकिलासी बोलावयाची मर्जी आसल्यास या पत्राची द्रश्यता न होता बोलणे व्हावे याचे कारण येथील आव्यवस्थित प्रकार यास्तव सुचविले आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १७३ तारीख २३–८–१७९०

श्री

रु. नं. ७२
फा. नं. ४६
पत्र नं. ७

सेवेसी सदाशिव रघुनाथ सां। नमस्कार विज्ञापना ता।। छ ११ जिल्हेज मुकाम करवीर येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष सांवतवाडीकर याचे जाबसाल उलगडून द्यावयाविशी आज्ञेप्रमाणे राजश्री बालाजी गणेश व आम्ही मिलोन

माहाराजास विनंती पत्रे देऊन विनंती केली त्यावरून माहाराजानी आज्ञा केली कीं सांवतानी मरातीब मोर्चेल धरून अमर्याद वर्तणूक केली यामुळे त्याजवर स्वारी जाली ते समई राजश्री नानासी संमत घेतले व पुढे स्वारी स्वस्थलास व्हावी हेंही त्याचेच लक्ष ध्यानी आणून स्वारी स्वस्थलास जाली पुढे सांवताचा प्रांत सोडावयाचा तोहि त्याच्याच लक्षानरूप सोडू परंतु स्वारी माघारे फिरतेसमई पत्रे व याद ठरावाची घेऊन आला त्यात मरातीब व मोर्चेलाविशी माहाराजास विनंती करावी आज्ञा करतील त्याप्रमाणे सांवतानी चालावे याप्रमाणे ठराव होऊन सांवताकडील व सकूबाई सिंदे याकडील कारकुनानी पत्र लिहून दिल्हे त्यात स्वारी स्वस्थलास जाल्यानंतर विसा रोजात मोर्चेल राजश्री नानापासी देऊन पावती आणून देऊ याप्रमाणे ठरले असता अद्याप मोर्चेल पावल्याचे पत्र आले नाही हुजूरचे मानस की मोर्चेल येथे द्यावी परंतु सांवताचा आग्रह कीं त्यापासी द्यावी तेच मान्य करून स्वस्थ असता सांप्रत तुम्ही पत्रे घेऊन आला त्यांत लिहिले जे मोर्चेलाचा ठराव होत आहे ठरेल त्याप्रमाणे मागाहून लिहिल्यात येईल यावरून काये समजावे दुसरे सांवत कागदीपत्री मरातीब लिहितात ते पक्षी मोर्चेले आली म्हणोन तुम्ही म्हणता हे काये ? व सांवतानी मरातीब व मोर्चेले हुजूरचे आज्ञेखेरीज धरू नये हा आग्रह सुटला तो कसा ? असो येविशी तुम्ही राजश्री नानास लिहून मोर्चेल पुण्यात आल्याचे पत्र त्याचे आणवावे व सांवत राजे बहाद्दर म्हणवितात ते म्हणऊ नये व पेशजीच्या कराराप्रमाणे वाडीकरानी चालावे नंतर प्रांत सोडावा येविशीचा बंदोबस्त राजश्री नानास लिहून करावा व सांवताकडील कारकून यावा म्हणजे पहिले प्रमाणे तह करून जाबसाल उलगड्यात येतील व प्रांतात पहिले प्रमाणे वहिवाट चालावी त्यास दिकत सांवताकडोन असो नये याप्रमाणे निभावणी जाली पाहिजे येविसीचे बोलणे कारकून येईल त्यास बोलोन ठरावाची यादी करून तह करावयासी येईल प्रांत घेतला त्यासंमधे सिबंदी वगैरे खर्च जाहला तोही समजलाच आहे आता प्रांत सोडणे ते पक्षी त्याचा बंदोबस्त वाडीकराकडोन व्हावा याप्रमाणे माहाराजाची आज्ञा जाली त्यावरून विनंती केली की मोर्चेले कराराप्रमाणे पुण्यात आली आहेत सिबंदी वगैरे खर्चाचा मजकूर तरी दोन वर्षे प्रांत जफ्तीस आहे त्यापैकी एक साला वसूल स्वामीनी घेतला तो घेतलाच दुसरे सालचा वसूल पडला आहे त्यात किल्याची व माहालाची सिबंदी वजा घालून बाकी राहील ती सांवतास माघारे द्यावी व सालमजकुरी प्रांतास उपसर्ग न व्होता प्रांत माघारें द्यावा याप्रमाणे विनंती पत्रांत मजकूर आहे ते पक्षी जाजती खर्चाचे बोलणे निभावणार नाही मोर्चेलाविशी राजश्री माहादजी शिंदे याचा आग्रह भारी आहे ते जसे म्हणतील तसे ऐकावे लागेल येक रुपया न घेता मोर्चेले द्यावी लागतील त्या पक्षी आताच ठराव होऊन च्यार रुपये नजर देतात ती घेऊन फडशा केल्यास पुढे दिकत राहाणार नाही व सिंदे याजकडीलही अडचण पडणार नाही व प्रांत सोडावा येविसी दिकत असो नये विनंतीचे अलक्ष केल्यापक्षी साऱ्याच गोष्टी विसंगत पडतील याकरिता विनंती मान्य करावी हे उतम आहे अमान्य केल्यास राजश्री नाना व तात्या

यासी स्वामीचे अलक्ष धरावे लागेल अशी भाव दर्शविले त्याचे उत्तर राजश्रीने केले कीं मरातीब मोर्चेलाचा ठराव पहिला जाला तोच जाहाला त्याची निभावणी सांवतानी करावी त्यात दुसरे होणार नाही प्रांताचे जाबसाल मात्र कारकुनासी बोलोन उलगडावयासी येतील याप्रमाणे आज्ञा जाली ती सेवेसी विनंती लिहिली आहे त्यास पत्रान्वये ध्यानी आणोन बंदोबस्त करून राजश्रीस विनंती पत्रे यावी व सांवताकडील कारकून यास आज्ञा येथे यावयाविशी जाली पाहिजे राजश्री बालाजी गणेश राजश्रीच्या कामाकरिता राजश्री परशरामपंत भाऊ याजकडेस गेले आहेत जाले वर्तमान सेवेसी विनंती लिहिली आहे पुढे आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करीन. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १७४ तारीख १–९–१७९०

पत्र नं. २ श्री

शेवेसी बालाजी गणेश दोनीकर जोडून सिरसा नमस्कार विज्ञापना ता। छ २० जिल्हेज पर्यंत मु॥ मौजे ढवलेश्वर घटभा दक्षणतीर नजीक मनोली येथे स्वामीचे कृपेंकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष करवीराहून निघालो तेव्हा शेवेसी विनंती लिहिली होती कीं राजश्री भाऊ याणी जोसीराव यासी आणावयाचा आग्रह धरिल्यास शेवेसी विनंती लिहीन म्हणून लि॥ होते त्यास राजश्री भाऊ याची भेट घेतली बोलणे जाले तेव्हा भाऊ याणी पहिल्याने उतर केले की जोसीराव आले नाहीत रुजुवात कसी होईल? नंतर शेवकाने उतर केले कीं जोसीराव याचे रुजुवातीची तीन कल्मे आहेत त्यात एक कल्म नेसरी व माहागावचे आहे ते आपले बोलिल्या प्रो माहाराज याणी भान्य केले दुसरे कल्म भिवसी माणगांवचे त्याविसीची रुजुवात पुणियात करून चिंतोपंत याचे समक्षच जोसीराव याणी लिहून दिल्हे त्याच कल्माची पुन्हा रुजुवात का असावी? बाकी येक कल्म सिरोळचे सिबंदीचे राहिले त्या येका कल्माविसी जोसीराव यासी आणावे तत्रापि आपले राहाणे तासगावानजीक आसते तरी तसेही माहाराज यासी विनंती करावयासी येते तरी तोहि प्रकार नाही मजल दरमजल कर्नाटकात स्वारी चालली याजकरिता येक कल्म राहिले त्याविसी करवीरास जोसीराव यास लिहून पाठवावे उतर येईल तसा फडशा करावा असे बोलिलेबरी याप्रो कर्तो असे स्पष्ट बोलिले नाहीत माहाराज याचे मानस जोसीराव यास राजश्री भाऊ याजकडे पाठवावयाचे नाही असे आहे त्याप्रो राजश्री भाऊ यासी स्पष्ट बोलावे तरी भाऊ यासी कसे वाटेल कलेना म्हणून स्पष्ट बोलिलो नाही जोसीराव न आणिता फडशा करावा असा बोलण्यात भाव दर्शविला नंतर भाऊ याणी उतर केले कीं चिंतोपंत लिमये पंढरपुरास गेले आहेत ते आठ दहा रोजी येतील नंतर तुमचे त्याचे बोलणे समक्ष करून रवानगी करून देऊ इतकेच बोलिले परशरामभाऊ याणी बोलणे उलगडो नये म्हणून पत्र स्वामीनी

पाठविले ते उपयोगी बहुत पडिले तसे आणिक येक पत्र स्वामीचे भाऊ यास यावे कीं येका कलमाकरिता जोसीराव यासी आणावे आसा आग्रह न धरावा लिहून पाठऊन उत्तर आणून फडशा करून द्यावा म्हणून पत्र शेवकाकडेस आज्ञाकरून पाठविले पाहिजे तसाच प्रसंग दिसल्यास पत्र राजश्री भाऊ यासी प्रविष्ट करीन जाले वर्तमान शेवेसी विनंती लि।। आहे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १७५ तारीख ४-९-१७९०

श्री

पत्र नं. ४

शेवेसी बालाजी गणेश खांडेकर सां। नमस्कार विज्ञापना ता। छ २३ जिल्हेज मु।। मनोली येथे स्वामीचे कृपेकरून शेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष करवीरचे जाबसाला करिता येथे आलो त्यास राजश्री चिंतोपंत लिमये नाहीत पंढरपुरास गेले आहेत ते काल दशमीस शुक्रवारी पंढरपुराहून निघणार आहेत म्हणून राजश्री भाऊ सांगत होते येविसी राजश्री भाऊ यासी बोलणे जाले ते पेशजी सविस्तर शेवेसी लिहून पाठविलेच आहे त्याजवरून निवेदन होईल प्रस्तुत राजश्री भाऊ लांबत चालिले याजमुले पुढे काय सांगतील कलेना ? येविसी आपण राजश्री नाना यासी विनंती करून येक पत्र राजश्री भाऊ यासी पाठवावे कीं करवीरचे जाबसालाकरिता बालाजी गणेश यासी आपणाकडे पाठविलेच आहेत त्यास कामे उलगडोन देऊन सत्वर रवानगी करून द्यावी असे परभारा पाठविले पाहिजे इकडील वर्तमान तरी लस्करात महर्गता फार आहे पाच सेर सात सेर पर्यंत धारण धान्याची आहे तूप तेल अडीच सेर प्रो। आहे मीठ अडीच पाइली आहे खुर्दा मात्र पाच टके आहे या प्रांती प्रजन्य अगदी नाही पेरेच जाले नाहीत आपणास कलावे म्हणून विनंती लि।। आहे.

....

(पुढील चौदा ओळी मजकूर अवांतर सबब गाळला.)
शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १७६ तारीख २३-९-१७९०

श्री

नं. ५

सेवेसी सदाशिव रघुनाथ सां। नमस्कार विज्ञापना ता। छ १३ मोहरम पर्यंत मुकाम करवीर सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष श्रीमंत माहाराज राजश्री छत्रपति स्वामी याणी मरातीब व मोर्चेल सांवतास देऊ नयेत व त्याजपासून स्वारी खर्च व सिबंदी खर्चाचा फडशा व्हावा व राजश्री परशरामपंताकडील राजमंडलच्या प्रांताचे फडशे सांप्रतच्या

कराराप्रमाणे व्हावे येविसीचा बंदोबस्त पकेपणे राजश्री नानानी करून पाठवावा नंतर सांवताचा प्रांत सोडावयासी येईल असी बोलणी घालोन राजश्री बलवंतराव याची रवानगी राजश्री परशरामपंत भाऊकडेस केली हे वर्तमान पेशजी सेवकानी विनंती पत्रे सेवेसी पाठविली ती प्रविष्ट होऊन राजश्रीच्या मनोदयातील आर्थ समजल्यात आलेच आसतील व हेही स्वामीच्या विनंती पत्राची व बलवंतराव आपली कामे उलगडून याव-याची मार्गप्रतीक्षा करितात याकरिता सेवेसी विनंती लिहिली व राजश्री बावा व रामजी पाटील यास इकडील सर्व आर्थ लिहिले आहेत ते विनंती करितील ती लक्षात घेऊन सांवताच्या कामाविशी माहाराजास विनंति पत्रे यावी जे राजमंडलच्या प्रांताचे फडशे संप्रतच्या करारप्रमाणे राजश्री परशरामपंताकडून होऊन येतील व वाडीकराकडील मरातीब व मोर्चले व स्वारी सिबंदी खर्च याबिशी राजश्री बाजीराव बच्चाजीपंत व बलवंतराव यासी समक्ष सांगितले आहे त्याप्रमाणे त्यानीही विनंती केलीच आसेल व हालीही करीतिल ती लक्षात घेऊन सांवताचे जाबसालाचा ठराव पुण्यात होऊन रा॥ सदाशिव रघुनाथ याजबराबर याद पाठविली आहे त्याप्रमाणे कामे उलगडून द्यावीं येविशी स्वामीनी पुन्हा आज्ञा करावयाची तथा राहिली नाही याउपरी सांवताकडील जाबसालाचे उलगडे पडावयास दिवसगत लागलिया त्याचे जाबसाल उलगडून देणे सेवकास प्राप्त होतील याकरिता सेवेसी विनंति लिहिले आहे. म्हणोन पत्रे यावयाची आज्ञा जाली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १७७ तारीख ३०-१०-१७९०

श्री

रुमाल नं. ९०
फाईल नं. १४
पत्र नं. ५

शेवेसी बालाजी गणेश खांडेकर दोनी कर जोडून चरणावरी मस्तक ठेऊन सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ २१ सफरपावेतो मु॥ मौजे नवलूर नजीक धारवाड येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष स्वामीचे पत्र सेवकास आले त्यात आज्ञा कीं राजश्री भाऊ यासी आलाहिदा पत्र पाठविले आहे त्याआन्वये फडशा करून देतील म्हणून आज्ञा स्याजवरून राजश्री भाऊ यासी पुसिले त्याणी सांगितले की प्रस्तुत आम्ही धारवाडास लागलो आहो धारवाड हस्तगत जाले म्हणजे दुसरे दिवशी चिंतोपंताची रवानगी करून देतो तोपर्यंत तुम्ही राहात असल्यास राहावे याप्रो राजश्री नाना व तात्या यासी आम्ही लि॥ आहे म्हणून भाऊनी सांगितले याजवरून विनंती शेवेसी लिहिली आहे त्यास धारवाड हस्तगत होईतोंपर्यंत राहावे कीं निघोन यावे हे शेवकास आज्ञा केली पाहिजे स्वामीनी सेवकास आज्ञा करून माहाराज याचे कामाकरिता राजश्री भाऊ याजकडे पाठविले त्यापक्षी कार्य होऊन येईल हा भरवसा माहाराज यासी आहे

आणि आता राजश्री भाऊनी तरी आवकाशाची गोष्ट सांगितली त्यापक्षी स्वामीची आज्ञा आणून आसेच काम न होता निघोन पुण्यास आलो म्हणजे माहाराज यास भरवसा शेवकाचे विनंतीचा राहणार नाही असे दिसते त्यास आणखी राजश्री भाऊ यासी स्वामीनी पत्र आगत्यवादाचे या कार्याविसी पाठवून चिंतोपंतास पुण्यास आणून उलगडा करविला असता माहाराज यासी संतोष होईल राजश्री भाऊनी स्वामीस पत्र लि॥ आहे त्यातील भाव काय असेल तोही श्रुत जालाच असेल सेवकास येथे खर्चास नाही माहाराज याजकडून खर्चास आणवावे तरी त्याचे कामाचा मजकूर लौकर होता दिसत नाही त्यापक्षी तेथे लिहून पाठवावयासी प्रशस्त दिसत नाही स्वामीनी कृपालु होऊन खर्चास देविल्यास प्राप्त होईल आज्ञा करणार स्वाम धणी समर्थ आहेत आज्ञा येईल तैसी वर्तणूक करीन. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १७८ तारीख १२-१२-१७९०

श्री

रुमाल नं. ७३

मसुदा

स्वस्तिश्री राज्याभिषेक ११७ साधारण नाम संवत्सरे मार्गसीर्ष शुध सप्तमी भानुवासरे क्षत्रिय कुलावतंस श्री राजा सिवछत्रपति स्वामी याणी समस्त राजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री माधवराव पंडित प्रधान यासी आज्ञा केली ऐसीजे कसबे संगमेश्वर येथे कैलासवासी तीर्थस्वरूप माहाराज [1] साहेब यांचा वाडा आहे त्या जाग्यावरी हाली राजश्री सदासिव दादाजी मावलंगकर सरदेसाई याणी वाड्याच्या उभ्या जोत्यावरी घर बांधिले म्हणोन हुजूर विदित जाहाले यैसीयास सरकारचे वाडेचे जागेवरी कोणीही घरदार बांधू नये यैसे असता मारनिले याणी घर बांधिले हे ठीक नव्हे तरी सदासिव दादाजी यासी आपणाकडील ताकीद देऊन वाडियाचा जागा मोकला करवावा आणि कसबे मजकूर येथील सरकार बाग जप्तीस असो द्यावी.

लेखांक १७९ तारीख १७-१२-१७९०

श्री

नं. ६

सेवेसी सदासिव रघुनाथ सां नमस्कार विज्ञापना ता छ ९० रबिलाखर पर्यंत मुकाम करवीर सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष सांवत प्रकरणीचे जाबसाल उलगडून यावयाविसी माहाराजास व बाजीराव यास पत्रे स्वामीनी छ २९ रावलची पाठविली ती

१ छत्रपति संभाजी महाराज (इ. स. १६८०-१६८९)

छ ७ रबिलाखरी येथें आली ते लाखोटे जासुदानी दरवाज्यास दिल्हे पत्रे माहाराजानी अवलोकन केली असता जाबसाल उलगडून द्यावयाविसी वकीलास आज्ञा होऊन त्याचे बोलणे सेवकासी घडोन फडशात येत नाही तीन दिवस जासूद आस्तमान परयेत दरवाज्यावर उपासी बसतात त्याची दाद अथवा पोटगीची बरदास्त किंवा पत्राचे जाब द्यावयाचा योग घडत नाही मीही वकीलासी स्वामीचे आज्ञेप्रमाणे बोलत आहे परंतु कामे उलगडून यावयाचा प्रथम दिवस याकरिता शेवेसी विनंती लिहून इकडील सविस्तर मजकूर राजश्री बाबा व रामजी पाटील यास लिहिले आहेत ते निवेदन करून विनंती करितील ती लक्षात येऊन वाडीकराचे कामाचा बंदोबस्त करून द्यावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १८०

इ. स. १७९०

रुमाल नं. ९० फा. नं. १४

पत्र नं. ६ श्री

शेवेसी बालाजी गणेश खांडेकर दोनीकर जोडून सिरसां नमस्कार विज्ञापना यैसीजे करवीराहून माहाराजानी आज्ञा करून शेवकास पाठविले स्वामीची स्वारी कऱ्हाडास श्रीमंत राजश्री पंतप्रतिनिधी याचे लग्नास येणार त्यास कऱ्हाडाहून करवीर बहुत लांब नाही अठरा वीस कोश आहे याजकरिता स्वामीची स्वारी करवीरास व्हावी आणि भेट घ्यावी हे मानस फार आहे याविसी माहाराजानी बहुतच निखालसपणे आज्ञा केली आहे वारंवार स्वामीची स्वारी करवीरानजीक होणार नाही करवीरास येण्याचा संशय स्वामीनी चितात आणिल्यास त्याचा प्रकार माहाराजानी सांगितला कीं दाहा हजार आथवा पंचवीस हाजार फौजेसुधा करवीरात आता जरी आले तत्रापि मी किमपी संशय घेत नाही परंतु मजला भेट देऊन जावे असे फार ग्लान करून शेवकास विनंती करावयासी सांगितली माहाराजानी निखालसपणाचे परियाय सांगितले ते विनंती पत्री किती लिहू ? सविस्तर राजश्री राघोपंतदादा याजवल बोलिलो आहे विनंती करतील शेवकाची विनंती खाजगत आहे तीही दादा करितील स्वाम कृपालु होऊन शेवकास सनाथ केले पाहिजे तर शेवकाची पत माहाराजापासी राहील माहाराजाकडील ग्रहस्त कऱ्हाडास येऊन बसले आहेत त्यास स्वामीचे दर्शनास आणिले पाहिजे इतके रोज शेवकाने कालहरण केले परंतु आता कालहरण करावयासी तोड दिसत नाही आता स्वामीनी कृपाच केली पाहिजे दुसरी तोड नाही कृपा करणार धणी समर्थ आहेत. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

लेखांक १८१

इ. स. १७९२–९३

रु. नं. ७३ श्री

यादी करवीरकर माहाराज याणी सांवत यांजकडील प्रांत घेतला आहे त्याचा अजमासे

आकार सु॥ सलास तिसैन मया व अलफ रु॥

८०००० किले नरसिंगड व भरथगड व ठाणे निवती प्रांत कुडाल येकूण कमपेश.

२०००० तालुके गंधर्वगड व हेरे व तुरुकवाडी नि॥ कमलजाबाई भोसले

———

१००००

सन समान समानीनात प्रांत करवीरकर याणी घेतला तो ता। सलास तिसैन पावेतो साले साहा येकून येकंदर ६००००० रु॥

लेखांक १८२ इ. स. १७९३-९४

नं. ९० श्री

यादी रामोजी राजे सिर्के सु॥ सन आर्बा तिसैन मया अलफ आपले आजे कान्होजी राजे पेशजी सरकारांत चाकरीस होते त्यासमयी सरकारातून पावत होते यण प्र॥ नख्त बीन बटा सालिना रु॥

६००० खासादेखील पालखी शागीर्दपेशा मिळून आ॥ १ येकून

४५००० स्वार आ।। शंमर येकूण शेरा दर आ॥ कारकून सुधा रु॥ ४५० प्र॥.

१००० कापड आखाबा नख्त

———

५२०००

येणे प्रा। सालिना घेऊन चाकरी मानकरियात करीत होते.

लेखांक १८३ तारीख २४-९-१७९४

रुमाल नं. ७६ श्री

फा. नं. ६१

पत्र नं. ३

पै॥ छ १० रबिलावल

सु॥ खमस तिसैन आश्विन

शेवेसी केसो कृष्ण कृतानेक सां नमस्कार विज्ञापना येथील कुशल ता। छ २९ माहे सफरपावेतो शेवकाचे व किले बेलगावचे वर्तमान येथास्थित आसे विशेष आलीकडे

स्वामीचे पत्र येऊन वर्तमान कळत नाही तर सविस्तर ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे यानंतर इकडील वर्तमान तर पर्ज्यन्य दीड महिना जाहला आगदी नाही पिके आगदी× वाळली व पाटलाचे वर्तमान तर आद्यपि प्रथम दिवसच आहे त्यास जांबोटकराचा आश्रा जबरदस्त आहे त्या आर्थी त्याची समजूत होणें कठीण आहे तूर्त जांबोटकर व राजमंडळ-कर वगैरे येक होऊन पांच सात हजार लोक व पांच सातशे राऊत याप्रो सरंजाम घेऊन घाटाखाली सांखली प्रा डिचोली फिरंग्याचा मुल्क जाळून लुटू फस्त केला सांखली गाव मातबर होता आणखी आवाई यैसी आहे कीं तीच स्वारी घेऊन येऊन बेळगांवावर
१
पडावे ऐसे आहे मग आपले पुण्येकडून काय घडेल ते खरं कितुर प्रांतीही ऐसीच तली लागली आहे बागेवाडी तालुक्यातही येक खेडे मारून नेले सारांष चहुकडे तलीचा उपद्रव फार जाहला आहे येकवेल जांबोटकराचे पारपत्य चांगले जाहाल्यासिवाय बंदोबस्त होत नाही कलावे सिबंदी तो खर्च पडतो आणि नाशही होणे तो होतो आण पारपत्यही नाही आता तो जांबोटकर बहुत शेर जाहाले आहेत चहुकडे तल्याचा उपद्रव मांडला आहे त्यास गोडी लागलीसी जाली आहे परंतु येकवेल त्याचे पारिपत्य जाहल्यासिवाय या प्रांतीचा बंदोबस्त होत नाही शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १८४ इ. स. १७९४–९५.

फाईल नं. २
पत्र नं. ४३

यादी सखाराम घाटगे सर्ज्याराव कागलकर सु॥ खमसं तिसैन मया व अलफ.

मानकऱ्या प्रो बोली

जातीची बोली

स्वार

३०० आडहात्यारी उतम व मध्यम कनिष्ट दरआसामीस दरमाहा रुपये

२०० येकांडे दर आसामीस दरमाहा रुपये

———

५००

पैदल रोहिले गाडदी वगैरे माणूस पाहून सिरस्ते प्रो सेरा करार करून द्यावा. आ॥

३००

लेखांक १८५ इ. स. १८०३

श्री

रु. नं. १

फा. नं. ४

नं. ३

सेवेसी रंगराव मोहिते हंबीरराव विनंती विज्ञापना ऐसीजे आम्ही पूर्वीपार सरकारचे पदरचे आहो चतरसिंग बाबा सातारियाहून निघाले ते पाटणास आले पाटणकर याणी जिल्हेदार याचे भयास्तव जमा करून उतरून घालविले ते दोन घटका रात्रीस कुंभारगावास आले त्याजला आम्ही सांगितले कीं तुम्ही येथे राहू नये जिल्हेदार यास समजल्यावर आम्हास अवघड पडेल याजकरिता कांहीं स्वार व लोक तुम्हा बरोबर देऊन डोंगर उतरून पार करून देतो ऐसे सांगत असता ऐकिले नाही आणि फौज बाहेर ठेऊन आपण चौदा खाश्यानसी वाड्यांत गेऊन राहिले ही बातमी ठाणे कोले येथे जिलेदार यास समजली तेव्हा ठाणेदार याणी येऊन राहुटी सिवेवर ठोकून राहिले आणि माहालकरी पाच साहा हजार जमा करून दोनप्रहर रात्रीस दोन हजार लोक लस्करा भोवताले उभे राहून पाच सातसे घोडे व लोक पाडाव करून घेऊन गेले आणि दुसरे दिवशी बोलणार येऊन म्हणो लागले कीं चौदा आसामी आमचे हवाली करावे म्हणोन तीन रोज घोल केला आणि हजार रुपये रोख देतो जामीनकतबा देऊन यास पार करून दिले तो मार लिंगप्पा आपा यास माहित आहे पुढे कोल्हापुराहून खर्चास व पत्रे येऊन आम्हास रोजगाराकरिता राजश्री[1] घेऊन गेले तेथे रघुनाथराव गुजर व नरसिंगराव गुजर व लिंगाप्पा आप्पा यैसे दररोज आम्हाकडे येऊन बोलो लागले की तुम्ही सरकारचे पदरचे असिल्यास सरकारचे निशाणापासी येऊन राहावे तेव्हा रोजगार करवीरकराकडील सोडून वडिंग्याचे मुकामी सरकार निशाणापासी आलो. पाच वर्षे सेवा करोन हालआपेष्टा एक येक दिवसी भोगली असेल ती लिंगापा आपाजी निवेदन करतील.

लेखांक १८६

श्री

रुमाल नं. ७३

फाईल नं. १ बी

पत्र नं. ७६

सेवेसी सखो रामचंद्र कृतानेक सा नमस्कार विनंती यैसीजे ता. छ २१ पावेतो स्वामीचे

---

१ छत्रपति महाराज

कृपावलोकन करून सेवकाचे किले कलानिधी व तो चंदेगड येथील वर्तमान यथास्थित असे विशेष इकडील सविस्तर मजकूर छ ११ रोज भृगुवारची पत्रे लिहून म्हादजी म्हाडीक याजबरोबर पाठविली ती पोहचलीच असतील त्याजवरून सविस्तर विदित जाहालेच असेल पत्रे रवाना केली त्येच दिवशी रात्री दीड प्रहरास हेरेचे ठाणे घेतले कांहीं लोक पलाले व दाहा तीस माणूस सापडले त्याचे शिले भाले घेऊन सोडून दिल्हे ठाणेत राजश्री घनःशामराव देशपांडे याचे चुलतबंधू होते त्यास कैद करून चार रोज तेथेच ठेविले नंतर उसपास लाऊन दिल्हे गंधर्वगडानजीक अडकूर वगैरे किरकोली ठाणी होती ती पेशजीच घेतली आज प्रातःकाली राजश्री व्यंकटराव देसाई जांबोटकर पांच चारशे जमावानिशी इभ्रामपुरास जाऊन ठाणे घातले तसेच कनुरासही ठाणे घातले. राजश्री रत्नाकरपंत दीड हजार स्वार व दोन हजार प्यादा घेऊन छ १८ रोज भृगुवारी संध्याकाली समानगडाहून हेलेवाडीस आले शनिवारी दोनप्रहरी अडकूर बेनझडी पर्यंत तलाव्यास येऊन गेले त्याची याची गोली उडाली नाही काल रविवारी दोनप्रहरी व्यंकटराव देसाई मौजे सिरगाव येथे येऊन सांगोन पाठविले कीं आम्ही श्रीच्या दर्शनास येतो म्हणोन तेव्हा सडेच येऊन देवदर्शन घेऊन जावे म्हणोन आम्ही सांगोन पाठविले तेव्हा वरकड जमाव तेथेच ठेऊन दाहा स्वार व पनास लोक घेऊन आले भेटीस येतो म्हणोन सांगोन पाठविले तेव्हा आम्हीच देवालई गेलो भेट जाली तेव्हा त्याचे बोलणे कीं कमलजाबाई सरकारात आहेत आम्हीही सरकारचे पदरचे बाईची स्थापना व्हावी या अर्थे सरकार शेवा केली सरकारात लिहून आज्ञा आणाबी तरी विलंब लागतो राजमंडलची फौज नजीक आली आम्ही खर्चाचे पेचात येतो याजकरिता सरकार नि॥ तुम्ही आहा त्यास तुमची ठाणी घालून फौज माघारे फिरवावी ऐसे निखालस श्रीचे शफतीनिसी बोलिले तेव्हा आम्ही उतर केले की सरकार आज्ञेसिवाई ठाणी घालिता नये सरकारात लिहितो आज्ञा येईल त्याप्रो सांगतो म्हणोन सांगून निरोप दिल्हा याप्रो आहे आपले विचारास आल्यास श्रीमंत राजश्री नानासाहेबास व तात्यास विनंती करून मर्जी असल्यास पत्रे राजमंडलास त्या तालुक्यात उपद्रव न करणे म्हणोन व जांबोटकर यास ठाणी स्वाधीन करणे व आम्हास ठाणी घालणे म्हणोन घेऊन सांडणीस्वार जलद येऊन पोहचेसा पाठऊन द्यावा इतकाच जाबसाल होऊन येथे यावयास आठ दाहा रोज अवकाश यास्तव राजश्री बहिरवराव यास पत्र सोलापुरास येथे येणेविसी पाठविले आहे ते आल्यावर आम्ही व ते मिलोन राजमंडलचे फौजेत जाऊन थोंपेल तेथवर थोपावे ऐसे आहे नाहीतरी त्या प्रांतामुले या तालुक्याची नासाडी होत्ये इकडील गावची रयेत आपघाकाने पलती याजकरिता स्वामीनी पत्राचे उत्तर सत्वर पाठवावे दहावे रोजी येऊन पोहचले पाहिजे त्याचे याचे कज्यामुले मुलखाची तुडवण होती लावणीचे दिवस अशात गडबड जाहाल्यास रयतेची नांदणूक राहिली छ १७ रोज गुरुवारी दोनप्रहरी नागापा देसाई याचे पुतण्याने मौजे आसगावचे वाडेवरील हणबर गुरे घेऊन कोकरेच्या रानात गुल्यास गेले होते तेथून हणबरास गुरे पंचवीस व शेरडे पंचवीस होती त्यासुधा धरून

उसपास घेऊन गेले अद्याप हणबरास सोडिले नाहीत सरकारची पत्रे वाडीकरास घेऊन ढालाइत आल्यासिवाय बंदोबस्त होत नाही त्यास वाडीकरास सत्वर पत्रे येऊन बंदोबस्त होई ऐसे करावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १८७

श्री

रुमाल नं. ७३

राजश्री बलाजीपंत नाना
गोसावी यासी

सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य स्नेहपूर्वक कमलजाबाई भोसले सरदेसाई प्रो कुडाल व माहालानिहाय दंडवत विनंती येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन आज्ञा केली पाहिजे विशेष सांप्रत पत्र येऊन परामृश होत नाही तर यैसे न करिता सदैव पत्र प्रेषणी संतोषवीत असीवे यानंतर आमचे स्वशूर कैलासवासी नाग सांवत भोसले सरदेसाई पा कुडाल व माहालानिहाय हे वाडीहून रुसून वरघाटी येऊन शामलासी बिघाड करून तो चांदगडे हा मुलुक जबरदस्तीने हस्तगत करून बलकाऊन राहिले पुढे त्याचा काल जाहाला नंतर आमची सासू भागीर्थीबाई भोसली याणी जमावाचा जथ करून च्यार लोक चांगले जमाबंदी राखून संवस्थान जतन केले तेसमई सरकारची स्वारी या प्रांती आली तेव्हा धारवाडकराचे विद्यमाने कैलासवासी नानासाहेब व भाऊसाहेब यासी सख्य करून तह करून घेऊन आर्धा तालुका सरकारात दिल्हा व आर्धा आपल्यास ठेऊन स्वस्त राहिली आम्हास कोणाची तोसीस लागो नये लागल्यास सरकार तर्फेने बंदोबस्त व्हावा यैसा करार सरकारचा आहे यैसे असता आमची सासू वारली व खाशाचाही काल जाहाला त्याच्या समाचारास म्हणोन वाडीहून राजश्री रघुनाथ सांवत आले त्याणी आमचे सभाधान करून जाबे ते केले नाही आण आम्हासी खटला करून मनस्वी वर्तणूक करू लागले आम्ही सामोपच्यारे च्यार गोस्टी सांगितल्या आण आम्हास पुत्र पोसणा द्या आण ज्याप्रो सासूबाईकडे चालले त्याप्रो तुम्ही आम्ही मर्यादेने आसावे यैसे सांगताच कैद करून ठेवावयाच्या लागात आले तेव्हा सरकार तालुका नि॥ धारवाडकर याचे वि॥ सोलापुरी राहिलो त्याणी ठाणी बालाहकविली पुढे रघुनाथ सांवत याणी स्वंवस्थान गमाविले आण स्वस्त बसले तदनंतर राजश्री परशरामपंत भाऊ याणी स्वामीस आमची कुली हकीकत लेहून पाठविली त्यासही आज्ञा आली कीं आमची ठाणी घालोन द्यावी इतकेत करवीरकर याणी तालुका घेतला त्यास आम्हाकडील कारकून च्यार वर्षे खराब होत आहे आम्हीही दोनच्यारवेला विनंती पत्रे पाठविली कांहीं जाबसाल होत नाही त्यास सरकारची पाठ केली असता आमची आनास्ता होऊ नये करवीरकराचा जाबसाल कोणताही आम्हाकडे नाही सरकारच्या तहअन्वये आजवर चालले

तैसेच आमची रांडरोटी सर्वांनी कृपा करून चालवावी त्यास कोलापुरकरांचा तो आर्थ तेथे कोणी शाहाणा मनुष्य नाही आणि तेथील इमानही शाबूत नाही आम्ही त्यासी कशास बोलावे ? आमचे भांडण लोभाचे सरकारी आहे समर्थांनी स्थापना केली ती कोणाच्याने दूर करवेल ? हा आभिमान सरकारात आसोन धारवाडकर यास आज्ञा जाहाल्यास ते बंदोबस्त करून देऊ म्हणतात वाडीकराचे सोबतीस आमचे काम ठेविलेस आमचे प्राण वाचत नाहीत आण सरकारचाही लौकीक यात चांगला होत नाही फार दिवस जाहाले हैराणगतीत आहो धण्याविना आम्हास दुसरा आधार कोणाचा किमपि नाही निर्बल शबलंब राज्या यैसे आहे आता कृपा करून आमची स्थापना पूर्ववतप्रो करून देणार स्वाम समर्थ आहेत येविसी निक्षूण आज्ञा करणे ती करावी इकडील मजकूर राजश्री बाबा फडके व राजश्री आनंदराव चाफेकर विदित करीत आहेत हाली राजश्री सखो रामचंद्र सेवेसी निवेदन करतील बहुत काये लिहिणे. कृपालोभ कीजे हे विनंती.

लेखांक १८८

श्री

रुमाल नं. ७४
फा. नं. ११
पत्र नं. १८

विज्ञापना सखाराम घाटगे कागलकर सर्ज्याराव आले आहेत त्याचे भेटीविसी काल रात्री विनंती केली होती घेऊन येणे म्हणोन आज्ञा जाली त्यावरून आणिले आहेत. आज्ञा व्हावी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १८९

श्री

रुमाल नं. ७३
फाईल नं. १
पत्र नं. ६७

शेवेसी बापूजी शेषाद्री दिा अमिरलउमराव विज्ञापना ऐसीजे सरकारातून आम्हाकडील सरंजामाचे माहालाची जप्ती जाहाली होती त्यास स्वामींनी कृपालु होऊन मोकलीक करून दिल्ही परंतु सोलापूरकर वगैरे याजकडे ठाणी व जप्तीचा यैवज येणे तो आमचा आम्हाकडे देविला त्यास हिशेब आम्हास समजोन त्याप्रमाणे यैवज व ठाणी आमचे हवाली व्हावी ती होत नाही व यैवजास ठिकाण नाही यास्तव कृपा केल्याप्रमाणे येविसीची निक्षूण ताकीद होऊन ठाणी आमचे हाती येई तो करणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १९०

श्री

रुमाल नं. ७६
फा. नं. ५०
पत्र नं. ३

श्रीमंत राजश्री नाना
साहेब साबाचे सेवेसी

विनंती सेवक बाल सांवत भीरवाडेकर हावलदार किले पारगड दंडवत विज्ञापना ता। छ २५ शाबानपावेतो साहेबाचे कृपेकरून सेवकाचे व किले मजकुरचे वर्तमान येथास्थित आसे विशेष इकडील वर्तमान राजश्री त्र्यंबकराव सुभेदार याजकडील कारकून हवाल्याचे कामावर होते ते घरास गेले सर्व जाबसाल आमचे विचारे होत आहे परंतु गडकरी लोकाचा व हुजूर हशम लोकाची रोजमुरेची नेमणूकेप्रमाणे भर होत नाही तशात सालमजकुरी फिरंगी व भोसले याचा हर्शामर्ष होऊन प्रांत उद्वसले यामुले किलाचे तनखेचा यैवजास ठिकाण नाही यामुले लोकाचा नित्य गवगवा परंतु धण्याचे पुण्यप्रतापे बंदोबस्तास आंतर पडावयाचे नाही किल्लाची चौकी पाहरा करून सर्व हुशारीने आहो भोसले फोंडे प्रांती गेले होते फिरंगी व वाडीकर याची लडाई होऊन भोसले माघारे येऊन किला नजीक दोन कोशावर पांच हजारानिशी उतरले आहेत बहिरंगी किलाकडे त्याचा घरोबा आहे परंतु त्याचा मनसबा येकच आसा ठर (ला) नाही मागाहून होईल वर्तमान ते सेवेसी वरचेवर निवेदन होईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञप्ति.

लेखांक १९१

श्री

रुमाल नं. ७७
फा. नं. १
पत्र नं. ७

सेवेसी त्रिंबक बालकृष्ण मुकाम अंजणवेल सां। नमस्कार विज्ञापना तागायत छ २५ माहे जिल्हेज पावेतो सेवकाचे व किलेहायचे व प्रांत मा।रचे वर्तमान येथास्थित असे विशेष छ ४ जिल्हेजचे आज्ञापत्र सादर जाहले तेथे आज्ञा कीं किले विशालगड येथील सरंजामाचे अमलाची जप्ती राजश्री महिपतराव कृष्ण तालुके रत्नागिरी याजकडे सांगितली आहे तरी तुम्ही तालुके अंजनवेल येथील पनास माणूस पोटाची बेगमी करून मा।रनिल्हेकडे सत्वर पाठवून देणे म्हणोन आज्ञा त्याजवरून आज्ञेप्रमाणे पंनास माणसाची रवानगी केली आहे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १९२

श्री

रुमाल नं. ७७
फाइल नं. ३
पत्र नं. ४

शेवेसी आनंदराव गणेश चापेकर साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १७ रजबपावेतो स्वामीचे कृपावलोकने करून शेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष.
विज्ञापना लिहिली आहे कीं किले कलानिधीस सोंधे प्रांतातील जमेदाराची सूत्रे आली होती त्याविसी धण्यास विनंती केली आज्ञा जाली कीं राजश्री परशरामपंत भाऊस पत्र देतो त्याचे विचारे करणे ते करावे त्यावरून स्वामीचे पत्र घेऊन पाठविले ते पत्र घेऊन रा। सखो रामचंद्र धारवाडास गेले ज्या ठाणियाची सूत्रे होती ती कामगिरी दुसरियाने कबूल करून सनदा घेऊन गेला तेव्हा राजश्री भाऊनी किले सदासिवगड व आकोले सिवेश्वर या प्रकरणी सनदा पत्रे करून देऊन रा।। केली येक पैसा खर्चास दिल्हा नाही व सरंजामही कांहीं हुजूरचा दिल्हा नाही सरकार शेवा कांहीं घडावी म्हणोन सखोपंत याणी कबलात करून निघोन आले किले मजकुरी येऊन दाहा पांच हजार रुपये कर्ज वाम करून हजार दीड हजार माणूस ठेविले व त्या प्रांतातील एक दोन जमेदार साती करून घेऊन गेले सरंजाम सुधा किले सदासिवगडचे सूत्र करून गेलें किल्यास गेलो तो कोंकणपटीहून आरमारकरी दोन अडीच हजार सरकारी सरंजाम आला ते व हे येक येकत्र होऊन प्रांताची जप्ती करून किल्याखाली खुसकीस पावले किल्यावरील लोक यास येऊन भेटले याणी तयार होऊन दुसरे रोजी किल्यावर जावे तो किल्याचे हवालदार याणे फिरंगी याकडे सूत्र करून फिरंगी याकडील जमाव जलमार्गे आणून किल्यावर घेतला त्यास सरकारचे सूत्र लागले असता टोपीकराने ही गोष्ट करू नये याचे कारण किल्ला ज्याचा हाती लागेल त्याचा ही गोष्ट तो प्रमाण परंतु टोपकराचा व सरकारचा श्नेह सरकारचा प्रांत लाख दोन लाख रुपयाचा दाबला आहे तिकडील सूत्रेहि धण्याकडे येतात परंतु श्नेह रक्षण करावा या भावी धणी मनावर घेत नाहीत येकलासीच चालवितात येक दोनवेल कार्यानिमित्य वकील गेले त्याचा अनादरही जाला परंतु धन्यानी चितांत विशाद आणिला नाही निमित्य कीं श्नेह चालविन्यात उपयोग त्यास टोपकर तो वेलपाहून आपले कार्य साधितो कागदोपत्री उगाच श्नेह दाखवितो आसे आहे त्यास कोंकणपटी-तून सरकारचा जमाव आला त्याचा बदलोकी व आम्हाकडील कारकून कर्जदार जाला येकदोन शेवा सरकारी शेवकापासोन घडल्या परंतु कर्जाचा बोभाट हुजूर आला नाही परभारेच उगवण जाली या कामात मात्र लचांड जाले आहे सखोपंताकडून पत्रे आली त्याचा अर्थ या धण्याजवल प्रविष्ट केली होतीच परंतु कांहीं आज्ञा जाहाली नाही त्यास आखेरीचे दिवस टोपकरावर बिघाडाचे दिवस नाहीत परंतु सिलसिला आसावा यास्तव

वकीलातीस कोणी का + + + णूस साहेबी योजिला पाहिजे वकील तेथे + सावा येतद्दीशी कोणी रद्बद्ल करितात परंतु ते चांगले नाही याविसी सिवराज नीतीतील वचन बोवी आहे धण्यास कलावी

॥ वकील ठेवा परदरबारी ॥
॥ तेणे बातमी समजे खरी ॥
॥ जेशी बंदुखेची मोहरी ॥
॥ निशाण मारी निश्चये ॥ १ ॥

समजण्याविसी धणी इस्वररूप आहेत मी शेवकाने लिहून कलवावयाची योग्यता माझी नाही परंतु शेवाधर्म आहे केलेल ती स्वाम कल्याणरूप सुचवीत असावे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

लेखांक १९३

श्री गणराज

रुमाल नं. ९०
फा. नं. ४३
पत्र नं. ७

सेबेसी व्यंकटराव जिवाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ ७ जोवल पावेतो सेवकाचे व प्रांत वसई येथील वर्तमान येथास्थित असे विशेष इंग्रजाची कुमक असावी या आस्थेने कुलाब्याहून राजश्री जयेसिंग आंगरे याजकडून बालाजी पांडुरंग कारकून मुंबईस येऊन जनरालाची भेट घेऊन नजर केली तो जिनस माघारा कारकुनाकडे पाठविला मा॥रनिलेचे व इंग्रजाचे बोलणे अद्यापि जाहले नाही परंतु लौकिकात वदंता कुमक देण्याविषयी इंग्रज बंगालचे आज्ञेवर घालवील असे आहे व खेमसांवत याचे पुतणे राजश्री सोमसांवत हेट प्रांतीं अधिकारावर आहेत त्याचे पुतणे बालसांवत व राव सांवत येकत्र होते त्यास मागे पुढे अधिकाराकरिता कलह करतील हा अंदेशा चितांत आणून मारावयाचा विचार केला होता हे वृत उभयतास समजताच राव सांवत निघोन पुणियाकडे गेले व बाल सांवत च्यार आसामीनसी मुंबईस येऊन दाखल जाले आहेत जनराल याची भेट घेऊन पुणियास राजश्री पाटीलबावाकडे जाणार हे वर्तमान मुंबईहून कारकुनाकडून लिहून आले ते निवेदन व्हावे म्हणोन शेवेसी लिहिले आहे मागाहून बातमी येईल. ती लिहून पाठवीन. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

लेखांक १९४

श्री

रुमाल नं. ३
फा. नं. ४
नं. ६

यादी करवीरकर याचे वर्तमान बंदोबस्ताविशीचे सांगितले विठलभट पुजारे यानी

९ सरमजामे यानी चाकऱ्या कोलापुरी माहाराजापासी करावयाच्या ठरल्या त्या

१ कागलकर घाटगे
१ इचलकरंजीकर घोरपडे
१ तोरगलकर
१ सिरगांवकर
१ दशरीकर देश + +
१ वंटबरीकर देसा +
१ बावडेकर पंत आं + +
+ + + + +
१ निपाणकर याचे बोलणे चालले आहे
—
९

१ करवीर येथील पलटणे दरोबस्त उठोन गेली
१ चिकोडी मुलुकसुधा हवाली किले कोटसहित पूर्ववत प्रो केले
१ वकील रामराव कानडे आहेत
१ नाना रत्नाकर व हैबतराव गायकवाड यानी कारभार करावा
१ दरम्यान जामीन करवीरकर यास आपा लागू आहेत
सरकारास व साहेब लोकास वस्त्रे करून दरोबस्त निघोन गेले
कोणीयेक राहिला नाही मुलुख स्वाधीन केला
१ भाऊशास्त्री व निपाणकर व मिरजकर यानी चौदा लक्ष रुपये द्यावे
इंग्रजाचे स्वारी खर्चास यानी मसलत उभी केली सबब.
१ माहाल मुलुख पै।। रयत लुटली स।। तेरा लक्ष जमा जाहले त्या पै।। तीन लक्ष रुपये सरकार जमेस पोत्यास आहेत बाकी + + (एक ओळ मजकूर फाटला आहे) + + तो ऐवज + + सबब घरांतील + + (तांब्रा पि)तल व रुप्याची भांडी + + काढून अजमासे केला तो पनास हजार रुपया किंमत जाली. उपरांतीक ती भांडी परत करून तो ऐवज बहाल केला.

लेखांक १९५ तारीख १९-७-१८२१

श्री

फाईल नं. ६

नं. ४

जाहीरनामा श्रीमन्माहाराज छत्रपति सरकार राजमंडल हुजरून इलाका सातारा येथील समस्त लोकास समजावयाकरिता आज्ञा केली यैसीजे सयाजी बाजी मोहिते व त्याचे भाऊबंद व लेक मिलोन साहा आसामी याणी कोलापुरी संभाजी राजे यास छ १५ सवाली दग्याने मारोन पलोन गेले आहेत याजकरिता मोहिते मजकूर याचा जो कोणी तलास करून कोणे ठिकाणी आहेत त्याची बातमी पकी सांगोन त्यास दाखऊन देईल आगर धरून आणोन हजर करील त्यास सरकारातून बक्षीस दोन हजार रुपये मिलेल हे सर्वास समजावयाकरिता जाहीरनामा सादर केला असे जाणिजे छ १८ सवाल सु॥ इसने आशरीन मयातैन व अलफ तारीख १९ जुलई १८२१ इसवी.

लेखांक १९६ इ. स. १८३२-३३

श्री

नं. ११

यादी सरकारची व करवीरकर याच्या भेटी होऊन मेजवानी व्हावयाची त्यास मधे तोफेचे बार करावयाचे सु॥ सलास सलासीन मयातैन

७५ सरकारातून करावयाचे त्यास अडीच हजार रुो नेमिले सुमार त्यात करावे

२५ भेटी समई

५० मेजवानीस

२५ येताना

२५ जाताना

—

५०

० बलवंतराव राजे सेनापति याचे इराद्या प्रमाणे त्याजकडील कोणी असल्यास त्या प्रो बार करावयाचे

१०१ करवीरकर याणी बार करावयाचे
    ५१ भेटी समई
    २५ सरकारचे भेटीसमई
    २१ आपासाहेब महाराज
     ५ बलवंतराव राजे सेनापति याचा पूर्वजाचा मजकूर माहीत आहेच व हली दरज्या कसा व वागणूक कसी हे यैकोन वडिलाच आहे सबब
    —
    ५१
५० मेजवानी समई
    २५ येताना
    २५ जाताना
    —
    ५०
    —
    १०१

लेखांक १९७ तारीख १४–१–१८४१

रुमाल नं ६ श्री
फा. २
नं. ८

यादी सदासिवपंत वकील नि।। श्रीमन् माहाराज राजश्री छत्रपति माहाराज सरकार करवीर सु।। इहिदे आर्बैन मयातैन व अलफ

१ श्रीमन्माहाराज राजश्री छत्रपति साहेब याची स्वारी सातारेहून श्रीचे दर्शनास करवीरास येणार येविसी कंपनी सरकारातून मनाई नाही
सातारेहून रसिदंट साहेब याजकडून याद आसाहेबाकडे आली त्यात खर्च न पाडावा यास्तव सरंजाम आपले हदीत ठेवून सडेनी येऊन श्रीचे दर्शन घेऊन जातील असे लि।। आहे त्यावरून आसाहेबानी समक्ष आम्हास सांगितले व हुजूरचे थैलीचे उत्तर इतमाम ठेऊन सडेच येऊन जातील असे लि।। त्यास त्याचे येणे करवीरास श्रीचे दर्शनास बहुत दिवसानी होत आहे त्यापेक्षा इतमाम ठेवून सडेनी येऊन जाणे हे इकडील लौकीकास नीट नाही याजकरिता माहाराज याची स्वारी इतमाम सुधा येऊन श्रीचे दर्शन घेऊन व हुजूरच्या भेटी होऊन जाणे व्हावे म्हणजे लौकिकास नीट असा हुजूरचा मनोगत आहे तरी येविसी मेहेरबान रसिदंट साहेब यासी आसाहेबानी मेहेरबानगी करून लि।। पाहिजे मि।। पौष वद्य ७ रोज गुरुवार शके १७६२ मु।। सौंदुती तालुके परसगड.

लेखांक १९८ तारीख ११-१०-१८४४

रुमाल नं. १

श्री गुप्त मजकूर

नं. ४४७

विनंती विशेष माहाराज सरकारास हाजरत साहेब बहादूर याचा सलाम प्रविष्ट करून श्रुत करावे कीं बेळगांवचे पोलिटिक्याल यजीट न्यूस साहेब याचे खासगी गुप्त पत्र तारीख ७ आक्टंबरचे सामानगडाचे फौजेतून हाजरत साहेब बहादूर यास येऊन पोहचले त्यात त्याणी लिहिले आहे कीं सामानगडवाल्यासी व इंग्रजी सरकारचे फौजेसी लढाई चालली आहे तो किला लवकरच सर होईल व करवीरकर बदलून मुख्य कारभाऱ्यास कैद केले आणि दंगा करू लागले आहेत हे मालूम जाले आहे परंतु सामानगडवाल्याचा पुरा बंदोबस्त केल्यावाचून इकडून कोलापुराकडे फौज पाठविता येत नाही चोहोकडून इंग्रजी सरकारची फौजही मदतीस देतच आहे सर्वही बंडखोराचा लवकरच बंदोबस्त होईल या फौजेत स्वार लोक कमती आहेत यास्तव सातारचे महाराज सरकार हरवख्त आम्हास बहुत मदत करतात त्यास हाली त्यानी मेहरबानी करून कांही स्वार कुमकेस पाठविले असता फार उपयोग होईल सोलापुराकडूनही स्वार येणार आहेत त्याजला कांहीं अवकाश लागेल म्हणोन लिहिले आहे त्यास करवीरचे बंडवाले सातारा सरहदीपर्यंत येऊन पोहोचल्याचे वर्तमान माहाराज सरकारातून लिहून येते त्यास इकडील सरहद्दीचा बंदोबस्त बहुत हुशारीने राखणे फार जरूर आहे येविसी महाराज सरकारानी सदरहू मजकूर पुरा दिलात आणोन सातारा सरहद्दीचा बंदोबस्त राखोन कांहीं स्वार लोक इंग्रजी सरकारचे फौजेस मदतीस पाठवावे ते स्वार परवाचे दिवसी येथून करनेल ब्रोफसाहेब तिकडे फौज घेऊन जात आहेत त्याजबरोबर गेल्यास नीट पडेल.
तारीख ११ आकटंबर सन १८४४ इसवी

येशवंत कृष्ण

लेखांक १९९ माहे आक्टोबर इ. स. १८४४

रुमाल नं. १

फाईल ९

नं. २५

कोलापुराकडील बंडाचे बंदोबरतास फौज जात आहे त्याचबरोबर सातारा येथील इंग्रजी सरकारच्या तोफखान्यातून दोन तोफ द्याव्या असे हजरत साहेब बहादूर याचे दिलातून आहे.

लेखांक २०० तारीख ५-११-१८४४

श्री

नं. ७

हाजरत खुदावंद रसिदेंट साहेब बहादूर

इ॥ सातारा

खावंदाचे खिजमतीस अर्जदास्त फिद्वी लक्ष्मण काळे मु॥ लस्कर करवीर बंदगी कुरनिशात खिजमतीस अर्ज करितो ऐसाजे आजपरयंत फौजेचा मुकाम करवीरास होता आता उदईक तारीख ६ नवंबरचे रोजी पहाटे चार वाजता येथून कूच होऊन कागल येथे मुकामास जाणार आहो जनराल डिलीमोट साहेब याची फौज सामानगडाहून कूच होऊन भुदरगडावर ल्ढाईस जात आहेत त्या फौजेस कर्नेल ब्रोफसाहेब याची फौज जाऊन मिळणार आहे व इकडील बंडा प्रकर्णी मजकुराची कलमे.

१ भुदरगडावरील कांही थोडेसे लोक बोलण्याकरिता फार करवीरास आले त्यातील दोन आसामी मानकरी लोक काल तारीख ४ चे रोजी अस्तमानी करनेल आऊटराम साहेब याजपासी बोलावयास आले त्याच्या बोलण्यात उन्मतपणा दिसल्यावरून आऊटराम साहेबानी त्या दोन्ही आसाम्यास कैद करोन ठेविले त्याजकडून आज जबान्या वगैरे लिहविल्या त्यातील तातपरीय इतका ऐकण्यात आला कीं बाबाजी आहेरकर याणे सतेचालीसे रुपयाची चिठी भाऊसाहेब याजवर दिल्ही भाऊसाहेबानी च्याळीसे रुपये एका सावकाराकडून देविले त्या सावकारास कोगनळीं माहाल लाऊन दिल्हा व सातसे रुपये दुसरे सावकाराकडून देविले कलम.

२ भुदरगडवरील लोकानी आतून असा बेत ठेविला आहे कीं करवीरकर माहाराजाचा धाकटा मुल याजला कोणास न माहित होत गुपचिपीने पळवून भुदरगडावर न्यावे यासाठी आतून जागोजाग माणसे वेष पालटून पाठविले आहेत म्हणोन मला आज पहाटे आपले लोकाकडून समजले त्याचवेळेस मी हजरत ब्रोफसाहेबास कळविले. कलम.

३ करनेल आऊटराम साहेबानी काळे पलटणीच्या च्यार कंपण्याचे लोक आज आनीक सकाळीं शहरात बसावयास नेऊन चौकी पाहऱ्याचा मजबूत बंदोबस्त करून आले. कलम

४ भुदरगडचे सभोवती आसपास झाडीझुडपे फार दाट आहेत ते तोडावयाकरिता फौजेपैकी कांही लोक गेले होते त्या लोकासी भुदरगडवाल्याकडील लोक खाली तटासी होते त्याणी येऊन दंगा केला म्हणोन ऐकिले. कलम

तारीख ५ नवंबर सन १८४४

लेखांक २०१ तारीख २२-१२-१८४४

श्री

फाईल नं. ८
नं. ६

मेहेरबान रसिदेंट साहेब बहादूर
इलाखा सातारा स॥चे सेवेसी

अर्जी नारायणराव बिन बापूजी निकम देशमुख पा। कसबे सिराल पेटा वालवे इलाख सातारा सु॥ खमस आर्बेन मयातैन व आलफ लिहून दिल्ही अर्जी ऐसीजे राणोजी हवालदार दळवी किले पनाळा इलाख। करवीर याची मुलेलेकरे पनाळगडचे लढाईचे पूर्वी मौजे पारेले इलाखा करवीर येथे राहिली होती ती लढाई जाहल्यानंतर माहेरास कोकरुड पो सिराळ इलाखा सातारा येथे गेली.
तारीख २२ दसंबर सन १८४४

लेखांक २०२ इ. स. १८४४

श्री

रुमाल नं. ३
फा. नं. २ गुप्त नं. ७
नं. ११८

यादी सरकार दौलतमदार कंपनी इंग्रेज बहादूर सन १८४४ इसवी बेळगावाहून पोलिटिकल यजींट न्यूस साहेब त्या नकलेत व पत्रात अभिप्राय कीं सुभानजी निकम याणी कांही माणसे जमवून बेळगावचे कलीकटरीतील आकीवाट ता॥ चिकोडी या गावावर ठाणे घालण्याची तजवीज चालविली होती त्याजला धरण्याचा यत्न करावा असे आम्ही कोल्हापूरचे कारभारी यास लिहिले आहे व ती आसामी हाली सातारा इलाख्यात श्रावण शु॥ १२ मौजे खेड येथे मांग रामोसी वगैरे चाळीस पनास माणसाचा जमाव करून होता आणखी मांग रामोसी वगैरे लोक जाजती जमा करण्याकरिता गेला आहे असे पन्हाळ्याचे मामलेदारास बातमी लागली त्यास त्या अपराधी लोकास धरण्याकरिता कोल्हापूरचे कारभारी कांहीं लोक पाठविणार आहेत त्यास आम्ही विनंती करितो कीं आपण मेहेरबानगी करून सातारियाचे महाराज सरकार याजला सांगून सुभानजी निकम वगैरे बंडवाले लोकास धरण्याकरिता लोक पाठवून द्यावे.

— — — —

सूची भाग ४

विभाग (अ)

व्यक्तीपुढील आंकडे लेखांकांचे आहेत

विभाग (ब)

